म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र. ६३२

...ाठी ग्रंथ संग्रहालय
...धन मंडळ, ग्रंथ क्र. ४

# मुंबईचें वर्णन

लेखक :

श्री. गोविंद नारायण माडगांवकर

संपादक :

प्रा. नरहर रघुनाथ फाटक

REFBK-0012191
BK-0012191

सन १९६१

१२१९१

७२७०१
१९९
७/११/६०

७५११९
१७/३/६९
433

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र. ........ दिनांक ........
क्रमांक ........ नों. दि. ........

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध शाखा
१८५०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७५११९ दि: ........
क्रमांक 433 नों. दि: १७/३/६९

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय
इतिहाससंशोधन मंडळ ग्रंथ क्र. ४

# मुंबईचें वर्णन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. नं. 12191
शाखा

लेखक :

श्री. गोविंद नारायण माडगांवकर

संपादक :

प्रा. नरहर रघुनाथ फाटक

REFBK-0012191

REFBK-0012191

इतिहास संशोधन मंडळ
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय
ठाकुरद्वार, मुंबई २

प्रकाशक :

श्री. वासुदेव विष्णु भट
प्रमुख कार्यवाह
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय
ठाकुरद्वार, मुंबई २

आवृत्ति दुसरी : १९६१

किंमत रु. आठ

मुद्रक :

म. शं. साठे
दी प्राज्ञ प्रेस
वाई ( सातारा )

# एडवर्ड ऐ. हावर्ड इस्कायर्. एम्. ए.

## मुंबई इलाख्याचे डैरेक्टर आव्ह पब्लिक्

## इन्स्ट्रक्शन् यांस.

साहेब,


एतद्देशीय भाषेंत शालोपयोगी ग्रंथ सांपडण्याची पुष्कळ काळापासून फार अडचण पडली होती, ती आपण उत्तम प्रकारचीं क्रमवार पुस्तकें तयार करून दूर केली; तसेंच ग्रंथ करणाऱ्यांस व छापविणाऱ्यांस उदारपणें आश्रय व उत्तेजन दिलें; आणि एतद्देशीय लोकांस विद्येची अभिरुचि लावण्याकरितां फार झटत आहां; हे आपले उपकार कृतज्ञतापूर्वक स्मरून हा लहानसा ग्रंथ आपणास नजर करितों.

आपला नम्र व आज्ञापालक सेवक

गोविंद नारायण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
संदर्भ शाखा
अ. क्र. ...... विभाग ........
क्रमांक .............. नों दि. ..........

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
नौपाडा शाखा.
अ. क्र. ........ विभाग ........
क्रमांक ........ नों. दि. ........




इ. स. १८६३ मालच्या 'मुंबई' चें मानचित्र

# पुस्तकाचा अल्प परिचय

इंग्रजी राज्याच्या पहिल्या पंचविशीत ( १८२० नंतर ) मुंबई शहरामध्यें जे लोकहिताच्या कळकळीचे साहित्यसेवक उदयास आले, त्यांत ' मुंबईचें वर्णन ' या ग्रंथाचे लेखक प.वा. गोविंद नारायण माडगांवकर यांना पुष्कळच वरचें स्थान द्यावें लागतें. माडगांवकरांच्या लेखन कार्याची जी यादी सोबत जोडली आहे तिच्यावरून त्यांच्या हातून घडलेल्या साहित्याची कल्पना येईल. त्यांचें प्रत्येक पुस्तक मराठी जन्मभाषेच्या जनतेला कांहींना कांहीं उपयुक्त बोध व्हावा अशा उद्देशानें लिहिलें गेलेलें आहे. त्या सर्वांत ' मुंबईचें वर्णन ' या मोठ्या ग्रंथाचें महत्त्व विशेष मानलें पाहिजे. ज्या काळीं मुंबई शहराची माहिती पुरविणारीं साधनें अलीकडच्या काळा-प्रमाणें उपलब्ध नव्हतीं, त्या काळीं मिळालीं तीं साधनें व स्वतःचें अनेक वर्षें चाललेलें सूक्ष्म अवलोकन यांच्या साह्यानें मुंबई शहरासंबंधी बहुतांशीं सर्वांग परिपूर्ण आणि सविस्तर ग्रंथ लिहिला जावा, याचें आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाहीं. माडगांवकरांनीं कित्येक साधनांचा उल्लेख केला आहे, त्यावरून त्यांच्या समोर मुंबई शहराचा प्राचीन इतिहास निदर्शनास आणणारीं बखरीसारखीं कांहीं प्रमाणें उपलब्ध असल्याचें दिसून येतें. जेव्हां ( १८६३ मध्यें ) हें पुस्तक प्रसिद्ध झालें, तेव्हां इंग्रजीं भाषेंत मुंबई विषयीं चांगलीं पुस्तकें फार नव्हतीं. अशा तऱ्हेच्या ग्रंथलेखनाला साह्य करणारीं कोणती सामग्री असू शकते याचा निर्देश माडगांवक-रांनीं आपल्या प्रस्तावनेंत केलेला आहे. त्या सामग्रीचा पुरेसा आधार जवळ नसतां माडगांवकरांनीं आपली ग्रंथरचना शेवटास नेली, तिचा उद्देश त्यांनी प्रस्तावने-मध्यें व्यक्त केलेला आहे, तो जिज्ञासूंनीं पहावा एवढेंच नव्हे तर सारी प्रस्तावना काळजी घेऊन वाचावी, अशी शिफारस करण्याच्या योग्यतेची ती प्रस्तावना आहे.

आज मुंबईची माहिती देणाऱ्या इंग्रजी, गुजराथी इत्यादि भाषेंतील ग्रंथांची संख्या पाहूं गेल्यास ती सहज शंभराच्या घरांत असल्याचें आढळतें. माडगांवकरांनीं आपला ग्रंथ लिहिला, त्यानंतरची ही भिन्न भाषांतील पुस्तकें आहेत. कारण मुंबईच्या औद्योगिक विकासाला १८६३ नंतर थोड्या वर्षांनीं वेग चढला. १८६५ सालीं मुंबईतील व्यापाराचें दिवाळें वाजून जी हाकाहाक उत्पन्न झाली ती संपण्याला मोठासा कालावधि लागला नाहीं, पण ती आटपल्यावर मुंबईच्या उत्कर्षाचा वेग वाढला आणि मुंबई शहराच्या वाढीचें भिन्न भिन्न अंगांनीं कौतुक सांगणारी पुस्तकें लिहिलीं गेलीं. पण या सर्व अंगाचें ज्ञान बीजाच्या किंवा लहानशा अंकुराच्या रूपानें माडगांवकरांच्या प्रस्तुत पुस्तकांत सांठविलेलें आहे. मुंबई शहरांत पहांटेपासून मध्यरात्री पर्यंत जो निरनिराळ्या प्रकाराचा कोलाहल चालतो, त्यावर ‘ मुंबईचा गोंगाट ’ ( noise ) या अर्थाचें एक पुस्तक इंग्रजींत लिहिलें गेलें आहे. पहाट होऊं लागण्याच्या आधींच ताडीमाडी पिऊन बेभान झालेले कावळे आपली कर्कश कावकाव सुरू करतात येथपासून तो मध्यरात्रीपर्यंत शोकी लोकांच्या जिव्हातृप्त्यर्थ वेगवेगळे पदार्थ विकणारांच्या आरोळ्यांपर्यंतची हकीकत त्या इंग्रजी पुस्तकांत आलेली आहे. माडगांवकरांनीं आपल्या पुस्तकाच्या सुरवातीसच त्या गोंगाटाची माहिती दिलेली आहे. मुंबईचा प्राचीन व पोर्तुगीज इंग्रजी काळांतील इतिहास हा मुख्य विषय माडगांवकरांच्या पुस्तकांत सुटलेला नाहीं. त्यामध्यें किरकोळ चुका सांपडतील, परंतु त्या योगानें मोठेंसें वैगुण्य उत्पन्न होत नाहीं, हें ध्यानांत ठेवल्यास बरें. इंग्रजी राज्यांतील दुष्काळ, वादळें, दंगे, यासारख्या दैवी मानवी संकटांचा आपल्या पुस्तकांत समावेश करतांना माडगांवकरांनीं त्या त्या विषयाच्या निमित्तानें जें कवित्व उगवलें त्याचा आदर करून आपल्या पुस्तकाची मनोरंजकता वाढविली आहे. हें कवित्व सुमारें ४० वर्षांमागें लहान लहान चोपड्यांच्या रूपानें मुंबईच्या रस्त्यावरून विकल्या जाणाऱ्या पुस्तकांमध्यें दिसत असे. आज तें प्रयासाखेरीज स्वतंत्रपणें गोळा करतां येणार नाहीं, परंतु माडगांवकरांनीं त्या संबंधांत शंभर वर्षांमागील मुंबईची हालहवाल जाणूं इच्छिणारांची मोठी सोय केलेली आहे. १८६३ मध्यें मुंबईची जी स्थिति होती तिचें समग्र व सम्यक् दर्शन

पुढच्या पिढीला घडावें अशी माडगांवकरांची आकांक्षा या पुस्तकांत सफल झालेली आहे. माडगांवकरांनीं ही सफलता परिश्रमानें साधल्याची साक्ष पुस्तक पाहातांना सहज पटेल. मुंबई शहराच्या माहितीला अवश्य असणारा अमूक एक विषय माडगांवकरांनीं सोडला अशा तक्रारीला माडगांवकरांनीं जागा ठेवलेली नाहीं, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांचें पुस्तक हें स्थूलदृष्ट्या मुंबई शहराचें ज्ञान वाचकाला व्हावें, या करितां लिहिलेलें असलें तरी त्यांत तेव्हांच्या नागरिक जीवनाचीं बहुतेक सर्व अंगोपागें आलेलीं आहेत. यामुळें त्यांच्या पुस्तकाचें ऐतिहासिक या नात्यानें असलेलें मोल जेवढें मानावें तेवढें थोडेंच होईल. भाषेच्या दृष्टीनेंहि त्याची किंमत कमी नाहीं. त्यांनीं लिहावयास घेतलेले कितीतरी विषय मराठी भाषेला अपरिचित असून ते केवळ मराठी भाषेच्या द्वारें वाचकाला सुबोध वाटतील अशा रीतीनें लिहिलेलें आहेत. त्याकडे लक्ष दिल्यास आज त्या विषयानें आत्मसात् केलेल्या नव्या भाषेची व परिभाषेची कल्पना करतां येते. उदाहरणार्थ, आगगाडी या विषयाचा विचार वाचकांनीं करावा. आगगाडीवर माडगांवकरांच्या ‘ मुंबईचें वर्णन ’ या पुस्तकापूर्वी एक स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध झालें होतें. त्यांत व माडगांवकरांच्या पुस्तकांत (मुंबईचें वर्णन हें पुस्तक आगगाड्या सुरू झाल्यावर दहा वर्षांनीं प्रसिद्ध होऊनहि) ज्या शब्दांचा उपयोग आढळत नाहीं, ते शब्द आज आबालवृद्धांच्या तोंडी जणूं काय ते आगगाड्या निघाल्या तेव्हांपासूनच रूढ असल्याप्रमाणें पक्के बसलेले आहेत. केवळ मासल्याकरितां आगगाडी हा विषय येथें सुचविला आहे. सुज्ञ वाचकाला असे आणखी विषय आढळतील.

ज्या काळीं युरोपांतसुद्धां जुन्या नव्या शहरांच्या माहितीचीं पुस्तकें लिहिण्याची प्रथा पडली नव्हती, त्याकाळीं माडगांवकरांनीं ‘ मुंबईचें वर्णन ’ लिहून प्रसिद्ध करावें, ही एक त्यांच्या लेखनाची अपूर्वता ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. परंतु या पुस्तकांची वास्तविक माहिती महाराष्ट्राच्या वाङ्मयप्रेमी जनतेला मागील शंभर वर्षांत आकलन झाली नसल्याचा पुरावा त्याची नवी आवृत्ति शंभर वर्षांनीं काढण्याचा योग येतो, हाच आहे. अशा पुस्तकांना कादंबऱ्या नाटकादि ललित

साहित्याची लोकप्रियता न लाभणें साहजिकच म्हणतां येईल. पण त्याच्या पुनर्मुद्रणाला शंभर वर्षाएवढा दीर्घ कालावधि लागावा, अशा कमी योग्यतेचें तें खास नाहीं. तथापि या पुस्तकाची एक प्रकारें अक्षम्य उपेक्षा लोकांकडून घडली, हें कबूल करणें भाग आहे. माडगांवकरांनीं मराठी वाङ्मयासंबंधांत स्वतःच्या काळांतील जें दैन्य वर्णिलें आहे तें चालू वाङ्मयाच्या एक दोन शाखा आणि कांहीं व्यक्ति वगळल्यास आज देखील कायम आहे, असेंच दिसून येतें. या पुस्तकाची ही नवी आवृत्ति मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय या संस्थेनें प्रकाशित करून महाराष्ट्राची उपेक्षावृत्ति घटविली असली तरी या साहसांत शंभर वर्षांमागील दैन्याची साक्ष आहेच. सरकारी साह्यावरून ती ध्यानांत येईल. त्या दैन्याची तीव्रता आज स्वराज्य असल्याच्या जाणीवेनें कमी वाटते, एवढीच काय ती एक समाधानाची बाजू आहे. माडगांवकरांच्या प्रस्तुत पुस्तकामागून कित्येक वर्षांनीं मुंबई शहराविषयीं एक दोन पुस्तकें निघाली, पण ती सुद्धां लोकांच्या उपेक्षेमुळें लुप्तप्राय अवस्थेंत आहेत.

न. र. फाटक

# प्रस्तावना

कोणत्याही देशाचा इतिहास तडीस नेण्यास आरोग्य, स्वतंत्रपणा, बुद्धि, द्रव्य, वयातीत लोकांशीं स्नेह, विद्वज्जनांशीं संघट्टण, अनेक ग्रंथावलोकन, देशाची पक्की माहिती, तीसचाळीस वर्षांतील गोष्टी स्वतः पाहिलेल्या, निस्पृहपणा, ज्या स्थानाचें आपण वर्णन लिहिणार त्यांतील बहुतेक स्थळें पाहिलेलीं, आणि ज्या भाषेंत तो लिहिणार तिचें पूर्ण ज्ञान, इतकीं साधनें अनुकूल असलीं पाहिजेत. हीं जमल्यानंतर लिहिणारानें प्रामाणिकपणानें वास्तविक गोष्टींकडे लक्ष देऊन आपल्या लिहिण्यापासून लोकांस पुष्कळ खऱ्या गोष्टी माहीत होऊन ज्ञान प्राप्त होईल असें करावें. परंतु इतकीं साधनें उपलब्ध नसून जर एकाद्या स्थलाचा इतिहास लिहिण्याची कोणाची इच्छा झाली, तर त्याणें केवळ अवसान सोडून बसूं नये, उद्योग करावा. " उद्योगानें सर्व सोपें " अशी एक प्राकृत ह्मण आहे.

मुंबई ह्या नामांकित व वैभवाच्या शिखरास चढलेल्या शहराचा साद्यंत-वृत्तांत लिहावा असा पुष्कळ दिवसांपासून मनोदय होता, परंतु हें काम सिद्धीस नेण्यास सदरीं सांगितलेल्यांपैकीं बहुतेक साधनें अनुकूल नसल्यामुळें आजपर्यंत हें कृत्य घडून आलें नाहीं. पुढें असें मनांत आलें कीं, हीं सर्व साधनें जमवीत ह्मटलें तर जन्म गुदरलें, तरी साध्य होणें कठीण, आणि आयुष्य तर नदीवेगासारिखें झपाट्यानें जातें, व पुढेंही जर असेच आज उद्यां असें करून आळसांत दिवस घालविले, तर ज्या थोड्या बहुत गोष्टी प्रयासानें जमविल्या आहेत, त्याही शेवटीं जेथच्या तेथेंच राहतील. असें लक्षांत आल्यावरून सामग्रीची जी तरतूद होती, ती सामर्थ्यानुसार गोळा करून ही रचना केली आहे. श्रीमान् लोक हजारो रुपये खर्चून रमणीय वाडे व बंगले बांधितात, ह्मणून गरिबानें आपलें कोलंब्याचें झोंपडें बांधावयास आळस करूं नये. राजास आपल्या सात खणांच्या मंदिरांत चंदन मंचकावर दुशाला पांघरून शयन केलें असतां व गरिबास केमळ्याच्या झोपडींत तृणशय्येवर कांबळें पांघरून निजलें असतां निद्रा सारखीच लागून समाधान होतें. हा धर्म मनांत आल्यावरून ह्या उद्योगास प्रारंभ केला आहे.

अर्थाःपादरजोपमा गिरिनदीवेगोपमं यौवनं ॥ ॥
आयुष्यं जललोलबिंदुचपलं फेनोपमं जीवितं ॥ ॥
धर्मं यो न करोति निश्चितमतिः स्वर्गार्गलोद्घाटनं ॥ ॥
पश्चात्तापयुतो जरापरिगतः शोकाग्निना दह्यते ॥ १ ॥

गृह्यसूत्र

आपल्या देशाचा इतिहास लिहिण्याचा उद्योग करावा असा मनोरथ होता, परंतु भरतखंडाचा इतिहास लिहिणें ह्मटलें ह्मणजे त्यांतील बहुतेक देश फिरून पाहिले पाहिजेत, व त्या विषयावर अनेक ग्रंथकारांनीं वर्णनें लिहिलीं आहेत, तीं साद्यंत वाचून पाहिलीं पाहिजेत. हें सिद्धीस जाण्यास बुद्धि, द्रव्य व शरीर-संपत्ति हीं अनुकूल असलीं पाहिजेत. ज्यापाशीं ह्या साधनांची न्यूनता आहे, त्या गृहस्थाच्या हातून एकादें लोकोत्तर कृत्य सिद्धीस जाणें दुर्लभ. असें केलें असतां कदाचित् उपहासास्पद होईल, ह्मणून मुळींच अशा कृत्यास हात घातला नाहीं. "अंथरूण पाहून पाय पसरावे" असें वडिलांचें वाक्य आहे, आणि आह्मां-सारिख्या प्राकृत जनास या वाक्याच्या अनुरोधानेंच वागलें पाहिजे. दुधाची तहान ताकानें भागवावी असा दृढ निश्चय करून हें कृत्य हातीं धरिलें आहे. याचें सार्थक होणें बुद्धिदात्याकडे आहे. त्याच्या इच्छेशिवाय लेखणीचा टांक देखील इकडचा तिकडे फिरूं शकत नाहीं मग दुसरे व्यवहार कोठून सिद्धीस जातील.

दुसरें. मराठी किंवा कोणत्याही आमच्या भाषेंत स्वहितार्थ म्हणा, किंवा परहितार्थ ह्मणा एकादा ग्रंथ रचिला असतां इंग्रज लोकांच्या मदतीवांचून छापून बाहेर पडला अशी गोष्ट बहुधा आजपर्यंत घडून आलीच नाहीं. कितीहो दुःखाची गोष्ट ! देशकल्याणार्थ अथवा स्वहितासाठीं एकादा ग्रंथ रचावा, आणि तो छापण्यास इंग्रज, पारशी, व मुसलमान श्रीमंत लोकांच्या घरीं खेपा घालण्यांत व आर्जव करण्यांत जोडे फाडावे ! अहो स्वदेशीय सुज्ञ जनहो ! एकाद्यानें ग्रंथ रचिला आणि तो जरी तुमच्या योग्यते जोगा नसला, तरी ज्याणें तो रचिला आहे, त्याच्या उद्योगास उत्तेजन देण्यासाठीं तरी तुह्मी त्यास आश्रय द्यावा. जें त्याणें कांहीं लिहिलें असेल, तें त्यांतील न्यूनें काढण्याच्या हेतूनें तरी साद्यंत वाचून पाहा, आणि त्यास नीट मार्गास लावा, ह्मणजे तुह्मां-

करून देशाचें हित झालें असें समजा. तुह्मी मनावर घेतलें तर एकादी गोष्ट सहज पार पडेल, आणि तेणेंकरून देशाचें कल्याण होईल. तुह्मी कांहीं उदार कृत्यें केलीं, तीं आह्मी मोठ्या संतोषानें मान्य करितों. परंतु लोकांत ग्रंथ रचण्याची व वाचण्याची इच्छा उत्पन्न केल्याशिवाय दुसरे तुमचे सर्व उद्योग निर्बळ आहेत. अहो ! ग्रंथ छापायास परकीय लोकांपाशीं याचकपणा करून ग्रंथकर्त्यास पांचदहा हजार रुपये नफा झाला, तरी वास्तविक आनंद जो आहे तो होणार नाहीं. तो आनंद केवळ द्रव्य प्राप्तीचा, विद्येच्या सार्थकाचा नव्हे. स्वदेशीय लोक जे ग्रंथ त्यांसाठीं तयार होतात, ते जेव्हां उत्साहानें वाचतात आणि ग्रंथकर्त्यास उत्तेजन देण्यास हौस मानितात, तेव्हां त्यास जरी ग्रंथ छापण्याबद्दल द्रव्याचा कांहीं नफा झाला नाहीं, तरी जो हर्ष होतो तो अनुपमेय आहे.

थोडक्या दिवसांवर एका सुज्ञ व परोपकारी इंग्रज गृहस्थानें एका सभेंत सुरस भाषण केलें, त्यांत त्याणें आमच्या लोकांस हितावह उपदेश करून असें सांगितलें. " इंग्लंड देशांतील लोक विद्येसंबंधी, व्यापारासंबंधीं, किंबहुना देशकल्याणासाठीं जीं जीं कामें कर्त्तव्य तीं स्वतः माथ्यावर घेऊन करितात, व ह्या प्रीत्यर्थ शेंकडो सभा स्थापितात, आणि कोटयावधि रुपये खर्चून शाळा घालितात व ग्रंथ छापितात. ते लोक ज्या त्या गोष्टींत सरकाराची मदत मागत नाहींत. परंतु जें ते करितात, तें पाहायास मात्र सरकारास सांगतात. ह्मणूनच ते लोक स्वतंत्रता आणि सुख भोगितात. आणि जेव्हां तुह्मी लोक आपल्या द्रव्याचा आणि कालाचा उपयोग त्या लोकांप्रमाणें ज्ञान संपादण्यांत कराल, तेव्हांच वास्तविक सुखानुभवाधिकारी व्हाल. "

सामर्थ्यानुरूप देशकल्याणार्थ कांहीं करावें असें लक्षांत आणून हें मुंबईचें वर्णन लिहिलें आहे. यांत स्थलवर्णन, राज्यव्यवस्था, लोकस्थिति, इत्यादि मुंबईतील प्रकार जो जो दृष्टीस पडतो, तो स्वतः पाहून व ग्रंथांतरीं जें जें ह्या नामांकित शहराविषयीं सांपडतें, त्यांतील मजकूर घेतला आहे. मुंबईची पूर्वीची कशी स्थिति होती, व सद्यः कशी आहे, हा सर्व मजकूर जेवढा साध्य झाला तेवढा यामध्यें केवळ प्राकृत भाषेंत लिहिला आहें. शब्दचातुर्याकडे व वाक्यसौंदर्याकडे तादृश लक्ष दिल्याशिवाय केवळ बालबोध भाषेचाच क्रम अनुलक्षून ही रचना केली आहे. कारण कोणत्याही कृत्यांत आपल्या सामर्थ्याच्या धांवेचे पलीकडे जाण्यास

डौल घालणें हें विपरीत मार्गाचें अवलंबन करणें होय. आणि तसें केल्यानें मनुष्याचें वास्तविक स्वरूप ओळखायाची लोकांस भ्रांति पडत्ये.

हे आमचे यत्किंचित् प्रयत्न पाहून ह्या शहरांतील कित्येक विद्वज्जनसमूहास ईर्षा येऊन त्यांणीं याहून सहस्रपट उत्तम असा मुंबईचा किंबहुना हिंदुस्थानाचा इतिहास अनेक देश पाहून स्वश्रमानें तयार करावा, असी उमेद आहे. या कृत्यास आरोग्य व द्रव्याची विपुळता पाहिजे. लक्ष्मीची कृपा पावलेले गृहस्थ आह्मांमध्यें बरेच आहेत. इतिहास ह्मटला ह्मणजे ज्याच्या देशाचा त्याणेंच लिहावा. जर कोणास मराठी सारिख्या प्राकृत भाषेंत इतिहास लिहावयास मन होत नसलें, तर इंग्रजींत लिहिला असतां तो इंग्रज आणि एतद्देशीय लोकांसही सारखाच मान्य होईल. परंतु मराठी भाषा ह्मणजे केवळ क्षुद्र आहे असें कोणी मानूं नये. मराठी भाषा संस्कृत भाषेच्या योग्यतेस देखील येईल. ती विद्वान् लोकांनीं मात्र वहिवाटींत आणिली पाहिजे. या भाषेंत अनेक शास्त्रीय विषयांवर ग्रंथ रचून तींत अनेक शब्दांची योजना केली पाहिजे. संस्कृत, युनानी, हिब्रू , लातीन, अरबी, फारशी, इत्यादि भाषा विद्वज्जनांनीं सुधारल्या, ह्मणूनच एवढ्या योग्यतेस चढल्या. आमच्या कल्पना उष्ट्या, आमचे विचार परतंत्र, आमची बुद्धि जड, आमची ग्रंथरचना पोरकट, आह्मी दुसऱ्यानें संपादन केलेल्या विद्याधनावर फिशारी भोगणारे, किंवा उच्छिष्टभोजी, असे जे आह्मांस युरोपियन लोक दोष देतात, त्यांपासून आह्मांस व आमच्या पुढील संततीस तरी आमचे अर्वाचीन ज्ञाते मुक्त करतील, अशी खातरी बाळगून हा ग्रंथ रचिला आहे.

एक विद्वान् असें ह्मणतो. अनेक भाषा शिकाव्या, आणि मनुष्यानें विद्वान् व्हावें तें कशासाठीं ? स्वभाषेंत अनेक भाषांतील शब्द व कल्पना मिसळून तीस उत्तम प्रतीच्या भाषेची योग्यता आणावी, नाहींतर अनेक भाषा शिकून व विद्वान् होऊन लोकांस तादृश लाभ होत नाहीं. एकाद्या मुलाचे आईबाप मुळचे दरिद्री असतात, व पुढें मुलगा कर्तृत्वी निघून व मोठी संपत्ति मिळवून जसा आपलें कूळ उदयास आणितो; त्याच प्रमाणें विद्वान् लोकांचें कूळ ही त्यांची स्वभाषा, ही त्यांणीं उदयास आणिली नाहीं, तर मुलास संपत्ति प्राप्त झाली असतां त्याणें आपल्या आईबापांस घरांतून हाकून देऊन परक्यास आपल्या वैभवाचें सुख दिलें असतां त्याजवर कृतघ्नपणाचा जो दोष येतो, तोच त्यांसही

लागू होतो. व्यास, वाल्मिक, पाणिनि, इत्यादि अमर झाले, ते एक स्वभाषा सुधारल्यावरूनच.

दुसरें. ज्ञानेश्वर, वामन, मुक्तेश्वर, तुकाराम, मोरोपंत, रामदास, मुकुंदराज, श्रीधर, सोपानदेव, एकनाथ, इत्यादि प्राकृत कवींनीं मनावर घेऊन पद्यरचनेंत हजारो ग्रंथ रचले, तेव्हांपासून मराठी भाषा थोडीसी उदयास आली, आणि ती भाषा कांहीं उपयोगी आहे असें लोक मानूं लागले. व आर्या, श्लोक, अभंग, दिंड्या, ओव्या इत्यादि वाचण्याची लोकांस गोडी लागली. हे त्यांणीं श्रम केले नसते, तर मराठी भाषा केव्हांच विलयास गेली असती. गद्यरचनेंत शास्त्रीय विषयांवर ग्रंथ झाले नाहींत, यामुळें ती शास्त्री व पंडित जनांस मान्य झाली नाहीं. परंतु हें लक्षांत धरावें कीं, जी भाषा काव्यरचनेस योग्य झाली, ती हलकट असें कोण ह्मणेल.

तीनशें वर्षांमागें इंग्रजीभाषा ह्मटली ह्मणजे मुळची अगदीं पोरकट होती, आणि विद्वान् इंग्रज लोकांस कांहीं लिहिणें किंवा भाषण करणें पडे, तेव्हां जसें आह्मी हल्लीं गणपतीच्या कथेच्या चिट्ठ्या, धर्मसंबंधी सभांचे कागद, भाजीची याद, व लग्नपत्रें देखील इंग्रजींत पाठवितों, त्याच प्रमाणें ते सर्व अगत्याचा कागदपत्राचा व्यवहार लातीन किंवा फ्रेंच भाषेंत करीत, स्वभाषेची त्यांला इतकी लाज वाटे कीं, तीमध्यें ते चौघांत एकमेकाशीं भाषण करायास देखील लाजत, आणि हल्लीं आह्मी जसे अर्धी मराठी आणि अर्धी इंग्रजी बोलतों, तसे ते अर्धी इंग्रजी व अर्धी लातीन बोलत. परंतु पुढें जेव्हां बेकन्, न्यूटन्, मिलटन्, पोप्, शेक्स्पियर्, बैरन्, स्काट्, अडिसन्, इत्यादि त्यांमध्यें धुरंधर विद्वान् झाले, तेव्हां त्यांणीं ती भाषा श्रमेंकरून उदयास आणिली. आणि आतां ती सर्व मान्य झाली इतकेंच नाहीं, परंतु संस्कृत, लातीन, अरबी, हिब्रू इत्यादि विद्वज्जन भाषांच्या पंक्तीस जाऊन बसली. अहो ! ही आह्मांस किती लांच्छन आणण्याजोगी गोष्ट आहे. इंग्लंड देशांतील इंग्रज आचार्यांनीं आमच्या देशांत येऊन संस्कृत व प्राकृत भाषांचे कोश तयार करून आह्मांस द्यावे; आह्मी मराठींत लिहिलेले ग्रंथ त्यांणीं शोधावे; आमच्या वेदाचा अर्थ जर्मनी देशांतील भट्ट मोक्षमुलर यांणीं लावून व त्याजवर टीका करून छापून आह्मांसाठीं पाठवून द्यावा; आमच्या मराठी, संस्कृत आणि गुजराथी विद्यार्थ्यांची परीक्षा डाक्तर विल्सन्,

डाक्तर मिचल्, मेजर क्यांडी इत्यादि इंग्रज पंडितांनीं घ्यावी; आणि मुंबईंतील कालेजांत विद्यार्थ्यांस संस्कृत शिकवायास जर्मनी देशांतून गुरु यावा. अर्थात् हीं सर्व देशाभिमानाचीं व अप्रतिम उद्योगाचीं फळें आहेत, दुसरें कांहीं नाहीं.

जर कोणी ह्मणेल कीं, आमच्या लोकांस एवढे दोष कां देतां. भारत, भागवत, रामायण, ज्योतिःशास्त्र, न्यायशास्त्र, मानसशास्त्र, व्याकरण, वैद्यशास्त्र, अशा गहन विषयांवर मोठमोठे राजमान्य ग्रंथ आमच्या पूर्वजांनीं रचिले आहेत, तर आह्मांमध्यें काय सामर्थ्य नाहीं ? आह्मांस ही गोष्ट कबूल करणें भाग आहे कीं, व्यास, वाल्मिक, गौतम, कालिदास, पाणिनि, यांसारिखे आह्मांमध्यें महान् विद्वान् होऊन गेले खरे, परंतु तें ज्ञान त्यांजकडेसच राहिलें. तें आह्मांस उपयोगी पडत नाहीं. ज्याची विद्या, ज्याचें ऐश्वर्य, ज्याचें सत्कर्म, ज्याचें धैर्य, ज्याची शरीरसंपत्ति, ज्याचें सुख, त्यासच भूषण देतें. ज्ञान ह्मटलें ह्मणजे ज्याचें त्यालाच. दूर कशास जावें ? बापाचा लौकिक मुलास उपयोगी पडत नाहीं. मग शेंकडो वर्षांमागील आमच्या पूर्वजांचें ज्ञान आह्मांस कोठून भूषणदायक होईल. ? हीं सर्व श्रमेंकरून ज्याचीं त्याणेंच साध्य केलीं पाहिजेत, किंवा पूर्वजांनीं साध्य करून ठेविलीं असतां रक्षण तरी केलीं पाहिजेत, तेव्हांच त्या पुरुषास भूषण येईल. द्रव्य देखील स्वकष्टानें कमाविलें असतां जेवढें भूषण देतें, तेवढें वडिलांनीं ठेविलेल्या द्रव्यापासून भूषण येत नाहीं.

यावरून अशी कल्पना निघत्ये कीं, आह्मांमध्यें पूर्वीं मोठे विद्वान् होऊन गेले, त्यामुळेंच आम्हांला हल्लीं अभिमान उत्पन्न होऊन आह्मी आळशी होत चाललों. जर आम्हांमध्यें मुळींच कोणी विद्वान् झालेले नसते, तर कदाचित् आह्मी विद्येकडे झटून ती संपादन करायाचे उद्योग केले असते. इंग्रज लोकांमध्यें पूर्वीं विद्वान् नव्हते व विद्या कलाही त्यांस माहीत नव्हत्या, ह्मणूनच त्यांणीं देशोदेशीं जाऊन अनेक शोध केले, व लोकांचीं शास्त्रें तपासून त्यामध्यें जें जें उपयोगी होतें, तें साध्य करून घेतलें, आणि त्यांची वृद्धि केली. व त्याच उद्योगांत ते सुख मानितात.

ह्या प्रकारचा ग्रंथ रचणारापाशीं कोणकोणतीं साधनें असावीं हें मागें सांगितलेंच आहे. आतां हा ग्रंथ तयार करणाराकडे यांपैकीं किती साधनें उपलब्ध आहेत ह्मणाल, तर पुष्कळ वर्षांपासून एथचा रहिवास, एथील कित्येक

वृद्ध व तरुण विद्वान् लोकांचा परिचय व स्वभाषेचें यत्किंचित् ज्ञान. केवळ ह्या डगमगीत पायावर ही सगळी इमारत बांधिली आहे. इतक्यावरूनच जर हीस यावी तितकी मजबुती आणि शोभा येऊन हा अल्प स्वल्प उद्योग विद्वज्जनांस मान्य झाला, तर ग्रंथकर्त्यास आपण कृतकृत्य झालों असें वाटेलच. परंतु यदा कदाचित् इच्छेप्रमाणें हा ग्रंथ उतरला नाहीं, असें त्यांस वाटेल तर तो साद्यंत वाचून जीं न्यूनें त्यांत अढळतील, तीं आमच्या विद्वज्जनांनीं वर्त्तमानपत्रद्वारें किंवा एकाद्या मासिक पुस्तकांत लिहून स्नेहभावानें ग्रंथकर्त्याचें वास्तविक कल्याण करण्याच्या उद्देशानें निवेदन करावीं. ज्ञान प्राप्त करून जन्माचें सार्थक करावें, हाच या ग्रंथाचा मुख्य उद्देश. ज्या वेळीं आमचे लोक एकादा ग्रंथ शोधक बुद्धीनें वाचून त्यांतील वास्तविक दोष ग्रंथकर्त्यास कळवितील, तेव्हांच उत्तम प्रतीचे ग्रंथ स्वभाषेंत निघून लोकांस वाचण्याची गोडी लागेल. सर्व गोष्टी एकासच माहित होणें कठीण. दुसरें, मराठी भाषा अजून विद्वज्जनग्राह्य झाली नाहीं, कारण या भाषेंतील अनेक शब्द जिकडेतिकडे विखरले आहेत, ते अजून एका ठिकाणीं जमले नाहींत. या भाषेवर पांच पन्नास कोश होतील, आणि सहस्रावधि अर्वाचीनकालिक विद्वज्जनांकडून गद्यपद्यादि ग्रंथ बाहेर पडतील, आणि नवीन तयार झालेल्या ग्रंथांवर शेंकडो शोध पडतील, तेव्हां ही भाषा संस्कृताच्या खालोखाल योग्यतेस येईल.

रावसाहेब महादेव गोविंद शास्त्री कोल्हटकर माजी पुणें व सातारा प्रांतांतील विद्याखात्यांतील डिपुटी इन्स्पेक्टर् अणि सद्यः मुंबईखात्यांतील सेंट्रल बुकडीपो ( पुस्तकालय ) यावरील क्युरेटर ( चौकसनीस ) यांणीं ह्या पुस्तकाची लिहून छापायास तयार केलेली प्रत श्रम घेऊन संतोषानें साद्यंत वाचून पाहिली, ह्मणून मी त्यांचा मोठा उपकारी आहें. तसेंच कित्येक मित्रांनीं आपपर हस्तें हा ग्रंथ सिद्धीस जावा, ह्मणून अनेक प्रकारें साहाय्य केलें, त्यांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानितों.

ह्या ग्रंथांत अनेक भाषांतील शब्दांचा कोठेंकोठें उपयोग केला आहे त्यांचा कोश शेवटास छापून त्यांच्या अर्थाचें स्पष्टीकरण केलें आहे.

# अनुक्रमणिका

## मुंबईची हल्लींची व पूर्वींची स्थिति

### प्रकरण १

शहराची रचना-अनेक जातीचे लोक-निरनिराळ्या भाषा-त्यांचे पोशाक-नामांकित स्थळें-गाड्याघोडे-मूळची स्थिति आणि वैभव-कंपनी सरकारचें ऐश्वर्य शहराची लांबी रुंदी-इंग्रजांची राजसत्ता-देशोदेशच्या लोकांचें येणें. पृ० १-१५

### प्रकरण २

मुंबईंत सद्यः कित्येक पुरातन कुळांतील लोक वसत आहेत त्यांचा वृत्तांत-इसवी सन १४०० शां मागें या मुंबई टापूचीं दोन चार बेटें होतीं असें अनुमान करण्याचीं कारणें-मूळचे स्थायिक लोक-पूर्वींचें मुंबादेवीचें व काळबादेवीचें देऊळ-वसई वगैरे दुसरीं स्थळें-पारशी लोकांचें येणें. पृ. १६-३५

### प्रकरण ३

पूर्वींची मुंबई-अनेक रोग उद्भवण्याचीं कारणें-वरळीचा बांध-पायधुणी-ह्मातार-पाखाडी-उमरखाडी-कुलाबा-डोंगरी-चिंचबंदर-मशीदबंदर-बोरीबंदर-वालुकेश्वर-चौपाटी-शेतोडी-बाबुलनाथ-ह्याच्या पूर्वींच्या व हल्लींच्या स्थितीची तुलना-महालक्ष्मी-मामाहजानी-आणि वरळीचा जुना वृत्तांत. पृ. ३६-५५

### प्रकरण ४

भायखळें-माजगांव-घोडपदेव-शिवरीचा किल्ला व बाग-मिठाचा आगर-परळ-मांडवीबंदर-आर्थरबंदर-पालोबंदर-हल्लींचा कुलाबा-बोरीबंदर-कोळीबंदर-करनाकबंदर-मशीदबंदर चिंचबंदर-क्लेरबंदर-एल्फिन्स्टन्बंदर-वाडिबंदर-टांकबंदर-कोळसेबंदर-माहीम-माटुंगें-शींव-रीवाचा किल्ला-सध्याची वरळी-सोनापूर. पृ० ५६-७१

### प्रकरण ५

मुख्य मोठ्या व दुसऱ्या किल्ल्यांची बांधणी-गोदी व जहाजें बांधण्याचें काम-न्यायखात्याची सुरवात-वलंदेजी लोकांच्या सरदाराचें अरमार व मुंबई घेण्याची मसलत-किगवुइन याचा दंगा-लष्करी खातें-लष्कराची संख्या-शहर वसविण्याविषयींच्या अडचणी-याकुतखानाची स्वारी-मुंबई इंग्रजसरकाराची हिंदुस्थानांत मुख्य राजधानी केली-टंकसाळ-घरांवरील छाप्याची सुरवात-पूर्वींच्या सरकारी कामगारांचा मुशारा-कांपावरील वस्ती-तिजोरीच्या नोटी-इंग्रज आणि पोर्टुगीझ् लोकांचें वैमनस्य-कुलाबदांडी-बंदुकीच्या दारूचा कारखाना. पृ० ७२-९९

प्रकरण ६

बाजार-कांपाचें मैदान–किल्ल्यांतील रचना-बंबखाना–जामदारखाना, इत्यादि–मार्किस आफ् कार्नवालिस व वेलसली यांचे पुतळे-लोकसंख्या-निरनिराळ्या ठिकाणांची वस्ती–मासळीबाजार-सन १८०२ व १८२२ सां मधील भयंकर आग-वादळें –वायव्य प्रांतांतील दुष्काळाचें निवारण करण्याचे प्रयत्न-पारशीलोकांचें औदार्य. पृ० १००–१२३

प्रकरण ७

कुत्रे मारण्याचा हुकूम-पारशीलोकांचा दंगा–चोर व लबाड लोक-बंदरांतील तर्कटी लोकांची टोळी-मुसलमान लोकांचा दंगा–सन १८५७ तील बंगाल देशांतील पलटणींचें बंड प्रार्थनेचे मासले–रूस देशाशीं इंग्रजांची लढाई चालली होती त्यावेळीं मुंबईतील लोकांच्या प्रार्थना-सन १८५८ त राणीसरकारानें प्रगट केलेला जाहीरनामा. पृ० १२४–१५१

प्रकरण ८

गव्हर्नर व त्यांचीं कृत्यें–व्यापार वाढविण्याची युक्ति–व्यापाऱ्यांची संख्या–पेढ्यांची स्थापना–सर चार्लस फार्ब्स व सर जमशेटजी जिजीभाई या नामांकित व्यापाऱ्यांचा संक्षिप्त इतिहास–शहराचें सरकारास उत्पन्न–घरांची संख्या व उत्पन्न–नवे कर व ते घेण्याचीं कारणें–नव्या नोटी–लैसेन्सटाक्स बंद केल्याचा सरकारी हुकूम. पृ० १५२–१७८

प्रकरण ९

सुप्रीम कोर्ट व दुसरीं न्यायखातीं-लेजिस्लेटिव्ह कौन्सिल व हैकोर्ट–मारवाडी–डाक्तर, गांधी, वैद्य इत्यादि-विद्वान् ब्राह्मण, वैदिक इत्यादि-बाळगंगाधर शास्त्री–दवाखाने-वैद्यशाळा–धर्मशाळा–पाणी–टपालाची स्थापना-आगबोटी–तारायंत्र–एल्फिन्स्टन् शाळेची स्थापना व दुसरीं विद्याखातीं-पुस्तकालयें-वर्त्तमानपत्रें–मुलींच्या शाळा–पुण्याची पाठशाळा-इंग्रजी शिकण्याची इच्छा. पृ. १७९–२१७

प्रकरण १०

खत्री व रेशमाचा व्यापार–गिरण्या व कापसाचा व्यापार–कडदोऱ्या-पारशी लोकांचे उद्योग–छापखाने-गणपत कृष्णाजी–वर्त्तमानपत्रें–पारशी लोकांत विद्येची अभिरुचि-सोन्यारुप्याचा मुलामा काढायाचे कारखाने– चित्रें काढण्याचे कारखाने-बर्फाच्या वखारी–लोखंडी सडका-सुताचे व कापड विणण्याचे कारखाने–कारागीर लोक–गाडीचे कारखाने-लोखंडी ओतींव कामाचे कारखाने–रावणाऱ्या संपत्तीची तुलना–कसबी काम–कागदाचे व काचीचे कारखाने-तेलाचे घाणे-साबण करायाचे कारखाने-धुराचे दिवे करण्याची मसलत–दारूच्या भट्ट्या व पिठीं-तंबाखूच्या गाद्या

व पानसुपारीचीं दुकानें–अफिणीचा व्यापार व दुकानें-चंडोलखाने-मिठाई-किमयागर–दारू, फुलबाज्या, नळे, इत्यादि–लहान सफरी करण्याच्या आगबोटी–दागिने. पृ० २१८–२५०

## प्रकरण ११

टौनहाल्-रायल् एशिआटिक सोसायटी-जिओग्राफिकल् सोसायटी-आग्रिहार्टिकल्चरल् सोसायटी–बांबे आसोसिएशन्–मेक्यानिक्स इन्स्टिट्यूशन्-दक्षिणी भाषेंत पुस्तकें करणारी मंडळी-नेटिव्ह जनरल् लैब्ररी व दुसरीं पुस्तकालयें-सर्वपदार्थसंग्रहालय-विक्टोरिआ आणि आल्बर्ट म्यूझिअम्-विक्टोरिआ गार्डन्. पृ० २५१–२७१

## प्रकरण १२

अवर्षण–फ्रामजी कावस्जीचा तलाव-पाण्याचे नळ–नाखुदाचें तळें-पांजरापोळ-बंदीशाळा–उद्योगशाळा-वेड्यालोकांचें घर–मुंबई आणि ठाणें एकत्र करण्याचा बेत–नवीं बंदरें करण्याची योजना-किल्ला मोडून टाकण्याची सूचना-पोसखाने-भटारखाने-खाणावळी–इंग्लंड देशाच्या राजाचा जन्मदिवस-चेंडूफळी–जिम्नेशिया-जिम्खाना–तालीमखाने-ब्यांड्स्टांड्. पृ० २७२-२९४

## प्रकरण १३

विमान-नाच – तमासे - अनेक जातींचीं जनावरें-नाटकें-घोड्यांच्या पैजा–बोटींच्या पैजा–वेश्यांचे नाच-बाणकोटी–तेलीराजा–गोसावी–तुंबडीबावा-हरदासांच्या कथा–बावा–आत्मारामबावा-पाऊड, पांगूळ इत्यादि–जोगी, सन्न्यासी वगैरे भिकारी–आंधळे-जोगिणी–जन्मपत्रिका करणारे जोशी. पृ० २९५–३१४

## प्रकरण १४

इंग्रज लोकांचीं देउळें–पोर्टुगीझ् लोकांच्या इगर्जा व खुरुस-हिंदुलोकांचीं देवालयें–श्रावक लोकांचे डेरे व यती–कामाठी लोकांचीं राउळें-मुसलमान लोकांच्या मशिदी व पीर-बेनी इस्राएल व यहुदी लोकांचे सिनेगाग (मशिदी) व त्यांचा इतिहास–पारशी लोकांच्या अग्याऱ्या–निरनिराळ्या लोकांचे सण–कपिलाषष्ठी–देवीचीं गाणीं–कानोबाचे मठ–गणेश चतुर्थी-दिपवाळी-मोहरम–यात्रा व जत्रा–उरूस-मिशनरी–परमहंस मंडळी–विष्णु बावा ब्रह्मचारी. पृ० ३१५–३४६

## प्रकरण १५

## साधारण विषय

इंग्रज लोकांविषयीं असमंजस विचार–आमच्या राजांची राज्य चालविण्याची रीति, त्यांचा उधळेपणा, व भित्रेपणा–बाहुल्यांचीं लग्नें-लहान मुलांचें लग्न करण्याचा नाद – माकडांचें लग्न – इंग्रजसरकारचा दक्षपणा – जातिप्रकरणीं खूळ – असंतुष्टपणा–वास्तविक भूतदया. पृ० ३४७–३५७

# मुंबईचें वर्णन

१२१९

# मुंबईची हल्लींची व पूर्वींची स्थिति.

## प्रकरण १.

शहराची रचना—अनेक जातीचे लोक—निरनिराळया भाषा—त्यांचे पोशाक—नामांकित स्थळें—गाड्याघोडे—मूळची स्थिति आणि वैभव—कंपनी सरकारचें ऐश्वर्य—शहराची लांबी रुंदी—इंग्रजांची राजसत्ता देशोदेशच्या लोकांचें येणें.

भरतखंडांत मोठमोठालीं नामांकित शहरें पुष्कळ आहेत, परंतु मुंबई शहरासारखें लहान असून टुमदार व अनेक चमत्कारिक विषयांनीं भरलेलें, कोठें आढळत नाहीं असें बहुतेक सांगतात. आणि ही गोष्ट वास्तविक आहे कीं, ह्या शहरासारखें भरगच्च व नोकदार शहर कोठें विरळा. ह्याचा थाट व ऐश्वर्य पाहूनच कित्येक आपला स्वदेश सोडून एथचे वतनदार झाले आहेत; आणि मुंबईत लोकांची इतकी दाटी होण्याचें बहुतकरून हेंच एक कारण असावें. काय हो सांगावें ! सहज रस्त्यांतून जावें तर टोलेजंग वाडे, विस्तीर्ण इमारती, रमणीय बंगले व बागबगीचे पाहूनच मन चकित होऊन जातें. हें तर असो; परंतु मुंबईतील रस्त्यांसारखे विस्तीर्ण, स्वच्छ, निर्मळ व सरळ रस्ते हिंदुस्थानांत दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं दिसत नाहींत, असें पुष्कळ लोकांचें ह्मणणें आहे. अहो हे रस्ते शिंपायच्या नव्या नव्या युक्त्या तरी आजपर्यंत किती निघाल्या ! फक्त या रस्त्यांवर पाणी शिंपण्याबद्दल सरकारास प्रतिवर्षी पंचवीस तीस हजार रुपये खर्च होतो. कोणी असें म्हणतात कीं, पुण्यांतील फरसबंदी रस्ते मुंबईतील साध्या रस्त्यांच्या जकातीस देखील पुरणार नाहींत. दुसरें अणखी वैभव तें किती वर्णावें ? मुंबईत संन्यासी, गोसांवी, आणि बैरागी देखील हांड्या व गलासें वापरतात. कधीं कधीं भुलेश्वराच्या रस्त्यांतून जात असतां, एकादा जटाधारी बैरागी मस्तकापासून पायांच्या अंगठ्यापर्यंत भाकरीसारखी जाड

राख फांसलेला, व कमरेस मनगटाएवढा मजबूत दोर बांधलेला असा एकादी उंच किंमतीची हांडी बगलेंत मारून रस्त्यांतून डुलत डुलत जातांना दृष्टीस पडतो. पुष्कळ ठिकाणीं संन्याशांच्या व बैराग्यांच्या मठांत हांड्या व गलासें लावलेलीं असतात.

"छपन्न भाषा आणि अठरा पगड जात" अशी एक प्राकृत जनाची म्हण आहे. परंतु मुंबईत सांप्रत किती भाषा चालू आहेत व किती जाति आहेत ह्याचा कांहींच थांग लागत नाहीं. एक मराठी भाषाच तीस चाळीस तऱ्हेची आहे. यावरून दुसऱ्या भाषांचें अनुमान सहज करितां येईल. आतां मुंबईमध्यें किती जातीचे लोक आहेत याचें संक्षिप्त अनुमान करून पाहूं. हिंदू, यांमध्यें सुमारें शेंदीडशें भेद आहेत-मारवाडी, मुलतानी, भाटये, वाणी, जोशी, ब्राह्मण, (सुमारें पंचवीस तीस प्रकारचे ब्राह्मण एथें आढळतात) कांसार, सुतार, जिनगर, लोहार, भंडारी, भोपी, सोनार, शेणवी, (ह्यांत आठ दहा प्रकार आहेत) पाताणे परभु, कायस्थ परभु, धुरु परभु, उग्र परभु, शिंपी, खत्री, कांतारी, झारे, पांचकळशे, शेटये, लवाणे, कुंभार, लिंगायत, गवळी, घांटी, मांग, म्हार, चांभार, हजाम, तेली, माळी, कोळी, धोबी, कामाठी, तैलंगी, कानडी, कोंगाडी, घडशी, पुरभय्ये, बंगाली, पंजाबी, इत्यादि. अणखी ह्या प्रत्येक जातींत जे क्षुल्लक अंतर्भेद असतात, त्यांचा तर कोणासच अंत लागत नाहीं. आतां दुसऱ्या जाती पाहा-पारशी, मुसलमान, मोंगल, यहुदी, इस्राएल, बोरी, खोजे, मेमण, आरब, कंधारी, अशी अठरा पगड जात आहे. या शिवाय, इंग्रज, पोर्टुगीझ्, फ्रेंच, युनानी, वलंदेजी, तुर्क, जर्मन्, अर्मानी, चिनी, इत्यादि टोपीवाले चहूंकडे दृष्टीस पडतच आहेत. ह्या अनेक जातीच्या लोकांचे चित्र विचित्र पोशाक पाहून मनुष्याची कर्मणूक होती इतकेंच नाहीं, परंतु मनांत अनेक विचार उत्पन्न होतात.

सहज घटिका अर्ध घटिका ओटीवर बसावें ह्मणजे अनेक जातीचे किराणे जिन्नस व कापड वगैरे दुसरा माल विकणारे फेरेकरी नजरे समोरून जातात, व अनेक तऱ्हेचे विलक्षण स्वर काढून शब्द करितात ते कानीं पडतात. पहांटेच्या दोन घटिका अवशिष्ट राहिल्या म्हणजे ईश्वराचें नामस्मरण करावें असें हिंदुशास्त्रांत आहे, आणि तसाच प्रकार पोर्टुगीझ् लोकांत आहे, त्यांमध्यें प्रातःकाळीं, माध्यान्हकाळीं, आणि संध्याकाळीं, अशी त्रिकाळ

ईश्वराची प्रार्थना करावी असा नेम आहे. त्याप्रमाणें पहांटेस, दोनप्रहरीं आणि संध्याकाळीं देवळांत घंटा वाजवून लोकांस देवळांत जाण्याची इशारत होती. ह्या घंटांचे नाद तीनही प्रहरीं सर्व मुंबईभर ऐकायास येतात.

पहांटेच्या ह्या घंटा वाजायचे पूर्वीं तीन चार घटिका रात्र असतानांच प्रथम सकृद्दर्शनीं " मिठों निरो साकर्या निरो " असे शब्द कानीं पडतात. तीन चार घटिकांच्या अवधींत मिठोनिरो विकणारांच्या फेऱ्या सुमारें पांच दहा होतात. आणि त्या प्रत्येकाची स्वर काढण्याची व नवीन शब्दांची योजना करण्याची तऱ्हा विपरीत असत्ये. मिठोनिरो हा सकाळचा सूर्योदयापूर्वीं व संध्याकाळचा सूर्य अस्तमान पावल्यानंतर १० घटिका रात्रपर्यंत रस्तोरस्तीं फिरून विकतात.

मिठोनिरो हा जरी मोठा अमली पदार्थ नाहीं, तरी त्यापासून अंगीं गुर्मी येत्ये. व तो सेवन केला असतां दोष लागतो असें लोक मानितात. कोणी सभ्य गृहस्थानें तो चौघांमध्यें सेवन केलेला आढळत नाहीं. मिठो निरोचा खप बहुधा इंग्रज पोर्टुगीझ्, पारशी, व मुसलमान, आणि कोठें कोठें शूद्र लोकांत होतो. दुसरे लोक कोणी पीत असतील तर विरळा. हा पदार्थ सकाळ संध्याकाळ अशा नामांकित शहरामध्यें रस्तोरस्तीं फिरावा हें प्रशस्त वाटत नाहीं. परंतु फिरंगी लोकांचा या बेटावर पुष्कळ दिवसपर्यंत अम्मल चालत होता याचें अनुमान करण्यास हें एक सबळ प्रमाण आहे. हा काळोखांत कां विकतात याचें कारण बरोबर समजत नाहीं. परंतु असें सांगतात कीं, सूर्योदयीं हा पदार्थ आंबट होतो. खजुरी व ताड यांपासून जो रस काढितात त्यास निरा असें म्हणतात व मिठो हें त्याचें विशेषण आहे.

नंतर दोन घटिका दिवस आला नाहीं इतक्यांत प्रत्यहीं एकामागून एक फेरेकरी येत असतात. त्यांचे असे शब्द कानीं पडतात—भाकरीचे तांदूळ—घ्या चवळीच्या शेंगा—चिक्की गुडदाणी— साकरया वड्डी—राजापुरी हळद—साकर्यागोळ—हिराहिंग—ह्या माहिमी नारोळ—ह्याआंब—मस्का मस्का—घ्यारे मिर्चा कोथंबीर—भाजी मुळे—लस्सण लेरे गोघारी लस्सण—लेरे सक्करमक्करना केक—कलिंगणमेवा खा गुलाबी मेवा खा-लेरे तूरनी डाळ—कंवटेंकंवटें—भुजेली शेंग गरमागरम—तांबडमाती—लेरे कच्छी मूग—कडाकेदार गुलाबी रेवडी—सर्दी रोगाला वैद्य, नाडीपरिक्षक वैद्य, सर्वरोग परिक्षक वैद्य—चिनई बांगडी—घेरे फणसाचे गरे हातापायांला बरे—

राख फांसलेला, व कमरेस मनगटाएवढा मजबूत दोर बांधलेला असा एकादी उंच किंमतीची हांडी बगलेंत मारून रस्त्यांतून डुलत डुलत जातांना दृष्टीस पडतो. पुष्कळ ठिकाणीं संन्याशांच्या व बैराग्यांच्या मठांत हांड्या व गलासें लावलेलीं असतात.

"छपन्न भाषा आणि अठरा पगड जात" अशी एक प्राकृत जनाची म्हण आहे. परंतु मुंबईत सांप्रत किती भाषा चालू आहेत व किती जाति आहेत ह्याचा कांहींच थांग लागत नाहीं. एक मराठी भाषाच तीस चाळीस तऱ्हेची आहे. यावरून दुसऱ्या भाषांचें अनुमान सहज करितां येईल. आतां मुंबईमध्यें किती जातीचे लोक आहेत याचें संक्षिप्त अनुमान करून पाहूं. हिंदू, यांमध्यें सुमारें शेंदीडशें भेद आहेत–मारवाडी, मुलतानी, भाटये, वाणी, जोशी, ब्राह्मण, (सुमारें पंचवीस तीस प्रकारचे ब्राह्मण एथें आढळतात) कांसार, सुतार, जिनगर, लोहार, भंडारी, भोपी, सोनार, शेणवी, (ह्यांत आठ दहा प्रकार आहेत) पाताणे परभु, कायस्थ परभु, धुरु परभु, उग्र परभु, शिंपी, खत्री, कांतारी, झारे, पांचकळशे, शेटये, लवाणे, कुंभार, लिंगायत, गवळी, घांटी, मांग, ह्मार, चांभार, हजाम, तेली, माळी, कोळी, धोबी, कामाठी, तैलंगी, कानडी, कोंगाडी, घडशी, पुरभय्ये, बंगाली, पंजाबी, इत्यादि. अणखी ह्या प्रत्येक जातींत जे क्षुल्लक अंतर्भेद असतात, त्यांचा तर कोणासच अंत लागत नाहीं. आतां दुसऱ्या जाती पाहा–पारशी, मुसलमान, मोंगल, यहुदी, इस्राएल, बोरी, खोजे, मेमण, आरब, कंधारी, अशी अठरा पगड जात आहे. या शिवाय, इंग्रज, पोर्टुगीझ्, फ्रेंच, युनानी, वलंदेजी, तुर्क, जर्मन्, अर्मानी, चिनी, इत्यादि टोपीवाले चहूंकडे दृष्टीस पडतच आहेत. ह्या अनेक जातीच्या लोकांचे चित्र विचित्र पोशाक पाहून मनुष्याची कर्मणूक होती इतकेंच नाहीं, परंतु मनांत अनेक विचार उत्पन्न होतात.

सहज घटिका अर्ध घटिका ओटीवर बसावें ह्मणजे अनेक जातीचे किराणे जिन्नस व कापड वगैरे दुसरा माल विकणारे फेरेकरी नजरे समोरून जातात, व अनेक तऱ्हेचे विलक्षण स्वर काढून शब्द करितात ते कानीं पडतात. पहांटेच्या दोन घटिका अवशिष्ट राहिल्या म्हणजे ईश्वराचें नामस्मरण करावें असें हिंदुशास्त्रांत आहे, आणि तसाच प्रकार पोर्टुगीझ् लोकांत आहे, त्यांमध्यें प्रातःकाळीं, माध्यान्हकाळीं, आणि संध्याकाळीं, अशी त्रिकाळ

ईश्वराची प्रार्थना करावी असा नेम आहे. त्याप्रमाणें पहांटेस, दोनप्रहरीं आणि संध्याकाळीं देवळांत घंटा वाजवून लोकांस देवळांत जाण्याची इशारत होती. ह्या घंटांचे नाद तीनही प्रहरीं सर्व मुंबईभर ऐकायास येतात.

पहांटेच्या ह्या घंटा वाजायचे पूर्वीं तीन चार घटिका रात्र असतानांच प्रथम सकृद्दर्शनीं " मिठो निरो साकर्या निरो " असे शब्द कानीं पडतात. तीन चार घटिकांच्या अवधींत मिठोनिरो विकणारांच्या फेऱ्या सुमारें पांच दहा होतात. आणि त्या प्रत्येकाची स्वर काढण्याची व नवीन शब्दांची योजना करण्याची तऱ्हा विपरीत असत्ये. मिठोनिरो हा सकाळचा सूर्योदयापूर्वीं व संध्याकाळचा सूर्य अस्तमान पावल्यानंतर १० घटिका रात्रपर्यंत रस्तोरस्तीं फिरून विकतात.

मिठोनिरो हा जरी मोठा अमली पदार्थ नाहीं, तरी त्यापासून अंगीं गुर्मी येत्ये. व तो सेवन केला असतां दोष लागतो असें लोक मानितात. कोणी सभ्य गृहस्थानें तो चौघांमध्यें सेवन केलेला आढळत नाहीं. मिठो निरोचा खप बहुधा इंग्रज पोर्टुगीझ्, पारशी, व मुसलमान, आणि कोठें कोठें शूद्र लोकांत होतो. दुसरे लोक कोणी पीत असतील तर विरळा. हा पदार्थ सकाळ संध्याकाळ अशा नामांकित शहरामध्यें रस्तोरस्तीं फिरावा हें प्रशस्त वाटत नाहीं. परंतु फिरंगी लोकांचा या बेटावर पुष्कळ दिवसपर्यंत अम्मल चालत होता याचें अनुमान करण्यास हें एक सबळ प्रमाण आहे. हा काळोखांत कां विकतात याचें कारण बरोबर समजत नाहीं. परंतु असें सांगतात कीं, सूर्योदयीं हा पदार्थ आंबट होतो. खजुरी व ताड यांपासून जो रस काढितात त्यास निरा असें म्हणतात व मिठो हें त्याचें विशेषण आहे.

नंतर दोन घटिका दिवस आला नाहीं इतक्यांत प्रत्यहीं एकामागून एक फेरेकरी येत असतात. त्यांचे असे शब्द कानीं पडतात–भाकरीचे तांदूळ–घ्या चवळीच्या शेंगा–चिक्की गुडदाणी– साकरया वड्डी–राजापुरी हळद–साकर्या-गोळ–हिराहिंग–ज्या माहिमी नारोळ–ज्याआंब–मस्का मस्का–घ्यारे मिर्चा कोथंबीर–भाजी मुळे–लस्सण लेरे गोघारी लस्सण–लेरे सक्करमक्करना केक–कलिंगणमेवा खा गुलाबी मेवा खा-लेरे तूरनी डाळ–कंवटेंकंवटें–भुजेली शेंग गरमागरम–तांबडमाती–लेरे कच्छी मूग–कडाकेदार गुलाबी रेवडी–सर्दी रोगाला वैद्य, नाडीपरिक्षक वैद्य, सर्वरोग परिक्षक वैद्य–चिनई बांगडी–घेरे फणसाचे गरे हातापायांला बरे–

टाळा चावी–तेल–शेवती सायली–ध्यारे शिकींदोर–जरी पुराणा–भेंडे शिराळीं–आ तो चूरण हिंदुस्थानी खावे जावे बडेदिवानी–जिरिमिरी मसाला–छद्रोडचे पायली मीटो–लगारे जलूजोख– बाटली बाटली–दूध–ज्या वांसवते–माल चखें स्वाद रखें–आतो चूरण बत्तीसा तेरा रोग जायगा छत्तीसा– बत्तीसे लड्डू–ध्यारे कापडचोळी. सुमारें वीस वर्षांमागें एक म्हातारा पारशी अनेक जातींचीं लेणचीं एका मोठ्या काथवटींत घालून पोर्टुगीझ् लोकांच्या दारोदार फिरत असे, आणि तऱ्हेतऱ्हेचे स्वर काढून निरनिराळया लेणच्यांचीं फिरंगी भाषेंत नावें घेऊन त्या लोकांस हाका मारी. हा बाहेर निघाला म्हणजे त्याचे ते विलक्षण शब्द ऐकायास रस्तोरस्तीं पांच पंचवीस असामी जमत. तो असे शब्द काढी–सिंयोर कैतान आचार केरे,–सिंयोर मारयान् आचार केरे इत्यादि.

असे अनेक तऱ्हेचा माल विकणारे फेरेकरी लोक सकाळपासून संध्याकाळपर्यंत किमानपक्षीं शेंदोनशें प्रत्येकाच्या दारावरून अनेक भाषांत शब्द करीत जातात. आंब्याचा हंगाम असतो तेव्हां तर प्रत्यहीं शेंपन्नास गांवढेकरी लोक, बायका व पुरुष, आंब्यांच्या कावडी खांद्यावर घेऊन व टोपल्या डोकीवर घेऊन उच्च स्वरानें " ह्या आंब " करीत गल्लोगल्लीं व रस्तोरस्तीं फिरतात. याशिवाय कलमी आंबे विकणारे खेरीज असतात. त्यांचे सर्व शब्द एथें लिहायास लागलों तर एक मोठा ग्रंथच होईल. कांहीं वर्षांमागें आमचा एक मित्र ह्या फेरेकरी लोकांचे कर्कश शब्द दिवसभर सहन होत नाहींत म्हणून कुलाब्यास जाऊन एकांत ठिकाणीं राहिला. एवढी या लोकांची वाणी त्रासदायक आहे. अशक्त व रोगी लोकांच्या कानीं हे शब्द सतत पडले असतां त्यापासून त्यांस फार इजा होती. विद्याभ्यास करणाऱ्यांचीही यापासून बरीच हानि होती.

पोशाकाच्या डामडौलावरून मुंबईत तर श्रीमंत कोण, आणि गरीब कोण हें ओळखायाची मारामार पडत्ये. मुंबईतील साधारण लोकांस वस्त्रप्रावरणाची जितकी छानछोकी असत्ये तितकी कलकत्त्यांतील मोठमोठाल्या बाबूलोकांतही नसत्ये. कायहो सांगावें ! सहज एकादा ताकवाला दुकानांतून बाहेर पडला, तर वीत दीड वीत कांठाचें अष्टी धोतर नेसतो; लप्फेदार दशांचें चक्री पागोटें डोकीस घालितो; बुट्टीदार काश्मिरी शाल पांघरतो; हिंगळा सारखा लाल नरम आपाशाई जोडा पायांत चढवितो; आणि कानांत सुंदर भिकबाळी लटकावून

रस्त्यांतून इतक्या मिजासीनें चालत जातो कीं, पाहाणारास हा कोणी जगत्-शेटीचा नातूच असावा असा भास होतो.

सन १८५९ त गोमांतक एथें पोर्टुगीझ् सरकारानें सर्वपदार्थसंग्रहालय स्थापून अनेक देशांतून चमत्कारिक पदार्थ आणून लोकांस दाखविले. त्यावेळीं आमच्या एका मित्रानें मुंबईतील निरनिराळया जातीच्या लोकांच्या पागोट्यांचे मासले पाठवून दिले. ते सुमारें पन्नास पाऊणशें असून केवळ निवडक होते. असें सांगतात कीं, त्या पागोट्यांचे निरनिराळे डौल व आकृति पाहून गोमांतकांतील लोकांस मोठें आश्चर्य वाटलें कीं, अशीं तऱ्हेवार पागोटीं घालणारे लोक मुंबई शहरांत राहतात. एथें जसे सर्व जातींचे लोक सांपडतात तसे कोणत्याच शहरांत सांपडत नाहींत. हें सर्वजातीयलोकस्थल असें ह्मटलें असतां कांहीं बाध येणार नाहीं.

मुंबईंत घड्याळें व वाद्यें यांची जी संख्या आहे त्याचा एक तृतीयांश देखील सर्व भरत खंडांत सांपडणें कठीण. ह्या घड्याळांच्या आकृतीच किती तऱ्हेच्या आहेत. अर्धरुपयाच्या आकृतीपासून तळाठा एवढीं मोठीं घड्याळें असतात. मोठीं घड्याळें जीं आपोआप वाजतात त्यांस क्लाकूस असें ह्मणतात. तीं चार रुपयांचे किमतीपासून पांच हजार रुपयांच्या किमतीचीं असतात. असें एक क्लाक कांहीं वर्षांमागें एका राजास पाठवायासाठीं एथें आणिलें होतें, तें साधारण देवाऱ्या एवढें मोठें असून त्यांत अनेक वाद्यें वाजत. तास, अर्धतास आणि पावतास वाजायाचे वेळीं शिपायांचीं चित्रें बाहेर येऊन कवाईत खेळत असत. आणखी कोंबडा त्याचा दरवाजा उघडून बाहेर येऊन मोठ्यानें साद् करी. हें क्लाक मोठें चमत्कारिक होतें. यास पांच हजार रुपये पडले होते. अशीं अनेक तऱ्हेचीं क्लाकें एथें कित्येक श्रीमंत लोकांच्या घरीं असतात. लहान घड्याळें पांच रुपयांचे किमती पासून हजार दीड हजार रुपये किमतीचीं असतात. कित्येक घड्याळें सोन्याचीं असून हिरेजडित असतात. तशाच यांच्या सोन्यारुप्याच्या सांखळा मोठ्या सफाईदार असतात. साधारण लोक देखील मुंबईंत घड्याळें व क्लाकें वापरतात. कोठेंकोठें परीट आणि न्हावी देखील घड्याळें बाळगतात. एकादा श्रीमान् इंग्रज असला तर त्याच्या घरीं किमानपक्ष पांच सात क्लाकें व दोन चार सोन्या रुप्याचीं घड्याळें असतात. क्लाकांची योजना अशी केलेली असत्ये:— एक बबरजी खान्यांत, एक जिन्यावर, एक दिवाणखान्यांत,

एक जेवणाच्या मेजाजवळ, एक वाचायाच्या कोठडींत, एक बसायाच्या जागेंत, व एक निजायाचे कोठडींत, याप्रमाणें पारशी व दुसऱ्या श्रीमान् लोकांच्या घरींही क्लाकें जागोजागीं ठेविलेलीं असतात. भाडोत्री गाडीवाल्यांच्या तबेल्यांत देखील घड्याळें असतात. कोठेंकोठें बट्लर आणि बबरजी देखील शेंदीडशें रुपयांच्या किमतीचीं सोन्याचीं सांखळीसुद्धां घड्याळें गळयांत घालून रस्त्यांत फिरतांना दृष्टीस पडतात. सारांश गरीब गुरीब देखील मुंबईत घड्याळें बाळगितात. जागोजागीं, चौक्यांवर, देवळांत, मशिदींत, दवाखान्यांत व कारखान्यांत, घड्याळें वाजतांना ऐकायास येतात; तेणेंकरून गरीबगुरिबांस देखील घटिका, तास, पळें, सर्वकाळ समजतात.

नाना तऱ्हेचीं नवीं घड्याळें विकण्याचीं दुकानें किल्ल्यांत व दुसऱ्या ठिकाणीं पुष्कळ आहेत. हीं इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स व जिनीव्हा या देशांतून येतात. जीं इंग्लंड देशांतून येतात तीं उत्तम प्रतीचीं असतात. घडयाळें व क्लाकें नीट करणाऱ्या पारशांचीं व दुसऱ्या लोकांचीं दुकानें दर रस्त्यांत पांच दहा आहेतच. आणि प्रत्येक दुकानांत पाहावें तेव्हां घडयाळें नीट करून घेणारे दोन चार गृहस्थ बसलेले आढळतातच. घडयाळें नीट करणारे लोक बहुधा मोठे धूर्त व मसलती असतात. कोठें कोठें या लोकांकडे टोपली टोपली घड्याळें पडलेलीं असतात.

या शहराचें वैभव पाहूनच मराठे लोक आनंदांत असतात तेव्हां दारापाशीं तुणतुणें व डफ वाजवीत बसून मुंबईच्या स्तुतिपर कवनें ह्मणतात, त्यांतील एकदोन मासले पुढें उतरून घेतले आहेत.

---

## लावणी.

आसपास दर्या भरा है बडाजी ख्याल खुदरतका ॥
विलायतमें बादशाह रहना मुलखोंपर अम्मल उनका ॥
तालचेरी मदरास व्हां है कलकत्ता बंगालेका ॥
बडे बडे शहरोंमें तारिफ नाम बजाता मुंबईका ॥
कां लग्गइ नामही बिकट नाजुक बंदर दम्मणका ॥
पानीपर फौजा लगाया चार तरफ घोशा उनका ॥

सब शहरोंपर हुकुम चलाता बंगालेका साहेबका ॥
मुंबई शहरका नवा बंदर माल आवता मुलखोंका ॥
काशी गया अब भैया बालक टोपीवालेका ॥
सुरतमे साहेबी करते शहर बढाया कोचीका ॥
माहीम मांडवी धक्का बंदीर नादर सुभावणा ॥
करनाटक मस्कत चीन बडा माल आवता भरणा ॥१॥ मुंबई शहर गुलजार मुंबादेवी है ठिकाणा ॥

इंग्रजकी साहेबी चलता उप्पर किल्ला नमुना ॥
अजब तऱ्हेोंका टापु मुंबई जरा है दखनमें ॥
शिव शंकर पैगंबर देव रहेते है ते बसतीमें ॥
उस बसतीके चातुर लोक ऐसा नहीं कोय दुनयामें ॥
पवनसें लेता काम लकडी चलाता है पानीमें ॥
शेंकडो खंडीका आटा होता है पवनचक्कीमें ॥*
पलटणकुं पाव बनाकर भिजवा देता लष्करमें ॥
सुनो घड्याळी घननघनन आवाज आवता देवलमें ॥
क्या कलसूतर काम बनाया घंटा वाजे देवलमें ॥
बावडीकुं बंब बांधकर पाणी भेजवाता जहाजोमें ॥
हजारो आरमार खडी देखत तमासा बंदरमें ॥
कांटेसे तोफा चढाकर उतार लेते किल्लेमें ॥
पाहाडसरिखे जहाज बनाते कारखाना गोदीमें ॥
सो हत्तीसें काम ना हुवे सो एक आदमीने करना ॥
उसमेंसें जहाज निकल कर बडे पानीमे ले जाना ॥२॥ मुंबईशहरगुलजार ॥
क्या हिकमतसें संगीन पक्का काम बनाया है किल्लेका ॥
कोटके अंदर कोट घेरा खंदक पानीका ॥
बुरुजपर तोफा रखा है बडा मार मारनेका ॥
खडा चौकीपाहारा होता है बंदोबस्ती दरवाजेका ॥

---

* चर्चगेटाजवळ वाऱ्याच्या योगानें गहूं दळायाचा कारखाना सन १७२५ त घातला होता.

कोटके अंदर कोट खासा किल्ला साहेबका ॥
सवाई निशाण भडके बावटा विलायतके बादशहाका ॥
कोटके बाजु न्यारा मुक्काम है खुलाबेका ॥
दांडीपर चिराख जलता सुमार मनवर आनेका ॥
उस बाजुकु और किल्ला बांदा है टेंकरीका ॥
सब शहरोकु लिया पेटमें वांकु सक्ता नै चलनेका ॥
†माजगांवमें तलाव बंगला नवाब हनशासाहेबका ॥
परलमें हवेली बना हुवा है ऐसा काम नहीं देखा ॥
माहिमसें लगा मुंबई बागबंगलेका खुब रमणा ॥
जग्गो जग्गे मेला होता है महालक्ष्मी देखना ॥ ३ ॥ मुंबईशहरगुलजार ॥
सेट और सावकार घरघर अम्मल सबकूं खिलावते ॥
पारशीन गुजराती, शेणवी परभू चलावते ॥
मुसलमान और सब लोक बडे बडे तालेवान व्हां रेते ॥
उनके जीव सब कोई ख्याल तमासा देखत है ॥
बारा कौन्सलदार आठवे दिन कौन्सल भरते है ॥
बूक देखकर जुसतीस होती साहेब करता अदलजसे ॥
नक्तसें गोविंदराव जुन्नर रानोजी व्हां रहते ॥
प्रिय मूरतकी दुवा देखकर मल्लारी ख्याल खुब गाते ॥
मुंबादेवी माता शरम रखना तेरेबिन कुच नहीं रेते ॥
भैरु बजाते मोर चंगदंग आबाजी छंद खुब गाते ॥
छोटे बडे सब लोकोंकु अर्जी मेरी सुन लेना ॥
हम परदेस पाखरूं उस खातर मोबद रखना ॥ ४ ॥ मुंबईशहरगुलजार ॥

---

## मुंबईवर पोवाडा.

सागरामाजी बेट थेट पहाति चे कोशाचा छाटा ॥
भरति आल्या संधीस धक्यार्शी उसळति लाटावर लाटा ।।
महागिऱ्या लाखोच गलबतें गणतां नाहीं त्या थाटा ॥

---

† हनशा साहेब हा मोंगल बादशाहाकडून वकील माजगावांत रहात होता.

रात्रौ लांबिल येति जहाजें खुणा दिव्याचा रे बोभाटा ॥
मुंबइशहर आंत रस्ते बांधिले चहुंकडे सडका च्यारे वाटा ॥
तृतीय प्रहर शिडकाव सड्याचा नसे खडा कचरा कांटा ॥
म्याने बग्या रथ रोज धडाका पैस म्हणति पलिकडे हटा ॥
तशा झपेटिंत कोणी सांपडला त्याचा तर चुरडा आटा ॥
वस्ति शेणवी परभु पारशी पैके पूर धुंदी ताठा ॥
एकाच्या मर्जीस आलें तर सारे जलद मसलत घाटा ॥
असे आहेत स्वच्छंदि विलासी आपुले महालीं बेपरवा ॥
प्रस्तुत काळीं हौस हवेची भोगुन घ्या तृप्ति जिरवा ॥
पदरीं असूं द्या दाम सैलसी काम डौलैसा मिरवा ॥ १ ॥
प्रथम कोट मग पोट भरायास्तव नर हरहुन्नेर झुकले ॥
अटोकाट लिहिणार इंग्रजी जाणति मात्रा बिंदुकलें ॥
जाले गबर पण काय खबर नावाचे नव्हेत येकच दुकले ॥
उदमी वाणी लोक बकाली आपुल्या देशाला मुकले ॥
इकडे सर्व अनुकूल परंतु पाणि कंठिचे रें सुकलें ॥
शरिर ढिलें अगदींच जसा काय वळिं दोरिचा पिळ उकले ॥
मिजाज हलवा दूध चहा पण म्हणति आज डोकें दुखलें ॥
पित्त क्षोभलें हमेतच होतो जर जेवणवेळा चुकलें ॥

हा पोवाडा कोणी फंदीनें रचिला होता. ह्याचीं चार कडवीं आहेत परंतु एथें दीड कडवें मात्र उतरून घेतलें आहे.

मुंबई शहराच्या वर्णनपर सदहू उर्दूभाषेंतील कवन मल्हारी नांवाच्या एका दक्षिणेंतील मराठ्यानें सुमारें पाऊणशें वर्षांमागें रचिलें होतें. आणि तें त्यानें त्यावेळच्या गव्हर्नर साहेबास म्हणून दाखविल्या वरून ते साहेब मोठे खूष होऊन त्यास सरकारांतून तीनशें रुपये बक्षीस दिले, आणि परत आपल्या देशास जायास सांगितलें. हा मजकूर एका वृद्ध गृहस्थाकडून समजण्यांत आला. त्यानें ह्या कवीस परत लावण्याचें असें विलक्षण कारण सांगितलें कीं, थोडक्या काळांत ह्या शीघ्र कवीनें मुंबईचें मोठ्या चातुर्यानें साद्यंत वर्णन केलेलें पाहून गव्हर्नर साहेबांस असा संशय आला कीं, हा आपल्या राज्याचा सर्व अंत समजून घेऊन

कदाचित् दुसऱ्या राजांस कळवील ! अशा आमच्या लोकांच्या क्लिष्ट कल्पना आहेत.

कोणी नवा गृहस्थ मुंबईस आला असतां प्रख्यात स्थळें पाहाण्यास मोठा उत्सुक असतो; तीं स्थळें कोणतीं म्हणाल तर टंकसाळ, गोदी, तोफखाना, सुताचें यंत्र, कापड विणण्याचें यंत्र, सर्व पदार्थ संग्रहालय, तारायंत्र, लोखंडी सडका, वेधशाला, वैद्यशाला, दारूखाना, टौनहाल, पांजरापोळ, कुलाबदांडी, गिरण्या, उद्योग शाला, पाठ शाला इत्यादि. या शिवाय कोटांत मोठमोठाल्या पेढ्या आहेत; ज्यांत नवीनच टंकसाळेंतून पाडून आणलेल्या लाखो रुपयांचे चकचकीत डोळे दीपिवण्या जोगे ढीग दृष्टीस पडतात. त्यांचा खणखणाट क्षणोक्षणीं कानीं पडल्यामुळें एकाद्यास सहज उल्हास होतो. चमत्कारिक बिलोरी सामान व अनेक तऱ्हेच्या अमोलिक वस्तूंनीं भरलेलीं अशीं पारशी, इंग्रज, व मुसलमान लोकांचीं दुकानें आहेत. तसेच जिकडे तिकडे औषधांनीं भरलेले अनेक रंगाचे शिसे डाक्तर लोकांच्या दुकानांत चमत्कारिक रीतीनें रचलेले पाहून हे कोणी धन्वंतरीच असावे असा भास होऊन एकादे वेळीं मन मोहित होऊन जातें. त्याच प्रमाणें एकाद्या सावकाराच्या घरांत गेलें असतां त्याच्या घरांतील तऱ्हेवार सामान, गाडी घोड्यांचा सरंजाम, चाकर नफरांची धामधूम व द्रव्याची विपुलता पाहून हा कोणी कुबेरच असावा अशी कल्पना होत्ये. जागोजागीं पुस्तकालयें लागून गेलीं आहेत; ज्यांमध्यें सहस्रावधि अनेक विषयांवर सुंदर रीतीनें बांधलेले ग्रंथ रचून ठेविले आहेत. आणि जिकडे तिकडे चित्रें टांगलेलीं आहेत, जीं पाहतांच चित्ररेखेचें स्मरण होतें. अर्थात् जेथें पाऊल टाकावें तेथें दृष्टि वेधण्याजोगें कांहीं ना कांहीं तरी दृष्टीस पडतें. मुंबईंतील अनेक रंगांच्या व आकृतींच्या गाड्या पाणीदार अरबी घोडे जुंपून संध्याकाळचे पांच सहा वाजतां कापाच्या रस्त्यांतून जातात, त्यांचा थाट पाहून एक नवीनच कोंकणांतून आलेला गृहस्थ चालत असतां क्षणभर स्तब्ध उभा राहून असें म्हणाला. "कायहो सांगावें ! तुमची मुंबई हें केवळ इंद्रभुवनच आहे. जन्मास यावें तर एकदां मुंबई पाहावी. तरच जन्माचें सार्थक."

एका मोड ब्राह्मणाची आई खंबायतेहून सन १८६१ त एथें आली होती. ती मुंबईचें ऐश्वर्य पाहून असें म्हणाली, "महाराज तमारी मुंबईनी तो हद्द छे. आजे हूं एक महिनो लगन जोती फरूं छुं, तो पण आंखोनी तृप्ति थतीच नथी. गाडीनी तो रस्तामां एटली भीड थायछे के, सांबेथी चालवा जईये तो

पछवाडेथी गाडिओ आवेछे. जरा आ बाजु सरकवा जाऊं, तो बीजी बाजूथी गाडीओ आवे छे. भगवानजीये मुंबई परतो बहु कृपा करेली छे."

कांहीं वर्षांमागें प्रख्यात सर जमशेटजी जिजीभाई बारोनेट यांहीं इंग्लंड व भरतखंडाची प्रतापी राणी विक्टोरिया हीस एक उत्तम प्रकारची अरबी घोड्यांच्या जोडीची भेट पाठविली होती. तीस सुमारें ३०००० रुपये खर्च झाला होता असें सांगतात. ह्यावरून पुराणांतरीं शामकर्णाचें वर्णन केलें आहे त्याहूनही हे घोडे उंच वर्णाचे होते असें वाटतें.

## कवन.

कायहो मुंबई बंदर उमदा कोट्यावधि फिरतात जहाजें ॥
अजब कंपनी शहर त्याला लंकेची उपमा साजे ॥
गव्हर्नराचें तक्त मजेचें दिसतें उमदा खूब शिरां ॥
तऱ्हेतऱ्हेचे रंगित बंगले ऐन इंग्रजी पहा तऱ्हा ॥
भर रस्त्यामध्यें उभे शिपाई लोक म्हणती सरा सरा ॥
रथगाड्यांची गर्दी होती ऱ्हा बाजूला मागें फिरा ॥
मोठे मोठे सावकारसाहेब रथ फिरवीती झरा झरा ॥
नव खंडींचे माणुस पाहुन रथ म्हणती हा बरा बरा ॥
जिकडे तिकडे अशीच गर्दी रथ जातां धडधड वाजे ॥
अज कंपनी शहर त्याजला लंकेची उपमा साजे ॥

जें मुंबई शहर सांप्रत इतक्या वैभवास चढलें आहे, तें सन १५३० त ज्यावेळीं मुसलमानांकडून पोर्टुगीझ् लोकांच्या हातीं आलें त्यावेळीं केवळ रानवट व ओसाड गांवासारखें असून त्यांत सुमारें लहान मोठीं मिळून ४०० घरें होतीं, आणि पांच दहा हजार लोकांची वस्ती होती. ती केवळ कोळी, भंडारी आणि पांच कळशी, या जातींची असे. आणि जमीनीचा वसूल सरकारास दर-साल ७०० असुरफ्या म्हणजे अजमासें ३५० रुपये होत असे. एथील जमीन कातळवट व बरड असून आसपास खाजणें असल्यामुळें धान्य वगैरेचें उत्पन्नही फार होत नसे. तथापि पुष्कळ वर्षांपासून इंग्रज व्यापाऱ्यांचा त्यावर डोळा होता. सन १६५४ त कंपनीच्या मुख्यांनीं आलिवर क्रामवेल त्यावेळचा इंग्लंडांतील दरबारचा मुख्य अधिकारी याजकडे असें बोलणें लाविलें होतें कीं,

हिंदुस्थानांत व्यापार करण्यासाठीं आपणास पोर्टुगीझ् लोकांकडून कसेंही करून मुंबई बेट मिळेसें करावें. शेवटीं हें बेट त्यांजकडून विकत तरी घ्यावें. परंतु थोडक्याच काळांत अनायासानें तें त्यांस मिळालें. सन १६६१ मध्यें पोर्टुगालच्या राजानें आपली कन्या इंग्लंड देशचा राजा दुसरा चार्लस यास देऊन लग्नसमयीं हें बेट तीस आंदण दिलें. त्यावेळींही ह्याची जमाबंदी केवळ सांगण्याजोगी नव्हती. सरासरी शहराचा खर्च भागणें देखील मुष्कील पडे.

एथील एका पुरातन स्थायिक सुताराकडे एक चमत्कारिक कवन होतें, त्यावरून मुंबईची पूर्वींची स्थिति कशी होती, इंग्रज एथें केव्हां आले, पुढें ते वैभवास कसे चढले आणि मुंबईंतील जमीनीचे भाग समुद्रांत होते ते कसे भरून काढिले, याविषयीं बरींच प्रमाणें सांपडतात. हे श्लोक केवळ मुंबईंतील पहिल्या अस्सल भाषेंत होते, ते कोठें भाषा बदलल्याशिवाय श्लोकांच्या छंदास लागतील तेवढे फिरविले आहेत. पुढील दोन श्लोकांमध्यें मुंबईच्या मूळ स्थितीचें वर्णन केलें आहे.

* सत्रासेंविस संवताचे समयीं इंग्रज विलायेतसीं ॥
आला पाहुनि ज्येष्ठमास बरवा चालूनि मुंबैइसीं ॥
फिंर्ग्यानें बक्शीस गांव दिधला ईनाम बाच्छाइला ॥
तालेवंत समर्थ इंग्रज इथें तैंपासुनी वाढला ॥

निमें मुंबई सागरामाजि होती ॥ बहू लोकवस्ती असीतैं न होती ॥
महाघोर रानें तशा शेतवाड्या ॥ लघू झोंपड्या झांवळयांच्या कवाड्या ॥

सन १६६६ त हें बेट इंग्लंड देशच्या राजानें सालिना १०० रुपये सोन्याचें नाणें सरकारास द्यावें असा करार करून कंपनी सरकाराच्या ताब्यांत दिलें. तेव्हांपासून हळू हळू या शहराचा भरभराट होत चालला. देशोदेशचे लोक येऊन एथें जमूं लागले. हें बेट इंग्लंडदेशच्या राजाच्या स्वाधीन झालें त्यावेळीं शहरांतील मालमत्ता, घरेंदारें व सरकारी ऐवज मिळून सर्व जिनगी २८,३४० रुपयांची होती. सन १६८८ त ६४,९६० रुपये इतकी वाढली. पुढें १८१२ त १,३२,६०,००० इतकी होती. आणि सन १८५८ त फक्त

---

* सध्या १९१९ संवत चालला आहे, यावरून यास आज १९९ वर्षें झालीं.

शहरांतील स्थावर जिनगी व व्यापारी लोकांचा विकावयाचा माल मिळून सुमारें पन्नास कोटी रुपयांवर आहे, असा आकार केला होता. याशिवाय लोकांचें नग नगोटें, नगद नाणें व इतर मालमत्ता. सन १८६१ मध्यें फक्त मुंबईच्या जामदारखान्यांत रोकड ३,१२,५५,२३० रुपये होते; व हिंदुस्थानांतील सर्व जामदारखाने मिळून नगद नाणें १४,२८,६९,१७८ रुपये होतें. ह्यावरून कंपनी सरकारच्या ऐश्वर्याचें सहज अनुमान करितां येईल.

ह्या शहराच्या भरभराटाविषयीं जेव्हां दुसरे शहरांतील लोक ऐकतात, तेव्हां त्याला असें वाटतें कीं, हें मोठें विस्तीर्ण शहर असेल, परंतु हें एक हिंदुस्थानाच्या पश्चिमेस १९ अक्षांशांवर लहानसें बेट असून त्याची लांबी कुलाब्राशिवायकरून उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत सुमारें साडेचार कोश, आणि रुंदी पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत सुमारें दीडकोश, हीही सर्वत्र सारखी नाहीं. कोठें अर्धकोश कोठें पाऊणकोश अशी आहे. आणि सगळें क्षेत्रफळ सुमारें आठ चौरस कोश असून याची आकृति विषमचतुरस्त्र आहे. इतका सगळा या नांवाजलेल्या शहराचा विस्तार. हाही तीनचार जमीनीचे जवळचे भाग एकत्र मिळवून केला आहे. असें हें शहर सर्व प्रकारें निकृष्टावस्थेंत असतांना ह्याचा एवढा भाग्योदय झाला, ही एक मोठीच आश्चर्याची गोष्ट आहे. ह्या बेटाच्या भाग्योदयास अनुकूळ असें पूर्वीपासून एक साधन मात्र होतें, तें कोणतें ह्मणाल तर बंदर. मुंबईच्या बंदरासारखें सर्व गोष्टींत व्यापारास व जहाजांस सोईवार असें भरत खंडांत दुसऱ्या ठिकाणीं कोठेंच नाहीं असें सांगतात. पोर्टुगीझ् भाषेमध्यें "बों" ह्मणजे चांगलें आणि "बेहीया" ह्मणजे बंदर असा अर्थ होतो. आणि मुंबई हें अन्वर्थक नांव ह्या बेटास पोर्टुगीझ् लोकांनीं दिलें असें बहुतेकांचें मत आहे. परंतु त्या पूर्वीं ह्या बेटाचें काय नांव होतें तें बराबर समजत नाहीं. मुंबई हें नांव ह्या बेटास पडण्याचीं बहुतेक दुसरीं कारणें सांगतात, परंतु त्यांतील एकाचाही निर्णय होत नाहीं. याचा विचार पुढें कारणपरत्वें करण्यांत येईल.

इंग्रज लोकांच्या राज्यसत्तेचा पाया ह्या खंडांत प्रथम मुंबईत घातला गेला, आणि पुष्कळ काळ पर्यंत मुंबई हीच त्यांची मुख्य राजधानी होती. मग मद्रास आणि बंगाल हस्तगत झाल्यावर मुख्य राजधानी कलकत्ता करून मुंबई ही त्याच्या खालोखाल केली. पाहा ! जें स्थान केवळ कोळी व भंडारी यांचें होतें आणि ज्यामध्यें पांच सराफ व दोघे प्रख्यात व्यापारी सांपडणें देखील

कठीण होतें, त्याची सत्ता आज भागीरथी सारखी सर्व भरतखंडभर पसरून गेली आहे. " राईचा पर्वत होतो " असें ह्मणतात तसा प्रकार भरतखंडांत इंग्रज लोकांच्या राज्यसत्तेचा झाला. ह्या सगळ्या प्रतापाचा उगम कोठून ह्मणाल तर सुरतेची वखार आणि मुंबई बेटाचा राज्याधिकार. ह्या शहराचा महिमा वाढायास केवळ कंपनी सरकारचेच पाय. इंग्रज लोकांचा अलौकिक उद्योग, अतर्क्य धूर्तपणा, व स्तुत्य व्यवहारदक्षता हींच ह्याच्या वैभवास कारणभूत झालीं, असें ह्मटलें पाहिजे.

पृथ्वीवरील राजे, अमीर व श्रीमान् लोक हजारो रुपये खर्च करून मुंबईचें ऐश्वर्य पाहाण्या निमित्त एथें येत असतात. युरोपखंडांतील राजमान्य गृहस्थ तर या शहरावर स्वामित्व चालवितातच. आफ्रिका खंडांतील शिद्दी लोकांचे राजे व सरदार वर्षे साहा महिन्यांनीं दृष्टीस पडतच आहेत. अमेरिकेंतील नामांकित सौदागर व प्रख्यात मानकरी गृहस्थ मोठमोठाल्या आगबोटींतून बंदरांत उतरत आहेतच. भरतखंडांतील बादशहा, राजे, सरदार इत्यादि बडे लोकांच्या स्वाऱ्या शिवाय तर दिवस खालीं जातच नाहीं. आज कोठें नेपाळचा जंग बहादुर आला; आज कोठें मस्कतचा इमाम आला; आज कोठें सिंधचा अमीर आला; आज कोठें अजमीरचा दिवाणसाहेब आला; आज कोठें इराणचा एलची आला; आज कोठें मुरबीचा ठाकूर आला; आज कोठें बंगालचा नवाब आला; आज कोठें काबुलचा शाहाजादा आला; आज कोठें कलकत्याचा बाबू आला; आज कोठें दिल्लीचा खानबाहादुर आला; आज कोठें करनाटकांतील सुभेदार आला; आज कोठें झालेवारचा राजा आला; आज कोठें उदेपुरचा राणा आला; आज कोठें अर्काटचा मुत्सुदी आला; आज कोठें झंजिबारचा वजीर आला; आज कोठें पोरबंदरचा मनसुबदार आला; आज कोठें सिंदे आले; आज कोठें गायकवाड आले; आज कोठें होळकर आले; आज कोठें धारचे पवार आले; आज कोठें बायजाबाईची स्वारी आली; आज कोठें इंदुरचे सौदागर आले; आज कोठें सातारचा राजा आला; आज कोठें कोल्हापुरचा महाराज आला; आज कोठें ढमढेरे आले; आज कोठें निंबाळकर आले; आज कोठें रास्ते आले; आज कोठें पटवर्धन आले; आज कोठें जमखंडीकर आले; आज कोठें कुरुंदवाडकर आले; आज कोठें पहिल्या प्रतीचे सरदार आले; आज कोठें दुसऱ्या प्रतीचे सरदार आले; असे प्रतिदिवशीं कोणीना कोणी रस्त्यांतून स्वाऱ्यानिशीं जातांना

दृष्टीस पडत आहेतच. जे जे एथें येतात ते शहराचें वैभव पाहून तल्लीन होतात. आणि दहावीस हजार रुपये तरी खर्च करून जातात. कोणी कितीही कृपण असला तरी, या शहरांत आला म्हणजे त्याची मनोवृत्ति फिरून त्याच्या अंगीं औदार्यशक्ति येती, असा या भूमीचा गुण आहे.

न लगे व्याकरणाची न्यायाची घटपटादि खटपट ती ॥
वैकुंठपेंठ मोठी नामावरि हीन दीन खटपटती ॥

ही एक मोरोपंताची आर्या आहे. यांतील भावार्थ इतकाच घ्यावयाचा कीं, ईश्वर मोठा आहे त्याच्या कृपेनें कोणी कितीही अघोर पातकी व मूढ असला तरी तो तरला जातो. हीच आर्या थोडीशी फिरवून तिचा ओघ मुंबई शहराकडे नेला आहे.

न लगे खटपट विद्याभ्यासाची तनधनादि तीं खपती ॥
मुंबइशहरचि मोठें ज्यामध्यें हीनदीनही खपती ॥

पाहा ! आज मुंबईमध्यें गरीब दुबळा, लंगडा लुला, आंधळा पांगळा, बहिरा मुका, भला बुरा, चोर चिरटा, थोंट लबाड, खुळा भोळा, सोंगी ढोंगी, कोणी कसाही आला असतां, अन्नवस्त्रास मरत नाहीं. कोणी कोणी पगडबंद घरीं बसल्या बसल्या सहज दिवसांतून एकदोन रुपये कमावितात. एकादा अडाणी बाणकोटीदेखील एथें येऊन वर्षाअंती पांच पन्नास रुपये घेऊन जातो. मग उद्योगी आणि हुशार लोक शेंकडों रुपये कमावितील, हें सांगायासच नको. कांहीं वर्षामागें एथें लंगडी आणि लुली एक म्हातारी बैरागीण आली होती, तिला डोलींत बसवून रस्तोरस्तीं फिरविण्याचा मक्ता दोघां बळकट शूद्रांनीं पत्करिला होता. ते तिला सर्व शहरभर फिरवून संध्याकाळीं आठ चार आणे देत, आणि बाकीचें उत्पन्न आपण घेत. देशोदेशांतून श्रीमंत एथें येतात इतकेंच नाहीं, परंतु आंधळे, पांगळे, जर्जर झालेले पाउणशें ऐशीं वर्षांचे म्हातारे, अशक्त, व्याधिग्रस्त, असे अनेक जातीचे भिकारी लोकही शेंकडो कोशांवरून एथें येतात.

# प्रकरण २.

मुंबईंत सद्यः कित्येक पुरातन कुळांतील लोक वसत आहेत त्यांचा वृत्तांत–इसवी सन १४०० शां मागें या मुंबई टापूचीं दोनचार बेटें होतीं असें अनुमान करण्याचीं कारणें–मूळचे स्थायिक लोक–पूर्वीचें मुंबादेवीचें व काळबा-देवीचें देऊळ–वसई वगैरे दुसरीं स्थळें–पारशीलोकांचें येणें.

सांप्रत मुंबईमध्यें जे इतके लोक आहेत ते अनेक जातीचे व कुळांचे जमले आहेत, आणि त्या प्रत्येकांतील भेद उघड समजतो. हे लोक एथें कोणत्या काळापासून वसूं लागले याचा पक्का शोध केल्यानें मुंबईची जमीन केवळ बरड असून एवढ्या वैभवास व मोठेपणास चढण्यास राजकीय व व्यापारसंबंधी काय-काय कारणें झालीं याविषयीं प्रत्यक्ष प्रमाण सांपडतें. सुरतेचा व्यापार मुंबई बंद-रांत चालू झाला तेव्हांपासून तें शहर मोडलें. त्यामुळें पुष्कळ पारशी लोक मुंबईंत येऊन राहूं लागले; तसेंच इंग्रज लोकांनीं पुणें घेतलें तेव्हांपासून ब्राह्मण व इतर दक्षिणी लोक एथें येऊन राहूं लागले. घोड्यांचा व्यापार चालू झाल्यामुळें अरब व कंदहारी लोक एथें येऊन वस्ती करूं लागले. याचप्रमाणें इतर देशांतील लोकही एकामागून एक येऊन राहिले. ज्यावेळीं इंग्रज लोकांनीं मिसर व दुसऱ्या देशां-वर स्वाऱ्या केल्या त्यावेळीं बहुतेक मद्रास शहरांतील कामगार व सरदार आप-आपले चाकरमाने घेऊन मुंबईंत आले, त्यामुळें कामाठी लोकांची वस्ती एथें झाली. पोर्टुगीझ्, मुसलमान, आणि इंग्रज ग्रंथकर्त्यांनीं या प्रकरणावर जे ग्रंथ लिहिले आहेत ते वाचून त्यांच्या मूळ स्थानांचीं नांवें शोधून काढिलीं असतां हेंच सिद्ध होतें.

सदहू प्रमाणें हल्लीं मुंबईंत पुरातन काळांतील जे लोक राहतात, त्यांच्या भाषांच्या आधारानें त्यांच्या कुळाचा शोध लागतो. मुंबईंत हल्लीं तऱ्हतऱ्हेच्या मराठी भाषा बोलतात त्यांमध्यें साष्टी, माहीम, माटुंगें, आणि माजगांव, एथील

किरिस्तांव जी भाषा बोलतात ती दुसऱ्या लोकांच्या भाषेहून भिन्न आहे. याजवरून असें दिसतें कीं, फिरंगी लोकांनीं त्यांस हिंदुधर्मांतून आपल्या धर्मांत आणण्याच्या पूर्वीं ते लोक हीच भाषा बोलत असत. पोर्टुगीझ् लोकांनीं किरिस्तांव लोकांस अशी विलक्षण भाषा शिकविली नसावी, कारण यांच्या भाषेंत फिरंगी लोकांचा एकही शब्द सांपडत नाहीं. आणखी फिरंगी लोकांनीं याला आपल्या धर्मांत घेतल्यापासून ते लोक निराळेच राहत असत. यामुळें यांच्या भाषेंत फेरफार होई इतका यांचा त्यांला सहवास घडलाच नाहीं. यावरून स्पष्ट दिसून येतें कीं, जी भाषा सद्यः मुंबईतील किरिस्तांव लोक बोलतात, ती पोर्टुगीझ् लोक या शहरांत यावयाच्या पूर्वीं या बेटांतील सर्व लोक बोलत असत. ज्या ज्या जातींत या चमत्कारिक भाषेचें प्रस्तुत मूळ सांपडतें त्या त्या जातीचा शोध लागतो. याप्रमाणें शोध केला असतां असा निर्णय होतो कीं, पांच जातीचे लोक एथें खालीं लिहिले आहेत, त्या सर्वांची अस्सल भाषा हीच होती. आणि त्या पांच जातींचे पुरातन लेख व कथा पाहिल्या असतां त्यांच्या भाषेवरून जें अनुमान करवतें तेंच सिद्ध होऊन या पांच जाति पुरातन काळापासून मुंबईत आपआपल्या धर्मांत फेरफार केल्यावांचून वसत आल्या आहेत, असें स्पष्ट दिसून येतें. त्या ह्या. १ कोळी; २ भोंगळे भंडारी; ३ पळशे जोशी; ४ पाताणे परभू; ५ पांचकळशे–वाडवळ–सुतार.

भाषेच्या आधारावरून असें सिद्ध होतें कीं, या पांच जाति हें बेट पोर्टुगीझ् लोकांच्या हस्तगत होण्याच्या पूर्वींपासून एथें वसत होत्या. आणखी या पुढील गोष्टीवरून असें दिसून येतें कीं, हे लोक मुसलमान येण्याच्या अगोदर १४ व्या शतकाच्या प्रारंभापूर्वींही एथें वसत असत.

जेव्हां मुसलमान लोकांनीं पहिल्यानें सन इसवी १२९२ मध्यें दक्षिणेवर हल्ला केला, तेव्हां अल्लाउदिन यानें देवगड, ज्यास हल्लीं दौलताबाद असें म्हणतात तेथील हिंदुराजा रामदेव जाधव याचा पराभव करून इसवी सन १३१८ त आपली सत्ता कोंकण समुद्रापर्यंत वाढविली, त्याच समयीं पहिल्या मुबारक बादशहानें त्या शहराजवळ हरपाळ देव याचा पराभव करून त्यास ठार मारून टाकिलें, आणि आपल्या लष्करास कोंकण समुद्रापर्यंत रखवाली करण्याचा हुकूम केला. अल्लाउदीन यानें रामदेव याचा पराजय केला आणि

आपली सत्ता माहीम, साष्टी, कोंकण समुद्र, आणि दुसरीं कित्येक बंदरें एथें चालू केलीं. या दोन गोष्टींचा सविस्तर वृत्तांत पाताणे परभू यांच्या पुरातन लेखांत लिहिला आहे.

वालुकेश्वर महात्म म्हणून संस्कृत पुराण आहे त्यामध्यें वालुकेश्वराच्या देवळाविषयीं जो वृत्तांत लिहिला आहे, त्यांत असें आहे कीं, हें वालुकेश्वराचें देऊळ बांधावयाच्या पूर्वीं मुबारक बादशहाच्या जुलुमामुळें मुंबईतील हिंदूलोक धर्मसंबंधी फार त्रास पावत असत. याजवरून असें दिसतें कीं, त्या वेळीं या शहरांत कोणी उंच वर्णाचे हिंदू होते. जर ते लोक सगळे कोळीच असते तर ते देऊळ बांधावयास झटले नसते, किंवा धर्मसंबंधी जें दुःख होतें तें त्यास समजलें नसतें. जे साष्टींत आणि मुंबईत सद्यः किरिस्तांव लोक आहेत, ते कोळी आणि भंडारी होते, त्यांतून कित्येकांचीं आडनावें आणि मूळभाषा तसीच आहे. या पांच जातींचा संबंध ओळखण्याचें मुख्य साधन त्यांची भाषाच. हे लोक मराठी भाषा बोलतात खरे, परंतु जी भाषा हिंदू किंवा किरिस्तांव कोळी बोलतात त्यांच्या उच्चारावरून व दुसऱ्या हलक्या शब्दांवरून ती केवळ मराठी पासून वेगळी दिसती, यास्तव तिला कोळ्यांची भाषा असें म्हणतात. यावरून ह्या बेटांत पूर्वींपासून पुष्कळ कोळी लोक राहत आले असें समजावें. आणि त्यानंतर दुसऱ्या चार जाति येऊन राहिल्या. मग त्यांस पुष्कळ दिवस कोळ्यांचा सहवास झाल्यामुळें ते कांहीं कांहीं त्यांसारखी भाषा बोलूं लागले, परंतु उच्चारांत व शब्दांत कांहीं फेर पडला. कोंकणांतील दुसरे ठिकाणचे कोळी अशीच भाषा बोलतात, पण जे नीच जातीचे कोळी लोक आहेत ते ही भाषा बोलत नाहींत. या चार जातींमध्यें या भाषेचा भेद फार थोडा समजतो. पळशे, जोशी, परभू, पांचकळशे, या तीन जातींमध्यें तर तो भेद उत्तरोत्तर कमी होत चालला आहे. याविषयींचीं कारणें, दक्षिणेंतून आणि कोंकणांतून पुष्कळ ब्राह्मण लोक एथें येऊन राहूं लागले, व दुसरें एल्फिन्स्टन् विद्यालय स्थापल्यामुळें मराठी भाषेची सुधारणूक होऊन शुद्ध मराठी ग्रंथ निघूं लागले. कित्येक सुशिक्षित लोक जात्याभिमानामुळें मूळ भाषा सोडून शुद्ध ब्राह्मणी भाषा बोलावयास लागले. अशा तीन कारणामुळें भाषेंत बहुत फेर पडला.

भंडारी लोक ओळखण्याचा प्रकार असा आहे कीं, या लोकांत भोंगळीं वाजविण्याचा फार नाद आहे. ती ते फिरंगी लोकांचें राज्य झाल्यापासून कांहीं सर-

कारी कारणावरून वाजवीत असत. सुमारें इसवी सन १६७२ आणि १६८१ यांत एका गृहस्थानें असें पत्र लिहिलें आहे कीं, भंडारी लोक फिरंगी सरकारचे शिंग वाजविणारे अथवा मानकरी शिपाई होते आणि हल्लींही तेच लोक सेशन बसावयाचे दिवशीं न्यायाधिशाची गाडी कोर्टाच्या दरवाज्याजवळ पोहोंचली म्हणजे बावटा घेऊन शिंग वाजवितात. ह्या त्यांच्या अधिकारावरून पुरातन लेखांत फिरंगी लोक येण्याच्या पूर्वीं भोंगळे सरदारांनीं येऊन माहीमचें राज्य घेतलें असें लिहिलें आहे तें खरें आहे असें सिद्ध होतें; त्यावेळीं मुंबई आणि साष्टी हीं बेटें माहीमच्या राज्याखालीं होतीं. यावरून असें दिसतें कीं, भंडाऱ्यांचे पूर्वज भोंगळे सरदारच होते. – ज्यांचे गरीब झालेले वंशज अद्यापि परराज्याचे शोभे-करितां निशाण घेऊन शिंग वाजवीत असतात. कांहीं वर्षांमागें हे लोक माहीम एथें राहत होते आणि भीमराजाचे हाताखालीं साष्टीचा आणि कोंकणांतील कांहीं गांवांचा कारभार चालवीत असत. याविषयीं दुसरे पुरातन लेख आहेत त्यांत या राज्यांचा वृत्तांत लिहिला आहे, त्यावरून असें वाटतें कीं, पूर्वीं या राज्याच्या दोन राजधान्या होत्या, एक माहीम, आणि दुसरी साष्टींतील मरोळ सुभ्यांतील प्रतापपुरी. साष्टीमध्यें या लोकांच्या पूर्वीं नायक लोकांचें राज्य होतें, तें या लोकांनीं घेतलें. इसवी सन १०१८ मध्यें तेथें जो राजा राज्य करीत होता तो आपण तगर राजाचा वंशज असें म्हणवी. परंतु तो नायक लोकांच्या कुटुंबांतील असावा, कारण ठाण्यास ताम्रपट सांपडला त्यावरील लेखावरून असेंच सिद्ध होतें. साष्टीमध्यें शिलालेख सांपडले त्यांतून एकावर सन १०४७ मध्यें केशीदेवराजानें साष्टींतील उतनगांव इनाम दिला असा लेख आहे. आणखी तशींच इसवी सन १०९९ आणि ११००शांमध्यें हरपाळदेव यानें वियुरगांव व दुसरीं इनामें दिलीं आहेत असें लिहिलें आहे.

याप्रकरणीं जे पुरातन लेख आहेत त्यांत भीमराजानें माहीम राज्य स्थापिलें याचा वृत्तांत लिहिला आहे. त्यांत बहुत करून पाताणे परभांच्या आणि कारण-परत्वें दुसऱ्या चार जातींच्याही गोष्टी लिहिल्या आहेत.

मराठे लोकांनीं सन इसवी १७३९सांमध्यें वसई घेतली, त्यानंतर जनार्दन गणेश माहीमकर यांनीं मराठी भाषेंत बखर लिहून अनंतकृष्ण याजला मुंगीपैठणास पाठविली होती त्यांतील कांहीं मजकूर पुढें घेतला आहे,

आपली सत्ता माहीम, साष्टी, कोंकण समुद्र, आणि दुसरीं कित्येक बंदरें एथें चालू केलीं. या दोन गोष्टींचा सविस्तर वृत्तांत पाताणे परभू यांच्या पुरातन लेखांत लिहिला आहे.

वालुकेश्वर महात्म म्हणून संस्कृत पुराण आहे त्यामध्यें वालुकेश्वराच्या देवळाविषयीं जो वृत्तांत लिहिला आहे, त्यांत असें आहे कीं, हें वालुकेश्वराचें देऊळ बांधावयाच्या पूर्वी मुबारक बादशहाच्या जुलुमामुळें मुंबईतील हिंदूलोक धर्मसंबंधी फार त्रास पावत असत. याजवरून असें दिसतें कीं, त्या वेळीं या शहरांत कोणी उंच वर्णाचे हिंदू होते. जर ते लोक सगळे कोळीच असते तर ते देऊळ बांधावयास झटले नसते, किंवा धर्मसंबंधी जें दुःख होतें तें त्यास समजलें नसतें. जे साष्टींत आणि मुंबईत सद्यः किरिस्तांव लोक आहेत, ते कोळी आणि भंडारी होते, त्यांतून कित्येकांचीं आडनांवें आणि मूळभाषा तसीच आहे. या पांच जातींचा संबंध ओळखण्याचें मुख्य साधन त्यांची भाषाच. हे लोक मराठी भाषा बोलतात खरे, परंतु जी भाषा हिंदू किंवा किरिस्तांव कोळी बोलतात त्यांच्या उच्चारावरून व दुसऱ्या हलक्या शब्दांवरून ती केवळ मराठी पासून वेगळी दिसती, यास्तव तिला कोळयांची भाषा असें म्हणतात. यावरून ह्या बेटांत पूर्वीपासून पुष्कळ कोळी लोक राहत आले असें समजावें. आणि त्यानंतर दुसऱ्या चार जाति येऊन राहिल्या. मग त्यांस पुष्कळ दिवस कोळयांचा सहवास झाल्यामुळें ते कांहीं कांहीं त्यांसारखी भाषा बोलूं लागले, परंतु उच्चारांत व शब्दांत कांहीं फेर पडला. कोंकणांतील दुसरे ठिकाणचे कोळी अशीच भाषा बोलतात, पण जे नीच जातीचे कोळी लोक आहेत ते ही भाषा बोलत नाहींत. या चार जातींमध्यें या भाषेचा भेद फार थोडा समजतो. पळशे, जोशी, परभू, पांचकळशे, या तीन जातींमध्यें तर तो भेद उत्तरोत्तर कमी होत चालला आहे. याविषयींचीं कारणें, दक्षिणेंतून आणि कोंकणांतून पुष्कळ ब्राह्मण लोक एथें येऊन राहूं लागले, व दुसरें एल्फिन्स्टन् विद्यालय स्थापल्यामुळें मराठी भाषेची सुधारणूक होऊन शुद्ध मराठी ग्रंथ निघूं लागले. कित्येक सुशिक्षित लोक जात्याभिमानामुळें मूळ भाषा सोडून शुद्ध ब्राह्मणी भाषा बोलावयास लागले. अशा तीन कारणामुळें भाषेंत बहुत फेर पडला.

भंडारी लोक ओळखण्याचा प्रकार असा आहे कीं, या लोकांत भोंगळीं वाजविण्याचा फार नाद आहे. ती ते फिरंगी लोकांचें राज्य झाल्यापासून कांहीं सर-

कारी कारणावरून वाजवीत असत. सुमारें इसवी सन १६७२ आणि १६८१ यांत एका गृहस्थानें असें पत्र लिहिलें आहे कीं, भंडारी लोक फिरंगी सरकारचे शिंग वाजविणारे अथवा मानकरी शिपाई होते आणि हल्लींही तेच लोक सेशन बसावयाचे दिवशीं न्यायाधिशाची गाडी कोर्टाच्या दरवाज्याजवळ पोहोंचली म्हणजे बावटा घेऊन शिंग वाजवितात. ह्या त्यांच्या अधिकारावरून पुरातन लेखांत फिरंगी लोक येण्याच्या पूर्वीं भोंगळे सरदारांनीं येऊन माहीमचें राज्य घेतलें असें लिहिलें आहे तें खरें आहे असें सिद्ध होतें; त्यावेळीं मुंबई आणि साष्टी हीं बेटें माहीमच्या राज्याखालीं होतीं. यावरून असें दिसतें कीं, भंडाऱ्यांचे पूर्वज भोंगळे सरदारच होते.—ज्यांचे गरीब झालेले वंशज अद्यापि परराज्याचे शोभे-करितां निशाण घेऊन शिंग वाजवीत असतात. कांहीं वर्षांमागें हे लोक माहीम एथें राहत होते आणि भीमराजाचे हाताखालीं साष्टीचा आणि कोंकणांतील कांहीं गांवांचा कारभार चालवीत असत. याविषयीं दुसरे पुरातन लेख आहेत त्यांत या राज्यांचा वृत्तांत लिहिला आहे, त्यावरून असें वाटतें कीं, पूर्वीं या राज्याच्या दोन राजधान्या होत्या, एक माहीम, आणि दुसरी साष्टींतील मरोळ सुभ्यांतील प्रतापपुरी. साष्टीमध्यें या लोकांच्या पूर्वीं नायक लोकांचें राज्य होतें, तें या लोकांनीं घेतलें. इसवी सन १०१८ मध्यें तेथें जो राजा राज्य करीत होता तो आपण तगर राजाचा वंशज असें म्हणवी, परंतु तो नायक लोकांच्या कुटुंबांतील असावा, कारण ठाण्यास ताम्रपट सांपडला त्यावरील लेखावरून असेंच सिद्ध होतें. साष्टीमध्यें शिलालेख सांपडले त्यांतून एकावर सन १०४७ मध्यें केशीदेवराजानें साष्टींतील उतनगांव इनाम दिला असा लेख आहे. आणखी तशींच इसवी सन १०९९ आणि ११००शांमध्यें हरपाळदेव यानें वियुरगांव व दुसरीं इनामें दिलीं आहेत असें लिहिलें आहे.

याप्रकरणीं जे पुरातन लेख आहेत त्यांत भीमराजानें माहीम राज्य स्थापिलें याचा वृत्तांत लिहिला आहे. त्यांत बहुत करून पाताणे परभांच्या आणि कारण-परत्वें दुसऱ्या चार जातींच्याही गोष्टी लिहिल्या आहेत.

मराठे लोकांनीं सन इसवी १७३९सांमध्यें वसई घेतली, त्यानंतर जनार्दन गणेश माहीमकर यांनीं मराठी भाषेंत बखर लिहून अनंतकृष्ण याजला मुंगीपैठणास पाठविली होती त्यांतील कांहीं मजकूर पुढें घेतला आहे,

इसवी सन १२९४ त अल्लाउदीन यानें पैठणास रामदेव राजाचा पराभव केला असतां तो पुनः राज्य करूं लागला, आणि त्याचा मुलगा केशवराव यानें आपल्या बापाचा पराजय झाल्यानंतर बापाचें राज्य कायम राहावें याकरितां कोणत्या प्रकारचा पराक्रम केला ह्या सर्व गोष्टी त्या बखरींत लिहिल्या आहेत. जरी ही बखर सरळ लिहिलेली नाहीं तथापि तिजवरून असें सिद्ध होतें कीं, रामदेव राजा शूद्रकुळांतील होता आणि त्याचें आडनांव जाधव होतें. परंतु बखरीमध्यें जाधव हें आडनांव सोडून त्याबद्दल त्यास राणे असें आडनांव देऊन तो राजा सूर्यवंशी क्षत्रिय कुळांतील असें लिहिलें आहे. आणखी या बखरींत असें लिहिलें आहे कीं, रामदेव राजाचा दुसरा मुलगा भीमराव यास बापानें आपण राज्य करीत असतां गुजराथेमधील उदेपूरच्या राज्यावर बसविला होता; परंतु तो कोणत्या गांवांत होता हें नीट समजत नाहीं. त्यानंतर त्याच्या बापाचा पराजय झाला असतां आणि दक्षिण व पश्चिमेकडे मुसलमानींचें प्राबल्य झाल्यामुळें भीमराजास इसवी सन १२९६ मध्यें सूर्यवंशी बारा राजे आणि नामांकित सोमवंशीं क्षत्रियांचीं ६४ कुळें आणि दुसरें पुष्कळ लष्कर घेऊन स्वदेश सोडणें प्राप्त झालें. मग त्यांसुद्धां दक्षिणेंत येऊन नायकराजाचा पराजय करून त्यानें चिंचणीतारापूर, आसरी, केळवेंमाहीम, थळ, साष्टी, आणि माहीम हीं एकामागेंएक घेऊन त्याचें एकच राज्य केलें, आणि त्यांतील ४४४ गांवांचे पंधरा महाल करून आपल्या बरोबर जे मुख्य मुख्य होते त्यांस नेमून दिले. ह्या सूर्यवंशी राजांचीं आणि त्यांच्या कुटुंबांचीं नांवें आणि त्या महालांचीं नांवें ह्या बखरींत सविस्तर लिहिलीं आहेत. त्यामध्यें माहीम हें ओसाड बेट आणि तेथें राहणारे फक्त कोळी असें लिहिलें आहे. परंतु भीमराजानें तें स्थान चांगलें आहे असें पाहून कित्येक लोकांस पाठवून वसविलें. मग त्यांनीं तेथें घरें बांधून वाड्या व बाग केले. याप्रमाणें वसविलेलें माहीम कांहीं काळानें लहानशा राज्याची राजधानी झालें. याबखरींत माहीमास माहीमबेट, महिकावती, प्रभावती, आणि भीमस्थान अशीं नांवें दिलीं आहेत. कांहीं सरदार एथेंच राहिले व कित्येकांस केळवेंमाहीम, चऊल, वसई या सुभ्यांच्या नेमणुका मिळाल्या. याजवरून त्यांचीं आडनांवें माहीमकर, केळवेकर, वसईकर, चऊलकर अशीं पडलीं आहेत.

भीमराजा मरण पावल्यानंतर त्याचा पुत्र प्रतापशा राज्य करूं लागला. त्यानें साष्टींत मरोळ एथें प्रतापपुरी या नांवाची एक राजधानी बांधिली. त्याच्या

राज्याच्या शेवटीं त्यानें चऊलचा सरदार नागरशा याजबरोबर लढाई करावयास प्रारंभ केला. तो त्याचा मेहुणा असावा असें लिहिलें आहे. शेवटीं नागरशानें त्या प्रतापशाचा पुष्कळ वेळां पराजय करून त्याचें राज्य घेतलें, आणि माहीमचें राज्य स्वतः करूं लागला. ह्या लढाईंत ज्या सरदार लोकांनीं कुमक करून नागर-शास राज्यपदवीस चढविलें होतें, त्यांस त्यांच्या इच्छेप्रमाणें कांहीं बक्षीस न दिल्यामुळें त्या एकमेकांत कलह उत्पन्न झाला. त्यावेळीं कित्येकांनीं आपल्या मदतीस मुसलमान लोकांस बोलावून आणिलें. तेव्हां त्यांनीं आपलें लष्कर साष्टी आणि माहीम एथें पाठवून नागरशास ठार मारून त्याचें राज्य घेतलें, आणि सर्व ठिकाणीं आपलें राज्य स्थापिलें. परंतु त्यावेळीं त्याचे फार लोक एथें येऊन राहिले नव्हते. नंतर भोंगळे सरदार आले, ते बहुतकरून भंडारी असावे असें वाटतें. कारण त्या लोकांमध्यें अद्यापपर्यंत भोंगळे असें आडनांव चालत आहे. आणि शिंग वाजविणें हा त्यांचा हक्कही आहे. यावरून पूर्वीं त्यांकडे कांहीं सत्ता होती असें ह्मणावयास थोडासा आधारही सांपडतो. बखरींत दुसरें असें लिहिलें आहे कीं, मुसलमानांनीं भोंगळे सरदारांचा मोड करून पुनः तें राज्य घेतलें.

असें दिसतें कीं जेव्हां पोर्टुगीझ् इकडे आले तेव्हां भंडारी लोकांनीं त्यांस मदत केली, त्यामुळें फिरंगी लोकांच्या राज्यामध्यें त्यांचे हक्क पूर्ववत् चालूं लागले. भोंगळे सरदारांचा पराजय करून मुसलमान लोकांनीं आपलें राज्य हळूहळू कोंकणपर्यंत वाढविलें आणि वसईचा राज्यकारभार बहादुरखानास दिला, त्यावेळीं फिरंगी लोकांनीं त्यास द्रव्याची लालूच दाखवून तेथें एक व्यापारासाठीं वखार बांधली आणि कांहीं दिवसांनीं पुष्कळ लष्कर जमवून तिचा मजबूत किल्लाच बनविला. नंतर त्यांनीं दंगा आणि जुलूम करून, साष्टी, आणि माहीम हीं बेटें घेतलीं. पुढें या पोर्टुगीझ् लोकांनीं मुंबई इंग्रज लोकांस कशी आंदण दिली आणि मराठे लोकांच्या राज्याचें प्राबल्य होऊन फिरंगी लोकां-बराबर त्यांनीं कशी लढाई केली व तीन वर्षें लढून इसवी सन १७३९ मध्यें वसईचा किल्ला कसा सर्द केला हा सर्व वृत्तांत या बखरींत लिहिला आहे.

दुसरी एक बखर वसई एथील लेख जमवून केली आहे त्यावरून या गोष्टी खऱ्या ठरतात कीं, भीमराजा शूद्र सरदार होता त्यानें साष्टी आणि कोंकण

यांतील कांहीं देश घेऊन आपलें राज्य स्थापिलें आणि माहीम आपली राजधानी केली.

ह्या इतिहासावरून ह्या पुढील गोष्टीचें अनुमान होतें. इसवी सन १२९५ चे पूर्वी मुंबईमध्यें कोळी लोक वसत होते आणि ते एथील मूळ स्थायिक.

इसवी सन १२९५ मध्यें भीमराजानें मुंबई घेऊन तेथें बहुतकरून माड लाविले, त्यामुळें भंडारी लोक आले.

भीमराजानंतर जो राज्य करीत होता त्यास चऊलच्या सरदारांनीं पदच्युत केलें. ते सरदार त्या राज्याचे सुहृत्संबंधी नसले तर शेटये जातीचे असावे.

चऊलच्या सरदारांचा मुसलमान लोकांनीं मोड केला. त्यानंतर माहीमचें राज्य भोंगळे लोकांनीं केलें, ते बहुतकरून भंडारी असावे, त्यांला राज्य प्राप्त झाल्यानंतर त्यांनीं आपलें भंडारी आडनांव टाकून भोंगळे असें आडनांव घेतलें. नंतर जेव्हां पोर्टुगीझ् लोक आले तेव्हां त्यांनीं मुसलमान लोकांचा मोड करण्याकरितां मदत केली असतां त्यांस कांहीं राज्याधिकार प्राप्त झाला, त्यामुळें सरकारी निशाण नेण्याचे किंवा शिंग वाजविण्याचे हक्क त्यांकडे राहिले. याप्रमाणें इसवी सन १२९० पासून आजपर्यंत या पुढील जातींचें मुंबईत प्राबल्य झालें.

१. कोळी.
२. भीमराजा व त्याचे वंशज.
३. चऊलचे सरदार ज्यांचे जातीविषयीं बरोबर सिद्धांत होत नाहीं, परंतु ते वरील दोन जातींपासून निराळयाच जातीचे असावे.
४. मुसलमान.
५. भंडारी अथवा भोंगळे.
६. दुसऱ्या वेळीं आलेले मुसलमान.
७. फिरून बहुतकरून भंडारी, भोंगळे.
८. पोर्टुगीझ् फिरंगी.
९. इंग्रज.

पहिल्या दोन बखरी वाचल्यावरून असा सिद्धांत होतो कीं, इसवी सन १२९५ मध्यें मुंबई आणि माहीम हीं स्वतंत्र दोन निराळीं बेटें होतीं.

सुप्रीम कोर्टांतील माजी चीफ ट्रान्स्लेटर मिस्तर मर्फी यांनीं लिहिलेल्या वृत्तांतावरून वरील बहुतेक गोष्टी घेतल्या आहेत.

कोळी, भंडारी, पांचकळशे, सुतार, वाडवळ, परभू, आणि जोशी, ह्या लोकांची वस्ती ह्या बेटांत मुळापासून होती असें जें एथें सांगितलें आहे त्यास प्रत्यक्ष प्रमाण हेंच आहे कीं, सदरीं सांगितलेल्या लोकांत पूर्वींपासून चालत आलेल्या जमीनी, शेतें, वाडया अद्यापि आहेत, शिंवाच्या दक्षिणेस

पळशांची डोंगरी ह्मणून एक ठिकाण आहे. त्यावरून पूर्वी या लोकांची एथें वस्ती होती असें वाटतें. माहिमाच्या सीमेवर पुरातन परभादेवीचें देऊळ आहे यावरून परभू गृहस्थांचें एथें वास्तव्य होतें असें अनुमान होतें. जोशी व परभू लोकांचे विस्तीर्ण वाडे जागोजागीं दिसतच आहेत. भंडारी व कोळी लोकांच्या वाड्या व घरें, धोबीतळें, डोंगरी व इतर ठिकाणीं जिकडे तिकडे अढळतात. व ह्यांत कित्येक लोक सधनही आहेत. पांचकळशे, सुतार, व वाडवळ ह्यांच्याही वाड्या व घरें पूर्वीपासून चालत आलेलीं गिरगांव, कांदेवाडी, माजगांव, परळ, वरळी, ह्या ठिकाणीं असून ते लोक केवळ उत्पन्नभक्षी नाहींत. त्यांत कित्येक बरेच सधन आहेत. परंतु ते इतर लोकांसारखे आपली दौलत उघडपणी दाखवित नाहींत. ते बहुतकरून वडिलोपार्जित चाललेल्या चालीसच अवलंबून असतात. कोळभाट, कोळी वाडी, मुगभाट या नांवांचीं ठिकाणें मुंबईंत पुष्कळ आहेत. भाट हा गोमांतकी शब्द आहे. त्याचा अर्थ, वाडी, ठिकाण, किंवा वतन असा होतो. यावरून पोर्तुगीझ् लोकांच्या कारकिर्दींत गोमांतकांतील वहिवाटीप्रमाणें त्यांनीं या लोकांच्या ठिकाणांस भाट असें नांव दिलें असावें. त्याचीं किती भाटें आहेत ? हें भाट कोणाचें ? असें गोमांतकांत ह्मणतात. आणि जसें इतर देशांत जमिनीच्या धन्यास फजिनदार, जमीनदार व वतनदार ह्मणतात, तसेंच ते लोक भाटकर ह्मणतात. काळबादेवीच्या देवळापासून लैनीच्या शेवटापर्यंत जो जमिनीचा भाग आहे त्यास कोळभाट असें नांव आहे, यावरून तें कोणा कोळयाचें वतन असावें असें वाटतें. आत्माराम बावाच्या ठाकुरद्वारामागें जी मोठी वाडी आहे तीस मुगभाट असें नांव आहे. आणि पूर्वीं हें कोणी मुग्या नांवाच्या कोळयाचें वतन असावें. कोळयामध्यें शिमगा, पोशा, भोगा, मंगळ्या, बुध्या, जोग्या, मुगा, अशीं नांवें अढळतात.

पुरातन लेखांत असें आहे कीं, माहीम हें निराळेंच बेट असून भीमराजाची स्वतंत्र राजधानी होतें. आणि मुंबई हें त्याच्या लगत दुसरें बेट त्याच्या हाताखालीं होतें. याशिवाय मुंबईचींही चार पांच सुटीं बेटें होतीं. तीं अशीं:— कुलाबा, मुंबई, ( किल्लयापासून पायधुणीपर्यंत ) महालक्ष्मी, वरळी, माजगांव, आणि शींव. कित्येकांचें असेंही ह्मणणें आहे कीं, चौपाटीच्या आसपास खाडी होती तिच्या योगानें वालुकेश्वर आणि गिरगांव हींही विभागिलीं होतीं. पण यास बरोबर आधार सांपडत नाहीं. जेथें जेथें पूर्वीं खाड्या होत्या म्हणून सांग-

तात तेथील जमीन सखल असून तेथें विहिरी खणल्या असतां गोडें पाणी लागत नाहीं. पायधुणी, उमरखाडी, नळ, भेंडीबाजार एथील विहिरींचें पाणी अगदींच वाईट असून त्या ठिकाणीं झरे लागत नाहींत. महालक्ष्मीच्या खालचीं सगळीं शेतें खारीं खाजणें होतीं. त्यांतील कित्येक अद्याप आहेत, त्यांत उधाणाच्या वेळीं समुद्राचें पाणी भरत असतें. वरळीचा व कुलाब्याचा बांध बांधलेला तर उघड दिसतच आहे. महालक्ष्मीस जाण्यास पूर्वीं होडी लागत असे. ती सध्याच्या कामाठपुरांतून जात असे. कामाठपुरापासून थेट महालक्ष्मींपर्यंत सलग खाडी होती असें मिस्तर मर्फी यांनीं पक्का शोध करून ठरविलें आहे आणि बहुतेकांचें असेंच मत आहे.

कित्येक भूगर्भशास्त्रवेत्त्यांचें याविषयीं असें मत आहे कीं, जीं मुंबईचीं सद्यः पांच सहा बेटें आहेत तीं सगळीं मिळून पूर्वकाळांतरीं एकच बेट होतें. परंतु धरणीकंप, किंवा जमीन फाटून तिचे वेगळे तुकडे होत असा कांहीं तरी मोठाच एथें उत्पात झाला असावा, त्यामुळें मुंबईची अशी आकृति झाली असावी. डाक्तर ब्युइस्ट यांचेंही असेंच मत होतें.

ह्या बेटाचे याप्रकारचे भाग असल्यामुळें शहरांत वस्ती फार थोडी होती. आणि लोक एकमेकांपासून वेगळे असल्यामुळें त्यांजकडून परस्परांस मदत होत नसे. पूर्वी या बेटांत लुटारू, चोरटे, दंगेबाज असे लोक असून लोकांच्या घरावर दरोडा घालीत; व आसपासच्या मराठ्यांच्या व मुसलमानांच्या संस्थानांतील सरदार येऊन लोकांस लुटीत; याचें कारण त्यावेळीं लोकांचा एक जथ्था नव्हता, सबब लोकांवर अशीं अरिष्टें येऊन पडत. चाळीस पन्नास वर्षांमागील वृद्ध लोक असें सांगत होते कीं, मुंबईत पूर्वीं लुटारू लोकांचें भय फार असल्यामुळें सूर्यास्त झाला आणि दिव्यांत वात पडली कीं, लोक आपआपल्या घराचे दरवाजे बंद करून घरांत बसून राहत. कारण, रात्र पडली ह्मणजे एथें चोरांचें प्राबल्य होई. मग रस्त्यांत कोणी सांपडला कीं ते त्यास लुटून घेत. कोणाच्या डोकींतील पागोटीं, कोणाच्या अंगावरील धोतर घेऊन जात. जेव्हां इंग्रज प्रथम एथें आले, तेव्हांही अशीच स्थिति होती. त्यावरून त्यांनीं रात्रीचे आठ तास वाजले ह्मणजे तोफ मारावी आणि लोकांस घरांतून बाहेर न पडण्याची इशारत करावी, आणि पहांटेच्या पांच कलाकांच्या घंटा वाजल्या आणि अरुणोदय झाला कीं, फिरून तोफ मारून लोकांस बाहेर फिरायाची मोकळीक आहे असी सूचना द्यावी. अशी ही वहिवाट घातली होती ती अद्याप चालली आहे. हल्लीं दोहींसांज तोफा पूर्वीं-

५५११८ ... ४३३ ... २५१

प्रमाणें मारितात, परंतु लोकांस रात्रीचें फिरण्याची मनाई नाहीं. संध्याकाळपासून मध्यरात्रपर्यंत लोक सर्व मुंबईभर फिरत असतात. इतकेंच मात्र, अपरात्रीचा कोणी उगीच रस्त्यांतून फिरत असला, तर त्यास पोलीस अंमलदार तूं कोण ? कोठें जातोस ? हें विचारून, समर्पक उत्तर मिळालें ह्मणजे कांहीं हल्ला हरकत करीत नाहींत. रात्रीचा कोणी फिरत असला तर त्यास पोलीस अम्मलदार इंग्रजी भाषेंत असें विचारितात. *हुकम्सुदेर ? ( कोण येतो ? ) त्यास असें उत्तर द्यावें पडतें. फ्रेंड ( मित्र ). पोलीस अंमलदारांची गस्त रात्रीचे दहा वाजल्यापासून पहांटेचे पांच तास पर्यंत सर्व मुंबईभर फिरत असते.

मुंबईच्या आसपास वीस पंचवीस कोशांच्या आंत पंधरा वीस लहान मोठीं बेटें आहेत. हा सर्व समुदाय मिळून मुंबई बेट समजावें. उत्तरेकडेस सुमारें १५ कोशांवर वसई आहे. त्याच्या खालीं साष्टी हें वसईपेक्षां मोठें आहे. त्यास ठाणें ह्मणतात. त्याच्या अलिकडे चेंबूर, वेसांवें आणि तुर्भें. तुर्भें हें शीवाचा पूल बांधून साष्टीस आणि मुंबईस मिळविलें आहे. याच्या आग्नेय दिशेकडेस घारापुरी, दिवदिवें, छिनालटेंकडी, खानेरीहुनेरी आणि त्याच्याखालीं करंजें अथवा उरण. ईशान्येकडेस वांदरें हें माहिमाचा पूल बांधून मुंबईस मिळविलें आहे. ह्या शिवाय आजुबाजूस दुसरीं लहान लहान दोन तीन बेटें आहेत. खानेरीहुनेरी, दिवदिवें, छिनालटेंकडी ह्या ठिकाणीं चांचे व दुसरे लुटारू लोक येऊन पूर्वी राहात होते. आणि ते आसपासच्या गांवांत छापे घालून जहाजें लुटीत.

तुर्भें, वेसांवें, चेंबूर, कुरलें, मालाड, वसई, साष्टी, वगैरे आसपासच्या गांवांत पांचकळशी, वाडवळ, व सुतार या लोकांची वस्ती फार असून या लोकांचीं वंशपरंपरेनें चालत आलेलीं शेतें, वाडया, व वतनें पुष्कळ आहेत. आणि हे लोक बहुतकरून शेतभात करूनच आपला निर्वाह करितात. या लोकांत चार पांच तट आहेत, तरी ते मुळचे सगळे एकच होते असें सांगतात. यांमध्यें हरी केशवजी या नांवाचा एक विद्वान गृहस्थ होऊन गेला. यांस इंग्रजी भाषेंत बरेंच गम्य असून मराठी भाषा चांगली येत असे. व संस्कृताचाही त्यांनीं

---

* पोलीसच्या शिपायांस इंग्रजी शब्दांचा बराबर उच्चार करितां येत नसल्यामुळें ते " हुकुमडर " असें ह्मणतात. आणि उत्तर देणाराही त्याच कोटींतला असला ह्मणजे तो असें प्रत्युत्तर देतो- " फिरंग ".

थोडा अभ्यास केला होता. यांनीं इंग्रजी भाषेंतील कित्येक शालोपयोगी व दुसऱ्या ग्रंथांचें मराठींत भाषांतर करून, सात आठ सुरस मराठी ग्रंथ तयार केले. ह्यांस सदर अदालतींत भाषांतर करण्याची असामी होती. यांस सन १८५८ त देवाज्ञा झाली. कांहीं पुरातन गोष्टींचा शोध करून यांनीं सुतार, व पांच-कळशे, हे अस्सल सोमवंशी क्षत्रिय असा निर्णय करून आपण सोमवंशी क्षत्री असें ठरविलें होतें, तेव्हांपासून हे लोक आपण सोमवंशी क्षत्री आहोंत असें ह्मणतात. यावरून हे एथील मूळस्थायिक होते व यांजकडे कांहीं राजसत्ता होती असें वाटतें. परंतु यांनीं हें कोणत्या आधारावरून ठरविलें होतें हें समजत नाहीं. कोणी असें सांगितलें कीं, पांचकळशे हे पांडवांचे वंशज ह्मणून त्यांस पांच-कळशे असें नांव पडलें. परंतु या गोष्टीस कांहीं आधार सांपडत नाहीं.

पळशेजोशी हे वसई आणि केळवेंमाहीम एथें फार आहेत, आणि तेथें त्यांचीं वतनें व वाडया आहेत.

परभू लोक इंग्रजी दरबारांत बहुत काळापासून महशूर आहेत इतकेंच नाहीं, परंतु भीमराजाच्या कारकिर्दींत त्यांजकडे राज्यकारभार होता असें पुष्कळ गोष्टींवरून समजण्यांत येतें. इंग्रजी जहाल्यापासून ते इंग्रजी भाषा शिकून सरकारी हपीसांत कारकुनीचें काम करूं लागले, आणि दुसरीं सरकारी हुद्यांचीं कामेंही त्यांजकडे चालत होतीं असें सध्यांच्या वहिवाटीवरून ध्यानांत येतें. वरळीचा बांध बांधण्याचें काम रामजी शीवजी नांवाच्या एका परभू इंजिनराकडे सोंपलें होतें असा लेख सांपडतो. हे लोक पोर्टुगीझ् लोकांच्या राज्यांतही फिरंगी भाषा शिकून कांहीं कामें चालवीत होते असें अनुमान होतें. कारण मागील काळां तील कित्येक वृद्ध गृहस्थ फिरंगी भाषा बोलत व त्यांजकडे फिरंगी भाषेंत लिहि-लेलीं कागदपत्रें असत. कांहीं वर्षांमागें धाकजी दादाजी नांवाचा एक परभू गृहस्थ या शहरांत मोठा प्रख्यात होता. त्यांनीं कांहीं काळपर्यंत गाईकवाड दरबारांत दिवाणाचें काम केलें होतें. नंतर इंग्लंड देशाशीं व्यापार करीत. हल्लींही यांमधील कित्येक गृहस्थ सरकारी हुद्यांचीं मोठीं मोठीं कामें चालवितात. इंग्रजी न शिक-लेला असा यांत कोणी विरळा.

शिंपी लोक एथें फिरंग्याच्या कारकिर्दीपासून किंबहुना इंग्रजी झाल्या-पासून आले असावे असें अनुमान होतें. कारण यांच्या कारकिर्दींत नवे शिपाई ठेवणें व इंग्रजी रिवाजाचा पलटणीस पोशाक करणें चालू झालें, तेव्हांपासून

यांची संख्या वाढत चालली. पूर्वी हें काम ह्यांकडेसच होतें. आणि यांतच त्यांतील कित्येकांनीं पुष्कळ द्रव्य कमाविलें. यामध्यें आत्माराम शिंपी नांवाचा एक गृहस्थ पुष्कळ वर्षांपासून प्रख्यात होता; तो एथील महाजनांमध्यें गणला जात होता. त्याचकडे विपुळ संपत्ति असून तो धर्मही बराच करी. त्यानें भुलेश्वराजवळ मोठें देऊळ व सभामंडप बांधिला आहे. आणि तो प्रत्यहीं पहांटेस सूर्योदयापूर्वीं दर ब्राह्मणास दुगाणी ( दोन पै ) वांटीत असे. याचें कारण रामप्रहरीं धर्म केला असतां महत् पुण्य आहे असा हिंदू लोकांचा समज आहे! दोन तीन घटिका रात्र असतांनाच प्रति दिवशीं त्यांच्या दारापाशीं भिकाऱ्यांची गर्दी होऊन जाई.

मुंबादेवीची मूळस्थापना कोणी व कोणत्या जातीच्या पुरुषानें केली होती त्याचा बरोबर शोध लागत नाहीं, परंतु हिची स्थापना होऊन सुमारें चारपांचशें वर्षें झालीं असावीं असें म्हणतात. आणि ह्या देवीची स्थापना कोणी कोळयानें केली होती असेंही बहुतेक वृद्ध लोक आपल्या ऐकण्यांत आहे असें सांगतात. आणि ही गोष्ट संभवण्याजोगी आहे, कारण एथचे मूळस्थायिक कोळी होते व त्यांची कुळदेवी म्हटली म्हणजे मुंबादेवीच आहे. आणि कोळयांत स्त्रियांचीं नांवें मुंगा, शिमगी, मौना, भोंगु अशीं आहेत, त्यावरून असें अनुमान होतें कीं, ही देवी कोणी कोळणीनें स्थापून, हिंदूलोकांच्या शास्त्राप्रमाणें तीस आपलें नांव मुंगादेवी असें ठेविलें. तें प्रवृत्तींत मुंबादेवी असें आलें असावें. अथवा कोणी ब्राह्मणानें "गा" या अक्षराबद्दल "बा" या अक्षराची योजना केली असावी, आणि हिंदूलोकांत अशी वहिवाटही आहे. धाकजी दादाजी यांनीं महालक्ष्मीस देऊळ बांधिलें आहे त्यांत जो देव स्थापिला आहे त्यास धाकलेश्वर असें नांव ठेविलें आहे. आणि त्याचे शेजारीं रमेश्वरी असी देवी स्थापिली आहे. त्या मूर्तीस धाकजी दादाजीच्या पत्नीचें नांव दिलें आहे. त्या बाईचें नांव रमाबाई असें होतें, तें रमेश्वरी असें केलें आहे. तसेंच माणकोजी यानीं परळास देव स्थापिला आहे त्यास माणकेश्वर असें नांव ठेविलें आहे.

अस्तु. पूर्वींचें मुंबादेवीचें देवालय कापाच्या मैदानांत फांशी तळयाजवळ होतें. पुढें जेव्हां कापाचें मैदान तयार करण्यासाठीं तेथील वस्ती मोडून टाकिली, त्या वेळीं ह्या देवळाचा खरा वारस कोणी नव्हता, व कोणी सांपडला नाहीं. कोळी लोकांची वाताहात झाल्यामुळें, किंवा, त्या लोकांत कोणी पराक्रमी नसल्यामुळें

कोणी पुढारी झाले नसावे. तेव्हां सरकारानें त्या देवालयाची किंमत ठरवून तें मोडिलें आणि सध्याच्या जाग्यावर नेण्याची परवानगी दिली. आणि त्याचा सर्व कारभार पांडूशेट सोनार याच्या हातीं सोंपिला. हा गृहस्थ त्यावेळीं मुंबईंत प्रख्यात व्यापारी व सरकार दरबारांत वजनशील होता व लोकांतहि याची प्रतिष्ठा होती, असें पाहून याच्या हातीं तो कारभार दिला. त्यानें तें देऊळ बांधून तो त्याची सर्व व्यवस्था ठेवूं लागला. तेव्हांपासून ह्या देवळाची वहिवाट त्याच्या घराण्यांत चालली आहे. सध्याचें मुंबादेवीचें तळें मात्र शेट नागरदास नवलाख्या यांनीं बांधिलें होतें.

काळबादेवीचें देवालयही फार पुरातन आहे आणि तें कोणी बांधिलें याचा बरोबर शोध लागत नाहीं. परंतु याची सध्या वहिवाट पळशे जोशी यांजकडे आहे. ज्यावेळीं सरकारानें काळबादेवीचा रस्ता वाढविला त्यावेळीं हें देऊळ मागें हटवायचा हुकूम करून जुनें देऊळ मोडविलें आणि त्याचा जीर्णोद्धार करून देवीची पुनः स्थापना करण्याचा खर्च सरकारानें दिला. ह्याची सर्व वहिवाट मयत रघुनाथ जोशी यांचकडे सोंपिली होती. रघुनाथ जोशी हे एथील मूळस्थायिक असून मोठे प्रख्यात गृहस्थ होते. पूर्वीं मुंबई बेटांत वैद्य म्हटले म्हणजे हेच लोक. आणि अद्यापिही हे लोक बहुधा तोच धंदा चालवितात. मुंबईंतील उपाध्येगिरीचें काम हेच पूर्वीं चालवीत असत.

मुंबादेवीचें संस्कृत भाषेंत एक महात्म आहे. तें केव्हां आणि कोणी लिहिलें याचा कांहीं थांग लागत नाहीं. यांत असें लिहिलें आहे कीं पूर्वीं मुंबारक नांवाचा एक मोठा प्रबल दैत्य या बेटांत होता त्याचें नांव या बेटास पडलें होतें. यानें आपल्या तपेंकरून ब्रह्मदेवास संतुष्ट करून घेऊन आपणास कोणापासूनच मृत्यु नसावा व आपण सर्वकाळ विजयी व्हावें असा वर मागितला. तो त्यास ब्रह्मदेवानें दिला! मग तो पृथ्वीवर लोकांस व देवांस पीडा करूं लागला; तेव्हां सर्व देव जमून विष्णूस शरण गेले आणि याचा संहार करावा अशी प्रार्थना केली. त्यासमयीं विष्णु शिव आदिकरून सर्वांनीं आपआपलें तेज काढून त्या दैत्यास मारायास देवी उत्पन्न केली! नंतर त्या देवीनें त्या मुंबारकास मारून मरणप्राय करून भूमीवर टाकिला. आणि वर मागायास सांगितलें. तेव्हां त्या दैत्यानें त्या देवीचा स्तव करून विनंति केली कीं, माझें नांव तुझ्या नांवांत मिळवून तुझ्या नांवांपूर्वीं माझें नांव यावें आणि तें सर्वकाळ ह्या जगांत प्रसिद्ध

असावें. मग देवीनें तसा वर देऊन आपलें नांव मुंब्रादेवी असें ठेविलें. परंतु विचारवंतानें या कथेवर कोणत्या आधारानें विश्वास ठेवावा ? हें महात्म सूत ऋषींस सांगतात असें यांत दर्शविलें आहे !

हा दैत्य कदाचित् पहिला मुबारख असावा. आणि यावरून हें मुंब्रादेवीचें वर्णन रचिलें असावें असें अनुमान होतें. आणि मुंब्रापूर किंवा मुबारखपूर हें मुबारख बादशहानें आपलें नांव ह्या बेटास दिलें असावें. त्यावरून मुंबई असें लोकप्रवृत्तींत आलें. तो बादशाह हिंदु धर्मद्वेष्टा होता ह्मणून आमच्या लोकांनीं त्यास दैत्य असें नांव देऊन तो मरण पावल्यानंतर त्याची कथा अशी रचून त्याचें एक पुराण केलें.

हें पुढील संस्कृत वर्णन सहज संस्कृत भाषेंतील त्या वेळची काव्यरचना वाचणारांच्या लक्षांत यावी ह्मणून उतरून घेतलें आहे.

॥ सूतउवाच ॥

अथ मुंब्रापुराख्यानं शृणुध्वं मुनयः शुभं ॥
यस्य श्रवणमात्रेण चिंतितान्याप्नुयान्नरः ॥ १ ॥

पुरा तत्र माहादैत्यो मुंबारक इति श्रुतः ॥
तपस्तेपे महत्तीव्रं कमलासनतुष्टये ॥ २ ॥

ततस्तत्तपसा तुष्टो धाता प्रास्तदंतिकं ॥
दृष्ट्वा मुंब्रारको देवं नुनाव नतकंधरः ॥ ३ ॥

देव देव नमस्तेस्तु नमस्ते भक्तवत्सल ॥
गुणत्रयविभागेन सृष्टिस्थित्यंतकारिणे ॥ ४ ॥

चतुर्वदनसंभूत चतुर्वेदाय ते नमः ॥
इंद्रादिसुरवंद्याय भक्तसामर्थ्यदायिने ॥ ५ ॥

इति स्तुत्वा स धातारं प्रणम्य च पुनःपुनः ॥
बद्धांजलिपुटो भूत्वा स्थितोऽग्रे यतमानसः ॥ ६ ॥

दृष्ट्वा तद्भक्तिमतुलां प्रोवाच चतुराननः ॥
वरं ब्रूहि प्रदास्यामि यस्ते मनसि वर्त्तते ॥ ७ ॥

॥ मुंबारकउवाच ॥

यदि धातः प्रसन्नोसि वरं दातुं ममोद्यतः ॥
तर्हि मां कुरु देवेश जयिनं सर्वतः सदा ॥ ८ ॥
देवगंधर्वयक्षादिदैत्यदानवराक्षसैः ॥
हिंस्रैर्व्याघ्रादिभिरपि कृमिकीटपतंगकैः ॥ ९ ॥
नरैर्गोमहिषाद्यैश्चाप्यवध्यः पुरुषैःसदा ॥
यथा भवामि लोकेश तथा प्रीत्या विधीयतां ॥ १० ॥
एवं दैत्यस्य वचनं निशम्य कमलासनः ॥
तथेत्युक्त्वा निजपदं जगामांतर्हितस्तदा ॥ ११ ॥
ततो दैत्यो वरान्लब्ध्वा ब्रह्मणो मनसीप्सितान् ॥
पीडयामास सकलान्देवादीन्मुनिमानुषान् ॥ १२ ॥
ततः समेत्य ते सर्वे जग्मुर्वैकुंठमुत्तमं ॥
तत्र पीतांबरं नत्वा चचक्षुर्दैत्यचेष्टितं ॥ १३ ॥
निशम्य तद्वचो विष्णुर्विचार्य मनसि क्षणं ॥
विधिमप्यानयामास तत्रेशं चंद्रशेखरं ॥ १४ ॥
श्रुत्वा विष्णुमुखात्सर्वं चुकोप गिरिजापतिः ॥
दैत्यं हंतुं कृतमतिर्मुखादुदगिरन्महः ॥ १५ ॥
तत् दृष्ट्वा भगवान् विष्णुर्ब्रह्मापि निजतेजसी ॥
व्यसर्जयेतां मुखतोऽत्युल्बणे कुपितौ भृशं ॥ १६ ॥
ततस्ते निखिला देवाः स्वतेजांसि व्यसर्जयन् ॥
सर्वाणि तानि चैकत्र मीलितानि चकाशिरे ॥ १७ ॥
तस्मात्तेजोबलादेका प्रादुरासीन्नितंबिनी ॥
सुंदराष्टभुजा चंचदायुधाष्टकशोभिता ॥ १८ ॥
धनुर्बाणगदाशक्तिघंटाखड्गाब्जशूलभृत् ॥
हारकुंडलकेयूरकंकणाढ्या स्मितानना ॥ १९ ॥
तां दृष्ट्वा मुदिता देवास्तुष्टुवुर्विविधैस्तवैः ॥
कार्यं चास्यै प्रतिश्रुत्यनमश्चक्रुः पुनःपुनः ॥ २० ॥
देवानां सभयां वाणीं श्रुत्वा सा शक्तिरुत्तमा ॥
प्राह देवान्नभीः कार्या भवद्भिश्च मुनीश्वरैः ॥ २१ ॥

गत्वा तत्राहमधुना सूदयिष्येति दुर्मदं ॥
मुंबारकाभिधं दैत्यं सर्वेषां क्लेशकारकं ॥ २२ ॥
इत्युक्त्वा तान् विसर्ज्यासौ शक्तिर्देवादिकान्मुदा ॥
जगाम धरणीं यत्र संस्थितो दितिजाग्रणीः ॥ २३ ॥
सायुधां तां समालोक्य दैत्यो योद्धुमनास्तदा ॥
जगाम त्वरया क्रुद्धो रथारूढः स सैनिकः ॥ २४ ॥
रथारूढं तमालोक्य देवी हर्यक्षमस्मरत् ॥
तदैव हरिरागत्य नमस्कृत्याग्रतः स्थितः ॥ २५ ॥
तमारूढा भगवती युयुधे तेन संयुगे ॥
सोपि दैत्योमर्षपूर्णश्चक्रेयुद्धं महत्तया ॥ २६ ॥
एवं सुतुमुलं युद्धं तयोरासीद्दिनाष्टकं ॥
ततः स जर्जरीभूतदेहो मुंबारकोभवत् ॥ २७ ॥
तां देवीं शरणं यातो नमस्कृत्वा पुनःपुनः ॥
तुष्टाव परया भक्त्या बद्धांजलिपुटः शुभां ॥ २८ ॥
नमामि ते देवि पदारविंदं भक्तार्कसंघाचलभेदवज्रं ॥
पितामहाद्यामरवृंदवंद्यं योगीश्वरैरर्चितमात्ममुक्त्यै ॥ २९ ॥

॥ सूतउवाच ॥

इति स्तुत्वा स देवेशीं पपात पदयोर्मुदा ॥
अवदच्च वचो देवीमतस्ते किं करोम्यहं ॥ ३० ॥
तन्निशम्य वचस्तस्य सा दयालुरुवाच तं ॥
गच्छ दैतेय पातालं लोकाः संतु निरामयाः ॥ ३१ ॥
तथेत्युक्त्वा स दैत्येंद्रः प्रार्थयामास तां पुनः ॥
मया यद्यु(द्दु)च्यते तन्मे देहि पश्चाद् व्रजाम्यहं ॥ ३२ ॥

॥ श्रीदेव्युवाच ॥

ब्रूहि दैत्येंद्र शीघ्रं त्वं यत्ते मनसि वर्तते ॥
दास्यामि परया प्रीत्या नादेयं विद्यते तव ॥ ३३ ॥

॥ दैत्यउवाच ॥

मन्नामपूर्वकं नाम तव देवि यथा भवेत् ॥
भगवत्या यथाकार्यमेष मे परमो वरः ॥ ३४ ॥

॥ श्रीदेव्युवाच ॥

यदर्थितं त्वया दैत्य तद्दत्तमविचारितं ॥
त्वदर्धनाम्ना संयुक्ता मुंबादेवी भवाम्यहं ॥ ३५ ॥
इति श्रुत्वा वचो देव्याः प्रहृष्टो दैत्यनायकः ॥
ननर्त चास्याःपुरतो लुलुठे तत्पदांबुजे ॥ ३६ ॥
उवाच च पुनः प्रीत्या देवि स्थेयमिह त्वया ॥
मनोरथाः पूरणीया भक्तानां सर्वदा शुभे ॥ ३७ ।
येर्चयंति पदांभोजं भवत्या भक्तिसंयुताः ॥
तेषां विघ्नामयाकीर्तिनाशनाय भवांबिके ॥ ३८ ॥
भगवत्या तथेत्युक्त्वा दत्तानुज्ञः स दैत्यराट् ॥
नत्वा प्रदक्षिणीकृत्य देवी पातालमाविशत् ॥ ३९ ॥

॥ सूतउवाच ॥

तद्दिनादिह सा देवी स्थिता मुंबापुरे शुभे ॥
भक्तानां कामदा नित्यं सर्वदेवैरभिष्टुता ॥ ४० ॥
स्नात्वा तु विमले तीर्थे दृष्ट्वा देवीं सुभक्तितः ॥
संपूज्य चाखिलान् भोगानंतो शिवपदं व्रजेत् ॥ ४१ ॥
शारदे नवरात्रे तु यः पठेत्स्तोत्रमुत्तमं ॥
प्रत्यहं निकटे देव्याःसर्वान् कामानवाप्नुयात् ॥ ४२ ॥
उपवासपरा ये च नवरात्रे महोत्सवे ।
भक्त्या जपंति गायंति नृत्यंति परया मुदा ॥ ४३ ॥
कुमारिकाः पूजयंति गंधैः पुष्पैस्तथांशुकैः ॥
भूषणैर्विविधैर्रत्नैस्तर्पयंति च नित्यशः ॥ ४४ ॥
होमीयनानाद्रव्याणि भावेनाग्निषु जुव्हति ॥
पारणादिवसे विप्रान् भोजयंति सुवासिनीः ॥ ४५ ॥
वस्त्रैश्च दक्षिणाभिश्च तोषयंति सुभक्तितः ॥
तेषां गृहेषु कमला सुस्थिरा जायते सदा ॥ ४६ ॥
वादे युद्धे च विजयो भगवत्याः प्रसादतः ॥
वंशवृद्धिर्यशोवृद्धिरारोगी विग्रहे सदा ॥ ४७ ॥

अन्यथादपि वक्ष्यामि देवतीर्थकदंबकं ॥
भक्त्या निशम्य मनुजः कृतकृत्यो भवेत् द्विजः ॥ ४८ ॥
श्रुत्वा क्षेत्रस्य माहात्म्यं हनुमानपि राघवात् ॥
स्थितो मुंबापुरेंशेन भक्ताभीष्टप्रदो हरिः ॥ ४९ ॥
तस्य संस्पर्शनादेव नरा विगतकल्मषाः ॥
शत्रून् जयंति संग्रामे विवादे च न संशयः ॥ ५० ॥
तथान्ये क्षेत्ररक्षार्थं देव्या व्यापारिताः शुभाः ॥
गणाः शतसहस्रं वा मुंबापुर्यां व्यवस्थिताः ॥ ५१ ॥
यः पश्यति नरो भक्त्या तां देवीं यतमानसः ॥
पूजयेच्च यथाशक्त्या संप्राप्नोतीष्टकामनाः ॥ ५२ ॥

पारशी लोक सहपरिवार मुंबईंत कोणत्या वर्षापासून आले व प्रथम त्यांचीं किती कुटुंबें एथें येऊन वस्ती करून राहूं लागलीं, हें बरोबर समजत नाहीं. परंतु हें खरें आहे कीं, पोर्टुगीझ् लोकांच्या हस्तगत हें बेट झाल्यानंतर पांच दाहा वर्षांनीं म्हणजे सुमारें इसवी सन १५४० सां पासून एक दोन पारशी गृहस्थ सहकुटुंब एथें राहात होते. ते पोर्टुगीझ् दरबारांत कारभार करीत असत असें पक्या शोधावरून समजतें. नंतर इंग्रज लोकांच्या कारकिर्दीपासून त्यांची वस्ती वाढत चालली. सुरतेस इंग्रज कंपनीचा व्यापार चालला होता त्यावेळीं हे लोक त्यांचे दलाल व मुख्य कारभारी होते. देण्याघेण्याची सर्व वहिवाट इंग्रज व्यापारी त्यांच्याच मार्फतीनें करीत. आणि पूर्वींपासून इंग्रज लोकांचा यांवर विश्वास बसला होता; सबब जेव्हां त्यांच्या हस्तगत हें बेट झालें तेव्हां त्यांनीं पारशी लोकांस एथें येण्यास उत्तेजन दिलें आणि राज्यांतील कांहीं नाजूक कामें त्यांस दिलीं.

पोर्टुगीझ् लोकांच्या कारकिर्दींत दोराबजी नांवाचा एक पारशी गृहस्थ मुंबईंत सहपरिवार राहात होता व सरकारचा कारभार याजकडे होता असें त्याच्या इतिहासावरून अढळतें. पुढें कंपनी सरकारच्या वेळीं देखील सरकारांत हे कारभारी होते आणि त्यावेळीं इंग्रज लोकांस एथील सर्वस्वी गैरमाहिती असल्यामुळें पारशी गृहस्थांचा त्यांस फारच उपयोग झाला. परंतु त्यांची प्रथम मकथा मंडळी येऊन राहात असे, कारण त्यावेळीं मुंबईंत नीट व्यवस्था नसल्यामुळें लटल्यासुद्धां

येऊन राहाण्यास कोणी धजत नसत. सन १६७२ मध्यें डाक्टर फ्रायर हे मुंबईस आले होते त्यांनीं त्यावेळचा मुंबईचा वृत्तांत लिहिला आहे. त्यांत ते पारशी लोकांविषयीं तादृश कांहीं लिहीत नाहींत, परंतु बाबुलनाथाच्या डोंगरावर नवीनच बांधलेला पारशी लोकांचा दोखमा आहे असें दर्शवितात. यावरून त्यावेळीं पारशी लोकांची एथें नुकतीच वसाहत होत होती असें दिसतें. परंतु ते अगदींच थोडे होते.

सन १६९२ त मुंबईंत महामारीचा सपाटा चालला होता तेणेंकरून इंग्रज लोकांचें बहुतेक लष्कर जांयां झालें. आणि लोकांचाही फार नाश झाला. ही संधि पाहून जंजिऱ्यांतील शिद्दी यानें मुंबईवर स्वारी केली होती. या प्रसंगीं दोराबजी याचा मुलगा रस्तम दोराब यानें इंग्रज लोकांस बरीच कुमक करून आपलें शौर्य दाखविलें. त्याणें कोळी लोकांस शिपाई बनवून जिकडे तिकडे लष्कराचा बंदोबस्त करून ह्या परचक्राचें निवारण करविलें, आणि त्याच्या ह्या स्तुत्य उद्योगावरून सरकारानें त्यास मुंबईंतील पटेलगिरीचीं वस्त्रें दिलीं. आणि हा किताब त्याच्या वंशपरंपरें चालावा अशी सनद करून दिली. आणि कोळी लोकांची न्याय मनसुबी करण्याचा सर्व अखत्यार याजकडे सोंपिला. तेव्हांपासून हा अधिकार यांच्याच घराण्यांत चालत आहे. रस्तम दोराब याचा काळ झाल्यानंतर, त्याचे चिरंजीव कावसजी रस्तमजी यास गवर्नर हानबी यानें पटेलकीचीं वस्त्रें दिलीं. कावजी पटेलाचें तळें म्हणतात तें ह्यांनींच बांधिलें होतें, व यांची मुंबईत स्थावर जिनगी पुष्कळ होती. ह्या गृहस्थानें इंग्रज लोकांचीं मोठीं नाजूक कामें केल्यामुळें त्याचा मुंबईत बराच इतमाम चालला होता. मराठयांकडून इंग्रज लोकांनीं ठाणें घेतलें, तेव्हां तेथील वस्ती वाढविण्यांत व दुसऱ्या कामांत कावजी पटेल हे इंग्रज लोकांस फार उपयोगी पडले; तेथें त्यांनीं पारशी लोकांची वसाहत केली. आणि ह्या शिवाय ते मोठे व्यापारीही होते. त्यानंतर सुरत एथील कंपनीच्या जहाजांचे चौकसनीस लवजी यांस सन १७३५ त एथें आणविलें. हे तारवें बांधण्यांत मोठे प्रवीण. यांच्या मागून दुसरीं प्रतिष्ठित कुळें येऊन राहिलीं. मग उत्तरोत्तर यांची संख्या वाढत चालली. पारशी लोक ह्मटला तो उद्योग करूं लागले, व सरकारी व व्यापारी कामांत धीटपणानें वागूं लागले, ह्मणून त्यांची योग्यता वाढून एथें त्यांची सर्व प्रकारें बढती झाली. त्यांचा मुळचा देश इराण. तेथें राज्यक्रांति होऊन मुसलमान लोकांकडून धर्मसंबंधी त्यांस उपद्रव होऊं लागल्या-

मुळें स्वदेश सोडून ते सुमारें १२०० वर्षांपासून हिंदुस्थानांत येऊन राहिले. मग ते गुजराथ प्रांतांत दिव एथें येऊन राहिले होते. मग हळूहळू आपल्या पराक्रमानें त्यांनीं सर्व गोष्टी आपणास अनुकूळ करून घेतल्या. पाहा ! पारशी लोकांच्या एथें वतनवाड्या कांहींच नव्हत्या, आणि ते केवळ निराधार होते. असें असतां आज ते अर्ध्या मुंबईचे धनी झाले हें एक त्यांच्या उद्योगाचें व उदारपणाचें फळ. दुसरें कांहीं नाहीं. सन १८५४ त मुंबईत पुरुष, स्त्रिया, व मुलें मिळून एकंदर पारशांची संख्या १, १०, ५४४ इतकी होती.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
नौपाडा शाखा.
अ. क्र. .............. विभाग ..............
क्रमांक .............. नों. दि. ..............

# प्रकरण ३

पूर्वींची मुंबई – अनेक रोग उद्भवण्याचीं कारणें – वरळीचा बांध – पायधुणी – झ्तातारपालाडी – उमरखाडी – कुलाबा – डोंगरी – चिंचबंदर – मशीदबंदर – बोरीबंदर – वालुकेश्वर – चौपाटी – शेतोडी – बाबुलनाथ – ह्याच्या पूर्वींच्या व हल्लींच्या स्थितीची तुलना – महालक्ष्मी – मामाहजानी – आणि वरळीचा जुना वृत्तांत.

मुंबई शहराची मुळची स्थिति कशी होती आणि आतां कशी आहे हें समजून घेणें सर्वांस आवश्यक आहे. कारण ज्या शहरांत आपण वास करितों त्याचा इत्थंभूत वृत्तांत जरी आपणास ठाऊक नसला तरी किमान पक्ष त्याज-विषयीं थोडया तरी गोष्टी माहित असल्या पाहिजेत.

ह्या शहराचा इतिहास केवळ एथच्याच लोकांस उपयोगी आहे असें कोणी समजू नये. तो या इलाख्यांतील सर्व लोकांस व इतरांसही उपयोगी आहे. कारण ही एक कंपनी सरकाराची अस्सल राजधानी असून भरत खंडांतील व्यापाराचें मुख्य स्थान आहे. याशिवाय कोणत्याही शहराचा पूर्वापार वृत्तांत सम-जून घेणें हें फार उपयोगी आहे.

पूर्वींची मुंबई ह्मटली ह्मणजे तिची लांबी सुमारें एक कोश आणि रुंदी सुमारें अर्धकोश होती. डाक्तर फ्रायर हे युरोपाहून हिंदुस्थानांत इसवी सन १६७२ त देश पर्यटण करायास आले होते ते मुंबईचें वर्णन असें लिहितात. “ ह्या बेटाचा बहुतेक भाग म्हणजे सुमारें ४०,००० बिघे जमीन समुद्राच्या पाण्यानें भरून वाहत असतो. आणि सरासरी १०,००० बिघे जमिनीचा भाग मात्र वास्तविक जमिनींत गणला जातो. मुंबईचीं लहान लहान पांच बेटें आहेत. आणि त्यांतून खाऱ्या पाण्याच्या खाड्या असून त्या चिखलानें भरलेल्या आहेत.

ओहटीच्या वेळीं हीं बेटें पांच दिसतात, परंतु भरती आली म्हणजे जिकडे तिकडे पाणी भरून सात होतात. "—यावरून हल्लींच्या मुंबईचा व पूर्वीच्या मुंबईचा जमीन अस्मानाचा भेद आहे असें स्पष्ट दिसून येतें. त्यावेळीं सध्याच्या प्रमाणें एथें मोठे वाडें व बंगले नव्हते. खिडक्यांस काचीच्या भिंगाबद्दल कालवांच्या शिंप्यांचीं भिंगें करून लावीत. असलीं भिंगें लावलेल्या खिडक्यांचीं घरें कांहीं वर्षांमागें एथें किरस्तांव लोकांचीं होतीं.

मुंबई शहर हें स्थलसंकोचामुळेंच केवळ निकृष्ट होतें असें नाहीं; परंतु एथील लोकांस अनेक उपद्रव होऊन अल्पायुषी होत, त्यामुळें हें उदयास येत नसे. जे इंग्रज एथें येत ते दोनचार वर्षांचे आंत नाहींसे होत. त्यामुळें अर्थातच याचें काय कारण असावें याचा विचार करणें त्यांस भाग पडलें. त्यावेळीं जरी इंग्रज लोकांची संख्या या टापूंत थोडीच होती, तरी त्यांमध्यें स्वभावतः विचारी आणि स्वकार्य सिद्धीस नेण्याचा अभिमान बाळगणारे बरेच गृहस्थ होते; त्यांनीं लोकांमध्यें भलतेच रोग उद्भवण्याचीं कारणें शोधण्याचे प्रयत्न मांडिले. त्यांत कित्येकांनीं अशी कल्पना काढिली कीं, शहरांत जिकडे तिकडे खारें पाणी सांचलेलें असतें, आणि ओहट लागली म्हणजे त्यापासून जो गंध निघतो तेणेंकरून मनुष्यांस विकृति होते. तर ह्या पाण्याचा बंदोबस्त केल्याशिवाय मुंबईंत वास्तव्य करणें कठीण, असा निर्णय करून मुंबईसरकारानें सुमारें सन १६८५त मुख्य कंपनीसरकारास इंग्लंड एथें लिहून पाठविलें कीं, मुंबईंतील खाड्यांचा बंदोबस्त केल्यावांचून लोकांची ह्या शहरांत वस्ती होणें कठीण, तर ह्या खाड्या बुजवून टाकण्याची परवानगी असावी. हा त्यांचा अर्ज मोठ्या जरुरीचा होता तरी त्याचें समर्पक उत्तर येण्यास पुष्कळ वर्षें लागलीं. सन १६८५ पर्यंत मुंबईंत डेप्युटी गव्हर्नर व दुसऱ्या कामगारांच्या नेमणुका सुरतेच्या वखारीच्या अध्यक्षाकडून होत असत. त्यावेळीं मुंबई ही सुरतेच्या अंमलदारांच्या हाताखालीं होती. पुढें सन १६८६त सर्व अधिकार मुंबईच्या गव्हर्नरास देऊन मुंबईंत इंग्लंड देशांतून गव्हर्नराची नेमणूक होऊं लागली. ज्यावेळीं सुरतेहून कामगार लोकांची मुंबईवर नेमणूक होई, त्यावेळीं ते हवेच्या उपद्रवामुळेंच एथें येण्यास कांकू करीत होते असें नाहीं, परंतु एथें आल्यावर त्यांस खाण्यापिण्याची व सर्व प्रकारची आपदा भोगावी लागे. ह्मणून मुंबईत जाऊन राहावें ह्मणजे संकटांत

जाऊन पडावें असें त्याला वाटे, आणि अद्याप तरी कित्येक आमचे लोक मुंबईस येण्यास भितात तितके दुसऱ्या देशांत जाण्यास भीत नाहींत. याचें कारण मुंबईची हवा वाईट असें जें एकदां त्याला माहित होतें तेंच ते दांतीं धरून बसले आहेत.

आसपास खाजणें असल्यामुळें हवा सर्द व रोगी होती, आणि एथें वस्ती करणाऱ्या लोकांत अनेक तऱ्हेचे रोग उत्पन्न होत असत. आणि जमीन चांगली नसल्यामुळें धान्य वगैरे फार पिकत नसे. मुंबईतील हवेविषयीं एक प्रथमच आलेला इंग्रज असें लिहितो,-"मुंबईतील राहणाऱ्यांचें आयुष्य दोन चातुर्मास झाले ह्मणजे संपलें असें समजावें." व कित्येक हीस "यमपुरी" असें ह्मणत. इतकी एथील हवा नाकारी होती. परंतु आतां पाहा तींत किती फेर पडला! कित्येक इंग्रज बाहेर गांवांतून हवा पालटण्याकरितां मुंबईस येतात. हल्लीं मुंबईतील हवा केवळ निरोगी नसण्याचें कारण फक्त लोकांची गर्दी; जमिनीचा व हवेचा गुण नव्हे. समुद्रास मागें हटवून तें स्थळ सुपीक व मनुष्यास राहण्या जोगें प्रशस्त व निरोगी करणें आणि त्यापासून लक्षावधि रुपये उत्पन्न करणें हा केवढा भगीरथ प्रयत्न!

मुंबईत रोग उद्भवण्याचीं अनेक कारणें होतीं त्यांतील हें एक होतें. त्यावेळीं शेतांस व माडांस मासळीचें खत घालीत असत. त्यास कुटा असें ह्मणत. आणि हा कुटा घातला ह्मणजे शेतांतून व बागांतून दुर्गंधी सुटे. त्यामुळें लोकांस उपद्रव होतात असें मनांत आणून सरकारनें त्यांस मासळीचें खत घालण्याची सन १७२० त मनाई केली. आणि याबद्दल शेणाचें खत घालावें असें ठरविलें. यामुळें कित्येक शेतकरी व वाडीवाले आपलें उत्पन्न बुडालें ह्मणून आपआपलीं ठिकाणें सोडून साष्टीस व ठाण्यास गेले. मग याविषयीं कंपनी सरकारास कोर्ट आफ डैरेक्टर्स पर्यंत लिहावें पडलें. माहिम, वरळी वगैरे ठिकाणांतील सर्व शेतकरी व वाडीवाले मिळून सरकारास असा अर्ज केला कीं, आम्हांस वहिवाटी प्रमाणें झाडांस खत घालण्याची परवानगी दिली असतां सरकारास १०,००० रुपये देऊं, परंतु तोही अर्ज सरकारानें नाकबूल केला. मग निरुपाय होऊन लोक पूर्ववत् शेती करायास लागले. बहुधा लोक आपआपल्या नफ्याकडे पाहातात, लोकांच्या कल्याणाकडे पाहात नाहींत. परंतु सरकारास या गोष्टीचा विचार ठेवावा लागतो.

ह्यावेळीं जे इंग्रज कामगार व गोरे शिपाई एथें होते ते बहुतकरून खाण्यापिण्याचा व सर्व प्रकारचा बेहद्द स्वच्छंदपणा ठेवीत, त्यामुळें त्यांस अनेक उपद्रव होऊन ते मरत. जरी त्यांस औषधोपाय करायास इंग्रजी डाक्तर असत तरी ते आपआपल्या घरीं असल्यामुळें डाक्तराच्या सांगण्याप्रमाणें पथ्यपाणी न करितां जीवावर उदार होऊन मनास येईल त्याप्रमाणें वागून आपला नाश करून घेत. आणि वास्तविक पाहिलें असतां मनुष्यानें खाण्यापिण्याचा बंदोबस्त ठेविला नाहीं तर त्यास अनेक व्याधि होऊन ते अल्पायु होतात. हें लक्षांत आणून सन १६७८ त सुरतेतील वखारीच्या मुख्यानें मुंबईच्या गव्हर्नरास मुंबईत एक लहानसें इस्पिटाल ( दवाखाना ) बांधण्याचा हुकूम पाठविला. त्यांत असें सुचविलें होतें कीं हें बांधायास चार हजार रुपयांपेक्षा अधिक द्रव्य खर्च करूं नये, अणखी त्यांत सुमारें सत्तर रोग्यांचा समावेश होई इतकें मोठे बांधावें; व त्याबद्दल सरकारास दरसाल एक हजार रुपयांवर खर्च बसूं नये असें करावें. आणि हें इस्पिटाल तयार होई तोंपर्यंत किल्ल्यांत एकाद्या साधारण हवेलींत इस्पिटलाची योजना करून रोगी लोकांस त्यांत नेऊन ठेवावें. मग लागलेंच दुसऱ्या वर्षी इस्पिटाल बांधून तयार केलें. आणि असें सांगतात कीं, तेव्हांपासून गोरे लोकांत मृत्यूच्या फेऱ्या कमी होत चालल्या.

सन १६९९ त इंग्रज लोकांत आपआपसांतच सर्व गोष्टींची अंदाधुंदी चालली होती. आणि त्यांत मुंबईत पटकीचा वाखा उद्भवून पुष्कळ लोक मरूं लागले. या वेळीं एतद्देशीय लोकांची फारच नासाडी झाली. आणि गोऱ्या पलटणी पैकीं ७६ लोक मात्र जीव धरून राहिले. अशा दुःखांत मोठें तुफान सुटलें. आणि ह्या अवधंड्यामुळें मोठाच अनर्थ झाला. शेतें, वाड्या, घरें, दारें, दाणा, धान्य यांचा फारच नाश झाला. आणि फुटलेल्या जहाजांची तर संख्या बेसुमार होऊन गेली. यावेळीं सुरत एथील वखारीच्या मुख्यास सर जान गेयर मुंबईचे गव्हर्नर यांनीं पत्र लिहिलें होतें त्यांत ते असें लिहितात " एथील लोक पादचारी आहेत. बसायाजोगा मुंबईत एकच घोडा असून गाडीस जुंपायाजोगी बैलांची एक जोडी आहे. " ( ही मोठ्या सुरती बैलांची होती ). त्यावेळीं गव्हर्नर व कौन्सलर लोक देखील अशा बैलांच्या गाड्यांत बसून फिरत.

सन १७०० मध्यें जेव्हां गव्हर्नर सर निकोलास वेट आपल्या हुद्याचा अधिकार चालवायास या बेटावर प्रथमच आले, तेव्हां मुंबईची स्थिति पाहून

सुरतच्या अंमलदारांस या प्रमाणें लिहिलें होतें " हें अति दरिद्री मोडकळीस आलेलें असें एक बेट आहे. " त्यावेळीं मुंबई कोणत्या प्रकारची होती हें पुढील गोष्टीवरून समजेल. इराणच्या बादशाहाच्या तर्फेनें मुंबईत एक मोठा सावकार जहाजावर माल घेऊन आला होता. आणि तो शहरांत उतरण्याची तजवीज करी, परंतु मुंबईचा कमीपणा त्याच्या दृष्टीस पडेल आणि आपला बोज कमी होईल, असें मनांत आणून डेप्युटी गव्हर्नर यानें तो शहरांत न यावा ह्मणून अनेक युक्ति काढिल्या होत्या. ह्यावेळीं सनदी इंग्रज कामगारांपैकीं सरकारी काम चालविण्याजोगे सगळे कौन्सलदारांसुद्धा आठ असामी होते. त्यावेळीं इकडून कोर्ट आफ डैरेक्टर्स यांस असें पत्र लिहून गेलें होतें. " आक्टोबर महिन्याच्या अखेरी पर्यंत आमच्या मदतीस जर कोणी येऊन पोहचले नाहींत तर आमचा एथें टिकाव होणें कठीण. "

इंग्रज लोक यावेळीं मोगल सरकारास व मराठी राजांस फार भीत होते. आणि त्यांचें उणें बोलायास त्यांस फार विचार पडे. औरंगजेब मरण पावल्याचें वर्तमान मुंबईच्या गव्हर्नरास कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांस कळवावें पडलें, तेव्हां तें उघडपणें लिहायास त्यास संकोच पडल्यामुळें, त्यानें ही बातमी लाक्षणिक भाषेत लिहून कळविली. हें पत्र यांनीं ता. १ माहे मार्च सन १७०७ त लिहिलें होतें, त्यांत असा मजकूर होता. " पृथ्वीच्या या भागाचा सूर्य मावळला. आणि दुसऱ्या प्रतींतील तारा त्याच्या नजीक असल्यामुळें त्याच्या स्थानीं बसला, आणि जरी प्रथम प्रतींतला तारा दुसऱ्या प्रदेशांत आहे तरी तो आपला प्रकाश पाडायास प्रयत्न करील असा संभव आहे. " यांतील अर्थ इतकाच कीं, औरंगजेब बादशाह मरण पावला; त्याचा धाकटा पुत्र आजीम गादीवर बसला, परंतु त्याचा वडील पुत्र मोआझीम बापाचें तक्त स्वाधीन करून घेण्यास येणार.

शिवाजीचाही या लोकांस फार दरारा होता. शिवाजी मेल्याचें वर्तमान सन १६८० डिसेंबर महिन्याच्या १३ व्या तारिखेस मुंबईतील गव्हर्नर यांनीं बंगाल्यांतील वखारीच्या मुख्यास लिहून पाठविलें, तरी त्याची खातरी होईना. त्याला हा कोणी अमर प्राणी आहे असा भास होई.

बंगाल्यांतील मुख्य कामगार मुंबईस याप्रमाणें लिहितो. " शिवाजीच्या मरणाची बातमी इतक्या खेपा उडाली, त्यामुळें लोकांस हा अमर आहे असें वाटतें. त्याच्या पराक्रमाच्या सूर्याचा लोप होईल तेव्हांच तो मेला असें वास्त-

विक समजावें. असें ह्मणतात कीं त्याच्या सारखा पराक्रमी त्याचे मागून राज्य-कारभार चालिवणारा कोणी नाहीं. ”

जरी वरळीचा बांध कोणत्या वर्षीं बांधायास प्रारंभ केला, कोणत्या वर्षीं तो बांधून समाप्त झाला, व तो बांधायास किती वर्षें लागलीं आणि किती द्रव्य खर्च झालें याचा कागदोपत्रीं कोठें बराबर लेख सांपडत नाहीं, तरी तो सन १७७६ आणि १७८० ह्या वर्षांत गव्हर्नर हार्नबी साहेबांच्या कारकिर्दींत बांधिला असें बहुतेक सांगतात. ह्या प्रकरणीं जो पुढें बखरीचा भाग उतरून घेतला आहे त्यावरून तर हा इंग्रजानें बांधिला इतकेंच ठरतें. ह्याविषयीं दुसरें कोणी असें सांगितलें कीं, हार्नबी साहेबानें ह्या निरुपयोगी वेटाची सुधारणा करण्यासाठीं हा बांध बांधण्यांत निरर्थक पुष्कळ द्रव्य खर्च केलें ह्मणून ( कोर्ट आफ् डैरेक्टर्स ) मुख्य कंपनी सरकाराची यांजवर थोडी इतराजी झाली. परंतु ह्या गोष्टीस कांहीं आधार सांपडत नाहीं. हा बांध दगडांनीं बांधलेला असून त्याची लांबी सुमारें पाव कोश आहे. याचें हार्नबी व्हेलार्ड असें नांव अद्याप प्रख्यात आहे. त्या वेळच्या एका सुतारानें मुंबईवर कांहीं श्लोक रचिले होते त्यांत हा पुढील श्लोक सांपडला. त्या वरून हा कंपनी सरकारनेंच बांधिला असें सिद्ध होतें.

बांधीला दरयांत सेतु जइसा श्रीरामें लंकेवरी ॥
मोठा दुष्कर जांगळा खरचिलें द्रव्यासि कोटीवरी ॥
केली वाट सपाट खाडि अवघी बुंजूनि ती टाकिली ॥
जेठायीं मग ती महाभगवती लक्षूमि तैं स्थापिली ॥ १ ॥

या श्लोकांत इंग्रज लोकांची जी स्तुति केली आहे ती यथायोग्य आहे. पाहा ! एक हा वरळीचा बांध बांधिल्यानें सर्व मुंबईची रचना फिरून गेली. ही किती अलौकिक कल्पना ! ज्या खाडीमुळें अर्धी मुंबई पाण्यांत होती तिचा एक-दम बंदोबस्त करून टाकिला, आणि मुंबई ही एक लंकाच करून सोडिली. हें वेट मराठे, मुसलमान, व पोर्टुगीझ् लोकांच्या हाताखालीं इतका काळ होतें; परंतु कोणासच ही युक्ति सुचली नाहीं व एवढें द्रव्य खरचण्याचा हिय्या झाला नाहीं. त्यांचा हेतु हाच होता कीं, देश काबीज करून त्यांत जें द्रव्य सांपडेल तें हरण करावें, आणि आपण सुखाचा उपभोग घ्यावा, दुसरें कांहीं नाहीं. राजा देईल तें रयतेनें मुकाट्यानें खावें, बोलेल तें निमुटपणीं ऐकावें, सांगेल तेथें राहावें आणि करील तें पाहावें, अशी त्यांची वहिवाट होती.

कोणा एका वृद्ध भंडाऱ्यानें दुसरें असें सांगितलें कीं, त्याकाळीं एथें एक सधन मडम होती तिणें हा बांध बांधविला. याला कांहीं बराबर आधार सांपडत नाहीं. परंतु मुंबईंत पुष्कळ वर्षांमागें निसबिट मडम नांवाची एक द्रव्यवान् बाई होती, हें खरें आहे. तिच्या संपत्तिविषयीं असें सांगतात कीं; सुमारें मुंबईतील एक चतुर्थांश जमीन तिच्या स्वाधीन असून तिनें माजगावांस पोर्टुगीझ् लोकांचें एक मोठें देवालय बांधिलें. कोटांत व माजगावांत तिच्या भ्रताराच्या नांवानें बांधलेले अद्याप " निसबिट लेन् " असे दोन रस्ते आहेत. यावरून ह्या बाईनें हा बांध बांधावयास कंपनी सरकारास मदत केली असावी, असें वाटतें.

ह्मातारपाखाडी, उमरखाडी, माजगांव, माहीम, हीं ही अलाहिदा बेटें असून मधून लहान खाऱ्या पाण्याच्या खाड्या होत्या. जिला आम्ही पायधुणी म्हणत असतों तेथून ही सलग खाऱ्या पाण्याची खाडी होती, आणि भरती आली म्हणजे भेंडी बाजारापासून चिंचबंदर पर्यंत पाणी भरून जाई. ह्या जाग्यास पाय धुणी असें नांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं, पूर्वीं माहीम, वरळी, व माटुंगें एथून लोक येऊन ह्या खाडींत पाय धुऊन मुंबईस येत, म्हणून तीस " पायधुणी " असें नांव पडलें.

समुद्राचें पाणी शहरभर पसरलें होतें तें वरळीचा बांध बांधून बंद केलें इतकेंच नाहीं; परंतु मुळच्या खाड्या होत्या त्यांत नळ बांधून शहरांतील पावसाचें, मोऱ्यांचें, व न्हाण्यांचें सगळें पाणी त्या नळांत सोडून तो वरळीच्या खाडीस मिळविला आहे. हा नळ सुमारें पुरुष दीड पुरुष ओंड असून चार हात रुंद आहे. हा थेट मार्किटाच्या मागून डोंगरीच्या खालून काढिला आहे तो भेंडी बाजाराच्या मागल्या बाजूनें रस्त्याच्या मधून सलग वरळीच्या खाडीस नेऊन मिळविला आहे. भेंडी बाजारामागें व मार्किटामागें जे नळ आहेत ते कांहीं वर्षांमागें उघडे होते, परंतु हल्लीं त्यांपासून लोकांस इजा होऊं लागल्यामुळें ते आच्छादिले आहेत. ह्या स्थळास नळ हेंच नांव पडलें आहे. महालक्ष्मीस जातांना हा नळ शेतांमधून वरळी पर्यंत कसा नेला आहे तो स्पष्ट दिसतो. हा बांधून भरतीच्या पाण्यास खेळायास मार्ग ठेविल्यामुळें वरळीचा बांध टिकला आहे, नाहीं तर तो उधाणाच्यावेळीं पाण्याच्या जोरानें कोसळून गेला असता, बांधाच्या शेवटीं जेथें समुद्राच्या पाण्याचा व शहरांतल्या पाण्याचा संयोग झाला आहे तेथें चुनेगची सांकव बांधिला आहे, व खालून आंत

पाणी यावें म्हणून कळसूत्र करून त्यांत दरवाजा केला आहे. त्यांतून भरतीच्या-वेळीं बेतवारच पाणी आंत येतें, आणि ओहट लागली म्हणजे शहरांतील पाणी जाऊन समुद्रास मिळतें. हे दरवाजे हवे तेव्हां उघडावे व बंद व्हावे असें केलें आहे. ही कृति स्वतः जाऊन पाहिल्याशिवाय बराबर लक्षांत यावयाची नाहीं. आलीकडे दहा पंधरा वर्षांपासून रस्त्यांमधून नवे नळ खणून लोकांच्या वापराचें सर्व पाणी नळास लावून दिलें आहे, परंतु हे सर्व नळ वरून आच्छादिले आहेत. याप्रमाणें मुंबईंत आंतून नळ बांधून पाणी नेलें नाहीं असें स्थळ सांपडणें कठीण. एथील कित्येक ठिकाणची जमीन व रस्ते बाहे-रून स्वच्छ व निर्मळ दिसतात, परंतु ते हात दीड हात खोल खणले असतां त्यांचा प्रकार कबरी सारखा दृष्टीस पडेल.

कुलाबा हें एक मुंबईच्या दक्षिणेच्या शेवटास लहानसें ओसाड बेट असून ढोरें चरण्याचें ठिकाण होतें, तेथें फक्त कोळी लोकांची वस्ती होती. ते लोक भाजीपाला उत्पन्न करीत, व मासळी विकून निर्वाह चालवीत असत. तेथें जाण्यास लहानशी तर लागत असे. ही खाडी कंपनी सरकारानें सन १८३८ त पूल बांधून व भर घालून मुंबईस मिळविली. पूर्वीं इंग्रज लोक एथें शिकारीस जात असत, व हरणें आणून सोडीत. सन १७२८ त सगळा कुलाबा सालिना १३० रुपये सरकारास द्यावे असें ठरवून खंडास दिला होता.

डोंगरी व चिंचबंदर यांच्या खालीं समुद्राचें पाणी सर्वत्र भरल्यामुळें वरील जागा वस्ती करण्यास निरुपयोगी असें मानून सरकार गरीब गुरीब लोकांस झोपड्या बांधायास देई. परंतु प्रस्तुत त्या जाग्याचें मोल सोन्यापेक्षांही अधिक वाढलें आहे. सद्यः ही जागा दर काठीस हजार पंधराशें रुपये दिल्यानेंही सांपडणें कठीण पडतें. थोडक्याच वर्षांमागें आमच्या एका स्नेह्यानें सुमारें पांचशें रुपये देऊन लहानसें मोडकें घर चिंचबंदरावर घेतलें होतें, त्याची किंमत आज पांच हजार रुपये देण्यास व्यापारी लोक तयार आहेत, तरी तें तो विकीत नाहीं. एतद्देशीय व्यापारी लोकांचें मुख्यस्थान मशीद बंदरापासून चिंचबंदर व डोंगरी पर्यंत. उद्योगाची खाण – दुकानाचा थाट – घरांची दाटी – मनुष्यांची गर्दी – अनेक तऱ्हेच्या मालाची रहदारी – नवघण्यांचा कलकलाट – खटाऱ्यांचा घडघडाट – मजूर लोकांच्या आरडा ओरडी – व अनेक तऱ्हेच्या मालानें भर-लेल्या वखारी या ठिकाणीं पाहाण्यांत येतात, हा सर्व प्रकार एथें जाऊन एक

क्षणभर उभें राहिलें असतां दृष्टीस पडतो. मुंबईतील सर्व ऐश्वर्य व कोट्यावधि रुपयांचा व्यापार तो सगळा एथें होतो. बोरीबंदरापासून डोंगरीच्या शेवटापर्यंत सर्व जाग्यांत बहुत करून कच्छी, मुसलमान, इस्रायल, मेमण, खोजे, लवाणे व दुसरे व्यापारी लोक राहातात. दक्षिणी लोकांची वस्ती कोठें पातळ. एथें कोळ्यांचीही वस्ती बरीच आहे. त्यांत कित्येक सधन असून त्यांनीं मोठमोठालीं घरें बांधिलीं आहेत. सर्व मुंबई शहरांत सुमारें दहा हजार कोळी आहेत असें अनुमान केलें आहे. त्यांच्या पुरातनपासून चाललेल्या ठिकाणावरून हे लोक एथचे मुळस्थायिक होते असें प्रमाण पटतें.

मुंबई बेटाच्या नैर्ऋत्य दिशेच्या शेवटास टेंकडी आहे तीस वाळुकेश्वर ह्मणतात. हीही पूर्वीं मुंबईपासून सुटी होती असें कित्येकांचें ह्मणणें आहे. हा डोंगर पूर्वीं केवळ ओसाड होता, आणि कित्येक मुंबईतील श्रीमान् व सरकारी कामगार लोकांस त्याचा कांहीं कांहीं भाग घोडयांस व ढोरांस गवतासाठीं फुकट मिळाला होता. सन १७२८ त हाही सगळा डोंगर सालिना १३० रुपये सरकारास द्यावे असा कौल करून दिला होता, असें सरकारी दप्तरावरून समजतें. ह्या डोंगराची कांहीं जमीन खारवी लोकांनीं भाड्यानें घेऊन त्यांत शिराळीं, काकड्या, भेंडे, मकेचीं कणसें, गवारी, वालपापडी, वांगीं इत्यादि भाज्या लावीत असत, त्यावेळीं ह्या सर्व डोंगराचें उत्पन्न दोनशें तीनशें रुपये होणें देखील मुष्कील पडे. दिवसाचें देखील वाळुकेश्वरीं जाण्यास लोक भीत. एवढी ही जागा रानवट होती. वाळुकेश्वराच्या अगदीं शेवटच्या टोंकास दांडी ह्मणतात. तेथें गव्हर्नर साहेबाचा सरकारी बंगला आहे. त्याच्या लगत पूर्वीं खुद्द वाळुकेश्वराचें देवालय होतें. हें देऊळ फार पुरातन होतें. हें सुमारें सहाशें वर्षांमागें केबाजी राणा म्हणून मराठी सरदार होता त्यानें बांधिलें होतें असें सांगतात. परंतु त्यास कांहीं आधार सांपडत नाहीं. हा सरदार कदाचित् भीमराजाच्या कारकिर्दीतील असावा. कांहीं वर्षांमागें या देवळाचा पाया दिसत होता. परंतु हल्लीं तो सर्व खणून काढून त्या जाग्यावर बुरूज बांधीत आहेत. दांडीच्या शें दीडशें हातांच्या अलिकडच्या भागांत लहानशी सपाटी आहे तेथें सध्याचें वाळुकेश्वराचें व दुसरीं दहावीस देवालयें आहेत. आणि आसमंतात् पन्नास पाऊणशें धर्मशाळा आहेत. तेथें ब्राह्मणांची वस्ती आहे व मध्यभागीं मोठें तळें आहे, त्यास बाणगंगा असें म्हणतात, ह्या तळ्याचें पाणी सर्व लोक वापरतात, हें मुंबईतील महाजन

लोकांनीं वर्गणी करून बांधिलें होतें असें सांगतात. सन १८६२ त हें उपसून यांतील चिखल वगैरे काढून साफ करावें म्हणून सरकारानें पाणी उपसायास तीनशें चारशें वेगारी व दोन बंब लाविले होते. हे लोक एकसारिखे एक महिना खपत परंतु त्यांच्यानें तें सगळें पाणी आटववलें नाहीं. शेवटीं मृगाचा पाऊस पडून सर्व चिखल आणि पाणी एकच होऊन फिरून तळयांत जाऊन पडलें. आणि सगळा खर्च व्यर्थ गेला.

वालुकेश्वराविषयीं हा पुढील वृत्तांत कांहीं वर्षांमागें ज्ञानोदयांत छापिला होता. आमच्या कोणत्याही पुरातन गोष्टींचा शोध करायास लागलों असतां त्यांत कांहींना कांहीं तरी विलक्षण वृत्तांत सांपडायाचाच; त्यामुळें भरतखंडाचा बराबर इतिहास सांपडतच नाहीं. ह्मणून आह्मी कांहीं लिहिलेलें द्विपांतरांतील लोक सप्रमाण आहे असें मानीत नाहींत.

" वालुकेश्वर, याचा बरोबर उच्चार वालुकेश्वर. या नांवाचा अर्थ असा आहे कीं, रेतीचें लिंग. हें लिंग रामस्थापित आहे, दुसऱ्या लिंगांप्रमाणें मानव स्थापित नाहीं असें म्हणतात. याविषयीं अशी कथा आहे कीं, राम अयोध्येहून लंकेकडेस जाण्यास लक्ष्मणासहित निघाले, आणि वालुकेश्वराच्या दांडीवर समुद्र-कांठीं आले. प्रत्यहीं रामाचा नेम असा असे कीं, काशींतून नवें लिंग लक्ष्मणा-कडून आणवून पुजावें, परंतु ज्या दिवशीं या जागीं राम आले त्या दिवशीं लक्ष्मणाला काशीहून येण्यास उशीर लागला, सबब रामानीं वाळूचें लिंग करून पूजिलें. आणि तें तेथेंच स्थापिलें, इतक्यांत लक्ष्मणही येऊन पोहोचले. तेव्हां लक्ष्मणांनीं जें लिंग काशीहून आणिलें तें वालुकेश्वरीं स्थापिले. ह्मणून ज्याला हल्लीं वालुकेश्वर म्हणतात, तो लक्ष्मणेश्वर आहे. आणि वालुकेश्वराचें स्थान वालुके-श्वराच्या दांडीवर होतें. जें लिंग रामानें तेथें स्थापिलें तें हल्लीं अढळत नाहीं. आणि हें नाहींसें होण्याचें कारण कांहीं मोठेंच असावें. कित्येकांनीं भलतीच गोष्ट उठविलेली आहे; ती अशी कीं, जेव्हां फिरंग्याचें राज्य चालू झालें, तेव्हां त्या म्लेंछ राज्याचा कंटाळा धरून तें लिंग गुप्त झालें, आणि त्या दिवसापासून याविषयीं कोणी कांहीं ऐकिलें नाहीं. कोणी यापेक्षां संभव होण्याजोगी गोष्ट सांगतात कीं, तें फिरंग्यानें फोडिलें व तें मोठें देऊळही पाडिलें. हल्लीं त्या मोठ्या देवळाचा ज़बरदस्त चौथरा दृष्टीस पडतो. ह्यावरून असें दिसतें कीं, त्या देवळाचें काम

फारच मोठें असावें. हें देऊळ मोडल्यापासून लक्ष्मणेश्वरालाच वालुकेश्वर ह्मणूं लागले. तेथें रामाला तहान लागली म्हणून त्यांनीं भूमींत बाण मारून पाणी उत्पन्न केलें, आणि तें पिऊन संतोष पावले. हें उदक बाणानें उत्पन्न केलें ह्मणून त्याला बाणतीर्थ, बाणगंगा, अथवा बाणाच्या योगानें पाताळांतील भोगावती वर निघाली म्हणून पाताळगंगा असेंही म्हणतात. मग राम तेथें थोडा वेळ विश्रांति पावून लंकेस गेले." वालुकेश्वरमहात्म नांवाचें एक संस्कृत पुराण आहे त्यांत ह्या देवालयाचा मोठा चमत्कारिक वृत्तांत लिहिला आहे. त्यांत सदरहु मजकूर असून दुसऱ्या पुष्कळ गोष्टी आहेत. गौतमऋषीचें आगमन, लिंगाची स्थापना इत्यादि मोठीच कथा आहे. परंतु हें कोणत्या शतकांत झालें याविषयीं कांहींच नाहीं. त्यामुळें हें सर्व निरुपयोगी झालें आहे.

सध्याचें वालुकेश्वराचें देवालय रामाजी कामत या नांवाच्या शेणवी गृहस्थानें सुमारें ५० वर्षांमागें बांधिलें होतें. रामाजी कामत यांस इसवी सन १७२८ त देवाज्ञा झाली. त्यांच्या मरणाच्या पंधरा-वीस वर्षांपूर्वीं हें देवालय बांधलें असावें. वालुकेश्वराची जमीन ह्या गृहस्थास सरकारांतून इनाम मिळाली होती असेंही सांगतात. परंतु हे गृहस्थ त्यावेळीं प्रख्यात होते, हें वास्तविक आहे. कारण सन १७१८ मध्यें कोटांतील इंग्रजांच्या मोठ्या देवळाची अर्चा झाली, त्याचा वृत्तांत सुरतचे गव्हर्नर यांस रेवरेंड मिस्तर काब यानें लिहून पाठविला आहे. त्यांत तो असें लिहितो कीं, हा समारंभ पाहण्यास रामाजी व त्याच्या जातीचे गृहस्थ पुष्कळ आले होते. रामाजी कामत हे त्यावेळच्या एतद्देशीय लोकांच्या लष्करावरील मुख्य सरदार होते. शेणवी हे बहुधा गोमांतक प्रांतस्थ. फिरंगी लोकांचें वसई सुभ्यांत व मुंबईबेटांत प्राबल्य झालें तेव्हांपासून ते रोजगाराच्या किंबहुना व्यापाराच्या संबंधानें वसई व साष्टी एथें येऊन राहूं लागले. व कांहीं पेशव्याच्या कारकिर्दीपासून वसईस येऊन राहिले. फार दिवसांपासून बहुतेक शेणवी मुंबईंत प्रख्यात व्यापारी होते. आणि हल्लीं गोमांतकांत व्यापारी ह्मटले म्हणजे शेणवी गृहस्थच. तेथें हे लोक पोर्टुगाल, चीन, इत्यादि देशांतील व्यापार करितात. मध्यम प्रतीचे लोक कर्नाटक, राजापूर, मुंबई, दमण यांशीं व्यापार करून व दुसराही साधारण व्यापार करितात. ज्या वेळीं ह्यांच्या व्यापाराचा मुंबईत भरभराट होता, व त्यांस सरकारांत मोठ्या असाम्या होत्या त्यावेळीं त्यांनीं मुंबईत पुष्कळ देवालयें बांधिलीं. वालुकेश्वराचें देवालय, भुलेश्वराचें

देवालय, माहिमचें ठाकुरद्वार, कोटांतील व्यंकटेशाचें देवालय, इत्यादि पुष्कळ देवालयें ह्यांनीं बांधिलीं. त्यावेळीं या लोकांची एथें मोठी चढती कळा होती.

वालुकेश्वराच्या दांडीवर सरकारी बंगला आहे. त्यांत कधीं कधीं गव्हर्नर साहेब जाऊन रहात असतात. तेथें नेहमी संत्रीचा पाहरा असतो व भलत्यासच परवानगीशिवाय आंत जाण्याची बंदी असत्ये. श्रीमंत लोक गरमीच्या दिवसांत वालुकेश्वरीं जाऊन धर्मशाळांमध्यें रहातात. व कित्येक हवेसाठीं एथें बारमास असतात. वालुकेश्वराच्या देवळाच्या भोवतालीं बडे लोकांनीं ह्मणजे वाणी, भाटे, परभू, सोनार, शेणवी, ब्राह्मण, इत्यादि हिंदू गृहस्थांनीं दोन दोन तीन तीन मजली धर्मशाळा बांधल्या आहेत. त्यांस धर्मशाळा असें नांव आहे खरें, परंतु वास्तविक पाहिलें असतां त्या धर्मशाळा नाहींत. हे सुखवस्तू जाऊन रहायाचे बंगले आहेत. ह्यांत जाऊन रहायास गरीब गुरिबांस तर बिलकुल सांपडत नाहीं. ह्या धर्मशाळा नेहमी बंद केलेल्या असतात. एकाद्यास शरीरप्रकृति सुधारण्यासाठीं महिना दोन महिने जाऊन यांत रहावयाचें असलें तर मालकाचें मोठें आर्जव करावें पडतें. आणि असें केल्यानें तरी सर्वांस रहाण्याची परवानगी मिळत्ये असें नाहीं. तो आर्जव करणारा मालकाचा स्नेही असून कांहीं जिनगीवाला असला पाहिजे. श्रीमंत लोक नांवासाठीं धर्मशाळा बांधितात, आणि आपण जाऊन तेथें खुशाल रहातात. धर्मशाळा ह्मटली ह्मणजे ती सर्वांस मोकळी असली पाहिजे. गरीब व पांथस्थ लोकांसाठीं धार्मिक लोक घरें बांधून त्यांस धर्मशाळा असें नांव देतात. आणि त्या सर्वकाळ उघड्या ठेवितात. धन्यांचा त्यांवर इतकाच हक्क असतो कीं, त्यांनीं त्यांची वेळोवेळ उस्तवारी करावी. वास्तविक शास्त्र ह्मटलें तर असें आहे कीं, धर्मशाळेंत मालकानें जाऊन एक रात्रही राहूं नये.

तीस वर्षांमागें एका गृहस्थाचा वालुकेश्वरी डोंगराचा तुकडा होता, तो चारपांचशें रुपये घेऊन कोणास तरी विकून टाकावा ह्मणून तो गिऱ्हाईक शोधी, परंतु त्या किमतीस तेवढा तुकडा घेणारा त्याला कोणी सांपडला नाहीं. परंतु तीच जागा आज तीस हजार रुपयांस मागितली असतां मिळत नाहीं. ज्या ठिकाणीं पूर्वीं नुसतें गवत वाढत असे, तेथें आतां शेंकडो लाखो रुपये खर्चून हवाशीर बंगले व बाग उठविले आहेत; ज्यांमध्यें उत्तम प्रकारचे आंबे, शिताफ़ळें, पोपनसें, पेरू, अंजिरें, इत्यादि उत्पन्न होत आहेत. सर्व मुंबई बेटांतील

हवेपेक्षां एथील हवा मोठी आरोग्यदायक आहे. बहुतेक इंग्रज लोक एथें राहतात. या लहानशा टेंकडीपासून हल्लीं दरसाल १,५९,९६५ रुपये उत्पन्न होतात. प्रस्तुत वालुकेश्वराच्या डोंगरावर रिकामी जागा कोठें अढळत नाहीं. या ठिकाणची हवा आणि पाणी महाबलेश्वराच्या बरोबरीस मानितात. जें स्थळ पूर्वीं कंगाल लोकांसाठीं सोडिलें होतें, तें आतां फक्त श्रीमंत लोकांसच रहावयास योग्य असें झालें आहे. वालुकेश्वराच्या डोंगराच्या निरनिराळ्या भागांस निरनिराळीं नांवें आहेत. एका भागास खंबाळा, एका भागास गवाळ्याच्या तळ्यावरील डोंगर, एकास टांकरविल अशीं नांवें आहेत. आणि दांडीच्या शेवटच्या टोंकास शिरगुंडी ह्मणतात.

चौपाटी, गिरगांव, याही ठिकाणांत कोठें पातळ वस्ती होती. आणि जिकडे तिकडे माड मात्र होते. शेतोडी, ज्या ठिकाणीं हल्लीं पांच पांच सहा सहा मजली पारशी लोकांनीं शेंकडो इमले उठविले आहेत, व इंग्रज लोकांस भाड्यानें देण्यास इंग्रजी तऱ्हेचे डौलदार हवाशीर बंगले बांधले आहेत, ती सगळी शेती जमीन असून तेथें बारमास चिखल असे, व कोठें कोठें गरीब लोक हलक्या प्रतीचा भाजीपाला उत्पन्न करीत असत. आणि ही जागा केवळ निरुपयोगी असें मानीत असत; परंतु ज्या धन्यांची ही जागा शंभर वर्षांमागें होती, ते जर आज जिवंत होऊन आले तर निःसंशय त्यांला असा भास होईल कीं, आपण कोठें दिल्लीस किंवा लंडन शहरास जाऊन पोहोचलों.

चौपाटी, ज्या ठिकाणीं पूर्वीं रान होतें, तेथें रमणीय बाग व बंगले उठविले आहेत व त्याच्या बाजूस हल्लीं एक सुताचा कारखाना तयार होत आहे आणि जागोजागीं नव्या बंगल्यांचीं कामें चाललीं आहेत. समुद्राच्या बाजूस मोठमोठाल्या लांकडाच्या वखारी पडल्या आहेत, ज्यांमध्यें लाखो खंडी लांकडांचे ढोण एकावर एक रचून दिलेले आहेत; कीं त्यांवर नजर देखील ठरत नाहीं. अशा वखारी एथें सात आठ आहेत. चौपाटीच्या पुढें डाव्या बाजूस लहान डोंगरी आहे तीस बाबूलनाथ असें म्हणतात. एथें महादेवाचें देऊळ आहे, तें पांडुशेट सोनार यांनीं बांधिलें होतें. सोनारलोक या बेटांत पोर्टुगीझ् लोकांच्या कारकिर्दीपासून होते असें वाटतें. यांला सोनार म्हणतात, परंतु बहुधा हे सोनार काम करीत नाहींत. यांमध्यें सावकार व व्यापारी लोक पूर्वीपासून होते. यांत हल्लीं इंग्रजी शिकलेले सरकारी व सावकारी हपिसांत चाकरी करणारे गृहस्थ बरेच

आहेत. शंकरशेट हे यांमध्यें मोठे प्रख्यात होऊन गेले. बाबुलनाथाचें पाणी चांगलें आहे. एथें बैरागी व गोसावी लोक नेहमी गांजा व भंग पिऊन पडलेले असतात, व कित्येक भंग पिणारे लोक एथें जाऊन गांजा व भंग, सांबाचा प्रसाद म्हणून मोठ्या आदरानें सेवन करितात.

चौपाटी आणि गिरगांव यांच्या मध्यभागीं शेट मंगळदास नथुभाई ह्या प्रख्यात वाणी गृहस्थाचा मोठा वाडा व बाग आहे. ह्या वाड्यास चार दरवाजे असून मागच्या बाजूचे दरवाजे थेट शेतोडीच्या रस्त्यास लागले आहेत. एवढी ही जागा विस्तीर्ण आहे. ह्या बागेंत अनेक तऱ्हेचीं झाडें आहेत व जागोजागीं समुद्राची रेती घालून मार्ग पाडिले आहेत. बागाची रचना इंग्रजी रिवाजाची असून वाड्यांत शेट मंगळदास हे नेहमी रहातात. यांत अमोलिक सामान भरलें आहे. हे नामांकित सावकार हिंदू लोकांच्या महाजनांपैकीं एक गृहस्थ असून धर्मशील व उदार आहेत. यांनीं लोकोपयोगार्थ १,००० रुपये खर्चून मुंबादेवीच्या चौकीवर घड्याळ मारलें आहे. यांनीं मुलींची शाळा घातली आहे व उद्योग शाळेस वीस हजार रुपये दिले आहेत. हे लोककल्याणार्थ आपल्या द्रव्याचा बराच उपयोग करितात. ह्या वाड्यांत जाऊन दोन घटिका बसलें असतां तहान भूक निवत्ये, इतकें हें स्थळ रमणीय आहे.

पूर्वी मुंबईत जमीन सुपीक नसल्यामुळें धान्य वग़ैरे कांहीं उत्पन्न होत नसे असें सांगितलें आहे; परंतु वरळीचा बांध बांधल्यापासून व माहीमची खाडी बुजवून टाकल्यामुळें महालक्ष्मी, वरळी, परळ, माहीम, माटुंगें, एथें बरेंच भात पिकूं लागलें. हें धान्य मुंबईच्या वस्तीस एक दिवसाची अन्नसामग्री होई इतकें पिकतें असें कित्येक लोकांचें म्हणणें आहे. याचप्रमाणें अनेक तऱ्हेच्या फळभाज्या व पालेभाज्या एथें उत्पन्न करितात.

मुंबई बेटाच्या पश्चिमेस किल्ल्यापासून सुमारें दोन कोशांच्या अंतरावर महालक्ष्मी आहे. एथें समुद्राच्या कांठीं लहानशी टेंकडी आहे, तीवर महालक्ष्मीचें देवालय आहे, व त्याच्या बाजूस मयत धाकजी दादाजी नामांकित परभू गृहस्थानें बांधिलेलें एक मोठें देवालय आहे. हें बांधायास या गृहस्थास ८०,००० रुपये खर्च झाला. या शिवाय दुसरीं दहावीस लहान लहान देवालयें आहेत व आसपास श्रीमंत हिंदू गृहस्थांनीं बांधिलेल्या धर्मशाळा आहेत. देवळाच्या अलीकडे सुमारें ५० हातांवर फरसबंदी एक मोठें सुंदर पाण्याचें तळें आहे. तें

सन १८२४ त ४०,००० रुपये खर्चून तुलसीदास गोपालदास यांनीं बांधिलें. याची आकृति जहाजासारिखी आहे. उष्ण काळांत लोक जाऊन यास्थळीं रहातात, एथील पाणी व हवा निरोगी असल्यामुळें रोगी लोक हवा पालटण्याकरितां एथें जातात. नवरात्राच्या दिवसांत नऊ दिवसपर्यंत सकाळ संध्याकाळ कित्येक लोक महालक्ष्मीच्या दर्शनास जातात. कित्येक पहांटेस उठून तळयावर स्नानसंध्या करून महालक्ष्मीचें दर्शन घेऊन सूर्योदयीं मुंबईस येतात; व कित्येक आपआपल्या धर्मशाळेंत जाऊन राहतात. श्रीमंत लोक एथून पाणी आणवून पितात, एथीलही धर्मशाळा मालकांच्या जिनगीप्रमाणेंच आहेत. ते लोक आपल्यास पाहिजे तेव्हां जाऊन त्यांत रहातात. कित्येक वर्षंवर्ष, सहा सहा महिने आपआपल्या धर्मशाळेंत जाऊन खुशाल रहातात.

महालक्ष्मीचें देवालय वरळीचा बांध बांधिल्यानंतर बांधिलें आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. कारण एथील एका मूल स्थायिक सधन परभू गृहस्थाजवळ बखर आहे. तींत असें लिहिलें आहे की, इंग्रज सरकार वरळीचा बांध बांधित असतां तो एक दोन वेळां मध्येंच कोसळला आणि त्याचे सर्व श्रम व द्रव्य पाण्यांत गेलें. ह्या बांधाचें काम तपासणारा एक परभू गृहस्थ इंजनेर होता त्यास एके रात्रीं स्वप्नांत महालक्ष्मीनें असा दृष्टांत केला कीं, माझी मूर्ति या वरळीच्या खाडींत आहे ती काढून माझें देवालय बांधशील तर हा तुमचा बांध तडीस जाईल ! मग त्या गृहस्थानें ती मूर्ति काढून घेतली आणि तिची स्थापना केली. नंतर बांध तयार झाल्यावर सरकारांतून ही जागा बक्षीस घेऊन त्यावर देऊळ बांधिलें. या प्रकरणीं बखरींतील कांहीं भाग साद्यंत उतरून घेतला आहे तो मोठा चमत्कारिक आहे. ह्या प्रमाणें कांहीं मोठें कृत्य जुनें झालें ह्मणजे आमच्या लोकांचा कांहींनाकांहीं तरी देवभोळेपणा असायाचाच. त्यामध्यें अनेक कल्पित कादंबऱ्या भरून ते खरें कोणतें आणि खोटें कोणतें याचा थांग लागूं देत नाहींत. कोणत्याही पुरातन देवाच्या स्थापनेविषयीं किंवा किल्ला वगैरे बांधण्याविषयींची गोष्ट आली कीं, त्यांत कांहींनाकांहीं तरी विलक्षण वृत्तांत सांपडायाचाच, त्यामुळें कोणत्याही शहराचा वास्तविक इतिहास सांपडणें कठीण पडतें.

मालवणच्या किल्ल्याविषयीं एका शूद्रानें असें सांगितलें कीं, ज्या वेळीं शिवाजी महाराजांची हा किल्ला बांधायाची इच्छा झाली, त्यावेळीं त्यांजकडे कांहीं

५५११९ १२९८१

द्रव्य नव्हतें. परंतु ते ईश्वरी अवतार होते ह्मणून त्यांनीं इतके किल्ले बांधिले. हा किल्ला बांधायास त्यांनीं हजारो लोक कामास लाविले होते. त्यांस ते मजुरी-बद्दल संध्याकाळीं गवताच्या काड्या तोडून देत. त्या काड्या मजूर लोकांच्या हातीं पडल्या ह्मणजे त्यांचें सोनें होत असे ! ह्या मध्यें दुसरी मोठी आश्चर्याची खुबी ही होती कीं, जो मनुष्य ह्या कारखान्यांत मन लावून इमानेंइतबारें काम करीत असे, त्याच्या काडीपासून त्याच्या श्रमास व उद्योगास योग्य तितकें द्रव्य उत्पन्न होई ! आणि जे आळशी निरुद्योगी असत आणि ज्यांचें लक्ष कामावर नसे त्यांच्या काडीपासून जेवढें ते काम करीत तेवढ्या मजुरी पुरतें मात्र त्या काडी-तून सोनें निघे !

ह्या बखरींत बहुतेक अगत्याच्या गोष्टींचें स्पष्टीकरण होतें खरें, परंतु मुख्य आधार शक व मिती ज्यांचा शोध लावण्याकरितां एवढे प्रयत्न करून ही बखर आणविली होती त्याविषयीं हीमध्यें कांहीं सांपडत नाहीं. आमच्या लोकांचें लिहिणें याप्रमाणें अपूर्णच असतें. असें हे जाणून बुजून करीत होते कीं काय तें समजत नाहीं. अस्तु वरळीच्या बांधाविषयीं आणि महालक्ष्मीच्या देवा-लयाविषयीं ह्यांत विलक्षण गोष्टी सांपडतात. ही बखर पुराणासारिखी लिहिली आहे तरी त्यांतून कांहीं कांहीं गोष्टी उपयोगी आहेत. त्या ह्या. त्यावेळीं कोणी इंग्रेजी शिकलेला परभू गृहस्थ इंजनेर होता, त्याच्या हातून कंपनी सरकारनें हा बांध बांधिला. व त्यानें महालक्ष्मीचें देवालय वरळीचा बांध बांधिल्यानंतर बांधिलें. हा पुढील वृत्तांत बखरींतून उतरून घेतला आहे.

“ कोणे एके समयीं इंग्रज सरकार कंपनी बाहादुर यांचे मनांत आलें कीं, वरळी गांव व मुंबईची दरम्यान खाडी ती बांध बांधून गाडीवाट करावी; परंतु समुद्राचे पाण्याचा जोर फार होता तेव्हां फार सायास पडले, तथापि बांध बांधून खाडींतली जागा काढून शेतें केलीं व बहुतेक जागा तेणेंकरून निघाली आणि रयतेस सुख जहालें व गाडीवाट व पायवाट जहाली. हा एक धर्मच आहे. कोणी लोकांस त्या रस्त्यावरून येण्यास कांहीं मनाई जोर जुलूम करीत नाहींत. तर धर्माची रीत अशीच आहे. तरी म्लेंछ यांत असून फार सुज्ञ धर्माची वृद्धि करितात. परंतु हिंदुलोक द्वेष करून धर्माचा लोप करितात, तेणेंकरून क्षयातें पावतात. हा विचार कोणीच पाहात नाहींत. हें कलीचें महात्म आहे.

जे समयीं वरळीचा बांध बांधावा असें इंग्रज सरकारच्या मनांत आल्यावरून सरकारानें फार मेहनत केली. दगडाच्या राशी जहाजें भरून तेथें समुद्रांत दगड टाकिले परंतु रस्ता कांहीं सिद्धीस न जाय. याप्रमाणें कित्येक दिवस मेहनत केली तेव्हां श्री महालक्ष्मी, महाकाळी, महासरस्वती, यांचे मनांत आलें कीं, क्षीर सागरांतून बाहेर निघावें आणि मुंबई नगरांत प्रसिद्ध व्हावें, भक्तजन तारायासाठीं; कारण त्या रस्त्याचे जागेंत त्यांचा वास होता. तेणेंकरून बांधाची बांधणी सिद्धीस जात नव्हती; त्यासाठीं श्री महालक्ष्मी, महाकाळी, महासरस्वतीने ते समयीं रामजी शिवजी परभू सरकारचे इंजनेर होते, त्यांस दृष्टांत दिला कीं, आह्मी क्षीर सागरांत आहों तर आह्मास तेथून काढून बाहेर ज्या ठिकाणीं सद्यः आहेत ते टेंकडीवर देवालय बांधून स्थापना करावी. तर आह्मी संतुष्ट होऊन बांध बांधायास अनुकूळ होऊन तुझ्या हातीं बांध बांधवूं. बांध सिद्धीस गेला तर तूं सरकारांत हमी भरावी कीं मजला सरकारानें हुकूम केला असतां बांध बांधून देईन. नंतर त्या समुद्राचे खाडींत जाळें घाल. ह्मणजे आह्मी जाळयामधून समुद्रांतून बाहेर निघून येऊं. याप्रमाणें देवीचा दृष्टांत झाला.

रामजी शिवजीनें देवीचे आज्ञेवरून सरकारांत हमी भरली कीं, सरकार जर मला हुकूम करील तर मी बांध बांधून देतों. नंतर सरकारानें रामजी शिवजीस हुकूम दिला कीं, तुम्ही बांध बांधावा; तो बांधला असे. परंतु हुकूम झाल्यावर रामजी शिवजीची खात्री होण्यास देवीचे आज्ञेप्रमाणें जाळें दर्यांत घातलें. तेव्हां त्या तीन मूर्ति पाषाणी महाकाळी, महालक्ष्मी, महासरस्वती त्या जाळयांत आल्या. पहा ! देवीचें सत्व कसें आहे ! जाळें तें काय, किती बारीक सुतळीचें, त्या मूर्ति पाषाणी भारी तळास बसलेल्या त्या जाळयांत कशा आपोआप बसून जाळें भारानें न तुटलें असतां आल्या. नंतर त्या मूर्ति ह्या ज्या टेंकडीवर आहेत त्याच टेंकडीवर ठेविल्या. नंतर ती टेंकडी व जागा सरकाराकडून बक्षीस मागून त्या टेंकडीवर देऊळ बांधून स्थापना केली. त्या दिवसापासून तो आज दिवस पावेतों अचल आहेत. तर ती टेंकडी देवीची असे. त्या टेंकडीवर व जाग्यावर देवीशिवाय कोणाची सत्ता नाहीं. त्या टेंकडीची हद्द टेंकडी व डोंगरी सारी दर्या किनारा वरळीचे बाजूचा तेथपर्यंत ती काळिकेचे देवळापर्यंत देवीचें देऊळ बांधिलें तेथपर्यंत असे. नंतर गोविंदजी मुग्यानें धर्मशाळा बांधिली. सोनार शेठ्यानें धर्मशाळा बांधिली. व माणकी कोळणीनें बांधिली.”

वरळीच्या बांधाच्या शेवटीं पश्चिमेचे बाजूस लहान टेंकडी आहे व तिच्या नजीक शें दोनशें हात औरसचौरस जमीन वरळीचाच भाग, त्यास मामा हजानी असें नांव आहे. महालक्ष्मी आणि वरळी यांच्या मध्यें जी खाडी आहे. तिच्या मध्यभागीं चाळीस पन्नास हात एक खडकळ उडी आहे तीस हाजीअल्ली ह्मणतात. भरतीच्या वेळीं हिच्या भोवताली सगळें पाणी भरतें, परंतु वरच्या प्रदेशांत चढत नाहीं. ह्या ठिकाणीं मुसलमान फकिराची एक कबर आहे. त्यावर लहान झोंपडें बांधिलें आहे; व आसपास दुसरीं सात आठ लहान लहान घरें आहेत. त्यांत मुसलमान व हिंदू मिळून सुमारें पन्नास साठ मनुष्यें रहातात. ओहट असती तेव्हां महालक्ष्मीच्या खालच्या बाजूनें खडकावरून पाय मार्ग आहे; परंतु भरतीच्या वेळीं तेथें होडींतून जावें पडतें.

ह्या कबरीची सब्जा घालून फकीर लोक पूजा करितात. हिचें दर्शन घेण्यास कित्येक भोळया हिंदूलोकांच्या बायका व पुरुष मुलांस घेऊन नवस फेडायास तेथें जातात. आणि मोठ्या भक्तीनें त्याची पूजा करितात, व फकीर लोकांस चिराखी देतात. कित्येक मुसलमान व हिंदूलोक हा पीर मोठा जाज्वल्य असून नवसास पोहंचतो असें सांगतात ! कोणी असें सांगितलें कीं, सर जमशेटजी जिजीभाई यांस हे पीर प्रसन्न झाले तेव्हां पासून त्यांची संपत्ति वाढली !

ह्या पिराची प्रख्याति होण्याचें व ह्या स्थानास मामा हजानी असें नांव पडण्याचें कारण एका एथील मुसलमान फकिरानें असें सांगितलें. पूर्वीं एथें हाजी अल्ली उर्फ मामा या नांवाचा एक सधन मुसलमान रहात होता. त्याची एक बहीण होती. हीं दोघें बहीण भांवडें मोठीं देवभक्त व विरक्त असून त्या दोघांची एकमेकांवर अतिशय प्रीति होती. त्यांनीं आपली सर्व दौलत गरीब गुरिबांस वांटून देऊन तीं मक्केची हाज करायास गेलीं. हीं हाज करून आल्यावर वैराग्य धारण करून तो फकीर झाला. आणि ह्या ठिकाणीं समुद्रांत जाऊन राहिला. आणि बहिणीस सांगितलें कीं, तूंही संतवृत्ति धारण करून डोंगरावर रहा. आणि मी ह्या समुद्रांतील झोंपडींत बसून ईश्वराची प्रार्थना करितों. आतां हेंच स्थान ह्यांस आवडण्याचें कारण त्या फकिरानें असें सांगितलें कीं, महालक्ष्मीचें आणि ह्या बहीण भावंडांचें सख्य होतें. त्या एकमेकांचें भाषण होत असे. ह्मणून हीं दोघें जणें तेथें येऊन राहिलीं. ह्या प्रमाणें फकीर लोक हिंदू आणि मुसलमान धर्माचें लग्न लावून भोळया हिंदू लोकांस फुस लावून त्यांचीं मनें आपल्या धर्माकडे नेतात. मग

कांहीं वर्षांनीं या उभयतांस देवाज्ञा झाली. नंतर त्यांच्या आज्ञेप्रमाणें भावाची कबर समुद्रांत खडकावर आणि बहिणीची डोंगरावर बांधून त्यांची पूजा अर्चा चालू केली, आणि आतां त्यांचा साक्षात्कार पटतो ! हा साधू मोठी जागती जोत आहे ! व त्याच्या नांवानें कोणी धर्म केला असतां तो त्यास सुखी करितो असें सांगतात ! ह्या प्रमाणें ज्या ठिकाणाचा शोध करायास लागावें त्याचा विलक्षण वृत्तांत सांपडतो. ह्या कबरीच्या साक्षात्काराविषयीं ह्या फकिरानें दुसरें असें सांगितलें कीं, भरती कितीही उधाणाच्या जोराची असली तरी समुद्राचें पाणी ह्या कबरीच्या वर चढायाचें नाहीं, तें तिच्या पायाजवळ येऊन कमती पडतें, असा याचा पराक्रम आहे ! ह्या ठिकाणास मामा हजानी हें नांव पडण्याचें कारण असें आहे. जसें हिंदू लोकांत कोणी काशीयात्रेस जाऊन आला ह्मणजे त्यास "काशीकर" असें ह्मणतात, तसेंच मुसलमान लोकांत कोणी मक्केची हाज करून आला ह्मणजे त्यास "हजानी" असें ह्मणतात. ह्या ठिकाणीं मामा हजानी राहूं लागला ह्मणून त्या जाग्यास ह्याचें नांव दिलें. हा फकीर एथें कोणत्या काळीं वसत होता व त्याचा काळ होऊन किती वर्षें झालीं याचा शोध लावावा ह्मणून एथील एका वृद्ध फकिरास विचारिलें असतां त्यानें असें उत्तर केलें "तोबा ! तोबा ! महाराज ओ बात मैं तुमकु क्या कहूं ! ओ पीर साहेब तो मुंबई शहरमें बोत लंबी मुदतसें रहा हुवा है. खुदा मालुम उनकु आकर कितना बरस हुवे. लेकिन् मेरे ध्यानमें आताकें हजार दोहजार बरस हो गया होयगा. ओ पीर साहेब ह्यां बेठकर लोकोंकी अरज सुन लेता, और खुदाके पास हाजर करता. खुदा उनोका बात सुनकर बाहाल करता." ह्या प्रमाणें ह्या लोकांची यावर श्रद्धा आहे. कदाचित् अशा स्थळाचा शक व मिती ठाऊक असलीं तरी हे लोक बुद्ध्या सांगत नाहींत. एकादें दैवत पुरातन काळापासून एथें आहे अशी लोकांस समजूत पडण्यासाठीं ही युक्ति काढितात असें वाटतें. जसे तुकारामाच्या नांवावर पंढरपुरांतील साधु भीक मागत फिरतात, तसेंच मुंबईतील कित्येक मुसलमान फकीर मामा हजानीच्या नांवावर भिक्षा मागत फिरतात.– "मामा हजानी तेरा भला करे" असा लोकांस आशीर्वाद देत असतात.

एका सधन व पुरातन स्थायिक वृद्ध परभू गृहस्थाकडे वरळीचा पुरातन वृत्तांत लिहिलेली एक लहान बखर सांपडली, तींत हा पुढील मजकूर सांपडतो.

" श्रीराजबिंब महाराज यांणीं आपले पाटील यांस वरली गांव वंशपरंपरा इनाम दिलें होतें. त्या गांवांतील शेत, जमीन, डोंगर, ताडमाड, खजुरी यांचें उत्पन्न वसूल करून घेऊन पुत्र पौत्रादिकांनीं याचा उपभोग करून घ्यावा अशी त्या पाटिलास सनद करून दिली होती. तदनुसार फिरंगी यांनींही तीच वहिवाट कायम करून पाटील मजकूर यांचें इनाम चालविलें. तदनंतर इंग्रजी झाली त्यांनींही कांहीं हल्ला हरकत न करितां पाटिलाच्या घराण्यास पूर्ववत् इनाम चालूं दिलें. त्या पाटिलाचें कुटुंब मोठें होतें, कांहीं काळानें त्याचा पडता काळ आला, व कुटुंबांतील मनुष्यें विभक्त झालीं आणि वरळी गांवाच्या वतनाच्या निरनिराळया तक्षिमा करून त्यांनीं आपआपणांत वांटून घेतल्या. त्यांचा मोडता काळ होत चालल्यामुळें कोणीकोणी आपआपल्या तक्षिमा विकूं लागले. अशा त्यांनीं पुष्कळ जागा फरोक्त केल्या. त्यापैकीं, मनोहरदास रूपजी, नसरवानजी मोदी, व सोकाजी रघुनाथजी यांणीं विकत घेतल्या, व बदामीचें भाट नांवाची वाडी भिकाजी माणकोजी याणें खरेदी केली, आणि थोडीशी जागा रुस्तमजी बरजोरजी याणें विकत घेतली. पुढें सन १७५३ मध्यें ज्यावेळीं कंपनी सरकारास मुंबईवर फ्रांसीस येणार आहे, असें समजलें त्यावेळीं मुंबईच्या किल्ल्या-सभोंवते चर खणण्याचा आपला मतलब मुंबईतील शेट सावकार लोकांस दर्शवून सरकारास द्रव्याची याप्रसंगीं कुमक करावी असें सांगितलें. त्यावेळीं मुंबईतील रयतेनें असें सांगितलें कीं, सरकारास द्रव्याची कुमक करायास आह्मापाशीं कांहीं द्रव्य नाहीं, परंतु सरकारानें आमची स्थावर जिनगी वतनवाडी यांवर कांहीं कर बसवून आमच्या उत्पन्नांतून सालिना कांहीं द्रव्य घ्यावें आणि मग अडचण दूर झाल्यावर तें द्रव्य आमचें आह्मास परत द्यावें. असा ठराव कंपनी सरकारा-पाशीं करून कर चालू केला. त्या पूर्वीं वरली गांवावर सरकार देणें घेणें कांहीं पडत नव्हतें. इतर गांव माहीम, परळ, मुंबई, याठिकाणीं पेनशन टाक्स ह्मणून कर द्यावा पडत होता. कारण तो गांव इनाम दिला होता, आणि तें पाटिलाचें वतन होतें. सबब त्याजवर कांहीं कर चालू केला नव्हता. सन १७५३ पासून वरली गांवावर कंपनी सरकारानें कर घेणें ठरविलें. "

# प्रकरण ४.

भायखळें–माजगांव–घोडपदेव–शिवरीचाकिल्ला व बाग–मिठाचा आगर–परळ-मांडवीबंदर–आर्थरबंदर–पालेबंदर–हल्लींचा कुलाबा–बोरीबंदर–कोळीबंदर–करनाकबंदर–मशीद बंदर-चिंचबंदर–क्लेरबंदर–एल्फिन्स्टनबंदर –वाडियाबंदर–टांकबंदर–कोळसेबंदर– माहीम–माटुंगें–शींव–रीवाचा- किल्ला–सभ्याची वरळी– सोनापूर.

ही गोष्ट खरी आहे कीं, शहरें ह्मटलीं ह्मणजे बहुधा मुळापासून भरभराटांत आलेलीं कोठें विरळा. मोठमोठालीं रोमशहरासारिखीं शहरें जी उदयाच्या शिखरास येऊन पोहंचलेलीं, तीं देखील पूर्वीं निरुपयोगी, रानवट व ओसाड गांवांसारिखीं होतीं. पुणें हें पेशव्यांच्या कारकिर्दीपूर्वी कोणत्या प्रकारचें स्थल होतें ! सगळा डोंगरी पेंढाऱ्यांचा गांव होता; परंतु पेशव्यांनीं त्यावर शहर बांधून तें उदयास आणिलें. तेथें पाणी नव्हतें तें पांच पंचवीस कोशांवरून नळ बांधून आणिलें. परंतु तेथची जमीन तरी चांगली सुपीक असून तेथें झाडें वगैरे होतीं आणि आसपास नद्या व घांट होता, आणि नजीक दुसरीं शहरें होतीं. असाच प्रकार ज्या ज्या शहराचा इतिहास शोधून पाहावा त्याचा सांपडतो. परंतु मुंबईचा प्रकार दुसऱ्या शहरांहून केवळ भिन्न आहे. शहर वसविण्यास किंवा बांधण्यास जी आवश्यक जमीन तिचाच एथें अभाव होता. जिकडेतिकडे खाऱ्यापाण्याच्या खाडया असून चिखलाचा मात्र सुकाळ होता. आणि आसपास आसरा कशाचा ह्मणाल तर समुद्राचा. आणि त्याच्या पलिकडे वस्ती कोणाची ह्मणाल तर चांचे, व बंडवाले लोकांची. अशा ह्या स्थलास उत्तम प्रतीच्या योग्यतेस आणून लाखो मनुष्यांची सुखवस्तु वस्ती होई असें करणें साधारण काम नव्हे ! जसजसा भूमीचा उपभोक्ता असतो तसतशी तिची योग्यता वाढते. स्त्रीस भ्रतार चांगला मिळाला असतां तिची जशी योग्यता वाढते, तसेंच जमिनीस चांगला प्रभु असला ह्मणजे ती अनेक प्रकारें प्रख्यातीस येते. मुंबईचा मुळच्या स्थितीचा

नकाशा पाहिल्यावरून ही किती ठिकाणीं छिन्नभिन्न झालेली होती, व हिला सध्याची योग्यता आणण्यास किती अडचणी होत्या हें ध्यानांत येईल.

जसा एकादा मनुष्य पूर्वी अत्यंत दरिद्रावस्थेंत असतो आणि मग काळें-करून तो आपल्या पराक्रमानें किंवा एकाद्या श्रीमानाच्या मदतीनें उदयास येतो तसाच प्रकार मुंबईचा झाला. पूर्वी नागपाडा, भायखळें ह्मटलीं ह्मणजे केवळ अप्रयोजक ठिकाणें होतीं. हीं गुराख्यांचीं रहायाचीं व ढोरें चरविण्याचीं ओसाड स्थळें होतीं. तीं आज राजे लोकांस वस्ती करण्याजोगीं झालीं आहेत. ह्याठिकाणीं प्रस्तुत पाहावें तेव्हां नवे बंगले व इमारती बांधण्याची धामधूम चाललेली दृष्टीस पडते. हल्लीं एथील सर्व प्रकार किल्ल्यांतील रचनेसारिखा होत आहे. आगीच्या गाडीचे अलिजाहां कारखाने जिकडेतिकडे लागून गेले आहेत. व जागोजागीं अनेक तऱ्हेचीं यंत्रें पडलेलीं आहेत.

भेंडीबाजाराच्या शेवटीं बाबुल्याचें तळें आहे. त्याच्या एकेबाजूस नागपाडा, त्यापुढें इस्पिटल–त्यापासून थोडयाशा अंतरावर शेट खरशेटजीचें तळें. हें शेट माणिकजी खरशेटजी स्मालकाझ कोर्टांतील तिसरे न्यायाधीश यांच्या तीर्थरूपांनीं लोककल्याणार्थ बांधिलें होतें. त्यांच्या कारकिर्दींत भायखळयावरील लोकांस पाण्याचा फारच तोटा होता आणि ह्या परोपकारी गृहस्थानें हा तलाव बांधिल्या-पासून लोकांस सुख झालें. हल्लीं सरकाराची अशी मर्जी आहे कीं, हा तलाव बुजवून ही जागा इमारती बांधण्यास विकून टाकावी. आणि ज्या उदार गृहस्थानें हा तलाव बांधिला होता त्याचें नांव चिरकाळ लोकांत प्रसिद्ध असावें ह्मणून सर जमशेटजीच्या इस्पिटलासमोर एक गोडया पाण्याचा हौद बांधून त्यास ह्या गृहस्थाचें नांव ठेवावें, असे विचार चालले आहेत. पुढें दाऊद सासून यांनीं बांधलेली विशाळ मशीद आहे. तिच्या शेजारीं यांनींच आपल्या लोकां-साठीं घातलेलें विद्यालय. ह्या दोनही इमारती सुंदर बांधिल्या आहेत. त्यांपासून सुमारें पंचवीस हातांच्या अंतरावर सोलजर लोकांच्या मुलींच्या व मुलांच्या दोन शाळा आहेत. ह्या शाळा सन १७१९ पासून चालू असून त्यांला सरकारचा आश्रय आहे. ह्या पूर्वी कोटांतील बराकांत होत्या. त्या सुमारें सन १८३८ त ह्या इमारती तयार करून एथें आणिल्या. यांत सोलजर व इतर साधारण इंग्रज लोकांचीं मुलें शिकतात. ह्या शाळा रेवरेंड मिस्तर काब ह्यांनीं उपस्थित केल्या होत्या. हे कोटांतील इंग्रजांच्या मोठया देवळावर

आलेले पहिलेच पाद्री. हे उद्योगी असून विद्यावृद्धीसाठीं व लोककल्याणार्थ झटणारे होते. यांनीं सन १७१९ माहे सेपटेंबरांत देवळांत उपदेश केला आणि आपल्या वक्तृत्वशक्तीनें एथें इंग्रजी शिकविण्याच्या शाळा घालण्याच्या आवश्यकतेविषयीं लोकांच्या मनांत ही गोष्ट ठसविली. मग वर्गणी करून त्याच वेळीं ६,१९० रुपये जमविले. नंतर कांहीं दिवसांनीं ही शाळा सुरू केली. त्यापूर्वी इंग्रज लोकांच्या मुलांस शिकायाची एथें कांहींच सोय नव्हती. त्यावेळीं हे सहा हजार रुपये जमलेले पाहून इंग्रज लोकांस देखील नवल वाटलें. परंतु हल्लीं सहज फुटलेल्या जहाजावरील एकाद्या खलाशांस मदत करावी पडली तर एकादा पारशी गृहस्थच हजार दोनहजार रुपये देतो. ह्या शाळांच्या बाजूस सरकारी छापखाना व इंग्रज लोकांचें देवालय आहे. त्याच्या समोर कांहीं अंतरावर रेलवेचें ठाणें व हपीस. त्याच्या खालीं रणमल्ल लखा या नांवाच्या लवाण्या जातीच्या एका श्रीमान् वाणी सावकारानें बांधिलेलें देवालय आहे. ह्यास सुमारें पन्नास साठ हजार रुपये खर्च झाला असें सांगतात.

पुढें माजगांवापर्यंत श्रीमंत, पारशी, मोगल, मुसलमान, वाणी, व इंग्रज यांनीं हजारो रुपये खर्च करून बांधलेले बंगले आहेत. ह्या एकएक बंगल्याची व तेथील सुंदर बागांची रचना व त्यांतील मिष्ट पाण्याचे जे करंजे उडतात त्यांची शोभा अवर्णनीय आहे. कोठें पाण्याचे तलाव भरून वाहात आहेत, कोठें कुंडें बांधून त्यांत थंड व गारपाणी भरून ठेविलें आहे. ह्यातारपाखाडी, उमरखाडी, पायधुणी, ह्या पूर्वीं खाड्या होत्या असें सांगितलें आहे, परंतु सध्याची व्यवस्था पाहिल्यानें तो प्रकार एकाएकीं लोकांच्या लक्षांत येणार नाहीं. कारण त्या जाग्यांत आज शेंकडो बाग व बंगले उठले आहेत, इतकेंच नाहीं, परंतु त्या जाग्याची चर्याच अगदीं फिरून गेली आहे. ज्या रस्त्यांतून जावें त्यांतून नवा नवा प्रकार दिसतो.

भायखळयाच्या शेवटास खेमचंद मोतीचंद श्रावक वाणी यानें बांधलेलें चमत्कारिक मंदिर आहे. आमचे दक्षिणी लोक श्रावकांच्या देवळांत जाऊं नये ह्मणून अशीं मंदिरें जाऊन पाहत नाहींत, परंतु हें पाहण्या जोगतें आहे. हें मंदिर सुमारें एक लक्ष रुपये खर्चून बांधिलें आहे, त्यांत कोरीव काम आहे खरें परंतु तें सर्व मारवाडी तऱ्हेचें असून त्यांत सुरेखपणाचा अगदीं अभाव आहे. एथें मारवाडी लोक दर्शनास जातात. देवालयाच्या दोहीं बाजूस दोन मोठे

लांकडाचे रंगविलेले हत्ती आहेत. देवालयांत जिकडेतिकडे पुष्कळ मूर्तींची स्थापना केली आहे, व आंतून आरसे जडविले आहेत.

माजगांवाच्या वर टांकबंदरानजीक लहान डोंगर आहे त्यास व त्याजवळच्या जाग्यास घोडपदेव असें नांव आहे. या डोंगरांतून एक. खडक बाहेर निघाला आहे त्यावर तेल व शेंदूर चढवून त्याचा देव बनविला आहे. ह्या देवाची कोणत्या काळापासून स्थापना झाली हें समजत नाहीं. परंतु ज्या अर्थी सरकार दरबारांत या स्थळाचें नांव महशूर आहे, त्या अर्थी हें फार काळापासून स्थापित आहे असें वाटतें. या देवाचे सेवक बहुतकरून कुणबी, माळी व कोळी असतात. परंतु दुसऱ्या लोकांच्या स्त्रियाही या देवास भजतात, व नवस करितात. हा देव मुलें देण्याविषयीं प्रख्यात आहे ! वंध्या स्त्रिया व ज्यांचीं मुलें वांचत नाहींत अशा मृतवंध्या ह्यास फार भजतात. या देवास पाळणें, झोळ्या, असे पदार्थ अर्पण करितात. ह्याचें देऊळ साधारण झोपडी सारिखें आहे. एथें गेलें असतां झोळया व पाळणे टांगलेले दृष्टीस पडतात. कोणी रुपया आठआण्याचे रुप्याचे पाळणे व बाळकें करून देवास अर्पण करितात; व सुपाऱ्या पाण्यांत भिजवून कौल लावितात.

शिवरीस लहानसा किल्ला आहे व शेवटास मोठा आगर आहे, त्यांत मीठ पिकतें. मीठ पिकविण्याची अशी कृति आहे. समुद्राच्या खाडीनजीक जी सपाट जमीन असते ती शेता सारिखी स्वच्छ करून, तींत लहान वाफे पाडून हात सवाहात खारें पाणी घेतात, व त्यावर मातीचा शिवारा देतात. मग त्या पाण्यावर ऊन पडूं लागलें ह्मणजे दुधासारिखी साई येऊं लागते. नंतर आठपंधरा दिवसांनीं ती जाड व कठीण होते. नंतर नेमाप्रमाणें दिवस झाले म्हणजे ती वरची साई काढून घेतात, तेंच मीठ. मग फिरून समुद्राचें पाणी आंत घेतात, असें करून मीठ तयार करितात.

शिवरी एथें एक मोठा सरकारी बाग आहे. त्याची स्थापना सन १८३० मध्यें झाली, तेथें देशोदेशींचीं फळ व फुल झाडें आणि वनस्पति आणून लाविल्या आहेत. हें एक पाहण्याजोगतें रम्य स्थळ आहे. माजगांवांत सर जमशेटजी यांचा एक अत्युत्कृष्ट बाग व बंगला आहे, असे या ठिकाणीं चहूंकडे बाग लागून गेले आहेत.

परळ हें स्थळ सरकारी वाड्यामुळें सर्वत्र प्रख्यात आहे. हा वाडा पुष्कळ वर्षांपासून एथें आहे. ह्या शिवाय सावकार व श्रीमंत लोकांचे बंगले व बाग एथें एकास एक लागून गेले आहेत. अस्सल एथील वस्ती म्हटली असतां पांचकळशे, सुतार, कोळी, भंडारी आणि किरिस्तांव. परंतु हल्लीं एथें श्रीमान् लोक जागोजागीं हवेसाठीं जाऊन राहतात. एथें एक लहानसा बाजार आहे. एथील कित्येक मुळ-स्थायिक सुतार व भंडारी लोक सधन असून त्यांचीं एथें घरेंदारें आहेत. परळ एथील पाणी व हवा चांगली आहे. किल्ल्याच्या उत्तरेस सुमारें अडीच कोशांच्या अंतरावर परळ आहे. त्याच्या ईशान्येस अर्धकोशावर शिवरी. तिच्या अलीकडे माजगांव व चिंचपोकळी.

पालोबंदर कापाच्या मैदानाच्या शेजारीं कुलाब्याच्या पुलाच्या बाजूस आहे. एथें माल वगैरे फार उतरीत नसतात. परंतु लोक आगबोटींतून किंवा दुसऱ्या जहाजांतून येतात तेव्हां या बंदरांत उतरतात. हें बंदर चहूं बाजूनीं मोकळें असल्यामुळें एथें सकाळ संध्याकाळची सुंदर हवा येते. एथें श्रीमंत इंग्रज लोक संध्याकाळचे गाडींत बसून सहपरिवार हवा खाण्यास जातात. व कित्येक आमचे लोकही जातात. एथील धक्का हल्लीं मोडून विस्तीर्ण बांधण्याचें काम चाललें आहे.

पालोबंदराच्या बाजूस गोदीखालीं मांडवीबंदर आहे त्यांचें वर्णन पुढें येईल. आर्थरबंदर पालोबंदराच्या वरच्या बाजूस आहे.

कुलाबा हें एक ओसाड स्थान होतें असें सांगितलें आहे. कांहीं वर्षांमागें एथील जागा निरुपयोगी असें मानून तिचा बहुतेक भाग सरकारानें लिलांव करून अगदीं सवंग विकून टाकिला होता. जी जमीन पूर्वीं पांचशें रुपयांस विकली होती, तिचे सद्यः दर महिन्यास हजार रुपये उत्पन्न होतात.

कुलाब्याच्या वायव्येकडील खाडी भरणी घालून बुजवून टाकिली आहे आणि तिजवर कापसाचे गठे व लाकडांचे सोट ठेवलेले असतात. एथें एक दोन लहान वखारी बांधिल्या आहेत व कांहीं दिवसांनीं एथें बंगले उठतील असें वाटतें. कुलाब्याचे तीन भाग कल्पिले आहेत ते असे-लहाना कुलाबा, मधला कुलाबा, आणि मोठा कुलाबा. आर्थर बंदरापासून गनक्यारेजच्या कारखान्याच्या थोडें पुढेंपर्यंत लहाना कुलाबा, पुढें काबूलचर्चपर्यंत मधला कुलाबा, आणि त्याच्या पुढें दांडीपर्यंत मोठा कुलाबा.

लहान्या कुलाब्यास प्रथम आर्थर बंदर. ज्याच्या धक्क्यावर ग्रांट बिल्डिंग नांवाच्या इमारती, त्यांच्या मागें दोन मोठ्या गिरण्या. एथें कापसाच्या वखारी जिकडे तिकडे लागून गेल्या आहेत. एथें सर जमशेटजी जिजीभाई व त्याचे भागीदार यांनीं आपला माल उतरायाकरितां दीड लक्ष रुपये खर्चून धक्का बांधिला आहे. यांची एथें मोठी गिरणी आहे तेथें वाफेच्या योगानें चालणारीं आठ यंत्रें आहेत. याशिवाय चहूंकडे कित्येक व्यापारी लोकांचीं हपिसें आहेत. एके बाजूस तारायंत्राचें हपिस, त्याच्या पुढें समोरच गनक्यारेज हपिसाचा कारखाना आहे. हा सन १८२३ त सुरू झाला. ह्या कारखान्यांत तोफा, गोळे, तोफांचे गाडे व अनेक तऱ्हेचें लोखंडी व पितळी ओतींव काम करितात. एथें जिकडे तिकडे वाफेचीं यंत्रें असून सर्व काम मोठ्या झपाट्यानें चालत असतें. कोठें लांकडी काम तयार होतें. कोठें मोठे बिडाचे नळे ओतितात, असा चमत्कार दृष्टीस पडतो. ह्या कारखान्यांत शेंकडो लोक खपतात. ह्यांतील एक एक यंत्र दृष्टीस पडलें म्हणजे तेथें पाहतच राहावें असें वाटतें. कशापासून काय होतें हें सांगितल्यावांचून कांहींच लक्षांत येत नाहीं. ह्या इंग्रज लोकांच्या यांत्रिक कारखान्यांत गेलें म्हणजे मनुष्याची मति अगदीं कुंठित होऊन जाते. ह्या कारखान्याचा खर्च दरमहा दहा बारा हजार रुपये आहे. ह्या एकएक कारखान्याचें साद्यंत वर्णन करीन ह्मटलें तर आठपंधरा दिवस सतत तेथें जाऊन प्रत्येक कारागिराकडून त्याचें काम व प्रत्येक यंत्राकडून जे जे व्यापार घडून येतात ते ते समजून घेतले पाहिजेत. इतकेंच सांगायाचें कीं, हे कारखाने लोकांनीं अवश्य जाऊन पाहावे; तेव्हांच तेथील कांहीं रचना व प्रकार ध्यानांत येईल.

मधल्या कुलाब्यास गोऱ्या पलटणीचीं घरें, इस्पिटल, पोर्टुगीझ् व इंग्रज लोकांचीं देउळें. काबूलच्या लढाईंत पडलेल्या लोकांच्या स्मरणार्थ काबूल चर्च नांवाचें एथें एक देऊळ सन १८४८ त बांधिलें आहे. ह्यास सुमारें ८०,००० रुपये खर्च झाला. पुढें पलटणीच्या लोकांस कवाईत शिकविण्याची जागा. त्यापुढें कोळसे बंदर. पुढें पुष्कळ घरें व लहानसा बाजार आहे. त्याच्या जवळच सोल्जर लोकांनीं अपराध केला असतां त्यांस शासन करण्याची कांजी हौस नांवाची काळोखाची कोठडी आहे.

पुढें मोठा कुलाबा. एथें प्रथम साहेब लोकांचे बंगले, त्यापुढें वेधशाळा, ही सर्व विद्यार्थी मुलांनीं तर अवश्य जाऊन पाहावी. यांत अनेक यंत्रें आहेत, व हवेचे क्षणोक्षणीं फारफेर होतात ते समजतात. यांत हवामापक, वायुमापक, व दुसरीं अनेक यंत्रें आहेत. एथील कारभारी लोकांस रात्रंदिवस ह्या यंत्राचें चलनवलन पाहून ठेवावें पडतें. त्याच्या पुढें कुलाबदांडी. त्याच्या समोर वेडे लोकांस घालायाचें घर. आणि अगदीं शेवटास लहानशी गढी आहे. तीवर दोन तोफा रचून ठेविल्या आहेत. आणि त्याच्या शेवटास इंग्रज लोकांचें कबरस्थान, ज्यांत पुष्कळ इंग्रज लोकांच्या कबरी बांधिल्या आहेत. हे तीनही भाग मिळून सुमारें एक पक्का कोश जमीन आहे. मोठा कुलाबा ही थोडीशी डोंगरी जमीन आहे. ही मुंबईची दक्षिणेकडची सीमा.

कांपाच्या मैदानाच्या शेवटीं किल्ल्याच्या तटाच्या बाजूस बोरीबंदर आहे. ह्या बंदरांत पूर्वीं फक्त होडींतून उतारू लोकांस उतराया पुरती थोडीशी सोई होती. परंतु आसपास खडक असल्यामुळें उतारू लोकांस एका खडकावरून दुसऱ्या खडकावर उड्या मारून वर यावें पडे. अर्थात् जिकडे तिकडे सगळी अडचणच होती. माल उतरावयाची व गाडी येण्याजाण्याची मुळींच सोई नव्हती. बाजूस लहानशी टेंकडी होती व आसपास मोठमोठाले खडक होते त्यामुळें दहा-पंधरा मनुष्यांस एकदम उतरायाचें पडलें तर मोठीच अडचण पडे. आणि ही जागा खडकळ असें लक्षांत आणून सरकार हें बांधण्याच्या खटपटींत पडत नसे. परंतु काळेंकरून सरकारास जाग्याच्या संकोचामुळें यावरही नजर पुरवून हें बांधण्या-प्रीत्यर्थ हजारो रुपये खर्चणें भाग झालें. सुमारें इसवी सन १८५२ पासून एथील डोंगरी व खडक फोडून टाकून एथें एक मोठा विस्तीर्ण धक्का बांधिला आहे; ज्यांवर चार पांच हजार मनुष्यें खुशाल उतरतील व लाखो खंडी माल ठेवतां येईल. हल्लीं रेलवेचीं सगळीं यंत्रें व दुसरें सामान आणि पाण्याचे मोठमोठाले लोखंडी नळ एथेंच उतरितात. हें बंदर दुसऱ्या बंदरांपेक्षां सर्व गोष्टींत सोईवार झालें आहे. एथें गेलें असतां दोन घटिका उभें राहावेंसें वाटतें. हें बंदर पूर्वाभि-मुख असल्यामुळें संध्याकाळचा मंद वारा येत असतो व समोर खानेरी हुनेरी, छिनालटेकडी, घारापुरी हीं बेटें एकमेकाच्या अंतरानें दृष्टीस पडतात.

बोरीबंदरावरून माजगांवास जायास निघालें म्हणजे एकसारिखीं एकास एक लागून थोड्या अंतरावर करनाकबंदर, क्लेरबंदर, मशिदबंदर, चिंचबंदर, एल्फिन्स्टन-

बंदर, आणि वाडीबंदर, हीं लागतात. करनाक आणि क्लेर हीं दोन बंदरें मयत प्रख्यात लक्ष्मण हरिश्चंद्रजी उर्फ भाऊ या नांवाच्या परभू गृहस्थानें बांधिलीं आहेत. हीं बंदरें हल्लीं भाऊचे धक्के या नांवानें मुंबईंत प्रख्यात आहेत. हीं बांधण्यास सुमारें आठ नऊ लक्ष रुपये खर्च झाला असें सांगतात. क्लेरबंदर हें अर्ल आफ्क्लेर गव्हर्नर साहेबाच्या कारकिर्दींत तयार झालें म्हणून त्यास या साहेबाचें नांव दिलें. करनाकबंदर हें सरजेम्स रिव्हेट करनाक या गव्हर्नर साहेबाच्या कारकिर्दींत तयार झालें ह्मणून त्यास करनाकबंदर असें नांव ठेविलें आहे. या दोन्ही बंदरांवर दाणा, फळफळावळ, लांकडें, गवत व दुसरा अनेक जातीचा माल उतरतो. ह्या ठिकाणीं जिकडे तिकडे वखारी आहेत. व यांची रचना मोठ्या शहाणपणानें केली आहे. ह्या दोनही बंदरांच्या वखारींच्या भाड्याबद्दल व माल उतरण्याच्या हक्काबद्दल सालिना सुमारें एक लक्ष रुपयांवर उत्पन्न आहे. लक्ष्मण हरिश्चंद्रजी हे सधन असून मोठे धूर्त, चतुर व विद्वान होते. ह्यांनीं कांहीं वर्षें-पर्यंत तंबाखूचा व कचरपटीचा मक्ता सरकारांतून घेतला होता. या प्रमाणें ते लाखो रुपयांचे सरकारांतून कारखाने घेत. असें सांगतात कीं, त्यांनीं कचरपटीचा मक्ता घेतला होता त्याकाळीं शहरांतील सर्व कचरा नेववून ह्या बंदराच्या खाडींत घालवून ती भरून काढविली. त्यामुळें हें काम त्यांस स्वस्त पडलें. नाहींतर हीं दोन बंदरें तयार करायास पंधरा वीस लक्ष रुपये खर्च पडला असता.

चिंचबंदरावर दाणादुणा व इतर परचुरण माल उतरतो. एथें कस्टमचा एक कमिशनर असून मांडवीचें खातें आहे. एथें एके बाजूस पांचपंचवीस तंबाखूच्या वखारी आहेत. मुंबईच्या खपाचा सर्व तंबाखू यांत भरून ठेविला आहे. तेथून तो दरमणास तीन रुपये फी व जकात भरून वखारदाराकडून दुकानदार विकायास आणितात. ज्याला सरकारी पट्टा असेल त्यालाच मात्र हा मिळतो. मणाखालीं आणण्याचा हुकूम नसतो.

क्लेरबंदराच्या पुढें नवरोजी हिल नांवाचा डोंगर आहे. त्याच्याखालीं एल्फिन्स्टनबंदर हें एक नवीनच तयार होत आहे. ह्यास सुमारें पांच लक्ष रुपये खर्च होईल. हें बंदर विस्तीर्ण असून त्यांत वखारी व माल उतरण्याचे धक्के मोठे सोईवार बांधिले आहेत. पुष्कळ व्यापारी लोकांची मंडळी जमून हें काम चालविलें आहे. यांचे भागीदार इंग्रज व दुसरे एतद्देशीय शेट सावकार मिळून शहात्तर असामी आहेत. व ह्याचे भाग सर्व दीडशें आहेत. ह्या सर्व गृहस्थांनीं

ते आपआपणांत वांटून घेतले आहेत. ह्या बंदराच्या जाग्याची लांबी रुंदी औरस चौरस १,०५,००० वार आहे. ही सर्व पूर्वी खाडी होती, तितकी भरून काढायास १,६७,००० रुपये ह्या मंडळीस खर्च बसला; ह्या प्रमाणें दर वारास रु० १–१० पडले. असें सांगतात कीं, ह्या जाग्यांत मुंबईतील सर्व केरकचऱ्याची भरणी घातली. आणि ही युक्ति काढल्यामुळेंच हें काम इतकें स्वस्थ पडलें. नाहींतर ही खाडी बुजवून टाकायासच दोन तीन लक्ष रुपये खर्च बसला असता. हें बंदर लार्ड एल्फिन्स्टन साहेबाच्या कारकिर्दीत सन १८५८ त उपस्थित झालें, ह्मणून यास ह्या गव्हर्नर साहेबाचें नांव दिलें. जरी हें अजून संपूर्ण तयार झालें नाहीं, तरी यापासून मालकास दरमहा सुमारें दोन हजार रुपये उत्पन्न होतात. यावरून पुढें याचें उत्पन्न अधिकच वाढेल असें अनुमान होतें. या स्थळीं गिरण्या वगैरे अनेक जातीचे कारखाने घालावे असा मालकांचा मनोदय असून हे प्रयत्न त्यांनीं सद्यः चालविले आहेत. ह्या प्रमाणें मुंबई शहराचें महत्व वाढविण्यास राजा आणि प्रजा एकत्र जमून एकसारिखे झटत आहेत; त्यामुळेंच ह्याचा सर्व गोष्टींत उत्कर्ष होत चालला आहे. अशा कृत्यापासून शहरास बळकटी आणि शोभा येते एवढेंच नाहीं, परंतु सरकाराचें व रयतेचें उत्पन्न वाढतें. हेंच द्रव्य यांनीं पूर्वीच्या लोकांसारिखें जमिनींत पुरून ठेविलें असतें, तर त्यापासून काय लाभ झाला असता ? इंग्रज लोकाचें राज्य झाल्यापासूनच लोकांस आपल्या द्रव्याचा उघडपणीं उपभोग घेण्यास धैर्य झालें. आणि ते व्यापार करूं लागले, व लाखो रुपये व्याजास पेढीवर ठेवूं लागले, मोठमोठाले कारखाने घालून धक्के, बंदरें, इत्यादि बांधूं लागले. तेणेंकरून शहरांत द्रव्य घोळूं लागलें, लोकांस उद्योग सांपडून त्यांचीं मनें संसाराकडे वळूं लागलीं, मालकांचें द्रव्य वाढत चाललें, व सुखाची वृद्धि होत चालली, आणि नव्या नव्या कल्पना सुचत चालल्या.

ह्या बंदरांत कापुस, कोळसे, व अनेक तऱ्हेचा माल उतरतो. यांत वाफेच्या योगानें चालणाऱ्या कापसाच्या गिरण्या तयार होत आहेत, सद्यः तीन तयार आहेत. ह्या एका वखारींत दहा गिरण्या चालू होणार. यांतील एकएक यंत्र, मोठमोठालीं चाकें, व दुसरीं कळसूत्रें पाहून मोठा आनंद आणि विस्मय होतो. ह्या एकेक गिरणीसच दहा दहा हजार रुपये खर्च झाले आहेत. ह्या कारखान्यांत वाफेचें यंत्र चालतें, त्यावर लोखंडाचे पत्रे मारून एक कोठडी तयार केली आहे. तींत

पाणी भरतात मग तें कळसूत्र फिरविलें ह्मणजे आपोआप खालीं उतरतें. ह्या एका कोठडींत शेंकडो हांडे पाणी मावतें, ह्या प्रमाणें फक्त हा एक कारखानाच उभा करण्यास सुमारें दोन लक्ष रुपये खर्च लागेल, ह्या एकएक बंदराचें वर्णन करीन ह्मटलें ह्मणजे एक निराळाच ग्रंथ तयार केला पाहिजे.

मुंबापुरांतील सुज्ञ लोकांनीं मुंबईंत जींजीं बंदरें व कारखाने आहेत ते वर्षांतून एकदां तरी आपल्या मुलांमाणसांस नेऊन दाखवावे. सणावाराच्या दिवसांत उगीच इकडे तिकडे फिरून आयुष्य खर्चावें त्यापेक्षां अशीं स्थानें पाहून त्यांपासून ज्ञानप्राप्ति करून घ्यावी. विद्यार्थी मुलांनीं तर हीं जाऊन वर्षांतून एक दोन वेळा तरी अवश्य पाहावीं, ह्मणजे त्यांच्या अंगीं असे उद्योग करण्याचें सामर्थ्य येईल.

पुढें वाडीबंदर. एथें बांधकाम कांहीं नाहीं. जिकडेतिकडे चिखलांत लांकडाच्या वखारी आहेत. वखारींत शिसवी, सागवानी, फणशी, अशा अनेक जातीच्या लांकडांच्या सोटांचे गंज रचले आहेत. एथें एकएक लांकूड तीसतीस गज लांब व तीनतीन गज रुंद असें असतें. या दर सोटास कधींकधीं तीनशें चारशें रुपये पर्यंत किंमत पडते. उंच प्रतीचा साग कलिकोटाहून येतो. हीं लांकडें तारवें व घरें बांधायास फार उपयोगी पडतात. लोखंडी सडका झाल्यापासून सागाची किंमत दुप्पट चढली आहे. शिसवी व फणशी लांकूड, कपाटें, पेट्या, पलंग वगैरे उंची सामान करायास खपतें. याशिवाय एथें वांसे, तक्ते, बालें, तुळई असें घर बांधायाचें सर्व सामान विकतात.

मशीदबंदर हें मशीदीच्या खालीं आहे, ह्मणून त्यास हें नांव पडलें आहे. या बंदरांत साधारण माल उतरतो, व कस्टम कमिशनराचे शिपाई व कारकून असतात. बंदर ह्मटलें ह्मणजे तेथें पोलीसच्या व कस्टमच्या शिपायांची चौकी असायाचीच.

कोळीबंदर हें बोरीबंदराच्या शेवटीं आणि करनाक बंदराच्या शेजारीं लहानसें बंदर आहे. ह्या बंदरावर कोळयांची वस्ती असून सर्व नकद माल, मासळी एथें उतरते, व जिकडेतिकडे जाळीं पसरलेलीं असतात. एथें जायास लागलें ह्मणजे ह्याच्या पन्नास साठ हातांच्या अंतरावरूनच कुजलेल्या मासळीची दुर्गंधी निघत असते. कोणी मासळी वाळवितात, कोणी सुकवलेली टोपल्यांत भरून ठेविलेली असते. बंदरांत कोळ्यांच्या मासळी पागायास जायाच्या होडया व

मचवे जागोजागीं दृष्टीस पडतात. मुंबईत मासळी उतरण्याचीं पांच सहा ठिकाणें आहेत, त्यांत हें मुख्य. सोनापुराच्या नजीक ज्या किनाऱ्यास ब्याकबे असें ह्मणतात, तेथेंही एक दोन ठिकाणीं मासळी उतरतात. परंतु ती थोडी असून नेहमी उतरीत नाहींत. बोंबील नांवाची मासळी मुंबईत फार. ही मासळी मुंबई आणि सुरत यां मधील समुद्राच्या भागांशिवाय दुसऱ्या कोठें सांपडत नाहीं. वाळविलेले बोंबील मुंबईत प्रतिवर्षी हजारो खंडी खपतात. मुंबईच्या आखातांत साठ सत्तर कोशांच्या भागांत कोळी लोक मासळी मारायास होड्या घेऊन जातात. आणि तेथून ती मारून आणितात. यांचीं जाळीं मोठीं असतात. एकएक खंडीखंडी वजनाचें असतें. यांस मासे धरायास सरकारानें वेगवेगळे भाग नेमून दिले आहेत. त्यांत ते मोठमोठाले खांब रोवून जाळीं बांधून ठेवितात. हीं जाळीं दिडशें दोनशें हात लांब असून तितकींच रुंद असतात. गैर माहित तांडेल असला तर त्याचें जहाज जाळ्यांत सांपडून त्याची नासाडी होते. पूर्वी पोर्टुगीज् लोकांचें एक जहाज चौला नजीक अशा एका जाळ्यांत सांपडून त्याचा नाश झाला असें कोठें इतिहासांत अढळतें. मासळी पागायाच्या व हे खांब रोविण्याच्या हक्काबद्दल कोळ्यांस सरकारास कर द्यावा पडतो. व यांचीं जाळीं गलबत आंत शिरून तोडिलीं किंवा खांब मोडिले, तर सरकार त्यांपासून दंड घेऊन कोळ्यांस देतें. ह्या खांबांस खुंट व जाळ्यांस डोळीं असें ह्मणतात. ताजी मासळी पागून बंदरांत आणितात तीस जकात पडत नाहीं, परंतु सुकी मासळी दुसऱ्या देशांतून येते तीसच जकात द्यावी पडते.

कोळीबंदराच्या बाजूस पशुवधाचें ठिकाण केलें आहे, त्यास खाटकी बाजार असें ह्मणतात. खाटकी मार्किटाच्या मागें राहतात. ह्या ठिकाणीं खाटकी राहतात ह्मणून त्यास कसायवाडा असें नांव पडलें आहे. ह्या ठिकाणीं ते अनेक जातीच्या पशूंचा वध करितात.

कोळी बंदराच्या नजीक ढोरांचें तुरुंग आहे. त्यास पौंड असें ह्मणतात. यांत धन्यावांचून रस्त्यांत सांपडलेले घोडे, गाई, ह्मशी, बकरीं वगैरे नेऊन टाकितात. मग मालकाकडून दंड घेऊन परत करितात. एक रात्र गाई किंवा बैल एथें राहिला तर धन्याकडून सवारुपया दंड घेतात. याप्रमाणें जितक्या रात्री जनावर यांत राहील तितका सरकारास पैका भरावा पडतो.

घोडपदेवाच्या वर टांकबंदर आहे. एथें माल उतरण्याची वगैरे फार रहदारी नसते. शिवरीस व माजगांवासही बंदरें आहेत. माजगांवच्या बंदरांत जहाजें असतात व कधींकधीं लाकडांचे सोट, वांसे, तक्ते वगैरे यांत उतरतात. समुद्रांत तुफान झालें असतां या बंदरांत जहाजांचा बचाव होतो. ह्या शिवाय दुसरीं लहान सान पांच सहा किरकोळ बंदरें आहेत. त्यांवर फक्त एकादा शिपाई मात्र रखवालीस असतो.

कोळसे बंदर मधल्या आणि मोठया कुलाब्याच्या मध्यभागीं आहे. हें बंदर हल्लींच वहिवाटींत आणिलें आहे. या शहरांत आगबोटी, आगीच्या गाड्या, व वाफेचीं यंत्रें फार वाढल्यामुळें हजारो खंडी विलायती कोळशाचा खप होऊं लागला, आणि ते उतरायास दुसऱ्या ठिकाणीं अडचण पडूं लागली, सबब सरकारानें हें कोळसे उतरायासाठीं निर्वेध स्थान शोधून काढिलें, आणि त्यांत फक्त कोळसे मात्र उतरतात. एथें मोठमोठे कोळशाचे ढीग पडलेले असतात.

माजगांवांत वस्ती बरीच आहे. एथें साहेब लोकांचे व श्रीमंत वाणी, पारशी, मुसलमान लोकांचे बंगले व किरिस्तांव लोकांचें मोठें देऊळ आहे. एथें या लोकांची वस्ती फार आहे. एथें गोदी आहे तींत आगबोटी नीट होतात. पुढें दारू करायाचा कारखाना आहे. चिंचपोकळी, परळ, नायगांव, एथें बंगले व बाग पुष्कळ असून श्रीमंत पारशी व इंग्रज लोक राहतात. इतर हिंदू लोकांची वस्ती पातळ आहे. ती बहुतकरून पांचकळशी, सुतार, भंडारी, अशा लोकांची आहे. पुढें माहिमास व शींवास जाण्याचे रस्ते. एथें दोनही बाजूनीं शेतें असून मधून लोखंडी सडका व दुसरे रस्ते आहेत. ह्या शेतांत भात पिकतें.

माहीम हें लहानसें गांव मुंबईच्या वायव्येस किल्ल्यापासून सुमारें तीन कोशांच्या अंतरावर आहे. एथें जिकडे तिकडे माड आहेत. बाजारांत मात्र थोडीशी दाट वस्ती आहे, तीहि पांचकळशी, वाडवळ, सुतार, भंडारी, कांसार, सोनार, कोळी, मुसलमान, किरिस्तांव, यांची आहे. एथें नारळाचें उत्पन्न फार व एथील नारळ उत्तम प्रकारचे असून ते महाग खपतात. एथील वाड्यांत वाडवळ लोक रहातात. तेच माडांची व इतर झाडांची देखरेख करितात. एथें पोर्टुगीझ् लोकांचीं एक दोन देउळें व पाठशाळा आहेत. हिंदू लोकांचीं दोनचार देवळें व मुसलमान लोकांची एक मोठी मशीद आहे. मुकदमबाबा नांवाच्या एका

पिराची तींत कबर आहे. ह्या मुकदम साहेबाचा मार्गशीर्षाच्या सुमारास मोठा उरूस भरतो. तो पांच सहा दिवस पर्यंत असतो. तेथें शेंकडो व्यापारी लोकांचीं दुकानें पडतात. ही एक मुंबईंतील प्रख्यात जत्राच आहे. सर्व प्रतीचे लोक ह्या ठिकाणीं जातात. हिंदु लोक तर सर्वांपुढें जाऊन याची पूजा करायास सिद्ध असतात. शेवटास मांडवी आहे. त्याच्या शेजारीं आगीच्या गाडीचें ठाणें आहे. एथें वांद्र्याचा पूल सुरू होतो. वांद्र्याचा पूल सर जमशेटजी जिजीभाई यांनीं १,५५,००० रुपये खर्च करून लोककल्याणार्थ सन १८४३त बांधिला. व २२,००० रुपये खर्च करून त्यांच्या पत्नीनें तेथील मोठा रस्ता बांधिला. माहिमाची हद्द संपते तेथें मोठा दरवाजा आहे. माहिमास भंडारी लोकांची वस्ती फार आहे. ते लोक माडांपासून सूर काढितात. व त्याची दारू व गूळ तयार करितात. माहिमास किल्ला आहे तो लहान असून साधारण आहे. एथें बंदर आहे त्यांत बहुधा मासळी उतरते. हा पदार्थ एथें उत्तम प्रकारचा सांपडतो असें सांगतात.

दुसऱ्या प्रकरणांत कारणपरत्वें परभादेवीविषयीं सूचना केली आहे. ह्या देवीचें वास्तविक नांव प्रभावती आहे. परंतु वहिवाटींत हीस परभादेवी हें नांव पडलें आहे. ह्या देवीची स्थापना फार पुरातन काळापासून म्हणजे भीमराजाच्या कारकिर्दीपासून झाली आहे असें वाटतें. त्यावेळीं माहिमास प्रभावती असेंही नांव होतें. आणि तें ह्या देवीवरूनच पडलें असेल. परंतु मुळचें देवालय जीर्ण झाल्यामुळें समस्त परभू मंडळीनें वर्गणी जमवून सन १७१४ च्या सुमारास ह्याचा जीर्णोद्धार केला असावा. कारण नव्याच मूर्तिची स्थापना करायास सगळे परभू गृहस्थ झटले नसते. ह्या देवळाच्या भिंतीस आंतून एक शिला आहे तीवर हा पुढील लेख आहे.

॥ श्री ॥

“ श्री माता प्रभावतीचें<br>
देवाल्य बांधलें स<br>
मस्त प्रभुकुल पाठारे ज्ञा<br>
ती मिळोन वैशाखशुद्ध<br>
११ येका० संवत १७७१<br>
विक्रमादी० ॥ ”

ह्या लेखावरून दुसरा कांहीं शोध लागला नाहीं, तरी दीडशें वर्षांपूर्वी कोणत्या प्रकारची मराठी भाषा एथें बोलत व लिहित होते तें समजतें.

माटुंग्यांस पूर्वी लष्कराची छावणी होती. आणि बहुतेक लष्करी लोक एथें राहात होते. परंतु ह्या पाण्यानें शिपाई लोकांस नारू होऊन ते आजारी पडूं लागल्यामुळें तेथून काढून त्यास पुण्यास पाठविलें. एथें किरिस्तांव लोकांची वस्ती फार. ते लोक भाजी लावितात, आणि मुंबईस आणून विकितात. एथेंही बाग व बंगले आहेत, पण थोडे. पुढें शीव, एथें कोठेंकोठें वाडवळ लोकांची वस्ती असून बाग आहेत. शेवटास सरकारी चौकी आहे. तिच्यासमोर डोंगर आहे, त्यावर शींवचा किल्ला. एथें एक इंग्रज सरदार व कांहीं संत्री असतात. किल्ल्यांत दुसरी वस्ती नाहीं. ह्या किल्ल्याच्या खालीं थोडक्या अंतरावर दुसरा एक लहानसा भुयकिल्ला आहे, त्यास रीवाचा किल्ला असें म्हणतात. शींवास व माटुंग्यास मिठाचे आगर आहेत. आणि एथें पुष्कळ मीठ पिकतें. एथील वस्ती बहुतकरून गरीब आहे. शेवटास चौकी आहे तींत मांडवीखात्याचा एक कारकून व शिपाई असतात. बाजूस एक मोठा तलाव व देवालय आहे. पुढें शींवचा पूल आहे. याच्या योगानें मुंबई आणि कुरलें मिळविलीं आहेत. जेथें शींवची हद्द संपते तेथें मोठा दरवाजा आहे. व त्याच्या लगत पोलीसाचें ठाणें आहे. हा दरवाजा रात्रीची आठवरांची तोफ झाली ह्मणजे बंद होतो. आणि पहांटेची तोफ होते तेव्हां उघडतो. शींवचा पूल सन १७९७ त गव्हर्नर डंकन साहेबाच्या कारकिर्दींत बांधिला. त्यास ५०,५७५ रुपये खर्च झाला. हें द्रव्य रयतेकडून उत्पन्न करून घेण्याविषयीं अशी युक्ति काढिली होती कीं, या पुलावरून गाड्या, घोडे, पालक्या वगैरे जातील येतील त्यांजकडून याप्रमाणें कर घ्यावा:– बैलाच्या गाडीस अर्धआणा, घोड्यास चार आणे, एका घोड्याच्या गाडीस अर्ध रुपया आणि आणि दोन घोड्यांच्या गाडीस एक रुपया. या प्रमाणें कर द्यावा पडे. या पुलाचा प्रतिवर्षीं सरकार मक्ता देई व त्यापासून सालिना दहा वीस हजार रुपये उत्पन्न होत असे. परंतु अलीकडे सुमारें सन १८३१ सालीं जेव्हां सरकारानें पाहिलें कीं, जें द्रव्य हा पूल बांधायास खर्च झालें होतें तें भरपाई होऊन चुकलें, तेव्हां लागलेंच एका सुज्ञ परोपकारी इंग्रज कामगाराच्या सूचनेवरून हा कर घेणें बंद केलें. हा सरकारचा किती उदारपणा! दुसरें सरकार असतें तर एकाएकीं हें इतकें उत्पन्न सोडून देतें ना.

ज्या वर्षीं हा पूल बांधला त्यावर्षीं सर्व हिंदुस्थानांत मोठा दुष्काळ पडला होता. त्यामुळें हजारों मजूर व दुसरे लोक घाटांवरून व गुजराथ वगैरे देशांतून एथें आले, त्यावेळीं उकडे जाडे तांदूळ रुपयास तीन चार पायल्या देखील सांपडणें कठीण होतें. या समयीं हा पूल बांधायास मजूर लोक नुसते पोटास खायास घातल्यानें सगळा दिवस खपत. आणि असें काम मागणारे हजारो येऊन पडत. यामुळेंच हा बांध बांधायास इतकें थोडें द्रव्य लागलें. सध्याचा काळ असता तर हें काम लाख दीड लाख रुपयांनीं आटोपलें नसतें. असें सांगतात कीं, या दुष्काळाच्या वेळीं कित्येक परोपकारी पारशी गृहस्थांनीं बंगालेंतून हजारो खंडी तांदूळ आणून गरीब लोकांस धर्म केला. आणि त्यांचीं हीं सत्कर्मेंच त्यांस आज फळास आलीं. दादीशेट नांवाच्या एका पारशी गृहस्थानें या वेळीं अन्नदानाचें फारच श्रय घेतलें असें एका एथील वृद्ध भंडाऱ्यानें सांगितलें.

महालक्ष्मीच्या उत्तरेकडे वरळी आहे. हा एक लहानसा डोंगरी गांव आहे. शेवटास टेंकडी आहे तिजवर किल्ला आहे. एथें कोळी, वाडवळ, सुतार, पांचकळशी, भंडारी व किरिस्तांव लोकांची वस्ती आहे. वरळींत सुमारें लहान मोठीं मिळून तीनशें चारशें घरें आहेत. व अलीकडे कित्येक साहेब लोकांचे व दुसऱ्या लोकांचे बाग व बंगले झाले आहेत. तेथें श्रीमान् लोक जाऊन राहतात. वरल्या पाखाडींत किल्ल्याच्या खालीं सगळी कोळयांची वस्ती. वरची पाखाडी, मधली पाखाडी आणि खालची पाखाडी असे हिचे तीन भाग आहेत. मधल्या पाखाडीस शंभू महादेव पाखाडी असें ह्मणतात. हें लहान गांव असून वस्ती बहुधा गरीब. एथें कोळी लोक कांहीं सधन आहेत. व मासळीचा कारखाना पुष्कळ आहे. वरळींत हिंदू लोकांचीं दोनतीन देवालयें आहेत. हल्लीं एथें इंग्रज लोकांची वस्ती होत चालली असून फळफळोरा बराच उत्पन्न होतो. वरळी पासून माहीम एक कोशाच्या अंतरावर आहे. आणि माहिमाहून शींव सुमारें दीड कोश आहे.

शहराच्या पश्चिमेस कांपाच्या मैदानाच्या शेजारीं समुद्र किनाऱ्यावर हिंदू, मुसलमान, व इंग्रज लोकांच्या स्मशानभूमि आहेत, त्यांस सोनापूर असें ह्मणतात. ह्या शिवाय पोर्टुगीझ् लोकांच्या स्मशानभूमि निरनिराळ्या चारपांच आहेत. द्रव्यवान् पोर्टुगीझ् व इंग्रज मरण पावले असतां त्यांस देवळांत पुरतात. त्याप्रमाणें तशा लोकांस मूठमातीचा संस्कार कोटांतील मोठ्या देवळांत होतो. या देवळांत भिंतींत, उमऱ्याच्या आंत, जमिनींत, जिकडे तिकडे नामांकित पुरुषांच्या सुंदर

कबरी बांधिल्या आहेत, व त्यांवर त्यांचीं नांवें व कीर्ति वर्णन केलेल्या अशा कबरी आहेत, त्याचप्रमाणें देवळाच्या वाड्यांत सर्व ठिकाणीं अनेक कामदार लोकांच्या कबरी बांधिल्या आहेत. या देवळांत प्रेतें पुरण्यास पुष्कळ द्रव्य द्यावें पडतें.

पारशी लोकांची स्मशानभूमि बाबुलनाथाच्या शेजारीं डोंगरावर आहे. या लोकांत प्रेतास दहन करीत नाहींत, व पुरीतही नाहींत. त्यांनीं प्रेतांस टाकायास हजारो रुपये खर्चून याठिकाणीं मोठ्या विस्तीर्ण विहिरी बांधिल्या आहेत. त्यांत जागोजागीं मोठ्या शिळा रचिल्या आहेत, त्यांवर प्रेतास नेऊन ठेवितात. तेथें गीध व दुसरे मांसाहारी पक्षी त्यांचा शेवट करितात. या विहिरीस ते लोक " दोखमा " असें ह्मणतात. असे दोखमे बाबुलनाथाच्या डोंगरावर पांच आहेत. हे लोक याठिकाणीं दुसऱ्या जातीच्या लोकांस जाऊं देत नाहींत.

जगन्नाथ शंकरशेटीच्या घरामागें सोनापुरालगत इंग्रज लोकांची एक स्मशानभूमि आहे. दुसरी मरीन पलटणीच्या मागें आहे. ह्या जागा स्वच्छ असून एकांत ठिकाणीं आहेत. एथें अनेक जातीचीं थडगीं बांधिलेलीं आहेत. कोठें त्रिकोणी, कोठें चौकोनी अशा अनेक तऱ्हेच्या कबरी बांधिल्या आहेत. त्यांवर मृत पुरुषांचीं नांवें लिहून त्यांच्या वर्तणुकीचा उल्लेख केला आहे. हेंही स्थळ पाहाण्याजोगें आहे. एथें आजपर्यंत इंग्रज कोण कोण देवाज्ञा पावले व त्यांचें आचरण कसें काय होतें, हें सर्व समजतें. हें स्थळ पाहून मनुष्यास आत्मबोध होऊन आपण ह्या जगांत केवळ प्रवासी आहे आणि आजपर्यंत जे मोठे मोठे होऊन गेले त्याच मार्गानें आपणासही जायाचें आहे, असें क्षणभर तरी मनांत येतें. हें केवळ स्मशान वैराग्य आहे खरें, परंतु जे लोक नेहमी ख्यालीखुशालींत निमग्न असतात, त्यांनींतर अशा ठिकाणीं जाऊन थडग्यांवरील लेख वाचून पाहावे आणि त्यांचें मनन करावें. हारवी नांवाच्या एका प्रख्यात इंग्रज कवीनें " शवगर्तेचें चिंतन " या नांवाचा एक सुबोध मोठा ग्रंथ रचिला आहे. तो वाचून पाहिल्यानें अशा स्थानांत गेल्यानें काय ज्ञानप्राप्ति होते, ती लक्षांत येईल.

मुंबईत दरमहा सुमारें दोन हजार मनुष्यांस देवाज्ञा होती, व सुमारें तेवढेच जन्मतात.

# प्रकरण ५.

मुख्य मोठया व दुसऱ्या किल्ल्यांची बांधणी-गोदी व जहाजें बांधण्याचें काम-न्यायखात्याची सुरवात-वलंदेजी लोकांच्या सरदाराचें अरमार व मुंबई घेण्याची मसलत-किगवुइन याचा दंगा-लष्करी खातें-लष्कराची संख्या-शहर वसविण्याविषयींच्या अडचणी-याकुत-खानाची स्वारी-मुंबई इंग्रज सरकाराची हिंदुस्थानांत मुख्य राजधानी केली-टंकसाळ-घरावरील छाप्याची सुरवात-पूर्वींच्या सरकारी कामगारांचा मुशारा-कांपावरील वस्ती-तिजोरीच्या नोटी-इंग्रज आणि पोर्टु-गीझ् लोकांचें वैमनस्य-कुलाबदांडी-बंदु-कीच्या दारूचा कारखाना.

एकादें चिरकाळ रहाण्याजोगें व त्यापासून महत् उपयोग घडून उदयास येण्याजोगें कृत्य करण्यास मनुष्य दूरदृष्टि, विचारी आणि धैर्यवान् पाहिजे. मुंबईची प्रथमची स्थिति पाहून जे एथें येत त्यांचा केवळ हिरमोड होई. कारण हें बेट लहान असून सर्व प्रकारच्या अडचणींची खाण होतें. ही आंतली स्थिति. दुसरें बाहेरून चोंहीकडून शत्रूंनीं घेरलेलें. व्यापारी तर रात्रंदिवस हातांत जीव घेऊन होते. कारण आंग्रा, हपशी हे कधींकधीं बंदरांतील जहाजें देखील धरून नेत. पोर्टुगीझ् तर यांचें उणें पाहायास दीड पायावर उभे होतेच. यास्तव कोर्ट आफ् डैरेक्टर्स या प्रीत्यर्थ द्रव्य खर्च करण्यांत मन घालीत नसत. तथापि सर जाशुआ चैल्ड यांनीं मनावर घेऊन अनेक अडचणी असतांही किल्ला बांधण्याचें काम सुरू करविलें. वस्तुतः येणेंकरूनच हें बेट पुढें उदयास आलें. जरी त्यांच्या कारकिर्दींत किल्ल्याचें सर्व काम सिद्धीस गेलें नाहीं, तरी यांनीं तो क्रम चालू करविल्यामुळें पुढें हें काम पार पडलें. सर जाशुआ चैल्ड हे कोर्ट आफ् डैरेक्टर्सचे मुख्य कारभारी असून हिंदुस्थानांतील त्या वेळच्या वखारदारांवर गव्हर्नर होते.

हे व्यवहारदक्ष व व्यापारांत मोठे चाणाक्ष होते, सबब त्यांच्या आग्रहामुळें या किल्ल्याचें काम सुरू केलें.

कानोजी आंग्रा, हपशी व मराठे यांजकडून एथें फार उपद्रव होत असे, म्हणून इंग्लंडाहून कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांनीं सन १७१०त असा हुकूम पाठविला कीं, किल्ल्याच्या आसपास अर्धकोशाच्या अंतरावर जीं झाडें व माड असतील ते सर्व कापून टाकावे व किल्ला मजबूत बांधून सर्व बंदोबस्त ठेवावा. आणि किल्ल्यांतील रहवाशांकडून भुंयभाड्याबद्दल जाजती कर घ्यावा. किल्ल्याचा खर्च पुरा पडायासाठीं शहरांतील व्यापारी व दुसऱ्या लोकांनीं सरकारास अर्ज केला कीं, जो माल शहरांत येईल त्यावर दोन टक्के जाजती जकात घ्यावी. चांचे लोकांकडून जहाजांस उपद्रव होऊं नये म्हणून बंदरांत नेहमी एक मनवार ठेविला होता, तो रात्रंदिवस या इतक्या आखातांत फिरत असे. सन १७१६ त मुंबईंतील लष्करी खात्यावरील पोर्टुगीझ् अंमलदारांनीं किल्ल्याच्या रक्षणार्थ प्रतिवर्षीं १५ हजार असुरप्या म्हणजे सुमारें साडेसात हजार रुपये देण्याचें कबूल केलें. हे पोर्टुगीझ् लोक एथें जहागिरदारांसारिखे होते. व त्यांकडे दुसरें हें काम होतें कीं, जी कोणाची वारशावांचून जिनगी असेल तिचें व अनाथ मुलांचें त्यांनीं रक्षण करावें. त्या पोर्टुगीझ् लोकांस व्यारीयादोर्स असें म्हणत. ज्या वेळीं किल्ल्याच्या तटाभोंवतालीं चर खणले त्यावेळीं मुंबईंतील रयतेनें सरकारास तीस हजार रुपये आपसांत वर्गणी जमवून दिले. आणि तेव्हांपासून मुंबईंतील लोकांनीं लष्करी काम शिकावें असा जो कायदा होता त्यापासून त्यांस मुक्त केलें. हे त्या वेळचे तीस हजार रुपये इंग्रज सरकारास तीस लक्षांपेक्षां जाजती होते. हे चर खणायास शेंकडो लोक लागले होते. पलटणीच्या शिपायांनीं देखील ह्या कामास लागावें असा हुकूम केला होता. आणि हे शिपाई लोक कुदळ आणि पिकाव हातीं घेऊन चार पांचतास पर्यंत हें काम करीत. आणि काम पडलें ह्मणजे कपडे घालून शिपाई बनत.

किल्ल्याचा संपूर्ण तट व पालेगेटचा दरवाजा बांधून सन १७१६ माहे जून १ रोजीं चार्लस बून याच्या कारकिर्दींत तयार झाला, असें पालेगेटच्या दरवाज्याच्या भिंतींत लाद्दी आहे तीवर लिहिलें आहे. सन १६६९ पासून इंग्रजलोक या किल्ल्याच्या मागें लागले होते, आणि सरासरी ४७ वर्षांच्या मुदतींत हा सर्व त्यांच्या मनाजोगता झाला. पूर्वींचा किल्ला साधारण होता. त्या भोंवतालीं

चर खणण्यास व कांपाचें मैदान तयार करण्यास फार खर्च पडला. हें काम सन १७५३ त सुरू झालें. कांपाच्या मैदानांत पूर्वीं मुंबईंतील सर्व श्रीमान् व बडे लोक राहत होते. त्यांचीं घरें, वाडे, बाग, बंगले, देवळें, मशिदी, हीं सर्व इतक्या जाग्यांत होतीं, तीं बराबर दाम देऊन खरीद करून मोडिलीं. यामुळें द्रव्य फारच खर्च झालें. असें सांगतात कीं, कांपाच्या मैदानाची जमीन १०० हात औरस चौरस तयार करण्यास सरकारास सुमारें तीस हजार रुपये खर्च बसला. या मानानें सर्व कांपाच्या मैदानाबद्दलच सरकारास किती द्रव्य लागलें तें ध्यानांत येईल. सन १८३८ पासून १८६० इतक्या काळांत किल्ल्याचे तीनही जुने दरवाजे मोडून विस्तीर्ण केले. त्या प्रीत्यर्थ सरकारास तीन चार लक्ष रुपये खर्च बसला. हे सर्व किल्ले व हें कांपाचें मैदान मिळून सरकारास एक कोट रुपया खर्च झाला.

सन १६७० मध्यें मुंबईचा मुख्य किल्ला, व माजगांव, शिवरी, शींव, माहीम, आणि वरळी, एथें लहान लहान साधारण प्रतीचे किल्ले बांधून शहराचा जिकडे तिकडे बंदोबस्त केला.

सर जार्ज आक्झेंडन याच्या कारकिर्दींत इसवी सन १६७० मध्यें कंपनी सरकारानें तारवें बांधण्याची गोदी बांधिली. यापूर्वीं जेव्हां इंग्रज व्यापारीलोकांस तारवें बांधण्याची गरज पडे तेव्हां पोर्टुगीझ् लोकांच्या दरबारांत वसई व दमण, एथें तीं बांधण्याची परमाणगी घ्यावीपडे. सन १६३६ त दमण एथें दोन व वसई एथें दोन अशीं चार लहान जहाजें बांधण्यास पोर्टुगीझ् सरकारच्या मुख्या-कडून हुकूम घेतला होता. यामुळेंच गोदीचें काम प्रथम सुरू करणें त्यांस भाग पडलें.

ह्याचवर्षीं कंपनीसरकारानें लंडन शहराहून मिस्तर वार्डविक् पिट नांवाच्या एका इंग्रज इंजनरास पाठवून दिला. यानें कांहीं तारवें तयार केलीं. पुढें सन १७३५ मध्यें हें काम शेट लवजी नसरवानजी वाडिया याजकडे सोंपिलें. हे प्रख्यात पारशी गृहस्थ प्रथम सुरत एथें कंपनीच्या खात्यांत लहानसान जहाजें बांधीत असत. ह्या नामांकित पुरुषानें ह्या कामांत मोठी हुशारी व प्रमाणिकपणा दाखविला व पुष्कळ तिर्कटी तारवें बांधिलीं. हें काम अद्याप त्याचे घराण्यांतच चाललें आहे. ह्या वेळीं ही गोदी लहान होती. मग कांहीं वर्षांनीं वाढवून मोठी केली. ह्या गोदींत १८१० मध्यें मियानी नांवाचें एक मोठें तिर्कटी लढाऊ

जहाज बांधिलें होतें, त्याजवर ७४ तोफा राहत. तें बांधायास दहावर्षे लागलीं. व त्यास सात लक्ष रुपये खर्च झाला. दुसरीं जमना आणि नर्मदा अशीं दोन लढाऊ तारवें बांधिलीं गेलीं. आणि हीं कोणी इंग्रजांच्या मदतीशिवाय ह्या पारशी गृहस्थानें बांधिलीं. या जहाजांची रचना अशी असते कीं, त्यां पुढें औरंगजेबाच्या तंबूचा थाट किंवा मयासुरानें रचलेली सभा कांहींच नाहीं. आंत अनेक तऱ्हेच्या खोल्या, त्यांत छप्परपलंग, खुरच्या, कोची, हांड्या, झुंबर, आणि कपाटें, असतात. दोनतीन वर्षांमागें अमेरिकेहून मेनसोटा नांवाचें एक मोठें जहाज एथें आलें होतें. तें पांच मजली असून त्यांतील रचना राजवाडयापेक्षांही शतगुणित विशेष होती. त्यांत पुस्तकालयादि सर्व सरंजाम होता. यावर साठ सत्तर मोठ्या तोफा होत्या. हें पाहायास हजारो लोक जात होते. असें एक दुसरें कांहीं वर्षांमागें आलें होतें, त्यास आंतून सोन्याचा मुलामा काढला होता, त्याची राणीस भेट पाठविली होती.

मुंबईंत आजपर्यंत सरकार खात्याचीं ५३ आणि सावकार लोकांचीं ८२ इतकीं जहाजें बांधिलीं. ह्या कारखान्यांत हल्लीं वाफेचीं यंत्रें चालू केलीं आहेत, त्यांची शक्ति अशी आहे. एक वीस घोड्यांच्या, दुसरें १० घोडयांच्या जोरानें चालणारें. ह्याच्या योगानें लांकडें वेरितात. व दुसरें पितळी व लोखंडी सामान, खिळे, चुका, स्क्रू वगैरे या यंत्रांवरूनच तयार करितात. या कारखान्यांत जाऊन क्षणभर उभें रहावें म्हणजे जिकडे तिकडे यंत्रें चालतात व कारागीर आणि मजूर लोक मोठ्या धामधुमींत आहेत असें दृष्टीस पडतें. टण् टण्, खाट् खाट्, ठाक् ठोक्, घरघर, असे अनेक ध्वनि कानांत पडतात. ही गोदी १८१६ मध्यें वाढवून हिला त्यावेळचे गव्हर्नर यांचें नांव दिलें, म्हणून हीस डंकन गोदी असें म्हणतात. ही बांधायास १४ लक्ष रुपये खर्च झाला. ही फिरून सन १८४५त आणि १८५२त वाढविली.

सन १८४३ मध्यें सरकाराच्या हुकुमानें आगामहंमद रहीम या नांवाच्या एका प्रख्यात सधन मोंगलानें माजगांवच्या बंदरांत आठ नऊ लक्ष रुपये खर्चून गोदी बांधिली. ही तयार होण्यास पांच सहा वर्षें लागलीं. या खाडींत पाणी पुष्कळ असल्यामुळें तें आटवून त्याठिकाणीं गोदी बांधणें म्हटलें म्हणजे मोठेंच काम. असेंही असतां या गृहस्थानें मोठें धैर्य धरून तें सिद्धीस नेलें. या ठिकाणीं सुंदर बंगला आहे, त्यांत हपिस आहे. बाजूस वखार व अनेक तऱ्हेचीं यंत्रें ठेव-

ण्याची जागा आहे. ही जागा चांगली हवाशीर आहे. कांहीं वर्षांमागें या गोदींत एक आगबोट बांधून तयार केली होती, परंतु अलीकडे एथें तारवें व आगबोटी बांधीत नाहींत. " पेनिन्सुलर आणि ओरिएंटल स्टीम न्याव्हिगेशन कंपनी " नांवाची जी एक इंग्लंड देशांत मोठी मंडळी आहे, ती मुंबई, कलकत्ता, चीन, आस्ट्रेलिया इत्यादि देशांत आगबोटी पाठवीत असते. ह्यांच्या सुमारें १०० आगबोटी आहेत. यांचें हपिस मुंबईमध्यें सन १८४३त स्थापिलें, तेव्हांपासून मुंबई सरकारानें युरोप खंडांत सरकारी टपालाचे कागद व उतारू नेण्यास व आणण्यास यांच्या आगबोटी नोरी घेतल्या आहेत. व यांचे लाखो रुपयांचे कारखाने चालले आहेत. या मंडळीनें ही गोदी सालिना वीस हजार रुपये देण्याचें करून मालकाकडून भाडयानें घेतली आहे. यांत या मंडळीच्या आगबोटी नीट करितात.

सन १८६२त अशी अवाई उठली होती कीं, किल्ल्यांतील सरकारी गोदी व तेथील सर्व कारखाना एक कोटी पन्नास लक्ष रुपयांस सरकार विकीत आहे. परंतु सरकार एकाएकीं असें करणार नाहीं असें वाटतें. कारण सरकारी खात्यांत ४९ आगबोटी आहेत. या शिवाय दुसरीं जहाजें. यांस जडजोखीम जहालें असतां आश्रय तर पाहिजे; परंतु जहाजांचें व आगबोटींचें खातेंच सरकारांतून बिलकुल काढून टाकावें असा मुख्य सरकाराचा मनसुबा आहे, असा कागदोपत्रीं गवगवा चालला आहे यावरून काय तें समजत नाहीं. या खात्यास इंडियन् नेव्ही म्हणतात.

सन १६७० मध्यें कंपनी सरकारानें ह्या टापूंत न्याय मनसुबी करण्याचें खातें सुरू केलें. ह्यावेळीं जें कोडत स्थापिलें होतें त्यांत डेपुटी गव्हर्नर आणि कौन्सलदार मिळून मुख्य न्यायाधिशाचें काम करीत. साधारण मुकदम्यांचे निवाडे करण्यास फ्याक्टरींतील एक इंग्रज आणि एतद्देशीय लोकांमधील एक गृहस्थ न्यायाधिशाच्या कामावर नेमीत असत. तेच बहुधा सर्व खटल्यांचा निवाडा करीत. ही एक आनंदाची गोष्ट आहे कीं, दोनशें वर्षांमागें एतद्देशीय लोकांपैकीं मुंबईंतील कोडतांतील न्यायाधिशाच्या कामावर एका असामीस नेमीत. पुढें सन १६७१त इंग्रजी न्यायशास्त्र पढलेला एक न्यायाधीश मुंबईस पाठवावा असा एथील गव्हर्नरानें कंपनी सरकारास इंग्लंडांत अर्ज पाठविला, तो कबूल केला नाहीं. त्यास अशी सबब सांगितली कीं, मुंबई बेट घेतल्यापासून कंपनीस सुमारें

तीस लक्ष रुपयांचा तोटा सोसावा पडला. त्यावेळीं हें बेट केवळ निरुपयोगी आणि नुकसानी आणणारें आहे, असें ते मानीत. आणि याची सुधारणूक करण्यास झटत नसत. शेवटीं मोठ्या संकटानें सन १६८३त आगष्ट महिन्याच्या ९ व्या तारिखेस इंग्लंडाहून सेंट जान नांवाचा एक न्यायाधीश पाठवून दिला. त्याला सरकारांतून दोन चाकर द्यावे, व त्यानें डेपुटी गव्हर्नराच्या पंक्तीस जेवावें, आणि सालिना दोन हजार रुपये वेतन घ्यावें असें ठरविलें होतें. परंतु हा लष्करी व जहाजांवरील कामगारांच्या खटल्यांचा मात्र तपास करी. सन १७२८ फेब्रुवारी महिन्याच्या १० व्या तारिखेस इंग्लंडांतील मुख्य सरकाराच्या हुकुमानें एथें मेयर्स कोर्ट नांवाचें न्यायस्थान स्थापिलें. यांत एक न्यायाधीश व नऊ असामी पंच मिळून न्याय करीत. यावर जो मुख्य न्यायाधीश नेमिला होता त्यास सालिना ६२५ रुपये ठरविला होता. ह्याचा अधिकार मुनसफा सारिखा असे, परंतु या कोडतांत साधारण फौजदारी व दिवाणी खटल्यांचा निकाल होई. यावर वरिष्ठ कोडत ह्मटलें ह्मणजे गव्हर्नर आणि कौन्सल. हें कोडत स्थापण्याचा हुकूम आला तेव्हां मुंबईतील सर्व रयत व महाजन लोक पालो बंदरावर जमले होते, तेथें हा हुकूम गव्हर्नर यांनीं वाचून दाखविला.

पुष्कळ काळ पर्यंत ह्मणजे सुप्रीमकोर्टाची स्थापना होई पर्यंत कोणत्याही खटल्याचा निकाल बहुधा न्यायी जनांच्या खातरी जोगा होत नसे. कंपनीचे कामगार तेच न्यायाधीश, आणि जर त्यांनी कोणावर फौजदारी खटला उभारला असला तर त्याचा तपास त्यांच्याच हातानें होई. यांस नवीनच राज्य प्राप्त झालें होतें, आणि राज्यांतील नियम वगैरे बराबर चालू झाले नव्हते. मग अशी गोष्ट घडून येई कीं, वादीच न्यायासनावर बसून प्रतिवाद्याचा खटला तपाशी. मग एकाद्या समयीं मुकदम्यांत साक्षी पुरावा बराबर नसला आणि न्यायाधिशाच्या मनांत प्रतिवाद्यास अपराधी ठरवायाचें असलें तर भलतेंच किल्मिष काढून त्यास शिक्षा करीत. या प्रकारचा न्याय पूर्वीं सर्व हिंदुस्थानभर पसरला होता. आणि कंपनीचें एथें तर नवीनच राज्य सुरू झालें होतें. राज्यक्रांति झाली ह्मणजे राज्याचा बराबर ताळा बसायास पुष्कळ वर्षें लागतात. आणि कांहीं काळपर्यंत अव्यवस्था चालत असत्ये. खातरीप्रमाणें न्यायमनसुबी होण्याजोगीं न्यायस्थानें स्थापण्यास कंपनीस पुष्कळ काळ लागला. इंग्रज लोक एतद्देशीय लोकांचाच इनसाफ या रीतीनें करीत होते, आणि आपल्या लोकांचा पक्षपात धरीत होते असें

नाहीं. त्यावेळीं ते बहुधा इंग्रज आणि यादेशाच्या लोकांचा न्याय सारखाच करीत. आणि आतां पेक्षां एतद्देशीय लोकांशीं सलुकाईनें वागत. त्यावेळीं त्यांच्या लोकांत आपसांतच फार तंटेबखेडे होत. हा त्यांजकडे दोष नाहीं. त्या काळाचा महिमा तसाच होता. इंग्रज इतिहासकर्ते त्या वेळच्या वहिवाटीस फारच दूषणें देतात. एकादा गुन्हेगार व त्याच्या तर्फेचा साक्षी गुन्हा कबूल होत नसल्यास त्याच्या शरीरास इजा देऊन त्याजकडून आपणास पाहिजे तशी जबानी घेऊन त्याजवर गुन्हा शाबूत करीत. परंतु इंग्लंड देशांत मात्र पुष्कळ वर्षांपासून ही चाल दोषार्ह आहे असें समजून काढून टाकिली होती. ह्यावेळीं मुंबईत तर्कटी लोक फार असत. व एकमेकांचा उत्साह सहन होत नसल्यामुळें एकाद्यावर भलतेंच कुभांड रचून त्याचा नाश करीत. रक्षण करण्यास कायदे, तक्रार करण्यास वकील व बारिस्टर व वर्तमानपत्रें नसल्यामुळें एकादा गरीब बेहकनाक बुडला जाई. ह्यावेळीं फौजदारी खटल्यांचे फैसले झाले त्या पैकीं, कांहीं मुकदम्यांचे मासले सरकारी दप्तरावरून इंग्रजी इतिहासांत घेतले आहेत. त्यांतील हा पुढील मजकूर आहे.

सन १७२० मार्च महिन्याची २४ तारीख या दिवशीं एक मोठा चमत्कारिक फौजदारी मुकदमा कौन्सला पुढें तपासण्यांत आला. त्यामुळें मुंबईत मोठा गवगवा झाला.

रामाजी कामत ह्मणून एक संभावित गृहस्थ इंग्रजांच्या पदरीं पुष्कळ वर्षांपासून विश्वासू व प्रमाणिक कामगार होता. हा एतद्देशीय लोकांच्या लष्करावर मुख्य सरदार असून इंग्रजांच्या तर्फेनें कानोजी आंग्रा व दुसरे कानेरीहुनेरी, उरण, घारापुरी एथें जहाजें धरून नेण्यास येत, त्यांजवर स्वारी करी. असा हा हुशार व पराक्रमी होता. परंतु काळाची गति फिरली ह्मणजे सर्व प्रतिकूळ होतें. आणि राजाचा रंक होतो. मुंबईमध्यें याची स्थावर जिनगी व द्रव्यही पुष्कळ असून अधिकारही बराच होता. सबब याचें अनहित पाहणारेही लोक होते. त्यांनीं तर्कट रचून यास कचाटांत आणिलें. असें इतिहासकर्ते स्पष्ट ह्मणतात.

यावर फितुरीचा वहमा आणून मुकदमा चालू केला. त्याजवर आरोप आणिले ते येणें प्रमाणें.

१. रामाजी कामत यांनीं कानोजी आंग्रा यास सन १७१७ डिसेंबरांत असें पत्र लिहून पाठविलें कीं, इंग्रज लोकांचें " सकसेस " नांवाचें जहाज जें धरून नेलें आहे तें पुष्कळ द्रव्य घेतल्या शिवाय त्यांस परत देऊं नये.

२. सन १७१८ अक्टोबरांत असें लिहून पाठविलें कीं, इंग्रज लोकांचा कानेरीवर हल्ला करायाचा मनसुबा आहे तर आपण सावध असावें. आणि सैन्याची वगैरे तयारी करून बंदोबस्तानें रहावें.

३. ह्याच वर्षी पोर्टुगीझ् सरदारानें मुंबईच्या गव्हर्नरास पत्र पाठविलें होतें, तें रामाजी कामत यांनीं अडकावून ठेविलें. ज्या पत्रांत फिरंग्यानें आंग्र्याबरोबर लढाई करण्यास इंग्रज लोकांस कुमक करण्यास येण्याचें दर्शविलें होतें.

४. रामाजी कामत यानें मुंबईवर हल्ला करण्यासाठीं मुंबईचा भेद काढून कानोजी यास पाठविला.

५. यानें आंग्र्या बरोबर अंतर्स्थी व्यापार चालविला.

६. जे काळे लोक ह्याच्या हाताखालीं होते त्यांस आंग्र्या बराबर लढूं नये ह्मणून दहशत घालून त्यांचा हिरमोड केला.

७. हें आपण केलेलें कर्म उघडकीस आलें असतां त्याचा परिणाम् भयंकर होईल असें मनांत आणून यानें आपल्या खासगीनाण्याच्या चौदा पेटया व दुसरी मालमत्ता ठाणें व दुसऱ्या ठिकाणीं पळविली. — हे इतके आरोप याजवर आणिले होते. या मुकदम्याचा तपास सुरू झाला त्यावेळीं गव्हर्नर मिस्तर बून व दुसरे कौन्सलदार बसून याचा तपास चालविला. प्रथम रामाजी कामत यास असें सांगितलें.

हे सात आरोप जे तुजवर आणिले आहेत ते साक्षी मुद्यानिशीं व जें पत्र तूं कानोजी आंग्रा यास पाठविलें होतें तें हजर असल्यानें तुजवर हा गुन्हा शाबूत होतो, असें सांगून याचा तपास चालविला. हा मुकदमा पुष्कळ दिवस चालला होता. आणि हा गुन्हा याजवर ठरवावा ह्मणून पुष्कळ प्रयत्न केला, तथापि त्यावर फितुरीच्या अपराधाचा पुरावा झाला नाहीं. शेवटीं कौन्सलानें असें ठरविलें कीं, हा कांहीं वाईट कृत्य केल्याचा अपराधी आहे सबब यास कैद करावा. असें ठरवून त्यास कैदेंत ठेविला. आणि त्याची मालमत्ता जप्त करून सरकारांत नेली.

पुढें कांहीं वर्षांनीं रामाजी कामत कैदेंतच मरण पावले. परंतु मरणाच्यापूर्वी यांनीं आपला इनसाफ यथान्याय व्हावा ह्मणून इंग्लंडांत नामदार कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांस अर्ज केला होता, पण त्याचा त्यांस जबाब आला नाहीं.

पुढें कांहीं वर्षांनीं जेव्हां दुसरे गव्हर्नर आले तेव्हां त्यांच्या दृष्टीस असें आलें कीं, कामत मजकूर यांजवर हें कोणी तर्कट रचिलें होतें. आणि आंग्र्यास जें त्यांच्या शिक्याचें पत्र पाठविलें ह्मणून ठरविलें होतें तें कोणी दुष्टानें बनावट केलें होतें, अशी त्यांच्या मनाची खातरी झाली, व त्यांनीं एथील लोकांपाशीं शोध केल्या अंतीं असेंच सिद्ध झालें. तेव्हां त्यांनीं कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांस असें लिहून पाठविलें "जरी त्यावेळचें कौन्सल व त्यांचे मुख्य यांस त्यावेळीं जें योग्य वाटलें त्याप्रमाणें केलें, तथापि आमच्या लोकांच्या सांगण्यावरून व मुंबईंतील लोकांच्या बोलण्यावरून रामाजीचा करडा इनसाफ झाला. नंतर कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांच्या हुकुमावरून सरकारांतून त्यांच्या कुटुंबाचें संरक्षण करण्याकरितां त्यांच्या मुलास कांहीं वर्षासन करून दिलें. आणि जरी कांहीं सबबीमुळें त्यांची स्थावर जिनगी त्यांस परत दिली नाहीं तरी त्यास चारहजार रुपये बक्षीस दिले. रामाजी कामत यांवर हा आरोप आणिला त्यास पोर्टुगीझ् सरदार मिलाफी होता असें ह्मणतात. तें कांहीं असो, पण त्यावेळीं न्यायाची व्यवस्था नीट नसल्यामुळें असे भयंकर परिणाम घडून येत. हल्लीं इंग्रजी न्यायासारिखा न्याय कोठें पृथ्वीवर नाहीं. याचें कारण सुप्रीमकोर्ट व त्याचे कायदे. हल्लीं अपराध्याचा यथान्याय इनसाफ करण्यास न्यायाधीश किती जपत आहेत. आणि एकादा गरीब कंगाल असला तरी त्याचें रक्षण करण्याचीं साधनें किती करून ठेविलीं आहेत. गरिबास द्रव्य खर्चून वकील बारिस्टर करायास सामर्थ्य नसलें तर त्याच्या तर्फेनें भांडणारे सरकारी धर्माचे वकील आहेत. मुफाशील कोर्टांतही कोणावर खटला आला तर त्याचा तपास प्रथम माजिस्त्रेटापाशीं होतो. मग तो सेशन जडजाजवळ पंचांच्या समक्ष तपासला जातो. आणि मग सदरअदालतींत मोठ्या न्यायाधिशापाशीं त्याचा निकाल होतो. असा बंदोबस्त असल्यामुळें बहुधा यथान्याय इनसाफ होतो.

सन १८४० सांत अलुपारु यावर मोठा आरोप आल्यावरून त्यास काळ्या पाण्याची टेप दिली. आणि सरकारानें त्याची स्थावर मिळकत वगैरे सर्व जप्त केली. त्याच्या मुलानें इंग्लंड सरकारांत अर्ज केला कीं, तुह्मी माझ्या बापास शासन करून जन्मटेप दिली, त्या अर्थीं त्याची मालमत्ता मला त्याच्या वारसास द्यावी. अगर त्याची सर्व जिनगी सरकारानें जप्त करून न्यावी आणि माझ्या

बापास सोडून द्यावें, या न्यायावर लढून त्यास त्याची जिनगी परत मिळाली. हा न्याय किती सुगम, आणि हा इंग्रज सरकाराचा कायदा किती स्तुत्य !

दुसरा यावेळचा एक विलक्षण न्यायाचा मासला अढळला तो तसा. एके दिवशीं संध्याकाळीं मिस्तर ब्राडील कौन्सलर आणि त्याची स्त्री हीं दोघंजणें फिरायास निघालीं, तेव्हां कोणी एक घोडेस्वार त्यांच्या आंगावरून सपाट्यानें गेला तेव्हां मिस्तर ब्राडील त्यास लागून बोलले. त्यावेळीं तो स्वार ह्मणाला " जर ह्यावेळीं मजपाशीं बंदूक असती तर तुला मजा दाखविली असती " ब्राडील त्यास ह्मणाला " खरेंचकाय ? " स्वार ह्मणाला " संशय कशाला. " असें ह्मणून तो चालता झाला. दुसऱ्या दिवशीं यास शासन करायाचें, परंतु तो कोण आणि कोठें राहतो हें कोणास माहीत? तेव्हां म्याथ्यू बोगल या नांवाच्या कोणी मनुष्यावर वहमा आणून त्याजवर हा खटला उभारिला. आतां पाहा ! वादी तोच न्यायाधीश ! मग गरीब बिचाऱ्या प्रतिवाद्यानें आपला निर्दोषीपणा कसा शाबूत करावा ! मग अर्थातच हा खटला त्याजवर शाबूत होऊन त्यास भरबाजारांत खांबास बांधून एकुणचाळीस फटके मारावे आणि त्यानें बिन मुशारी कंपनीच्या जहाजावर गव्हर्नराची मर्जी असेल तितका काळ चाकरी करावी अशी त्याला शिक्षा झाली. " बळी तो कान पिळी " असेंच या वेळीं होतें.

ह्यावेळीं कोणत्या प्रकारचा बेबंदपणा चालला होता याचें दुसऱ्या एका गोष्टीवरून अनुमान करितां येईल. एक दिवस संध्याकाळच्या भोजन समारंभास रेवरेंड मिस्तर स्पेन्सर ( उपदेशक ) यास एका गृहस्थानें बोलाविलें, तेथें पुष्कळ मंडळी जमली होती, त्यांत एक तरुण गृहस्थ व उपवर झालेली अशी एक कन्या होती. त्यावेळीं त्या दोघांजणांची गांधर्व विवाह करण्याची इच्छा झाली. तेव्हां हे उपाध्यक्ष बावा जवळच होते, त्यांजपाशीं त्यांनीं विनंती केली कीं, आह्मा उभयतांचें लग्न लावून आह्मास दंपत्याचे अधिकारी करावें. हें ऐकून मिस्तर स्पेन्सर यांस स्वभावतः ही थट्टा असावी असें वाटलें. तथापि त्यांनीं त्यांस सांगितलें कीं, जर तुमची उभयतांची लग्न करण्यांची वास्तविक मर्जी आहे, तर उदईक मी तुमचें लग्न लावून देईन. परंतु तें त्यांस आवडलें नाहीं. आणि प्रातःकाळ होतांच त्या गृहस्थानें मिस्तर स्पेन्सर यावर उपाध्यक्षाच्या कामांत गफलत केल्याचा दोषारोप आणून त्यास गव्हर्नरापाशीं नेलें. नंतर त्याची चौकशी

झाली. पुढें त्याचा परिणाम कसा काय झाला तो समजला नाहीं. हा मजकूर मुंबईच्या गव्हर्नरानें सुरतेच्या अधिकाऱ्यास सन १६८६-८७ तारिख १५ जानेवारीचें पत्र पाठविलें होतें त्या वरून घेतला आहे.

रेवरेंड मिस्तर काब ज्यानें इतकी खटपट करून कोटांतील मोठें देऊळ बांधविलें, व इंग्रज लोकांच्या मुलांस शिकविण्याकरितां चारिटीस्कूल नांवाची धर्मशाळा उपस्थित केली, तो देखील ह्या न्यायाच्या झपाट्यांतून सुटला नाहीं. मग दुसऱ्यांची कथा काय ? यास असें कारण झालें कीं, हे मोठे स्पष्टवक्ते होते. आणि खिस्ती धर्माचे अभिमानी असून फारच कर्मठ असत. मिस्तर ब्राडील हे या वेळचे कौन्सलर होते. त्यांनीं अप्रील आणि मे महिन्यांत आपल्या बंगल्याचा जीर्णोद्धार करायास प्रारंभ केला असून बेधडक आदित्यवारीं देखील मजूर लोकांकडून बंगल्याचें काम करवून घेत. एक दिवस आदित्यवारीं मिस्तर काब हे ह्या गृहस्थाच्या घरीं गेले होते, त्यांनीं या बिगाऱ्यांची धामधूम पाहून खिस्ती शास्त्राविरुद्ध विश्रामवारीं लोकांकडून काम करवून घेतात ह्मणून मि. ब्राडील यास कांहीं लागून बोलले. तेव्हां ब्राडील यांनीं यांजजवळ क्षमा मागितली, आणि सांगितलें कीं, पर्जन्यकाळ जवळ आल्यामुळें आदित्यवारीं मनुष्यांस कामावर बलावण्याचें अगत्य पडलें. तथापि या धर्माभिमान्याची तृप्ति झाली नाहीं. त्यानें देवालयांत सर्व मंडळी देखत यांचा या सबबीवरून उपमर्द केला, आणि हा धर्मभ्रष्ट आहे असें कांहीं बोलला. या वरूनच व दुसऱ्या एकदोन अशाच सबबीं वरून कौन्सलांत याचा तपास होऊन ह्याला या कामावरून बरतर्फ केलें.

याचप्रमाणें एका भगतिणीचाही न्याय झाला. ह्या वेळीं एथें एक गरीब भगतीण रहात होती. ती कोणी आजारी मनुष्यास दोरा बांधी, तांदूळ मंत्रून खायास देई, व कोणास विभूत लावी. ह्यावरून तिजवर जादू केल्याचा आरोप आणून तारीख २४ जुलई १७२४ रोजीं तिचा सरकारानें इनसाफ करून असें ठरविलें कीं, हिनें जादू कोणाचा घात करण्यासाठीं केली नाहीं, तथापि हीस देवळासमोर खांबास बांधून अकरा फटके मारावे. त्याप्रमाणें तीस फटके मारून सोडून दिली. अणि असा हुकूम केला कीं, जे याप्रमाणें मंत्रोपचार करतील त्यांस असेंच देवळापुढें प्रायश्चित्त घ्यावें पडेल.

मिस्तर जेंकिन्सन नांवाचा एक इंग्रज गृहस्थ होता, त्याच्या कपाटांतून पंधरा गिनी* त्याच्या गुलामानें घोडेवाल्याच्या मसलतीनें चोरल्या, सबब त्या दोघांसही फांशीची शिक्षा ठरविली. त्याच वर्षी एका दुराचरणी स्त्रीनें जाराच्या शिकवणीनें आपल्या नवऱ्याचा खून करण्याची मसलत केल्याच्या तोहमतीवरून तीस जाळून टाकण्याची शिक्षा ठरविली.†

पाहा, हल्लींचे कायदे रयतेस किती कल्याणकारक आहेत! सन १८५५ त मुंबईतील सुप्रीमकोर्टांत एक मुकदमा तपासला गेला. त्यामुळें शहरांत मोठाच गवगवा झाला. याचें मूळ असें होतें. मिस्तर मिसन या नांवाच्या एका इंग्रजानें विठोबा मल्हारी नांवाच्या एका दर्ज्यास आपल्या चाकरींत ठेविलें होतें, परंतु त्याचा दरमहा त्यास बराबर न पोहंचल्यामुळें त्यानें त्याचें काम सोडिलें, आणि आपला तुंबलेला मुशारा द्यावा म्हणून तगादा लाविला. सबब मिस्तर मिसन यानें मेजर बेन्स ह्यावेळचे पोलिस मास्तर यांस लिहून पाठविलें कीं, दर्जी मजकूर हा आपल्यास न कळवितां चाकरी सोडून गेला, सबब त्यास कैद करून ह्या गुन्ह्या बाबत शासन करावें. त्या प्रमाणें पोलिस मास्तर यानें त्याच्या चिटीबरहुकूम त्यास एक रात्र कैद केलें, आणि दुसऱ्या दिवशीं वहिवाटी प्रमाणें सीनियर माजिस्त्रेट मिस्तर कारफिल्ड याजकडे पाठविलें. त्यालाही मिस्तर मिसन यानें पत्र लिहून पाठविलें कीं, विठोबा दर्जी मजकूर हा मला न सांगतां काम टाकून चाकरी सोडून गेला, सबब त्यास शिक्षा असावी. ह्या त्याच्या चिटीवरून मिस्तर कारफिल्ड यानें ह्या खटल्याचा बराबर तपास न करितां, विठोबा मल्हारी यावर धन्याचा हुकूम न घेतां घरचाकरी सोडल्याचा गुन्हा ठरवून, त्यास नव्या तुरुंगांत सक्त मजुरी निशीं २१ दिवस कैद करावें असें ठरवून तुरुंगांत पाठवून दिलें. पुढें ही कैद भोगून सुटून येतांच दर्जी मजकूर यानें सुप्रीमकोर्टांत सीनियर माजिस्त्रेट मिस्तर कारफिल्ड यावर आपणास बेहकनाक कैद करून सक्त मजुरीची सजा केल्याचा आरोप आणून आपल्या अब्रूचा जबाब द्यावा व जें नुकसान झालें त्या बद्दल ६०० रुपये द्यावे अशी फिर्याद केली. तिचा तपास

---

* साडेदहारुपयांची एक गिनी, इंग्रजीनाणें.

† सन १७२८ माहे फेब्रुवारी आणि जुलैच्या सरकारी दप्तरांतून घेतलें आहे.

सन १८५५ माहे जून १६ या दिवशी सुप्रीमकोर्टांत सर विलियम यार्डली मुख्य न्यायाधीश आणि सर चार्लस जाकसन धाकटे न्यायाधीश यांजपुढें तपासला गेला. ह्याचा तपास एक सारिखा सात दिवस पर्यंत चालला होता. ह्याचा फैसल्ला कसा काय होतो तो व उभय पक्षांचे वकील बारिस्टर तक्रारी घेऊन मोठ्या निकरानें भांडत, तें पाहायास इंग्रज कामगार व इतर गृहस्थ कोर्टांत जाऊन दिवसभर बसत. शेवटीं तारीख २५ या दिवशीं उभयतां न्यायाधिशांनीं या खटल्याचा निकाल करून असें ठरविलें कीं, मिस्तर कारफिल्ड यानें विठोबा मल्हारी शिंपी यास विनाकारण सजा केली हें गैरशिस्त केलें. सबब त्याच्या नुकसानी बाबद ५०१ रुपये दर्जी मजकूर यास द्यावे. मग मिस्तर कारफिल्ड यास सरकारानें या कामावरून दुसऱ्या खात्यावर नेमिलें. प्रस्तुत काळीं बहुधा असा निःपक्षपाती न्याय होत असतो.

रामाजी कामत यांनीं कानोजी आंग्र्यास पत्र पाठविलें ह्मणून सरकारांत हजर केलें होतें, त्याचें इंग्रजी भाषांतर एका पुस्तकांत होतें, त्याचें मराठी करून एथें छापिलें आहे. कानोजी सारिख्या मांडलिक राजास एवढ्या मोठ्या मान्याचें पत्र रामाजीनें लिहिलें ह्मटलें असतां विलक्षण वाटतें. आणि ह्या मध्यें एका ठिकाणीं सिनोर या शब्दाचा उपयोग केला आहे. या वरून थांत कोणी पोर्टुगीझ् गृहस्थाचें आंग होतें असें वाटतें. तें कांहीं असो, पण हें पत्र चमत्कारिक आहे ह्मणून इंग्रजी प्रमाणें एथें उतरून घेतलें आहे.

“ श्रीमंत रविप्रभ, शूर, विजयी, सार्वकाल धैर्यवान्, चतुर, उदार, दानशील, धृतिनग, तत्त्वज्ञानी, ब्राह्मण पालक, धर्मरक्षक, बहुयशस्वी, राजमान्य मुकुटमणी, सिनोर कानोजी आंग्रे सरखेल यांप्रती.

सेवक-रामाजी कामत आपल्या सेवेंत तत्पर असून सेवकाकडून लिहिण्यांत येतें. आपल्या कृपेकरून क्षेम असों विशेष. लिहावयास कारण, इकडील मजकूर आमचे जनरल यांनीं कौन्सलांत ठरविलें आहे कीं, हल्ला करून कानेरी घ्यावी. आणि हें कृत्य सिद्धीस नेण्याकरितां १७ माहे अक्टोबर रोजीं ह्या बेटास वेढा घालावा असा ठराव झाला आहे. याप्रमाणें सैन्य, दारूगोळा वगैरे लढाईच्या सरंजामाची तयारी आहे. यास्तव महाराजास लिहिण्यांत येतें कीं, आपण त्या किल्ल्याचा चांगला बंदोबस्त ठेवावा. राजापूर तर्फेविषयीं मी आलीनाईक लोखंडे यांस बोलिलों आहे. आणि त्यांपासीं ठरावही केला आहे कीं, राजापुराकडून उभय

पक्षांस कुमक होणार नाहीं, याप्रमाणें सूचना केली आहे. बहुत काय लिहिणें कृपालोभ असूं देणें हे विनंती ".

तारीख १२ अक्टोबर.

कांपाच्या मैदानांत ज्या ठिकाणीं सध्या धोबी लोक धुतात तेथें पूर्वी मुंबादेवीचें तळें होतें. याच्या शेजारीं अपराधी लोकांस दंड करण्यासाठीं जागा नेमिली होती. याचें कारण ही जागा बाजार गेटाच्या दरवाज्यासमोर असल्यामुळें लोकांची रहदारी फार असे. आणि पूर्वींच्या लोकांचा असा नियम होता कीं, अपराध्यांस शासन करणें तें प्रख्यात ठिकाणीं करावें, ह्मणजे तें सर्व लोकांच्या दृष्टीस पडून द्वाड लोकांस दहशत बसते. चावडीवर आणूनच अपराध्यांस शासन करावें असें आमच्या लोकांचेंही मत आहे. एथें जसें ज्याच्या अपराधास शासन ठरविलें असेल त्याप्रमाणें कोणास शेण व कवटें मार करीत. कोणास पिंजऱ्यांत घालून फिरवीत. कोणास खांबास बांधून फटके मारीत. कोणाची गाढवावर बसवून धिंड काढवीत. धिंड काढायाची असल्यास प्रथम त्या मनुष्यास एथें शृंगारून तयार करीत. आणि मग रस्तोरस्तीं फिरवीत. शृंगारण्याचा प्रकार असा होताः—त्याची अर्धी हजामत करवीत, कपाळावर शेंदूर घालीत. त्याचें तोंड रंगवीत. गळ्यांत कांद्याच्या माळा घालीत. आंगांत चित्रविचित्र पोशाक घालून त्याचें एक सोंग बनवीत. आणि गाढवाच्या शेंपडीकडे त्याचें तोंड फिरवून त्यास त्यावर बसवीत. मग शिंग व दुसरीं रणवाद्यें लावून त्याची वरात रस्तोरस्तीं काढीत. आणि त्याच्यामागें पांच पन्नास पोरें हुर्यो! हुर्यो! अशा आरोळ्या ठोकीत फिरत, आणि त्याजवर शेण मारीत अथवा धूळ उडवीत. या प्रीत्यर्थ सरकारास खर्चही बराच होई. या तळ्याच्या बाजूस खुनाच्या अपराध्यांस फांशीं देण्याची जागा होती, ह्मणून यास फांशीतळें असें नांव पडलें. त्याच्या एका बाजूस [illegible]मार करायाचें लांकडाचें यंत्र होतें. त्याच्या जवळच एक पिंजरा होता. त्यांत अपराध्यास घालून घेरी येऊन पडेपर्यंत तास अर्धतास फिरवीत. अशीं या लहानशा तुकड्यांत चार पांच निरनिराळ्या जातीचीं शासन करण्याचीं साधनें करून ठेविलीं होतीं. हल्लीं ह्या प्रकारचें शासन बंद केल्यामुळें हीं काढून टाकिलीं. आतां फांशीं देण्याची जागा मात्र डोंगरीवर जुन्या तुरुंगाच्या मागें करून ठेविली आहे. आणि शरीरदंड करणें तो सक्त मजुरीवरच ठरवितात. कोठें कोठें फटकेही मारितात, परंतु विरळा.

मराठी [illegible]

इंग्रज लोक मुंबईत जिकडे तिकडे किल्ले बांधून व थोडें थोडें लष्कर ठेवून आपल्या बंदोबस्तानें राहिले होते. इतक्यांत माहे फेब्रुआरी २० सन १६९३ मध्यें वलंदेजी लोकांचा ( डचलोकांचा ) सेनाधिपति रिक्लाफ व्हानगान हा ६००० लोकांनिशीं आरमार घेऊन मुंबईवर आला, आणि हें बेट घेण्याची मसलत करीत होता. परंतु त्यावेळीं एथचे गव्हर्नर, जनरल आनजीयर हे मोठे धूर्त, चौकस व चतुर सरदार असल्यामुळें त्यांनीं जी आपणापासीं फौज होती तिची जिकडे तिकडे वांटणी करून आटोकाट बंदोबस्त केला. त्यावेळीं त्यांजपासीं ३०० गोरे, ४०० किरिस्तांव, ३०० भंडारी, व पोर्टुगालच्या फिरंगी लोकांपैकीं ५०० लोक, व त्यांवर एक इंग्रज सरदार, इतकें सैन्य होतें, आणि साठ तोफा होत्या. त्या तटावर चढवून मुंबईच्या किल्ल्यावर पांचशें लोकांची नेमणूक केली. हें पाहून त्या सेनाधिपतीनें आपल्या आरमाराचें सुकाण फिरविलें. आणि माहिमाच्या बाऱ्यांत उतरायाचें धोरण चालविलें होतें. परंतु त्याचा तो बेत आनजीयर साहेबास कळतांच माहीमच्या किल्ल्यावर तीनशें भंडारी लोक हातांत सोटे देऊन उभे केले. आणि एथेंही त्यास हात दाखवायास सिद्ध झाला. या शिवाय त्यावेळीं मुंबईच्या बंदरांत तीन मोठीं मजबूत लढाऊ जहाजें ज्यांवर तीस तीस तोफा होत्या अशीं होतीं. व पांच फ्रांसीस ( फ्रेंच ) लोकांचीं जहाजें होतीं, तीं इंग्रज लोकांस मदत करायास सिद्ध होतीं. असा हा तटबंदीचा प्रकार या सरदारास दृष्टीस पडतांच त्यानें आपला गाशा गुंडाळिला. या वेळीं गव्हर्नराचे हुजूर शिपाई भंडारीच होते, व भंडारी व कोळी यांची संख्या एथें जाजती होती.

इसवी सन १६८३ त मि० वार्ड याच्या कारकिर्दीत कंपनी सरकाराच्या वहिवाटींत मोठाच अडथळा आला, तेणेंकरून त्यांच्या मुंबई बेटावरील राजसत्तेस सुमारें एक वर्षपर्यंत खोळंबा झाला. याचें कारण असें झालें कीं, ज्यावेळीं कपतान किगवुयन् यास ह्या बेटाच्या लष्करावर सरदार नेमिला होता, त्यावेळीं पगारा शिवाय त्यानें डेपुटी गव्हर्नराच्या पंक्तीस दोन वेळ भोजन करावें असें ठरविलें होतें, पुढें कंपनीनें शहराचा खर्च कमी केला त्यांत ह्याचें पंक्तीचें जेवण तोडिलें. त्यावेळीं कपतान किगवुयन् यानें आपल्या जेवणाच्या खर्चाबद्दल कांहीं द्रव्य तरी द्यावें असें डेपुटी गव्हर्नरापासीं बोलणें लाविलें, तेव्हां त्यानें कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांस लिहून जेवणाच्या खर्चाबद्दल दरमहा पंचवीस रुपये जाजती देऊं असें यास कबूल केलें होतें. परंतु ते त्यास पोंचले नाहींत, सबब त्यानें

तारीख २७ माहे डिसेंबर सन १६८३ ह्या दिवशीं सर्व लष्कर फितवून बंड केलें, आणि वार्ड साहेबास धरून कैद केलें, व त्याच्या तर्फेचे कारभारी होते त्यांस हाकून लाविलें. आणि इंग्लंड देशाच्या राजाच्या नांवानें आपण स्वतः कारभार चालवूं लागला, व दुसरे जे त्यास मिलाफी होते त्यांस कामें वांटून देऊन वसूल करूं लागला. सुरतेस कंपनीचे कारभारी होते त्यांनीं हें बंड मोडून मुंबई आपल्या हाताखालीं यावी ह्मणून पुष्कळ प्रयत्न केले; परंतु यापुढें त्यांचा कांहीं इलाज चालला नाहीं. याप्रमाणें यानें सरासरी एक वर्षभर मुंबईवर आपला अम्मल चालविला. नंतर इंग्लंडदेशांत मुख्य सरकारास ही गोष्ट कळून ह्याचा बंदोबस्त केला. तेथून राजाकडून सर टामस ग्रान्थाम नांवाचा एक आरमार खात्यांतील सरदार व एक मोठें मनवार ज्यामध्यें ७० तोफा होत्या असें पाठवून दिलें, व राजानें आपला शिक्का मोर्तब करून हुकूम पाठविला, त्यांत असें लिहिलें होतें. "हें पत्र पाहतांच वीस तासांच्या आंत मुंबई बेट होतें तसें कंपनीच्या स्वाधीन करावें" तें पाहून किगवुयन् शुद्धीवर येऊन मुंबई बेट सोडण्यास कबूल झाला. परंतु सर ग्रान्थाम याजकडे इतकें मागितलें कीं, आपल्या अपराधाची आपणास क्षमा करावी. तें कबूल करून तारीख १२ नवेंबर १६८४ मध्यें मुंबई बेट त्याच्या स्वाधीन केलें. पुढें वार्ड साहेबास मोकळें केलें व पूर्ववत् कंपनीकडे राज्याची वहिवाट चालू झाली.

किगवुयन् यानें जरी या प्रसंगीं बंड केलें तरी तो धूर्त, सहनशील, व राजकारभारांत निपुण असे. यानें ह्या वेळीं मोठाच पोक्तपणा दाखविला. जरी आपण राज्याधिकार स्वाधीन करून घेतला तरी दुसऱ्या बंडवाल्यां सारिखें आपल्या नांवानें राज्य चालविलें नाहीं. आपण इंग्लंड देशाच्या राजाची रयत असून राज्य चालविणाऱ्याचा कारभारी असें जाहीर करून सर्व बंदोबस्त नीट रीतीनें चालविला. सरकारी द्रव्य आपल्या खासगी कामास लाविलें नाहीं. इंग्रज सरकाराचा मान व कंपनीचा व्यापार वाढविण्यास प्रयत्न मांडिला. शिद्दी व दुसरे राजेरजवाडे यांजवर आपली जरब घालून इंग्रज लोकांचें वर्चस्व राखिलें. हाच इंग्रजांचा शहाणपणा पुढें त्यांची सत्ता वाढविण्यास उपयोगी पडला.

ह्या काळीं इंग्रज सरकाराचा सर्व खर्च बातबेताचा होता इतकेंच नाहीं, परंतु ते राज्यकारभार फारच काटकसरीनें करीत होते. ज्यावेळीं कंपनी सरकारानें

मुंबई बेट आपल्या हस्तगत करून घेतलें त्यावेळीं मुंबई खात्यांतील इंग्रज, फ्रेंच, पोर्टुगीझ् आणि काळे लोक मिळून लष्करांत १२५ लोक होते.

सन १६८६ मध्यें कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांनीं एक सरकारी लष्कराची तुकडी एथें पाठवून दिली. त्यावर कपतान क्लिफ्टन ह्यांस मुख्य नेमिले होते. त्यांचा मुशारा सालिना ३०० रुपये ठरविला होता. ह्यांत गोरे व काळे लोक होते. पुढें १७७७ पर्यंत तें वाढवून ६००० लोक केले. यांत बहुतेक मुंबईंतील स्थायिक लोक होते. ह्या वर्षीं कंपनी सरकारानें असा कायदा केला होता कीं, मुंबईंतील सर्व शेटसावकार लोकांनीं कवाईत शिकून काम पडेल तेव्हां लढाईस उभें रहावें. तेव्हां सुमारें शंभर वाणी आणि ब्राह्मण गृहस्थांनीं लष्करी काम न पत्करून आपआपल्या चाकरीबद्दल सरकारास कांहीं द्रव्य देऊन आपली सुटका करून घेतली. पुढें सन १७९४त मुंबई खात्याचें लष्कर ३,२७३ गोरे व १२,५२८ काळे लोक मिळून सगळें १५,८०१ होतें, आणि यांचा खर्च सालिना ४७,२०,७६० रुपये होता. १८०७त गोरे ५,००० आणि काळे २३,४५० मिळून सगळे २८,४५० लोक होते. आणि यांचा खर्च सालिना सुमारें दीड कोटीवर होता. सन १८४७ त ११,२१० गोरे आणि काळे ६५,८४५ मिळून सगळें सैन्य ७७,०५५ होतें आणि ह्या बद्दल सरकारास सालिना तीन चार कोटींवर खर्च होत असे. सन १८६१ त सर्व पलटणी घोडेस्वार वगैरे मिळून मुंबई खात्यांत सुमारें पाऊण लक्ष फौज होती. याशिवाय बंगाल आणि मद्रास खात्याच्या पलटणी. यावरून कंपनी सरकाराचें वैभव किती अचाट वेगानें वाढत चाललें आहे, त्याचें अनुमान करितां येईल. जसा पाण्याचा झरा उगमा जवळ लहान असतो, आणि मग त्याची अनिवार विस्तीर्ण नदी होत्ये, तसाच प्रकार मुंबईचा किंबहुना कंपनी सरकाराचा झाला. स्वदेशापासून हजारो कोशांच्या अंतरावर परखंडांत जाऊन इतक्या प्रभावानें राज्यसत्ता वाढविलेली असा प्रभु इतिहासांत कोठेंच अढळत नाहीं. पाहा ह्यांनीं काय चमत्कार केला तो! पस्तीस गोऱ्या शिपायांवरून एक लक्ष सैन्य जमविलें, आणि लहानशा सुरतेच्या वखारीवरून सर्व भरतखंड हस्तगत करून घेतलें. ह्या पलिकडे आश्चर्य तें कोठें राहिलें! एकाचे एकवीस झाले ह्मणजे पुष्कळ वृद्धि झाली असी आमच्या लोकांची ह्मण आहे. परंतु एथें एकाचे सहस्रांवर झाले, मग वृद्धीची सीमा कोठें राहिली! पाहा! आज ह्या नामांकित कंपनीची मुंबई,

कलकत्ता, आणि मद्रास व दुसरीं संस्थानें मिळून सुमारें तीन लक्ष फौज आहे, आणि सगळे राजे रजवाडे यांचे आज्ञांकित होऊन राहिले आहेत. कंपनीसरकाराच्या आज्ञे विरुद्ध चालणारा असा भरतखंडांत कोणीही राजा राहिला नाहीं. हा सगळा ह्यांच्या शहाणपणाचा परिणाम.

जसे १८६१ त कित्येक व्यापारी, दिवाणी कामगार व दुसरे इंग्रज गृहस्थलोक स्वेच्छेनें लष्करी काम करण्याचें पत्करून कवाईत शिकत होते, व आपणा मधूनच कोणी कपतान, कोणी करनल, कोणी जनरल, नेमून लढाईचें काम करण्यास सिद्ध झाले होते, तसीच सन १७९८ त लष्करी काम करण्याविषयीं एथें इंग्रज लोकांची धामधूम चालली होती. ही लष्करी कामगारांची तयारी होण्याचें कारण हें होतें कीं, फ्रेंच लोकांचें व इंग्रजांचें वैमनस्य पडल्यामुळें ते मुंबईवर हल्ला करून हें बेट घेतील अशी भीति होती; दुसरें हैदरअल्ली, व दुसरे हिंदुस्थानांतील राजे इंग्रज लोकांस एथून हांकून देण्याचा मनसुबा करून संधि येण्याचा वेळ पाहात होते. हें जेव्हां कोर्ट आफ् डैरेक्टर्स ह्यांस कळलें तेव्हां त्यांनीं डंकन साहेब त्या वेळचे गव्हर्नर यांस अशी ही लष्करी तयारी करण्यास लिहून पाठविलें होतें. त्याप्रमाणें सन १७९८ च्या अक्टोबर महिन्यांत डंकन साहेबानें मुख्य सरकाराचा हुकूम सर्व लोकांस कळवावा ह्मणून कोटांतील थियेटरांत सभा भरून तो हुकूम वाचून दाखविला, व आपण सुरस भाषण करून हें करण्याची आवश्यकता दाखविली, आणि सरकारी कामगार व दुसऱ्या सर्व लोकांनीं कवाईत शिकून लढाईचें काम पडेल तेव्हां युद्धास उभें राहायास स्वेच्छेनें तयार असावें असें सांगितलें. त्यावरून गव्हर्नरसुद्धां सर्व इंग्रज लोक हें काम करायास सिद्ध झाले. पुढें हें काम सिद्धीस जाण्यास द्रव्य पाहिजे ह्मणून त्याच बैठकीस टीप तयार केली, आणि स्वतः डंकन साहेबानें २५,००० व जनराल स्टुअर्टयांनीं ३०,००० रुपये भरले व इतरांनीं कोणी १०,०००, ५,०००, १,०००, असें आपआपल्या सामर्थ्यानुरूप द्रव्य टिपींत भरिलें. हें द्रव्य ३,००,००० रुपये जमलें. ह्यांतून १,२७,७६३ रुपये मुंबई सरकारांत ठेविले व बाकीचे इंग्लंड देशांत सरकारापाशीं आरमार खात्यास मदत करण्याकरितां राजाचा सक्रेटारी याजकडेस पाठवून दिले. आणि त्या वेळीं लार्ड नेल्सन हे नुकतेच मिसर देशांतून विजयी होऊन आले होते. त्यांचा आनंद प्रदर्शित करून मुंबईंतील रयतेचा प्रमाणिकपणा दाखविला. हें लष्करी खातें कांहीं

वर्षें चाललें होतें. मग तें मोडून टाकिलें. अशा तयार केलेल्या लष्करास व्हालं-टियर कोर असें ह्मणतात.

कंपनी सरकारास या बेटाची वसाहत वाढविण्यास फारच श्रम पडले. शिवाजीचा मुलगा संभाजी याचा डोळा याजवर असे. कधीं कधीं सैन्या-सुद्धां येऊन घारापुरीस व कानेरी हुनेरीस छावणी करून रहात असे. अलि-बागचा आंग्रा, हप्सणांतील शिद्दी, जंजिऱ्यांतील चांचे, वाडीचा सावंत, व विजयदुर्गाचा धुळप यांजकडून मुंबईंत येणाऱ्याजाणाऱ्या सावकारांस व इतर लोकांस फारच त्रास होत असे. कधींकधीं ते मोठमोठालीं जहाजें धरून नेत. माल लुटीत, लोकांस कैद करीत, व ठार मारून टाकीत. याकुतखान तर सन १६७२ पासून अनेक निमित्तांनीं माजगांवास दहा दहा हजार लोक घेऊन येऊन डेरा देत असे. कधींकधीं शेजारच्या गांवांत व मराठ्यांच्या राज्यांत जाऊन छापे घालून येई. शिवाजीशीं त्याचें वांकडें असल्यामुळें त्यावर जाण्याच्या मिषानें एथें तळ देऊन बसे, तेणेंकरून मुंबईंतील हिंदू रयतेस अनेक प्रकारचे उपद्रव होत. त्याचे लोक अनेक तऱ्हेनें त्यांची छळणूक करीत. एकदोन वर्षेंपर्यंत तर पोर्टुगीझ् लोकांनीं आणि संभाजीनें आपआपल्या राज्यांतून दाणादुणा मुंबईस जाणें बंद केल्यावरून लोकांचे फार हाल झाले. ह्या प्रकारचे इंग्रज लोकांस वर्ष प्रतिवर्षी त्रास भोगावे पडत.

सन १६८९ तारीख २२ माहे फेब्रुआरी ह्या दिवशीं हप्सणांतील शिद्दी याकुतखान हा वीस हजार फौज घेऊन शिवरीस येऊन उतरला, आणि त्यानें तेथील किल्ला हस्तगत करून घेतला. याकुतखान दोनप्रहरीं शहरांत येऊन शिरला. आणि दुसऱ्या दिवशीं पहांटेच्या एक तासाच्या सुमारास इंग्रजानें किल्ल्यावरून तीन तोफा सोडून परचक्र आलें आहे, तर तुह्मी आपला बचाव करून घ्यावा अशी लोकांस इशारत केली. मग काय विचारतां! लोकांच्या आकांतास पार राहिला नाहीं. "दे माय धरणी ठाव" अशी अवस्था झाली. लोक पोरेंबाळें घेऊन जिकडेतिकडे पळत सुटले. परंतु जातात कोठें! पळायाच्या वाटा शिद्याच्या लष्करानें बंद केल्या होत्या. दुसऱ्या दिवशीं माजगांवच्या किल्ल्यावर चाल करून तेथील संत्री लोकांस हाकून लाविलें. व किल्ल्यांतील दारूगोळा व तोफा आणि नाण्याच्या सुमारें दहा पेट्या ह्याच्या हातीं सांपडल्या. मग त्यानें कांहीं लष्कर माहीमचा किल्ला हस्तगत करून घेण्यास व लुटण्यास पाठवून दिलें. अणखी

डोंगरी किल्ल्यावर तोफा रचून मुंबईचा मोठा किल्ला जो इंग्रजांच्या हातांत राहिला होता, तो घेण्याची मसलत केली होती. बहुतेक मुंबईचा भाग याच्या स्वाधीन होऊन त्याचें लष्करही चाळीसपंचेचाळीस हजार झालें. सुमारें एक वर्षपर्यंत राहून शेवटी माजगांवचा किल्ला जाळून टाकून सन १६९० च्या जून महिन्याच्या ८ व्या तारिखेस एथून तळ उठवून तो परत हपसणांत गेला. ह्या वेळीं मुंबईचे गव्हर्नर सर जान चैल्ड होते. आणि ही याकुतखानाची स्वारी बहुतकरून यांच्या अविचारामुळेंच झाली, असें बहुतेक ग्रंथकारांचें ह्मणणें आहे. तो गेल्यानंतर कांहीं काळानें मुंबईत महामारीचा उपद्रव होऊन पुष्कळच लोक जायां झाले, दुष्काळ पडला, आणि इंग्रज सैन्यापैकीं ३५ गोरे शिपाई मात्र मुंबई शहराचें रक्षण करण्यास राहिले.

याकुतखानाचें निवारण करायास सर जान चैल्ड ह्यांस फारच प्रयास पडले. ह्याला मुंबईतून तळ उठवून परत जाण्यास हुकूम पाठवावा ह्मणून दोन इंग्रज वकील दिल्लीच्या बादशहाकडे त्यांनीं पाठविले. औरंगजेबास युक्तिप्रयुक्तीनें मथवून तो सांगेल त्याप्रमाणें तह करणें त्यांस भाग पडलें. सर जान चैल्ड याच्या कित्येक उद्धटपणाच्या आचरणांवरून औरंगजेब त्याजवर मोठा वक्र होता. या तहनाम्यांत कित्येक गोष्टी जरी इंग्रज लोकांचा अपमान होण्याजोग्या होत्या, तथापि त्या कबूल करणें त्यांस भाग झालें. त्यांत असें एक कलम होतें कीं, सर जान चैल्ड यानें नऊ महिन्यांच्या आंत हिंदुस्थान सोडून जावें. परंतु असा प्रसंग येण्याच्या पूर्वीं दोन तीन महिने अगोदरच त्यास देवाज्ञा झाली. ह्या प्रसंगीं इंग्रज लोकांनीं फारच लीनता दाखविली, तेव्हां शिद्दी यास मुंबईतून तळ उठविण्यास हुकूम पाठविला. ह्या एका शिद्याच्या येण्यामुळें कंपनी सरकारास ४१,६०,००० रुपयांची हानि झाली. कारण याकुतखानास मुंबईवर चढ करून येण्यास जो खर्च झाला तो सर्व इंग्रजांस भरून द्यावा पडला. कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, सर जान चैल्ड हे जर ह्या वेळीं समंजसपणानें चालले असते, तर ह्या शत्रूचा प्रवेश मुंबईत एकाएकीं झाला नसता. दुसरें, जर हे धैर्य धरून याकुतखानास आडवे आले असते तर त्याचा कांहीं काट चालला नसता, असें कित्येक इंग्रज इतिहासकर्त्यांचें मत आहे; कारण ह्या वेळीं बंदरांत इंग्रजांच्या तर्फेचीं दोन मनवारें होतीं. परंतु ह्या गृहस्थानें त्यावर बार करायास कोणासच हुकूम न करितां स्वस्थ राहिला. मोंगलास चिडिवण्यास हेच कारण झाले. आणि कंपनी सरकाराची

राज्यसत्ता वाढविण्याविषयीं क्रम यांनींच काढिला होता, परंतु या वेळीं हे घाबरून जाऊन स्वस्थ राहिले. ह्यामुळें मुंबईंतील लोकांची सर्व गोष्टींत नासाडी झाली.

मुंबईहून जे वकील दिल्लीस गेले होते त्यांस औरंगजेब बादशहाकडून कंपनीच्या नांवानें फरमान ( हुकूम ) मिळाला होता. त्याचें इंग्रजी भाषांतर ब्रूस यानें आपल्या इतिहासांत छापलें आहे, तें एथें मराठींत खालीं उतरून घेतलें आहे. " तारीख २७ माहे फेब्रुआरी सन १६८९-९० मोठ्या कीर्तिमान् राज्याच्या तेहतिसाव्या वर्षीं.

सर्व इंग्रज लोकांनीं मोठ्या नम्रतेनें अर्ज केला कीं, जे आपण अपराध केले त्यांची आपणांस क्षमा असावी, आणि क्षमा झाली हें प्रसिद्ध होण्यासाठीं नवीन फरमान द्यावा अशी विनंती केली; आणि जगामध्यें जें मोठें प्रतापी स्थळ अत्युत्तम राजमंदिर एथें बादशहाची कृपादृष्टि असावी ह्मणून आपले वकील पाठविले. अणखी गुन्हेगारीबद्दल ते ज्याचा जामदारखाना मोठा आणि सूर्यासारिखा प्रज्वलित आहे अशा महान् बादशहास दीड लक्ष रुपये नजराणा करतील; आणि सावकार लोकांचा माल जो त्यांनीं हरण केला आहे, तो त्यांच्या धन्यांस परत देतील आणि मामूलचाली प्रमाणें वहिवाट ठेवून इतःपर याप्रमाणें गैररीतीची वर्त्तणूक ठेवणार नाहींत. असा सुरतेचे सुभेदार यांजकडून अस्माना एवढा अर्ज या नामांकित दरबारांत पोहंचला; सबब जी आपली मेहरबानी सर्व लोकांवर करण्यास योग्य आहे, तेणेंकरून दयाळू होऊन त्यांच्या अपराधाची क्षमा केली आहे. आणि बादशहालायक मेहरबानगीनें फरमावितात कीं, नजराणा सुरतेच्या जामदारखान्यांत दाखल करण्यांत यावा, सावकारांचा माल परत केला जावा. शहराची अबादानी असावी, आणि त्यांनीं पूर्ववत् व्यापार चालवावा; व मिस्तर चैल्ड ज्यानें ही बेअदबीची, गोष्ट केली, त्यास एथून लावून देण्यांत यावें. हा हुकूम अनिवर्त्त आहे. "

सन १६८१ त कंपनी सरकारास मुख्य इंग्रज सरकाराकडून आपल्या नांवानें नाणें पाडण्याची सनद मिळाल्यावरून त्यांनीं मुंबई एथें किल्ल्यांत एक साधारण टंकसाळ बांधिली आणि मोहरा, पांचीं, रुपये, पावल्या, चवल्या, तांब्याचे पैसे इत्यादि नाणें पाडून चालवूं लागले. सन १६७० पासून नाणें पाडण्याचें काम यांनीं चालविलें होतें. तें दिल्लीच्या बादशहाच्या नांवानें छापीत व त्यावर फारशी अक्षरांचा छाप असे, त्यामुळें मोंगल दरबारांत थोडी तक्रार चालली होती. सबब

त्यांनीं ही सनद मिळविली, आणि स्वतः हें काम चालवूं लागले. तेव्हांपासून इंग्रजांवर लक्ष्मीचा होरा फिरत चालला. आणि देशोदेशीं नाणें चालूं लागल्यामुळें सर्वत्र ख्याति होत चालली, व शहराचें उत्पन्न वाढलें. पूर्वी या खात्यांत शेंकडो कांसार व सोनार खपत असत तें सर्व काम आतां एका वाफेच्या यंत्रावर चालतें. हल्लींची टंकसाळ सन १८२५ त मेजर हाकिन्स यानें बांधिली होती, व सर्व यंत्रांची रचना वगैरे याच्याच हातानें झाली. धातूचा रस करणें, तिच्या लगड्या पाडणें, व पत्रे घडून त्याच्या चकत्या पाडून त्याजवर छापा मारणें, हें सर्व यंत्राधारें आपोआप होतें. या कारखान्यांतील सर्व यंत्रें वाफेवर चालतात. हा सर्व प्रकार डोळ्यांनीं पाहिल्याशिवाय लक्षांत येणें कठीण. ह्या कारखान्यांत वाफेचीं तीन यंत्रें आहेत, त्यांची शक्ति अशी आहे. एक मोठें आहे त्याचा जोर ४० घोड्यांचा, दुसरें आहे त्याचा २४ घोड्यांचा, व तिसरें आहे त्याचा १० घोड्यांचा आहे. आणि ह्या यंत्रांकडून प्रतिदिवशीं १,५०,००० अनेक जातीचें नाणें पाडून तयार होतें. एवढ्या वेगानें हें काम चालतें. हीं यंत्रें केवळ वायुवेगानें चालतात. ज्यांला ज्ञान संपादन करायाचें आहे, त्यांनीं अशा कारखान्यांत जाऊन ते अवश्य पाहावे. यंत्रांवर हें नाणें पाडण्याचें काम सन १८३० मध्यें चालू झालें. तेव्हांपासून ह्या इलाख्यांत हेंच नाणें घोळतें. एथें जाण्यास मिंट मास्तरची परवानगी घ्यावी लागती. प्रत्येक शुक्रवारीं हें पाहाण्याची मोकळीक आहे. सन १६८१ मध्यें लंडन शहराहून टंकसाळीचें काम तपासण्यास मिस्तर स्मिथ नांवाचा एक इंग्रज कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांनीं पाठविला होता. त्यास सालिना ६०० रुपये ठरविले होते आणि हल्लींच्या मिंट मास्तरास दरमहा २,००० रुपये मिळतात. याशिवाय तीनचार मदतनीस आहेत, त्यांस कोणास ५००-६०० असा दरमहा आहे.

सन १६८७ मध्यें भरतखंडांतील जीं जीं संस्थानें इंग्रज लोकांच्या हस्तगत होतीं, त्या सर्वांवर मुंबई मुख्य राजधानी करून या सर्वांची व्यवस्था एथून व्हावी असा बंदोबस्त केला.

सन १६८८ मध्यें मुख्य कंपनी सरकाराच्या हुकुमांवरून मुंबई शहरांतील घरांवर छापा घेण्याचा कायदा सुरू केला. यापूर्वी कर घेण्याचा कोणत्याच प्रकारचा नवीन कायदा सुरू केला, यापूर्वी कर घेण्याचा कोणत्याच प्रकारचा नवीन कायदा कंपनी सरकारानें चालू केला नव्हता.

पोर्टुगीझ् लोक आज सुमारें साडेतीनशें वर्षांपासून भरतखंडाशीं संबंध ठेवितात, परंतु भरतखंडस्थ लोकांच्या रीतिभाती, देवधर्म कोणत्या प्रकारचा आहे व हिंदुस्थानांत भाषा किती आहेत, व यांचीं पुरातन देवस्थानें आहेत त्यांत काय चमत्कार आहेत, यांजकडे किमपिही लक्ष दिलें नाहीं. हिंदूंचे देव पाहिले म्हणजे ते फोडून टाकावे. ते बोलूं लागले म्हणजे त्यांची हेळणा करावी. हें मात्र त्यांला ठाऊक असे. या देशाच्या भाषा शिकून त्यांत काय रहस्य आहे हें पाहणें व ज्या लोकांवर आपणास अम्मल चालवायाचा त्यांची भाषा शिकणें अवश्य आहे हें त्यांला ठाऊक नव्हतें. पोर्टुगालांतून आलेल्या फिरंगी लोकांपैकीं मराठी किंवा उर्दू भाषा शिकलेला कोणीच अढळत नाहीं. लोकांस जुलमानें आपल्या धर्मांत घ्यावें, त्यांच्या मूर्त्ति छिन्न भिन्न कराव्या, हें मात्र त्यांनीं केलें. पोर्टुगालाहून आलेले फिरंगी पांच पांच सहा सहा पिढ्यांपासून गोव्यांत रहातात, परंतु त्यांस हिंदू लोकांचा धर्म म्हणून काय आहे हें अद्याप ठाऊक नाहीं व मराठी भाषेचा एक शब्दही समजत नाहीं.

कोणी असें सांगितलें कीं, कांहीं वर्षांमागें पोर्टुगीझ् लोकांच्या गोवें एथील एका गव्हर्नरास हिंदू लोकांचा धर्म काय आहे, तें समजून घेण्याचें कारण पडलें. तेव्हां तेथील एका धूर्त्त शेणवी गृहस्थानें अगदीं सुलभ आणि चमत्कारिक रीतीनें त्याची समजूत पाडली. ती अशी; गोपीचंदनाचा खडा आणि लोटीभर पाणी घेऊन गव्हर्नरापाशीं गेला. आणि त्यानें तो उगाळून कपाळावर टिळा ओढून सांगितलें कीं, हें सगळें हिंदू धर्माचें तत्त्व. आणि असें सांगतात कीं, यावरून त्या राजपुरुषाची हिंदू धर्माविषयीं समजूत पडली !

इंग्रज लोकांचा दक्षपणा किती आहे तो पाहा. प्रारंभापासून जेव्हां त्यांनीं भरतखंडांत सुरत, खंबाईत, कोची इत्यादि ठिकाणीं वखारी घातल्या होत्या, तेव्हांपासून कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांचा त्यांस असा हुकूम होता कीं, ज्या देशांत जाल, त्या देशाची भाषा पहिल्यानें शिका. त्याबद्दल त्यांस वर्षासन सुद्धां मिळे. सुरतेच्या वखारीच्या कारभाऱ्यांस पंडिताची नेमणूक होती. यावरून त्यांची दूरदृष्टि किती ती पाहा. सन १६६७ मध्यें एथें कपतान ग्यारी हे डेपुटी गव्हर्नर होते, त्यांला दोनतीन भाषा येत होत्या. याशिवाय ते अरबी शिकून त्यांनीं एक लहानसें पुस्तक त्या भाषेंत लिहून गोव्यांमध्यें पोर्टुगीझ् लोकांचा गव्हर्नर होता त्यास नजर केलें होतें.

घारापुरी, दिवदिवें, कानेरी हुनेरी, हीं बेटें जरी मुंबईपासून दोनतीन कोशांवर होतीं, तथापि पूर्वीं तेथें जाण्यास मोठे प्रयास पडत. कारण तिकडे आंग्र्याचें ठाणें होतें, व आसपास दुसऱ्या चांचे लोकांचीं जहाजें घिरट्या घालीत असत. असेंही असतां सन १७१२ त एथील गुहा व मूर्त्तींचा शोध करण्यासाठीं मोठ्या प्रयासानें कपतान पैक हा तेथें गेला. आणि त्याचा शोध करून व तेथील सर्व मूर्त्तींचीं चित्रें काढून विलायतेस घेऊन गेला. यापूर्वीं जे कोणी तेथें गेले होते, त्यांस या स्थानाचा शोध बराबर न लागल्यामुळें ते हें शिकंदर बादशहाचें काम असावें असें म्हणत. कोणी चिनी व्यापाऱ्यांचें असेंही बोलत, परंतु हल्लीं निर्विवाद सिद्धांत झाला कीं, हें हिंदूशिवाय दुसऱ्या राजाचें कृत्य नाहीं. पोर्टुगीझ् लोकांनीं याच्या रचनेचा फार नाश केला. किती एक मूर्त्तींवर तोफा लावून फोडून टाकिल्या. सन १७१८ मध्यें कंपनी सरकाराचा एक कामगार मि. बौचर यानें पारशी लोकांच्या धर्माचा एक वेंदिदाद सादी नांवाचा ग्रंथ घेऊन तो इंग्लंडास पाठविला होता. परंतु वाचणारा कोणी नसल्यामुळें पुष्कळ वर्षेंपर्यंत तो तेथेंच पडून राहिला. परंतु हल्लीं इंग्रज लोकांनीं वेंदिदाद तर काय, पण हिंदूलोकांच्या वेदाच्या पुस्तकांचें देखील इंग्रजींत भाषांतर केलें आहे, व त्यावर संस्कृतांत टीका लिहिली आहे. आणि संस्कृत, मराठी, गुजराथी, उर्दू, तामिल, फारशी अशा भाषा शिकलेले इंग्रज मुंबईत व सर्व भरतखंडभर पसरले आहेत. हा त्यांचा किती स्तुत्य गुण आहे! गव्हर्नर चार्लेस बून ह्यांनींही सन १७१९ त घारापुरीस जाऊन तेथील शोध केला होता. व तेथील मूर्त्तींचीं चित्रें काढून त्यांचा वृत्तांत लिहिला होता. आणि हल्लींतर या स्थलाचें साद्यंत वर्णन चित्रांसुद्धां प्रसिद्ध झालें आहे. सारांश इतकेंच कीं, इंग्रज लोक एथें आल्यापासून असे शोध करावयास लागले होते, तरी अद्याप त्यांनीं तें काम सोडून दिलें नाहीं. दिवसेंदिवस त्यावर नव्या नव्या कल्पना बसवीतच आहेत. व त्यांतून नवीन सारांश काढीतच आहेत. यांनीं अशा कृत्यांबद्दल आजपर्यंत हजारो रुपये खर्च केला असावा. सनदी कामगारांस मराठी, उर्दू, गुजराथी, कानडी, तुळवी, किंवा कोणतीही मुलखी भाषा शिकल्याशिवाय कलेक्टरचें किंवा मोठ्या हुद्याचें काम मिळत नाहीं. आणि राजनीतिही हीच आहे कीं, ज्या लोकांवर अंमल करावा त्यांची भाषा त्या कामगारास आली पाहिजे, ह्मणजे त्याजकडून बहुधा व्यवस्था नीट राहते.

संस्कृत, अरबी, उर्दू, मराठी, गुजराथी आणि दुसऱ्या कित्येक एतद्देशीय भाषांवर इंग्रज विद्वानांनीं मोठमोठाले कोश केले आहेत. कांहीं वर्षांमागें या शहरांत जनरल व्हान्स केनडी नांवाचा एक इंग्रज कामगार होता. यास पांच सहा मुलखी भाषा चांगल्या येत असून तो संस्कृतांत निपुण होता असें सांगतात. सरकारांत कोणी शास्त्री, पंडिताची गरज लागली असतां त्यास या साहेबाकडे प्रथम परीक्षा देण्यास पाठवीत. कित्येक आमचे शास्त्री, पुराणीक, व पंडित एकाद्या श्लोकाचा अन्वय चांगला लागला नाहीं, तर याजपाशीं जाऊन आपली शंका निवारण करून घेत. यानें मराठी आणि इंग्रजी, आणि इंग्रजी आणि मराठी असा एक कोश करून सन १८२४ त छापिला होता. याजकडे संस्कृत व दुसऱ्या देशभाषांतील पुस्तकांचा भरणा फार होता. सन १८४० च्या सुमारास त्याचा काळ झाला. त्यावेळीं याचें वय ९५ वर्षांचें होतें. तो एवढा वृद्ध होता, तरी संस्कृत व दुसरे ग्रंथ अवलोकन करणें यानें सोडिलें नव्हतें. इतका विद्वान असून तो सद्रव अंतःकरणाचा, व निःसीम उदार, असून यास एतद्देशीय लोकांची कींव फार होती.

सन १७२० मध्यें सगळे मुंबई खात्यांत चाळीस सनदी कामगार होते आणि त्यांचे पगारही लहान होते. गव्हर्नरास सालिना ३,०००, डेपुटी गव्हर्नरास १,०००, कौन्सलांतील तिसऱ्या हुद्देदारास ७०० रुपये; यावरून बाकीच्यांस काय मिळत असेल त्याचें अनुमान होईल. परंतु याखेरीज त्यांचा अन्नखर्च व दुसरा इतमाम दरबारी खर्चांतून होत असे. व त्यांस प्रतिवर्षीं दुसरें बक्षीस मिळत असे. लष्करी खात्यांतील पगार तर याहून कमीच होता, आणि तो दर सहा महिन्यांनीं एकवेळ मिळत असे. त्यावेळीं दोन डाक्तर होते त्यांस ३५० रुपये सालिना होते. आणि पाद्रीस सालिना ५०० रुपये व दुसरे पांचशें बक्षीस मिळत. ह्यावेळीं सगळा एक उपाध्याय ह्या बेटांत होता. पुढें सरकारी खात्यांत जेवणाचें खटलें तोडून जेवणखर्चाबद्दल सनदी कामगारांस दर महिना २५ रुपये जाजती द्यावे असें ठरलें. यामुळें तें द्रव्य पोटखर्चास पुरत नाहीं, तर दर असामीस सुमारें ५२ रुपये चाकरासुद्धां खर्च होतो, तर आह्मास तितकी तरी रकम असावी ह्मणून १७३९ त सनदी कामगारांनीं त्यावेळचे गव्हर्नर हनराबल स्टीवन्‌ला इस्क्वायर यांस अर्ज केला होता, त्यांत इतकेंच लिहिलें होतें कीं,

मुंबईंत सर्व प्रकारची महर्गता चालल्यामुळें २५ रुपयांनीं पोटखर्च भागत नाहीं. तर सरकारांतून आह्मास ५२ रुपये तरी मिळण्याची तरतूद व्हावी.

सन १७०० च्या सुमारास कंपनी सरकाराकडून मुंबईंतील गव्हर्नर साहेबांस असें लिहून आलें कीं, मुंबई टापूबद्दल खर्च फार होतो, व उत्पन्न थोडें, सबब दुय्यम गव्हर्नर साहेबांचा मुशारा तोडून दरमहा १०० रुपयांवर आणावा, आणि सर्व मुंबई शहराचा वार्षिक खर्च ७०,००० च्या आंत असावा, ह्या इतक्या रकमेंत गांवखातें, लष्करी खातें, व धर्मखातें ह्या सर्वांचा खर्च पुरवावा. जकात व जमिनीचा वसूल मिळून यावेळीं सरकारास ९४,२०० रुपये सालिना उत्पन्न होत असत.

ह्या प्रकारची मुंबई बेटाची पूर्वस्थिति. आतां तिच्या हल्लींच्या स्थितीकडे क्षणभर लक्ष देऊन पाहा - पूर्वीं ज्या सत्तर हजार रुपयांनीं एका वर्षाचा खर्च भागत असे, ते आज एका दिवसाच्या देखील खर्चास पुरत नाहींत. पूर्वीं गव्हर्नर साहेबांस जें वेतन दरमहा मिळत होतें तें हल्लींच्या गव्हर्नरास दर दिवसास मिळतें. या पलिकडे दुसरें आश्चर्य तें कोठें राहिलें ! फक्त नवे रस्ते बांधण्यास, रस्त्यांची दागदुजी ठेवण्यास व ते शिंपण्यास आणि शहरांत स्वच्छपणा ठेवण्यास व पाणी पुरविण्यास हल्लीं सालिना सरकारास सुमारें दहा लाख रुपये खर्च होतो. यावरून दुसऱ्या खर्चाची अटकळ करितां येईल. उत्पन्नही तसेंच वाढलें आहे. जकाती बद्दलच सरकारास प्रतिदिवशीं चाळीस पन्नास हजार रुपये उत्पन्न होतात.

सन १७६८ च्या पूर्वीं मुंबई बेटांतील सर्व श्रीमंत व स्थावर मिळकतीचे मालक बहुधा कांपाच्या मैदानांत रहात होते. याठिकाणीं लोकांच्या मोठमोठाल्या हवेल्या व देवळें होतीं. संभावित लोकांची वस्ती ह्मटली ह्मणजे पूर्वीं कोटाच्या दरवाज्यापासून मशीदबंदराच्या अलीकडे होती. कांपाच्या मैदानांत ज्या ठिकाणीं सद्यः धोबी लोक कपडे धुतात त्या ठिकाणीं पुरातन मुंबादेवीचें व दुसरीं चार पांच हिंदू लोकांचीं देवळें होतीं. तसेंच पोर्टुगीझ् लोकांचें एक मोठें देऊळ अलीकडचे बाजूस होतें, आणि त्याच्या अलीकडे जुमामसीद असे. ती कंपनी सरकारानें किंमत देऊन मोडून टाकून सध्याच्या ठिकाणीं बांधायास जागा दिली. कांपाच्या मैदानापुढील सर्व जमीन मोकळी होती. ज्यावेळीं किल्ला बांधण्याचें व त्या सभोंवते चर खणण्याचें काम सुरू केलें, तेव्हां लोकांला घरांचें व जमिनीचें

मोल देऊन तीं मोडून टाकिलीं, आणि सध्याचें कांपाचें मैदान तयार केलें. यावेळीं घरदारवाले व स्थावर मिळकतीचे मालक असे सुमारें ९०० गृहस्थ मुंबईंत होते, त्यांत ब्राह्मण व वाणी १०० होते.

सरकारास खर्च फार आणि उत्पन्न कमी झाल्यामुळें रयतेकडून चार किंवा पांच टक्यांच्या व्याजानें द्रव्य घेऊन सरकारी खजिन्यांत दाखल करून गव्हर्नर जनरल यांच्या सहीची चिटी सरकारांत द्रव्य ठेवणारांस देऊन त्यांस त्याबद्दल सहा सहा महिन्यांनीं व्याज देत जावें, असा मुख्य इंग्रज सरकाराकडून सन १७२० मध्यें हुकूम मिळाला. तेव्हांपासून सरकारी चार व पांच टक्यांच्या तिजोरीच्या नोटी सुरू झाल्या.

ह्याचवर्षी पोर्टुगीझ्लोकांचें व कंपनीसरकाराचें वैमनस्य पडल्यामुळें त्यांनीं वांद्र्याचा आणि मुंबईचा संबंध तोडिला, त्यावेळीं इंग्रज सरकारानें मुंबईंत दवंडी फिरविली कीं, सर्व लोकांनीं २१ दिवसांच्या आंत माहिमास निघून जावें, परंतु हा तंटा आंतच्याआंत मिटल्यामुळें मुंबईंतील लोकांस शहर सोडून जाणें पडलें नाहीं.

इसवी सन १७७५ मध्यें मोठ्या कुलाब्यास दांडी बांधिली, व मुंबईंतील किल्ला फिरून बांधून मजबूत केला. हे सर्व किल्ले मिळून सरकारास सुमारें एक-कोटी रुपये खर्च झाला. ही दांडी बांधण्याचें कारण शत्रूचीं जहाजें आलीं असतां ह्या दांडीवरून दिसावीं. दुसरें, जीं जहाजें रात्रीचीं या बंदरांत येतात त्यांस आसपासचे खडक न समजल्यामुळें खडकावर आपटून फुटण्याचें भय असल्यामुळें ह्यांस ह्या दांडीवर दिवा लावल्यानें सरळ मार्ग लक्षांत यावा. तिसरें, जीं तिर्कटी तारवें युरोप वगैरे दुसऱ्या खंडांतून येतात त्यांवरील कपतान लोकांस बंदराची माहितगारी नसल्यामुळें त्यांचीं तारवें भलत्याच ठिकाणीं जाऊन त्यांचा नाश होत असे. अशीं गैरमाहिती जहाजें दूर असतांना दांडीवरून दुर्बिणीच्या योगानें पाहून, त्यांस नीट मार्गानें आणण्यास माहितगार तांडेल पाठवितां यावे. अशीं याचीं अनेक कारणें आहेत. ही दांडी बांधल्यानें तारवांचा बचाव झाला, आणि सहस्रावधि लोकांचे जीव वांचले. व लाखो रुपयांच्या मालाचें रक्षण झालें.

दांडी बांधिली आहे ती डोंगरी समुद्राच्या सपाटी पेक्षां सत्तर फुटी उंच आहे. आणि दांडीची उंची ८९ फुटी आहे; मिळून ह्या दांडीची उंची १५९ फुटी असून हिच्या पायथऱ्याचा घेर सुमारें ७० हात आहे. हींत पूर्वीं एकच

मोठें कंदील असून त्यांत दिवे लावीत, परंतु सन १८४७ पासून कळसूत्र करून अशी कृति केली आहे कीं, दिवे लावले ह्मणजे हीं कंदिलें उजेडे पर्यंत एकसारिखीं फिरत असतात. तेणेंकरून त्यांचा प्रकाश चौफेर सारखा फांकतो. यांत प्रतिदिवशीं सुमारें दीडमण तेल जळत असतें. ही दांडी बाराकोशांच्या अंतरावरून दृष्टीस पडत्ये. ही जाऊन पाहाण्यास कोणी अनमान करूं नये.

कंपनी सरकारानें बंदुकीची दारू करण्याचा कारखाना केव्हांपासून घातला त्याचा बराबर शोध लागत नाहीं, परंतु त्यांची वहिवाट चालू झाल्यानंतर पांच दहा वर्षांनीं दारूचा कारखाना सुरू झाला असें वाटतें. प्रथम तो धाकट्या कुलाब्यास होता. सन १७२८ त लेफ्टनेंट आर्चिबाल्ड क्यांपबेल नांवाच्या एका प्रीन्सेस क्यारोलीना या जहाजावरील गृहस्थास इंजनराचें काम दिलें होतें. त्या वेळीं एथें कोणी इंजनेर नव्हते व खर्च भारी होतो, सबब इंग्लंडाहून कोणास पाठवूनही देत नसत. यानें प्रथम धाकट्या कुलाब्यास दारू करण्याची एक मोठी वखार बांधिली आणि तींत मोठा राट करून वाऱ्याच्या योगानें दारू दळून तयार करावी असा कारखाना घातला होता. परंतु एथील लोकांस हें काम बराबर करितां येणार नाहीं, असें ठरवून तें बंद केलें. आणि त्या बद्दल २४ घाणे घालून त्यांस टोणगे बांधून दारू तयार करून घेत. नंतर तेथील जागा बराबर नाहीं असें पाहून कांहीं काळानें ते फुके सवंग विकून टाकिले, आणि कांपावर पालोगेटाच्या दरवाज्याजवळ नवा कारखाना घातला. तेथून कामाठपुरामध्यें नेला होता. नंतर कामाठपूर वसून तेथील वस्ती फार वाढल्यामुळें एक दोन वेळां अपाय घडून आले, तेव्हां माजगांव हें एकांतस्थळ व तेथें लोकांची दाटी फार नाहीं असें पाहून, सन १७९० मध्यें हा माजगांवास नेला, परंतु तेथेंही हल्लीं लोकांची वस्ती फार होत चालली आहे. एथें प्रतिवर्षीं सुमारें ९०० पिंपें ह्मणजे ६९,००० रत्तल दारू होती. मुंबईत ही दारू करण्याचा दुसऱ्या कोणास हुकूम नाहीं. ह्या कारखान्यांत प्रतिदिवशीं शेंदीडशें लोक खपतात. व दरमहा ह्या प्रीत्यर्थ सरकारास दहा पंधरा हजार रुपये खर्च आहे. बंदुकीची दारू भलत्यासच विकायाचा हुकूम नाहीं. ज्या कोणास घेणें असेल त्यानें ती घेण्याचें बराबर कारण दाखविलें पाहिजे, तेव्हांच ती मिळते.

मोल देऊन तीं मोडून टाकिलीं, आणि सध्याचें कांपाचें मैदान तयार केलें. यावेळीं घरदारवाले व स्थावर मिळकतीचे मालक असे सुमारें ९०० गृहस्थ मुंबईंत होते, त्यांत ब्राह्मण व वाणी १०० होते.

सरकारास खर्च फार आणि उत्पन्न कमी झाल्यामुळें रयतेकडून चार किंवा पांच टक्यांच्या व्याजानें द्रव्य घेऊन सरकारी खजिन्यांत दाखल करून गव्हर्नर जनरल यांच्या सहीची चिटी सरकारांत द्रव्य ठेवणारांस देऊन त्यांस त्याबद्दल सहा सहा महिन्यांनीं व्याज देत जावें, असा मुख्य इंग्रज सरकाराकडून सन १७२० मध्यें हुकूम मिळाला. तेव्हांपासून सरकारी चार व पांच टक्यांच्या तिजोरीच्या नोटी सुरू झाल्या.

ह्याचवर्षीं पोर्टुगीझलोकांचें व कंपनीसरकाराचें वैमनस्य पडल्यामुळें त्यांनीं बांद्र्याचा आणि मुंबईचा संबंध तोडिला, त्यावेळीं इंग्रज सरकारानें मुंबईंत दवंडी फिरविली कीं, सर्व लोकांनीं २१ दिवसांच्या आंत माहिमास निघून जावें, परंतु हा तंटा आंतच्याआंत मिटल्यामुळें मुंबईंतील लोकांस शहर सोडून जाणें पडलें नाहीं.

इसवी सन १७७५ मध्यें मोठ्या कुलाब्यास दांडी बांधिली, व मुंबईंतील किल्ला फिरून बांधून मजबूत केला. हे सर्व किल्ले मिळून सरकारास सुमारें एक-कोटी रुपये खर्च झाला. ही दांडी बांधण्याचें कारण शत्रूचीं जहाजें आलीं असतां ह्या दांडीवरून दिसावीं. दुसरें, जीं जहाजें रात्रीचीं या बंदरांत येतात त्यांस आसपासचे खडक न समजल्यामुळें खडकावर आपटून फुटण्याचें भय असल्यामुळें ह्यांस ह्या दांडीवर दिवा लावल्यानें सरळ मार्ग लक्षांत यावा. तिसरें, जीं तिर्कटी तारवें युरोप वगैरे दुसऱ्या खंडांतून येतात त्यांवरील कपतान लोकांस बंदराची माहितगारी नसल्यामुळें त्यांचीं तारवें भलत्याच ठिकाणीं जाऊन त्यांचा नाश होत असे. अशीं गैरमाहिती जहाजें दूर असतांना दांडीवरून दुर्बिणीच्या योगानें पाहून, त्यांस नीट मार्गानें आणण्यास माहितगार तांडेल पाठवितां यावे. असीं याचीं अनेक कारणें आहेत. ही दांडी बांधल्यानें तारवांचा बचाव झाला, आणि सहस्रावधि लोकांचे जीव वांचले, व लाखो रुपयांच्या मालाचें रक्षण झालें.

दांडी बांधिली आहे ती डोंगरी समुद्राच्या सपाटी पेक्षां सत्तर फुटी उंच आहे. आणि दांडीची उंची ८९ फुटी आहे; मिळून ह्या दांडीची उंची १५९ फुटी असून हिच्या पायथ्याचा घेर सुमारें ७० हात आहे. हींत पूर्वीं एकच

मोठें कंदील असून त्यांत दिवे लावीत, परंतु सन १८४७ पासून कळसूत्र करून अशी कृति केली आहे कीं, दिवे लावले ह्मणजे हीं कंदिलें उजेडे पर्यंत एकसारिखीं फिरत असतात. तेणेंकरून त्यांचा प्रकाश चौफेर सारखा फांकतो. यांत प्रतिदिवशीं सुमारें दीडमण तेल जळत असतें. ही दांडी बाराकोशांच्या अंतरावरून दृष्टीस पडत्ये. ही जाऊन पाहाण्यास कोणी अनमान करूं नये.

कंपनी सरकारानें बंदुकीची दारू करण्याचा कारखाना केव्हांपासून घातला त्याचा बराबर शोध लागत नाहीं, परंतु त्यांची वहिवाट चालू झाल्यानंतर पांच दहा वर्षांनीं दारूचा कारखाना सुरू झाला असें वाटतें. प्रथम तो धाकट्या कुलाब्यास होता. सन १७२८ त लेफ्टनेंट आर्चिबाल्ड क्यांपबेल नांवाच्या एका प्रीन्सेस क्यारोलीना या जहाजावरील गृहस्थास इंजनराचें काम दिलें होतें. त्या वेळीं एथें कोणी इंजनेर नव्हते व खर्च भारी होतो, सबब इंग्लंडाहून कोणास पाठवूनही देत नसत. यानें प्रथम धाकट्या कुलाब्यास दारू करण्याची एक मोठी वखार बांधिली आणि तींत मोठा राट करून वाऱ्याच्या योगानें दारू दळून तयार करावी असा कारखाना घातला होता. परंतु एथील लोकांस हें काम बराबर करितां येणार नाहीं, असें ठरवून तें बंद केलें. आणि त्या बद्दल २४ घाणे घालून त्यांस टोणगे बांधून दारू तयार करून घेत. नंतर तेथील जागा बराबर नाहीं असें पाहून कांहीं काळानें ते फुके सवंग विकून टाकिले. आणि कांपावर पालेगेटाच्या दरवाज्याजवळ नवा कारखाना घातला. तेथून कामाठपुरामध्यें नेला होता. नंतर कामाठपूर वसून तेथील वस्ती फार वाढल्यामुळें एक दोन वेळां अपाय घडून आले, तेव्हां माजगांव हें एकांतस्थळ व तेथें लोकांची दाटी फार नाहीं असें पाहून, सन १७९० मध्यें हा माजगांवास नेला, परंतु तेथेंही हल्लीं लोकांची वस्ती फार होत चालली आहे. एथें प्रतिवर्षी सुमारें ९०० पिंपें ह्मणजे ६९,००० रत्तल दारू होती. मुंबईत ही दारू करण्याचा दुसऱ्या कोणास हुकूम नाहीं. ह्या कारखान्यांत प्रतिदिवशीं शेंदीडशें लोक खपतात. व दरमहा ह्या प्रीत्यर्थ सरकारास दहा पंधरा हजार रुपये खर्च आहे. बंदुकीची दारू भलत्यासच विकायाचा हुकूम नाहीं. ज्या कोणास घेणें असेल त्यानें ती घेण्याचें बराबर कारण दाखविलें पाहिजे, तेव्हांच ती मिळते.

# प्रकरण ६.

बाजार– कांपाचें मैदान–किल्ल्यांतील रचना– बंब्रखाना– जामदार-खाना इत्यादि–मार्क्विस आफ् कार्नवालिस, व वेलस्ली यांचे पुतळे–लोकसंख्या–निरनिराळ्या ठिकाणांची वस्ती–मासळी-बाजार–सन १८०२ आणि १८२२ सां मधील भयंकर आग–वादळें–वायव्य प्रांतांतील दुष्काळाचें निवारण करण्याचे प्रयत्न–पारशी लोकांचें औदार्य.

मुंबई शहरांत जागोजागीं लहान मोठे असे अठरा बाजार आहेत, त्यांत शहराच्या मध्यभागीं जुमामशिदीजवळ जो आहे तो मुख्य. त्यास मार्किट असें ह्मणतात. ह्या स्थलाची रचना मोठ्या चतुराईनें केली आहे. पूर्वीं मुंबईंत वस्ती थोडी व व्यापाराचीही तादृश धकाधकी नव्हती, सबब माल विकणारे लोक सांपडेल तेथें बसून माल विकीत. ह्या मार्किटाची जागा अस्सल एका वाणी सावकाराची होती, असें सांगतात. ह्या परोपकारी गृहस्थानें ती बाजारासाठीं धर्मार्थ देऊन लोकांस तेथें बसून भाजीपाला व फळफळावळ विकायाचा हुकूम दिला. मग कांहीं वर्षेंपर्यंत लोक त्या जाग्यांत बसून माल विकीत. जसें अन्नछत्र व धर्मपोई घालण्यांत आणि विहीर व तलाव बांधण्यांत पुण्य आहे, तसेंच धर्मार्थ बाजार बांधण्यांतही आहे, असें हिंदूलोक मानितात. त्या अभिप्रायानें ही जागा त्यानें धर्मार्थ सोडिली, पुढें कांहीं वर्षांनीं डंकन साहेब यांच्या कारकिर्दींत सन १८०९ त ह्या जाग्यांत सरकारानें सोईवार इमला बांधून लोकांस बसायासाठीं जागा करून दिली. परंतु अमुकानेंच अमुक ठिकाणीं बसावें, व ही अमक्याची जागा आणि ती तमक्याची जागा असें कांहीं ठरविलें नव्हतें. त्या वेळीं अशी वहिवाट होती कीं, पहांटेस उठून जो प्रथम येऊन ज्या जाग्यांत बसेल ती त्याची जागा. कोणत्याच जाग्यावर कोणाचा हक्क नसे. परंतु भाजी विकणाऱ्या लोकांनीं आपआपले बांक आणून घातले होते, सबब जो तो आपआपल्या जाग्यांत बसे.

८५११८ १०१मू:५: ४८३ ०८

पूर्वी ह्या मार्किटांत हल्लींच्या सारिखी सोई नव्हती. पावसाच्या दिवसांत गुडघ्या एवढा मधून चिखल होत असे, व जागोजागीं दगड टाकून त्यांवरून उड्या मारून लोक जात. अशा दिवसांत ह्या मार्किटांत जायाचें ह्मटलें ह्मणजे मोठें जिवावर येई. पुढें सुमारें सन १८३८ त सरकारानें त्याचा जीर्णोद्धार केला, आणि त्याला सद्ध्याची रचना दिली. ह्या मार्किटाचा पूर्वीचा वृत्तांत बराबर कोठें सांपडत नाहीं. एथें बसून भाजी विकण्याबद्दल सरकारास कांहीं देणें पडत नाहीं. ह्या बाजारांत मासळी वगैरे दुसरे पदार्थ विकण्याचा हुकूम नाहीं; ह्मणून हें निर्मळ व स्वच्छ दिसतें. हा बंदोबस्त फारच चांगला आहे.

ह्या मार्किटांत जेथें फळें विकतात तेथील तुळईवर समोरच एक फळी मारली आहे. तिजवर इंग्रजी व गुजराथी भाषेंत असें लिहिलें आहे.

" भाजीपाला, फळफळावळ विकण्याचें मार्किट. धि आनरेबल जोनाथन डंकन इस्कायर, "

ग्रंथालय दा. क्र. ७२१८१

## जाहीर खबर

" हें मार्किट भाजीपाला, फळफळावळ व फुलें, पानें, इत्यादि विकण्यासाठीं तयार केलें आहे. असा माल विकणाऱ्या कोणत्याहि जातीच्या लोकांस एथें बसून विकायास मोकळीक आहे. एथें बसण्याबद्दल त्यांस, कर, फी, दस्तुरी व कोणत्याहि प्रकारचें देणें पडणार नाहीं. "

काळबादेवीकडून निघावें ह्मणजे प्रथम रामदास, रामलाल, व दुसऱ्या प्रख्यात सावकारांच्या पेढ्या; कांहीं पावलें पुढें चालून जावें ह्मणजे पश्चिमेस भुलेश्वराचा बाजार, व उत्तरेस भेंडीबाजार. एथें कांसारांच्या दुकानांची रांग, व घांसारी लोकांचीं दुकानें आहेत. यांच्या पुढें सर जमशेटजीच्या दवाखान्यापर्यंत सगळा बाजारच. कोणी मिठाई विकतो, कोणी कापड विकतो, कोठें तेलाचे घाणे, गाड्यांचे तबेले, व भटारखाने दृष्टीस पडतात. ते टाकून पुढें जावें तों चिनाई व गांवठी बांगड्या व इतर लाखेचे दागिने विकणाऱ्या कांसारांचीं व सुरती मोच्यांचीं दुकानें आहेत. एके बाजूस अरब लोकांची मोठी घोडसाळ आहे. हींत सुमारें हजार पंधराशें अरबी घोडे असतात. मागें एथें एक उत्तम प्रतीचा घोडा आला होता, त्याची किंमत पांच हजार रुपये सांगत. बहुधा श्रीमान् लोक ह्या घोडसाळींतूनच घोडे विकत घेतात. अशा घोडसाळी तीन चार ठिकाणीं आहेत.

परंतु ही सर्वांहून मोठी. पुढें भायखळा; ह्या स्थळीं प्रतिदिवशीं पहांटेस बाजार भरत असतो, त्यावेळीं वांदरें, माहीम, वरळी, परळ, माटुंगें, माजगांव, कुरलें, शींव वगैरे ठिकाणांतून माळी लोक टोपल्या भरून अनेक जातीचें माळवें सुमारें दोन घटिका रात्र असतानां एथें आणितात. तें मुंबईतील भाजी विकणारे लोक एकठोक खरेदी करून जागोजागीं नेऊन विकतात. हा बाजार सगळा तास दीड तास भरतो आणि तो सूर्योदय होण्यापूर्वीं सर्व उलगडून सामसूम होऊन जातो. कांहीं अंशीं ह्या शहरांतील प्रत्येक रस्ता अलाहिदा बाजार आहे. जिकडे पाहावें तिकडे अनेक जातीचे कारखाने व कारागीर लोकांची धामधूम. कोणी सोडा-वाटर तयार करितात; कोणी तेल काढितात; कोणी गाड्या रंगवितात, कोणी कलाबतू तयार करितात.

पूर्वेकडेस मुंबादेवीच्या चौकीकडून फिरावें इतक्यांत लाखो रुपयांचे हुंडी-वाले व पेढीवाले सावकार स्वच्छ बैठकीवर लोडास टेंकून बसले आहेत; त्यां-समोर चाकरांची धामधूम चालली आहे. अशीं पांच पन्नास दुकानें लागतात. किंचित् पुढें अफिणीचा सट्टा करणाऱ्या मारवाड्यांची व दुसऱ्या गुजरलोकांची टोळी जमून रस्त्यावर रेंटारेंटी करीत व हाकाट्या मारीत आहे. मुंबादेवीच्या देवळामागें एकसारखीं रांगीनें शालवाल्यांचीं दुकानें आहेत. तेथें काय विचारतां! वर खालीं जिकडे तिकडे शालीच. एकादा गट्ठा उघडून पाहावा ह्मणजे अनेक रंगांच्या व जरीकांठांच्या अमोलिक किमतीच्या अमृतसरी व काश्मिरी शाली दृष्टीस पडतात. त्या पाहूनच मनुष्याचें मन गर्क होऊन जातें. अंमळ पुढें जावें ह्मणजे चहूंकडे मोत्यें, हिरे, रुपें, विकणारांच्या पेढ्या जागोजागीं चकचकतात. किंचित् पुढें एकास एक लागलेलीं तांबटांचीं दुकानें. त्यांत वरखालीं आजूबाजूस लहान मोठीं अनेक जातीचीं नवीनच घडलेलीं तांबडीं व पिवळीं लखलखीत भांडीं रचलेलीं दृष्टीस पडतात. मध्येंच दोन तीन सकलादीचीं, सोनारांचीं व सोनें कसून पाहाणाऱ्या छापवाल्यांचीं दुकानें आहेत. तीं टाकून पांचसात पावलें पुढें गेलें नाहीं इतक्यांत हलवायांचीं दुकानें आहेत, तेथें काय विचारतां! एकावर एक बांक मांडून त्यांवर तांबडे, पिवळे, हिरव्या रंगाचे, कागद पसरून अनेक प्रकारच्या मिठायांनीं भरलेल्या पराती रचून ठेविल्या आहेत; ज्या पाहातांच मनुष्याचें मन तृप्त होऊन जातें. त्यांच्या बाजूस गांधींचीं दुकानें, त्यांत अनेक तऱ्हेच्या औषधी व वनस्पति भरलेल्या आहेत, त्यांत कित्येक गांधी पुड्या बांधीत आहेत. मध्येंच

रस्त्याच्या बाजूस हात दीड हात पंचा नेसलेला व फाटके कपडे आंगांत घातलेला, असा गुजराथी ब्राह्मण पत्रावळी व द्रोणाचे पुडे मांडून बसलेला दृष्टीस पडतो. अशा पत्रावळी व द्रोण विकणारे इतक्या जाग्यांत कानाकोपऱ्यास बसलेले जिकडेतिकडे आहेत. पुढें दोन्ही बाजूंनीं भुसाऱ्यांचीं दुकानें. ज्यांत अनेक प्रकारचें धान्य टोपल्यांत व मोढ्यांत भरून ठेविलें आहे, व मारवाडी लोक न्हौरंगावर बका सारिखे गिऱ्हाइकाची मार्गप्रतीक्षा करीत आहेत. आणि जे कोणी त्यांच्या तावडीस सांपडतील त्यांस फसविण्यास अनेक युक्ति करीत आहेत. यांच्या पाशांत सांपडलें असतां ठकल्यावांचून निभाव होणें कठीण. तशांत उचापतीचें खातें असलें ह्मणजे काय विचारता ? एकाचे दोन. “ उचापतीचें पोतें आणि सवाहात रितें ” अशी ह्मणच आहे. एथून थोडेसें पुढें तूप, साखर, तेल, व नारळ विकणाऱ्यांचीं दुकानें; त्यांच्या बाजूस मारुतीच्या समोर विलायतीकापड विकणाऱ्यांचा नवा घातलेला बाजार, असे अनेक प्रकारचे थाट दृष्टीस पडतात. मग समोर पूर्वेकडे तोंड फिरविलें ह्मणजे मार्किट दृष्टीस पडतें. जुमामशिदीस लागून दोहीं बाजूंस मसाल्याचीं दुकानें आहेत. त्यांच्या शेजारीं सोन्या रुप्याचे दागिने विकणाऱ्यांच्या पेढ्या; त्यांच्या समोर अत्तर, गुलाब, अबीर, उदकाड्या, पिंजर इत्यादि सुगंधि द्रव्यें विकणाऱ्यांचीं दुकानें दिसतात. रस्त्यावर त्यांच्यासमोर लवंगा, एलची, जायफळ, जायपत्री इत्यादि गरम मसाल्यांचीं दुकानें आहेत. त्यांच्या मागें दुसऱ्या रांगेंत बदाम, खिसमिस, खजूर, खारका, इत्यादि मस्कती मेवा विकणाऱ्यांचीं दुकानें वीस पंचवीस एकास एक लागून गेलीं आहेत. त्यांच्या मागें फळबाजार; आणि त्याला लागून शाकभाजी इत्यादिकांचीं दुकानें. पुढें पूर्वेकडेस नळाच्या अलीकडे सगळा बाजारच. चहूंकडे बोहऱ्यांचीं, सोन्या रुप्याचे दागिने, व रेशीम कलाबतू इत्यादि अनेक तऱ्हेचा माल विकणाऱ्यांचीं दुकानें एकास एक लागून गेलीं आहेत. आणि अनेक जातीचे कारागीर लोक दुकानांत काम करीत आहेत, व जिकडेतिकडे भटारखान्यांत मुसलमान व कच्छी लोकांची गर्दी जमली आहे असें दृष्टीस पडतें. एथें तयार केलेलीं मातीचीं भांडीं विकणाऱ्यांचीं दुकानें जागोजागीं आहेत. गांवठी मातीचीं भांडीं या शहरांत प्रतिवर्षी सुमारें २४,००० रुपयांचीं खपतात, असा आकार काढिला आहे. एका बाजूस एक सारखीं पांच दाहा पेट्या व हडपे विकणाऱ्यांचीं दुकानें. एथें अनेक तऱ्हेच्या लहान मोठ्या पेट्या सांपडतात. तसेच पलंग व गाद्या विकणाऱ्यांचे कारखाने आहेत. एथें एक

हातभर देखील जागा रिकामी नाहीं, एथील लोक नेहमी उद्योगांत असतात. ते बहुधा सर्व गुजराथ प्रांतस्थ आहेत.

आतां मार्किटांत जाऊन चहूंकडे दृष्टि फेंकून पाहावें, ह्मणजे उसाच्या भाऱ्यांचे गंज, फुलांच्या राशी, लिंबांचे ढीग, व दुसरे पदार्थ चहूंकडे लागून गेले आहेत. तशाच्च अनेक तऱ्हेच्या पालेभाज्या, फळभाज्या, पपनसांचे एकावर-एक रचलेले गंज, मस्कती डाळिंब्रांच्या टोपल्या, रसभरित परिपक्व अंजिरें, पिवळ्या व तांबड्या केळ्यांचे लोंगर, हिरव्या व तांबडया द्राक्षांचे घड टोपल्यांत रचले आहेत; आणि आंबे, फणस, पेरू वगैरे अनेक रंगांच्या फळांची जिकडे-तिकडे गर्दी होऊन गेली आहे. अनेक ऋतूंत अनेक जातीच्या फळांच्या हंगामाचा भर असतो खरा, परंतु मुंबईच्या मार्किटांत एकादे वेळीं ह्मटला तो मेवा बारमाही सांपडतो. त्याची किंमत मात्र जबर पडती. आंब्याच्या दिवसांत तर हें स्थळ फळांनीं एवढें प्रफुल्लित व सुशोभित होऊन जातें कीं, कित्येक सहज अनेक तऱ्हेचे आंबे नजरेस पडावे ह्मणूनच एथें जाऊन येतात. या ठिकाणीं आंब्याच्या दिवसांत किमानपक्ष चाळीस पन्नास जातीचे व रंगांचे आंबे दृष्टीस पडतात. एथें ह्मटला तो पदार्थ सांपडतो. द्रव्य मात्र खर्चिलें पाहिजे. कधींकधीं रुपयाचे दोन आंबे, चार डाळिंबें, आठ अंजिरें, व दाहा केळीं या दरानें फळें खपतात. नळाच्या पलीकडे बोहरी लोकांचीं दुकानें आहेत. त्यांत विलायती, चिनाई, व अनेक देशचें तऱ्हतऱ्हेचें सामान विकतात. त्यांच्या शेजारीं पिंजारी, कांतारी, व बांगड्या आणि लाखेचे दागिने विकणारे यांचीं दुकानें पांच पंचवीस लागून गेलीं आहेत, व बाजूस रंगारी लोक राहतात. पुढें तखलाचे डबे, कंदिलें, हांड्या, गलासें वगैरे सामान, व दुसरा अनेक तऱ्हेचा माल विकणाऱ्यांचीं दुकानें. एथील सुमारें चौरसचौरस अर्धकोश जमिनींत अनेक तऱ्हेचीं दुकानेंच भरलेलीं आहेत. थेट मशीदबंदरापासून डोंगरीपर्यंत सगळा बाजारच. या शहरांतील बाजार पहांटेस भरतात, ते दहा घटिका रात्रीस उठतात. भाजीतरकारी विकणारे मात्र किंचित् लवकर उठून जातात.

मार्किट सोडून दक्षिणेकडेस म्हणजे कांपाकडेस जायास निघालें म्हणजे प्रथम खजूर, खारका, खोबरें, बदाम, खिसमीस इत्यादि मेवा विकणाऱ्यांचीं कांहीं दुकानें लागतात. मार्किटांतील परचूरण माल विकणारे लोक बहुतकरून मगरूर व बेपरवा असतात. कोणी कितीही सात्विक व अब्रूवाला त्यांच्या दुकानांवर माल

घेण्यास गेला असतां आर्जवानें बोलायाचेच नाहींत. मिर्च्या, कोथिंबीर, विकणारे देखील ह्याप्रमाणें वागत असतात. ते एका पैच्या पदार्थास अर्धआणा किंमत मागतील इतकेंच नाहीं, परंतु असें म्हणतीलः-- "पाहिजेतर घे नाहींतर चालताहो" इतके हे लोक उद्धट असतात. पुढें कापडबाजार, ह्या ठिकाणीं सुमारें शंभर दीडशें दुकानें आहेत. यांत विलायती कापड, घनवडी सणंगें, किनखाप व अनेक तऱ्हेचीं उंची वस्त्रें विकतात. मुंबईतील सर्व प्रकारच्या तर्कटाचा व लबाडीचा उत्तम प्रकारचा मासला एथें सांपडतो. दुकानांत दाट पडदे लावून अंधार केला आहे, व पुढें बांकेवर मानभावाचें सोंग घेऊन एक दोन भाटये डोकें बाहेर काढून टपत बसले आहेत, आणि कोणी गैरमाहीत भोळसर गृहस्थ कांहीं सणंगें खरेदी करायास आला असतां त्यांस फसवीत आहेत. हा सर्व प्रकार दृष्टीस पडतो. हे मुंबईतील साधे भोळे व्यापारी एका रुपयाच्या सणंगास पांच रुपये किंमत मागतात, इतकेंच नाहीं, परंतु पांच रुपये घेऊनही ठेवणीचें, फाटकें, असें कापड त्याच्या हातीं लावितात. आणि समयानुसार तो कांहीं तक्रार करूं लागला तर त्यांस मुष्टिमोदक व थापटपोळया देण्यासही मागें पुढें पहात नाहींत. पंचवीस तीस वर्षांमागें ह्या कापड विकणाऱ्या भाट्यांचा व इतर दुकानदारांचा गरीब गुरीब लोकांवर फारच जुलूम असे. परंतु हल्लीं मिस्तर फोर्जेट यांचा अंमल पोलिस खात्यांत चालू झाल्यापासून पुष्कळ बंदोबस्त झाला. कापडवालेच ठकवितात असें नाहीं. परंतु सोन्यारुप्याचे पेढीवालेही अनेक प्रकारची ठकबाजी करितात. बाजाऱ्च्या लोकांस असें वाटतें कीं, गिऱ्हाइकास ठकविणें हा व्यापाऱ्यांचा हक्क. ही गोष्ट मोठी दुःखाची आहे कीं, मुंबईसारिख्या शहराच्या बाजारांत प्रमाणिकपणा अगदींच थोडा आहे. परंतु यांतही हर्ष मानण्याजोगें इतकें आहे कीं, मोठे व्यापारी, पेढीवाले किंवा बहुतेक एकठोक माल विकणाऱ्या लोकांत प्रमाणिकपणा आणि वचनाचा साचेपणा असतो. लबाडी म्हटली म्हणजे बहुतकरून किरकोळ माल विकणाऱ्यांकडे व हलक्या लोकांकडेसच फार असत्ये. प्रमाणिकपणाविषयीं सांगण्यास इतका आनंद होतो, तर प्रमाणिकपणाचा प्रत्यक्ष व्यवहार झाला असतां किती संतोष होईल! व्यापाऱ्यांस प्रमाणिकपणाच योग्यतेस चढवितो, आणि तोच त्यांचें वास्तविक भांडवल.

बाजाराच्या शेवटीं पश्चिमेस लोहारचाळ. एथें लोहार लोकांचे कारखाने व लोखंडी सामान विकणाऱ्यांचीं दुकानें आहेत. पुढें दक्षिणेस फिरावें म्हणजे कांचाचें

मैदान; याच्या एका कोपऱ्यास भाड्याच्या गाड्या उभ्या असतात, व दुसऱ्या बाजूस संध्याकाळचे पांच वाजतां मोची लोकांचा बाजार भरत असतो. त्यावेळीं एथें पांच पंचवीस मोची अनेक तऱ्हेचे व रंगांचे जोडे मांडून बसतात. लोहारचाळीच्या मागें आणि कांपाच्या मैदानाच्या समोर सलग मोठमोठाल्या इमारती आहेत. त्यांत अनेक तऱ्हेच्या व्यापाऱ्यांचीं दुकानें आहेत, व कांहीं टोलेजंग इमारती तयार होत आहेत. पुढें फ्रीचर्च देवालय, त्याच्या बाजूस सेलर लोकांस राहण्याचा एक मोठा विस्तीर्ण वाडा आहे, ह्या वाड्यास सुमारें एक लक्ष रुपये खर्च झाला. पुढें एल्फिन्स्टन विद्यालय, स्मालकाझ कोर्ट, बैबल सोसायटी, मनीविद्यालय अशा एक सारख्या धोबीतळयापर्यंत इमारती लागून गेल्या आहेत. लोहारचाळीच्या वरच्या बाजूस मध्येंच थोडीसी जागा उघडी आहे, तींत जुने कपडे विकण्याचा बाजार भरतो. एथें सुमारें वीस पंचवीस मुसलमान लोकांचीं दुकानें आहेत. त्यांत सगळीं जुनीं व फाटकीं वस्त्रें भरलेलीं असतात. एथें सर्व जातीच्या लोकांचे कपडे विकत मिळतात. मडम लोकांचे घागरे, साहेब लोकांच्या इजारी, पारशी लोकांचे सदरे, मुसलमान लोकांच्या तुमानी, हिंदु लोकांचीं पागोटीं, आंगरखे, बंड्या, धोतरें, लुगडीं, शाली, चोळ्या, व सर्व प्रकारचीं जुनीं वस्त्रें, आण्यापासून दोन तीन रुपयांच्या किमतीचीं सांपडतात. विशेष काय सांगावें, एथें फांटके जोडे, तुटक्या वहाणा, मोडक्या पेट्या, असला माल देखील विकतात. हा बाजार दोन प्रहरचा व संध्याकाळचा भरतो. यास चोरबाजार ह्मणतात. एथें ठक लोक जाऊन चोरीचा माल बहुधा विकीत असतात. असे चोरबाजार मुंबईत पांच सहा आहेत. नळावर एक भिकारबाजार ह्मणून आहे, तेथें सगळे भिकारी लोक मिळून संध्याकाळचा दाणादुणा जो ते दिवसात भीक मागून जमा करितात, तो विकून टाकितात. रस्तोरस्तीं व गल्लोगल्लीं अनेक जिनसांचीं दुकानें आहेत. दुकानें नाहींत अशी जागा ह्या शहरांत कोठें विरळा. या शिवाय फेरेकरी लोक ह्मटला तो माल घेऊन सकाळपासून संध्याकाळपर्यंत दारोदार हिंडत असतात. मुंबई ही एक पश्चिम हिंदुस्थानाची पेंठ किंवा बाजार आहे असें ह्मटल्यास कांहीं दोष नाहीं. सोनें आणि रुपें यांशिवाय ह्मटला तो माल दारापाशीं येतो. मोत्यें, हिऱ्यांच्या, माणकांच्या, व पाचीच्या अमोलिक किमतीच्या आंगठ्या घेऊन जव्हेरी श्रीमंत

लोकांच्या घरोघर फिरत असतात. तसेंच उंच उंच किमतीच्या शालींचे दिंड घेऊन शालवाले लोक फिरत असतात.

लोहारचाळीच्या खालीं कापडबाजाराच्या शेवटास सुमारें औरसचौरस अर्ध कोश जागा मोकळी आहे, तीस कांपाचें मैदान असें म्हणतात. पुढें फांसीतळया-वर धोबी लोक वस्त्रें धुतात. व आगगाडीची सडक सुरू होती. तें आगगाडीचें मुख्य ठिकाण. ह्या मैदानाच्या उजव्या आणि डाव्या बाजूस काळया लोकांच्या पलटणी रहाण्याचें ठिकाण. व मध्यें उघड जागा रहाते, तींत जागोजागीं गोड्या पाण्याच्या विहिरी असून लष्करी लोकांस कवाईत शिकवितात. उजवे बाजूस जी जागा मोकळी आहे, तींत पलटणींतील साहेब लोकांचे तंबू मारतात. ते तंबू मार्गशीर्षांत मारतात, व वैशाखाच्या अखेरीस उठवितात. त्याच्या शेवटीं समुद्र-किनाऱ्यास स्थायिक तंबू असून त्याच्या आसपास रमणीय बाग केलेले असतात, व जागोजागीं छायावृक्ष लाविले आहेत. ह्या झावळयांच्या तंबूंची रचना आमच्या एकाद्या राजवाड्यापेक्षांही अधिक असत्ये. आंत झुंबर, हांड्या, लावलेल्या असून अमोलिक सामान रचलेलें असतें. तंबूच्या दोनही बाजूंस पलटणींतील आजारी लोकांस घालायाचे दवाखाने ( हस्पिटलें ) आहेत. हे दवाखानेही निर्मळ व स्वच्छ आहेत; एथें रोगी लोकांस आराम होण्याचीं सर्व साधनें केलीं आहेत. शेवटास बाजारगेटा समोर सकाळ संध्याकाळ गवळी लोक ह्मशी आणून दूध विकीत असतात, व भाडोत्री गाड्या उभ्या असतात. पुढें मुंबईचा किल्ला. हा किल्ला मजबूत व पाहाण्याजोगा आहे. सभोंवताले चर खणून त्यांत समुद्राचें पाणी घेतलें आहे. तें पाहिजे तेव्हां आंत घेतां येतें व बाहेर टाकितां येतें. पाव-साचें, शहरांतील कांहीं भागाचें पाणी या चरांत उतरून नेलें आहे. ह्यांत गोडे पाणी असतें. ह्या किल्ल्यास कोठें तीन, कोठें दोन, कोठें एक असे तट व चर आहेत. आणि उत्तरेकडेस तीन व पश्चिमेकडेस एक असे चार दरवाजे आहेत. दक्षिणेकडील ह्या किल्ल्याचा भाग समुद्रांत आहे. याच्या तटावर तोफा व गोळे रचून ठेविले आहेत. दरवाज्यांचीं नांवें बाजारगेट, सालिगेट, चर्चगेट,* पालोगेट, अशीं आहेत. सालिगेट हा लहान असून त्यांतून गाडी घोडा जात नाहीं. फक्त एथून लोक पाणी वगैरे नेतात; व कित्येक लोकांची रहदारीही असत्ये.

* ह्याचें वास्तविक नांव आपालोगेट. आपालो हें ग्रीकलोकांच्या एका देवाचें नांव आहे.

चर्चगेटास पूर्वी पवनचक्कीचा दरवाजा असें ह्मणत. कारण ह्या दरवाज्यासमोर एक मोठा रहाट बांधून यास तारवा सारखीं बाहेरून शिडें लावून आंत घरट मांडून वाऱ्याच्या योगानें गहूं दळायाचा सरकारी कारखाना घातला होता. हा कारखाना कांहीं वर्षांमागें काढून टाकिला. गुजराथी लोक ह्या कारखान्यास पवनचक्की असें ह्मणत. पूर्वी ह्या कारखान्यांत गहूं दळून लष्करी लोकांस आटा पुरवीत असत, असें सांगतात. बाजारगेट आणि चर्चगेट ह्या दोनही रस्त्यांत किल्ल्याच्या दरवाज्यापासून कांपाच्या शेवटापर्यंत आठआठ दहादहा हातांच्या अंतरावर खांब रोवून ह्यांवर फाणसें बसविलीं आहेत. त्यांत नेहमी संध्याकाळचे सरकारी खर्चानें दिवे लावितात. दोहीं बाजूंनीं फाणसांच्या खांबांमधून एक सारिखे छायावृक्ष लावले आहेत. याबद्दल सरकारानें आजपर्यंत हजारो रुपये खर्च केले. ह्या चारही दरवाज्यांत नेहमी संत्रीचा पहारा असतो. बाजारगेटांतून आंत जाण्यास तीन दरवाजे लागतात. आणि पुढें जातांच प्रथम सकलादीचीं दुकानें लागतात. त्यांत अनेक रंगांची उंचनीच किमतीची बनात विकतात. पुढें मोठमोठ्या सावकारांच्या पेढ्या पांच पांच सहा सहा मजली घरांत वर खालीं दृष्टीस पडतात. अलीकडे बोहरी लोकांचीं बिलोरी सामानाचीं दुकानें, त्यांच्या लगत मार्किट आहे. हें अडमिरल सर एडवर्ड ह्युज साहेबाच्या सुचनेवरून सन १७९२ त बांधिलें होतें, तें एक दोन वेळा जळून गेलें. नंतर एतद्देशीय गृहस्थानीं वर्गणी काढून हें बांधिलें. एथें फळफळावळ व दुसरा माल सांपडतो, व आसपास जिकडे तिकडे बोहऱ्यांचीं दुकानें आहेत. एथें विलायती, चिनाई, व इतर बिलोरी सामान भरलेलें असतें; व सुऱ्या, कांटे, चाकू, कातरी, फण्या, प्याले, बशा, गलासें, इत्यादि तऱ्हेवार जिन्नस सांपडतात. त्याच्या पुढें बराक्स ह्मणून मोठ्या इमारती आहेत, त्यांत लष्करी इंग्रज लोक राहत होते, परंतु हल्लीं यांत सरकारी हपिसें आहेत. या इमारती बांधायास हजारो रुपये खर्च झाला. ह्या डंकन साहेबाच्या कारकिर्दीत १८०९ त बांधिल्या होत्या. पुढें टंकसाळ व काळा किल्ला. ज्यांत तोफखाना व अनेक जातीची युद्ध सामग्री तलवारी, भाले, बर्चा, कटारी, वगैरे नाना तऱ्हेचीं शस्त्रें रचून ठेविलीं आहेत. हीं पाहण्यास सरकारी कामगाराची परमाणगी घ्यावी पडते. त्याच्या बाजूस लाखोरुपये भरलेला जामदारखाना असतो. ह्या किल्ल्याचा मोठा मजबूत दरवाजा आहे, त्यांत सोलजरांचा पहारा असतो. तिजोरीच्या व तोफखान्याच्या दरवाज्यांतही

हमेश पहारा असतो. ह्या किल्ल्याच्या दरवाज्यांत नेहमी कांहीं सोल्जर असतात. व एथें तोफांचा व गोळयांचा सरंजाम जिकडेतिकडे रचलेला आहे.

तिजोरीच्या मागें ज्या किल्ल्याच्या भागास बंबेक्यासल किंवा काळा किल्ला असें ह्मणतात, त्यावर इंग्रजाचा बावटा नेहमी वाहात असतो. हा इंग्रजाचा झेंडा. हा सूर्योदयीं उभारितात, आणि अस्तमानीं उतरितात. सूर्योदयीं जेव्हां हा उभारितात तेव्हां कांपाच्या मैदानांत मरीन पलटणीचें ठाणें आहे, तेथें जे पहारेकरी संत्री लोक असतात ते सर्व उभे राहून लष्करी रिवाजाची सलाम झाडितात, व तेथें सुमारें पावघटिकापर्यंत इंग्रजी बाजा वाजवून शुभवार्त्ता सुचवितात. तसाच प्रकार संध्याकाळीं हा बावटा उतरल्यानंतर होतो. असे बावटे दुसऱ्या तीन ठिकाणीं आहेत. परळ, ताडदेव ( महालक्ष्मीच्या डोंगरावर ), आणि वाळुकेश्वराच्या दांडीवर. परंतु तेथें कांहीं असा प्रकार होत नाहीं. इंग्लंडाहून आगबोट आली, ह्मणजे तिचें आगमन सर्व लोकांस कळावें ह्मणून ह्या बावट्याच्या काठीवर दुसरा बावटा उभारितात. तसेच दुसरीं तिर्कटी तारवें आलीं ह्मणजे उभारितात. देशोदेशच्या जहाजांचे बावटे निरनिराळया रंगांचे असून त्यांवर निरनिराळीं चिन्हें असतात. त्या त्या देशांतून जहाजें आलीं ह्मणजे त्यांचे बावटे या काठीवर उभारितात. ह्या बावट्यांच्या खुणा समजून घेतल्या शिवाय हे समजायाचे नाहींत. यांचें एक मोठें बूक आहे.

अलीकडे टौनहाल. त्याच्या समोर एके बाजूस उत्तरेकडे बंबखाना आहे. त्यांत बंब व आग लागली असतां विझविण्याचें अनेक सामान असतें. ह्या प्रभुसारिखा रयतेचें अग्नीपासून रक्षण करण्यास सरंजाम तयार करून ठेवणारा कोठेंच अढळत नाहीं. मुंबईंत पांच सहा ठिकाणीं बंब असून या खात्यांत पन्नास पाउणशें लोकांस पगार करून नेहमी ठेविले आहेत. कोठें आगीचा प्रसंग आला असतां त्यांनीं तयार असलें पाहिजे. समय विशेषीं तसीच अडचण आली असतां मोठमोठे इंग्रज कामगार देखील आग विझविण्याच्या कामास लागतात. जिकडेतिकडे नळांतून पाणी नेऊन तयार ठेविलेलेंच असतें. त्यास अशा प्रसंगीं चावी फिरवून नळांतून पाणी बाहेर काढितात, आणि आग विझविण्याच्या कामास लावितात. कोटांतील बंबखान्यांत ९ बंब आहेत, व पोलिस मास्तर याच्या स्वाधीन ७, व परळास गव्हर्नर साहेबाचे एथें १, व

दर पलटणींत एकएक असे सर्व मुंबई मध्यें ३२ बंब आहेत. हे नेहमी चाख-चोख करून ठेवितात.

ह्याच्या लगत सरकारानें वर्गणी करून शें दीडशें वर्षांपूर्वी बांधिलेलें मोठें पुरातन नाटकगृह होतें. तें कांहीं वर्षांमागें सरकारानें लिलांव करून विकलें. तें शेट बमनजी हुर्मुजी वाडिया यानें पन्नास हजार रुपयांस घेऊन त्यांत आपलें इपिस घातलें होतें. त्याच्या समोर "बंबे ग्रीन" ह्मणून सुमारें औरस चौरस ५०० हात जमीन मोकळी आहे. आमचे लोक ह्या जाग्यास चौक असें ह्मणतात. ह्या चौकाच्या मध्यभागीं लहान देवळी बांधून त्यांत लार्ड कार्नवालिस या नांवाच्या गव्हर्नर जनरल साहेबांचा पुतळा ठेविला आहे. हे साहेब मोठे दयाळू व भरतखंडाचे वास्तविक कल्याण कर्त्ते होते. सबब मुंबईंतील गृहस्थांनीं त्यांच्या स्मरणार्थ त्यांचा हा पुतळा इंग्लंड देशांतून कोरवून आणविला. हे साहेब सन १८०५ त कलकत्ता एथें गव्हर्नर जनरल होते. त्यांची कृपादृष्टि सर्वत्र सारिखी होती. ह्या पुतळ्याची स्थापना एथें सन १८२२ त झाली. ह्या पुतळ्याच्या आसपास मोकळें पटांगण आहे; त्यासभोंवते वृक्ष लाविले आहेत; व सागाचे खांबे रोवून त्यांतून चौफेर जाड लोखंडी सांखळ नेली आहे. ह्या पुतळ्याच्या स्तंभपदावर त्या नामांकित पुरुषाच्या कीर्तीचें वर्णन लिहिलें आहे.

ह्या पुतळ्यास कित्येक हमाल व दुसरे गरीब गुरीब लोक भजत व नवस घेत, व त्या समोर नारळ, विडा, दक्षिणा ठेवून मानणूक करीत. परंतु अलीकडे सरकारानें हें खूळ बंद करून टाकिलें आहे. आमचे लोक काय विचारता! सर्व गोष्टींत भोळे! दगडास कांहीं आकृति दृष्टीस पडली कीं, नारळ घेऊन त्यापुढें हात जोडायास धांवले. विचार करायाचे भरीस पडायाचे नाहींत.

बंबेग्रीन या ठिकाणीं जीं आसपास घरें वगैरे आहेत ह्मणून सदरीं लिहिलें आहे, तेथील कित्येक घरें सन १८६२ मे महिन्यांत सरकारानें विकत घेतलीं आहेत. व कित्येक ठिकाणीं सरकारी जागा होती ती विकून टाकिली आहे. आणि एथें नवीन मोठी चमत्कारीक रचना होणार. एथें शेट बमनजी हुर्मुजी वाडियाचें घर होतें, तें सरकारानें सहालक्ष रुपयांस खरेदी केलें. हेंच तीस चाळीस वर्षांमागें त्याच गृहस्थास ५०,००० स विकलें होतें. ह्या ठिकाणीं एकसारिखें पटांगण व सुंदर बाग करून मध्यें महाराणी विक्टोरियाचा पुतळा

ठेवणार. हा पुतळा पंचरस धातूचा करणार. त्यास ५०,००० रुपये दाऊद सासून हे देणार असें वर्त्तमान पत्रांत छापिलें होतें.

दुसरा एक असाच जनरल वेलेस्लीचा पुतळा चर्चगेटा समोर मांडलेला आहे. ह्या प्रख्यात योद्ध्यानें सन १८०३ मध्यें मराठ्यांचा मोड करून मोठी कीर्ति मिळविली. ही लढाई आसे एथें झाली; त्या प्रसंगीं इंग्रज लोकांचा मोठा नाश झाला. तथापि या सरदारानें आपल्या अलौकिक शौर्यानें मराठ्यांचा समूळ पराजय केला. मराठ्यांचें लष्कर तीस हजार घोडेस्वार व दहा हजार पायदळ होतें. आणि इंग्रजांचें त्याचा एक पंचमांश होतें. तरी या धुरंधर योद्ध्यानें जय मिळविला. त्याच्या या पराक्रमाच्या स्मरणार्थ कलकत्त्यांतील सरकारानें १०,००० रुपयांच्या किमतीची एक सुंदर तलवार यास बक्षीस दिली. व हिंदुस्थानांतील लष्करांतील सरदार लोकांनीं यांच्या सन्मानार्थ एक सुवर्णाचें पात्र त्याजवर आसे-च्या लढाईचें वर्णन लिहून नजर केलें, व दुसरीं भोजन समारंभाचीं रुप्याचीं पात्रें दिलीं होतीं.

हे प्रख्यात योद्धे सन १७९८ त गव्हर्नर जनरलच्या हुद्यावर होते; त्या वेळीं त्यांनीं मोठीं उदार कृत्यें केलीं. हे साहेब एतद्देशीय लोकांवर कृपादृष्टीनें पहात असत, व यांच्या कारकिर्दींत व्यापाराची अबादानी झाली, सबब मुंबईतील सावकारांनीं वर्गणी जमवून त्यांच्या स्मरणार्थ त्यांचा पुतळा इंग्लंड देशांतून तयार करवून सन १८१४ मध्यें एथें स्थापिला. ह्या पुतळ्याचें कोरींव काम फारच कुशळतेनें केलें आहे वेलेस्ली साहेब सिंहासनावर बसले आहेत, त्यांच्या हातांत एक तोडा आहे, व त्याच्या समोर एक पहिलवान मराठा उभा आहे. त्यास तो तोडा बक्षीस देण्यास हात उभारला आहे. त्यांच्या बाजूस मडमीचा पुतळा आहे. तिच्या उजव्या हातांत पदक आहे, त्याजवर असे शब्द लिहिले आहेत -- "चातुर्य, शौर्य, प्रमाणिकपणा." ह्या तीनही पुतळ्यांच्या पायाखालीं आसेची लढाई काढिली आहे. आणि याच्या पाठीमागें एक सिंह आणि सिंहीण असीं दोन चित्रें कोरलीं आहेत. हीं चित्रें कोरण्याची सफाई व त्यांची भव्य आकृति पाहून मनास मोठी संतोषवृत्ति प्राप्त होती. मुंबईतील बहुतेक लोक ह्यास पहिल-वानाचें चित्र असें ह्मणतात. मुंबईच्या व्यापाऱ्यांचीं कृत्यें जींजीं या शहरांत दृष्टीस पडतात तीं तीं राजमान्य असून यांच्या उदारपणाचे मोठे ध्वज आहेत.

हा पुतळा एथें स्थापिलेला पाहून मुंबईतील कित्येक भोळया मराठे लोकांस मोठा हर्ष झाला कीं, आह्मासाठीं कंपनी सरकार मेहरबान होऊन एक नवा विलायती देव आणिला आहे ! मग काय विचारता ! त्यांच्या आनंदास पार राहिला नाहीं. लागलेच याची पुजा करायास धांवले ! पुष्कळ वर्षे पर्यंत ते ह्या पुतळ्या समोर नारळ फोडून शिरोणी वांटीत, त्याची पुजा करीत, व नवस घेत. परंतु सरकारानें असें पाहिलें कीं, हे लोक केवळ अनाचार करितात, तर त्यांस प्रतिबंध करावा. आतां त्याच्या सभोंवताली लोखंडी कांबीची गराद करून आंत जाण्याची मनाई केली आहे. आणि कोणी पुजा करायास लागला तर त्यास सरकारी पटेवाला प्रतिबंध करितो.

शेवटास मांडवीच्या पाठीस लागून गिरण्या आहेत, ज्यां मध्यें शेंकडो मजूर लोक खपतात, व मोठ्यानें ओरडत आहेत. पुढें कोटांतील मांडवी; जिजवर जाऊन एक घटिका अर्ध घटिका उभें रहावें ह्मणजे काय काय उलाढाली होती त्यांचा मासला दिसतो. दक्षिणेकडे तोंड फिरवून पाहावें, ह्मणजे सर्व आखात आगबोटी, तिर्कटी तारवें, बतेले, बोटी, फतेमाऱ्या, कोठे, डोल यांहीं भरलेलें व मचवेवाले इकडून तिकडे व तिकडून इकडे माल व उतारू नेतात व आणितात, व हें सगळें बंदर नाचत आहे असें दृष्टीस पडतें. धक्यावर पाहवें तर कोठें घोडे उतरतात, कोठें तांब्याच्या पत्र्यांचा ढीग पडला आहे, कोठें लोखंडाच्या कांबी रचल्या आहेत, कोठें अफिणीच्या पेट्या रचून ठेविल्या आहेत, व अनेक तऱ्हेचा माल जिकडेतिकडे पसरला आहे; आणि सरकारी कामगार पेट्या उघडून माल तपासीत आहेत, व गरीबगुरीब लोकांस धमकी देत आहेत. वर हपिसांत जावें तर पांच पन्नास कारकून व इंग्रज कामगार आपआपल्या उद्योगांत चूर आहेत; सावकार लोक जिकडेतिकडे चिट्या घेऊन फिरत आहेत, आणि कारकून लोकांचें आर्जव करीत आहेत. एके बाजूस तीन पेट्या मांडून सराफ बसला आहे; त्याच्या बाजूस त्याचा मदतनीस बेरीज घेत आहे. त्याच्या पुढें रुपयांचा ढीग व बाजूस नोटींचा पुडका आहे, असे अनेक व्यापार दिसतात. खालीं आठ दहा निरनिराळया खात्यांचे मोठे कांटे आहेत, त्यांवर माल तोलतात; तेथें पांच दहा कामगार आपआपला हुद्दा बजावण्यासाठीं टपले आहेत असें पाहण्यांत येतें निरनिराळया कामगारांचीं खातीं निरनिराळीं आहेत. तेणेंकरू हपिसांत फार गर्दी होत नाहीं.

बाजारगेटापासून चर्चगेटापर्यंत वाणी, पारशी, बोहरी वगैरे गुजराथी लोकांची वस्ती. त्यांत पारशांची विशेष. चर्चगेटापासून थेट पालोगेटापर्यंत सरकारी व सावकारी हपिसें व कोठें कोठें इंग्रज व पारशी लोकांची वस्ती आहे. ह्या भागास इंग्रजबाजार असें ह्मणतात. पालोगेटाजवळ गोदी आहे व तिच्या वरचे बाजूस पोष्टहपिस आहे. किल्ल्यांत ७७,६८९ लोकांची वस्ती आहे, यावरून दर चौरस एकर जमिनीस ३१४ मनुष्यें पडतात, इतकी एथील वस्ती दाट आहे. ह्या पेक्षांही चौकशीनें मनुष्यांची गणती केली असतां पांच दहा हजार मनुष्यें वाढतील, परंतु कमी होणार नाहींत.

जरी मुंबईत जावें तिकडे पंचभेळ वस्ती आहे, तरी एकएक जातीचे लोक आपआपल्या जातीचा शेजार असेल तेथेंच जाऊन राहतात. जेथें पांच दहा घरें पारशांचीं आहेत तेथें एकटा हिंदू जाऊन राहयाचा नाहीं. तसेंच दहावीस घरें दक्षिणी लोकांचीं आहेत, तेथें एक दोघे गुजराथी जाऊन एका एकीं राहयाचे नाहींत. तसाच प्रकार पारशी, मुसलमान, बोहरी, किरिस्तांव, व इतर लोकांचाही आहे. परंतु इंग्रज लोक मात्र स्वजातीचा शेजार न पाहतां जेथें चांगली हवा असेल व जागा स्वच्छ असेल तेथें जाऊन राहतात. सन १८१६ मध्यें या शहरांत १,६१,७५० मनुष्यांची वस्ती होती. सन १८४४ त मेजर बेन्स, पोलिस मास्तर ( शहरचे कोतवाल ) यांनीं मोजणी करविली, त्यावेळीं २,७५,१९० पुरुष, आणि २,४८,९३१ स्त्रिया व मुलें. एकंदर ५,२४,१२१ मनुष्यांची वस्ती होती. आणि सद्यः आठलक्षांवर आहे असें अनुमान करितात. १८५० त या शहरांत ६,९३६ ब्राह्मण, व दुसऱ्या जातीचे हिंदू २,८८,९९५, जैन १,९०२, मुसलमान १,२४,१५५, पारशी १,१४,६९८, यहुदी १,१७२, मिश्र पोर्टुगीझ् आणि किरिस्तांव ७,४५६, एतद्देशीय इंग्रज १,३३३, एतद्देशीय पोर्टुगीझ् ५,४१७, अस्सल इंग्रज ५,०८८, शिद्दी ८८९, संकर जातीचे लोक ७,११८, अशी वस्ती होती; परंतु या दहा वर्षांत सर्व जातीची वस्ती दिढीनें वाढली आहे असें दिसतें. पाहा! ~ती झपाट्यानें मुंबईची संपत्ति आणि संतति वाढत चालली आहे. १८५१ त निराळ्या भागांत याप्रमाणें वस्ती होती:–

| | |
|---|---|
| कुलाबा | ७,०३० |
| किल्ला | ७७,६८९ |
| कांप | ४,००० |
| मार्किट | २५,६२४ |
| मांडवी | ६९,४७० |
| उमरखाडी | ८७,३९४ |
| धोबीतळें | १,०४,९२१ |
| भुलेश्वर | ३१,८०९ |
| खारेंतळें | १७,९५१ |
| गिरगांव | १०,८८८ |
| चौपाटी | २,१४२ |
| वालुकेश्वर | ३,७६८ |
| महालक्ष्मी | १,४९२ |
| माजगांव | ६,१७० |
| तारवाडी | ४,९५७ |
| कामाठपूर | २६,२३१ |
| परळ | ५,१५० |
| शिवरी | २,२६२ |
| वरळी | ११,४८३ |
| माहीम | ९,४५२ |
| शींव | ४,८३० |
| यांत अल्पवयस्क मुलें गणलीं नाहींत. | ५,१४,७१३ |

ह्या अकरा वर्षांत वस्ती किती वाढली पाहा.

धोबीतळें, काळबादेवी, गिरगांव, कावजीपाटलाचें तळें, माजगांव, परळ, माटुंगें, माहीम, वरळी, आणि शींव एथें बहुतकरून दक्षिणी लोकांची वस्ती फार असत्ये. भाट्ये, वाणी, पारशी, मुसलमान, खोजे, मेमण, कच्छी इत्यादि लोकांची वस्ती कोट, मशीदबंदर, चिंचबंदर, डोंगरी, मुंबादेवी, भुलेश्वर, भें बाजार ह्या ठिकाणीं पुष्कळ असत्ये. यांत दक्षिणी लोकांपैकीं, कोठेंकोठें म

घांटी, कोळी, व दुसऱ्या जातीचे कारागीर लोक असतात. सन १८०२ त कोटांत मोठी भयंकर आग लागली होती. त्यावेळेस तेथील कित्येक सधन गुजराथी लोक भुलेश्वर, भोयवाडा, व मुंबादेवी एथें येऊन राहिले. मग त्यांनीं तेथेंच हवेल्या उठविल्या आणि कायम राहिले. शेतोडी, कुंभारवाडा, माटुंगें, डंकन रोड, व नागपाडा एथें पंचभेळ वस्ती असून ह्या ठिकाणीं शेवटास घेड, म्हार, मांग, चांभार वगैरे लोक राहतात.

ह्या शहरांत मासळी बाजार जागोजागीं आहेत, परंतु ही गोष्ट सांगण्याजोगी आहे कीं, मासळी, व मांस विकण्याचीं ठिकाणें वेगळींच असून तीं बहुतकरून उघड जाग्यांत नसतात. आणि हा पदार्थ घेऊन जातेवेळीं लोक झांकून नेतात. शाकभाजीचे बाजार निराळे व हे बाजार निराळे असतात. मासळी व मांस उघड रस्त्यांत ठेवण्याचीही बंदी असत्ये. मुंबईत शेंकडो जातीचे मासे अढळतात. व त्यांस निरनिराळीं नांवेंही आहेत. कधींकधीं हे फार महाग विकतात. एकादा उंच प्रतीचा मासा सुमारें दोन विती लांब असला तर त्यास रुपया दीड रुपया पर्यंत किंमत पडत्ये. दरसाल मुंबईत सुमारें पांच सहा लक्ष रुपयांचा माशांचा व्यापार होतो. मासळी बहुतकरून कोळीच विकतात. मांस विकणारे कसाई लोक. खाटकी बाजार ह्मणून मार्किटाच्या पलीकडे एक जागा आहे, तेथें बहुतकरून कसाई लोकांची वस्ती असत्ये. जनावरें भलत्याच ठिकाणीं मारण्याची बंदी आहे. कोंबडी बाजार ह्मणून एक निराळाच बाजार आहे तेथें कोंबडीं, बदकें, कंवटें, इत्यादि विकतात.

बोंबील ह्या नांवाची मासळीच ह्या शहरांत प्रतिवर्षी साठसत्तर हजार रुपयांची खपत्ये असें सांगतात. ही बहुधा वाळवूनच विकितात. हा पदार्थ देशोदेशीं विलायतेपर्यंत जातो. हे पाहिले असतां वीत सवा वीत लांब बारीक काठीं सारिखे दिसतात. वाळीवलेल्या बोंबिलास एथील लोक काड्या, व ओल्या बोंबलांस गल्लू अथवा गटगटे ह्मणतात. मत्स्याहारी लोकांत यांचा फार खप. हे स्वस्त मिळून बारमाही सांपडतात. एका एका कोळयाच्या घरीं वाळिवलेल्या बोंबिलांच्या मुड्या वखारी भरून ठेविलेल्या असतात. या मुंबईच्या आखाताचा बोंबील हा राजा आहे असें कोळी लोक ह्मणतात. आणि हा मुंबई शिवाय दुसऱ्या [illegible]द्रांत न सांपडण्याचें असें विलक्षण कारण सांगतात. ज्या वेळीं रामचंद्रानें [illegible] जावयास सेतु बांधिला, त्यावेळीं सर्व मत्स्यांनीं त्यास सहाय केलें. परंतु

बोंबील स्वस्थ बसून राहिला. तें पाहून रामचंद्रास राग आला, आणि त्याला हातांत धरून मुरगाळिला, आणि झुगारून दिला. तो येऊन ह्या मुंबईच्या आखातांत पडला. तेव्हांपासून त्याच्या हाडांचा चुराडा होऊन तो नरम झाला, आणि त्याच्या आंगांत कांटे राहिले नाहींत. ह्मणून तो ताजा असतो तेव्हां कापसासारखा नरम असतो ! ! ! भोळे लोक शेकचिल्ली सारख्या अशा गोष्टी रचीत असतात.

बोंबील समुद्राच्या वाळूंत समुद्र किनाऱ्यावर वाळवितात. आणि हे वर्षसवा वर्ष पर्यंत टिकतात. पूर्वीं बहुधा कोळी ह्मटले ह्मणजे माजगांवांत राहात होते; आणि सगळी मासळी तेथून मुंबईस येत असे. ह्मणून या स्थळास ' मछली गांव " असें नांव पडलें होतें. मग याचा अपभ्रंश होऊन " माजगांव " असें लोक वहिवाटींत आलें, असें एक पोर्तुगीझ् ग्रंथकार लिहितो. यावरून माजगांव याचें वास्तविक नांव मछलीगांव होतें असें वाटतें.

मुंबईतील किल्ल्यांत दोन वेळ मोठी प्रचंड आग लागली, त्यामुळें ह्या शहराची फार नासाडी झाली. पहिली सन १८०२ त; ही आग बाजारगेटा जवळ जेथें वाणी, भाटये, पारशी, बोहरी इत्यादि लोक राहतात त्या ठिकाणीं अकस्मात् लागली. मुंबईतील पुरातन घराण्यांतील एका गृहस्थाकडे हें पुढील ह्या भयंकर आगीचें वर्णन सांपडलें. यांत ह्या आगीचा सविस्तर वृत्तांत आणिला आहे. या कवितेचे रचनेवरून हा कोणी त्यावेळचा देवभोळा कवि होता असें वाटतें. हे श्लोक संगतवार वाचायास यावे ह्मणून यांत कोठेंकोठें किंचित् अक्षरांची उलटापालट केली आहे, परंतु दुसरें कांहीं फिरविलें नाहीं.

प्रथम नमन माझें गौरिपुत्रा गणेशा ।। विनवित तुज भावें बुद्धि देगा महेशा ।।
पुनरपि नमियेली शारदा आद्यमाया ।। मतिवर मज देई श्लोकपद्यें कराया ।। १ ।।
दूजें प्रणम्य करितों श्रिगुरू दयाळा ।। व्हावें प्रसन्न मजला कवि बाळकाला ।।
ठेवीं कृपा वरद हस्तक मस्तकासीं ।। गातां कथा करिं सहाय तुं सेवकासीं ।। २ ।।
श्रोत्यांप्रती विनवितों कर जोडुनीयां ।। काव्ये बरें सुरस घ्या तुह्मि ऐकूनीयां ।।
मुंबैचरित्र कवि बोलत शुद्धवाणी ।। जें लक्षुमीप्रति निवेदित चक्रपाणी ।। ३ ।।

सत्राशें शक चौविसांत वरुषें दुंदूभि संवत्सर ।।
माघाची दशमीच वद्य दिनिते आला गुरूवासर ।।

दीवसाच्या अकरा घडयांवरि महा प्रलयाग्नि जो ऊठला ॥
वायूसंग मिळोनि भाग अरधा मुंबैइचा जाळिला ॥ ४ ॥
कडकडित दुपारीं चेतला अग्नि भारी ॥ मदनदहनिं जैसा कोपला त्रीपुरारी ॥
उघडुनि नयनरागें तीसरा शंकरानें ॥ रतिपति क्षणमात्रें जाळिला नीकरानें ॥ ५ ॥
घडघड गगनातें लागल्या अग्निज्वाला ॥ उठति हुडे धुराचे सूर्य लोपोनि गेला ॥
रविशशिनभतारे दृष्टि कांहीं पडेना ॥ पळतिच जनसारे मार्ग त्यांतें सुचेना ॥ ६ ॥
हवेल्यांच्या हारी नवखणि ब-या उंच दिसती ॥
जळोनी अग्नीनें कळस वरचे भूमि पडती ॥
भिती पाषाणाच्या उलटति जसे पर्वत कडे ॥
उठे त्यांचा नादो गगनिं विज जैसी कडकडे ॥ ७ ॥
किती हत्या झाल्या कितिक जिवते प्राणि जळले ॥
पशूपक्षीयाती बहुत अगनी माजि भुजले ॥
कितीका वस्तूंचा जळत सुटला माल खजिना ॥
हिरे रत्नें मोतीं जळति बरव्या दिव्य रचना ॥ ८ ॥
किती व्यापाऱ्यांचें न कळे जळलें कापड किती ॥
किनखापी थानें भलिं भलिं उंची माल किमती ॥
जरीवस्त्रें शाली रंगित खुद ज्या काशमिरिच्या ॥
दहा झाला त्यांचा मुखिं पडुनि क्षणीं अगनिच्या ॥ ९ ॥
बतावीचा माल लवंग तजते जायपतरी ॥
असंख्या पेट्यांचे ढिग पडले होते घरघरीं ॥
चिनी बंगालीचें अवल धुम रेशीम जळलें ॥
किती शर्करांचे दपोटे धुळिमाजि विखुरले ॥ १० ॥
विलाती मालाच्या लखलख वखारीच जळती ॥
बिलोरीचीं कामें तडतडतडां काचि फुटती ॥
अमोल्ये ज्या वस्तु त्रिभूवनिं अशा नाहिं मिळती ॥
घरीं व्यापाऱ्यांचे असुनि अगनी माजि जळती ॥ ११ ॥
नसे द्रव्या पार मिळुनि अवघे चोर लुटिती ॥
हामीन्या मोऱ्हांच्या धरुनि हृदयीं लोक पळती ॥

अनाजाच्या राशी कितिक जळती नाहीं गणना ॥
घृतें तेलें त्यासी अगनि दुसरा चेतवि दुणा ॥ १२ ॥
आड्मीराल समग्र लोक अवघे आर्मारिचे धांवले ॥
हातीं घेउनियां कुऱ्हाडि जळत्या सदनांत प्रवेशले ॥
मोठे धीट अरिष्ट देखुनि जिवा नाहीं जरा शंकती ॥
मांदूसा भरले धनादि हडपे फोडूनियां टाकिती ॥ १३ ॥
आला साहेब डंकन झडकरी हाकार ऐकोनियां ॥
धांवे देखुनि अग्नि दुर्धर स्वयें पाण्येंचि विजवावया ॥
केला यत्न उदंड अग्निपरि तो आटोपेना हो कदा ॥
जाळीली घटकेंत एक अवघी वाण्याचि हो संपदा ॥ १४ ॥
यंत्राचे भडमार गोळे करुनि भिंतीवरी मारिती ॥
माड्या सुंदर गोपुरें कडकडां मोडोनियां पाडिती ॥
अग्नी शांत करावया नृपतिनें युक्ती बहू योजिली ॥
आधीकाधिक वाढला अगनि हो तैं मांडवी पेटली ॥ १५ ॥

नसे पाहतां कांहिं ईलाज यासीं ॥ विचारी उभा राहुनीयां मनासी ॥
ह्मणे सत्य हा ईश्वरी क्षोभ झाला ॥ असा कोण आहे निवारील याला ॥१६॥
परतला नृपती निजमंदिरीं ॥ अमळ रात्र घड्या अकरांवरी ॥
अनल तेथुनियां मग फीरला ॥ निटदिशे उत्तरेप्रति चालिला ॥ १७ ॥

आला शेवटिं रामदास सदनीं त्याचे हवेल्यांवरी ॥
केली होळि समग्र जाळुनि घरें लंकेमधें ज्यापरी ॥
सर्व भस्म करोनियां अगन तो तेथूनि नीवारला ॥
ठाकुद्वारसमीप त्या हरिपदा देखोनियां नीवला ॥ १८ ॥
महा अग्नी तापें थरथरथरां कांपे धरणी ॥
भयाभीत झाला दशशतमुखी भूधरफणी ॥
ह्मणे कोठें ऐसा प्रलय अगनी आज उठिला ॥
गमे त्या सांबानें तृतिय नयनातें उघडिला ॥ १९ ॥
उठोनी शैलेजा पति गळिं भयें घालित मिठी ॥
जगाच्या आकांता देखुनि शिवभार्या लटलटी ॥

रमा धावोनीयां श्रिहरि चरणा दृढ धरिले ॥
असें कोणे ठायीं त्रिभुवनिं पती विघ्न उठिलें ॥ २० ॥
अश्वासुनी कमळजेप्रति बैसवीली ॥
सांगे कथा सकळ आपण वनमाळी ॥
हें विघ्न जाण उठिलें असे मृत्युलोकीं ॥
तेणें करूनि महि कंपितसे विलोकीं ॥ २१ ॥
कोंकणामध्यें सागरातिरीं ॥ म्लेंछ नांदतो मुंबईपुरीं ॥
रावणापरी सूख संपदा ॥ कोणि गोष्टिची नाहिं आपदा ॥ २२ ॥

या श्लोकांत मुंबईचा अर्धा भाग जळला असें ह्मटलें आहे तें ठीकच आहे. त्यावेळीं किल्ल्यापासून मुंबादेवीपर्यंत जमिनीस मुंबई असी संज्ञा होती. ह्या कवीनें या कवनांत कविलाघवाची सीमा सोडून तिच्या पलिकडचा मार्ग धरिला आहे. या अग्नीनें शेष, ईश्वर, पार्वती आणि लक्ष्मीनारायण ह्या सर्वांसच घाबरवून टाकिलें असें लिहिलें आहे. आणि आपण जो वृत्तांत लिहिला आहे तो विष्णु आणि लक्ष्मी यांचा संवाद आहे, असें दाखविलें. ही फारच अतिशयोक्ति आहे. आणि या कवितेंत कांहीं अशुद्धें असून कोठेंकोठें छंदोभंगही आहेत, परंतु मुंबईतील पुरातन कवितेचा मासला लोकांस दाखवावा ह्मणून हें प्रकरण साद्यंत एथें उतरून घेतलें आहे.

ही आग कशी लागली याचा शोध बराबर लागला नाहीं, परंतु हिचीं अनेक विलक्षण कारणें सांगतात. कोणी असें सांगतात कीं, एक बाई तिसऱ्या मजल्यावर वडे तळीत बसली होती, तिच्या कढईंत पाणी पडल्यामुळें एकाएकीं आगीचा भडका होऊन घराचें छप्पर पेटलें. याविषयीं दुसरा असा लेख सांपडतो कीं, ही आग सतत दहा दिवस पर्यंत घराचा व मालमत्तेचा ग्रास करीत चालली होती, आणि इतक्या काळांत शेंकडो लोकांची मिळकत जाळून भस्म करून टाकिली. ह्या वेळीं सर्व मुंबई शहरांत मोठा हाहाकार चालला होता. ही आग विजविल्या नंतर एकसारिखी सहा महिने पर्यंत धुमत होती असें सांगतात. हल्लीं मुंबईमध्यें सुमारें ऐशीं नव्वद वर्षांचा एक वृद्ध भंडारी आहे, त्यानें ही आग लागलेली पाहिली होती, त्यानें ही लागण्याचीं दोन विलक्षण कारणें सांगितलीं. तीं ऐकून हल्लींच्या आमच्या तरुण विद्यार्थ्यांस आश्चर्य वाटल्या वांचून राहणार नाहीं. त्यानें असें सांगितलें कीं, ह्या वर्षीं आर्देसर दादीशेट ह्या पारशी

गृहस्थाचे घरीं लग्न होतें, ह्या प्रसंगीं त्यानें पन्नास साठ हजार रुपये खर्चून अति सुंदर मंडप घातला होता कीं, असा पांडव निजधामास गेल्या पासून कोठेंच घातला नव्हता. हा मंडप तयार करायास त्यानें देशोदेशांतून शैंकडो रुपये खर्चून कारागीर लोक आणिले होते. हा अत्युत्कृष्ट मंडप मुंबईंत पडलेला पाहून स्वर्गांतील पांडवांस कोप आला कीं, आपण जी मयासुराकडून मृत्युलोकीं पूर्वीं सभा रचिली होती, ती यानें माजी पाडिली आणि त्यामुळें लोकांस आपला विसर पडेल ! त्यांच्या कोपामुळें हा अग्नि लागला !

आणि दुसरें कारण असें सांगितलें कीं, मुंबईंत त्यावेळीं एक नवा बैरागी आला होता. तो एक सारिखा दहा दिवस पर्यंत लोकांच्या दारोदार भिक्षेसाठीं खेपा घाली. तथापि त्याची कोणीच दाद लाविली नाहीं, तेव्हां त्यास कोप येऊन त्यानें शाप दिला. त्यामुळें मुंबईचा इतका नाश झाला ! शेट रामदास नांवाचा एक वाणी गृहस्थ कोटांत राहत होता, त्यानें मात्र ह्या बैराग्याचा परामर्श घेऊन त्यास शिधा पाठवून दिला. त्यावेळीं त्यानें त्याला आशीर्वाद देऊन सांगितलें कीं, दोन तीन दिवसांच्या आंत तुह्मी आपलें बिऱ्हाड उठवून मालमत्ता घेऊन किल्ल्याच्या बाहेर जाऊन राहा. असें सांगून तो अदृश्य झाला ! अशा गोष्टींवर विश्वास ठेवणारे वृद्ध अजून मुंबईंत बरेच आहेत.

दुसरी १८२२ त कोटांतील मोठ्या देवळाच्या मागें कापसाचे गठ्ठे रचले होते त्यांस आग लागली, तीमुळेंही मुंबईस बराच धक्का लागला. ह्या दोनही आगींपासून मुंबईस सुमारें एक कोट रुपयांवर धक्का बसला.

सन १८३७ जून महिन्याच्या पंधरावे तारिखेस मुंबई एथें एक मोठें भयंकर वादळ झालें. त्या दिवशीं शहरांतील सरकारी हपिसें, कारखाने, सर्व बंद होतीं, एक सगळा दिवस शहरांत कांहींच उलाढाल जहाली नाहीं. सतत पावसाच्या धारा लागल्या होत्या व मोठा प्रचंड वायु सुटला होता, तेणेंकरून कित्येक घरें कोसळलीं, हजारो वृक्ष उलथून पडले. शैंकडो जहाजें फुटून गेलीं. कित्येक तिर्कटी तारवें बंदरोबंदरीं येऊन पडलीं होतीं. आणि पुष्कळ लोक जायांही झाले. लाखो रुपयांचा माल मुंबईच्या आग्वातांत पसरून गेला होता. कोटांत व जिकडेतिकडे हातहात पाणी भरून गेलें होतें. त्या दिवशीं मुंबई केवळ म्लान होऊन गेली. असें सांगतात कीं, या प्रसंगीं सुमारें तीस लक्ष रुपयांचा नाश झाला.

असेंच एक दुसरें तुफान १८५४ त नवेंबर महिन्याचे पहिल्या तारिखेस झालें होतें, त्याचें वर्णन चंद्रिकेंत याप्रमाणें केलें होतें.

मुंबईंत वादळ झालें ॥ सर्वेही घाबरले ॥ धृ० ॥
॥ सनअठराशें चौपन्नांत ॥ नवेंबराची पहिली रात ॥
॥ वादळ सुटलें अकस्मात ॥ लोक झाले भयाभीत ॥
॥ उठले झोंपेंतुनी डचकत ॥ पाहुनि होती फार चकीत ॥
॥ वारा चाले बळावत ॥ मेघराजे विमानांत ॥
॥ आले बैसुनि गडगडत ॥ कौलें पक्ष्यांपरी उडत ॥
॥ झाडें लोटांगणें घालित ॥ जणु काय मारुतिताता नमित ॥
॥ घरें लाटांपरी डोलत ॥ कांहीं होतां जमीनदोस्त ॥
॥ प्राणा मुकले लोक बहूत ॥ खिडक्या दारें खडाडत ॥
॥ तावदानें फुटूनि पडत ॥ कितिएक तंबू आकाशांत ॥
॥ झुकत जाती हवाखात ॥ बावटा जाऊन त्यांस भेटत ॥
॥ मुंबईंत वादळ झालें ॥ सर्वेही घाबरले ॥ १ ॥
॥ ऐका आतां समुद्रांतली ॥ नासाडी जी बहुतचि झाली ॥
॥ तरी गलबतें फुटोनि गेलीं ॥ एकमेकावरि आपटलीं ॥
॥ कांहींकानीं समुद्रातळीं ॥ बुडी मारुनी गत घेतली ॥
॥ कितीक खाऱ्या जळा त्रासलीं ॥ जाउन टेंकडिवरी बैसलीं ॥
॥ आगबोटिची चक्रि उडाली ॥ नांगर तोडुनि धांव घेतली ॥
॥ खडकांची मग भेट जहाली ॥ फारच मग ती खराबि झाली ॥
॥ मुडद्यांनीं बंदरें फुललीं ॥ धान्यादिक तीं तरूं लागलीं ॥
॥ मालाची धुळधाणी झाली ॥ दुबळीं गरिबें फार नाडलीं ॥
॥ ऐसें वादळ पूर्वकाळीं ॥ अश्रुत बोले वृद्धावळी ॥
॥ सन्मार्गाची दर्शकमंडळी ॥ हिनें वादळस्थिती वर्णिली ॥ २ ॥ मुंबईंत० ॥

या वादळामुळें मुंबई बंदरांत दोनशें अडीचशें मनुष्यें बुडून मेलीं, व सुमारें २०० जहाजें फुटलीं. त्यांतील मालासुद्धां सर्व नासाडी झाली, तिचा आकार तीस लक्ष रुपये केला आहे. या शिवाय शहरांतील दुसऱ्या मालमत्तेची नासाडी झाली ती खेरीजच. हजारो माड पडले, घरें कोसळलीं, व वखारींतील माल नासून गेला. याप्रसंगीं मुंबईस सुमारें अर्धकोट रुपयांचा धक्का बसला असावा. मुंबईचे

सगळे खाडींत अनेक तऱ्हेचा माल पसरून गेला होता. गरीब लोक बंदरांतून टोपल्यांच्या टोपल्या तांदूळ, गहूं, बाजरी, व इतर दाणा व सडलेलें खोबरें आणि कापूस वगैरे जिन्नस आणून उन्हांत वाळवून ठेवीत.

कोठें घरास आग पेटली, कोठें मार्किट जळालें, कोठें बंदरांत तिर्कटी तारवास आग लागली, असे उत्पात प्रतिवर्षी होतच आहेत, आणि मुंबई शहरास पांच दहा लक्षांचा धक्का लागतच आहे, परंतु ईश्वरकृपेनें मुंबईच्या संपत्तीस अजून कांहीं खामी आली नाहीं. नासाडी होत्ये तिच्या दसपट अधिक उत्पन्न होतें. सन १८५१ त पन्नास खेपा आग लागली.

सन १८०२ मध्यें जी मोठी आग लागली होती, तींत सर जमशेटजी जिजीभाई यांच्या मालाची व द्रव्याची बरीच नासाडी झाली असें सांगतात. यावरून अडाणी कुणबी लोकांत एक पोरकट ह्मण आहे, तिचें स्मरण होतें. "घर जळाल्यानें संपत्ति वाढती आणि वाघानें खाल्यानें राज्यप्राप्ति होती." अस्तु. ही गोष्ट खरी आहे कीं, मुंबई शहरामध्यें पारशी गृहस्थांची किंबहुना सर्व प्रकारच्या उदमी लोकांची सद्दी आहे. पहा! सहज दिपवाळीचे दिवसांत अरास करून पेढीपूजन व दानधर्म करण्यांत व्यापारी व दुसरे लोक सहज लाख दोन लाख रुपये उडवून टाकितात. द्रव्याची बळकटी असल्याशिवाय असे खर्च करायास एकाएकीं कोणी धजणार नाहीं; हें उघडच आहे.

मुंबईतील लोक कांहीं गोष्टींमध्यें मोठे उदार आहेत. बहुतकरून पारशी लोक धर्मकृत्यास पुष्कळ द्रव्य लावितात. सन १८६२ त एका पारशी गृहस्थाच्या मुलास सदरा घालण्याचा संस्कार झाला. त्या प्रसंगीं त्यानें दीड लक्ष रुपये धर्मखात्यांत ठेविले व त्याच्या स्त्रीनें आठ दहा हजार रुपये त्या दिवशीं दानधर्म केला. सालगुदस्तां (१८६१) वायव्य प्रांतांत दुष्काळ पडल्याचें वर्तमान आल्यावरून त्या लोकांचें दुःख निवारण करण्यास कांहीं उपाय योजावे, ह्मणून टौनहालामध्यें युरोपियन व एतद्देशीय गृहस्थांची सभा भरली होती. त्यावेळीं मुंबईतील सेनाधिपति अध्यक्षस्थानीं बसले होते. या विषयीं एथें एवढेंच सांगणें आहे कीं, पंधरा दिवसांच्या आंत या परोपकारी कृत्यास एक लक्ष रुपया जमला. ही किती आश्चर्याची गोष्ट आहे! एका पारशी गृहस्थानें तर ९०,००० हजार रुपये प्रथमच आणून गरीब लोकांचीं दुःखें लागलींच निवारायासाठीं व्याजाशिवाय मोबदला करायास दिले, या शिवाय त्यानें हजार रुपये वर्गणी दिली. सर्व मुंबई

इलाख्यांत या परोपकारी कृत्यास दोन लक्षांवर रुपये तीन चार महिन्यांच्या मुदतींत जमा झाले, व इंग्लंड देशांतून सुमारें सहा लक्ष रुपये आले, मिळून सर्व द्रव्य ८,५१,८३८ रु०–३–११ वर्गणी जमली. परंतु ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे कीं, आमच्या लोकांत भूतदया, दातृत्वशक्ति आणि औदार्य हीं बहुधा इंग्रज लोकांचीं मुखें अवलोकन केल्यावांचून जागृत होत नाहींत. हिंदूलोकांत तर दातृत्वशक्ति अलीकडे कमी होत जात्ये. आणि त्याप्रमाणें त्यांचें ऐश्वर्यही उत्तरोत्तर क्षीण होत चाललें आहे. "जशी दानत तशी बरकत" अशी ह्मण आहे, व दुसरें असें आहे "साखरेचें खाणें त्यास देवाचें देणें." पारशी लोकांत उदारपणा मात्र या शहरांत वर्णावया जोगा आहे. मुंबईपासून सुमारें सहा कोसांच्या अंतरावर ठाणें जिल्ह्यांत चेंबूर ह्मणून एक गांव आहे त्याच्या नजीक एक लहानशी खाडी आहे, तीमुळें गरीबगुरीब लोकांस आसपास जाण्यास अडचण पडे. हें ऐकिल्यावरून सन १८६१ मध्यें मयत धनजीभाई नसरवानजी कामा याची पत्नी धनबाई इनें ती खाडी बुजवून बांध बांधून सरळ रस्ता बांधायासाठीं १५,००० रुपये दिले. असीं उदाहरणें या लोकांत शेंकडो सांपडतील. शेट खरशेटजी नसरवानजी कामा हे गरीबगुरीब विद्यार्थ्यांस मदत करण्यांत व लोकांचें हरप्रकारें कल्याण करण्यांत दरमहा शेंकडो रुपये खरचतात. सन १८६२ च्या मे महिन्यांत ल्यांकशायर या प्रांतांत दुष्काळ पडल्याचें वर्तमान इंग्लंडहून आलें. त्या लोकांचें दुःख निवारण्याकरितां मुंबईंतील लोकांनीं आठ पंधरा दिवसांच्या अवधींत सुमारें पाऊण लक्ष रुपये जमा केले. यांतील बहुतेक मोठया रकमा पारशी लोकांनींच भरल्या. या प्रकारच्या यादी प्रतिवर्षी अनेक सदरांखालीं श्रीमान् व उदार लोकांच्या घरीं किमानपक्ष दहा पंधरा जात असतात.

सन १८६२ त पारशी लोकांतील गृहस्थांनीं असा ठराव केला आहे कीं, त्यांच्या शास्त्राप्रमाणें अंधारू व दस्तूर यांचें काम चालविण्यास जे लोक त्यांचें शास्त्र पढून त्यांत निपुण होतील त्यांसच धर्मकृत्य चालविण्याचा अधिकार द्यावा, आणि त्यांचें शास्त्र पढिवण्यासाठीं एक शाळा घालावी. आणि तींत मुलें शिकून हुशार झाल्या नंतर त्यांस दस्तूराची दीक्षा द्यावी. ह्या कृत्यास सर जमशेटजी जिजीभाई यांच्या पत्नीनें सदतीस हजार रुपये दिले आहेत असें सांगतात.

# प्रकरण ७.

कुत्रे मारण्याचा हुकूम--पारशी लोकांचा दंगा-चोर व लबाड लोक-बंदरांतील तर्कटी लोकांची टोळी-मुसलमान लोकांचा दंगा-सन १८५७ तील बंगाल देशांतील पलटणीचें बंड-प्रार्थनेचे मासले-रूस देशाशीं इंग्रजाची लढाई चालली होती त्यावेळीं मुंबईतील लोकांच्या प्रार्थना-सन १८५८ त राणीचा सरकारनें प्रगट केलेला जाहीरनामा.

वर्षांतून तीन चार महिनेपर्यंत कुत्रे मारावे असा एक या शहरांत सरकारी कायदा होता. त्या बरहुकूम प्रतिवर्षी जाहिराती छापून नाकोनाकीं चिकटवीत. अथवा शहरामध्यें थाळी पिटीत; मग सरकारी शिपाई व कुत्रेमारू लोक रस्तो-रस्तीं फिरून सांपडेल त्या कुत्र्यास मारून टाकीत आणि त्याबद्दल त्यांस दर कुत्र्यास आठ आणे इनाम मिळे. असी ही वहिवाट पुष्कळ वर्षेपर्यंत चालली होती. कुत्रे मारण्याचा कायदा केव्हांपासून सुरू जहाला व तो कां केला याचा बराबर शोध लागत नाहीं. परंतु ज्यास विचारावें, तो ही वहिवाट पुष्कळ वर्षां-पासून आहे असें सांगतो. सुमारें साठ वर्षांच्या एका गृहस्थानें या विषयीं असें सांगितलें कीं, आपण पंधरा वर्षांच्या वयांत होतों तेव्हां हा कायदा नवीनच निघाला होता. यावरून हा कायदा निघून आज ४५ वर्षें झालीं असें दिसतें.

ह्या विषयीं कोणी असें सांगितलें कीं, मुंबईत कांहीं वर्षांमागें एक सधन सरकारी इंग्रज कामगार कुत्रा चावून मेला. त्यानें मरते समयीं सरकारांत पुष्कळ द्रव्य ठेवून असा अर्ज केला कीं, मुंबई शहरांत जीं रस्तोरस्तीं कुत्रीं फिरून लोकांस उपद्रव करितात, व येणाऱ्याजाणाऱ्यांच्या आंगावर धांवून येतात, त्यांस प्रतिवर्षी आपल्या अनामत ठेवलेल्या द्रव्याचें जें व्याज येईल तें खर्च करून मारून टाकावीं. ह्याप्रमाणें ही वहिवाट पुष्कळ वर्षें चालत आली. कुत्रेमारू लोक कुत्रे मारून पोलिस मास्तरास नेऊन दाखवीत, ह्मणजे त्यांस दर कुत्र्यास अर्ध रुपया मिळे. याप्रमाणें प्रतिदिवशीं गाडा दोन गाडे मेलेलीं कुत्रीं जमत. मग तीं नेऊन पुरून टाकीत. कधींकधीं मारून रस्त्यावरच टाकीत, मग तीं एक

दोन दिवसांनीं कचऱ्याच्या गाडींत घालून नेत. पुढें कांहीं वर्षांनीं पोलिस मास्तरानें असा हुकूम केला होता कीं, कुत्रे मारून टाकावे, आणि त्यांच्या शेंपट्या सरकारांत दाखल कराव्या, ह्मणजे त्याला वहिवाटीप्रमाणें बक्षीस मिळेल, परंतु त्यामध्यें बहुतेक तनखोरी करावयास लागले. ती असी. कुत्रा रस्त्यांत सांपडला असतां त्याचें शेंपूट कापून घ्यावें आणि त्यास सोडून द्यावें. मग पूर्ववत् कुत्रे मारून चौकीवर नेऊन दाखविण्याचा हुकूम झाला. पुढें सन १८३० च्या सुमारास सर जमशेटजी जिजीभाई, शेट मोतीचंद खेमचंद, शेट देवीदास मनमोहनदास, व दुसरे कित्येक पारशी व दक्षिणी महाजन मिळून सरकारास अर्ज केला कीं, कुत्रे असे मारितात ते मारूं नयेत. परंतु सरकारानें त्यांस पकडून कोठें तरी नेऊन सोडावें. हें कांहीं वर्षें सरकारानें कबूल केलें. मग कुत्र्यांस धरून नेऊं लागले. हे धरून ठेवलेले कुत्रे एक वखार भाड्यानें घेऊन तींत ठेवीत. आणि संधि सांपडेल तेव्हां जहाजांत भरून बाहेर लावून देत. असी ही वहिवाट कांहीं दिवस पर्यंत चालली. कुत्रेमारू लोक अर्ध रुपयाच्या आस्थेने सांपडेल तिकडून कुत्रे धरून नेत. कोणाच्या ओटीवरून धरून नेत, कोणाच्या वाड्यांत शिरून धिंगामस्ती करून कुत्रे घेऊन जात. त्यांस एक सरकाराचा हुकूम, दुसरें पोलिस अंमलदार बरोबर असे, आणि तिसरें दर कुत्र्यास आठ आणे मिळत. मग काय विचारता ! परंतु सरकाराची जाहिरात असी असे कीं, धन्यावांचून रस्त्यांत व गल्लींत जे कुत्रे फिरत असतील त्यांसच मारावे, व धरून आणावे. कोणाच्या वाड्यांत व ओटीवर असतील त्यांस धरूं नये.

वाणी इत्यादि गुजरलोक कुत्र्यांचा प्रतिपाळ करण्यांत व त्यांस अन्नपाणी देण्यांत मोठें पुण्य आहे असें समजतात. त्यांस कुत्र्यांची याप्रमाणें दशा होत्ये, हें पाहून फार वाईट वाटे. परंतु सरकारापुढें नाइलाज असें ह्मणून उगेच राहत. पारशी लोकांत कुत्रा हा पवित्र प्राणी मानितात, व उत्तरकार्य होतें,तेसमयीं त्याची त्यांस गरज पडती. जसा हिंदूलोकांत कावळ्यानें पिंडास स्पर्श केला पाहिजे, तसाच प्रकार पारशांमध्येंही आहे. अशा प्रसंगीं कांहीं अन्न तयार करून ते कुत्र्यास घालितात. ह्मणून हे लोक कुत्र्यावर फार भक्ति ठेवितात. कुत्रेमारू वाड्यांत शिरून गृहस्थांच्या ओटीवरील कुत्रे बेधडक धरून नेत, हें पाहून त्यांस मोठें दुःख होत असे.

सन १८३२ जून महिन्याचे सातवे तारिखेस पारशी लोकांनीं मुंबईंत हरताळ पाडून मोठा दंगा केला. त्याचें कारण असें सांगतात कीं, पूर्वदिवशीं कुत्रेमारू लोकांनीं कोटांतील पारशी वाड्यांत शिरून कित्येक गृहस्थांच्या ओटी-वरील कुत्रे धरून नेले. त्यावेळीं पारशी लोकांनीं त्यांस सांगितलें कीं, हें तुह्मी करूं नका, व असे कुत्रे धरणें सरकारी कायद्या विरुद्ध आहे. तर जीं कुत्रीं धरिलीं आहेत तीं सोडून द्या. परंतु त्यांनीं तें ऐकून न घेतां कुत्रे घेऊन चालते झाले. त्यावेळीं पारशांची आणि त्यांची थोडी लटापटी झाली. नंतर आसपासचे शेंपन्नास पारशी जमून असा कट केला कीं, जून महिन्याचे सातवे तारिखेस मुंबईंतील दाण्यादुण्याचीं वगैरे सर्व दुकानें बंद पाडून हरताळ पाडावा, आणि इंग्रज लोकांचें खाणें बंद होई असें करावें. असी मसलत करून त्यांनीं कोटांतील व बाहेर कोटांतील बाजारच्या लोकांस मसलत देऊन तयार केलें. परंतु ह्यामध्यें एक गोष्ट संतोषाची होती कीं, श्रीमंत पारशी लोक यांत नव्हते, व त्यांस ह्या गोष्टीची माहिती देखील नव्हती. ह्या दंग्यांत पारशी लोकांचे बबरजी, पाणके आदिकरून बहुतेक हलक्या प्रतीचे लोक असून पांच पंचवीस मध्यम प्रतीचे गृहस्थ होते. ह्या दिवशीं त्यांनीं बाजार बंद करून सोल्जर व इतर इंग्रज लोकांस रोटी व पांव कुलाब्यास जात होते ते बंद केले. कित्येक खाटकी लोक यांस अनुकूल नव्हते, ते मांस घेऊन जात असतां त्यांस मारून त्यांकडचें मांस घेऊन कोटाच्या चरांत टाकून दिलें. किरिस्तांव लोक पांव घेऊन जात होते, त्यांचे पांव रस्त्यांत फेंकून देऊन त्यांस हाकून लाविलें. याप्रमाणें त्यांनीं सकाळपासून दहा अकरा वाजत तोंपर्यंत धिंगामस्ती चालविली. हें पाहून इंग्रज लोकांस मोठी दहशत प्राप्त झाली. माजिस्त्रेटानें टौनमेजरास लिहून पाठविलें कीं, पारशी लोकांनीं दंगा मांडिला आहे, तर त्याचा बंदोबस्त करायास कांहीं लष्कर पाठवून द्यावें. परंतु पुष्कळ वेळपर्यंत त्यानें तसें केलें नाहीं. कुलाब्यास गोरी पलटण होती तीस खाणें पोहोंचायाचें तें त्या दिवशीं पोहोंचलें नाहीं. इंग्रज लोकांच्या गाड्या हपिसांत जात होत्या त्यांस अटकाव करूं लागले. कित्येक हपिसें उघडूंच दिलीं नाहींत. याप्रमाणें यांनीं धुमाळी मांडिली होती. सुप्रीम कोटांतील मुख्य न्यायाधीश सर जान आद्री हे त्या रस्त्यानें कचेरीस जात होते, त्यांच्या गाडीस अडविलें आणि रस्त्यांतील कचरा व एक दोन मेलेल्या घुसी त्यांच्या गाडींत फेकून दिल्या. असा यांनीं अनर्थ मांडिला. मग माजिस्त्रेटानें कित्येकांस धरून कैद केलें, व

सर जमशेटजी जिजीभाई व दुसऱ्या प्रख्यात पारशी गृहस्थांस यांचा बंदोबस्त करण्याविषयीं सांगून पाठविलें. त्यांनींही यांस शांत करण्याचे उपाय योजिले, परंतु जे अडाणी लोक आपल्या गुरमींत होते ते शुद्धीवर येईनात. मग टौनमेजर यांनीं कुलाब्याहून दोन तीन वाजतानां गोऱ्या लोकांची पलटण आणून उभी केली. अशा मसलतीनें कीं, तसाच प्रसंग गुजरला असतां बार सोडण्याचा हुकूम करावा. त्याचा हा निकर पाहून पारशांची टोळी विसकळीत पडत चालली. मग त्यांची जूट फुटली आणि हळूहळू जिकडेतिकडे पळूं लागले. त्यांमध्यें कित्येक बळकट व पहिलवान होते. परंतु शेंपन्नास गोऱ्यांपुढें गरीब बापुडे होऊन गेले. नंतर त्यांतील कित्येकांस धरून कैद केले होते; त्यांस कोणास दोन, कोणास तीन वर्षांच्या टेपी देऊन शिक्षा केली. ह्या दंग्यांत कांहीं खून झाला नाहीं ही एक गोष्ट पारशी लोकांच्या दंग्यांत सांगाया जोगी आहे. ह्या दंग्यामुळें पुष्कळ वर्षें-पर्यंत पारशी लोकांविषयीं इंग्रज लोक थोडे विरुद्ध होते. परंतु त्यांत संभावित व सुशिक्षित लोकांचें मत बिलकुल नव्हतें, व ते ह्या दंगा करणाऱ्या पारशी लोकांशीं फार विरुद्ध होते, असी जेव्हां इंग्रज सरकारची पक्की खात्री झाली तेव्हां त्यांची समजूत पडली. मग पूर्ववत् किंबहुना जाजती सरकारची त्यांजवर प्रीति बसली.

हल्लीं रस्त्यांत सांपडतील ते कुत्रे धरून टाकायासाठीं बैलाच्या गाडीवर मोठे लोखंडाचे पिंजरे केले आहेत. त्यांत घालून त्यांस नेऊन पांजरापोळांत कोंडून ठेवितात.

मुंबईमध्यें इंग्रज लोकांचा अमल चालू झाल्यापासून दरोडे, पुंडावकीं, अशा चोऱ्या होणें हळूहळू बंद होत गेलें होतें. परंतु साधारण चोऱ्या व तर्कटें पुष्कळ वर्षेंपर्यंत चालत असत. असें सांगतात कीं पूर्वीं लोक दिव्यांत वात पडली कीं, दरवाजे बंद करून जिकडे तिकडे चोरांच्या व तर्कटी लोकांच्या भयानें घरांत पडून रहात. रस्त्यांतून जात असतां संध्याकाळच्या कित्येकांच्या पागोट्या जात, व कित्ये-कांच्या आंगावरचे दागिने काढून घेऊन हाणमार करून त्यांस लावून देत. मार्कि-टांत खिसेकात्रु व दुसरे लुच्चे लबाड लोक अनेक तऱ्हेचीं ढोंगें करून गरीब लोकां-सच लुटून घेत इतकेंच नाहीं, परंतु मी मी ह्मणणारांची देखील केव्हांच रेवडी करून टाकीत. कित्येक मेमण व खोजे लोकांची टोळी कांपाच्या मैदानाजवळ, डोंगरीवर व खाटकी बाजाराजवळ एका तऱ्हेचा फितीचा जुगार मांडून बसे, आणि ते त्या योगानें लोकांस नागवून घेत. कदाचित् तो कांहीं हुजत करायास

लागला तर धक्काबुकी करून त्यास मारून पळून जात. कित्येक व्यापाऱ्यांचीं सोंगें घेऊन कांहीं दागिने व दुसरा माल स्वस्त दरानें विकतों असें सांगून त्याच्या जवळचें द्रव्य बुचाटून घेऊन दंगामस्ती करून पळून जात. कित्येक लोकांचे जीव देखील घेत. एक टोळी होती तिचा धंदा हाच होता कीं, लोकांच्या वखारींतून रात्रीचा माल लुटून न्यावा. तिची असी गोष्ट सांगतात कीं, तिच्या मुकादमाजवळ सुमारें दोनशें चारशें अनेक तऱ्हेच्या किल्लया होत्या आणि रात्र पडली ह्मणजे तो हाताच्या सगळ्या बोटांत तीस चाळीस सोन्याच्या अंगठ्या घाली आणि कांहीं मंडळी बरोबर घेऊन चाव्यांचा घोस कंबरेस बांधून बाहेर पडे. मग ज्या वखारींत चांगला माल असेल तीस चावी लावून माल बाहेर काढी. तेव्हां कोणी अडथळा करूं लागला कीं त्याच्या हातांत एक दोन अंगठ्या टाकून त्यास थंड करी. आणि मग निर्धोकपणीं वखार खालीं करून टाकी..

सुमारें पस्तीस वर्षांमागें एक विलक्षण रितीची तर्कट मंडळी ह्या शहरांत निघाली होती. हे लोक दिवसा ढवळ्यां उघडीपणीं सावकार लोकांचे हजारो रुपये राजरोश लुटीत.

त्यांचा प्रकार असा होता. ह्या टोळींतील दहा पंधरा लोक जमून शेंदीडशें रुपये दरमहा कबूल करून एकादा बंगला भाड्यानें घेत. व त्यांत एकजण इंग्रजाचें सोंग घेऊन व्यापाऱ्याचा डौल घालून पडदा लावून बसे. व कोणी कारकून, कोणी खजानजी, कोणी दलाल असे होऊन व्यापारी लोकांस बोलावून आणून त्यांजकडून मोत्यें; शाली, सोनें, पोवळीं, असा नकद माल खरीद करीत. आणि लागलाच तो एकाद्या व्यापाऱ्यास स्वस्त मोलानें विकून त्याचे टक्के करीत. किंवा आपसांत वांटून घेत. मग खुर्च्या, टेबलें, व दुसरें जें हपिसाकरितां सामान सजविलें होतें, तेंही अर्ध्या मोलास एकाद्या जरीपुराण्यास विकून टाकून चालते होत. आणि मालाची मुदत भरून सावकार पैका मागायास यावयाच्या पूर्वीं जिकडेतिकडे सामसूम होऊन कांहीं पत्ता लागूं देत नसत. कधींकधीं मोंगलाचें, नवाबाचें, किंवा एकाद्या राजाचें सोंग घेऊन एकाद्या वाड्यांत जाऊन रहात. मग त्याच्या नांवावर हजारो रुपयांचा माल घेऊन ह्याच प्रमाणें पळून जात. असीं अनेक तऱ्हेचीं तर्कटें होत. कोणत्यावेळीं कोणत्या मनुष्यास कोणत्या रितीनें हे लोक फसवितील याचें प्रमाण नव्हतें. हल्लीं या प्रकारचीं बहुतकरून तर्कटें मोडिलीं

आहेत. तरी लबाड लोकांचा जथ्था अजून मोडला नाहीं. "गांव आहे तेथें ह्मारवाड आहेच."

दुसरी एक अट्टल तर्कटी लोकांची जूट पुष्कळ वर्षांपासून मुंबईंत होती, हीस बंदरग्यांग असें ह्मणत. हींत प्रतिष्ठित खोजे, मेमण, लवाणे, भाट्ये, व दुसऱ्या जातीचे लोक होते. हे सर्व मिळून सुमारें तीनशें लोकांची टोळी होती. हींत कित्येक लाखो रुपयांचे धनी होते, आणि हे सभ्य लोकांत गणले जात. ह्यांच्या गाड्या, घोडे, व हवेल्या पाहूनच लोकांस त्यांचा प्रतिष्ठितपणा कबूल करणें भाग पडे. ह्यांतून कित्येकांचीं मोठमोठालीं जहाजेंही होतीं. आपला तर्कटी धंदा चालवायास ह्यांनीं पुष्कळ मचवे ठेविले होते. आणि ह्यांचा सगळा व्यापार रात्रीचा चाले. हे लोक बाहेर गांवांतून तंबाखू व दुसरा माल आणून बंदरांत उतरीत. आणि तो जकात भरल्यावांचून शहरांत आणून वखारींत भरून टाकीत. हें कृत्य साधायास त्यांनीं कनिष्टेबल, हवालदार, व पोलीसचे व कष्टम-खात्यांतील कित्येक शिपायांस दरमहा ठरावून आपल्या हाताखाल करून ठेविले होते! सरकारांतून कामगारांस जसा दरमहा मुशारा मिळतो त्याचप्रमाणें हेही लोक त्यांचीं नांवें लिहून त्यांचें वेतन महिन्याच्या महिन्यास पोहोंचवीत असत असें सांगतात. ह्याशिवाय ते एकादे वेळीं डाव साधला तर बंदरांतील माल लुटून नेत. तारवावर देखील घाला घालायास चुकत नसत. ह्यांनीं मुंबई बंदरांत मोठाच गहजप मांडला होता, परंतु पुष्कळ वर्षें पर्यंत याचा कांहींच शोध लागला नाहीं. यांत जे आठ दहा असामी लक्षाधीश होते, ते केवळ मालखाऊ मात्र. काम करणारे निराळेच होते, हे घरीं बसल्या प्रतिवर्षीं हजारो रुपये आपल्या जामदारखान्यांत ओढून घेत. परंतु वाईट कर्म कितीही सावधगिरीनें केलें तरी तें उघडकीस आल्यावांचून रहाणार नाहीं. ईश्वर दुष्ट लोकांस मागें पुढें केव्हां तरी शासन करतोच. कर्मधर्म संयोगानें यांच्या तर्कटाचा घडा फुटून सुमारें सन १८४३ त ज्यावेळीं पोलिस-खात्यांत कपतान बरोज यांचा अमल चालला होता, त्यावेळीं हा सर्व प्रकार उघडकीस येऊन कित्येक तर्कटी लोकांस धरिलें. कित्येक पळून गेले व कित्येकांस शासन होऊन काळ्यापाण्यावर पाठविलें.

मुंबईंतील बंदरांत वर्ष दोनवर्षीं माल भरलेल्या मोठमोठाल्या तर्कटी जहा-जांस आग लागून तीं एकाएकीं जळून जात, परंतु हा अनर्थ होण्याचें मूळ कांहीं सांपडत नसे. पुढें दैव गतीने हेंही उघडकीस आलें. ह्याचा असा प्रकार होता

कीं, सदरीं सांगितलेल्या टोळींतील कित्येक असामी व्यापारांत प्रख्यात होते, ते कापूस, अफीण, किंवा दुसऱ्या मोठ्या किमतीचा माल चिनास किंवा इंग्लंडास जाण्याचा आहे, असें सांगून एकादें मोठें तारूं नोरीं घेत. आणि त्यांत असा माल भरतों असें विमा उतरणाऱ्यांस सांगून त्याबद्दल त्यांत रेती, माती, कचरा, कांटे, दगड, चिंध्या, मिळेल तें भरून त्याचे गठ्ठे तयार करून तारवावर चढवीत. आणि आपण कापूस किंवा अफीण चडविली आहे असें विमा उतरणाऱ्या मंडळीस सांगून एकदम पांच सात लक्ष रुपयांचा विमा उतरीत. आणि मग त्या जहाजाचा नांगर उचलून बंदरांतून थोडेसें बाहेर गेलें म्हणजे त्यास आग लावण्याची किंबा बुडवून टाकण्याची तजवीज ठेवीत. आणि मग तें साधलें ह्मणजे विमावाल्यांकडून एकदम लाखो रुपये भरून घेत. ही असी जहाजास आग लावण्यास व बुडविण्यास ते जहाजांतील कपतानास हातीं धरीत. व त्याच्या हाताखालील कित्येक खलासी लोकांसही फितूर करून त्यांजकडून हें अघोर काम करवीत.

ह्यांचीं कर्में अशा प्रकारें उघड झालीं. सन १८४२ च्या अक्टोबर महिन्यांत ह्या टोळींतील कित्येक असामीनीं बेल्‌विडेर या नांवाच्या एका जहाजावर आपण उंच किमतीचा माल चढवितों असें सांगून वहिवाटी प्रमाणें त्यांत भलत्याच प्रकारचे गठ्ठे लादून त्याजवर सुमारें साडेसात लक्ष रुपयांचा विमा उतरला. आणि त्यांतील कपतानास पुष्कळ द्रव्य देऊं करून रस्त्यांत या जहाजास आग लावून जाळून टाकण्यास मथविलें. मग त्यानें शिंगापुरच्या रस्त्यावर ह्या तारवास आग लावून जाळून टाकिलें, ही बातमी लागतांच विमावाल्यांकडे ह्यांनीं रुपयांचें मागणें केलें. पुढें ह्या मंडळींतील लोकांमध्यें द्रव्याच्या वांटणीमध्यें कांहीं कमज्यास्त झाल्यामुळें आंतच्या आंत फुटाफूट होऊन एक दोघे सरकारतर्फेनें साक्षीदार होऊन हें कृत्य सरकारांत कळविलें. मग हें सगळें तर्कट उघडकीस आल्यावर ह्यांची टोळी फुटून जिकडे तिकडे पळून गेली. अलुपारु व त्याचे कित्येक सोबती हे हपूसणांत जाऊन लपून राहिले होते. परंतु सरकारानें मोठी खटपट करून त्यांस सन १८४४ त धरून आणून अक्टोबर महिन्याच्या सेशनांत त्यांचा इनसाफ केला. ह्यांचा इनसाफ एकसारिखा तीन दिवस होत होता. त्याचा ठराव होऊन अलुपारु यास काळ्यापाण्याची जन्मटेप व शिवजी

आमल यास दहा वर्षांची टेप झाली, आणि हाजी भोगाभाई यांस दीडवर्षांची नव्या तुरुंगांत सक्त मजुरीची शिक्षा झाली.

सन १८५१ अक्टोवर महिन्याच्या सत्राव्या तारखेस ह्या शहरांत सकाळचे दहावाजतां मुसलमान लोकांचा मोठा दंगा झाला. ह्याचें कारण असें सांगतात कीं, चित्रज्ञानदर्पण नांवाचें वर्त्तमानपत्र एक पारशी छापीत असे. त्यांत दरखेपेस तो अनेक लोकांतील नामांकित पुरुषांचीं चित्रें काढून त्याचा थोडा वृत्तांतही छापी. एके खेपेस त्यानें मुसलमान लोकांचा पैगंबर महंमद याचें चित्र काढून शिला छापावर छापून त्याचा थोडा वृत्तांत लिहिला. जें महंमदाचें चित्र काढिलें होतें तें सुरेख व अवयव शुद्ध नसून त्याच्या एका डोळयावर शाईचा बोळा असल्यामुळें तो एका डोळयानें अंध आहे असें दिसे. असें हें चित्र कोणी बुद्धया नेऊन शुक्रवारीं सकाळच्या प्रहरीं मार्किटांत जुमामशिद आहे तिच्या दरवाजावर चिकटवून दिलें. जेव्हां मशिदींतून निमाज पढून मुसलमान लोक सुमारें दोन प्रहरचे अकरा वाजतां बाहेर पडले तेव्हां त्यांच्या दृष्टीस हें आपल्या पैगंबराचें वेडेंविंद्रें चित्र पडलें. हें पाहून त्यांस आवेश आला कीं, हें कोणी पारशानें आपल्या पैगंबराची हेळणा करायास चिकटवून दिलें आहे, तर आपण त्याचा सूड उगवावा. असा निश्चय करून शेंकडो मुसलमान "दीन दीन" ह्मणत मोठ्या आरोळया ठोकीत हातांत सोटे घेऊन पारशी लोकांचा सूड घेण्यास निघाले. आणि रस्त्यांत पारशी सांपडेल त्यास मारीत सुटले, व त्यांत कित्येक दुसरे लोकही जखमी झाले व मेले. कांपाच्या मैदानांत एक दोन पोर्टुगीझ् लोक जखमी झाले. हे लोक पोलिसचे शिपायांस देखील आटोपेनातसे झाले. बाजारांत लुटालूट होऊं लागली. सराफ लोकांनीं आपल्या पेढ्या बंद केल्या व जिकडे तिकडे पळापळ सुटली. पारशीलोक तर फारच घाबरून गेले व कित्येक आपआपल्या घरीं जाऊन कवाडें लावून दडून राहिले. ह्या मुसलमान लोकांच्या जागोजागीं टोळया फिरूं लागल्या. शहरचे कोतवाल यानीं फार प्रयत्न केले तरी हा दंगा थंड होईना. मग पलटणीचे लोक आणून जागोजागीं ठेविले व पोलिसचे शिपायांची संख्या वाढविली. मार्किटांतील चौकी पासीं पलटणीची एक तुकडी सतत एक महिना होती. असी यांची ही मारहाण व दंगा सतत एक महिना पर्यंत चालला होता. ह्या दिवसांत मुलें माणसें

व बायका रस्त्यांतून जायास फार भीत. पारशी लोकांची तर पांचावर धारण बसली होती.

पारशी व मुसलमान लोकांचें वैमनस्य एक सारिखें एक वर्ष पर्यंत चाललें होतें. वर्षभर मारामाऱ्या व दंगे होत नसत. तरी पारशी लोक मुसलमान लोकांच्या मोल्ल्यांतून जाण्यास धजत नसत. पुढें दुसऱ्या वर्षी पोलिस कमिशनर, सकरतारी लम्सडन, व दुसरे एक दोन नामांकित सरकारी हुद्देवाले मिळून मुसलमान व पारशी लोकांची सभा मिळविली. त्यांत मुसलमान लोकांचा काजी व दुसरे मुख्य असामी होते. याप्रमाणें पारशी आणि मुसलमान लोकांचें सख्य करून दिलें. ज्यानें हें चित्र छापविलें होतें त्याजकडून क्षमा मागविली. त्यानें हा आपला अपराध कबूल केला व ही गोष्ट केवळ गैरसमजुतीनें झाली असें सांगितलें. तेव्हांपासून हा कज्जा मिटून मुसलमान व पारशी लोकांची एकी झाली. ज्या दिवशीं पारशी आणि मुसलमान लोकांचें समेट झालें त्या दिवशीं संध्याकाळचे कित्येक नामांकित पारशी आणि मुसलमान गृहस्थ गाड्यांनीं बसून मुसलमान लोकांच्या मोल्ल्यांतून फिरायास निघाले होते. त्यांची रचना असी होती. दरगाडींत एक दोन पारशी, दोघे मुसलमान, व एकादा इंग्रज कामगार असे गाडींत बसून एक दोन मुख्य रस्ते फिरून आले. याविषयीं ज्ञानोदयांत याप्रमाणें लिहिलें आहे.

" चित्रज्ञानदर्पण या नांवाच्या एका गुजराथी वर्तमान पत्रांत महंमदाचें चित्र काढून त्याचा वृत्तांत लिहिला आणि तें चित्र कांहीं एकांनीं मुसलमानांच्या मशिदीपाशीं चिकटविलें. त्यावरून कांहीं अज्ञानी मुसलमान लोकांस असें वाटलें कीं, आमच्या पैगंबराची हेळणा पारशी लोकांनीं आरंभिली आहे, असा द्वेष धरून त्यांनीं पारशी लोकांशीं तुफान आरंभिलें. हल्लीं पंधरा दिवसां पासून एथें मोठा गवगवा चालला आहे; दोनतीन वेळ मुसलमान व पारशी यांची मारामारी झाली. चित्रज्ञानदर्पणवाला यावर कांहीं दोष आहे असें नाहीं. त्यानें महंमदाचा वृत्तांत इंग्लिश पुस्तकावरून काढिला, व चित्रही याप्रमाणें काढिलें. आणि असें करायास त्यास अधिकारही आहे, त्यानें निंदा बनावून दोषानें लिहिलें असतें तर त्यास शिक्षा देणें प्राप्त होती, परंतु त्यानें असें केलें असें दिसत नाहीं. धर्मावरून लोकांस शिव्यागाळी दुरुत्तरें छापणें हें वाईट आहे. आणि जे असें करितात त्यांस शिक्षाच केली पाहिजे

परंतु त्यावरून मारामारी करणें हा फारच मोठा अन्याय आहे. कोणाला ज्या गोष्टी विषयीं वाईट वाटतें, त्यानें सरकारापाशीं फिर्याद करावी ह्मणजे सरकार चौकशी करून योग्य ठराव करील. जे मारामारी करितात त्यांचें चालेल असें नाहीं, उलटी त्यांची फजिती होत्ये, व सरकार त्यांस मोठी शिक्षा देईल.

हल्लीं सर्व लोकांनीं विचार करावा कीं, जर यावेळेस मुसलमान सरकार असतें तर पारशी वगैरेचें कसें झालें असतें ? परंतु हें सुज्ञ निःपक्षपाती सरकार आहे, ह्मणून परमेश्वराचे उपकार मानून आनंद करावा व या सरकारच्या अनुकूलतेनें वागावें. ”

सन १८५७ त बंगाल इलाख्यांत पलटणीच्या लोकांनीं मोठें बंड माजविलें. त्यामुळें हिंदुस्थानांतील रयतेची व कंपनी सरकाराची फारच नासाडी झाली. बंगाल खात्याच्या बहुतेक काळया पलटणी फितूर होऊन हा दंगा बळावला. दिल्ली, लखनौ, उज्जनी, अशा जागोजागीं ह्यांनीं उच्छाद मांडला होता. तेथें लढाया होऊं लागल्या, व त्यांत कित्येक इंग्रज कामगार मारले गेले. तसेंच लष्करांतील दुसरे शेंकडो लोकही पडले. ह्या बंडवाल्या लोकांनीं जेथें जेथें इंग्रज लोकांचीं ठाणीं होतीं तेथील इंग्रज लोकांच्या स्त्रिया व मुलें माणसांचा विनाकारण घात केला. असे उत्पात ह्या शिपाई लोकांनीं मांडल्यामुळें सर्व हिंदुस्थान भयाभीत होऊन गेलें होतें. मुंबईतील लोकांचीही अशीच अवस्था झाली. परंतु ईश्वरकृपेनें मुंबई इलाख्यांतील पलटणींत कांहीं बंड झालें नाहीं व मुंबईत रहाणाऱ्या लोकांच्या केशासही धक्का लागला नाहीं. ह्यावेळीं मुंबई सरकारानें मोठ्या चातुर्यानें मुंबईत बंदोबस्त ठेविला होता. हें बंड बंगाल इलाख्यांत उद्भवलें होतें, परंतु परिणामीं भरतखंडांतील सर्व रयतेस त्याचें दुःख भोगावें लागलें.

हें बंड समूळ मोडून टाकायास सरकारास सुमारें कोट दोनकोट रुपये खर्च बसला. तें एकसारखें दोन वर्षे पर्यंत चाललें होतें. मुंबईतील पलटणीं पैकीं दोघे असामी ह्या बंडास सामील होते असा त्यांजवर आरोप आल्यावरून त्यांस कांपाच्या मैदानांत सर्व पलटणीं समोर उभे करून तोफेचे तोंडीं देऊन उडवून टाकिलें. हें महा अरिष्ट उपस्थित झाल्यापासून तें दूर होई पर्यंत मुंबईतील सर्व जातीच्या लोकांनीं तीन खेपा आपआपल्या देवालयांत जमून इंग्रजांस जय प्राप्त व्हावा व त्यांचें राज्य कायम रहावें व त्याला संकटांत पाडूं नये ह्मणून प्रार्थना केल्या. तशाच बंड मोडून जिकडेतिकडे स्वस्थपणा झाल्यानंतर ईश्वराचें गौरव

वर्णायासाठीं मुंबईंतील सर्व शेटसावकार इंग्रज सरकारी कामगार व सर्व लोकांनीं आपआपला आनंद प्रदर्शित करण्यासाठीं आपआपल्या कारखान्यांत सुटी दिली होती, आणि जागोजागीं व देवळांत जमून ईश्वराचा स्तव व प्रार्थना केल्या. त्यांतील कांहीं मासले पुढें उतरून घेतले आहेत.

## ईश्वरप्रार्थना.

( " असतां मी निशिदिनि तुमच्या सेवेशीं तत्पर " ह्या चालीवर )

सकलचित्तचालका नियंता सृष्टीचा तूं हरी ॥ अवनिंचंद्रग्रहतारामंडळ भ्रमविशी यंत्रापरी ॥ अनंतशक्ती अचिंत्यलीला वर्णावी कुठवरी ॥ सनकसनंद-व्यासकवीश्वर श्रमले बहुतापरी ॥ भक्तवत्सला दीनदयाळा तारक सर्वांपरी ॥ रक्षिशि सकला समदृष्टीनें भेद नसे अंतरीं ॥ पांडवां साह्य होउनिरे ॥ कौरवां समरिं जिंकुनिरे ॥ द्रौपदी लाज रक्षिलिरे ॥ हीच प्रार्थना दीनदयाळा धांव अतां लवकरी ॥ अंत नको बा पाहुं आमुचा करुणा कर झडकरी ॥ तुज वांचुनियां दीनपालका जावें कोठें तरी ॥ अंत० ॥ १ ॥

### अभंग

साधूंच्या पालना ॥ दुष्टांच्या शासना ॥ डंका नारायणा ॥ वाजे तूझा ॥ १ ॥
दुष्ट क्रूर दैत्य ॥ जेव्हां मत्त झाले ॥ त्यांचि संहारिले ॥ क्षणामाजी ॥ २ ॥
कृतघ्न माजले ॥ आतां ऐशापरी ॥ पश्चादिक बरीं ॥ याहूनियां ॥ ३ ॥
अनाथ अबला ॥ अर्भकें जीं दीन ॥ यांच्या नाशा मान ॥ नसे देवा ॥ ४ ॥
विलापासी त्यांच्या ॥ देऊनियां कर्ण ॥ करी निवारण ॥ दीनोद्धारा ॥ ५ ॥

( " आहारे दैवा काय हें करवीशी " ह्या चालीवर )

॥ प्रभुसाठीं प्रभुला प्रभू वीनवीती ॥ संकट निरसुनियां होवो सर्व शांती ॥ धृ० ॥ रस्ता दावुनियां येथें त्वां आणिलें ॥ कांहीं दिवसांनीं राज्यीं कीं चढविलें ॥ सर्व जनाला सुख तें बहु झालें ॥ करीतें ऐसें सदोदित चाले ॥ प्रभु० ॥ १ ॥ शाळा स्थापुनियां विद्यावृद्धि झाली ॥ यंत्रादीकांनीं बहू माव केली ॥ व्यापाराची ते हद्द होउनि गेली ॥ विघ्नें कां यांशीं दयाळा आणीलीं ॥ प्रभु० ॥ २ ॥ संकटसमयीं नाहीं कोणी त्राता ॥ तुजवीण आह्मा दयाळा भगवंता ॥ अनुभव पूर्वीं आलासे पूरता ॥ धावें धावें बा शिणवूं नको आतां ॥ प्रभु० ॥ ३ ॥

## ॥ अभंग ॥

सत्यशांतिदयाकरुणेचा सागर ॥ ब्रीद हेंचि थोर जगीं गाजे ॥ १ ॥ शरण आलीया रक्षिसी तूं हरी ॥ विघ्नें सर्व दूरी करूनियां ॥ २ ॥ अनन्य भावानें शरण जो कां आला ॥ नाहीं त्याचा केला अनादर ॥ ३ ॥ ऐशापरी बहु गोष्टी आढळती ॥ थोरवी ही कीती गाऊं तूझी ॥ ४ ॥ नये बा आमुचा तुला काय द्रव ॥ धावण्यासी धांव सख्या हरी ॥ ५ ॥ गाऊनी स्तवूनी जरी आळवीला ॥ तरी कां बा केला कानाडोळा ॥ ६ ॥ चरणीं तूझीया घातियेली मीठी ॥ धरीं आतां पोटीं ऊचलोनी ॥ ७ ॥ सन्मार्गदर्शक ह्मणती आहे हरी ॥ सिद्ध सहाकारी भक्तां सदा ॥ ८ ॥

मुंबई तारीख २० वी, माहे आगष्ट सन १८५७

---

( नहि जमुनाजल जय्ये ह्या चालीवर )

## ॥ पद ॥

नीतिनिपुण प्रभु तारी हरी तूं ॥ नीति० ॥ धृ० ॥ प्रजापालनीं दक्षचि जे नर ॥ तद्विभ्रांतें वारी ॥ हरी तूं ॥ १ ॥ आह्मि अपराधी सर्व प्रपंचीं ॥ आलों तुझिया द्वारीं ॥ ह० ॥ २ ॥ शरण आलिया अभयचि द्यावें ॥ प्रार्थिति तुज कंसारी ॥ ह० ॥ ३ ॥ सन्मार्गाचे दर्शक ह्मणती ॥ दीनजना उद्धारी ॥ ह० ॥ ४ ॥

## ॥ आर्या ॥

॥ निजसुकृतहि वेंचुनियां, चिंतावें क्षेम त्या सुराजाला ॥
सर्वजनांसि सुखप्रद, विद्या वरितातिं भा सुराजाला ॥ १ ॥
पात्रापात्र न जाणे, धर्महि नेणे असा महीश बरा ॥
विद्वानहि तो न बरा, सुटवि सदा पाळुनी महीश बरा ॥ २ ॥

( उद्धवा शांतवन कर जा त्या गोकुलवासि जनांचें, ह्या चालीवर )

## ॥ पद ॥

कमलाक्षा दीनदयाला धांवुनियां भक्तां तारी ॥ धृ० ॥ संपन्न सर्व गुण ऐसें कविजन कीं तुजला गाती ॥ करुणेचा सागर ऐशी पसरली त्रिभुवनिं कीर्ती ॥ ब्रह्मादिक सुरही तुजला एकत्र मिळुनियां ध्याती ॥ चा० ॥ दुर्वासें पांडवाला ॥ छळितां निशिं धांवा केला ॥ द्रौपदिनें लक्षुनि तुजला ॥ पावशि तूं तिज कैवारी ॥

क० ॥ १ ॥ दुर्दैवें करुनी आह्मी पातकी जन्मा आलों ॥ संसारामाजी पडूनी व्यापार करित जे गेलों ॥ हतभाग्य ह्मणूनहि त्यांत पातकें आचरलों ॥ चा० ॥ शरणागतरक्षक ह्मणूनी ॥ मिठि दिधली पद लक्षूनी ॥ सर्वांपरि दुःखें हरूनी ॥ घे आतां झडकरि पदरीं ॥ क० ॥ २ ॥

## ॥ साक्या ॥

ज्या प्रभुनें हा देह निर्मिला त्याशि विसरलों आह्मी ॥
यापरते अपराध कायसे सर्व गुंतलों कार्मी ॥
देउनि अभय अह्मा रक्षी । ह्मणती तुला सर्वसाक्षी ॥ १ ॥
क्षमा करी जगदीशा अमुच्या अपराधाच्या कोटी ॥
दुष्ट कृतघ्नें प्रभुशि गांजिलें त्याशि धरावें पोटीं ॥ २ ॥

## ॥ पद ॥

( कृष्ण गडी अपुला यमुनाडोहीं बुडाला ह्या चा० )

धावें पावें यदुराया आलों शरण तुझ्या पाया ॥ धृ० ॥ आह्मी दीन पतित साचे ॥ गातों अगाध गुण वाचे ॥ वदतां नाम राघवाचें ॥ होय शुभ्र गजमृग गणितेचें ॥ निष्ठुर केली कां माया ॥ आलों शरण० ॥ १ ॥

दीनानाथ दीनबंधू ॥ विमलजनललितकृपासिंधू ॥ भवदवसुदग्धशरदिंदू ॥ वर्णिति असे सर्व हिंदू ॥ विकल बहु जालीसे काया ॥ आलों शर० ॥ २ ॥
येउं दे करुणा सकळांची ॥ नारिनरदीन कुटुंबाची ॥ स्वस्थता प्रभुला देसाची ॥ प्रणति सन्मार्ग दर्शकांची ॥ धाउनि त्वरित करी छाया ॥ आलों० ॥ ३ ॥

## ॥ आर्या ॥

करुणेचा सागर तूं दीनाचा नाथ भक्त कैवारी ॥
ऐशीं बिरुदें गाजति, वर्णिति कवि ह्मणुनि हें भय निवारी ॥

## ॥ अभंग ॥

नाश अमोलिक झाले ॥ कैसें तुजला आवडलें ॥ १ ॥ दीन बाळकें मारिलीं ॥ घरें फारच जळालीं ॥ २ ॥ स्त्रिया अबला असूनीं ॥ त्याही मारील्या दुष्टांनीं ॥ ३ ॥ ऐशा अनर्थ समयाशीं ॥ देवा कोठें गुंतलासी ॥ ४ ॥ काय पाषाणापरीस ॥ हृदय कठीण केलेंस ॥ ५ ॥ धरणें घेतलें द्वारांत ॥ नको आतां पाहूं अंत ॥ ६ ॥

## ॥ अभंग ॥

आचरण आमुचें शुद्ध नाहीं जरी ॥ दयासिंधु तरी पोटीं घाली ॥ १ ॥ अपराध केले जरी बाळकानें ॥ माता ममतेनें क्षमा करी ॥ २ ॥ मनोभावें तुज शरण जो कां आला ॥ त्याचा दूर केला भवरोग ॥ ३ ॥ पापाचा नाशक दीनाचा पालक ॥ दुष्ट विनाशक ब्रीदें तूझीं ॥ ४ ॥ ऐशा शुद्ध ब्रीदा कलंक लागेल ॥ जरी उपेक्षील दयासिंधू ॥ ५ ॥ सन्मार्गदर्शक ह्मणती सोडा भीती ॥ असे जगत्पती साह्य तुह्मा ॥ ६ ॥

तारीख ४ अकटोबर सन १८५७

---

## ॥ पद ॥

॥ कृपाघना संकट जाणुनि ये ॥ ध्रु० ॥

भक्त तुझे बहु तुजला स्तविती ॥ सेवा मानुनि घे ॥ कृपाघ० ॥ १ ॥
दुष्ट जनांनीं जीव तुझे हे ॥ समरीं त्रासविले ॥ कृपाघ० ॥ २ ॥
युगायुगीं तूं भक्त रक्षिसी ॥ दुर्जन मारुनि जे ॥ कृपाघ० ॥ ३ ॥
अनंत गुण तुझे वर्णु किती रे ॥ अहिवेदहि श्रमले ॥ कृपाघना० ॥ ४ ॥

## ॥ श्लोक ॥

प्रार्थितों तुला विश्वपालका ॥ अमृतदृष्टिने पाहिं बालका ॥
त्वां उपेक्षिल्या कोणतो हरी ॥ आमुच्या महासंकटा हरी ॥ १ ॥
सर्वव्यापका तूं निरंजना ॥ निर्गुणा तुझे गाति जे गुणां ॥
रक्षिसी तया बा निरूपमा ॥ सांगती असे भक्तही खुणा ॥ २ ॥
सर्वशक्तिमान् विश्वरूप गा ॥ निर्विकारही भक्त गाति गा ॥
विश्वपोषका विश्वभासका ॥ धांवें बा त्वरें रक्षि बालका ॥ ३ ॥

## ॥ आर्या ॥

सर्वेश सर्वसाक्षी सर्वात्मा तूंचि देव देवांचा ॥
गाती भक्त गुणांतें सर्वांला शक्ति दे वदे वाचा ॥ १ ॥
या प्रभुला यश द्यावें दासांचें मागणें प्रभो मान्य ॥
करुनी दुःख हरावें दुर्घट संकट असे न सामान्य ॥ २ ॥

जमले स्तवन कराया जगदीशा प्रार्थनेसि ब्रा धावें ॥
एकत्र आजि झालें संकट कोणासही न बाधावें ॥ ३ ॥
उत्पत्यादिक कर्त्ता हर्त्ता या संकटास तूं मान्य ॥
सोडुनि कल्पतरूतें सेवूं काशासि वृक्ष सामान्य ॥ ४ ॥

## ॥ केकावली ॥

कृपा जरि असे तुझी मग नसे उणें सेवकां ॥
ह्मणोनि जगदीश्वरा सुख सदा करी भाविकां ॥
मिळोनि अवघे पहा तव पदीं शिरें ठेविती ॥
पवित्र स्थळ जाणुनी मनुज सर्वही सेविती ॥ १ ॥

## ॥ साक्या ॥

क्यौं कर हमपर रूढ रहे प्रभु ये विध संकट दीनो ॥
दीनानाथ रखो ब्रिद अपनो ये सब दुख हर लीनो ॥ १ ॥
भक्तवत्सल तुम करुनासागर राखो लाज हमारी ॥
तुमबिन हमको यह संकटमो गत नहि प्रभुजी न्यारी ॥ २ ॥
चोरभयानें दुर्गम जे कां मार्गहि सुगमचि केले ॥
दुष्टापासुनि रक्षुनि जंतू सौख्य प्रजेसी दिधलें ॥ ३ ॥
स्त्रियामुलांचे प्राण हिरोनी नेले घोर रितीनें ॥
देवा त्यांला दंड कराया यावें शीघ्र गतीनें ॥ ४ ॥

## ॥ गीत ॥

हिण पुरुष ते हेतु ना लहे मुरख झुममारूडुं ना सहे ॥
सुधरवूं नहि तेमने गमे अवरने तेओ सारथी दमे ॥ १ ॥
सलुकसंपने स्थीरता भली लुणहरामिनें हुल्लडे पळी ॥
दिनदयाळ तूं पुण्यनूपण सहु प्रयत्नते चांडाळीहण ॥ २ ॥
फरिथि स्वस्थता व्हेलि आणरे सर्वजन्नना दुःख जाणरे ॥
विघ्न सर्वनें हांकी दे दुर रैयतलोकनें झंपताकर ॥ ३ ॥
करम रूडुं जे सूधराईनूं करत वांछुरे जारिचालिनू ॥
दगलबाजने शासनो करी विजय दे तूं इंग्रेजने फरी ॥ ४ ॥

नरम प्रार्थना दीलया धरी जलदी आवने वारे तूं हरी ॥
गजवचोदिशे आज राजनी जय जययो जयंकारनी ध्वनी ॥ ५ ॥

॥ अभंग ॥

भक्त तुझे ईशा आले हे सकळ ॥ करावा सांभाळ कृपासिंधो ॥ १ ॥
घ्यावी ही भक्तांची मानूनीयां सेवा ॥ अनाथाचा देवा पावेंगा तूं ॥ २ ॥
भक्तवत्सला तूं कोप टांकी आतां ॥ तूंचि मातापिता रक्षीता तूं ॥ ३ ॥
बालकानें केला अपराध जरी ॥ मातेच्या अंतरीं कोप न ये ॥ ४ ॥
स्त्रिया जा अनाथ बाळें जीं अजाण ॥ तयांचें पाळण करा देवा ॥ ५ ॥
खलांचिया नाशा साधूंच्या पाळका ॥ त्रैलोक्यनायका पावेगा तूं ॥ ६ ॥
भावें तुज आह्मी येतसों शरण ॥ करावें रक्षण संकटीं या ॥ ७ ॥

॥ दिंडी ॥

या सुभूपाला नमिती सर्व राजे ॥ देशोदेशीं सत्कीर्ति असी गाजे ॥ दयाशूर नाम ऐसें साजे ॥ त्रासूं पाहे मित्र काजवा जे ॥ राजा धीर गंभीर बुद्धिमान ॥ त्याचें करावें देवा सांगोपान ॥ बंड भीती नाहीं या बलवान ॥ नाश न हूंदे पाव भगवान ॥ २ ॥ भक्तसंकटीं भक्तपक्ष घेसी ॥ अजुन देवारे येथें कां न येसी ॥ स्त्रिया बाळें दुष्टांसि कारे देसी ॥ करी आतां तरि दुष्टधी वळेसी ॥ ३ ॥

॥ पद ॥

जगदीशा कैसें संकटीं पाडिलें ॥ दयाळू ऐशा राजाला त्रासिलें ॥ धृ० ॥ विद्यामृतवृष्टी केली या राजानें ॥ प्रजाही आणि चालवी न्यायानें ॥ ऐशाला देवा दुखविलें बंडानें ॥ करावें शांत दुष्टांस दंडानें ॥ जग० ॥ १ ॥ दयाळू प्रभुला संकटीं सांभाळ ॥ रक्षावा आमुचा सदां हा भूपाळ ॥ संकट मोठें जाणोनियां टाळ ॥ यास्तव चरणीं ठेवियेलें भाळ ॥ जग० ॥ २ ॥

॥ ओंव्या ॥

सर्वज्ञ असा प्रभु एक ॥ भक्तांला देतसे सुख ॥ तैसा राजा प्रजापालक ॥ याविणें दुजा नसेचि ॥ १ ॥ राजा आहे नीतिमान ॥ कोणी नसे याच्या समान ॥ यास्तव ईशें देवोनियां कान ॥ विजयी करावें सर्वदा ॥ २ ॥ राणीचें राज्य सदोदित ॥ नांदावें असें मनांत ॥ आबालवृद्ध हेंचि ह्मणत ॥ प्रार्थना करोन ईशाची ॥ ३ ॥

( चलो विदुर घर जय्यें उधोजी चलो विदुर ह्या चाली० )

संकट विलया गेलें आमुचें ॥ सं० ॥ धृ० ॥ करुणार्णव प्रभु बहु आळविला ॥ त्याचें सार्थक झालें ॥ आ० ॥ १ ॥ बंड मोडुनी सर्वप्रकारें ॥ शांतिरूप पसरलें ॥ आमुचें० ॥ २ ॥ समरसमाप्ती होउनियां जन ॥ स्वस्वकर्मी लागले ॥ आमुचें० ॥ ३ ॥ दास ह्मणे हें सदयें प्रभुनें ॥ सन्मार्गी योजिलें ॥ आमुचें संकट विलया गेलें ॥ आ० ४ ॥

## आर्या

केलीं अघोर कृत्यें, त्या काळीं शत्रुरूप शुनकांनीं ॥
अश्राव्य तीं सुसभ्यां, ऐकति जे क्रूर ते पिशुन कांनीं ॥ १ ॥
झाला अनर्थ ऐसा तेव्हां त्वत्प्रार्थनेविना नाहीं ॥
सदुपाय अन्य दीना मानियलें हें महेशनानाहीं ॥ २ ॥
ऐसा विचार करुनी केली त्वत्प्रार्थना अशा काळीं ॥
करुणासागर होउनि दुष्टांचीं आननें करी काळीं ॥ ३ ॥
धांव दयाब्धे ऐशा गजरांनीं जैं समस्त नभ भरलें ॥
दीनोद्धारसमर्था सदय तुझें हृदय तैंचि गहिवरलें ॥ ४ ॥
खलकृत पीडा पाहुनि दासांच्या पावलासि हाकेला ॥
निवटुनि सकल अरीतें निर्भय निर्विघ्न देश हा केला ॥ ५ ॥
याचिपरी जगदीशा संकटसमयीं सदैव पाळावें ॥
कीं सुशजनें आश्रितजन गृहदाहक किटाळ टाळावें ॥ ६ ॥

## पद

( प्रभुसाठीं प्रभुला प्रभू विनवीती ह्या चा० )

देवा रिपुनाशा जगदीशा दातारा ॥ तुझिया उपकारा नाहीं पारावारा ॥ दे० ॥ धृ० ॥ फौजा बदलूनी अनर्थ गुजरला ॥ बालकें अबला पीडूनी मारिल्या ॥ भासलें जेवीं कृतांत खवळला ॥ तुजवांचुनि समयीं कोण त्राता झाला ॥ दे० ॥ १ ॥ मनापासुनियां तुजला शरण आलों ॥ गायन सुस्वरें करूनी नाचलों ॥ भ्रमरापरि तुझिया चरणीं लीन झालों ॥ ठेऊनि भरंवसा तुजवरी बैसलों ॥ दे० ॥ २ भक्तरक्षक हें ब्रीद त्वां पाळीलें ॥ संकटीं अमुच्या धावणें बा केलें ॥ शस्त्र घेउनियां दुष्टांतें मर्दीलें ॥ कुठवरी वर्णू उपकार जे झाले ॥ दे० ॥ ३ ॥

बहुतांपरि आह्मी शीण तुजला दिधला ॥ सर्वस्वीं आमुचा भार त्वां उचलिला ॥
क्षमा करोनी सांभाळीं आह्मांला ॥ हेंचि मागणें सदोदीत तुजला ॥ ४ ॥

## साक्या

गुढ्या तोरणें उभउनि द्वारीं हास्यवदन जनमेळीं ॥
हस्त उभारुनि जयजयकारें द्या प्रभुला आरोळी ॥
आला सुदिन आह्मा आजी ॥ करणी तुझी हे देवाजी ॥ १ ॥
समर सोडुनि जीवरक्षणा शत्रु गिरिदरीं गेले ॥
कितिक दंडिले दयार्द्रभावें शरणागत मोकलिले ॥
फौजा जय गजरें फिरल्या । नेमिल्या स्थळीं स्वस्थ बसल्या ॥ २ ॥
प्रजापालनीं श्रेष्ठ राणिचा डंका जैं सुरु झाला ॥
तडित्प्राय ध्वनि शस्त्रास्त्रांचा आपोआप निमाला ॥
गाऊं गूण तिचे आह्मी । प्रार्थुनि ईश्वर निजधामी ॥ ३ ॥
सर्व लोक अति उल्हासानें ईश्वर भजती आजी ॥
नादब्रह्म कीं होउन जाइल हिंदुस्थानामाजी ॥
राज्य हें सर्वकाल राहो । ईश्वर दयें तया पाहो ॥ ४ ॥

## अभंग

प्रार्थू आतां आह्मी सर्व लोकांप्रती ॥ आळवा श्रीपती मनोभावें ॥ १ ॥
काय तेणें आजि सुदिन दावीला ॥ जय इंग्लिशांला देवोनीयां ॥ २ ॥
बंड हें जाऊनी रसातळाप्रती ॥ जयध्वज क्षितीं उभा केला ॥ ३ ॥
सर्व लोक सुखें नांदूं कीं लागले ॥ धंदे आपापले करूनियां ॥ ४ ॥
अमोलिक सुख असे या राज्यांत ॥ हें सर्वा माहीत प्रत्यक्षही ॥ ५ ॥
न्याय नीति दया सद्गुणसंपन्न ॥ कारभारी जन मुख्य असती ॥ ६ ॥
असो हेंचि आह्मा सर्वकाळ सुख ॥ सन्मार्गदर्शक ह्मणताती ॥ ७ ॥

## आर्या

श्रीचा असशी तैसा दीनाचा सदयनाथ तूं देवा ॥
सभया अभयचि केलें भक्तांपासूनि घे सदा सेवा ॥ १ ॥
रक्ताचे नद गेले नाहीं सुख तिळहि पांच अयनांत ॥
जरि हा प्रसंग वदलों येती दुःखाश्रु बिंदु नयनांत ॥ २ ॥

देवा तव सामर्थ्यें झाले निर्विघ्न भक्तजन सर्व ॥
जे कां प्रमत्त होते त्यांचा झाडोनि टांकिला गर्व ॥ ३ ॥
अभ्राच्छादित असतां एकाकीं अभ्रनाश करि तरणी ॥
तैसी विजयी सेना रिपु मारुनि नित्य विजय घेत रणीं ॥ ४ ॥
ही शक्ति ईश्वराची भावें त्यालाचि शरण गा जावें ॥
गावें नाम तयाचें भक्ताच्या मालिकेंत गाजावें ॥ ५ ॥
दीनोद्धारसमर्था स्तवितों तुज शक्ति देचि सकळांस ॥
व्यापारीं शिवकर दे मति दे विद्यादि सर्व सकळांस ॥ ६ ॥

### अभंग

दासां करूं देगा देवा ॥ तुझ्या चरणाची सेवा ॥ १ ॥
ह्मणति तुलारे दयाळ ॥ करी दासांचा सांभाळ ॥ २ ॥
आला त्रैलोक्याचा राजा ॥ झाला साह्य भक्तकाजा ॥ ३ ॥
पुढें केला वरद हात ॥ झालें हिंदुस्थानीं शांत ॥ ४ ॥

### श्लोक

संतोष केला प्रभुनें जिवांस ॥ केले सुखी सर्वहि दीन दास ॥
दासांस देणार सदा सुवास ॥ प्रार्थूंहि तो आजि जगन्निवास ॥ १ ॥
घोर संकटा ईश प्रार्थना ॥ करुनि चुकविली सर्व यातना ॥
धाडिले रिपू घोर रे वना ॥ तोष जाहला आमुच्या मना ॥ २ ॥

### पद

प्रभुजी फार तुझे उपकार ॥ ध्रु० ॥

अगणित गुण तुझे वर्णुं कितीतरि ॥ वेदहि थकले चार ॥ प्रभुजी० ॥१॥
धांवत येउनी भक्तां नेसी ॥ भवसिंधूंतुनि पार ॥ प्रभुजी० ॥ २ ॥
दीनदयाळा गुण वर्णाया ॥ जमले दास अपार ॥ प्रभुजी० ॥ ३ ॥
संकट समयीं पावाया प्रभु ॥ साधन नामचि सार ॥ ४ ॥
दास तुझा ह्मणे जोडुनियां कर ॥ सकल जनाला तार ॥ प्रभुजी० ॥ ५ ॥

तारीख २८ माहे जुलै सन १८५९ इसवी.

तुर्कस्थानामध्यें रुशियन लोकांशीं इंग्रज लोकांची लढाई चालू झाली. या प्रसंगीं इंग्लिश फौजेस जय यावा ह्मणून भरतखंडामध्यें मुंबईवगैरे सर्वत्र ठिकाणीं

१८५४ तारीख १६ वी जुलई रविवार रोजीं प्रार्थना व उपास करावा असा सरकारी हुकूम झाला. ह्या दिवशीं मुंबईत परभू, पारशी, शेणवी, आणि सावकार वगैरे महाजन लोक यांनींही आपआपल्या रीतीप्रमाणें प्रार्थना केल्या. ही प्रार्थना करण्याच्या कामांत जे आपणास सुधारलेले ह्मणवितात ते होते. मुख्यत्वें यांमध्यें ब्राह्मण नव्हते तरी परभू वगैरेच्या अनुषंगानें कित्येक शास्त्री वगैरे त्या प्रार्थनेंत होते, व कवितारूपानें त्यांनीं निराकार ईश्वराची प्रार्थना करून ती छापविली आहे. ती येणेंप्रमाणें.

## ईश्वरप्रार्थना. ॥ पद ॥

अगणित दुःखें समरापासुनि होती ॥ जगदीशाविण कोण करी शांती ॥धृ.॥
त्राता सत्याचा ऐसा डंका वाजे ॥ भक्तपालक तूं बिरिद हेंचि गाजे ॥
विश्वरक्षक हें नाम तुला साजे ॥ संकटीं आह्मा नाहीं कोणी दूजे ॥ अ. ॥ १ ॥
मरती जे युद्धीं आनंत सैनीक ॥ अबला हो त्यांच्या करीती बहु शोक ॥
बालकें दीन पावती जें दुःख ॥ वर्णाया त्यातें प्राज्ञही दुर्मूख ॥ अ. ॥ २ ॥
गुंततां लक्ष्यें युद्धीं नृपाळांचीं ॥ राहतां अमूल्य कृत्यें कल्याणाचीं ॥
नासाडी होई सर्वथा सकलांची ॥ लाज भगवंता तुजला ह्या नाशाची ॥अ० ॥३॥
व्यापार सर्व होताति कुंठीत ॥ धाडाया माल अन्य देशीं भीत ॥
होऊनी बंडें सूटती लूटीत ॥ यामुळें तोटे होती अगणीत ॥ अ. ॥ ४ ॥
यापरी युद्ध द्रव्याचें नाशक ॥ हाहाकार मोठा करीती लोक ॥
ह्मणती हे भगवन् दुखाब्धितारक ॥ होई बा सकलां "सन्मार्गदर्शक" ॥ अ. ॥५॥

## ॥ अभंग ॥

संकटीं तारक तूंचि आह्मा हरी ॥ जावें कोठें तरी सांग बापा ॥ १ ॥
करीशी ना जरी साह्य आह्मा तरी ॥ आह्मी तूझे द्वारीं धरणें घेऊं ॥ २ ॥
नको पाहूं आतां अंत बा आमुचा ॥ असशी दीनाचा त्राता जरी ॥ ३ ॥
सत्य शांती दया नीती सदोदीत ॥ राहावीं उदीत योग्य तूला ॥ ४ ॥
नष्ट होती जसे वीर तयापरी ॥ होती खरोखरी नष्ट हींही ॥ ५ ॥
ह्मणोनी शरण आलों तुला आतां ॥ पाहीं भगवंता कृपादृष्टी ॥ ६ ॥
भक्तपालकत्व ब्रिरिद अनंता ॥ संभाळी हें नाथा प्रसंगीं ह्या ॥ ७ ॥
झटूनीयां आह्मी सर्व ॥ प्रार्थू सोडूनीयां गर्व ॥ १ ॥

सर्व भक्तांची गर्जना ॥ कानीं पडतां सुटो पान्हा ॥ २ ॥
लेख नाहींच पाहिला ॥ ईशें सोडीलें भक्तांला ॥ ३ ॥
नाहीं कधींही ऐकिलें ॥ भक्त वीनमूख गेले ॥ ४ ॥
ऐशी आहे तुझी ख्याती ॥ ह्मणुनि आरंभीली स्तुती ॥ ५ ॥
देवा धांव अतां वेगीं ॥ आह्मा तारावया लागीं ॥ ६ ॥
शस्त्रपाणी हो सत्वर ॥ करी शत्रूंचा संहार ॥ ७ ॥
व्हा हो सकळ निर्भय ॥ प्रभु तुमची आहे माय ॥ ८ ॥

ही प्रार्थना झाली तेव्हां ठाकुरद्वारीं व भुलेश्वरीं कीर्तन झालें व मुंबादेवीस होम झाला आणि दुसऱ्याही देवळांतून कांहीं कांहीं प्रकार झाले आणि जेथें जेथें देवळांत ख्रिस्ती लोकांनीं प्रार्थना केल्या तेथें कित्येक हिंदु लोक गेलेच होते. परंतु विशेषेंकरून पारशी लोक आवेशीहोत्साते आग्यारी आग्यारींतून फारच जमले होते. आणि आपण नेटिवांनींही हा दिवस युरोपियनांप्रमाणें पाळावा ह्मणून तेच पुढारी होते. पारशी लोकांनीं जी प्रार्थना केली ती बहुधा जंध भाषेमध्यें होती. तरी त्यांनीं एक गुजराथी भाषेंत प्रार्थना केली आहे तिचा अर्थ येणे प्रमाणें.

हे गौरवयुक्तपरात्पर देवा, आह्मी तुझी प्रार्थना करितों कीं, या राज्याच्या राणीला चाललेल्या लढाईमध्यें सन्मान पूर्वक जय येवो. राजाचा राजा जो आहे त्यानें तिच्या फौजेस व आरमारांस ज्ञान व शक्ति विशेष द्यावी, राणीला दीर्घायुषी करावें, आणि तिचें साम्राज्य आबाद चालवावें. देवानें तिच्या शत्रूचा नाश करावा आणि तिला पूर्ण आशीर्वाद द्यावा. तर या सर्व गोष्टींकडे देवानें लक्ष्य लावून त्या घडवाग्या व रणभूमीच्या ठायीं राणीचा पक्ष धरून तिच्या सैन्याला जय द्यावा ह्मणून हे सर्व शक्तिमान देवा आम्ही तुजपासीं काकुळतीनें प्रार्थना करितों आणि आमच्या राणीचा अधिकार न्यायानें व दयेनें चालो, तिचें नांव व अधिकार पिढ्यानुपिढ्या याप्रमाणेंच राहो. आणि तिची स्थिति तेजस्वी व गौरवयुक्त आहे तसीच राहो ही आमची प्रार्थना आहे.

या दिवसीं मुसलमान लोकांनीं कांहीं विशेष केलें नाहीं तरी ते तुर्कस्थान व विलायतहीं अगदीं विसरले होते असें नाहीं.

यहुदी लोकांनीं जी प्रार्थना केली ती वर्तमानदीपिकेंतून खालीं उतरून घेतली आहे.

" सरकारानें जाहीर केल्याप्रमाणें बहुतेक लोकांनीं इंग्रज सरकारास रशिया-सरकारा बरोबरच्या लढाईंत जय मिळावा ह्मणून परमेश्वराची प्रार्थना केली, त्याप्रमाणें ही मुंबईंतील इस्राएल लोकांनींही केली, तिचा सारांश येणेंप्रमाणें.

जो परमेश्वर राजास तारण व राज्य देणारा, ज्याचें राज्य सदा सर्वकाळ आहे, ज्यानें आपला सेवक दाविद यास विध्वंसक तरवारीपासून तारलें आणि जो समुद्रापासून व प्रचंड पाण्यांतूनही मार्ग करितो, तो आमची दयाळू राणी क्वीन विक्टोरिया इजला व तिचे सर्व अधिकारी यांस आशीर्वाद देवो व त्यांचें रक्षण करो, त्यांचें साह्य करो, आणि मोठेपणा देवो. राजांचा राजा आपल्या दयेनें त्यांचें रक्षण करो आणि त्यांस दीर्घ आयुष्य देऊन सर्व भयापासून व संकटापासून मुक्त करो. व त्यांस राज्य करण्यास आयुष्य देवो. राजांचा राजा आपल्या कृपेकरून तिच्या सर्व सरदारांच्या व अधिकाऱ्यांच्या मनांत आमचें व आमच्या सर्व इस्रायल बंधूंचें कल्याण करण्यासाठी दया उत्पन्न करो. आणि तिच्या व आमच्या दिवसांत यहूदांचें तारण होवो, व त्याची प्रसन्नता आह्मावर होवो. "

( याप्रमाणें प्रार्थना करून सर्व इस्राएल लोकांनीं " तथास्तु " ह्मणून गजर केला. )

सन १८५५ त इंग्लिश लोकांस रुस लोकांवर जय प्राप्त झाला त्याप्रसंगीं मुंबईंतील सर्व रयतेनें ईश्वराची प्रार्थना केली व ह्या दिवशीं मोठा उत्साह केला.

## ॥ ईश्वर प्रार्थना ॥

### ॥ अभंग ॥

काय हा सुदिन आजी आह्मा आला ॥ ईशें जय दिला इंग्लिशांसी ॥ १ ॥
॥ उभयसैन्यांनीं शत्रू हाटवीला ॥ बावटा चढविला किल्यावरी ॥ २ ॥
॥ तोफा, दारु, गोळा, गलबतें बहुत ॥ अर्थ गुंडाळीत सैनिक ते ॥ ३ ॥
॥ दास ह्मणे लोकांपुढें व्हा सत्वरी ॥ प्रभु पाठीवरी तुमच्या असे ॥ ४ ॥

### ॥ पद ॥

" नहिजमुनाजलजय्यें किसनजी नहि० ॥ ध्रु० ॥

ह्या चालीवर.

सत्याश्रितसहकारी ईश्वरसत्या० ॥ ध्रु० ॥
प्रार्थुनि त्यासी बहु आळवितां ॥ आला तो झडकरी ॥ ई० ॥ १ ॥

सत्पक्षाचा लाउनि झेंडा ।। भक्तां हातिं धरी ।। ई० ।। २ ।।
अन्यावरि अन्यायें करुनी ।। उठती त्यां संहारी ।। ई० ।। ३ ।।
पीडित लोकां आश्रय देती ।। त्यावरि तुष्ट हरी ।। ई० ।। ४ ।।
अनन्य भावें शरण गेलिया ।। होई तो कैवारी ।। ई० ।। ५ ।।
सन्मार्गाचे दर्शक ह्मणती ।। प्रभुला ध्या सत्वरी ।। ई० ।। ६ ।।

।। साक्या ।।

दीन दयाघन भक्त प्रिय प्रभु साह्य असे आह्मासी ।।
काय कथा मानव शत्रूंची धिःकारूं काळासी ।। १ ।।
देवा आतां अशापरी त्वां शेवट गोड करावा ।।
नाश न होऊं देतां बहुध्वज विजयाचा चढवावा ।। २ ।।

बंडें वगैरे सर्व प्रकारचे दंगे व तुफानें मोडून जिकडे तिकडे स्वस्थता झाली तेव्हां सन १८५८ माहे नवेंबर १ ह्या दिवशीं महाराणीनें हिंदुस्थानांतील राज्य कारभार कंपनी सरकारच्या हातून आपल्या हातांत घेतल्याचा हुकूमनामा प्रगट केला. तेव्हां मुंबईंत मोठा उत्साह झाला व टौन हालांत मोठी अरास केली होती. जे मुंबई शहरांतील श्रीमंत गृहस्थ जमले होते त्यांच्या समोर हुकूम वाचण्यांत आला तो येणेंप्रमाणें.

"मुकाम अलाहाबाद, सोमवार, तारीख १ ली माहे नवेंबर सन १८५८ इसवी.

मलिका माआझमा इंग्लिस्तान यांजकडून हिंदुस्थानांतील राजे रजवाडे, व सरदार, व इतर लोक यांस खालीं लिहिलेला मेहेरबानीचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्याविषयीं नवाब गवरनर जनरल बाहादूर यांस हुकूम सादर झाला आहे.

हिंदुस्थानांतील राजे रजवाडे, व सरदार, व इतर लोक यांस मलिका माआझमा दर इजलास कौंसिल यांजकडून जाहिरनामा.

विक्टोरिया- ईश्वर कृपेनें ग्रेटब्रिटन व अयरलंड या संयुक्त राज्याची व राज्याच्या ताब्यांत युरप, एशिया, आफ्रिका, आणि आस्त्रेलेशिया या खंडामध्यें ज्या वसाहती व उपराज्यें आहेत त्यासर्वांची मलिका माआझमा व धर्मसंरक्षक.

आजपर्यंत हिंदुस्थानांतील मुलखांचा राजकारभार आमच्यावत्तीनें आनराबल ईस्ट इंडिया कंपनी चालवित होती तो आपणच चालवावा असें कितीएक

महत्वाच्या कारणांवरून, पार्लमेंट सभेंत जमलेले स्पिरिच्युअल, व टेंपरल लार्ड, आणि कामन यांच्या सल्यानें व आनुमतानें आह्मी ठरविलें आहे.

यास्तव आह्मी आतां या जाहिरनाम्याच्या द्वारें कळवितों व प्रसिद्ध करितों कीं, वर लिहिल्या प्रमाणे सला व अनुमत घेऊन; सदर्हू राजकारभार आह्मी आपले हातीं घेतला आहे; आणि सदर्हू मुलुखांतील आमच्या सर्व रयतेस फर्मावितों कीं, आमच्याशीं, आमच्या वारसांशीं, आणि आमच्या ज्यायनिशींनांशीं तुह्मी इमानानें, व खरोखर रयतेच्या नात्यानें वागावें; आणि यापुढें सदर्हू मुलुखांचा राज्य कारभार आमच्या नांवें व तर्फे चालविण्यासाठीं ज्या ज्या वेळीं ज्यांची ज्यांची नेमणूक आह्मी करूं, त्या त्या अधिकाऱ्यांचा हुकूम तुह्मी मानीत जावा.

आमचे मोठे विश्वासू, आणि फार प्रीतींतले मंत्री नवाब चार्लस जान वैकौंट क्यानिंग साहेब यांचें इमान व योग्यता, व शाहाणपण यांवर आह्मी पूर्ण विश्वास आणि भरंवसा ठेवून, त्यांस ह्मणजे मशारनिल्हे वैकौंट क्यानिंग साहेब यांस सहर्हू मुलुखांत आमचे पहिले वैसराय व गवरनर जनरल ठरवितों व नेमतों; आणि आमच्या नावें सदर्हू मुलुखांचा राज्यकारभार चालविण्यास, तसेंच एका मुख्य स्टेट सेक्रेटारीच्या मारफत जे जे हुकूम, व कायदे त्यांस वेळोवेळीं आह्मा-कडून पोंचतील त्यांस अनुसरून हरएक बाबतींत आमच्या नावें, व तर्फे वहिवाट करण्यास, त्यांस अधिकार देतों.

आनराबल ईस्टइंडियाकंपनी याणीं हल्लीं ज्या ज्या मुलकी, व लश्करी कामावर जे जे असामी नेमिलेले आहेत त्या सर्वांस, त्या त्या कामावर आह्मी काईम करितों; पुढें जशी आमची मर्जी होईल, व जे कायदे व कानू आह्मी ठरवूं, त्यां प्रमाणें फेरफार होतील.

हिंदुस्थानांतील राजे रजवाडे यांस आह्मी जाहीर करितों कीं, त्यांबरोबर आनराबल ईस्टइंडिया कंपनीनें जे तहनामे व करारनामे केले असतील, किंवा जे सदरहू कंपनीच्या हुकुमानें झाले असतील, ते सर्व आह्मास मान्य आहेत. व आह्मी लक्षपूर्वक पाळूं; त्याचप्रमाणें राजे रजवाडे यांणींही आपआपले तर्फेनें, तहनामे, व करारनामे पाळले पाहिजेत.

आमचें जें हल्लींचें राज्य आहे तें वाढविण्याची आह्मास अगदीं इच्छा नाहीं; आमचें राज्य, व राजाधिकार यांस धक्का पोंचविण्यास कोणी यत्न केला असतां आह्मी त्यास शिक्षा केल्यावांचून राहाणार नाहीं; आणि ह्याच प्रमाणें

इतरांच्या मुलखांस, व हक्कांस धक्का पोंचेल अशी गोष्ट आह्मी कधीं मंजूर करणार नाहीं. ज्या प्रमाणे आह्मी आपला अधिकार, आपला दर्जा, व आपला मर्तबा राखतों त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील राजेरजवाडे यांचा अधिकार, व दर्जा, व मर्तबा आह्मी राखूं. राजेरजवाड्यांची, तशीच आपल्या रयतेची आबादानी व बढती असावी असें आह्मी इच्छितों; व हें देशांत स्वस्थता, व चांगले प्रकारची राज्य व्यवस्था असेल, तरच घडेल.

आमच्या इतर सर्व रयतेविषयीं जे राजधर्म आह्मी अवश्य मानितों, तेच राजधर्म हिंदुस्थांनातील आमच्या मुलखांतल्या रयतेविषयीं आह्मास पाळिले पाहिजेत असें आह्मी समजतों; आणि ईश्वराच्या कृपेनें ते सर्व वास्तविक रितीनें मनःपूर्वक पाळूं.

खिस्ती धर्माच्या खरेपणावर आमचा पूर्ण विश्वास आहे; व धर्माच्या योगानें जें समाधान होतें तें स्मरून आह्मी ईश्वराचे उपकार मानितों असें आहे तरी, धर्मसंबंधी जे आमचे विचार आहेत ते आमच्या रयतेनें स्वीकारण्याविषयीं सक्ति करण्यास आह्मास अधिकार नाहीं, तशीच इच्छाही नाहीं. धर्मसंबंधी विचाराच्या, किंवा आचरणाच्या सबबीनें कोणाची तरफदारी होऊं नये व कोणास इजा होऊं नये व कोणास दुःख होऊं नये तसेंच कायद्यांचा आश्रय सर्वांस समान रितीनें, व निःपक्षपातानें मिळावा अशी आमची आज्ञा आहे. आमच्या सर्व अधिकाऱ्यांस आमची सक्त तांकीद आहे कीं, आमच्या रयत लोकांची धर्मसंबंधी समजूत किंवा भक्ति याप्रकरणीं त्याणीं कोणतेही प्रकारें हात घालूं नये; घालतील तर त्यांवर आमची मोठी इतराजी होईल.

आणखी आमची अशी आज्ञा आहे कीं, आमच्या रयत लोकांपैकीं जे कोणी विद्येने, हुशारीने, व प्रामाणिकपणाने जीं जीं सरकारी कामें यथास्थित चालविण्यास लायक असतील तीं तीं कामें, सवड असेल त्याप्रमाणे, बिनदिक्कत व निःपक्षपाताने त्या लोकांस ज्ञात, किंवा धर्म मनांत न आणितां द्यावीं.

वडिलांपासून चालत आलेल्या जमिनीवर हिंदुस्थानांतील लोकांची आसक्ति आहे ती आह्मास माहित असून आमच्या लक्षांत आहे. सरकाराचें वाजवी घेणें असेल तें घेऊन लोकांचे जमिनीसंबंधी जे जे हक्क असतील ते ते त्यांकडे सुरक्षित ठेवावे, व हरयेक बाबतींत कायदे ठरवितानां, व ते अमलांत आणतानां,

हिंदुस्थानांत जे प्राचीन हक्क, व वहिवाटी, व रिवाज चालत आले असतील त्यांवर योग्य नजर द्यावी, अशी आमची आज्ञा आहे.

राज्यलोभी मनुष्यांनी स्वदेशीय लोकांस खोटे मजकूर समजावून फसविलें, आणि दंगा करण्यास प्रवृत्त केलें; अशा त्यांच्या कृत्यांनी हिंदुस्थानांतील लोकांस इजा, आणि दुःखें प्राप्त झालीं येणेकरून आह्मास फार दुःख झालें आहे. दंगा करणारांचा पराजय करून दंग्याचा मोड केला यावरून आमचें सामर्थ्य सर्वांस जाहीर झालें आहे; परंतु सदहूप्रमाणें फसलेल्या लोकांपैकीं, जे पुनः योग्य रीतीने चालूं इच्छितात त्यांवर दया करून, त्यांच्या अपराधांची क्षमा करावी अशी आमची मर्जी आहे.

अधिक रक्तस्राव न व्हावा, व हिंदुस्थानांतील आमच्या मुलुखांत स्वस्थता लवकर व्हावी या उद्देशाने एका प्रांतांत तर आमचे वैसराय व गवरनर जनरल याणी मागें जे दुःखकारक दंगे झाले त्यांत ज्या लोकानी सरकारच्या विरुद्ध गुन्हे केले त्या बहुतेक लोकांस, कांहीं अटी ठरवून अपराधांची क्षमा होईल अशी आशा दाखविली आहे; आणि ज्यांचें अपराध क्षमेस पात्र नाहींत अशा गुन्हेगारांस काय काय शिक्षा होईल हेंही त्याणी ठरविलें आहे, सदहू तजवीज आमचे वैसराय आणि गव्हर्नर जनरल याणी केली ती आह्मास मंजूर व कबूल आहे; व याशिवाय आह्मी आणखी जाहीर करितों तें येणें प्रमाणें :-

इंग्रज सरकारच्या रयतेचे खून करण्यांत प्रत्यक्ष संबंध असल्याची ज्यांवर शाबिती झाली असेल, किंवा होईल त्या गुन्हेगारांवर दया करणें न्यायविरुद्ध आहे; परंतु त्यांखेरीज बाकीच्या सर्व गुन्हेगारांवर दया केली जाईल.

खुनी गुन्हेगारांस ज्या लोकांनी समजून उमजून आश्रय दिला असेल, किंवा जे दंग्यास पुढारी अथवा प्रवर्तक झाले असतील त्यास जीवदानाखेरीज दुसरें कांहीं आश्वासन देववत नाहीं. परंतु अशा मनुष्यांस शिक्षा ठरवितांना, ते सरकाराशीं बेइमान होण्यास कोणत्या कारणावरून प्रवृत्त झाले, याचा पूर्ण विचार केला जाईल; आणि मतलबी मनुष्यांनी उठविलेल्या खोट्या बातम्या केवळ अविचाराने खऱ्या समजून ज्या लोकांनी गुन्हे केले असें दिसून येईल त्या लोकांविषयीं पुष्कळ मेहेरबानीची नजर ठेविली जाईल.

सदहू मनुष्याखेरीज जे लोक दंग्यांत असून लढाई करीत असतील ते जर आपआपल्या घरास परत येऊन स्वस्थ आपआपले काम धंदे करूं लागतील तर

त्याणी आमच्या विरुद्ध, व आमच्या राज्या विरुद्ध, व आमच्या दर्जाविरुद्ध केलेले सर्व गुन्हे विसरून कोणतीही अट न लावितां त्यांस माफी, व क्षमा मिळेल असें आह्मी या जाहीरनाम्याच्या द्वारें आश्वासन देतों.

अपराधांची क्षमा, व मेहेरबानी करण्याप्रकरणीं जे नियम वर लिहिले आहेत त्या अन्वयें पुढील जान्युआरी महिन्याच्या १ ले तारखेपूर्वी जे वर्तणूक करितील त्या सर्वांस माफीचे, व मेहेरबानीचे सदहू ठराव लागू करावे अशी आमची आज्ञा आहे.

ईश्वरकृपेने जेव्हां हिंदुस्थानांत स्वस्थता होईल तेव्हां त्या देशांतील व्यापार धंद्यास उत्तेजन द्यावें, लोकोपयोगी आणि लोककल्याणाच्या कृत्यांची वृद्धि करावी, व त्या देशांत राहणाऱ्या आमच्या सर्व रयतेचें हित होईल अशा रितीने राज्य-कारभार चालवावा, अशी आमची मनापासून इच्छा आहे. आमच्या रयतेची आबादानी तेंच आमचें सामर्थ्य, त्यांचा संतोष तीच आमच्या राज्याची मजबुती, व त्यांची कृतज्ञता तेंच आह्मास उत्तम फळ, असे आह्मी समजतों. रयतेच्या कल्याणाविषयीं आमच्या ज्या या इच्छा आहेत त्या सिद्धीस नेण्यास सर्व शक्तिमान, जो परमेश्वर तो आह्मास व आमच्या अधिकाऱ्यांस सामर्थ्य देवो अशी आमची प्रार्थना आहे."

सदहू जाहीरनामा रा० रा० विनायकराव वासुदेवजी ओरियंट्ल त्रान्सलेटर यांहीं वाचून दाखविला. तो ऐकून सभासदांनीं आनंदाचा एकच गजर करून सोडिला.

ह्या दिवशीं मुंबईतील रयतेनें दीपोत्साह करून व जागोजागीं निशाणें उभारून आपला आनंद प्रदर्शित केला. हा उत्साह यथासांग रयतेकडून घडावा म्हणून सरकारांतून लोकांस दोन दिवस एक सारखी सुटी मिळाली होती, सबब हा लोकांनीं दोन दिवसपर्यंत मोठ्या हौसेनें केला. ह्या प्रसंगीं शहरांत सुमारें चार पांच लक्ष रुपये खर्च झाला असावा. फक्त खोबऱ्याचें तेल त्या दिवशीं साठ सत्तर हजार रुपयांचें जळलें. गलासें तर इतकीं महाग झालीं होतीं कीं, दर-शेंकड्यास दहा पंधरा रुपये देऊन कित्येक व्यापारी लोकांनीं भाड्यानें आणिलीं होतीं, भर रस्त्यांत देखील मोठमोठाले झुंबर टांकले होते.

मुंबईच्या संबंधानें ह्मैसूर, आसे, भरतपूर, काबूल व दुसऱ्या प्रांतांत इंग्रजांच्या आजपर्यंत लढाया होऊन त्यांत ते विजयी झाले होते, परंतु ह्या प्रकारचा

०५११९ १५१ ९२:५१ ८६३ ९६।३।

उत्साह कधींच झाला नव्हता. लार्ड नेल्सन हे जेव्हां नील नदीवरील युद्धामध्यें विजयी होऊन स्वदेशास परत गेले होते त्यावेळीं लंडन शहरांत मोठी अरास व उत्साह झाला होता, असें सांगतात; हाही त्याच कोटींतील होता.

काबूलची लढाई सन १८३९ त उद्भवली. ह्या लढाईंतही कंपनी सरकारची फारच नासाडी झाली. कित्येक धुरंधर योद्धे मारले गेले. याच लढाईमध्यें सन १८४१ त सर डब्ल्यू. एच. म्याग्नाटन हे मारले गेले. ह्या ठिकाणीं असतानांच या नामांकित पुरुषाची नेमणूक मुंबईच्या गव्हर्नराच्या हुद्यावर झाली होती, आणि ते आपल्या हुद्याचा अधिकार घेण्यास येणार, इतक्यांत दुष्ट अफगाण लोकांनीं त्यांचा घात केला. पुढें इंग्रजांनीं सन १८४२ त काबूलावर जय मिळवून दोस्त महंमदखान काबूलचा राजा याच्या पुत्रास एथें धरून आणिलें होतें, आणि तेथील बडे लोकांचे सोन्यारुप्याचे दागिने व अनेक तऱ्हेचें जवाहीर सुमारें दहा वीस लक्षांचें आणिलें होतें, तें एक महिना पर्यंत टौनहालांत एथील लोकांस दाखवायासाठीं मांडिलें होतें. हें पहायास हजारो लोक प्रति दिवशीं जात. ह्यांत एक एक नथच पांच पांच सहा सहा तोळे वजनाची जडाव असून हजार दीड हजार रुपये किमतीची होती. हें सर्व जाहीर लिलाव करून विकलें. पूर्वीं इसवी सन १०२४ त महंमदानें गुजराथेवर हल्ला करून सोमनाथाचा विध्वंस केला होता, आणि देवालयाचा अपूर्व चंदनी दरवाजा गिझनी एथें नेऊन आपल्या मशिदीस लावला होता, तो परत हिंदुस्थानांत आणिला होता, इतकें असतांही याप्रसंगीं मुंबईंत कांहींच उत्साह केला नव्हता.

सन १८५८ च्या बंडाचे लढाईंतही झांसीहून पुष्कळ जवाहीर, मोत्याच्या कंठ्या, व राजे लोकांचे रत्नजडित अलंकार आणून टौनहालांत लोकांस दाखवायासाठीं ठेविले होते. त्यांत दाने हार होते. त्या एक एकाची किंमत तीस तीस हजार रुपये होती असें सांगतात. हेही लिलाव करूनच विकले.

---

# प्रकरण ८.

गव्हर्नर व त्यांचीं कृत्यें—व्यापार वाढविण्याची युक्ति—व्यापाऱ्यांची संख्या—पेढयांची स्थापना—सर चार्लस फार्बस व सर जमशेटजी जिजीभाई या नामांकित व्यापाऱ्यांचा संक्षिप्त इतिहास—शहराचें सरकारास उत्पन्न—घरांची संख्या व उत्पन्न—नवे कर व ते घेण्याचीं कारणें—नव्या नोटी—लैसेन्सटाक्स बंद केल्याचा सरकारी हुकूम.

सन १६६१ त मुंबई बेट कागद पत्रद्वारें इंग्लंड देशाचा राजा दुसरा चार्लस यांची राणी इनफ्यानूटा क्याथरैन हिच्या स्वाधीन झालें. त्याच वर्षी पांच जहाजांचे अरमार त्याजवर सर आंद्रू शिपमन याची नेमणूक करून अर्ल आफ् मार्लब्रो हे राजाच्या हुकुमानें मुंबई बेट स्वाधीन करून घेण्यासाठीं सप्तेंबर महिन्याच्या १८ व्या तारिखेस एथें येऊन दाखल झाले. त्यांनीं आपणा बरोबर एथील पोर्टुगीझ् सरकारचा मुख्याधिकारी यास त्या सरकारांतून इंग्रजांच्या स्वाधीन मुंबई करावी असा हुकूम आणिला होता. व पोर्टुगाल दरबारांतून एक मानकरीही हें बेट इंग्रजांचे स्वाधीन करावें ह्मणून मुखजबानी सांगण्या करितां आणिला होता; परंतु हें बेट आपल्या स्वाधीन असावें असा एथील पोर्टुगीझ्लोकांचा मनोदय होता, सबब त्यांनीं एक दोन तक्रारी काढिल्या, त्या अशा; साष्टी खेरीज करून फक्त मुंबई तुमचे स्वाधीन करूं. परंतु अर्ल आफ् मार्लब्रो हे साष्टी सुद्धां मुंबई आपल्या स्वाधीन करावी असा मूळचा करार असें ह्मणूं लागले. दुसरी त्यांनीं अशी तकरार काढली कीं, जी सनद पोर्टुगालच्या बादशहानें दिली आहे, ती शिरस्त्या प्रमाणें नाहीं. सबब त्या बरहुकूम हें बेट इंग्रज लोकांच्या स्वाधीन करवत नाहीं. असें उत्तर मिळाल्यावरून अर्ल आफ् मार्लब्रो यांस वरवा करायास कोठें तरी स्थल शोधणें प्राप्त झालें. सर आंद्रू शिपमन यासच कोणी-कोणी सर एब्राहाम शिपमन असें म्हणतात. आणि ह्यासच या बेटावरील प्रथमचे गव्हर्नर नेमिले होते, परंतु तो योग घडून आला नाहीं.

आरमारावर पांचशें गोरे लोक होते त्यांचे हाल होऊं लागले तेव्हां सर आंद्रू शिपमन यानें जहाजें गोंव्यानजीक सदाशिवगडाच्या अलीकडे दहा पंधरा कोशांवर आंजदिवें ( आद्यद्वीप ) ह्मणून लहान बेट आहे तेथें नेऊन लष्कराचे पाय मोकळे करायासाठीं उतरून तेथेंच छावणी मारिली. एथें आंद्रू शिपमन यास व लष्करास ठेवून जहाजें घेऊन अर्ल आफ् मार्लबरो हे परत स्वदेशीं इंग्लंडास गेले. हें स्थळ रोगी व एथील हवा नाकारी असल्यामुळें व थंडी ऊन व पाऊस यांजपासून रक्षण करण्याजोगीं मजबूत व हवाशीर घरें नसल्यामुळें पावसाळयांत ह्यांचे फारच हाल झाले. आणि त्या लष्करापैकीं तीनशें गोरे शिपाई व सर आंद्रू शिपमन हे मरण पावले.

सर आंद्रू शिपमन यास देवाज्ञा झाल्याचें वर्त्तमान इंग्लंड शहरास पोहोंचल्यावर इंग्लंड देशच्या राजानें त्याच्या जाग्यावर हंफ्री कुक याची या बेटावर नेमणूक करून जें बाकी लष्कर राहिलें होतें, तें घेऊन मुंबई बेट स्वाधीन करून घेण्याचा हुकूम दिला. हे सन १६६५ फेब्रुआरी महिन्यांत एथें येऊन दाखल झाले. नंतर त्यानें मुंबईचा राज्याधिकार आपले स्वाधीन करून घेतला. परंतु ह्या वेळीं पोर्तुगीझ् लोकांचा मुख्य अधिकारी जीं कलमें सांगेल तीं कबूल करणें त्यास प्राप्त झालें, तथापि हरयुक्तीनें हें बेट त्यानें हस्तागत करून घेतलें, आणि आपला अमल चालू केला. पुढें कांहीं काळानें हंफ्री कुक यानें सरकारी ऐवज खासगी कामास लावल्याचा आरोप त्यावर आल्यामुळें तें काम सोडणें त्यास लवकरच प्राप्त झालें. मग त्याच्या जाग्यावर सर गरवेस लुकास यास नेमिलें. सर गरवेस लुकास यांनीं पांचवी नवेंबर सन १६६६ या दिवशीं ह्या बेटाचा अधिकार आपल्या स्वाधीन करून घेतला. पुढें त्यांस लवकरच देवाज्ञा झाल्यामुळें त्या जाग्यावर त्यांचे दुय्यम कपतान हेनरी गारी हे सन १६६७ मे महिन्याच्या २१ व्या तारिखेस गव्हर्नरच्या हुद्यावर बसले. इंग्लंडदेशच्या राजाच्या स्वतःच्या नेमणुकी पैकीं हा शेवटचा गव्हर्नर. पुढें यांत कांहीं रहस्य नाहीं असें पाहून दुसरा चार्लस यानें हें बेट कंपनीच्या स्वाधीन केलें. तेव्हांपासून कंपनीच्या नात्यानें गव्हर्नर येऊं लागले.

ह्या शहराचा किंबहुना सर्व मुंबई इलाख्याचा राज्यकारभार चालविण्यास इंग्रज सरकाराकडून लंडनशहराहून एक गव्हर्नर येत असतो. तसेंच राज्यकारभार चालविणारे सनदी, लष्करी, दिवाणी कामदार लोकही तेथूनच येत असतात. गव्ह-

र्नराची नेमणूक मुख्य इंग्लंड देशाच्या सरकारांतून होती. हे गव्हर्नर दर पांच वर्षांनीं बदलत असतात. ह्यांस सालिना १,२०,००० रुपये वेतन मिळतें. ह्याशिवाय दुसऱ्या खर्चाबद्दल सालिना २५००० रुपयांची नेमणूक असती. आणखी मुंबईंत रहायास दोन सरकारी वाडे बांधून ठेविले आहेत, एक परळास व दुसरा वाळुकेश्वरीं. ह्यांस चाकर चुकर वगैरे सर्व सरंजाम, चार घोड्यांचा रथ बसायास, व घोडेस्वार सरकारांतून मिळतात. ह्यांच्या दरवाज्यांत सतत संत्रीचा पहारा असतो. कांहीं महिने वाळुकेश्वरी व कांहीं महिने परळ एथें रहातात. आणि चतुर्मासांत हे पुण्यास रहावयास जातात. मग तेथून सातारा व अहंमदनगर एथें कांहीं दिवस राहून मार्गशीर्षाच्या सुमारास परत मुंबईस येतात. गव्हर्नर साहेबांस राज्यव्यवस्था करण्यास दुसरे तिघे मदतनीस असतात. एक सेनाधिपति; ह्याची ही नेमणूक इंग्लंड देशांतून होते. त्यास ५०,००० रुपये दरसाल ह्या हुद्याबद्दल मिळतात. त्याच्या रथाबरोबर जाण्यास स्वारांची नेमणूक केलेली आहे, व त्याच्या दारांत संत्री लोकांचा पहारा असतो. यांच्या फिरण्याच्या खर्चाबद्दल बऱ्याच रकमेची नेमणूक आहे. सेनाधिपतीचा हुकूम ह्मटला ह्मणजे फक्त फौजेवरच असतो खरा, परंतु ज्यावेळेस कौन्सल भरतें त्या वेळेस गव्हर्नर साहेबांच्या खालची पदवी सेनाधिपतीची असती. यांस दिवाणीखात्यापैकीं कांहीं करावें पडत नाहीं, तथापि या हुद्याबद्दल त्यांस वर्षाचे ६०,००० रुपये मिळतात. ह्या शिवाय भाड्याबद्दल सालिना ३,६०० यांची नेमणून केलेली असते. दुसऱ्या दोन मदतनिसांची नेमणूक सिविल खात्यांतील पोक्त व सरकार कामांत पुष्कळ वर्षें वहिवाटलेले असे पाहून कौन्सलच्या मुख्याकडून होती. ह्यांस कौन्सलर्स असे ह्मणतात. ह्या प्रत्येकास सालिना साठ साठ हजार रुपये मिळतात. व त्यांच्या दरवाज्यांत नेहमी संत्रीचा पहारा असतो. असे हुद्देदार एकत्र जमून राज्य प्रकरणीं मसलत करितात. आणि गांव, लष्करी, न्याय, वैद्य, धर्म व विद्या, खात्यांतील कामगार लोकांच्या नेमणुका करितात, ह्या कामगारांस कोणास तीन, कोणास अडीच, कोणास दोन, कोणास एक हजार, कोणास पांचशें असे पगार मिळतात. बेसनदी सरकारी हुद्देदार कामगारांच्या नेमणुकाही एथूनच होतात. ह्या सर्व नेमणुका प्रथम सरकारी वर्त्तमानपत्रांत दर गुरुवारीं जाहीर होतात. गव्हर्नरास सेनाधिपतीचाही हुद्दा चालविण्याचा अधिकार असतो. कांहीं वर्षांमागें ह्या चौघां सरकारी हुद्देदारांचें राज्य प्रकरणीं खलबत करण्यास

प्रत्येक बुधवारीं दोन प्रहरीं टौनहालांत दरबार भरत असे. यास कौन्सल असें ह्मणतात. या प्रसंगीं सरकारी सकरतार लोक ( चिटणीस ) कागद पत्रें आणून एथें हजर करितात. परंतु हल्लीं आठ दहा वर्षांत टौनहालांत कौन्सल भरणें तहकूब केलें होतें. कांहीं वर्षें हें दरबार गव्हर्नर साहेबाच्या घरींच भरत असे. राज्य प्रकरणीं तसेंच कांहीं ठरवायाचें असलें तर कागदोपत्रीं एकमेकांचें अनुमत घेऊन ठरवितात.

मुंबई बेट इंग्रज सरकारच्या हस्तगत झाल्यापासून आजपर्यंत जे जे इंग्लंड देशाच्या राजाकडून व कंपनी सरकाराकडून राज्य कारभार चालविणारे गव्हर्नर आले त्यांचीं नांवें. आज सुमारें दोनशें वर्षांत राज्य व्यवस्था चालविणाऱ्या ५० नामांकित पुरुषांनीं या शहरावर राज्य कारभार चालविला. त्यांतील कित्येकांनीं आह्मावर उपकार केले आहेत, ते आह्मास कृतज्ञतापूर्वक स्मरले पाहिजेत.

## खुद राजाकडून

| | |
|---|---|
| हंफ्री कुक ........................................ | सन १६६५ |
| सर गरवेस लुकास .................................... | १६६६ |
| कपतान हेन्‍री ग्यारी .................................... | १६६७ |

## कंपनी सरकाराकडून.

| नांवें. | वर्षें. | नांवें. | वर्षें. |
|---|---|---|---|
| सर जार्ज आक्झेंडन... | १६६८ | जान हार्न ............... | १७३४ |
| जराल्ड आंजीयर ...... | १६६९ | स्टिफन ला ............... | १७३९ |
| सर जान चैल्ड, बारोनेट ... | १६८० | विलियम वेक ............ | १७४२ |
| जान व्हाक्स ............ | १६९० | जान गिकी ............ | १७४२ |
| बार्थलोम्यु हारिस ......... | १६९० | रिचर्ड बौचर ............ | १७५० |
| बार्थलोम्यु आनेस्लि ....... | १६९२ | चार्लस क्रामेलिन् ......... | १७६० |
| सर जान गेयर .......... | १६९८ | टामस हाजिस ............ | १७६७ |
| सर निकोलास वेट ......... | १७०२ | विलियम हार्नबी ......... | १७७६ |
| सर हेन्‍री आक्झेंडन, बारोनेट | १७०७ | रासन हार्ट बाडम ......... | १७८४ |
| विलियम एस्लाबी ........ | १७०९ | आंद्रू रामसे ............ | १७८८ |
| चार्लस बून ............. | १७२४ | सर विलियम मेडोझ, के. बी. | १७९० |
| विलीयम फिप्स .......... | १७३१ | सर राबर्ट आबरक्रांबी, के. बी. | १७९० |
| राबर्ट कोवान ............ | १७३४ | जार्ज डिक ............ | १७९४ |

| | | | |
|---|---|---|---|
| जान ग्रिफिथस् ............ | १७९५ | सर डब्ल्यू. एच्. म्याग्नाटन, बारोनेट............ | १८४१ |
| जोनाथन डंकन............ | १७९५ | आनरबल जार्ज विलियम अंडरसन ............ | १८४१ |
| जार्ज ब्रौन ............... | १८११ | सर जार्ज आर्थर, बारोनेट... | १८४२ |
| सर ईव्हान नीपियन, बारोनेट | १८१२ | आनरबल लेस्टाक राबर्ट रीड. | १८४६ |
| धि आनरबल मौंट स्टूअर्ट एल्फिन्स्टन ............ | १८१५ | जार्ज रसल क्लार्क ......... | १८४६ |
| सर जान माल्कम्, के. सी. बी. | १८२७ | लार्ड वैकौंट फाकलंड, जी. सी. एच ............ | १८४८ |
| सर.टी.एस.बेक्वीथ,के. सी.बी. | १८३० | धि रैट आनरबल जान लार्ड एल्फिन्स्टन, जी. सी. एच. | १८५३ |
| जान रोमर ............... | १८३१ | सर जार्ज रसल क्लार्क, के. सी. बी. ......... | १८६० |
| अर्ल आफ् क्लेर ............ | १८३१ | सर हेनूरी बार्टल एडवर्ड फ्रियर, के. सी. बी. ... | १८६२ |
| सर राबर्ट ग्र्यांट जी. सी. एच. ............ | १८३५ | | |
| जेम्स फयारिश............ | १८३८ | | |
| सर जेम्स रिव्हेट करनाक, बारोनेट ............ | १८३९ | | |

सर जार्ज रसल क्लार्क हे गव्हर्नर सन १८६२ माहे अप्रील तारीख २४ या दिवशीं गव्हर्नराचा हुद्दा सोडून स्वदेशीं इंग्लंडास गेले. त्यांच्या जाग्यावर सर हेनूरी बार्टल एडवर्ड फ्रियर जे पूर्वीं कलकत्त्यांतील कायदे करणाऱ्या मंडळींतील एक सभासद होते, त्यांस मुंबईचे गव्हर्नर नेमिले. हे तारीख २२ अप्रील रोजीं कलकत्याहून आगबोटींतून मुंबई एथें दाखल झाले. सर बार्टल फ्रियर यांची मुंबई इलाख्याच्या गव्हर्नराच्या जाग्यावर नेमणूक झाली, यामुळें मुंबईच्या रयतेस मोठा हर्ष झाला, हे साहेब रयतेची कींव बाळगणारे असून पूर्वीं मुंबईतील दिवाणी खात्यांत पुष्कळ वहिवाटलेले होते. आणि त्यांनीं त्यावेळीं आपल्या औदार्याचीं व दयेच्या कृत्याचीं पुष्कळ उदाहरणें दाखविलीं होतीं. ज्यावेळीं गव्हर्नर जहाजावरून पालो बंदरांत उतरतात तेव्हां १७ तोफांची सरबत होती. व पालो बंदरापासून चर्चगेटापर्यंत रस्त्याच्या दोन्हीं बाजूंनीं काळ्या व गोऱ्या पलटणी उभ्या करून नवीन आलेल्या गव्हर्नरास मान देतात. आणि पलटणींतील व दिवाणी खात्यांतील सरकारी हुद्देदार व मोठमोठाले व्यापारी लोक त्यांस सामोरें जातात. हे गव्हर्नर २२ व्या तारिखेस सुमारें दोन वाजतां पालो बंदरावर आग-

बोटींतून उतरले; आणि त्यावेळीं भर दोन प्रहरच्या उनाचा कडाका होता, सबब ह्या दयाळू गव्हर्नर साहेबानीं शिपायांस आपणास सत्कार देण्याकरितां उनांत उभें करण्याचें मना करून अशा डामडौलाशिवाय उतरून वालुकेश्वरीं आपले बंधु नामदार डब्ल्यु. इ. फ्रियर कौन्सलर यांच्या वाड्यांत गेले.

मेहरबान सर बार्टल फ्रियर यांची एथें नेमणूक झाली त्यावरून मुंबईंतील गार्डियन नांवाच्या एका इंग्रजी वर्त्तमानपत्रांत कोणी शुभचिंतक या सहीच्या इंग्रजानें ह्या गव्हर्नराच्या स्तुतिपर एक कविता लिहून पाठवली होती. ती कविता-रूपांतच एथें उतरून घेतली आहे.

## साक्या

आह्मी ऐकों तीहि सुवार्त्ता चहूंकडे पसराहो ॥
नेमिति मुंबई सुज्ञ गव्हर्नर सर्‌बार्टल्‌ फ्रियराहो ॥ १ ॥
भाला तरवारीच्या जागीं हलकोईता राहो ॥
यांच्या अमलीं स्वास्थ्य असो हें सर्‌ बार्टल्‌ फ्रियराहो ॥ २ ॥
मक्ते तळमळ करिती लवकर त्यांतें तदनलदाहो ॥
निर्बंध व्यापार आवडे सर्‌ बार्टल्‌ फ्रियराहो ॥ ३ ॥
मुंबइ भर भर पावेल अतां जन तुह्मीच पहाहो ॥
गव्हर्नराच्या खालीं समया सर्‌ बार्टल्‌ फ्रियराहो ॥ ४ ॥
सज्जन चढतिल दुर्जन पडतिल आनंदचि सुज्ञांहो ॥
बरवें वेंचुनि काढिल गुणहा सर्‌ बार्टल्‌ फ्रियराहो ॥ ५ ॥
जयजयकार प्रजेचा आह्मां आकाशवरीवाहो ॥
मुंबइ घेवो परत आपुल्या सर्‌ बार्टल्‌ फ्रियराहो ॥ ६ ॥
पुस्तक शाळा संग्रहालयें झटकरचि उभाराहो ॥
यांतें आश्रय दाता समजा सर्‌ बार्टल्‌ फ्रियराहो ॥ ७ ॥
त्रस्तचित्त तरि उत्सुकसें मी सत्यवदें मानाहो ॥
नलगे आयास स्तविण्यातें सर्‌ बार्टल्‌ फ्रियराहो ॥ ८ ॥
आमुची राणी आणि कायदे चिकटुनि राहुनियांहो ॥
जयजय कारूं गव्हर्नरानव सर्‌ बार्टल्‌ फ्रियराहो ॥ ९ ॥

मेहरबान मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन साहेबापूर्वी जे गव्हर्नर होऊन गेले त्यांपैकीं कित्येकांनीं मुंबई शहराचें बरेंच कल्याण केलें होतें; परंतु एल्फिन्स्टन साहेबांनीं जी सुधारणूक केली तीपुढें त्यांचीं कृत्यें केवळ लपून गेलीं. त्यांपैकीं डंकन व हार्नबी साहेबांचीं नांवें मात्र थोडीं बहुत जिकडे तिकडे गाजत आहेत.

हार्नबी साहेबाच्या कारकिर्दींत वरळीचा बांध बांधिला ह्मणून त्यास हार्नबी-व्हिलार्ड असें नांव ठेविलें होतें. व गोदी समोरची मोठी इमारत जींत सुप्रीम कोर्ट बसत असतें ती यांनीं बांधविली होती. हा यांचा खासगी वाडा; हा वाडा मोठा विशाळ आहे. ह्याचें दरमहा १८०० रुपये भाडें येतें. ह्या वाड्यास हार्नबी बिल्डिंग असें नांव आहे. व यांच्या नांवाचा एक कोटांत रस्ता आहे. कोटांतील सरकारी वाडा ज्यांत सद्यः सकरतारीचें हपीस आहे तो कोणी बांधिला होता याचा बराबर शोध लागत नाहीं, परंतु हा पोर्टुगीझ् सरकारानें बांधिला होता असें कित्येक सांगत. पूर्वी गव्हर्नर या वाड्यांत रहात होते. ही इमारत मोठी विशाळ आहे. ज्यावेळीं परळचा वाडा डंकन साहेबानें गव्हर्नर साहेबांसाठीं तयार केला त्यावेळीं हा वाडा खालीं केला. मग मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन साहेबांच्या कारकिर्दींपासून त्यांत सकरतारीचें हपीस घालण्याचा हुकूम केला. परळचा वाडाही मोठा टोलेजंग आहे. हाही पोर्टुगीझ् सरकारानें आपल्या धर्मांतील साधु लोकांस रहाण्यासाठीं बांधिला होता असें कित्येकांचें ह्मणणें आहे. परंतु तें कांहीं असो. हें राजगृह मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन साहेबांच्या कारकिर्दीपासून पूर्ण उदयास आलें. यांत पुष्कळ फेरफार करून तें सद्ध्याच्या योग्यतेस आणिलें आहे. ह्या वाड्यांतील सरंजाम पहाण्यास योग्य आहे. वाळुकेश्वरावरील वाडाही मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन साहेबांनींच बांधविला. हा वाडा बैठा असून फार मोठा नाहीं, परंतु एथील हवा रमणीय आहे.

गोदी, कुलाब्यांतील व कोटांतील सोलजर लोकांस रहाण्याचीं घरें, बेलासिसरोड, महालक्ष्मीस जाण्याचा नवा रस्ता, व डंकनरोड ह्मणतात तो रस्ता व शींवचा बांध हीं सर्व डंकन साहेबाच्या कारकिर्दींत बांधलीं होतीं. या शिवाय यांनीं दुसरीं पुष्कळ लोकोपयोगी कृत्यें केलीं. रजपूत लोकांतील बालहत्या मोडण्याचे प्रयत्न यांणीं चालविले होते. हे एतद्देशीय लोकांवर फार प्रीति करीत होते. आणि ब्राह्मण लोकांवर यांची भक्ति होती ह्मणून सर जेम्स म्याकिनूटाश ह्यांनीं यांस एके ठिकाणीं ब्राह्मण झालेले डंकन असें ह्मटलें आहे. सर ईव्हान नीपियन

हे सन १८१२ त गव्हर्नर होते. त्यांनीं तरी मुंबईच्या लोकांच्या कल्याणाकडे बरेंच लक्ष दिलें होतें असें सांगतात, परंतु यांचें नांव लोकांत अगदीं महशूर नाहीं. जीं त्यांनीं कृत्यें केलीं तीं उदयास न येण्याचें कारण हें एक असावें कीं, त्यावेळीं मुंबईंतील लोक सद्ध्याचे सारिखे इंग्रजांचे गुणग्राही नव्हते. मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनीं जीं कृत्यें केलीं त्यावेळीं मुंबईचा पूर्ण बहर होता. आणि ज्या ज्या कामांत त्यांनीं हात घातला तीं त्यांचें नांव चिरकाळ रहाण्या जोगतींच होतीं. त्यांनीं राज्याचा असा मजबूत पाया घातला कीं, त्यांच्या मागून जे जे गव्हर्नर झाले त्यांनीं बहुधा त्यांचाच कित्ता घेतला, आणि त्यांनीं जे नेम करून ठेविले होते त्यां प्रमाणें त्यांस चालणें भाग पडलें. सर जॉन माल्कम् यांनीं तर सर्वत्र एल्फिन्स्टन साहेबांचाच क्रम चालविला होता. त्यांनीं एक दोन प्रसंगीं प्रख्यात सभेंत भाषण केलें त्यांत असें दर्शविलें होतें. "एतद्देशीय लोकांशीं कोणत्याच प्रकारें द्वैतभाव ठेवणें हें इंग्रज लोकांस मोठे हानिकारक आहे. कोणी इंग्रज कामगारानें असें समजूं नये कीं, आपण ह्मणजे इंग्रज व सरकारी हुद्देवाला; आपणापाशीं राज्यसत्ता आहे, तर एतद्देशीय लोकांशीं व आपणाशीं मोठें अंतर आहे, ह्मणून त्यांसीं सलुकेनें वागूं नये. असा अभिमान कोणी बाळगूं नये. परस्परांनीं एकमेकांशीं शुद्ध अंतःकरणानें वर्त्तण्यांत मोठें सुख आहे." एका प्रसंगीं त्यानें असें सांगितलें कीं, प्रथम आपणास स्वजातीय अभिमान इतका असे कीं, एखाद्या एतद्देशीय श्रीमान् गृहस्थाकडे संघटण ठेवणें ह्मणजे हलके असें वाटे; परंतु अनुभवाअंतीं माझी खातरी झाली कीं, एतद्देशीय लोकांपाशीं बरोबरीच्या नात्यानें वागल्यानें पुष्कळ लाभदायक गोष्टी आहेत, आणि राजा व प्रजा यांमध्यें प्रामाणिकपणा आणि प्रीति उत्पन्न करण्याचीं लक्षणें हींच आहेत कीं एकमेकांशीं मोकळे मनानें वागणें, असें उपदेशपर पुष्कळ भाषण केलें होतें.

हें बेट इंग्रज लोकांच्या ताब्यांत आलें तेव्हां मराठी राज्याच्या धुमाळीमुळें लोकांची वस्ती एथें होत नसे. परंतु इंग्रज लोकांनी धर्मप्रकरणीं कोणास त्रास न देतां ज्याचा त्यानें धर्म चालवावा अशी मोकळीक दिली होती, त्यामुळें गरीब, हलकट व अलनूटपु लोकांची संख्या वाढत असून जमाबंदी फार कमी होत असे. असें पाहून शहरांत पुष्कळ श्रीमंत, सावकार व धनिक लोक आणण्याचे उपाय त्यावेळच्या गव्हर्नरांनीं योजिले. गोंवें व इतर प्रांतांत कारागीर व धनिक लोक होते त्यांजकडे त्यांच्या मर्जी प्रमाणें करार करून एथें येऊन रहाण्याची विनंती केली.

गोंव्याचे किरिस्तांव लोक एथें पायमोजे तयार करीत ते विकत घेऊन विलायतेंत कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांस पाठवीत. अशा यांनीं अनेक युक्ति काढिल्या. दमण एथें नेमापारख ह्मणून एक मोठा व्यापारी वाणी होता त्यास बलावून मुंबईंत आणिलें, आणि त्याशीं अशी कबूलात केली कीं, वाणी लोकांस रहायास स्वतंत्र वेगळीच जागा देऊं, आणि मुसलमान व किरिस्तांव लोक त्यांच्या शेजारीं येऊन रहाणार नाहींत; व त्यांस धर्मसंबंधी कांहीं प्रतिकूलता पडूं देणार नाहीं. अशा अनेक युक्ति करून मोठ्या लोकांस शहरांत आणिलें. तेव्हां पासूनच मुंबई-मध्यें मासळी व मांस विकण्याच्या जागा एकीकडे नेमून दिल्या व बाजारगेटांतून मासळी, दारू वगैरे कांहीं नेऊं नये असा कायदा केला असावा. कारण त्याठिकाणीं वाणी, भाटये, व मारवाडी व्यापारी लोक रहात होते. आणि ही वहिवाट अद्याप चालु आहे. त्याचप्रमाणें शहरांतून मासळी व मांस नेण्याचें असलें तर तें उघडें नेऊं नये असा नेम केला असावा. त्यावरूनच हा पदार्थ हल्लीं देखील रस्त्यांतून नेणें झालें तर फडक्यांत किंवा कागदांत गुंडाळून झांकून नेत असतात.

व्यापारी लोकांची वृद्धि होण्यास व्यापार वाढविला पाहिजे हें मनांत आणून कंपनी सरकारानें इंग्लंड देशांत लिहून पाठविलें कीं, मुंबई शहरांत मोठ-मोठाले सावकार येऊन रहातील असें करण्यांस कांहीं मालास जकातीची माफी व दुसरी मोकळीक असावी व त्यांच्या मालमत्तेचें रक्षण होण्यासाठीं जीं जीं साधनें अवश्य आहेत तीं करणें भाग आहे; असें १६९० त बार्थलोम्यु हारिस यांनीं वरिष्ठ सरकारास लिहून कळविलें. त्याप्रमाणें त्यांनीं लोकांस मोकळीक दिली. दोन तीन वर्षें पर्यंत कांहीं मालाच्या जकातीची व्यापारी लोकांस माफी केली होती. याशहरांत मोठ्या लोकांची वस्ती न होण्याचीं दुसरीं कारणें अशीं होतीं. जंजिऱ्यांतील शिद्दी, अलिबागचा आंग्रा, व वाडीचा सावंत यांजकडून मुंबईंत वारंवार उपद्रव होत असे. हे शत्रु वारंवार खानेरीहुनेरी, व छिनालटेकडी एथें येऊन रहात असत आणि सोय सांपडली ह्मणजे बंदरांतील जहाजांवर छापा घालून सांपडेल तें घेऊन जात, व मुंबईंत येऊन लोकांस लुटीत असत. शिवाजीची ही कधींकधीं स्वारी होई. त्याचें येणें एकाएकीं होत असे ह्मणून द्रव्यवान् लोक आपली संपत्ति व मुलेंमाणसें घेऊन येऊन रहाण्यास डचकत. पुढें १७२४ मध्यें चार्लस बून हे गव्हर्नर होऊन आले. त्यांनीं आपल्या कारकीर्दींत हा किल्ला मजबूत बांधिला. आणि जंजिऱ्यांतील शिद्याचा व दुसऱ्या चांचे लोकांचा जिकडे-

तिकडे बंदोबस्त ठेविला. तेव्हां पासून शेट, सावकार, व दुसरे वडेलोक एथें थोडे थोडे येऊन राहूं लागले. प्रथम सुरतेहून पारशी लोक आले. मग त्यांच्या मागून वाणी, भाटचे, लवाणे, खोजे, मेमण, बोरी, कच्छी, मारवाडी, अरब, व दुसरे दक्षिणी व्यापारी लोक येऊन व्यापार करूं लागले. पूर्वी कंपनी सरकारचे कामगार येत तेच स्वतः आपण व्यापार करीत. त्यामुळें दुसरे सावकार लोक व्यापारास हात लावण्यास भीत. याचाही बंदोबस्त कंपनी सरकारानें केला. त्यांत असें ठरविलें कीं, सरकारी कामदारानें कोणत्याच प्रकारचा व्यापार करूं नये. इंग्रज व्यापाऱ्यांपैकीं फार्बस्, लेकी, व रेमिंगटन हीं प्रख्यात व्यापाऱ्यांची हपिसें एथें प्रथम आलीं.

सर्चार्लस फार्बस् हे फार्बस् कंपनी ह्या पेढीचे मुख्य मालक. हे गृहस्थ मोठे सुज्ञ व व्यापारांत धूर्त असून सधन होते, इतकेंच नाहीं; परंतु एतद्देशीय लोकांचें कल्याण करणारे व पूर्ण अभिमान राखणारे होते. यांची पेढी आल्यामुळें मुंबईतील व्यापाऱ्यांस व दुसऱ्या लोकांस फार लाभ झाला. ह्यांच्या संपत्तीची एवढी आख्या सांगतात कीं, ह्यांच्या पेढीवर प्रतिवर्षीं कोट्यावधि रुपयांची उलाढाली होती, व लाखो रुपये यांच्या जामदारखान्यांत पडलेले असतात. ह्या गृहस्थांचें इंग्रज सरकारांत मोठें वजन असे. तें खर्चून एतद्देशीय लोकांचें हित करण्यांत ते फार झटत असत. हे हिंदुस्थानांत आल्यापासून बहुतेक एतद्देशीय लोक वैभवास चढले. ह्यांच्या पेढीवर जे जे कारकून व कामगार लोक होते त्यांस त्यांनीं सुखी करून सोडिलें. सन १८४९ नवेंबर महिन्यांत ह्यांस देवाज्ञा झाली. सारांश हे साहेब मोठे उदार, दयाळू, चतुर व समदृष्टीनें वागणारे होते. मरण समयीं त्यांणीं आपल्या हपिसांतील सर्व कारभारी लोकांस पुष्कळ द्रव्य वाटून दिलें व जीवंत होते तेव्हां प्रतिवर्षीं त्यांस सोन्याचीं घड्याळें, पेनशिला, रुप्याच्या तपकिरीच्या डब्या, कोठें उंच बनातीचे ताके असीं बक्षिसें पाठवून देत. ह्यांच्या हपिसांत सुमारें कारकून व कारभारी मिळून शेंदीडशें लोक आहेत. ह्यांच्या पेढीवरील लोकांस वृद्धपणीं बैठा पगार देणें व त्यांच्या मागें त्यांच्या बायकांचा प्रतिपाळ करणें असी या नामांकित पुरुषानें वहिवाट घातली आहे, ती अद्याप त्याचे वंशज व भागीदार चालवीत आहेत. ह्या परोपकारी गृहस्थानें सन १८४६ त कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांजपाशीं पंचवीस हजार रुपये देऊन त्यांस असें सांगितलें कीं, तें द्रव्य खर्चून मुंबईतील लोकांस क्षणोक्षणीं पाण्याची अडचण पडत्ये ती दूर करावी. ह्याचप्रमाणें गरीब लोकांसाठीं मुंबईत धर्मशाळा बांधण्याकरितां तितकीच

रकम दिली. तिजविषयीं यथास्थळीं वर्णन केलें आहे. ह्या परोपकारी गृहस्थाचा पुतळा माल्कम् साहेबाच्या शेजारीं टौनहालांत स्थापिला आहे, त्याच्या आसनावर असा लेख आहे.

" ह्या बेटांतील लोकांचें निर्लोभपणें कल्याण करणारे व भरत खंडांतील लोकांच्या परीक्षेस उतरलेले आणि विश्वास् मित्र. "

" सर् चार्ल्स् फार्ब्स् बारोनेट यांच्या सद्गुण स्मरणार्थ कृतज्ञतापूर्वक मुंबईतील गृहस्थानीं हा पुतळा सन १८४१ त स्थापिला आहे. "

नामांकित इंग्रज व्यापाऱ्यांचीं प्रख्यात हपिसें ५१; यहुदी लोकांचीं २०; मुसलमान लोकांचीं ३९; पारशी लोकांचीं ५८; आणि हिंदू, गुजर, व दक्षिणी लोकांचीं मिळून २०९ आहेत. दक्षिणी लोकां पैकीं बाबा साहेब दिवाणजी ( आंगरे ), गोपाळराव मैराळ, आणि दाजी साहेब किबे इंदूरचे सावकार, यांच्या पेढ्या सर्वत्र प्रसिद्ध आहेत. मध्यम प्रतीचे सावकार, सराफ, दुकानदार, दलाल, हुंडीवाले, व कारागीर मिळून ७२५. ह्यांत सर्व जातीचे लोक अढळतात; त्यांत पारशी व वाणी विशेष; साधारण दुकानदार, कारागीर, व व्यापारी यांची संख्या आठ दहा हजारांवर आहे.

ह्यासर्व हपिसांत बहुधा पारशी गृहस्थ दलाल असतात. आणि ह्या दलालीमध्यें ते दरसाल लाखो रुपये कमावीत असतात. व्यापाऱ्यांमध्यें पारशी, खोजे, मेमण, भाटये, आणि वाणी पुष्कळ. दक्षिणी हिंदू व्यापारी कोठें विरळा. हल्लीं खोजे व मेमण हे मुंबईंत लाखो रुपयांचे व्यापारी झाले आहेत. दक्षिणी लोकांत मात्र व्यापार करण्याची ईर्षा उत्तरोत्तर कमी होत चालली आहे. एतद्देशीय व्यापाऱ्यांत सर् जमशेटजी जिजीभाई हें एक रत्नच होऊन गेलें. हे पांच खेपा चिनास जाऊन आले होते. कलकत्ता आणि सिंहलद्वीप हीं त्यांनीं पाहिलीं होतीं. या नामांकित गृहस्थानें स्वकष्टानें व्यापारांत लाखो रुपये कमाविले. हा पुढील या नामांकित दानशूराचा संक्षिप्त इतिहास दुसऱ्या पुस्तकांतून घेतला आहे.

हे नामांकित पारसी ह्यांचा जन्म तारीख १५ जुलई सन १७८३ ह्या वर्षीं गुजराथ प्रांतांत नवसरी महालांतील मलेश्वर नांवाच्या गांवांत झाला. सरजमशेटजी ह्यांच्या बापाचें नांव जिजीभाई चानजीभाई व त्यांचे आईचें नांव जीवनजी असें होतें. जिजीभाई हा मलेश्वरामध्यें जरी गरीब तरी मोठा अब्रूदार गृहस्थ होता. जमशेटजी ह्यांचे सोळावे वर्षीं त्यांचा बाप व आई हीं एक वर्षाचे आंत

मृत्यु पावली. आईबापांनीं जमशेटजींस लहानपणींच कांहीं सोई करितां मुंबईस पाठविलें होतें. मुंबईमध्यें जमशेटजी आपला सासरा, मयत शेट फ्रामजी नसरवानजी बाटलीवाला याचे घरांत येऊन राहिले. त्यावेळीं मुंबईमध्यें कोटांत नसरवानजी ह्यानें बाटल्या विकण्याचें लहानसें दुकान मांडिलें होतें. त्या दुकानाच्या कामांत जमशेटजी ह्यांनीं त्यास मदतगारी केली होती. जमशेटजीस गुजराथी आणि इंग्रेजी भाषा व लिपी ह्यांची माहिती सहज झाली. नंतर सन १७९९ ह्यावर्षीं सर जमशेटजी जिजीभाई आपला माऊसभाऊ, मेहरवानजी माणिकजी शेट, ह्यांच्या मुनिमाच्या हाताखालीं माहितगारी होण्याकरितां चाकरीस राहिले होते. वर सांगितलेल्या गृहस्थाचा व्यापार चीनदेशाशीं असे, त्यामुळें त्याचें जाणेंयेणें त्या देशांत होत असे. मेहरवानजीशेट ह्याबरोबर जमशेटजींनीं सन १७९९ ह्यावर्षीं चीनदेशांत आपली पहिली खेप केली होती. दुसऱ्या खेपेस ह्यांनीं व्यापारसंबंधी बरीच माहितगारी करून घेतली, ती इतकी कीं थोडक्यांतच आपला सासरा, फ्रामजी नसरवानजी शेट, ह्याबरोबर भागीदार होऊन जरी त्यासमयीं ह्यांजवळ २००० रुपयां पेक्षां अधिक पुंजी नव्हती, तरी त्यांनीं आपला व्यापार वाढवून आपल्या साखीनें व आपल्या सासऱ्याच्या मदतीनें व्यापाराकरितां ३५००० रुपये भांडवल जमविलें.

जमशेटजी आपल्या सासऱ्यास मुंबईंत ठेवून चिनांत जातयेत असत. एकेसमयीं चिनाहून येत असतां ईस्त इंदिया कंपनीच्या एका लढाऊ गलबतावरील लोकांस आपल्या गलबतावर ह्यांनीं घेतलें त्यावेळीं इंग्लिश व फ्रेंच यांमध्यें लढाई चालली होती. जमशेटजी ह्यांच्या गलबतावरील इंग्रेज लोकांची व फ्रेंच लोकांची बंगालच्या अखातांत लढाई झाली; त्या लढाईंत इंग्रेज लोकांचा जय झाला त्यामुळें जमशेटजी यांस आनंद होऊन पुढें ते घरीं आले. नंतर सन १८०२ ह्या वर्षीं मुंबईमध्यें मोठी आग लागली तींत ह्यांचा व्यापारासंबंधीं कांहीं माल जळून गेला, हें एक असंतोषास कारण झालें.

जमशेटजींनीं चीन देशास एकंदर पांच सफरी केल्या. शेवटची सफर सन १८०७ ह्या वर्षीं केली. त्यानंतर त्यांनीं प्रवास केला नाहीं. आपलें मुख्य ठिकाण मुंबईंत करून चीन, कलकत्ता, सिंगापूर, सयाम, इत्यादि देशांत त्यांनीं व्यापार चालू केला होता. त्यांच्या व्यापाराची बरोबरी थोडकेच इतर देशचे लोक करूं शकतील. सन १८०७ पासून सन १८४२ पर्यंत व्यापारांत त्यांनीं मोठ्या

रकम दिली. तिजविषयीं यथास्थळीं वर्णन केलें आहे. ह्या परोपकारी गृहस्थाचा पुतळा माल्कम् साहेबाच्या शेजारीं टौनहालांत स्थापिला आहे, त्याच्या आसनावर असा लेख आहे.

" ह्या बेटांतील लोकांचें निर्लोभपणें कल्याण करणारे व भरत खंडांतील लोकांच्या परीक्षेस उतरलेले आणि विश्वासू मित्र. "

" सर् चार्लस् फार्बस् बारोनेट यांच्या सद्गुण स्मरणार्थ कृतज्ञतापूर्वक मुंबईतील गृहस्थानीं हा पुतळा सन १८४१ त स्थापिला आहे. "

नामांकित इंग्रज व्यापाऱ्यांचीं प्रख्यात हपिसें ५१; यहुदी लोकांचीं २०; मुसलमान लोकांचीं ३९; पारशी लोकांचीं ५८; आणि हिंदू, गुजर, व दक्षिणी लोकांचीं मिळून २०९ आहेत. दक्षिणी लोकां पैकीं बाबा साहेब दिवाणजी ( आंगरे ), गोपाळराव मैराळ, आणि दाजी साहेब किबे इंदूरचे सावकार, यांच्या पेढ्या सर्वत्र प्रसिद्ध आहेत. मध्यम प्रतीचे सावकार, सराफ, दुकानदार, दलाल, हुंडीवाले, व कारागीर मिळून ७२५. ह्यांत सर्व जातीचे लोक अढळतात; त्यांत पारशी व वाणी विशेष; साधारण दुकानदार, कारागीर, व व्यापारी यांची संख्या आठ दहा हजारांवर आहे.

ह्यासर्व हपिसांत बहुधा पारशी गृहस्थ दलाल असतात. आणि ह्या दलालीमध्यें ते दरसाल लाखो रुपये कमावीत असतात. व्यापाऱ्यांमध्यें पारशी, खोजे, मेमण, भाटये, आणि वाणी पुष्कळ. दक्षिणी हिंदू व्यापारी कोठें विरळा. हल्लीं खोजे व मेमण हे मुंबईंत लाखो रुपयांचे व्यापारी झाले आहेत. दक्षिणी लोकांत मात्र व्यापार करण्याची ईर्षा उत्तरोत्तर कमी होत चालली आहे. एतद्देशीय व्यापाऱ्यांत सर् जमशेटजी जिजीभाई हें एक रत्नच होऊन गेलें. हे पांच खेपा चिनास जाऊन आले होते. कलकत्ता आणि सिंहलद्वीप हीं त्यांनीं पाहिलीं होतीं. या नामांकित गृहस्थानें स्वकष्टानें व्यापारांत लाखो रुपये कमाविले. हा पुढील या नामांकित दानशूराचा संक्षिप्त इतिहास दुसऱ्या पुस्तकांतून घेतला आहे.

हे नामांकित पारसी ह्यांचा जन्म तारीख १५ जुलई सन १७८३ ह्या वर्षीं गुजराथ प्रांतांत नवसरी महालांतील मलेश्वर नांवाच्या गांवांत झाला. सरजमशेटजी ह्यांच्या बापाचें नांव जिजीभाई चानजीभाई व त्यांचे आईचें नांव जीवनजी असें होतें. जिजीभाई हा मलेश्वरामध्यें जरी गरीब तरी मोठा अब्रूदार गृहस्थ होता. जमशेटजी ह्यांचे सोळावे वर्षी त्यांचा बाप व आई हीं एक वर्षाचे आंत

मृत्यु पावली. आईबापांनीं जमशेटजींस लहानपणींच कांहीं सोई करितां मुंबईस पाठविलें होतें. मुंबईमध्यें जमशेटजी आपला सासरा, मयत शेट फ्रामजी नसरवानजी बाटलीवाला याचे घरांत येऊन राहिले. त्यावेळीं मुंबईमध्यें कोटांत नसरवानजी ह्यानें बाटल्या विकण्याचें लहानसें दुकान मांडिलें होतें. त्या दुकानाच्या कामांत जमशेटजी ह्यांनीं त्यास मदतगारी केली होती. जमशेटजीस गुजराथी आणि इंग्रेजी भाषा व लिपी ह्यांची माहिती सहज झाली. नंतर सन १७९९ ह्यावर्षीं सर जमशेटजी जिजीभाई आपला माऊसभाऊ, मेहरवानजी माणिकजी शेट, ह्यांच्या मुनिमाच्या हाताखालीं माहितगारी होण्याकरितां चाकरीस राहिले होते. वर सांगितलेल्या गृहस्थाचा व्यापार चीनदेशाशीं असे, त्यामुळें त्याचें जाणेंयेणें त्या देशांत होत असे. मेहरवानजीशेट ह्याबरोबर जमशेटजींनीं सन १७९९ ह्यावर्षीं चीनदेशांत आपली पहिली खेप केली होती. दुसऱ्या खेपेस ह्यांनीं व्यापारसंबंधी बरीच माहितगारी करून घेतली, ती इतकी कीं थोडक्यांतच आपला सासरा, फ्रामजी नसरवानजी शेट, ह्याबरोबर भागीदार होऊन जरी त्यासमयीं ह्यांजवळ २००० रुपयां पेक्षां अधिक पुंजी नव्हती, तरी त्यांनीं आपला व्यापार वाढवून आपल्या साखीनें व आपल्या सासऱ्याच्या मदतीनें व्यापाराकरितां ३५००० रुपये भांडवल जमविलें.

जमशेटजी आपल्या सासऱ्यास मुंबईंत ठेवून चिनांत जातयेत असत. एकेसमयीं चिनाहून येत असतां ईस्त इंदिया कंपनीच्या एका लढाऊ गलबतावरील लोकांस आपल्या गलबतावर ह्यांनीं घेतलें त्यावेळीं इंग्लिश व फ्रेंच यांमध्यें लढाई चालली होती. जमशेटजी ह्यांच्या गलबतावरील इंग्रेज लोकांची व फ्रेंच लोकांची बंगालच्या अखातांत लढाई झाली; त्या लढाईंत इंग्रेज लोकांचा जय झाला त्यामुळें जमशेटजी यांस आनंद होऊन पुढें ते घरीं आले. नंतर सन १८०२ ह्या वर्षीं मुंबईमध्यें मोठी आग लागली तींत ह्यांचा व्यापारासंबंधीं कांहीं माल जळून गेला, हें एक असंतोषास कारण झालें.

जमशेटजींनीं चीन देशास एकंदर पांच सफरी केल्या. शेवटची सफर सन १८०७ ह्या वर्षीं केली. त्यानंतर त्यांनीं प्रवास केला नाहीं. आपलें मुख्य ठिकाण मुंबईंत करून चीन, कलकत्ता, सिंगापूर, सयाम, इत्यादि देशांत त्यांनीं व्यापार चालू केला होता. त्यांच्या व्यापाराची बरोबरी थोडकेच इतर देशचे लोक करूं शकतील. सन १८०७ पासून सन १८४२ पर्यंत व्यापारांत त्यांनीं मोठ्या

राजाप्रमाणें संपत्ति मिळविली इतकेंच नाहीं, तर देशोदेशीं आपली कीर्तिही पसरिली.

जमशेटजी ह्यांनीं कित्येक गरीब लोकांस त्यांचीं कर्जें फेडून मुंबईच्या बंदिशाळेंतून सन १८२२ यावर्षीं मुक्त केलें; आणि ह्या वर्षापासून त्यांच्या औदार्यास आरंभ झाला. ह्या पुढें त्यांचें औदार्य झऱ्याच्या पाण्यासारिखें अद्याप वाहत आहे, आणि नदीच्या उगमाजवळ लहान प्रवाह असून पुढें जसा तिचा प्रवाह उत्तरोत्तर मोठा होत जातो, तसें ह्या नामांकित पुरुषाचें औदार्य प्रतिवर्षीं वृद्धिंगत होत गेलें. ह्यांनीं जीं धर्मकृत्यें केलीं तीं सर्व जरी आह्मास ठाऊक नाहींत, तरी त्यांनीं आपला काळ होई तों पर्यंत सुमारें ३५,००,००० रुपये धर्मकृत्यास लाविले असा आकार केला आहे. जमशेटजी जिजीभाई ह्यांचें औदार्य आणि स्वदेशकल्याण करण्याची इच्छा इत्यादि गुणांचें वर्णन मुंबईचे माजी गवर्नर सर जेम्स रीवट कारनाक साहेबांनीं इंग्लंदच्या दरबारीं केल्यावरून आपल्या नामदार राणी साहेबांकडून त्यांस नैत ह्या पदवीची सनद सन १८४२ ह्यावर्षीं मिळाली. ह्यावरून त्यांस “ सर ” हा किताब प्राप्त झाला. पुढें सन १८४३ त रत्नखचित एक चांद त्यांस राणीसाहेबांकडून बक्षीस मिळाला. नंतर १८५८ ह्यावर्षीं “ बारोनेत ” ह्या पदवीची सनद त्यांस मिळाली, ही पदवी त्यांच्या वंशजांस निरंतर चालावयाची आहे. ह्या नामाकित पुरुषाचा मृत्यु तारिख १५ एप्रील सन १८५९ ह्यावर्षीं झाला, त्यावेळेस त्याचें वय ७६ वर्षांचें होतें. अरबस्थानाच्या किनाऱ्यापासून चीनच्या समुद्रा पर्यंत, २५,००,००,००० लोकांच्या वस्तीमध्यें, ह्यांची बरोबरी करूं शकेल असा गृहस्थ विरळा.

इंग्रज मानकऱ्यांच्या शिरस्त्या प्रमाणें ह्यांच्या वडीलपुत्रास त्यांचें नांव व पदवी मिळाली आहे. त्यावरून त्यास सर जमशेटजी जिजीभाई बार्ट असें नांव ठेविलें आहे.

यांविषयीं हा पुढील मजकूर सन १८५६ त पुण्याच्या ज्ञानप्रकाशांत छापला होता.

## सर जमशेटजी जिजीभाई नैट.

आपले देशांतले प्रतिकर्ण परोपकारी व देशबंधूंचें कल्याण करण्या विषयीं व दुःख परिहार करण्याविषयीं तत्पर जे नामांकित सर जमशेटजी जिजीभाई नैट यांस वृद्धावस्था प्राप्त झाल्यावरून त्यांनीं आतां लोकोपयोगी कृत्यांकडलें

आपलें चित्त काढिलें. यास्तव ह्या अशा आपल्या जगमित्राचें स्मरण अक्षय राहावें याकरितां आपणा सर्वांस कांहीं तरी सर्वांचे विचारें करणें उचित आहे. असें कित्येक मुंबईंतील थोरलोकांच्या दिलांत वागल्यावरून त्यांनीं जून महिन्याच्या २४ व्या ता० सन १८५६ सालीं टौनहालांत सभा भरविली. मुंबईंतील गवर्नर आदिकरून सर्व सरकारी नोकर व व्यापारी साहेबलोक व याप्रमाणेंच हिंदु व पारशी ही जमले होते. सभास्थानीं नेकनामदार एल्फिन्स्टन साहेब बसले होते. मिस्तर अंडरसन साहेब सरकारचे सेक्रतारी यांनीं व रा. रा. जगन्नाथ शंकरशेट यांणीं सदहू नैट यांनीं जीं जीं लोकोपयोगी कृत्यें केलीं त्यांचे अंतर्बाह्य स्तुति करण्यासारिखि भाषणें ह्यावर केलीं, तीं फारच मनोरंजक आणि यथातथ्य होतीं. हीं सर्व लोकांनीं ऐकिल्यावर आपल्या खुशीनें आंकडे टाकिले, ती वर्गणी २०,००० वीसहजार रुपये झाली. सर्वांनीं असें ठरविलें कीं, वर्गणी जी जमेल तेवढी खर्च करून सदहू मनुष्याचा पुतळा संगमरवरी बनवून तो त्या शहरांत प्रसिद्ध ठिकाणीं ठेवावा. हा पुतळा सन १८६० त इंग्लंडाहून तयार करून आणिला, तो टौनहालांत मांडिला आहे.

सन १७२० तील ब्यांक– इंग्रज लोकांनीं जिकडून तिकडून लोक जमवून मुंबईंत सर्व जातीचे लोक व व्यापारी जमविले. त्यांत सराफ व नानावटी असेही बरेच लोक होते. सराफ लोक हुंडी चिटी चपाटी करायाची असल्यास हुंडणावळ फार घेत. व कोणास नाणें घिरलें असतां त्याजकडून १०० स पांच रु० मंडावण घेऊन व्याज ही जबर घेत. हें पाहून कंपनीच्या कामगारांनीं सन १७२० जुलै २५ या दिवशीं ब्यांक घालण्याचा ठराव करण्यासाठीं बहुतेक शहरांतील इंग्रज व एतद्देशीय सावकार जमविले. आणि इचा बंदोबस्त ठेवण्यासाठीं मिस्तर ब्रौन आणि मि० फिलिफ अशा दोघां गृहस्थांची नेमणूक केली, व ब्यांकेचा सर्व सरंजाम तयार करून एक लक्ष रुपये जमा केले आणि हें काम सुरू केलें. हें पाहून त्यावेळींचे सावकार फार खुशी झाले. आणि ह्या पेढीच्या रक्षणार्थ आपल्या जिनगीवर एकटक्का फाजील कर देण्यास ही राजी जहाले. ह्या ब्यांकेचा नेम असा होता. हुंड्या द्याव्या घ्याव्या व घर, वाडी, स्थावर मिळकत व दुसऱ्या मालावर ऐवज घिरावा. गव्हर्नर आणि कौन्सलाचे दोघे सभासद यांस इचे मुखत्यार नेमिले होते. जे कोणी ब्यांकेमध्यें व्याजू द्रव्य ठेवतील त्यांस शेंकडा दर दिवसास एक दुगाणी (दोनपया) व्याज द्यावें असें ठरविलें होतें.

असा सगळा बंदोबस्त करून ता० १२ माहे डिसेंबर सन १७२० त शहरांत दवंडी फिरवून ब्यांकेची स्थापना केली. परंतु इची व्यवस्था नीट नसल्यामुळें कित्येकांस ऐवज ठेविल्या वांचून नाणें धिरल्यामुळें पुष्कळ द्रव्य खर्चलें. आणि ज्यांच्या हातीं तें गेलें ते बळकावून बसले. "ज्याच्या हातीं ससा तो पारधी" अशी अवस्था झाली. आणि स्थावर जिनगीवर नाणें धिरलें होतें, त्याचें ही उत्पन्न बराबर न जहाल्यामुळें पांच चार वर्षें चालवून ही ब्यांक मोडून टाकिली.

सन १८४० त मुंबईब्यांक या पेढीची स्थापना झाली. हिचें भांडवल ५२,२५,००० रुपये होतें, परंतु सद्यः इच्या हातीं ३ कोट रुपये घोळतात. अशा पेढ्या मुंबई शहरांत सात आहेत. या शिवाय गरीब गुरीब रयतेनें कांहीं पैशाचा संचय करावा व त्यांनीं संचय केलेलें द्रव्य बुडून जाऊं नये व तें उत्तरोत्तर वाढावें म्हणून सरकारानें मोठ्या उदार दृष्टीनें सेविंगब्यांक या नांवाची एक सरकारी पेढी काढिली आहे. हींत एक रुपया पासून दीड हजार रुपये पर्यंत नाणें अनामत ठेवितात. आणि त्यास दरशेंकड्यास चार टक्यांप्रमाणें दर-साल व्याज देतात. ह्या पेढींतून पाहिजे तेव्हां अनामत ऐवजांतून एका रुपया-पासून लागेल तेवढी रकम काढण्याची मोकळीक आहे. या पेढींतही लोकांचे हजारो रुपये आहेत.

हल्लीं मुंबईतील व्यापार कसा झपाट्यानें वाढत चालला आहे याचें अनुमान करायाचें असलें तर ह्या पुढील रकमा ताडून पहाव्या ह्मणजे समजेल. सन १८१४ त मुंबई बंदरांत बाहेरून ९,२६,९८० रुपयांचा माल आला आणि सन १८६२ मध्यें २१,८५,५६,७९७ रुपयांचा आला आणि २१,२९,९९,६०५ रुपयांचा बाहेर गेला. ह्या रकमेपैकीं एक तृतीयांश रुपयांच्या फक्त अफिणीच्या पेट्या बाहेर गेल्या. सन १७७८ त सर्व मालाच्या जकाती बद्दल तीसहजार, व तंबाखू, तपकीर, व गांजा यांबद्दल वीसहजार असुरप्या, मिळून एकंदर सुमारें २४,००० रुपये वसूल झाला. आणि सन १८६० मध्यें २,८५,१६,१४३ एवढे रुपये उत्पन्न झालें. सन १८५९ मध्यें मुंबई टापूंतील सर्व घरांचे व जमि-नीचे मालकांस ५४,१३,४६५ रुपये उत्पन्न झालें, त्यावर सरकारास दर शेंक-ड्यास ५ टक्यांप्रमाणें छाप्याबद्दल २,७०,६७३ रुपये वसूल झाला. आणि सन १८६० त घरांचें उत्पन्न ६१,१९,२१० रुपये आकारिल्या वरून सरकारास छाप्याबद्दल ३,५९,६०० रुपये वसूल झाला. याप्रमाणें सन १८५९ पेक्षां

१८६० मध्यें ३५,००० रुपये उत्पन्न जाजती झाले. याचप्रमाणें दुसऱ्या सर्व गोष्टींत दरसाल उत्पन्न वाढत जातें. फक्त तंबाखू, तपकीर, व गांजा यांचें उत्पन्न सरकारास सालिना सुमारें दोन लक्ष रुपये होतें. सन १८६० त इराणांतून घोडे आले त्यांची किंमत १५,९९,०००; खजूर, बदाम, पिस्ते इत्यादि दुसरा मेवा ७,१७,३१५ रुपयांचा आला. मुंबई बंदरांत लहान मोठीं ७,५५६ जहाजें आलीं. व मुंबई बंदरांतून ६,०६६ बाहेर गेलीं.

रेलवे कंपनीला लोखंडी सडकांपासून खर्च भागून अर्ध्या वर्षाची कमाई ३,६३,२९९-१२-११ एवढें द्रव्य झालें. एक आठवड्यांत मनुष्यांच्या उताराबद्दल, व जिनसांच्या नोराबद्दल सुमारें एकंदर रुपये ४८,००० होतात. त्याप्रमाणें रहदारी चालू झाल्यापासून दरमहा सुमारें दोन लक्ष रुपये उत्पन्न होतात.

हल्लीं या शहरांत मोठ मोठाल्या हवेल्या आणि पांच पांच व सहा सहा मजली चाळी ज्यांमध्यें पांच पन्नास कुटुंबें राहतात त्यांसुद्धां ह्या चिमकुल्या बेटांत १६,९४१ घरें आहेत. घरांवर छापा घेणें हा कर मुंबईमध्यें मुख्य कंपनी सरकाराच्या हुकुमानें सन १६८८ पासून सुरू झाला. फक्त वालुकेश्वरावरील लोकांचे स्थावर मिळकती पासून मालकांस प्रतिवर्षी १,५९,९६५ रुपये उत्पन्न होतात. सन १८०० पूर्वी किल्ल्यांत व बाहेर कित्येक मोठमोठाल्या हवेल्या लांकडाच्या होत्या.

सरकारांत नोंदलेल्या इंग्रज व एतद्देशीय गृहस्थांच्या चार व दोन चाकांच्या मिळून २,६६८ गाड्या आहेत. व भाडोत्री ५३२, व घोडे ३०,५०८ आहेत. बैलांचे बसावयाचे रेकडे ६४०, आणि माल व सामान नेण्याचे खटारे ६,५५१, मिळून सर्व गाडया १०,३६१ आहेत. भाडोत्री व घरगुती मिळून पालख्या (मेणे) सुमारें ४०० आहेत. ह्या सर्वांच्या छाप्याबद्दल सरकारास दरसाल १,५६,७३० रुपये उत्पन्न होतात. या १८६० ठांतील रकमा.

दारू विकण्याचा हुकूम दिल्याबद्दल उत्पन्न ५९,९२२, शहराचा बंदोबस्त ठेवणाऱ्या मंडळीनें दारू विकण्याचे पट्टे दिले त्यांचें उत्पन्न.-७८५९.

लोकांकरितां दवंडी पिटविल्यामुळें उत्पन्न झालें.-३,२०२

वजनें छापण्याची फी-९३४.

खटाऱ्यांस टिकिटा मारण्याबद्दल १,६०८.

गाडयांवर नंबर घालण्याची फी-१९१. हें १८६० ठांतील उत्पन्न.

म्यूनिसिपाल कमिशनर, शहराच्या व्यवस्थापक मंडळीकडे शहराचा बंदोबस्त ठेवण्यास निरनिराळ्या सरकारी खात्यांतून दर तीन महिन्यांनीं याप्रमाणें द्रव्य येतें. सन १८६० जान्युआरी पासून मार्च अखेर पर्यंत पहिल्या तीन महिन्यांत ६,०९,०६३–१५–७ व एप्रील पासून जुलै ता० १७ पर्यंत ५,८२,३११–१४–३ इतक्या रकमा दाखल जहाल्या. आणि या सहा महिन्यांत शहराची बरदास्त ठेवण्यास या मंडळीनें ७,२६,५६७–३–१० इतकें द्रव्य खर्चिलें.

सन १८६० मध्यें इंग्रज सरकारानें दोन नव्या बाबी चालू केल्या. एक पांच वर्षें पर्यंत चालू ठेवणार असें ह्या कायद्यांत दर्शविलें आहे. रयतेच्या उत्पन्नांतून ज्यांचें उत्पन्न दोनशें रुपयांपासून पांचशें रुपयांच्या आंत असेल त्यांकडून दरशेंकड्यास दोन रुपये आणि ज्यांचें उत्पन्न पांचशें रुपयांवर असेल त्यांनीं दरशेंकड्यास चार-रुपये दरसाल सरकारास द्यावे. ह्या इनकमटाक्सापासून सरकारास किती द्रव्य उत्पन्न होईल याचें अनुमान करवत नाहीं. परंतु आकार केला आहे त्या वरून मुंबईत २०,००,००० रुपये उत्पन्न होतील असें वाटतें. आणि कंपनी सरकाराचीं हिंदुस्थानांतील सर्व संस्थानें मिळून १,९१,००,००० इतकें द्रव्य उत्पन्न होईल. याचा वसूल करायास सरकारास दरशेंकड्यास आठदहा रुपये खर्च बसेल असें अनुमान करितात. परंतु दुसरी बाब स्टयांप आक्ट ह्मणून जी अक्टोबर महिन्याच्या पहिले तारखे पासून अमलांत आली, तिचा कायदा असा आहे कीं, देवघेवा विषयीं कागदपत्राचा व्यवहार व हुंडी, चिटी चपाटी करायाची असली तर त्यांजवर दहां पासून पन्नास रुपयांस अर्धा आणा व शंभरांवर कितीही असेल यास एकएक आण्याचा छाप मारून त्याजवर आपली सही करावी, आणि मग देण्या घेण्याचा जो व्यवहार असेल तो करावा. खतपत्र, रिणकोधनकोचा व्यवहार असेल, तर दरशेंकड्यास आठ आण्याचा छापील कागद सरकारांतून घ्यावा आणि त्यावर खतपत्र जें काय असेल तें करावें. कोणी असें सांगितलें कीं, मुंबईतील सावकार वगैरे लोकांनीं पहिल्याच दिवशीं ३५ हजार रुपयांचे छापे सरकारांतून विकत घेतले. ह्या प्रमाणें ह्या करापासून ही या शहरांत सालिना सरकारास तीस चाळीस लक्ष रुपये उत्पन्न होतील असें अनुमान होतें. छापील कागद व छापे विकण्यासाठीं सरकारांतून कित्येकांस पट्टे मिळाले आहेत; यांणीं जागोजागीं दुकानें घातलीं आहेत आणि हे कागद व छापे विक्रीत असतात.

सन १८६१ पासून तिसरा एक लैसेन्स टाक्स ह्मणून नवा कर चालू केला होता. ज्याजवर इनकमटाक्स लागू पडत नाहीं त्यासच मात्र हा धारा लागू होता. जे कोणी साधारण धंदा रोजगरा, कलाकौशल्य व हरएक प्रकारचें काम करून दोनशें रुपयाच्या आंत उत्पन्न करायास समर्थ आहेत त्याजकडून जसें ज्याचें उत्पन्न असेल त्या प्रमाणें ३,२,१ रुपयांपर्यंत कर घ्यावा. हा कर पांच वर्षे पर्यंत राहील असें ह्या कायद्यांत दर्शविलें होते. परंतु एक वर्षाच्या अंतीं सन १८६२ त हा बंद केला.

### प्राप्तीवरील कराविषयीं आर्या

" करवर हा परदमनीं झालेलें सर्व कर्ज फेडाया ॥
माागे त्याला जुलमी ह्मणणें टाका अशा सुवेडा या ॥ १ ॥
रयत सुखी हस्त मुखी, राखाया श्रमवि आपुला काय ॥
प्रभु जो तया तुह्मीं ऋणमुक्त कराया झटूं नये काय ॥ २ ॥
द्या झटपट कर हटतट करण्याचा थाट कां उगी करिता ॥
हरितां प्रभुची संप्रति आहे तुमची परंतु हें करिता ॥ ३ ॥

लोकहो हा उपदेश ध्यानांत ठेवून ज्या उत्कृष्ट पुष्ट व असंतुष्ट असें जें अरिष्ट नष्ट करण्यास कष्ट केले त्यास ऋणमुक्त करण्यासाठीं कर द्या ह्मणजे तुमची कृतज्ञता व राजनिष्ठा सरकारचे नजरेस येऊन तें तुमच्या सुखार्थ चिरकाल श्रम करील." वर्तमानदीपिका.

कर देण्याच्या आवश्यकतेविषयीं ज्ञानप्रसारकांतून हा पुढील मजकूर उतरून घेतला आहे.

आपणास जे कर सरकारास द्यावे लागतात त्यांविषयीं अज्ञानी लोकांमध्यें फारच गैरसमजूत असते. त्यास असें वाटतें कीं, सरकार आपणापासून कर घेतें. हा मोठा आपणावर जुल्म करितें. सरकारास जो आपण कर किंवा धारा देतों तो फुकट जातो. त्या बद्दल आपणास कांहीं मिळत नाहीं व तो न दिला तर सरकार मारील कुटील ह्मणून मात्र तो द्यावा. आपण सरकाराचें कांहीं लागत नाहीं. व सरकार हें आमच्या माथ्यावर एक त्रासदायक ओझें आहे. परंतु ही मोठी एक चूक आहे. सरकार ओझें व त्रास नव्हे इतकेंच नाहीं तर तें आवश्यक आहे. आणि जे कर आपण त्यांस देतों त्यांबद्दल त्यापासून त्या करांच्या किमतीहून अधिक लाभ आपणास होतो. ज्या देशांत मुळींच सरकार नाहीं

अशांच्या स्थितीविषयीं विचार केला असतां सरकार असण्याचा उपयोग आणि फायदा सहज ध्यानांत येईल. अरबस्थानांतील कांहीं भागांत व आफ्रिकेंतील कांहीं देशांत कोणीच बंदोबस्त राखणारा नाहीं. तेथें प्रत्येक मनुष्यास नेहमी हत्यारबंद राहावें लागतें. कारण तेथें चोर व लुटारू लोक फार असतात. ते केव्हां येऊन आपणास लुटतील किंवा आपला प्राण घेतील याचा भरंवसा नसतो. असल्या देशांत शेतकऱ्यांस आपल्या शेताची लागवड करायास जायाचें तर बरोबर एक दुसरा हत्यारबंद मनुष्य न्यावा लागतो, नाहीं तर चोर येऊन त्याच्या जवळचें बी घेऊन जातील. किंवा त्याचे बैल जबरदस्तीनें नेतील, किंवा कदाचित् त्याचा प्राणही घेतील. येणेंकरून एका मनुष्याच्या जागीं दोन मनुष्यें लागतात, एक शेतांत खपण्यास व एक त्याच्या साठीं चोरांशीं लढून त्याचें रक्षण करण्यास. इतकें करून तरी तो अगदीं निर्धास्त होतो असें नाहीं. कारण कधीं कधीं लोक पुष्कळ येतात आणि शेतकरी व त्याचा रक्षक या दोघांस ही हटवून त्याचें सर्व सामान घेऊन जातात. न्यूझीलंड म्हणून एक बेट आहे तेथील लोक पांच, चार एकत्र जमून उभ्या कड्यांवर किंवा दुसऱ्या कोणत्या तरी दुर्गमस्थळीं लहान खोपटें बांधितात. आणि त्याच्या सभोंवते सूळ मारितात. नाहीं तर दुसरे लोक येऊन त्यांस मारितील आणि लुटतील. इतकें असूनही ते मारले व लुटले गेले असें पुष्कळदां घडतें. अशा देशांत नेहमी हाणामारी चालल्या असतात. स्वस्थता व सुख कोणास घटकाभरही नसतें. काम करण्यासही हजारो विघ्नें येतात, प्रत्येकास आपल्या मेहनतीचें फळ आपणास मिळेलच व मिळाल्यावर तें आपणाजवळ राहील असा भरंवसा नसतो. किंबहुना बहुधा याचा उलट प्रकार घडण्याचा संभव असतो, ह्मणून उद्योग थोडाच घडतो. आणि लोकांस प्रपंचांतील सुखें प्राप्त होण्याचीं साधनें तर मुळींच नसतात. जमीन बहुतेक ओसाड पडलेली असती आणि देशांतील लोकसंख्या फार कमी असते. जे लोक थोडे सुधारलेले असतात त्यांचे अन्नवस्त्रा विषयीं फार हाल असतात. जे लोक अणदीं रानटी असतात त्या सर्वांची या प्रमाणेंच अवस्था असते. या सर्व आपत्तीचें कारण त्या देशांत मनुष्याचें प्राण आणि मालमत्ता निर्भय नसतात हेंच होय.

तर देशांत बंदोबस्त राखून लोकांचे प्राण आणि मालमत्ता सुरक्षित करण्याचा उपाय सरकार हेंच होय. सरकार ह्मणजे जे कोणी लोकांमध्यें व्यवस्था राखून परशत्रू पासून व परस्परां पासून त्यांचें रक्षण करितात तें. हें काम त्यांच्या

हातानें होणें तर लोकांवर त्यांचा कांहीं अधिकार किंवा अमल चालला पाहिजे हें उघडच आहे. सरकारचा मुख्य धर्म प्रजांचें रक्षण करावें हाच आणि यावरूनच संस्कृत भाषेंत "भूपति नृपति" अशीं अभिधानें राजास दिलेलीं आहेत. यावरून सरकारचा धर्म काय हें आपल्या लोकांस फार पुरातन काळींच किती बराबर समजलें होतें, हें आपणास कळतें. परंतु अरेरे! अर्वाचीन काळच्या हिंदुराजांस या गोष्टीचा कसा अगदी विसर पडून गेला!

हें आपलें काम बजाविण्याकरितां सरकार मनुष्यें चाकरीस (फौज व कोठें कोठें आरमार) ठेवून तें आपल्या लोकांचें परशत्रूपासून रक्षण करतें; आणि पोलीस न्यायाधीश ठेवून परस्परांपासून व चोर चिरटा पासून त्यांचें रक्षण करितें. व दुसरे ही पुष्कळ कामदार त्यास नेमावे लागतात.

या सर्व माणसांस द्यावयास जो पैका पाहिजे तो सरकार लोकांपासून घेतें. आणि नीटच आहे कीं, जापेक्षां हीं मनुष्यें लोकांच्या बऱ्याकरितां ठेवलेलीं असतात त्यापेक्षां त्यांच्या खर्चाचा पैका लोकांनीं द्यावा. या बद्दल रयतलोक सरकारास कर आणि जमिनीवर धारा देतात.

यांत आपण कांहीं अधिक करीत नाहीं, सरकार जी आपली चाकरी बजावतें-रक्षण करितें-ती बद्दल आपण त्यास करांच्या व धान्यांच्या रूपानें पैका देतों. आपण कोणा मनुष्यापासून कांहीं चाकरी किंवा जिन्नस घेऊन जसा त्यास पैका देतों त्या प्रमाणेंच हें होतें. हा पैका आपण सर्वांनीं सरकारास दिला नाहीं आणि त्यापासून आपलें रक्षण करून घेतलें नाहीं तर वर सांगितलेल्या रानटी देशांत जसा प्रत्येक शेतकरी आपल्या रक्षणासाठीं एक शिपाई ठेवितो तसेंच आपणांतील दर एकास करावें लागेल आणि हें आपणास केवढें त्रासदायक व खर्चाचें काम होईल बरें. आपल्या मेहेनतीपैकीं अर्धी मेहनत आपल्या रक्षणाच्या खर्चाकडेस जाईल; ह्मणजे हल्लीं जें आपण सरकारास देतों त्याहून फारच अधिक. आणि पुनः हें संरक्षण किती अपुरतें व अशाश्वत होईल याचें अनुमान वर सांगितलेल्या जंगली लोकांचे स्थितीवरून आपण करावें. ही गोष्ट खरी आहे कीं, सर्व राजे आपल्या प्रजांचे रक्षण सारिखें करितात असें नाहीं. कित्येक राजे इतके दुष्ट असतात कीं ते लोकांचें पालन करण्याबद्दल त्यांस नागवतात व कांहीं कारणावांचून हजारो माणसांचे प्राण घेतात, तरी हे राजे राजा नसण्यापेक्षां पुष्कळ बरे, जें अगदीं पराकाष्ठेचें वाईट सरकार पृथ्वीवर होऊन गेलें

असेल किंवा आपणाच्यानें ज्याची कल्पना करवेल तें मुळींच सरकार नसण्यापेक्षां हजारपट चांगलें. अशा सरकारचे लोक जरी फारच कमी सुरक्षित असले तरी ज्या देशांत कोणतेंच सरकार नाहीं त्यांतील लोकांपेक्षां ते अधिक सुरक्षित होत. तसेंच कित्येक सरकारें आपल्या लोकांच्या रक्षणार्थ जितका पैका खर्चितात त्याहून अधिक पैका त्यांपासून घेतात, आणि वावग्या रीतीनें त्याचा खर्च करितात. तरी सरकार नसलें तर प्रत्येक मनुष्यास स्वतः रक्षणार्थ जो खर्च पडेल त्याहून प्रत्येकापासून तीं फारच कमी घेतात. या सरकारच्या अमलांत जर प्रत्येकास आपल्या रक्षणाबद्दल आपल्या मेहनतीच्या फळाचा पंचमांश सरकारास द्यावा लागला तर जेथें मुळीं सरकारच नाहीं तेथें त्यास ( पूर्वीं सांगितल्याप्रमाणें ) याच्या अडीचपट ह्मणजे आपल्या मेहनतीचा अर्ध भाग आपल्या रक्षणार्थ खर्चावा लागेल. सरकार वाईट असल्यामुळें जरी लोकांस फारच दुःख व हानि होत असली, तरी सरकार नसलें म्हणजे त्यांस जीं दुखें होतील त्यांशीं ताडून पाहिलीं तर हीं कांहींच नाहींत.

तर आतां जे लोक सरकारास पैका द्यावा लागतो ह्मणून कुरकुर करितात, त्यांनीं पहावें कीं, सरकार आपणास किती आवश्यक व उपयोगी आहे तें. व जे कर सरकार आपणापासून घेतें त्याबद्दल तें आपली चाकरी बजावतें. ही चाकरी त्यानें न बजावली तर आपलें वास्तव्य देशांत कसें होईल. चोरांस व दुष्टांस पकडण्यास पोलिस अमलदार व त्यांचा न्याय करण्यास व यांस दंड करण्यास न्यायाधीश नसले तर लागल्याच गांवांत हाणामारी आणि लुटालुटी होऊं लागतील. देशास राखण्यास आरमार व सैन्य नसलें तर परशत्रु येऊन देशाची नासाडी करितील. याजकरितां आपण रयत लोकांनीं हे कर सरकारास देण्यास कुरकुर करूं नये. ते आपल्या बऱ्याच करितां आहेत. आपण जो पैका सरकारास देतों त्याचा तें योग्य व्यय करितें किंवा नाहीं याची लोकांनीं चौकशी करावी आणि योग्य व्यय करीत नसलें तर ( होण्याजोगें असल्यास ) या बद्दल भांडावें. असें करण्यास रयतेस पूर्ण अधिकार आहे. परंतु इतकें करण्यास लोकांचे आंगीं शहाणपण, हिम्मत, व देशप्रीति हीं असलीं पाहिजेत. भलत्याच लोकांकडून हें व्हावयाचें नाहीं. युरोप खंडांत ज्या देशांतील लोकांमध्यें हे गुण आहेत ते असेंच करितात.

कित्येक सरकारें रयतेपासून अधिक कर घेतात. कित्येक उणे घेतात, परंतु जीं सरकारें अधिक कर घेतात तीं जीं कमी घेतात त्यांहून चांगलींच किंवा जे लोक अधिक कर देतात, ते भिकारी होतात असें ह्मणवत नाहीं. जसजसें सरकार लोकांचें चांगल्या रीतीनें रक्षण करितें, देशामध्यें चांगला बंदोबस्त ठेवितें व प्रजांचे रक्षणाकडे अधिक लक्ष देतें तसतसा त्याचा अधिक खर्च वाढतो. आणि असेंच भिन्नभिन्न सरकारांचेंही आहे. हिंदुस्थानांत इंग्लंडांतील वस्तीच्या पांच-पट वस्ती आहे. परंतु हिंदुस्थानांत वसूल होतो त्याच्या दुप्पट इंग्लंडांत होतो. यावरून हिंदुस्थानांत दर मनुष्यास जो धारा किंवा कर द्यावा लागतो त्याच्या दसपट इंग्लंडांत दर एकास पडत असावा. परंतु यावरून इंग्लंडचें सरकार हिंदु-स्थानाच्या सरकाराहून वाईट किंवा तो देश या देशाहून गरीब आहे, असें कोणाच्यानें ह्मणवणार नाहीं. उलटें तें सरकार आपल्या येथील सरकाराहून चांगलें आहे. व तो देश या देशाहून हजारपट धनवान् आहे, यांत संशय नाहीं. तेथील लोकांमध्यें व्यापार, कला, कौशल्यें इत्यादि उद्योग फार ह्मणून त्यांच्या रक्षणार्थ सरकारास अधिक मनुष्यें चाकरीस ठेवावी लागतात. व लोकहि मोठे उद्योगी ह्मणून एवढे कर देण्यास समर्थ होतात. तसेंच पूर्वी आपल्या मराठी अमला-मध्यें जे कर आपणास द्यावे लागत असत त्यांहून हल्लीं आपण इंग्रज सरकारास देतों हे कदाचित् अधिक असतील. परंतु पूर्वीं आतांपेक्षां माणसांचे प्राण व मालमत्ता हीं फार कमी सुरक्षित होतीं हें सर्वांस कबूल केलें पाहिजे. पूर्वीं अंदाधुंदी व दरवडे हीं फार असत, त्यांत हजारो माणसांचे प्राण व धन धान्य यांचा नाश होत असे. परंतु आतां तसें नाहीं. तसेंच सरकार लोकांच्या विद्येकडेस वगैरे बरेंच लक्ष देतें. असें पूर्वींचीं सरकारें करीत नसत, तेव्हां सहजच या सरकारास आपलें काम चालविण्यास अधिक पैका पाहिजे. आतां हिंदुस्थानांतील इंग्रज सरकाराचे कामदारांचे पगार फारच मोठे आहेत. असे मोठे पगार दुसऱ्या कोणत्या देशांत नसतील. आणि ह्या पगाराचा बहुतेक पैका या देशांतून बाहेर जातो हा एक आपणाला तोटा होय. परंतु यांत इंग्रज सरकारचा दोष विशेष आहे असें नाहीं. हे कामदार परदेशस्थ असून फार दुरून एथें येतात, आणि रोजगार करून स्वदेशीं परत जातात, हें याचें कारण आहे. इंग्रज लोक या देशांत प्रवाशांप्रमाणें असल्यामुळें हें असें होतें, यास सरकारचा कांहीं उपाय

नाहीं. आमचे लोक मोठ मोठीं कामें करण्यास लायक होत तों पर्यंत हा प्रकार असाच ठेवणें सरकारास भाग आहे.

हल्लींच्या तीनही नव्या धाऱ्यांचें ओझें आह्मा लोकांवर येऊन पडण्यास आमचेच लोक कारण. जर सन १८५८ तील बंड झालें नसतें तर हे कर आमच्या स्वप्नीं देखील दृष्टीस पडले नसते. यावरून मनुष्य बहुतेक दुःखें आपल्या अविचारामुळेंच भोगितो असें जें ज्ञानी मनुष्यांचें ह्मणणें आहे तें शब्दशः खरें आहे असें ह्मटलें पाहिजे.

सन १८६२ त सरकारानें नोटीचें नाणें चालू केलें. ह्या नोटी दहा, वीस, पन्नास, शंभर, पांचशें, आणि हजार रुपयांच्या अशा आहेत. ह्या विलायतेंत छापून आणिल्या आहेत. पूर्वीं नोटी ह्मटल्या ह्मणजे ब्यांकेकडूनच चालत असत. आणि यां बद्दल ब्यांकेस लाखो रुपये मोबदला करायास सांपडत. ते आतां सरकारांत गेले. मुंबई, कलकत्ता, आणि मद्रास हे तीनही इलाखे मिळून चार कोटी दहा-लक्ष रुपयांच्या नोटी सरकारानें चालू केल्या आहेत. ह्या शहाजोग चिटी सारिख्या असून इंग्रज सरकारच्या बावट्याखाल सर्वत्र नक्‍द नाण्यासारख्या चालतात. सन १८६२ पासून ह्या नोटींची व सर्व मुंबईतील खजिन्याची वहिवाट सरकारानें मुंबई ब्यांकेच्या स्वाधीन केली आहे.

सन १८५९-६० त सरकारास मुंबई इलाख्याचें सर्व उत्पन्न ७,२७,७६,६४० रुपये झालें. आणि ९,५०,९६,११० रु. खर्च झाला. यावरून त्यासालीं सरकारास २,२३,१९,४७० रुपयांची खूट आली. अशी प्रतिवर्षीं खूट येऊं लागल्यामुळेंच सरकारास हे नवेनवे कर काढणें भाग प्राप्तझालें.

सन १८६१–६२ सालीं एका वर्षांत मुंबई इलाख्यांत सिंध, नागपूर, मेवाड, बडोदें हींधरून प्राप्तीवरील कर व छाप्या ( स्टांप ) बद्दल सरकारास जें उत्पन्न झालें तें येणेप्रमाणें.

प्राप्तीवरील कर ...................... रु० ४२,३५,१०८.

स्टांप ........................... रु० २९,४५,६८६.

मीठ, तंबाखू, अफीण व सर्व प्रकारच्या दुसऱ्या मालाच्या जकातीबद्दल वसूल ३,७८,९७,२५९ रुपये झाला. आणि या खात्याबद्दल खर्च १३,५९,२३६ रुपये बसला. सन १८६२ त फक्त मुंबई शहरांतच मागील वर्षांपेक्षां

सुमारें आठदहा कोटी रुपयाचा व्यापार जाजती झाला. याप्रमाणें या शहरांत प्रतिवर्षी व्यापाराची धांव वाढतच जात्ये.

दिवाणी, लष्करी, आणि दुसऱ्या खात्यांचीं कामें चालविण्यासाठीं मुंबईत सुमारें १३७ लहान मोठीं हपिसें आहेत. त्यांत बहुतकरून सनदी इंग्रज कामगार लोक अमलदार असतात. व त्यांच्या हाताखालीं इंग्रेजी शिकलेले कारकून व कारभारी दहा रुपये दरमहा पासून आठशें रुपये दरमहा मुशारा मिळणारे सुमारें ५,००० आहेत. यांत ब्राह्मण, शेणवी, परभू, सुतार, वाणी, पारशी व दुसऱ्या सर्व जातींचे लोक असतात. हपिसांतील कामें सर्व इंग्रजी लिपींत व भाषेंत चालतात.

इंग्रजांचें एथें आगमन झाल्यापासून व्यापाराची ईर्षा, विद्येचा प्रसार, ज्ञानाची अभिरुचि, औदार्याची इच्छा, व धर्म करण्याची वासना हीं सर्व उत्पन्न झालीं.

एशिआ व दुसऱ्या परखंडांपैकीं इंग्रजांच्या ताब्यांत पुष्कळ राज्यें आहेत. परंतु मुंबई सारखें राज्यसत्तेचा प्रकाश पाडून योग्यता आणणारें व व्यापाराच्या अबादानीच्या शिखरास चढलेलें बहुधा दुसरें कोठेंच नाहीं. कांहीं अंशीं मुंबई बेटावरूनच इंग्रजांचें सामर्थ्य आणि वैभव देशोदेशीं पसरलें. आणि त्यांचें सर्व गोष्टींत नीट रीतीनें संरक्षण करणें हें त्यांस फारच अगत्याचें आहे. इतर शहरांचा नाश झाला व सोडून दिलीं तरी इंग्रज सरकाराची तादृश हानि होणार नाहीं, परंतु मुंबईचा मोड झाला तर इंग्रज सरकारच्या भरत खंडांतील उत्कर्षास खामी आली असें होईल. आणि इंग्रज सरकाराचें राज्य एथें शाश्वत असावें असें बहुधा मुंबईतील सर्व लोकांच्या अंतःकरणांत वागतें, यावरून ईश्वर यांचें महत्व सदोदीत चालवील तर फार सुखप्रद होईल.

सन १८६२ सालीं सरकाराचें उत्पन्न वाढल्यामुळें मोठ्या दयार्द्र अंतःकरणानें रयतेची कींव लक्षांत आणून लैसेन्स टाक्स बंद केला. त्या प्रकरणीं हा पुढील सरकारी हुकूम एथें साद्यंत उतरून घेतला आहे:—

अ. क्र.

# जाहिरनामा.

## रेवेन्यु डिपार्टमेंट.

**इंडिया सरकारचा खालीं लिहिलेला ठराव सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं पुनः छापून प्रसिद्ध केला आहे.**

**नंबर २६.**

फिन्यान्शिअल डिपार्टमेंट.

**फोर्ट विलीयम तारीख २१ वी माहे फेब्रुआरी सन १८६२**

सन १८६१ चे नवेंबर व डिसेंबर महिन्यांत आणि सन १८६२ चे जान्युआरी महिन्यांत हिंदुस्थानांतले खजिन्यांतील शिलके विषयीं इंडियाचे आडिटर जनरल याणी आणि बंगाल व मद्रास व मुंबई व वायव्य प्रांत व पंजाब येथील सिविल पेमास्तर याणी केलेले रिपोर्ट वाचले.

सन १८६१-६२ सालीं उत्पन्न व खर्च किती, व हिंदुस्थानासाठीं पैक्याची गरज किती याविषयींचे अंदाजे फिन्यान्शिअल डिपार्टमेंटांत तयार होऊन नीट करण्यांत आले तेही वाचले.

ठराव-फोजेने बंड केल्यामुळें तीन वर्षें झालीं हिंदुस्थानचे खजिन्यांची स्थिति अशी झाली होती कीं या देशावर नवे नवे कर बसवावे लागले.

सदहू करांपैकीं कळाकौशल्यावरील व धंद्यांवरील व व्यापारांवरील कर आहे त्यास "लैसेन्स टाक्स" असें सामान्यतः ह्मणतात.

हा कर ज्या कायद्यावरून बसविला आहे तो कायदा सन १८६१ चे जुलै महिन्याचे १६ वे तारिखेस ठरला होता.

निरनिराळे प्रकारचे कारीगर व लाहान उदीम व्यापार करणारे लोकांवर मुख्यत्वें करून पडतो असा हा कर आहे.

सधन लोकानी व तसेच या लोकानी सरकारास आपआपले सामर्थ्या प्रमाणे मदत करावी हें वाजवी आहे व हिंदुस्थानचे रिवाजास अनुसरून आहे आणि ही गोष्ट लोक जाणत नाहींत व ते संतोषाने कबूल करीत नाहींत असें वाटण्याची सबब गवरनर जनरल इन् कौन्सिलास दिसत नाहीं.

सरकारास जरूर पडेल तेव्हां हिंदुस्थानांत लैसेन्स टाक्स चालू करणें हें वाजवी व फायद्याचें आहे अशी गवरनर जनरल इन् कौन्सिल यांची खात्री आहे.

परंतु जरूरी वांचून कोणतेही प्रकारचे लोकांवर कर बसवूं नये अशी गवरनर जनरल इन् कौन्सिलाची इच्छा आहे आणि हिंदुस्थानचे खजिन्यांची स्थिति आतां सुधारली आहे सबब "लैसेन्स टाक्साने" उत्पन्न व्हावयाची रकम सरकारास सोडून देतां येते.

हिशेब ठेवण्याचे व तपासण्याचे नवीन रिती प्रमाणे हाल्लीं पत्रकें तयार होऊन आलीं आहेत त्यांवरून व खजिन्यांत शिलक वाढत चालली आहे त्या वरून ही सुधारणूक सिद्ध होते.

तारीख ३१ वी ज्यानुआरीचे रोजीं हिंदुस्थानचे सरकाराचे सर्व खजीने मिळून रोख शिलक १८,४०,००,००० रुपये होती तीतून इंग्लंड देशांतील खर्च द्यावा लागेल तो सर्व वजा देतां हिंदुस्थानांत नक्की शिलक १५ कोटींहून जास्ती राहते.

गेल्या वर्षी सरकाराने व्याजाच्या नवीन नोटी काढल्या नाहींत व त्या मुदतींत सरकारांत मामूल खेरीज इतर रितीने पैका आला नाहीं आणि गेल्या एप्रील महिन्यांत तयार केलेले अंदाज्या वरून सन १८६१।६२ सालांत अमुक उत्पन्न होईल असें वाटत होतें त्याहून त्या सालांत अधिक वसूल येईल असें सरकारांत पत्रकें आलीं आहेत त्यावरून खचित होतें आणि उत्पन्नाचे बहुतेक मार्ग चांगले स्थितींत आहेत आणि खर्च आणखी कमी करण्याचें काम चाललेंच आहे यावरून खर्चा इतकें उत्पन्न आणण्या साठीं लैसेन्स टाक्स जरूर नाहीं अशी गवरनर जनरल इन् कौन्सिलाची खात्री झाली आहे यास्तव तो कर काढून टाकण्याचा त्याणी ठराव केला आहे.

हा कर काढून टाकल्यामुळें सरकाराने दर साल पन्नास साठ लाख रुपये सोडून दिले आहेत.

ही रकम सुमारें ५० लक्ष लोकांजवळून वसूल करण्यांत येती.

हा कर वसूल करण्याचें काम फार झालें नाहीं तथापि सुरू झालें आहे तेव्हां लोकांस कारणावांचून इजा व त्रास न व्हावा व सरकारचे इराद्याविषयीं बिलकुल अंदेशा न यावा ह्मणून पुढले वर्षाचे उत्पन्नाचा खर्चाचा अंदाजा पुरा

होण्याची वाट न पाहातां हा कर वसूल करण्याचें एकदम बंद करावें असा ठराव गवरनर जनरल इन् कौन्सिलाने केला आहे.

त्यास गवरनर जनरल इन् कौन्सिल फरमावितात कीं सन १८६१ चा १८ वा आक्ट रद्द करण्याविषयीं कायदा ठरविण्याची तजवीज लौकर होणार आहे याजकरितां सदर्हू आक्टावरून काम चालावयाचें तें सर्व बंद करावें आणि सदर्हू आक्टान्वयें कर वसूल केला असेल तो ज्याचा त्यास परत करावा.

च्यार्लस ह्यु लशिंग्टन साहेब,
हिंदुस्थानचे सरकारचे सेक्रेटारी यांची सही.

बमुजिबे हुकूम बंदेगान आली नवाब मुस्तताब हजरत आनरबल
गवरनर साहेब बाहादूर दर इजलास कौन्सिल.

वारो हेलबर्ट इलिस साहेब,
आक्टिंग चीफ सेक्रेटारी निसबत सरकार यांची सही.

मुकाम जंजिरे मुंबई.
तारीख ४ माहे मार्च सन १८६२.

असल तर्जुमा.
विनायक वासुदेव
ओरिएंटल् त्रान्स्लेटर.

भरत खंडांतील रयतेस ह्या करापासून मुक्त करण्याचें श्रेय चार्ल्स जान व्हैकौंट क्यानिंग साहेब हिंदुस्थानाचे माजी गव्हर्नर जनरल व महाराणीचे व्हैसराय यांणीं घेतलें. हे साहेब एतद्देशीय प्रजेचे हितेच्छु असून यांनीं आपल्या कारकिर्दींत लोककल्याणाचीं पुष्कळ कृत्यें केलीं, आणि हें शेवटचें कृत्य पार पाडून सन १८६२ त ते आपला हुद्दा सोडून स्वदेशीं इंग्लंडास गेले. तेथें गेल्यावर दोन चार महिन्यांच्या आंत त्यांस देवाज्ञा झाली. त्यांच्या मरणाची हानिकारक बातमी आल्यावरून हिंदुस्थानच्या लोकांस फार दुःख झालें. यांचें चिरकाल या देशांत स्मरण राहावें ह्मणून कलकत्यांतील लोकांनीं वर्गणी जमवून एका प्रख्यात ठिकाणीं यांचा पुतळा स्थापन करण्याचा ठराव केला आहे.

# प्रकरण ९.

सुप्रीम कोर्ट व दुसरीं न्यायखातीं-लेजिस्लेटिव्ह कौन्सिल व हैकोर्ट-मारवाडी-डाक्तर, गांधी, वैद्य इत्यादि-विद्वान् ब्राह्मण, वैदिक इत्यादि-बाळगंगाधर शास्त्री-दवाखाने – वैद्यशाळा – धर्मशाळा – पाणी – टपालाची स्थापना-आगबोटी-तारायंत्र-एल्फिन्स्टन् शाळेची स्थापना व दुसरीं विद्याखातीं-पुस्तकालयें-वर्त्तमानपत्रें-मुलींच्या शाळा-पुण्याची पाठशाळा-इंग्रजी शिकण्याची इच्छा.

ज्या अर्थी मुंबई शहरांत इतकी मोठी वस्ती आहे त्या अर्थी त्याची न्याय मनसुबी कशी व कोण करीत असतील असें सहज कोणाला वाटल्याशिवाय राहणार नाहीं. तर आतां त्याविषयीं कांहीं विचार करूं. मुंबईत एक हैकोर्ट, एक स्मालकाझ कोर्ट, आणि दोन माजिस्त्रेटांचीं असीं चार न्यायखातीं आहेत.

सुप्रीम कोर्टांत ५०० रुपयांपासून कितीही हजार रुपयांच्या दिवाणी खटल्यांचा व फौजदारी कोणत्याही प्रकारचे मुकदमे असले तरी त्यांचा निवाडा होतो. दर तीन महिन्यांनीं सेशन भरून फौजदारी मुकदम्यांचे फैसले होतात. यांत दोन न्यायाधीश असतात. त्यांतील मुख्यास सालिना ६०,००० रुपये, व दुसऱ्यास ५०,०००, ह्यांशिवाय ह्या खात्याचे दुसरे कामगार पुष्कळ आहेत. सुप्रीम कोर्टाची स्थापना सन १८३० त झाली. आणि या दरबारांत पूर्वी कांहीं वर्षेपर्यंत तीन न्यायाधिशांची नेमणूक होत असे यांत एक मुख्य असे. सन १८०६ पासून सन १८३० पर्यंत जें एथें न्याय दरबार होतें त्यास रिकार्डर्स कोर्ट असें नांव होतें. व जें सन १७७४ पासून १८०५ पर्यंत चालू होतें त्यास मेयर्स कोर्ट असें नांव होतें. स्मालकाझ कोर्टांत तीन न्यायाधीश असून एका रुपयापासून ५०० रुपयांपर्यंत दिवाणी फिर्याद चालते. एथें फक्त दिवाणी मुकदम्यांचाच निवाडा होतो.

सुप्रीम कोर्टांतील मुख्य न्यायाधिशानें मुंबईत सात वर्षें राहावें असा ठराव असतो. ही मुदत भरल्यावर इंग्लंडांस गेलें ह्मणजे त्यास सालिना दहा हजार रुपये

पेनशन मिळतें. ही मुदत पुरी होण्यापूर्वीं एक दोन वर्षें अगोदर हा हुद्दा सोडून जावें लागलें तर ७,००० रुपये वर्षास मिळतात. धाकट्या न्यायाधिशाची मुदत संपली ह्मणजे त्यास ७,००० रुपये वर्षास मिळतात. जर मुख्य न्यायाधिशास हिंदुस्थानांत आल्या नंतर सहा महिन्यांच्या आंत देवाज्ञा जहाली तर त्याच्या कुटुंबास एक लक्ष रुपये बक्षीस मिळतात. आणि बारा महिन्यांच्या आंत मेला तर पन्नास हजार मिळतात. ह्या न्यायाधिशांची नेमणूक मुख्य राणी सरकारांतून होते. म्हणूस यास बादशाही कोडत म्हणतात.

आतां माजिस्त्रेट तीन आहेत, ह्मणून सांगितलें, त्यांची वांटणी अशी आहे. मुख्य माजिस्त्रेटाचे खातें किल्ल्यांत आहे. तेथें दोघे माजिस्त्रेट आहेत. तिसऱ्या माजिस्त्रेटाचें माजगांवांत हपिस आहे. ह्या ठिकाणीं फौजदारी लहान खटल्यांचे फैसले होतात. व मोठे खून वगैरे असले तर त्यांचा कच्चा मजकूर समजून घेऊन जबान्या घेतात. आणि त्यांचा इनसाफ करण्यासाठीं सुप्रीम कोर्टांत पाठवून देतात. सेशन भरतें त्यावेळीं सर्व जातींतील २४ असामी महाजन मिळवून त्यांकडे कैदी लोकांच्या मुकादम्यांबाबद ज्या जबान्या लिहून आलेल्या असतील त्या सर्व तपासायास देतात. मग तपासून त्या खटल्याचा निवाडा करणें योग्य किंवा अयोग्य आहे यावर ते आपलें मत देतात. आणि कोणत्याही खटल्याचा सेशनांत तपास करणें त्यांच्या ठरावावर असतें. ह्या महाजन लोकांस ग्रांडजूरी असें ह्मणतात, मुकदमे ह्याजकडून आल्यानंतर त्यांचा निकाल होईपर्यंत एक न्यायाधीश व बारा असामी निरनिराळ्या जातींतील पंच मिळून त्यांचा निवाडा करितात. ह्यांस पेटीजूरी असें ह्मणतात. पोलिस खात्यांत एक मुख्य पोलिस कमिशनर आहे, त्यास पोलिसमास्तर असें ह्मणतात. त्याचे मदतनीस इंग्रज कानिस्टेबल्, पोलिस अमल्दार सुमारें ७५ आहेत, व स्वार, पोलिसचे शिपाई, रामोशी, मिळोन सर्व पोलिस मास्तराच्या हाताखालीं १,०८२ लोक शहराचा बंदोबस्त करण्यासाठीं नेमून दिले आहेत, यांबद्दल सरकारास सालिना २,२८,३८२ रुपये खर्च होतो. यांशिवाय मुंबईतील कित्येक इंग्रज व एतद्देशीय श्रीमान् गृहस्थांच्या घरीं पोलिसांतून घेतलेले रामोशी सुमारें १,००० असतील, यांस दरमहा ७ रुपये द्यावे पडतात, व सरकारास अर्धरुपया द्यावा लागतो, पोलिसच्या शिपायांच्या व कनिस्टेब्लांच्या नेमणुका जागोजागीं करून टाकिल्या आहेत. अणखी नाकोनाकीं चौक्या आहेत. व रस्तोरस्तीं रात्रंदिवस शिपायांचा पहारा असतो. घोडे स्वार दिवसभर सर्व शहरांत

फिरत असतात, जरा कोणी दंगामस्ती केली कीं शिपाई त्याच्या मुस्क्या बांधून नेतात.

सदर अदालत हें एक न्यायखातें कंपनी सरकाराकडून मुंबई बेटात आहे, परंतु एथें मुंबई इलाख्यांतील बाहेरील जिल्ह्यांतल्या मुकदम्यांचा मात्र निवाडा होतो. या न्यायखात्यांत कंपनी सरकाराकडून तिघे न्यायाधीश नेमलेले असतात. त्यांत एक कौन्सलर न्यायाधीश असतो. ह्या खात्यांत प्रतिवर्षीं मुलखी व फौजदारी मिळून पन्नास साठ हजार मुकदम्यांचे निवाडे होतात. सन १८६० मध्यें ५०,००० मुकदमे तपासले गेले.

मुंबईंतील सुप्रीम कोर्टांत शेरिफाचें (नाजराचें) खातें आहे. त्याच्या हाताखालीं शिपाई व इंग्रज अमलदार आहेत. सर्व फौजदारी व दिवाणी कैदी याच्या स्वाधीन होतात. मग त्यांची जसजशी शिक्षा असेल त्या प्रमाणें तो वहिवाट करितो. दिवाणी खटल्यांबद्दल शेरिफास फी द्यावी पडती.

मुख्य आणि दुय्यम असे दोघे शेरिफ् असतात. दुय्यम शेरिफाची नेमणूक कायम असून त्यास दरमहा सरकारांतून ३०० रुपये वेतन असतें. मुख्य शेरिफाची नेमणूक प्रतिवर्षीं जान्युअरीच्या पहिल्या तारिखेस होते. ही जागा देणें फक्त गव्हर्नरच्या खुशीवर आहे. ह्यास सरकारी मुशारा ३५० रुपये असतो. या शिवाय फी मिळत असते. शेरिफाचा हुद्दा बहुधा इंग्रज लोकांसच देत असतात. ह्या पन्नास साठ वर्षांत जे प्रतिवर्षीं शेरिफ् नेमिले गेले, त्यांत दोन खेपा मात्र पारशी गृहस्थांस नेमिलें होतें; एका खेपेस शेट बमनजी हारमस्‌जी वाडिया, व एका खेपेस माणिकजी खरशेटजी यांस. यांस सरकारांतून दरमहा थोडें मिळतें खरें, परंतु दिवाणी मुकदम्यांपैकीं जी फी सरकारीं देणें पडते तींतून शेंकडा दोन सवा दोन रुपये यांस घेण्याचा हुकूम आहे. जसजसे कोडतांत मुकदमे जास्त येतील तसतसी शेरिफाची कमाई वाढत असते. ही फी पूर्वीं शेंकडा पांच रुपये होती, परंतु जेव्हां सर अर्स्किन् पेरी यांनीं स्मालकाझ कोर्टाचा हक्क वाढवून याची नवी व्यवस्था सन १८५० त केली तेव्हांपासून शेरिफाची कमाई तुटली. पूर्वीं स्माल-काझ कोर्टांत १०० रुपयांपर्यंत फिर्याद होत असे.

सन १८४० पासून ५० पर्यंत जे शेरिफ् झाले त्यांस दहा वर्षांत १,१४,२८४ रुपये मिळाले. ह्या हपिसाचें काम सर्व दुय्यम करीत असतो. मुख्य शेरिफास केवळ घर बैठा पगार मिळतो. सेशन भरत असतें त्यावेळीं किंवा

कांहीं अगत्याचें काम असलें तर मात्र कांहीं दिवस त्यास हजर व्हावें पडतें. जे गव्हर्नराचे मित्र असतील त्यांस त्यानें आपल्या खुशीनें ही जागा द्यावी असा त्यास अधिकार असतो. सन १८४० पासून १८५० पर्यंत मिस्तर रिवेट हे तीन खेपा शेरिफ् होते. ह्यांस इतक्या मुदतींत ४१,३१० रुपये मिळाले; यावरून सुप्रीम कोर्टांत प्रतिवर्षी दिवाणी मुकदमे किती तपासले जातात याचें अनुमान करावें. या कोडतांत वकील व बारिस्टर आहेत; त्यांच्या मार्फतीनें कोणतीही फिर्याद करणें तर सुरू करावी पडती; या कामदार लोकांची फी मनस्वी असती. एकादा मोठा बिकट कज्जा असला तर त्याचा निकाल होण्यास एकादे समयीं दहा वीस वर्षें लागून हजारो रुपये देखील खर्च होतात. अशा खर्चांनीं कित्येकांचीं दिवाळीं ही निघून जमीनदोस्त झाले आहेत. या कोडतांत सन १८६२ त १० बारिस्टर व २० वकील होते.

कांहीं वर्षांमागें सुप्रीम कोर्टामध्यें दोघां बंधूंचा तंटा चालला होता. त्यांचा पुष्कळ वर्षेंपर्यंत निवाडा न झाल्यामुळें एका भावास सुमारें लक्ष सवालक्ष रुपये फक्त वकील बारिस्टरांच्या व दुसऱ्या फीबद्दल खर्च झाला. शेवटीं तो कर्जबाजारी होऊन दुःखांत मेला, तरी त्यांच्या तंट्याचा शेवट झाला नाहीं. क्षुल्लक गृहकलहावरून सुप्रीम कोर्टांत जाऊन मुंबईंतील गृहस्थांचीं शेंकडो घरें बसून गेलीं. इतःपर तरी आमच्या लोकांनीं याविषयीं फार सावध असावें. आणि असे कज्जे घरच्या घरीं मिटतील असें करावें. हल्लीं दोघां मोंगलांचा ह्या कोडतांत देवा घेवा बद्दल एक मोठा खटला चालला आहे. आणि तो सुरू होऊन आज सुमारें पंधरा वीस वर्षें झालीं असून त्या प्रीत्यर्थ उभय पक्षीं मिळोन दहा बारा लक्ष रुपये खर्च झाला असें सांगतात, परंतु अजून त्या खटल्याचा पूर्व दिवसच आहे. ह्याचा शेवट कोणत्या काळीं होईल याचें कोणाच्यानेंच अनुमान करवत नाहीं.

सन १८६१ मध्यें गुजराथ्यांच्या एका महाराजाचा सुप्रीम कोर्टांत खटला चालला होता. याचें कारण असें होतें कीं, जदुनाथजी या नांवाच्या महाराजाचें आचरण कांहीं गोष्टींत दोषाई आहे असें सत्यप्रकाश नांवाच्या एका गुजराथी वर्त्तमानपत्रांत करसनदास मुलजी वर्त्तमानपत्राचे कर्त्ते यांनीं छापिल्यामुळें महाराज मजकूर यांनीं करसनदास यांनीं हें आपणावर कुभांड रचिलें आहे आणि यामुळें आपली पन्नास साठ हजारांची नुकसानी झाली आहे, तर या गोष्टीचा पुरावा करावा किंवा आपल्या अब्रूचा जबाब द्यावा

अशी करसनदासावर सुप्रीम कोर्टांत फिर्याद केली. यावरून वाणी, भाटये, व लवाणे लोकांत पुष्कळ दिवसपर्यंत गवगवा चालला होता. प्रतिवादीच्या तर्फेनें कित्येक सधन वाणी व भाटये लोकांपैकीं होते, परंतु जे महाराजाच्या पक्षाचे होते त्यांनीं आपल्या पक्षाच्या लोकांची सभा जमवून असा कट केला होता कीं, महाराजाविरुद्ध कोणी साक्षी देऊं नये, आणि यदा कदाचित् कोणी दिली असतां त्यास वाळींत टाकावें. ह्या खटल्यांत बहुतेक वाणी लोकांच्या महाराजांच्या अविचारी आचरणाच्या गोष्टी उघडकीस आल्यामुळें कित्येक देवभोळया वाणी व भाटये लोकांस फार विषाद झाला. ह्या कटांत कित्येक सामील होते त्यांजवर प्रतिवादी करसनदास यांनीं फौजदारींत पोलिस हपिसांत माजिस्त्रेटापाशीं फिर्याद केली कीं, आपला खटला सुप्रीम कोर्टांत चालला असतां त्याचा पुरावा करणाऱ्या लोकांस साक्षी देण्यास हे लोक मनाई करितात, तर सरकारानें याचा बंदोबस्त करावा. ह्या खटल्याचा तपास पोलिस हपिसांत होऊन निवाडा होण्याकरितां सुप्रीम कोर्टांत सेशनांत पाठविला. या मुकदम्याचा वादीच्या तर्फेनें निवाडा होऊन जे अपराधी लोक होते त्यांस कोणास पांचशें, कोणास हजार रुपये दंड झाला.

पुढें महाराजाचा खटला सन १८६२ फेब्रुआरी महिन्यांत कोडतांत सुरू झाला. त्यावेळीं उभयपक्षांकडून मुंबईतील कित्येक श्रीमंत वाणी, भाटये, ब्राह्मण, शास्त्री, परभू, पारशी, शेणवी इत्यादि गृहस्थांस साक्षीसमानें लागलीं होतीं. आणि ह्या खटल्याचा तपास बावीस दिवस पर्यंत सुप्रीम कोर्टांत चालला होता. आणि वादी व प्रतिवादीच्या तर्फेचे साक्षीच पन्नास साठ असामी होते. या खटल्याचा कसा काय निकाल होतो तें पहायास कोडतांत शेंकडो लोक जाऊन बसत. या दिवसांत कोडतांत इतकी गर्दी होई कीं, लोकांस उभें रहायास देखील रीघ नसे. एक दोन दिवस तर लोकांच्या गर्दीमुळें कोडताचे दरवाजे बंद करून ह्या खटल्याची चौकशी चालविली होती. आणि वाणी व भाटये लोक महाराजाच्या तर्फेनें मारामारी करितील ह्मणून इंग्रज पोलिस अमलदारांचे जागोजागीं पहारे ठेविले होते. न्यायस्थानीं दोघेही न्यायाधीश बसले होते. वादी आणि प्रतिवादी यांनीं प्रत्येकानें दोन दोन वकील बारिस्टर केले होते. आणि प्रत्यहीं यांचे वादविवाद व साक्षीदारांच्या जबान्या घेतल्या त्यावेळीं त्यांस धर्म प्रकरणीं अनेक प्रकारचे प्रश्न करीत. कधींकधीं एकएक बारिस्टर सहा सहा तास एक सारिखा उभा राहून आपल्या पक्षाचें प्रतिपादन करायास भाषण करी. ह्यांचें हें भाषण व न्यायप्रकरणीं वाद-

विवाद ऐकण्यास लोक अगदीं तुटून पडत. अशा ठिकाणीं जाऊन ह्या लोकांचें भाषण ऐकण्यांत मोठा फायदा आहे. परंतु इंग्रजीचें चांगलें ज्ञान मात्र असलें पाहिजे. नाहीं तर कांहीं उपयोग नाहीं. या प्रसंगीं वादी आणि प्रतिवादी मिळून पन्नास साठ हजार रुपये खर्च जहाला असें सांगतात. खटला चालला होता तेव्हां फक्त प्रतिवादीसच प्रति दिवशीं तीनशें रुपये खर्च बसे असे ह्या कोडताचे खर्च आहेत.

ह्या खटल्याचा तपास बावीस दिवसांनीं संपला. परंतु निवाडा कोणाच्या तर्फेनें झाला हें न्यायाधिशांनीं दोन महिने पर्यंत कळविलें नाहीं. ह्या खटल्याचा निवाडा कसा काय होतो हें पहाण्यास मुंबईतील किंबहुना पश्चिम हिंदुस्थानांतील ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य, शूद्र, पारशी, मुसलमान, यहूदी, इंग्रज इत्यादि सर्व जातींचे लोक फारच उत्सुक होते. महिना दोन महिने पर्यंत जिकडेतिकडे मुंबईत एक सारिख्या सकाळ संध्याकाळ महाराजाच्या खटल्याच्या गोष्टी चालल्या होत्या. यांत हिंदु धर्माची फारच विदारणा होऊन गेली.

या खटल्याचा निकाल तारीख २२ माहे एप्रील सन १८६२ या दिवशीं झाला. त्यावेळीं दोघेही न्यायाधीश न्यायस्थानीं बसले होते. या प्रसंगीं ही कोडतांत लोकांची अतिशय गर्दी होऊन गेली होती. शेवटीं प्रतिवादी याच्या तरफेनें फैसल्ला जहाला. प्रथम मुख्य न्यायाधिशानें आपलें मत वाचून दर्शविलें; आणि इतकें सांगितलें कीं, करसनदास याच्यानें एक दोन साधारण बाबतींत पुरावा करवला नाहीं; सबब त्यानें महाराजास नुकसानीबद्दल पांच रुपये द्यावे. परंतु बाकीचा ह्या मुकदम्याचा फैसल्ला प्रतिवादीच्या तरफेनें झाला. धाकट्या न्यायाधिशाचें मत तर अगदीं प्रतिवादीच्या तरफेनेंच होतें, आणि प्रतिवादी याच्याच तरफेनें त्याणीं फैसल्ला केला. करसनदास याच्या स्तुत्य कृत्याविषयीं त्यांनीं न्यायस्थानावरून एक सारिखें दोन तास पर्यंत भाषण केलें. त्या प्रसंगीं यांची वक्तृत्वशक्ति, न्यायदृष्टींत चाणाख्यपणा व गांभीर्य हीं पाहून मोठे लोक चकित होऊन गेले. ह्यांचें भाषण संपल्यावर कोडतांतील बारिस्टर व दुसऱ्या प्रतिष्ठित लोकांनीं रा० करसनदास मुलजी ह्यांस मोठी शाबासकी दिली. महाराजाचे पक्षी होते ते अर्थातच म्लानवदन होऊन गेले. ह्या बद्दल महाराजास सुमारें पन्नास साठहजार रुपयांचा खर्च आला असें सांगतात. तारीख २५ माहे एप्रील सन १८६२ च्या धूमकेतु वर्त्तमानपत्रांत या मुकदम्याविषयीं हा पुढील मजकूर आला होता.

"हा मुकदमा चालत्या महिन्याच्या २२ वे तारीखेस शेवटास जाणार ह्मणून आह्मी आमच्या गेल्या अंकांत लिहिलें होतें. त्या प्रमाणें त्या दिवशीं राणी कोडतांत उभय न्यायाधिशां पुढें याचा निकाल झाला. त्या दिवशीं प्रातःकाळीं आठ वाजल्या पासून कोडतांत लोक जमा होऊं लागले, ते सुमारें अकरा वाजे तों इतके कांहीं जमले कीं, अशी दाटी केव्हांच झाली नव्हती. यांत हिंदू, इंग्रज, पारशी आदि करून सर्व ज्ञातींचे व धर्मांचे लोक होते, पैकीं फार भरणा भाट्यांचा होता. आमच्या वाचणारांस माहीतच आहे कीं, त्या मुकदम्यांत करसनदास मुलजी "सत्य प्रकाशाचे मालक" यांनीं आपल्या पत्रांत महाराज व्यभिचारी, खराब इत्यादि मजकूर लिहिला होता. ह्मणून त्यांवर महाराजांनीं बेअब्रूची फिर्याद केली होती. तेव्हां करसनदास हे प्रतिवादी होते. त्यांनीं आपल्या बचावार्थ आठ प्रकारच्या तकरारी आणल्या होत्या त्यांपैकीं चार तकरारी शाबूत झाल्या अन्वयें महाराजांनीं करसनदासाचा सर्व खर्च भरून द्यावा अशी दर्यात झाली. बाकी चार तकरारी शाबीत झाल्या नाहींत म्हणून प्रतिवादी करसनदास यांस रुपये ५ दंड झाले."

स्मालकाझ कोर्टात दर शेंकड्यास १२ रुपये फी द्यावी पडे, परंतु ती सन १८६१ जुलै महिन्या पासून कमी केली आहे. याचें कारण या खात्यांत उत्पन्न फार होऊन सरकारांत फाजील जमा फार होऊं लागली; हें सरकारानें किती स्तुत्य काम केलें. सन १८६०–६१ सालीं या कोडतांत १७,६९३ मुकदम्यांचे फैसले झाले आणि फी बद्दल सरकारी जामदारखान्यांत १,१५,०६१–८–१० इतका वसूल दाखल झाला. या खात्याचा वसूल उत्तरोत्तर वाढत जातो. ह्या कोडताचा सालिना न्यायाधिशांचें वेतन व दुसरा खर्च मिळून ८०,००० रुपये खर्च आहे; यांत फिर्याद करावयास वकील, बारिस्टरांचें अगत्य नसतें. परंतु तसाच तकरारीचा कज्जा असला तर कोणी कोणी शें पन्नास रुपये खर्चून वकील करितात. परंतु वकील करणें हें केवळ मालकाच्या खुशीवर आहे. सालमजकुरीं सन १८६१ मध्यें या खात्याचा खर्च भागून सरकारास ३२,८३०–१२–३ फाजील राहिले

गुरुवारीं सीनियर माजिस्त्रेटाच्या हपिसांत पेटीसेशन भरत असतें, त्यावेळीं सीनियर माजिस्त्रेट, एक इंग्रज जस्टिस आफ् धपीस आणि (नेटीव) एतद्देशीय जस्टिसिझ् आफ् धपीस यांपैकीं एक गृहस्थ, असे तिघे असामी

बसून साधारण तकरारीच्या फौजदारी खटल्यांची दर्यास करितात. वीस रुपये पर्यंत चोरीच्या खटल्याचा निवाडा करण्याचा व सहा महिने पर्यंत सक्त मजुरीची शिक्षा करण्याचा, व १०० रुपये पर्यंत दंड करण्याचा ह्यांस अधिकार असतो. साधारण खटले असतात त्यांचे फैसले प्रतिदिवशीं तीन्ही माजिस्त्रेटांकडून होतात. व जे मोठे खटले असतात ते हैकोर्टांत तपासायासाठीं पाठवून देतात.

मुंबईंत नेटीव आणि इंग्रज मिळून अडीचशें जस्टिसिझ् आफ् धपीस आहेत. जस्टिस आफ् धपीस हा हुद्दा इंग्लंड सरकारांतून जे द्रव्यवान् व अब्रूवान् असतील त्यांस मिळतो. यांजपाशीं अधिकार इतकाच कीं, शहराची व्यवस्था नीट ठेवावी. व शहराच्या व्यवस्थेसाठीं जें द्रव्य सरकारांतून जातें त्याचा नीट व्यय होतो किंवा नाहीं हें व रयतेच्या दुःखाकडे यांणीं पाहावें. हे राणीच्या तरफेनें देशाची व्यवस्था पाहाणारे प्रतिनिधि आहेत, दुसरें कांहीं नाहीं. यांस सरकारांतून कांहीं मुशारा नसतो. यांनीं रयतेस सुख होण्याचे उपाय करावे. व त्यांची न्यायमनसुबी यथान्याय होते कीं नाहीं हें पाहावें. सारांश त्यांनीं शहरांत स्वच्छपणा आणि स्वस्थपणा ठेवण्यास झटावें. एतद्देशीय लोकांस हा सन्मान सुमारें तीस वर्षांपासून मिळूं लागला. हा अधिकार मिळाला ह्मणजे त्यांस इस्क्वायर हा किताब मिळतो.

पोलिस हपिसांत तीनही माजिस्त्रेटांचीं खातीं मिळून सन १८५८ त खून, चोरी वगैरे अनेक जातीच्या फौजदारी खटल्यांचा निवाडा झाला ते सर्व मुकदमे १५,८७३ होते, आणि ह्या खटल्यांत जे असामी गुन्हेगार ठरले त्यांची संख्या २७,१४२ होती. चोरी बद्दल निरनिराळया मुंबईतील गृहस्थांचा ऐवज गेला त्याची रकम १,७१,२०३–८–१० रु. होती; त्यांतील मालकांस चोरी धरल्यामुळें ७६,७४७–२–६ रु. परत मिळाले. गुन्हेगारांस दंड होतो त्याबद्दल या खात्यांत सालिना तीस चाळीस हजार रुपये उत्पन्न होतात. सन १८६० माहे अक्टोबर महिन्यांत माजिस्त्रेटाच्या खात्यांत अपराधी लोकांस जो दंड झाला त्याबद्दल सरकारांत ३,७३० रुपये इतकी रकम रुजू झाली.

सन १८६० मध्यें पोलिस खात्यांत माजिस्त्रेटांकडे सगळे २१,९०६ फौजदारी खटले तपासायासाठीं आले, त्यां पैकीं ६,३८६ असामी अपराधी न ठरल्यामुळें सोडून दिले. आणि बाकी राहिलेल्यांस गुन्हेगार ठरवून अनेक तऱ्हेची

शिक्षा झाली. निरनिराळ्या जातींतील लोक फौजदारी खटल्यांत आलेल्यांची संख्या.

| | |
|---|---|
| हिंदू .......................... | १३,१७४ |
| मुसलमान ........................ | ५,६४३ |
| पारशी .......................... | ९८३ |
| अनेक जातीचे एतद्देशीय ख्रिस्ती ......... | ९६२ |
| युरोपियन ........................ | ९३४ |
| अनेक वर्णसंकर जातीचे लोक ............ | २१० |
| | २१,९०६ |

या संख्येंत हिंदू जातींतील स्त्रिया फौजदरींत गेलेल्या १,१३० अढळतात. ह्यांशिवाय दुसऱ्या जातींतील स्त्रियाही बऱ्याच आहेत, परंतु त्या थोड्या. ह्या शहरांत स्त्रियांचें प्राबल्य फार व त्यांस बदकर्मापासून प्रतिबंध करण्यास बराबर कायदा नसल्यामुळें त्या फार उनाड होऊन निर्लज्जपणें वागतात. इंग्रजलोकांच्या कायद्यांत इतका हा ऐब आहे.

सन १८६२ मे अखेर पर्यंत फौजदारी खटल्यांबद्दल नव्या व जुन्या तुरुंगांत ३८२ अनेक जातीचे कैदी असून त्यांत कितीएक सक्त मजुरीची शिक्षा भोगीत होते, व कित्येक नुसत्या कैदेच्या शिक्षेवर होते. यांत पंधरा दिवसांपासून दोनतीन वर्षांची टेप मिळालेले गुन्हेगार असून कांहीं काळ्यापाण्यावर पाठविण्याची शिक्षा पावलेले ही कैदी होते. गुन्हेगारांची संख्या वाढून तुरुगांत जाग्याचा संकोच होऊं लागला तर ह्यांतील कैदी लोकांस ठाणें, पुणें, व रत्नागिरी एथील दुसऱ्या जिल्ह्यांतील तुरुंगांत पाठवून देतात. तेथें त्यांजकडून सक्तमजुरी या प्रकारची करून घेतात. त्यांस रस्त्यांवर खपवितात. त्यांजकडून दगड वाहवितात, सरकारी वाडा बांधायाचा असला तर चुना कुटावयास लावितात.

रिकार्डर्स कोर्टाची स्थापना होण्याच्या पूर्वी कोणास मोठें शासन करायाचें असल्यास शहरांत दवंडी पिटवून त्यास तरीपार करीत ह्मणजे त्याला पनवेल, अलीबाग, उरण एथें नेऊन सोडीत. आणि त्याला शहरांत येण्याचा प्रतिबंध करीत. हें त्यावेळचें काळेंपाणी !

सन १८६१ त ह्याटांपूत १६,२०० मनुष्यें मेलीं. त्यांत ८,९४९ पुरुष आणि ६,९१४ स्त्रिया, व उपजतां मेलेलीं मुलें ३३७. यांपैकीं १०,५५९ स

मूठमाती झाली व ४,७३६ स अग्निसंस्कार झाला आणि ९०५ स दोखम्यांत टाकिले; हे पारशी. ह्याचवर्षी ११००० मुलें एथें जन्मलीं.

मुंबई शहराची किंबहुना भरत खंडांतील जीं संस्थानें इंग्रजी बावट्या-खालीं आहेत त्यांची न्याय मनसुबी करण्यासाठीं व त्यांत नव्या बाबी चालू करण्या-करितां इंग्रज सरकार प्रतिवर्षी अनेक कायदे करीत असतें. त्या कायद्याप्रमाणें राज्यांत वहिवाट होती. हे कायदे कलकत्त्यामध्यें तयार होतात. कायदे करणारी मंडळी ह्मणून निराळीच सभा आहे, तींत अकरा गृहस्थ कायदे करणारे असतात. त्यांत बंगाल, मुंबई आणि मद्रास इलाख्यांतील एकएक इंग्रज गृहस्थ सिविल खात्यांतील पुष्कळ वर्षें या देशांत वहिवाटलेला व ज्यास एथील लोकांच्या रीति-भाति माहीत असतील अशांची नेमणूक होती. यांस दरमहा पांच पांच हजार रुपये मिळतात. असे हे गृहस्थ मिळून एकमेकांच्या अनुमतानें कायदे करीत असतात. हे प्रत्येक इलाख्यांतील प्रतिनिधीसारिखे वागतात. कोणती ही बाब सुरू करायाची असली ह्मणजे ज्याच्या इलाख्यांतील जी बाब असेल त्याजकडून त्याचा उपक्रम निघतो. व प्रथम त्याचें अनुमत घेऊन त्या प्रकरणाचा सिद्धांत होतो. मग तो गव्हर्नर जनरलानें मंजूर केला ह्मणजे सरकारी वर्त्तमानपत्रांत देश भाषेंतील भाषांतरासुद्धां छापून लोकांत प्रसिद्ध करितात. आणि प्रसिद्ध केल्यानंतर तीन महिन्यांनीं अमलांत आणितात. ह्या कायद्यांची एक प्रत वरिष्ठ कोर्टांत ह्मणजे पार्लमेंट सभेस पाठवून तिचें अनुमत घ्यावें पडतें. जरी एखादा लहान सान कायदा कारण परत्वें मुंबईंतील सरकारानें केला तरी तो कलकत्त्याच्या सरकाराकडून बहाल होऊन आल्यावांचून एकाएकीं अमलांत आणीत नाहींत. ह्या मंडळींत गव्हर्नर जनरल, न्यायाधीश, व सेनाधिपति हे असतात.

हल्लीं पारशी लोकांच्या पंचाइतीनें पारशी लोकांचीं घरगुती खटलीं चुकविण्या-साठीं निराळे कायदे असावे असें मनांत आणून नवे कायदे तयार करून मुंबई-तील सरकारच्या मारफतीनें कलकत्त्यास पाठवून दिले होते. ते कायदे ह्या मंड-ळीनें मंजूर करून पाठविले आहेत. ह्यां मध्यें पारशी गृहस्थांनीं आपलें मोठें शहाणपण दाखविलें, आणि त्यांनीं तयार केलेले कायदे ज्या अर्थी गव्हर्नर जनरल सारिख्यांनीं पसंत करून पाठविले आहेत त्या अर्थी ते चांगलेच असतील. हे कायदे फिरून एथें तपासण्या करितां सर जोझेफ् आर्नोल्ड, शेट रुस्तमजी जम-शेटजी जिजीभाई व इतर पांच संभावित गृहस्थांस नेमिले आहेत.

पुष्कळ वर्षांपासून लोकांच्या मनांत होतें कीं, कायदे करणाऱ्या मंडळींत एतद्देशीय संभावित व विद्वान् गृहस्थ असावे आणि जे कायदे तयार होतील ते आमच्या लोकांच्या संमतानें व्हावे. ही त्यांची इच्छा इंग्रज सरकारानें हल्लीं मोठ्या उदारपणानें पूर्ण केली. सन १८६२ तारीख २२ माहे जानेवारी ह्या दिवशीं मुंबई इलाख्यासाठीं कायदे करणारी मंडळी किल्ल्यांत सरकारी वाड्यांत भरली होती. ह्या सभेंत ह्या पुढील गृहस्थांची नेमणूक केली आहे. कौन्सलाचे अध्यक्ष मुंबईचे गव्हर्नर; मुंबईचे सेनापति व कौन्सलांतील दुसऱ्या खुर्चीचें अधिकारी, सर विलियम म्यान्सफिल्ड; एम्. आर. वेस्ट्राप इस्कायर, सरकार तरफेचे सुप्रीम कोर्टांतील वकील; मेहरबान अब्दुल दुलेरखान अब्दुल खेरखान, सवनूरचे नवाब; श्रीमंत रा. रा. माधवराव विठ्ठल विंचुरकर; प्रख्यात शेट रस्तमजी जमशेटजी जिजीभाई; आनरबल एच्. डब्ल्यु. रीव्हूझ, कौन्सलाचे तिसऱ्या खुर्चीचे अधिकारी; आनरबल डब्ल्यु. बी. ट्रिस्ट्रम इस्कायर; शेट प्रेमाभाई हेमाभाई अमदाबाद एथील नगरशेट, व शहरचे डेप्युटि माजिस्त्रेट; आणि श्रीमंत रा. रा. जगन्नाथ शंकरशेट, मुंबईचे सावकार. ह्या नवीन नेमलेल्या हुद्देदारास आनरबल असा किताब दिला आहे.

ह्या सभेच्या योगानें ह्या देशाचें कल्याण होईल व एतद्देशीय लोकांस योग्य मान मिळेल असें अनुमान होतें. परंतु आमच्या लोकांनीं आपली योग्यता राखून व लोकांच्या कल्याणाकडे लक्ष देऊन शहाणपणानें आपआपला हुद्दा बजाविला पाहिजे, व लोकांच्या कल्याणांत आपलें कल्याण आहे असें मानिलें पाहिजे; परंतु कित्येक असें आहेत कीं, आपलें कल्याण तेंच दुसऱ्याचें कल्याण असें मानितात. असें न झालें तरच रयत सुखी होईल. ह्या सभेविषयीं ज्ञानोदय पत्रांत मजकूर छापिला होता त्यांतील बहुतेक एथें उतरून घेतला आहे.

कांहीं काळामागें विलायतेंतील पार्लमेन्ट सभेंत असा विचार झाला कीं, हिंदुस्थानांतील निरनिराळया इलाख्यामध्यें कौन्सलें ह्मणजे कायदे करणाऱ्या मंडळया असाव्या आणि त्यांत रयतेचे प्रतिनिधि असावे. हिंदुस्थान सरकारच्या अमलांत व्यापारी, जमीनदार, वगैरे जे गोरेलोक आहेत त्यांच्या तरफेनें साहेब लोक, व एतद्देशीय लोकांच्या तरफेनें एतद्देशीय गृहस्थ हे त्या मंडळयांचे सभासद असावे, आणि जे कायदे हिंदुस्थानांत चालण्याकरितां व्हावयाचे ते सर्व त्यांच्या

संमतानें व्हावे. त्यावरून आपले गव्हर्नर जनरल नामदार लार्ड क्यानिंग साहेब यांनीं ठराव केला, व तो नुकताच अमलांतही आणिला. कलकत्ता, मुंबई वगैरे ठिकाणीं हीं कौन्सलें चालू झालीं आहेत. त्यांत युरोपियन गृहस्थ व एतद्देशीय गृहस्थ असे सभासद आहेत.

हिंदुस्थानाच्या इतिहासांत ही एक ध्यानांत ठेवण्याजोगी मोठीच गोष्ट होय. कायदे करणारी मंडळी आजवर या देशांत झाली नव्हती असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. पूर्वींच्या काळांतील राजे फार करून कायदे करून त्यांच्या अनुरोधानें राज्यकारभार व प्रजापालन करीत नसत. ह्मणूनच त्यांतून बहुत राजे स्वेच्छाचारी, जुलमी, व दुष्ट असे झाले, व त्यांवरून त्यांच्या प्रजांस फार दुःखें व विपत्ति भोगावी लागत असे. त्यातून कोणी कोणी सुज्ञ, विचारशील, दयाळू, परोपकारी, व सदाचारी असेही झाले. आणि त्यांच्या हातून त्यांच्या प्रजांचें बहुत कल्याण झालें. कित्येक राजे मूढ किंवा निष्काळजी होते तरी त्यांच्याही प्रजांस सुखप्राप्ति झाली, कारण त्यांचे मंत्री किंवा प्रधान हे सुज्ञ, व दयाळू व सदाचरणी होते. तरी अशा राजांच्या दरबारांत देखील कायदे होऊन त्यांवरून कारभार चालत नसे. मग कायदे करणाऱ्या मंडळ्या कोठून असणार! कित्येक नृप राजनीती-प्रमाणें राज्य करीत असत, असें दिसतें. पण कोणत्या राजनीतीप्रमाणें? त्यांनीं स्वतः केलेल्या नीतीप्रमाणें नाहीं, तर मनु, विदुर आदिकरून पुरुषांनीं जीं मतें व बोध व नियम लिहून ठेविले होते त्यां प्रमाणें करीत असत. या ग्रंथांतील राजनीतीचे सर्व नियम चांगले होते किंवा वाईट याविषयीं एथें लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. आमचें ह्मणणें इतकेंच आहे कीं, एथील प्राचीन राजांच्या दरबारांत कायदे करणाऱ्या मंडळ्या नव्हत्या.

अलीकडील मराठे व मुसलमान राजे यांच्या हाताखालींही कायदे करणाऱ्या मंडळ्या नव्हत्या हें सांगणें नलगे. दिल्लीचा अकबर बादशहा यानें आपल्या दरबारीं पुष्कळ विद्वान् व गुणिजन जमा केले होते. पण ते राजकीय कार्यासाठीं नव्हते. त्याच्या पदरीं नऊ सुज्ञ पुरुष होते. त्यांस नवरत्नें अशी संज्ञा दिली होती. तरी त्यांच्या हातून तो कायदे करवीत नसे. नाजूक व अडचणीच्या प्रसंगीं त्यांची मसलत मात्र घेत असे. त्यानें व त्याचा पूर्वज तैमूर यानें कायद्या-प्रमाणें कांहीं ग्रंथ लिहून ठेविले. पण ते मंडळ्यांनीं केलेले नव्हते. तर त्यांनींच स्वतः केले. सातारकर राजाला आठ प्रधान होते. त्यांस अष्ट प्रधान ह्मणत असत.

" प्रधान, आमात्य, सचीव, मंत्री ॥ सुमंत, न्यायाधिश, न्यायशास्त्री ॥
"सेनापती, त्यांत बहू शहाणा ॥ अष्टप्रधानीं नृप मुख्य जाणा ॥१॥" (वा० स०)

हे अष्ट प्रधान कायदे करणारे नव्हते; असते तर त्यांचे कायदे लोकांत प्रसिद्ध असते. व इतिहासांत त्यांविषयीं सांगितलें असतें. पण असें कांहीं नाहीं. त्या आठ जणांस आठ निरनिराळया कामगाऱ्या नेमून दिल्या होत्या.

कायदे करणाऱ्या मंडळया नेमण्याची चाल युरोपांतील सुधारलेल्या लोकांची आहे. प्राचीन ग्रीस व रोम यांच्या राज्यांत कांहीं प्रकारें ही चाल होती पण विशेषें करून जर्मनी देशांत ही चाल इसवी सनाच्या पूर्वीं देखील होती. पुढें इंग्लिशांमध्यें ही चाल चालूं लागली. रयतेचे प्रतिनिधि राज सभेंत असून त्यांच्या संमतानें कायदे झाल्यानें लोकांस सुख होतें, कारण ते प्रतिनिधि लोकांच्या हितावर दृष्टि देऊन कायदे करितात. यास्तव इंग्लंडांतील लोकांनीं आपली स्वतंत्रता व सुख रक्षण्याकरितां सरकाराशीं मोठी टक्कर मारून राजसभेस आपले प्रतिनिधि स्वतः निवडून पाठविण्याचा हक्क मिळविला. नंतर कालें करून राजांसही दिसून आलें कीं, लोकांनीं निवडून पाठविलेल्या प्रतिनिधींच्या संमतानें झालेले कायदे व त्यांच्या संमतानें बसविलेले कर लोक संतोषानें मान्य करितात. यास्तव त्यांच्या साह्यानें राज्य कारभार चालविण्यांत रयतेचें हित आहे एवढेंच नव्हे. तर सरकारचाही फायदा आहे, असें त्यांच्या अनुभवास आलें. अमेरिकेंतील युनैतेद स्तेत्स देशांत तर मंडळीच्या योगानें राज्यकारभार सर्वोत्कृष्ट रीतीनें चालतो, आणि त्यावरून तेथील लोकांस फार सुख झालें. युरोप खंडांतील कित्येक राज्यामध्यें तर आतांशीं या रीतीची सुरवात होऊं लागली आहे. आणि कित्येक देशांतील लोकांस या सुखाची अजून चव देखील ठाऊक नाहीं. या प्रकारें ज्या हक्कासाठीं इतर ठिकाणच्या लोकांनीं सरकाराशीं वाद केले, व जीव देखील दिले, व जे हक्क आपणास मिळावे ह्मणून कित्येक देशांचे लोक लाळ घोटीत आहेत, व ज्यांचा लाभ इतके दिवस इंग्लिश सरकारच्या राज्यांत सुद्धां हिंदुस्थानच्या लोकांस झाला नव्हता; ते आतां एथील लोकांनीं कांहीं प्रयत्न केले नसतांही विलायतेंतील पार्लमेंट सभेनें मेहरबानगी करून या देशांतील लोकांस मिळावें असें ठरविलें, ही केवढी हिंदुस्थानाच्या कल्याणाची गोष्ट आहे.

प्रतिनिधींच्या संमतानें कायदे करणें व कर बसविणें हें सरकारच्या व रयतेच्या हिताचें असून तेणेंकरून उभय पक्षांमध्यें सौजन्य राहतें हें खरें पण ते

प्रतिनिधि रयतेनें निवडलेले असावे, व त्यांस उभय पक्षांच्या फायद्याचें पाहिजे तें मत देण्याची मोकळीक असावी. हें आवश्यक आहे. जर असें नसेल तर मग अशी मंडळी नसली तरी पुरवेल.

अणखी आह्मांस असें वाटतें कीं, प्रत्येक प्रकारच्या लोकांच्या तरफेनें एक-एक प्रतिनिधि कौन्सलांत असावा. ह्मणजे सरकारी कामदार नसणाऱ्या गोऱ्या लोकांच्या तरफेनें एक, हिंदूंच्या तरफेनें एक, मुसलमानांच्या तरफेनें एक, पारशांच्या तरफेनें एक, इस्राएल लोकांच्या तरफेनें एक, पोर्टुगीज् लोकांच्या तरफेनें एक, आणि एतद्देशीय खिस्ती लोकांच्या तरफेनें एक, असें असावे ह्मणजे फार चांगलें होईल.

१८६२ त इंग्लंड देशांतील सरकारांत असा ठराव झाला कीं, सदर अदालत आणि सुप्रीम कोर्टहीं एकत्र मिळवून एक मोठें न्यायदरबार स्थापावें आणि त्यास "हैकोर्ट" असें नांव ठेवावें. कलकत्ता, मद्रास व मुंबई ह्या तीन इलाख्यांत अशीं कोडतें स्थापिलीं आहेत. हें कलकत्त्यांत जुलै महिन्यांत सुरू झालें. या कोडतांत पंधरा पर्यंत न्यायाधीश नेमावे असा मुख्य सरकाराचा कायदा आहे, परंतु तेरा इंग्रज व एक एतद्देशीय गृहस्थ असे १४ आसामी नेमले. एथें ह्या कोडताची स्थापना ता. १४ आगस्ट १८६२ त झाली. त्यांत सात न्यायाधिशांची नेमणूक झाली आहे. यांत आमच्या लोकांपैकीं कोणाची नेमणूक झाली तर मोठाच भाग्योदय समजावा. कलकत्त्यांतील हैकोर्टांत जे न्यायाधीश नेमिले त्यांचें वेतन या प्रमाणें ठरविलें आहे. मुख्य न्यायाधिशास सालिना ७२,००० रु० आणि बाकीच्यांस प्रत्येकास सालिना ५०,००० रु०. मुख्य न्यायाधिशाची नेमणूक इंग्लंडाहून झाली असतां त्याच्या वाटखर्चास १०,००० रु० द्यावे. व धाकट्या न्यायाधिशास ८,००० रु० असा ठराव केला आहे.

मुंबईतील दाट वस्ती पाहून सहज एखाद्यास अशी कल्पना येईल कीं, एवढ्या ह्या लोकांस औषध पाण्याची कशी काय योजना केली असावी. कारण ज्या स्थानीं याची यथायोग्य व्यवस्था केलेली नाहीं तें स्थान रहायास योग्य नाहीं असें शहाण्या लोकांचें म्हणणें आहे. यावर संस्कृतांत एक श्लोक आहे. त्यांत एक सुज्ञ गृहस्थ आपल्या मित्रास याप्रमाणें उपदेश करितो; हे मित्रा ज्या शहरांत सावकार, वैद्य, विद्वान् ब्राह्मण व गोड्या पाण्याची नदी हीं नाहींत तेथें तूं राहूं नको.

प्रतिनिधि रयतेनें निवडलेले असावे, व त्यांस उभय पक्षांच्या फायद्याचें पाहिजे तें मत देण्याची मोकळीक असावी. हें आवश्यक आहे. जर असें नसेल तर मग अशी मंडळी नसली तरी पुरवेल.

अणखी आह्मांस असें वाटतें कीं, प्रत्येक प्रकारच्या लोकांच्या तरफेनें एक-एक प्रतिनिधि कौन्सलांत असावा. ह्मणजे सरकारी कामदार नसणाऱ्या गोऱ्या लोकांच्या तरफेनें एक, हिंदूंच्या तरफेनें एक, मुसलमानांच्या तरफेनें एक, पारशांच्या तरफेनें एक, इस्राएल लोकांच्या तरफेनें एक, पोर्टुगीज् लोकांच्या तरफेनें एक, आणि एतद्देशीय ख्रिस्ती लोकांच्या तरफेनें एक, असे असावे ह्मणजे फार चांगलें होईल.

१८६२ त इंग्लंड देशांतील सरकारांत असा ठराव झाला कीं, सदर अदालत आणि सुप्रीम कोर्टहीं एकत्र मिळवून एक मोठें न्यायदरबार स्थापावें आणि त्यास "हैकोर्ट" असें नांव ठेवावें. कलकत्ता, मद्रास व मुंबई ह्या तीन इलाख्यांत अशीं कोडतें स्थापिलीं आहेत. हें कलकत्त्यांत जुलै महिन्यांत सुरू झालें. या कोडतांत पंधरा पर्यंत न्यायाधीश नेमावे असा मुख्य सरकाराचा कायदा आहे, परंतु तेरा इंग्रज व एक एतद्देशीय गृहस्थ असे १४ आसामी नेमले. एथें ह्या कोडताची स्थापना ता. १४ आगस्ट १८६२ त झाली. त्यांत सात न्यायाधिशांची नेमणूक झाली आहे. यांत आमच्या लोकांपैकीं कोणाची नेमणूक झाली तर मोठाच भाग्योदय समजावा. कलकत्त्यांतील हैकोर्टांत जे न्यायाधीश नेमिले त्यांचें वेतन या प्रमाणें ठरविलें आहे. मुख्य न्यायाधिशास सालिना ७२,००० रु० आणि बाकीच्यांस प्रत्येकास सालिना ५०,००० रु०. मुख्य न्यायाधिशाची नेमणूक इंग्लंडाहून झाली असतां त्याच्या वाटखर्चास १०,००० रु० द्यावे. व धाकट्या न्यायाधिशास ८,००० रु० असा ठराव केला आहे.

मुंबईतील दाट वस्ती पाहून सहज एखाद्यास अशी कल्पना येईल कीं, एवढ्या ह्या लोकांस औषध पाण्याची कशी काय योजना केली असावी. कारण ज्या स्थानीं याची यथायोग्य व्यवस्था केलेली नाहीं तें स्थान रहायास योग्य नाहीं असें शहाण्या लोकांचें म्हणणें आहे. यावर संस्कृतांत एक श्लोक आहे, त्यांत एक सुज्ञ गृहस्थ आपल्या मित्रास याप्रमाणें उपदेश करितो; हे मित्रा ज्या शहरांत सावकार, वैद्य, विद्वान् ब्राह्मण व गोड्या पाण्याची नदी हीं नाहींत तेथें तूं राहूं नको.

॥ तत्र मित्र न वस्तव्यं यत्र नास्तिं चतुष्टयं ॥
॥ ऋणदाता च वैद्यश्च श्रोत्रियः सजला नदी ॥

मुंबई शहरांत ह्या चारही व्यक्ति उत्तमापासून कनिष्ठापर्यंत परिपूर्ण आहेत. दयाळू व उदार असे लाखोपति सावकार आहेत इतकेंच नाहीं, परंतु बगलेंत चोपड्या मारून लोकांच्या दारोदार घिरट्या घालणारे किरकोळ सावकार मारवाडी यांचीं दुकानें या टापूंत १५०० आहेत. हे लोक आठ चार आण्यांपासून दहा पंधरा हजार रुपये पर्यंत लोकांस कर्जी नाणें धिरतात. पैका धिरण्याचें या लोकांत मोठेंच धैर्य आहे. कोणी कितीही गरीब, तर्कटी व दिवाळखोर असला तरी त्यास कांहींना कांहींतरी द्रव्य ते धिरतात. मग एकाचे दहा किंवा पांचांचे पंचवीस घेवोत. कोठें असें पाहिलें आहे कीं, चार रुपये देऊन त्यांचे सवाईच्या हिशेबानें पांच करून त्याबद्दल निरनिराळया रकमेचीं चार कर्जखतें लिहून घ्यावीं. ह्यांत एकावर एक, दुसऱ्यावर दोन, तिसऱ्यावर तीन, व चवथ्यावर चार महिन्यांची मुदत असून असी अड असती. पांच दिवसांनीं ते ४ परत दिले तर पांच घ्यावे, एक महिन्यानें दिले असतां २५ घ्यावे, दोन महिन्यांनीं दिले असतां ५०, तीन महिन्यांनीं दिले असतां ७५, आणि चार महिन्यांनीं दिले असतां १०० घ्यावे. याप्रमाणें चार रुपये देऊन २५५ रुपयांचीं खतें लिहून घेतात, आणि असें कर्ज घेणारे लोकही त्यांस सांपडतात. एकादे समयीं चारही खतें हाताखालीं दाबून ठेवून तेवढ्या रुपयांच्या हा राक्षसरूपी सावकार मालकावर निरनिराळया फिर्यादी करितो. आणि त्यांजमध्यें कांहीं जीव असला तर ते वसूल करून घेतो.

मारवाडी लोक या शहरांत मारवाड देशाहून येतात. हे येतेवेळीं बहुधा आपल्या बरोबर द्रव्य किंवा मालमत्ता व दुसरें भांडवल घेऊन येत नाहींत. वाटखर्ची पुरते रुपया आठ आणे, एक पितळेची चरवी, एक भोंपळयाचा तुंबा, एक पांढरी कांबळ किंवा धाबळ, आणि हातांत एक काठी इतकें सामान ते घेऊन मुंबईंत येतात. ज्याला अगदींच कोणाचा आश्रय नसतो तो प्रथम एकाद्या दुकानावर सालिना चाळीस पन्नास रुपये मुशारा कबूल करून चाकरीस राहतो. आणि वर्ष दोन वर्षें चाकरी करून पन्नास साठ रुपये गांठीस झाले कीं कोठेंतरी गल्ली कुचींत दोन अडीच रुपयांचें भाड्याचें दुकान घेऊन टोपल्या मांडून बसतो. कित्येक प्रथम असें करितात,- रुपया आठ आण्यांचें कडदण किंवा गूळ, बतासे,

असा माल घेऊन सकाळच्या प्रहरीं शहरभर फिरून विकितात. आणि संध्याकाळचें दिव्यांत वात पडेतों पर्यंत खोबऱ्याचें किंवा गोडें तेल विकितात. कोणी कोणी सकाळच्या प्रहरीं जिरी मिरी मसाला आणि संध्याकाळचें तेल विकावयास लागतात. याप्रमाणे फेरीचें काम करून कांदे, लसूण, हळद जो मिळेल तो माल विकून शेंदीडशें रुपये जमले ह्मणजे पांच दहा रुपये सवाईच्या, दिढीच्या, व दुपटीच्या व्याजास देऊं लागतात. रुपयें देण्याघेण्याचें काम करूं लागलें म्हणजे हळूहळू त्याची लोकांत ओळख होती. मग त्याला लोक ठाकराजी, जेठाजी, मोतीजी आवो बेसो अशीं बहुमानाचीं विशेषणें देऊं लागतात. असें झालें ह्मणजे तो पांच दहा टोपल्या, त्यांत दोन दोन शेर तांदूळ, डाळ, उडीद, गहूं, मूग, मसूर इत्यादि घालून पुढें मांडितो. व दोन चार बरण्यांत तूप, तेल, गूळ, साखर इत्यादि घालून दुकान मांडितो. आणि जवळ एक लहान पेटी मांडून तिचे खालीं एक खादीचा तुकडा पसरून त्यावर दोन अडीच रुपयांचा खुर्दा मांडितो. ह्यांत तो दुकानदारीचें आणि सराफाचें अशीं दोनही कामें चालवितो. मग हळूहळू जसजसें त्याचें भांडवल वाढत जातें तसतसा तो दुकानांत माल भरतो. मग एकादुसरा भागीदार घेतो, व्याजू पैका देण्याचें काम सुरू करितो, मग काय विचारता. एक दोन वर्षांच्या अवधींत तो पांच सहा हजारांचें भांडवल गांठीस करितो. याप्रमाणें त्याचें काम पांच दहा-वर्षें सुरळीत रीतीनें चाललें ह्मणजे तो सहज वीस पंचवीस हजारांचा सावकार बनतो. मग काय विचारता! ख्याली खुशाली व उत्पन्नभक्षी लोक त्याची खुशामत करूं लागतात. दिढी दुपटीच्या व्याजानें पैका घेऊन जातात. पांच रुपयांचा दागिना असला तर तो दोन रुपयांस गहाण ठेवितात. वस्त्र चिरगूट असलें तर दहा रुपयांचा माल असला तर त्यावर तीन रुपये देऊनही रुपयास आणा दोन आणे देखील व्याज घेतात. व मुदतीचे आंत गहाण ठेविलेला माल मालकानें नेला नसला तर तो लागलाच फरोक्त करून त्याचे टक्के करितात. मारवाडी लोक फारच काटकसरीनें राहतात. त्यांच्या खाण्यापिण्याचे व वस्त्र प्रावरणाचे फारच बातबेत असतात. एक दोन खादीचे पंचे असले ह्मणजे ते वर्ष दीडवर्ष नेसायास चालतात. दहावीस हात घांटी पागोट्याचा तुकडा असला ह्मणजे डोकींत घालायाची पांच दहा वर्षांची बेगमी झाली. त्याला दहा वीस वर्षांनीं आठ चार आण्याचा रंग दिला तर मोठें भाग्य. आंगांत घालायास एकादी जाडी भरडी बंडी असली तर ती दोन अडीच वर्षें चालती. तीस एखादे

समयीं पांच दहा ठिगळ्या असतात. व तिजवर तेलाचें, तुपाचें व धुळीचें पूट असतें. यांला धोब्याची फारच थोडी गरज पडती. वर्षांतून एक-दोन वेळीं लागली तर लागती. खाण्याचा प्रकार असाच असतो. पांच सहा असामी जेवायाचे असले तर दिडकी दुगाणीची भाजी पुरती. इतके हे संसार दक्ष असतात. स्वच्छ व निर्मळ वस्त्र घातलेला मारवाडी दुकानदार कोठें विरळा. मारवाडी लोकांत दिवाळखोर व खादाड असे फारच थोडे असतात. हे लोक अनेक प्रकारें लोकांस व्यापारामध्यें ठकवितात. परंतु ह्यांमध्यें चोर व लुचे फार नसतात. हे लोक लिहिण्यांत फार कच्चे. त्यांस बाराखड्या आल्या ह्मणजे ते व्यापार करायास लागतात. मग तितक्या वरूनच जमाखर्च ठेवायास लागतात. परंतु त्या कामांत ते हुशार असतात. मारवाडी लोक दुसऱ्यांस ठकवितात खरे, परंतु आपसांत एकमेकांसीं मोठ्या प्रमाणिकपणानें व साखीनें वागतात. एकादा मारवाडी दुकानावर चाकरीस राहिला तर तो मोठ्या इमानें इतबारें चाकरी करील. मारवाडी लोक खाण्या-पिण्यांत, वस्त्र पांघुरण्यांत व दुसऱ्या खर्चांत मोठी काट कसर करितात इतकेंच नाहीं परंतु जें पाणी फुकट मिळतें तें देखील वापरावें तितकें वापरीत नाहींत. आठचार दिवसांनीं आंघोळ करितील ती ही बेतवार पाण्यानें. हात धुवायाचे असलें तर एक लहानशी लोटी घेतील आणि जेवल्या-नंतर एकादुसरा चूळ भरतील. दोन चार चिरगुटें असलीं ह्मणजे तीं दोनचार पोहरे पाण्यानें धुऊन तयार होतात. सारांश त्या लोकांला पाण्याचाही खर्च थोडाच असतो. परंतु इतकेंच खरें आहे कीं, मारवाड्यांच्या जिवावर मुंबईतील कित्येक लोकांच्या फिशाऱ्या चालतात.

मुंबईंत लोक गेले ह्मणजे मिजाज करायास लागतात व उधळे होतात. असा पुष्कळ लोकांचा समज आहे, परंतु मुंबई सोडून विलायतेस गेले तरी मारवाडी लोकांचा कृपणपणा सुटायाचा नाहीं. लोकांचे गाडीघोडे, शाली दुपेटे व वस्त्र अलंकार हीं पाहून त्यांचा उपभोग आपण घ्यावा असी त्यांच्या मनांत कल्पांतीं ही इच्छा उत्पन्न व्हावयाची नाहीं. आतां जे मोठमोठे सावकार आहेत ते गाडीघोडे ठेवितात खरे, परंतु त्यांचा झाला तरी वस्त्रप्रावरणाकडे खर्च थोडाच.

हे लोक मोठे उद्योगी. पहांटेपासून मध्यरात्रपर्यंत एक सारिखे अनेक कामांत असतात. प्रथम सूर्योदय व्हायाच्या पूर्वीं बगलेंत चोपड्या मारून उग्राणी करायास कर्जदारांच्या दारोदार फिरत असतात. कोणी कोणावर समान काढिलेलें

असतें, कोणावर केशा असतो, कोणाच्या मालमत्तेवर जप्ती केलेली असती. असे हे सकाळचे प्रहरीं सगळया मुंबईभर अनेक उद्योगांच्या नात्यानें फिरत असतात. कर्जबाजारी लोक ह्यांस व्याघ्रासारिखे भीत असतात.

इंग्रज डाक्तर इंग्लंडाहून शिकून आलेले व एथें ग्रांट वैद्यशाळेंत शिकून सनदा घेऊन बाहेर पडलेले व एतद्देशीय देशोदेशांतून संस्कृत वैद्यशास्त्रावरून शिकलेले असे वैद्य पुष्कळ आहेत. याशिवाय सोनामुखीच्या पाण्यावर व किराइ-ताच्या काढ्यावर पोट भरणारे वैद्य गल्लोगल्लीस आहेत. काना डोळ्याचे वैद्य तर औषधांची कावड घेऊन दारोदार रससिंदूर वैद्य, लोहभस्म वैद्य अशा हाका मारीत रस्तोरस्तीं जातात. यांचा औषध देण्याचा प्रकार असा आहे. एकाला पोटशूळाचा उपद्रव होता. त्यानें ह्या एका वैद्याकडे औषध मागितलें असतां त्यानें त्याच्या पाठीस दोन तुंबड्या लावून रक्त काढिलें. असे यांचे विलक्षण उपाय असतात. हे वैद्य आणा अर्धा आणा मिळाला ह्मणजे संतुष्ट होतात. परंतु एकदां औषध दिलें असलें तर त्या रोग्याची भेट फिरून घेऊं नये, अशी यांची वहिवाट आहे.

मुंबई शहरांत वास्तविक विद्वान् ह्मटले ह्मणजे इंग्रज डाक्तर व एतद्देशीय शिकलेले असे शेंदीडशें सांपडतील. ग्रांट वैद्यशाळेंत सन १८५० पासून सन १८६१ पर्यंत सनदा घेऊन निघालेले एतद्देशीय डाक्तर ५६ असामी आहेत. त्यांतील कित्येक बाहेरगांवीं सरकारी दवाखान्यांवर दरमहा १०० रुपये घेऊन हें काम चालवितात. व कित्येकांस मुंबईतील दवाखान्यांत असाम्या आहेत. कित्येक आपण दवाखाने घालून औषधें देतात. ह्यां शिवाय एतद्देशीय वनस्पती व रसायणें देणारे दह्मवीस सांपडतील. कोठें कोठें गांधीलोक देखील स्वतः वैद्याचें काम करितात. गांधी लोकांकडे कोणती औषधी मागीतली असतां नाहीं असें ह्मणत नाहींत. मग ती घेतल्यानें कल्याण होवो किंवा अकल्याण होवो. त्याची ते कांहीं धास्ती बाळगीत नाहींत. कांहींना कांहीं तरी पुडींत बांधून देतील. याची प्रचीत पाहण्यासाठीं एक दिवस एका गृहस्थानें एका मुलाकडे एक दिडकी दिली आणि गांधीच्या दुकानांतून अनुष्टुप्छंदः घेऊन ये असें सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें जाऊन अनुष्टुप्छंदः मागितली असतां गांधीनें दुकानांतून एक मुळी काढून पानांत बांधून त्या मुलाच्या स्वाधीन केली. या प्रकारची कित्येक गांधीची औषधी

देण्याची वहिवाट असते जर त्यांजकडे मेघाची गर्जना मागितली तरी ते दिडकी दुगाणी घेऊन भलतें कांहीं काढून देतील.

विद्वान् ब्राह्मण अथवा विद्वान् गृहस्थ—यांची संख्या तर या शहरांत उत्तरोत्तर वाढत जाते. काशीपासून रामेश्वराचे शास्त्री व पंडित हरहमेश एथें येत असतात. तसेंच मुसलमान लोकांचे काजी, मुल्ला, हकीम, व यहुदी लोकांचे रावी, पारशी लोकांचे दस्तुर असे विद्वान् पुष्कळ आहेत. युरोप खंडांतील प्रख्यात प्रोफेसर व धर्माध्यक्ष एथें बरेंच आहेत. यामुळें कोणत्याही गोष्टीचें स्पष्टीकरण करून घेण्यास कठीण पडत नाहीं. ह्या शिवाय शतश्लोकेन पंडितः असे पायलीचे पंचवीस सांपडतील. लघुहितोपदेश वाचतां आला ह्मणजे तो पंडिताच्या योग्यतेस येतो. रूपावळीचीं चार पृष्ठें तोंडपाठ आलीं ह्मणजे शास्त्री बनतो. "लंबोदरश्चविकटो" एवढें आलें ह्मणजे वैदिक होतो. आणि पांडव व प्रताप वाचतां आला ह्मणजे पुराणीक झाला. असे विद्वान् घरोघर सांपडतील. कांहीं वर्षांमागें एथें सप्ताह झाला होता, तेथें किती एक या प्रकारचे शास्त्री, वैदिक व पुराणीक होते. कोणी विदुरनीति, कोणी रामदासी श्लोक व कोणी इसापनीति घेऊन चौरंग मांडून गोमुखींत हात घालून ध्यानस्थ बसले होते. सप्ताहाचा प्रकार असा असतो. मोठा मंडप घालून त्यांत सात दिवस पर्यंत अष्टोत्तरशें पुराणिकांस बसवितात. आणि त्यांजकरवीं भागवताचें पारायण करवितात. ह्या कृत्यास किमान पक्ष पांच दहा हजार रुपये खर्च होतो. ह्या तीस चाळीस वर्षांत एथें असे सप्ताह सात आठ झाले. पंचाक्षरी, ज्योतिषी, सामुद्रिक लक्षणें सांगणारे तर दारोदार फिरतात. कांहीं वर्षांमागें एक अष्टावधानी बाबा आला होता तो एका खेपेस आठ ठिकाणीं लक्ष पोंहंचवी. हातांत पुस्तक घेऊन वाचून त्याचा अर्थ सांगे, बुद्धिबळाचा डाव चालवी, डाव्या हातानें फांसे टाकून सोंगट्यांचा डाव खेळे, पाठीवर हरबरे मारायास लावून ते मोजी, अशीं कामें एका खेपेंत करी. सन १८६२ सालीं मध्वमतानुयायी वैष्णवयांचे स्वामी ( गुरु ) एथें आले होते. हे मोठे विद्वान् होते अशी यांची आख्या होती. त्यांच्या शिष्यवर्गास तप्तमुद्रा द्याव्या अशी यांची दीक्षा आहे. यांचें नांव श्रीमत् पूर्ण प्राज्ञतीर्थ असून काशीक्षेत्रस्थ विद्वज्जन ब्रह्मवृंदाकडून यांस मानपत्र मिळालें होतें.

इंग्रज लोकांच्या देवालयांत उपदेश करणारे पाद्री लोक मुंबई खात्यांत सुमारें पन्नास साठ आहेत, आणि ह्या प्रीत्यर्थ सरकारास प्रत्येक इलाख्यांत सालिना

दोन तीन लक्ष रुपये खर्च होतो. बिशप ह्मणून सर्व मुंबई खात्यांतील देवालयावर मुख्य पाद्री आहे त्यास सालिना २५,६०० रुपये मिळतात. ह्या शिवाय बाहेर जिल्ह्यांत फिरायास गेलें असतां खर्चाबद्दल १,००० रुपयांची नेमणूक करून दिली आहे. त्याच्या हाताखालच्या उपदेशकांस कोणास १,५००, कोणास हजार, कोणास ७००, कोणास ९००, कोणास, ५००, असा दरमहा आहे. बिशपाची योग्यता मुख्य न्यायाधिशाबरोबर आहे.

बाळगंगाधर शास्त्री जांभेकर हे अल्पवयांत ऐन उमेदीमध्यें मरण पावले. ते संस्कृत, मराठी व इंग्रजी भाषेंत निपुण होते. व ह्याशिवाय त्यांस उर्दू, कानडी, गुजराथी, या भाषा येत होत्या. ह्या पश्चिम भरत खंडांत अर्वाचीन विद्वानांत हा एक मुकुटमणीच होता. सदाशिव काशिनाथ छत्रे एल्फिन्स्टन विद्यालयांतील खात्यांतले मुक्तसर होते. त्यांचे बाळगंगाधर शास्त्री हें गुरुबंधु होते. त्यांनीं यांची तीव्रबुद्धि आणि चापल्य पाहून एथें आणून त्यांस आपल्या घरीं ठेवून त्यांज-करवीं इंग्रजी विद्याभ्यास करविला. ह्या पुरुषाची गोष्ट अशी सांगतात कीं तो एकपाठी असून त्याची धारणाशक्ति अपार होती:— नेटिव लोकांत इंग्रजी विद्या-लयांत प्रोफेसराची योग्यता प्रथम यांसच मिळाली. ह्यांच्या अकालीन मरणामुळें मुंबईतील लोकांस फार दुःख झालें. विद्या आणि विनय हे दोनही गुण या गृह-स्थाच्या आंगीं सारखेच वसत होते. ह्याचा थोडासा इतिहास ज्ञानोदयांत छापिला होता त्याचा सारांश खालीं उतरून घेतला आहे.

"मयत बाळगंगाधर शास्त्री जांभेकर ज्याविषयीं लोक प्रस्तुत शोकाविष्ट आहेत. तो दक्षिण कोकण प्रांतांत राजापुराजवळ पोंगुरलें ह्मणून एक गांव आहे तेथें सन १८१० मध्यें जन्मला.

हा सन १८२९ मध्यें सोसायटीच्या शाळेंत ज्याला आतां एल्फिन्स्तन इन्स्टिट्यूशन ह्मणतात त्यांमध्यें शिक्षक झाला. आणि तो तेव्हांपासून त्या शाळेचें काम चालविण्यास वजनदार होता. त्यानें मुलांच्या विद्याभ्यासाकरितां कित्येक पुस्तकें तयार केलीं. कांहीं दिवसपर्यंत योग्य रीतीनें दिग्दर्शन व दर्पण नामें दोन पत्रें काढिलीं होतीं. परंतु त्या पत्रांची योग्यता त्याच्या लोकांस न समजून त्यांस आश्रय दिल्हा नाहीं. परंतु त्या पत्राचें द्वारें स्पष्ट समजण्यांत आलें कीं, तो इतर लोकां सारिखा अंधारांत नव्हता. अलीकडे तो मानसविद्येचें पुस्तक आबरक्रांबीच्या पुस्तका प्रमाणें कांहींसें करीत होता. आणि एल्फिन्स्तन साहेबाचें

पुस्तकाधारें हिंदुस्थानची बखर करीत होता. आणि मुंबई जिओग्राफिकल् सोसायटी व एशियाटिक् सोसायटी यांमध्यें कांहीं रचना करून देऊन साह्यता करीत असे, तो सन १८४६ त मे महिन्याच्या १७ वे तारिखेस तापाच्या दुखण्यानें मरण पावला.

बाळगंगाधर शास्त्री मोठा विद्वान् होता आणि त्यास साहेब लोक व नेटीव लोकही मानीत असत. महाराष्ट्रांतील सर्व नेटीव लोकांपेक्षां तो शिकलेला होता, व आपल्या लोकांमध्यें विद्या वाढवावी असी त्याची इच्छा होती. असें आपल्या चांगल्या वर्त्तणुकीच्या योगानें दाखविलें. प्रोफेसरचें काम चांगलें चालविल्यानें कित्येक विद्यार्थी बरे सुधारले; त्यांतील कित्येकांनीं विद्येची मोठी आवड धरून त्यासारिखेच विद्या वाढविण्या विषयीं उत्कंठित व्हावे अशी आमची इच्छा आहे."

इंग्रज सरकारानें रयतेच्या सुखास जसीं इतर साधनें करून ठेवलीं आहेत, तसींच रोगी व व्याधिग्रस्त लोकांसाठींही करून ठेविलीं आहेत. आणि हा क्रम त्यांनीं थोडा बहुत सन १६७६ पासून चालविला होता. इंग्रज लोकांसाठीं व एतद्देशीय लोकांसाठीं निरनिराळे दवाखाने घातले आहेत. त्यांत उत्तम प्रकारच्या विद्वान् डाक्तर लोकांच्या नेमणुका केल्या आहेत. किल्ल्यांत सरजमशेटजीच्या घराखालीं युरोपियन जनरल हास्पिटल या नांवाचा इंग्रज लोकांसाठीं मोठा दवाखाना पुष्कळ वर्षांपासून सरकारानें बांधला होता. हा सन १८६१ सालीं तीन लक्ष रुपयांस रुस्तमजी जमशेटजी जिजीभाई यांस विकला. आणि या लोकांसाठीं दुसऱ्या ठिकाणीं इस्पिटल तयार होणार. याशिवाय पन्नाससाठ सावकारी औषधें विकणारांचीं दुकानें आहेत. भायखळ्यावर मयत सर जमशेटजी जिजीभाई यांच्या नांवाचें एक मोठें इस्पिटल आहे. यांत अनाथ रोगी लोकांस राहायास जागा केली आहे व तेथें अन्न, पाणी, वस्त्र, प्रावरण, औषध उपाय हें सर्व मिळतें. यांत एक दोन डाक्तर लोकांची नेमणूक केलेली असती. वैद्यशाळेंत जे नवीन विद्यार्थी असतात त्यांजकडून रोगी लोकांस औषधें देववितात. कित्येक रोग्यांच्या यांमध्यें वाटण्या करून दिलेल्या आहेत. हा दवाखाना १८४३ त उपस्थित झाला. सर जमशेटजी जिजीभाई यांणीं आपले निसबत १,७०,००० रुपये हा दवाखाना बांधण्यास दिले व ३०,००० रुपये सरकारानें खर्चिले, यास सर्व दोन लक्ष रुपये खर्च झाला. या खात्याचा सर्व खर्च ३३,००० रुपये

होतो. त्या पैकीं सर जमशेटजी यांनीं सरकारांत त्या प्रीत्यर्थ ठेविलेल्या नाण्यापासून व्याज ४,००० रुपये येतात, बाकीचा खर्च सरकार चालवितें. जे रोगी लोक केवळ अनाथ असून आपला निर्वाह चालवायास असमर्थ आहेत तेच एथें जाऊन औषध पाणी घेतात असें नाहीं, परंतु मध्यम प्रतीचे लोक देखील या दवाखान्यांत जातात. या ठिकाणीं मोठें विद्वान् वैद्य लोक असल्यामुळें एकादे वेळीं महाव्याधी सारिख्या रोगाची देखील चिकित्सा होती.

सन १८६१ त ह्या दवाखान्यांत ३,८६७ पुरुष व १,०६८ स्त्रिया इतके रोगी औषधोपचार करण्यासाठीं येऊन राहिले, व मागील वर्षांपैकीं २१७ होते. ह्यांपैकीं ६१४ पुरुष आणि २०३ स्त्रिया मरण पावल्या. आणि ४,१३५ रोगी बरे होऊन आपआपल्या रोजगारास गेले. ह्या वर्षीं एकंदर ५,१५२ रोगी या दवाखान्यांत होते, व त्यां प्रीत्यर्थ सरकारास सन १८६०–६१ ह्मणजे सुमारें दीड वर्षांत ३६,३६५ रुपये खर्च झाला. ह्या शिवाय प्रति दिवशीं स्त्रिया, पुरुष, व मुलें मिळून सुमारें २०० रोगी ह्या दवाखान्यांतून औषधें घेऊन घरीं जातात.

ग्रांटवैद्य पाठशाळेच्या अगदीं लगत उत्तरेकडे सूतिकागृह आहे. तेथें ज्या गरीबगुरीब किंवा कोणत्याही गरोदर स्त्रिया बाळंत व्हावयास जातील त्यांचा सर्व प्रकारें बंदोबस्त होतो. त्यांस कांहीं कमी पडत नाहीं. हा कारखाना बांधाया-करितां कित्येक परोपकारी लोकांनीं २१,३८५ रुपये दिल्हे. त्यांतून सर जमशेटजी जीजीभाई ह्यांनीं पंधरा हजार रुपये दिल्हे, व त्याशिवाय जागा दिल्ही. ह्मणून हें घर त्यांच्या नांवानें स्थापित झालें आहे. आणि हें सदोदीत चालावें ह्मणून सरकारच्या हाताखालीं ठेविलें आहे. सदहू रुपयांतून बारा हजार शिलक आहेत, ते सरकारच्या हातांत ठेवून त्यांचें व्याज येईल तें दाई वगैरेकडे खर्चिलें जातें.

या देशांत असी चाल आहे कीं, गरोदर स्त्री प्रसूत होण्याचे वेळेस सुइ-णीस बोलावून तिच्या हातून बाळंतपण करवितात; परंतु त्या सुइणीस कांहीं विद्या नाहीं. त्या अज्ञानी यामुळें कधींकधीं बाळंतिणी फार इजा पावतात. त्या जरी वांचल्यातरी कधींकधीं त्यांस शक्ति नाहीं असें होतें व त्यांची प्रकृति कांहीं दिवसपर्यंत बिघडलेलीच राहती. तर हल्लीं यासाठीं हें बाळंतघर तयार केलेलें आहे. एथें बाळंत होण्यापासून औषधें वगैरे पोटापाण्यासुद्धां सर्व यथास्थित बंदोबस्त होईल. आणि गरिबांस त्याबद्दल कांहीं खर्च होणार नाहीं; ह्मणून त्यांनीं

तेथें जावें हें बरें आहे. हें सुंदर परोपकारी काम डाक्तर मोरहेड साहेब व सर जमशेटजी जिजीभाई यांच्या द्वारें झालें आहे ह्मणून यांचे सर्वांनीं उपकार मानावे हें योग्य आहे. ह्यास सर जमशेटजी जिजीभाई यांच्या पत्नीनें ३०,००० रुपये दिले असें ऐकण्यांत आहे.

एथें दवाखान्या समोर वैद्यशाळा आहे तींत वैद्यशास्त्र शिकवितात. त्या शाळेंत तयार होऊन प्रतिवर्षीं पांच दहा डाक्तर सनदा घेऊन बाहेर पडतात. या प्रीत्यर्थ प्रतिवर्षीं हजारो रुपये सरकारास खर्च होतो. हीस ग्रांट मेडिकल् कालेज असें ह्मणतात. ही सर राबर्ट ग्रांट साहेबांच्या स्मरणार्थ बांधिली आहे. ही बांधायास ९०,००० रुपये लागले. ही सन १८४५ त चालू झाली.

ह्या शाळे समोर सन १८६२ त सर जमशेटजी जिजीभाई यांचा पंचरस धातूचा मोठा पुतळा त्यांच्या चिरंजिवानें व त्यांची पत्नी रतनबाई इणें स्थापिला आहे. हा इंग्लंड देशांत तयार केला होता.

पुढें भायखळयाच्या बाजूस महालक्ष्मीच्या रस्त्यावर एक धर्मशाळा आहे. ही बांधण्यास सर जमशेटजी जिजीभाई यांणीं ५०,००० रुपये दिले व सरकारानें २५,००० खर्चिले आणि ही धर्मशाळा बांधिली. हिचा खर्च चालविण्याकरितां या परोपकारी कृत्यास सर जमशेटजी जिजीभाई यांणीं दरमहा ३०० रुपयांची नेमणूक करून ठेविली आहे. सन १८४७ त ही स्थापिली. या धर्मशाळेंत लंगडे, लुले, पांगळे, आंधळे, ह्मातारे व अशक्त अशा अनाथ लोकांस अन्नवस्त्र व राहाण्यास जागा पुरवितात. व जे कोणी एथें राहायास इच्छीत नाहींत त्यांस तीनपासून दहा रुपये पर्यंत दरमहा देतात. तो तसाच अनाथ असला तरच त्यांस असा दरमहा करून देतात. ह्या धर्मशाळेविषयीं हा पुढील वृत्तांत ज्ञानोदयांतून उतरून घेतला आहे.

भायखळयावर कामाठपुरानजीक सर जमशेटजी जिजीभाई यानें ८०,००० रुपये लावून गरीबगुरीबांला राहण्याकरितां सुंदर धर्मशाळा बांधिल्या आणि तेथील काम ठीक चालावें ह्मणून सरकारद्वारें डिस्ट्रिक्ट बेनिवोलेंट सोसायटीच्या स्वाधीन केल्या; व ५०,००० रुपये सरकारांत ठेवून त्यांचें ३०० रुपये व्याज दरमहा पोंचत जावें असें ठरविलें होतें. हल्लीं त्याविषयीं टैम्स पत्रांत असें लिहिलें आहे कीं, सरचार्लस फार्ब्स यानें या धर्मशाळेकरितां ३०,००० रुपये पाठविले आणि लेडी जमशेटजी ह्मणजे जमशेटजीची स्त्री २०,००० रुपये

देणार आहे. असे अणखी ५०,००० सरकारांत ठेवून त्यांचें अणखी ३०० रुपये व्याज त्याच खर्चाकडे देणार. तर असलें औदार्य लिहून जाहीर करणें आह्मास फार बरें वाटतें. रस्त्यावर विचार न करितां पैसा उडवीत जाणें यापेक्षां हा धर्म फार व्यवस्थित आहे. आणि अशावरून वास्तविक जे गरीब त्यांचें कल्याण आहे. हल्लीं एथें लंगडे, पांगळे, आंधळे, फार आहेत, आणि त्यांचें रक्षण व्हावें ह्मणून दयाळू मातबर लोकांनीं त्या धर्मशाळेकडे पैका पाठवीत जाणें हें त्यांस फार उचित आहे.

ह्या धर्मशाळेचे वार्षिक रपोट आमच्या पाहाण्यांत आले आहेत. त्यां वरून समजण्यांत असें आलें कीं, हल्लीं त्या धर्मशाळेमध्यें एकंदर असामी ३२४ आहेत. ते असे कीं, आंधळे ६१, कोडी, रक्तपिती ८५, लंगडे, पांगळे, ह्मातारे व दुखणेकरी मिळून ११९ आणि मुली ५९ त्यां पैकीं ज्यास आई बाप नाहींत अशा १४. त्या शाळेचा जमाखर्च पाहिला असतां असा आहे कीं, जमा रुपये १७,१४२ आणि खर्च एकंदर ११,०३० ह्मणजे जमा रुपये ६,११२ जास्ती आहेत. त्यां पैकीं शेटजी यांजकडून ३,६०० रुपये शाळेच्या खर्चास पोहंचतात. असें असतां हल्लीं एथें मुंबईत भिकारी लोक पहिल्यापेक्षां अधिक होऊन रस्त्यामध्यें जाणाऱ्या येणाऱ्या पाशीं व घरोघरीं भीक मागत फिरतात. याचें कारण असें आहे कीं, भिकारी लोकांस लोक रस्त्यांत पैसे देतात, सबब ते दिवसें दिवस वाढत चाललेले आहेत. तर या विषयीं सर्व सुज्ञ लोकांनीं विचार करून शाळेशिवाय बाहेर कोणाला कांहीं पैसा देऊं नये ह्मणजे त्यांचें रस्त्यांत इकडे तिकडे फिरणें बंद होऊन कोणाला इजा होणार नाहीं.

ह्या शहरांत पूर्वीं देवीच्या उपद्रवानें मुलें फार दगावत. हें पाहून सन १८१६-१७ च्या सुमारास कंपनी सरकारानें देवी काढण्याचें एथें हपिस घातलें. तें प्रथम काळबादेवीच्या अलीकडे होतें. जरी देवीच्या योगानें मनुष्यांची नासाडी होत असे, तरी मुलांचे जीव वांचवण्याचा हा इंग्रज लोकांचा नवा उपाय आमच्या लोकांस फारसा आवडला नाहीं. टोंचून देवी काढल्यानें देवीस राग येईल या भीतीनें कित्येक देवभोळे लोक मुलांस देवी काढण्याच्या भरीस पडत नसत. देवी खात्यांतील शिपाई दृष्टीस पडला ह्मणजे कित्येक आपलीं मुलें दडवून ठेवीत. कित्येक त्यांस घेऊन दुसऱ्या ठिकाणीं जात. तथापि सरकारानें लोकांच्या कल्याणा-

कडे लक्ष देऊन मोठ्या सहनशीलतेनें हा क्रम चालविला. कधीं कधीं गरीब मुलांच्या आईस आठ चार आणे बक्षीसही देत.

प्रथम या खात्यांत एक इंग्रज डाक्तर, एक जोशी ( मुंबईतील वैद्य ), एक दोन कारकून आणि आठ शिपाई असे होते. आणि दर सोमवारीं देवी काढीत. ह्या वेळीं श्रीमंत लोक तर बिलकूल आपल्या मुलांस या प्रकारचा देवीचा तोडका करवीत नसत. शिपाई लोक घरोघर फिरून गरीब गुरिबांचीं मुलें जबरीनें नेऊन तोडका करीत. या वेळीं दर सोमवारास पंचवीस तीस मुलें सांपडणें देखील मुष्कील पडे. शूद्र लोकांच्या बायका देवी खात्यांतील शिपाई मुलास नेयास आलेला पाहून ढळढळां रडत, आणि मुलास घेऊन त्याच्या हातून निसटून जाण्यास हर-प्रयत्न करीत. हें कृत्य वास्तविक आपल्या कल्याणाचें आहे, अशी अलीकडे लोकांची थोडीशी समजूत पडत चालली आहे. आणि आतां बहुतेक लोक मुलांस खुशीनें देवी काढायास नेतात. हल्लीं या खात्यावर डाक्तर अनंता चंद्रोबा आहेत, आणि ह्यांस तिघे मदतनीस असून या खात्यांत सात शिपाई आहेत. ते प्रत्येक दिवशीं निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन देवी काढितात. श्रीमान् लोक आपआपल्या घरींच काढवितात. ह्या देवी काढण्याच्या युक्तीपासून हजारो लोकांचे जीव वांचले. व शरीरास अनेक खोडी राहत, त्यांपासून बचाव झाला. देवीच्या योगानें कोणाचे डोळे जात, कोणाचे पाय धरत, कोणाचे हात आंखडत, कोणाची वाचा बंद होई, कोणाचा चेहरा विरूप होई, या सर्व अपेष्टेपासून लोकांचें रक्षण झालें. सन १८६१ त फक्त या बेटांतच ८,८६१ मनुष्यांस देवी काढल्या. मुंबई इलाखा व सिंध देश मिळून सन १८६० सालीं २,७४,४३३ असामींस सरकार मारफतीनें देवी काढल्या. या प्रकरणीं इंग्रज सरकारची स्तुति केली तेवढी थोडीच.

हिंदुस्थानांतील देवी काढण्याची कृति मोठी राक्षसी होती. असें असतां आमचे लोक तीस भीत नव्हते, हें मोठें नवल वाटतें. आमच्या लोकांचा देवी काढण्याचा प्रकार असा होता. मनगटापासून एका वितीच्या अंतरा-वर शस्त्रानें किंवा वस्तऱ्यानें फांसण्या घालीत, आणि त्यावर देवी आलेल्या मनुष्याच्या आंगावरील खपल्या झडलेल्या असतील त्या जमवून त्यांची बुकणी करून ठेवीत. आणि त्यावर घट्ट पट्टा बांधीत. तशाच त्या पोह्यांत गूळ घालून खायास देत, आणि वातूळ पदार्थ खायास घालीत. मग त्या

मनुष्यास एक दोन दिवस ज्वर येऊन सर्व आंगास देवी येत. व कित्येक जांयां ही होत. हे देवी काढणारे देवीचे भक्त असें मानून त्यांस कांहीं बक्षीसही देत. व त्यांवर किंवा त्यांच्या बायकांवर देवीचा अवसर आणीत आणि लोक त्याला देवाप्रमाणें भजत. ह्या एका देवी काढण्यापासून हें एक मोठेंच खूळ मोडत चाललें. यांस देवीचे गवळे ह्मणतात. हे आंगांत देवी आल्या ह्मणजे वेडे विद्रे चाळे करीत. हा किती भयंकर व राक्षसी उपाय ! आणि हल्लींचा किती सामोपचाराचा आहे. इंग्रजी रिवाजाचा तोडका पंधरा दिवसांच्या तान्ह्या लेंकरास देखील केला तर त्यापासून किमपि ही इजा व्हावयाची नाहीं.

श्रीमंत जगन्नाथजी शंकरशेट यांणीं गिरगांवास एक धर्मार्थ दवाखाना घातला आहे. तेथें रोगाची चिकित्सा करून सकाळ संध्याकाळ गरीब गुरिबांस फुकट औषधें देतात. ह्या दवाखान्यांत दरमहा सुमारें ३०० रोगी औषधें घेऊन जातात. ह्या दवाखान्यावर एक ग्रांट वैद्यशाळेंत शिकून तयार झालेला डाक्तर औषधें देतो. आणि श्रीमान् लोकांनीं धर्मार्थ घातलेले दवाखाने मुंबईत चार पांच आहेत व सावकारी दवाखाने जागोजागीं आहेत.

पाणी ह्या शहरांत जिकडे तिकडे विपुळ आहे. वीस पंचवीस हात जमीन खोल खणली म्हणजे पाणी लागतें. परंतु सर्वत्र गोडें पाणी लागत नाहीं. बहुतेक ठिकाणीं खारें पाणी असतें. कांपाचें मैदान, गिरगांव वगैरे ठिकाणीं गोडें पाणी असतें. मशीद बंदर, डोंगरी, चिंचबंदर, भेंडीबाजार एथें मात्र पाणी नसतें परंतु पाऊस चांगला पडला असतां पाण्याचा कोठेंच तोटा येत नाहीं. घरोघर विहिरी असून माहीम, शींव, वरळी, माजगांव व परळ मिळून सर्व मुंबईत लहानमोठे मिळून पाऊणशें ऐशीं तलाव आहेत. अलीकडे तर पाण्याचा मोठाच सुकाळ. जिकडे-तिकडे नळ बांधून पाणी आणलें आहे. त्यामुळें भागीरथी सारिखें मुंबईत जिकडे-तिकडे चौफेर पाणीच होऊन गेलें आहे. एवढ्या सोई ह्या शहरांत आहेत ह्मणून दिवसें दिवस एथील वस्ती वाढत चालली आहे.

इंग्रज लोक भरत खंडांत येऊन पुष्कळ व्यापार करीत व कोठें कोठें लहान सान देशही त्यांनीं हस्तगत करून घेतले होते. परंतु एथें टपालाची असावी तसी सोई नसल्यामुळें, त्यांस एकमेकांत पत्रव्यवहार ठेवण्यास मोठी अडचण पडे. जे इंग्रज मुंबईत राहत होते त्यांस वर्ष वर्ष सहा सहा महिने घराहून ( इंग्लंड देशांतून ) बातमी मिळत नसे, व जे इष्टमित्र भरतखंडांत होते त्यांस एकाद्या अगत्याच्या

कामाकरितां पत्र पाठवावें पडलें तर जासूद पाठवावा पडे. आणि त्याचा केवळ ज्याचा त्यासच उपयोग होई. सर्व प्रजेस किंबहुना दुसऱ्या लोकांस एकमेकांस पत्र पाठविण्याची कांहींच सोई नव्हती. आणि एकाद्या पत्राप्रीत्यर्थ पांच पन्नास रुपये लागत. पुढें मुंबईबेट सरकारच्या हस्तगत होऊन पुष्कळ वर्षें गुजरलीं. परंतु मराठी राजांचें प्राबल्य असल्यामुळें भरत खंडांतील सर्व देशांत टपालाची कांहीं योजना घडून आली नाहीं. यामुळें इंग्रजलोकांस राज्यप्रकरणीं परस्परांशीं वेळोवेळ पत्रव्यवहार चालविणें फारच कठीण पडे. मराठी राज्याचा विध्वंस होऊन जेव्हां कंपनी सरकाराचा बावटा भरत खंडावर सुरू झाला, तेव्हांपासून सर्वत्र टपालें नेमाप्रमाणें चालू झालीं. मुंबईंत मुख्य कंपनी सरकाराच्या हुकुमानें सुमारें इसवी सन १६९४ त पोस्ट हपिसाची स्थापना झाली, परंतु सन १८१८ पासून त्या टपालाच्या शाखा गांवो गांवीं आणि देशोदेशीं पसरल्या. कारण जंव पर्यंत पेशव्यांचें प्राबल्य होतें तों पर्यंत मराठ्यांच्या राज्यांत पोस्ट हपिस स्थापण्याचा त्यांजकडून प्रतिबंध असे. या पूर्वीं ज्यावेळीं एल्फिन्स्तन साहेब पुण्यांत होते त्यावेळीं सरकारी कामाचे लखोटे मुंबईस पाठवून द्यावे पडले, व इकडून तिकडे जायाचें असलें तर मोठा प्रयास पडून फक्त मुंबईस लखोटे पोंचविण्यास फार विलंब लागे. पुढें इंग्लंड देशांतून ही टपाल येऊं लागलें; व सर्व हिंदुस्थानभर टपालांतून लखोटे जाऊं येऊं लागले. त्यावेळीं टपालाचें हाशील थोडें जबर पडे. हिंदु दरबारांत टपाल ह्मणजे काय ? व याची व्यवस्था कशीकाय करितात, हें ठाऊक नसल्यामुळें त्वरित पत्रें पोहंचविण्याचा हा नवा प्रकार पाहून आमच्या लोकांस मोठा विसमय झाला असेल यांत कांहीं संशय नाहीं.

सन १८२८ पासून मुंबईंत कारणपरत्वें कोठेंकोठें आगबोटी येत. सन १८३१ माहे मार्चमध्यें मुंबईचे गव्हर्नर अर्ल् आफ् क्लेर हे प्रथमच लिंडसे या नांवाच्या आगबोटींतून आले होते. आगबोटींतून आलेले हे पहिलेच गव्हर्नर. त्यापूर्वीं तिर्कटी जहाजांवरून येत असत. परंतु टपालाचीं कागदपत्रें घेऊन येण्याचा प्रघात घातलेला नव्हता. भरत खंडासीं दर महिन्यास पत्रव्यवहार ठेवण्याविषयीं दोनचार आगबोटी सरकारांतून चालू कराव्या असा उपक्रम पुष्कळ दिवसांपासून ह्मणजे सन १८२५ पासून पार्लमेंट सभेपुढें चालला होता. आणि कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांणीं याबाबत खर्च काय होईल याचा आकार केल्यावरून असें दिसून आलें कीं, याप्रीत्यर्थ हिंदुस्थान सरकारास सालिना फक्त मुंबई खात्यासाठींच बारा

लक्ष रुपये जाजती खर्च होईल, असें ध्यानांत आणून तें काम त्यांनीं कांहीं कालपर्यंत तहकूब ठेविलें होतें. परंतु पुढें बहुतांचें अनुमत पडल्यामुळें उतारू नेण्याचा व दुसरा बंदोबस्त केल्यावरून सन १८३७ माहे एप्रील २८ तारिखेस लिंडसे ही आगबोट ३,४६३ पत्रांचे लखोटे व वर्त्तमानपत्रें घेऊन मुंबईस आली. त्यावेळीं समुद्रांत कांहीं विक्षेप आल्यामुळें ती बराबर एक महिन्यानें मुंबई बंदरांत दाखल झाली नाहीं, नेमापेक्षां पांच सहा दिवस जाजती लागले इतकेंच. ज्यावर्षी प्रथमच इंग्लंड देशाहून लखोटे, वर्त्तमानपत्रें व उतारूलोक घेऊन आगबोट एक महिन्यांत आलेली पाहिली त्यावर्षी आमच्या लोकांस मोठाच विस्मय झाला. जो मार्ग चालायास तिर्कटी तारवास सहा सहा महिने लागत तो मार्ग आगबोटीनें एक महिन्यांत आटोपला हा तिच्या आश्चर्यकारक गतीचा वेग पाहून कित्येक भोळया लोकांस असा भास झाला कीं, हें तारूं चालविणारा तांडेल कोणी वायुपुत्र असावा. आतां इंग्लंडाहून टपालाचे कागद व उतारू लोक घेऊन दर महिन्यांत दोन आगबोटी येतात व जातात. इसवी सन १८५८ त या टपालापासून सरकारास ४,६४,८४६ इतकें द्रव्य उत्पन्न झालें. सन १८६२ आगष्ट महिन्यांत विलायतेहून आगबोट १९ दिवसांनीं आली.

टपालांतून काशीपासून रामेश्वरापर्यंत भरतखंडांच्या कोणत्याही भागांत पत्र पाठवायाचें असलें तर दर पावतोळा वजनास अर्धा आणा पडतो, व तें एकापासून दहादिवसांच्या आंत जसजसें अंतर असेल त्याप्रमाणें नेमलेल्या ठिकाणीं जाऊन पोहंचतें, त्याचप्रमाणें पुस्तकें वगैरे दुसरा माल टपालांतून पाठवितां येतो.

पुढें १८५८ त याहूनही जलद गतीनें देशोदेशीं निरोप पोंचविण्याची युक्ति शोधून काढिली. ही तर केवळ अलौकिक आहे. ती कोणती ह्मणाल तर तारेच्या योगानें देशोदेशीं एक दोन घटिकांत वर्त्तमान कळवून पाहिजे असल्यास तितक्याच काळांत त्याचें उत्तरही आणवावें, याविषयीं सन १८५२ च्या ज्ञानोदयांत असें लिहिलें आहे:—

" हल्लीं या देशांत विजेचें यंत्र चालू करावयाचें त्यास खर्च काय होईल याचा सुमार काढावा ह्मणून बंगल्यांत सुमारें ८२ मैल पर्यंत यंत्र लावून पाहिलें. तेव्हां त्या बद्दल तीस हजार रुपये खर्च लागला, आणि या वरून हिशेब करितां मुंबईपासून कलकत्त्यापर्यंत दर मैलास ३५० रुपये प्रमाणें खर्च लागला व एकंदर सुमारें ९,००,००० रुपये लागतील असें दिसतें. आणि त्यापासून फारच

उपयोग होईल." हें काम सन १८५५ पासून सर्व लोकांच्या उपयोगांत आणिलें. या खात्यांत सालिना सुमारें लाख दीडलाख रुपये उत्पन्न होतात. हा उपयुक्त कारखाना उपस्थित झाल्यापासून या शहरांतील व्यापारी, उदमी व इतर लोकांस फार लाभ झाला. व त्या लोकांस उदीम करण्याची जी भीति होती ती अशा साधनें करून उत्तरोत्तर मोडत चालली. हा तर इतर लाभांपेक्षां अमोलिक लाभ असें मानिलें पाहिजे.

सन १८६१ सालच्या पोस्टाच्या कमिशनरच्या रपोर्टांत असें लिहिलें आहे कीं, सर्व हिंदुस्थानांत मिळून एकंदर ९१४ पोस्ट हपिसें स्थापित आहेत, व ४३,५५१ मैल रस्ता तयार आहे. तितक्यावरून जीं पत्रें आलीं गेलीं त्यांतून १,०१६ मैल रेलवेच्या मारफतीनें व ५७४ मैल गाड्यांतून डांक चालत्ये. आणि २६,७८५ मैल जासूद अगर बोटी, व जहाजांच्या द्वारानें कागद जातात, त्या सर्व डांकेंत ४७,०७,०१० इतकीं पत्रें व ४२,४२,६८४ इतकी वर्त्तमानपत्रें आलीं व गेलीं. हा आकार पाहतां तीन वर्षांपेक्षां सालमजकुरीं कागदपत्राचा व्यवहार फारच अधिक आहे; व त्यावरून या हिंदुस्थानच्या डांक खात्याचा व्यापार अतिशय वाढला असा संभव दिसतो. आणि नाना प्रांतांत नवीं नवीं पोस्ट हपिसें होत आहेत. याखेरीज तारेच्या डांकेनें तर नवखंड व्यापिलें आहे. इंग्रज लोकांचे हे राज्य चालविण्याचे नियम पाहून अचंबा वाटल्या वांचून कसा राहील !

संपत्ति, सत्ता आणि लौकिक हीं मिळूं लागलीं ह्मणजे मनुष्यास बहुतकरून ग़रीब ग़ुरिबांची कींव राहात नाहीं, कींबहुना आपल्या कर्त्तव्यकर्माकडेसही दुर्लक्ष होतें. असा प्रकार मेहेरबान मौंटस्टुअर्ट एल्फिस्तन साहेबाच्या कारकिर्दीत घडून आला नाहीं, आणि इंग्रज सरकारच्या राज्यनीतीचा मूळ पाया असाच आहे. जसजसी त्यांची सत्ता आणि संपत्ति वाढत चालली तसतसीं त्यांनीं रयतेच्या सुखाचीं साधनें वाढविलीं. गांवोगांवीं दंगे, पेंढारी व भरदोन प्रहरचे लोकांच्या घरावर दरोडे पडत असत, ते प्रथम मोडून टाकून रयतेच्या जिवाचें व मालमत्तेचें रक्षण केलें. भिल्ल, ठक, रामोशी, वाटपाडू, व लुटारूलोक सर्व भरतखंडभर पसरून प्रवासी, यात्रेकरी, व अनाथ वाटसरू लोकांस लुटीत व त्यांचे प्राण घेत, त्यांचा नाश करून देशांत जिकडेतिकडे स्वस्थता केली; रस्ते बांधिले, ठिकाणोठिकाणीं चौक्या पाहरे ठेवून वाटसरू लोकांस निर्भय करून

टाकिलें. हल्लीं इंग्रज सरकारच्या आवस्था खालीं सेतुबंधरामेश्वरापासून हिमालयाच्या शेवटापर्यंत काठीस सोनें बांधून गेलें तरी कांहीं भय नाहीं.

सन १८२१ त मेहेरबान मौंटस्टुअर्ट एल्फिन्स्तन् साहेब मजकूर यांनीं पाहिलें कीं, राज्यांत दुसरा सर्व बंदोबस्त चालला आहे. परंतु या देशाच्या लोकांस स्वभाषेमध्यें पूर्ण ज्ञान होऊन इंग्रजी विद्या प्राप्त होण्याचीं साधनें करून ठेविल्या शिवाय त्यांच्या संपत्तीचें रक्षण करणें निष्फल आहे. तर सरकारी नात्यानें मुंबईंत एक विद्यालय स्थापावें, त्यांत संस्कृत, मराठी, गुजराथी, उर्दू, इत्यादि एतद्देशीय भाषा शिकवून त्यांजकरवीं इंग्रजी भाषेचा अभ्यास करवावा; ह्मणजे त्यांला युरोपखंडांतील अनेक विद्यांचें परिज्ञान होऊन ते योग्यतेस चढतील आणि हेंच कृत्य त्यांच्या वंशपरंपरें चालेल. व जेणेंकरून ते आपल्या प्रभूचें कृतज्ञतापूर्वक चिरकाल स्मरण करितील. असें मनांत आणून या देशाचें अभीष्ट चिंतणारे मुंबईंतील शेट सावकार व दुसऱ्या संभावित लोकांची एक सभा मिळविली. आणि आपला हा स्तुत्य उद्देश त्यांस दर्शविला. व आपण स्वतः या कामास एक मोठी रकम भरली. मग इतर गृहस्थांनीं कोणी पांच, कोणी दोन, कोणी हजार, असी आपआपल्या शक्त्यनुसार या उदार कृत्यास वर्गणी दिली. असें सांगतात कीं, या प्रसंगीं आमच्या लोकांनीं आपला उदारपणा व आनंद प्रदर्शित केला तसा कोणत्याच वेळीं केला नव्हता. याप्रमाणें मुंबईंतील गृहस्थांकडून वर्गणी जमली. एवढ्यानेंच हे दयाळू व परोपकारी गृहस्थ स्वस्थ राहिले नाहींत. मुंबई इलाख्यांतील जे संस्थानिक लोक होते त्या सर्वांस पत्रें लिहून हा आपला उद्देश कळविला आणि हें कृत्य सिद्धीस नेण्यास त्यांजकडून मदत मागितली, आणि त्यांनीं ही उदारपणें बरेंच द्रव्य पाठवून दिलें. द्रव्याची विपुळता झाल्यानंतर १८२२ आगष्ट २१ या दिवशीं नेटिव्ह एज्युकेशन् सोसायटी या नांवाची एक मोठी शाळा स्थापिली. या शाळेसाठीं कांपाच्या मैदानांत एक इमारत बांधिली. त्यावेळीं ही लहान होती, परंतु आतां वाढविली आहे.

पुस्तकें वगैरे छापण्याकरितां एक मराठी छापखानाही घातला. ह्या खात्याची देखरेख करण्यास कपतान जर्विस यांस नेमिलें. त्यांनीं हें काम मोठ्याच तारतम्यानें चालविलें. मराठी शाळेचें काम तपासण्यास सदाशिव काशिनाथ छत्रे व जगन्नाथ शास्त्री क्रमवंत यांस नेमिलें. आणि यांच्या हाताखालीं दुसरे पुष्कळ शास्त्री नेमून शालोपयोगी पुष्कळ ग्रंथ तयार केले. सदाशिव काशिनाथ छत्रे यांनीं

इंग्रजी भाषेंतून बाळमित्र, इसापनीति, वगैरे सुंदर शालोपयोगी पुस्तकें शुद्ध मराठी भाषेंत तयार करून छापिलीं. खुद्द जर्विस साहेबांनीं गणित, भूगोल, भूमिति इत्यादि ग्रंथ प्रथम तयार केले. तसेंच रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान यांवर उत्तम प्रकारचे ग्रंथ दुसऱ्या गृहस्थांकडून करविले. हरी केशवजी नांवाचे एक विद्वान् गृहस्थ होते. हे इंग्रजी ग्रंथांचें मराठी भाषांतर उत्तम प्रकारचें करीत. त्यांणींही कांहीं ग्रंथ तयार केले. हाच मराठी शालोपयोगी पुस्तकें छापण्याचा सबळ पाया पडला. मराठी भाषेचें व्याकरण रचविलें व संस्कृत ग्रंथ छापविले. मग मुंबईंत एक दोन ठिकाणीं मराठी सरकारी शाळा घातल्या. एथूनच मुंबई इलाख्यांतील सर्व शाळांचा उगम. ह्या शाळेचा भरभराट होतांच मुंबई इलाख्यांत देशोदेशीं व शहरोशहरीं आणि गांवोगांवीं शाळा स्थापिल्या आणि अद्याप स्थापितच आहेत. हल्लीं ह्या शाळेस एल्फिन्स्तन् इन्स्टिट्यूशन् असें नांव दिलें आहे. हिच्याच संबंधानें एल्फिन्स्तन् पाठशाळा काढिली आहे. हींत शिकविण्या-करितां इंग्लंड देशांतून प्रोफेसर ( पंडित ) आणितात. त्यांस कोणास हजार, कोणास आठशें, कोणास सातशें असें दरमहा वेतन मिळतें. असे प्रोफेसर ह्या पाठशाळेंत पांच सहा असतात. ह्या पाठशाळेंत मोठमोठाले गहन विषय शिक-वितात. मराठी व संस्कृत भाषेचा देखील अभ्यास एथें उत्तम प्रकारचा होतो. ही शाळा उपस्थित झाल्यापासून लोकांस थोडी बहुत विद्येची अभिरुचि झाली. व हजारो एतद्देशीय लोक हुशार होऊन मोठ्या योग्यतेस चढले आहेत. या विद्याखात्यांवर जे मुख्य डैरेक्टर हल्लीं नेमले आहेत त्यांस दरमहा २,५०० रुपये मिळतात. व त्यांच्या हाताखालीं दुसरे तिघे साहेब व दुसरे एतद्देशीय विद्वानांपैकीं मदतनीस आहेत. या खात्याबद्दल सरकारास दरसाल तीन चार लक्ष रुपये खर्च होतो. एतद्देशीय लोक अनेक शास्त्रीय विद्येंत प्रवीण व्हावे ह्मणून युनिव्हर्सिटी नांवाची विद्वत्सभा स्थापिली आहे. तींत विद्यार्थी लोकांनीं अनेक विद्या शिकून परीक्षा द्यावी म्हणजे ती ती प्रमाणें त्यांस पंडितांची पदवी मिळत असते. मुंबई इलाख्यांत सन १८५६–५७ नांत सरकारानें फक्त विद्याखात्यांत ३,५२, ७३० रुपये खर्च केला.

मराठी भाषेचा उदय होण्यास हेंच विद्यालय कारणभूत झालें. पूर्वीं मराठी भाषा ह्मणजे रानटी व अज्ञानी लोकांची भाषा असें मानून ती शिकायास कोणी परिश्रम घेत नसत. व त्या भाषेंत कोश, व्याकरण गद्यपद्यादिग्रंथ नसल्यामुळें

शास्त्री, पंडित व पुराणीक मराठी भाषेंत कोणी कांहीं लिहायास लागला ह्मणजे त्याचा उपहास करीत. परंतु ही शाळा स्थापित झाल्यापासून मराठी भाषेंत व्याकरण, कोश, व अनेक ग्रंथ निघूं लागले. त्यामुळें लोकांचे डोळे उघडून मराठी भाषा कांहीं उपयोगाची आहे असें त्यांस वाटूं लागलें.

डैरेक्टर आफ् पब्लिक् इन्स्ट्रक्षन् विद्या खात्यांतील मुख्य ई. ऐ. हॉवर्ड साहेब हे मुलखी भाषांची मुलांत अभिरुचि उत्पन्न करण्यास फार श्रम घेतात. मराठी व गुजराथी शालोपयोगी गद्यपद्य रचनेंत यांणीं पुष्कळ ग्रंथ छापिले, व पुरातन कवितेंतील वेंचे छापविण्यास व ते विद्यार्थ्यांस शिकविण्यास व स्वभाषेंत कविता रचविण्यास हे फार उत्तेजन देतात. यामुळें हल्ली मुलखी भाषांचें मान बरेंच वाढत चाललें आहे. आणि नवे नवे ग्रंथ तयार होत चालले आहेत.

एल्फिन्स्तन् विद्यालयांत व दुसऱ्या शाळांत शिकलेल्या गृहस्थांनीं मिळून स्टूडेंटस लिटररी एंड सायंटिफिक् सोसायटी या नांवाची एक सभा सन १८४८ त स्थापिली; ह्या सभेचा उद्देश उपयुक्त ज्ञानाची वृद्धि करून त्याचा प्रसार आपल्या लोकांत करावा. ह्या सभेचे सभासद पाळीपाळीनें इंग्रजी भाषेंत निबंध लिहितात व व्याख्यानें देतात. ह्यांनीं द्रव्य जमवून मराठी व गुजराथी मुलींच्या शाळा स्थापिल्या आहेत. ह्या सभेच्याच शाखा मराठी आणि गुजराथी ज्ञान-प्रसारक सभा आहेत. मराठी ज्ञानप्रसारक सभेंत मराठी भाषेंत सभासदांतील कोणीतरी निबंध लिहून दर पंधरवड्यास सभेपुढें वाचितात व व्याख्यानें देतात. तीं ज्ञानप्रसारक नांवाचें मासिक पुस्तक जें ह्या सभेनें काढिलें आहे, त्यांत छापून प्रसिद्ध करितात.

वैद्यशाळा आणि न्यायशास्त्रशाळा ह्या दोनही सदरीं सांगितलेल्या शाळेच्या शाखा आहेत. सन १८३८ मध्यें सर राबर्ट ग्रांट मुंबईचे गव्हर्नर दापोली मुक्कामीं देवाज्ञा पावले. त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नांवानें वैद्यशाळा काढिली. त्यामध्यें पुष्कळ द्रव्य त्यांच्या मित्रांनीं वर्गणी काढून जमविलें व बाकीचें कंपनी सरकारानें दिल्हें. आणि त्याचा खर्च सरकारांतून चालतो. तशीच सर अर्स्किन्पेरी मुंबईंतील मुख्य न्यायाधीश सन १८५३ नांत ज्यावेळीं स्वदेशास गेले त्या वेळीं त्यांच्या सन्मानार्थ वर्गणी जमवून त्यांच्या नांवानें न्यायशास्त्रशाळा उभारिली. ह्या शास्त्राचें अध्ययन एल्फिन्स्तन् इन्स्टिटयूशन एथें होतें, एथें इंग्रजी न्यायशास्त्र्याची नेमणूक केली आहे. डाक्तर रीड साहेब हे ह्या खात्यांत न्यायशास्त्र शिकवीत

असतात. पाहा- हा क्रम किती चांगला आहे. प्रथम स्वभाषा व्याकरण शुद्ध शिकावी. मग पांच दहा वर्षें इंग्रजी भाषेचें अध्ययन करून त्या भाषेंत परिज्ञान करून नंतर वैद्यशास्त्र, न्यायशास्त्र, शिल्पशास्त्र, इत्यादि आपणास आवडेल त्या विद्येचें अध्ययन करायाची एथें सोई आहे, उद्योग मात्र केला पाहिजे ह्मणजे मुंबई शहरांत मनुष्य पाजीचा गाजी होतो, मुंबईंत जशीं हल्लीं विद्या संपादन करण्याचीं साधनें आहेत तशीं कोठें विरळा. एवढ्या सोई आहेत तरी मुंबईंतील लोकांस विद्येची अभिरुचि कमीच. एथील मूळ स्थायिक लोकांपैकीं ह्या विद्यांपासून वास्तविक फायदा करून घेणारे फार थोडे. उद्योग, ईर्षा, धारणा आणि चापल्य हे गुण एथील लोकांत तादृश प्रज्वलित नसतात. याचें कारण ब्राह्मण वगैरे दुसऱ्या जातीचे लोक जे बाहेर गांवांतून आलेले आहेत त्यांसारिखे यांचे उद्योग नसतात.

इंग्रजी, मराठी, गुजराथी, पोर्टुगीझ्, यहुदी, फारशी, उर्दू, आरबी आणि दुसऱ्या भाषा शिकविण्याच्या शाळा सर्व मिळून या बेटांत सुमारें ३५० आहेत. आणि त्यांत निरनिराळ्या जातींचीं अजमासें वीस पंचवीस हजार मुलें विद्याभ्यास करितात. तशींच सुमारें चाळीस पुस्तकालयें आहेत. त्यांत अनेक भाषांतील ग्रंथ असतात, दरमहिन्यास चार आण्यांपासून दहा रुपयांपर्यंत वर्गणी दिली असतां पाहिजे तो ग्रंथ वाचायास सांपडतो. पाहा.-- कांहीं वर्षांमागें एथें एक इंग्रजी शाळा व पांच गांवठी शाळा सांपडणें कठीण होतें. कोणास इंग्रजी शिकायाचें असलें तर तो डोंगरी किल्ल्यांत जाऊन सोलजर लोकांस पांच दहा रुपये दरमहा देऊन तास पाऊण तास त्यांजपाशीं शिके आणि असे शिकणारे दहा वीस सांपडणें कठीण होतें. कित्येक मुलें कोणी थोडेंसें इंग्रजी शिकलेल्या गृहस्थांकडे सकाळ संध्याकाळ जाऊन एकादा धडा शिकून घरीं येत व याप्रमाणें वर्ष सहा महिने अभ्यास झाला ह्मणजे हपिसांत जाऊन अक्षर वळवून चाकरी करायास लागत. बाराखड्या आणि शंभर अंक शिकला ह्मणजे मराठी अध्ययन समाप्त झालें, असें मानीत. आणि इंग्रजी स्पेलिंग बुकांतील सात वर्ड्या ( सप्ताक्षरी शब्द ) वाचायास आल्या ह्मणजे तो इंग्रजी भाषेंत निपुण झाला असें समजत. आतां पाहा ! अनेक भाषा शिकण्याच्या शेंकडो शाळा झाल्या. ज्यावेळीं एल्फिन्स्टन् विद्यालय स्थापिलें, त्यावेळीं त्या शाळेंत इंग्रजी शिकणाऱ्या मुलांची संख्या शंभर देखील नसे. तीही जमवायास लोकांचें आर्जव करावें पडे. त्यावेळीं मुलांनीं शिकून थोडीशी हुशारी दाखविली ह्मणजे

त्यांस पागोटीं, शेले, किनखापी ताके, रुपये व उत्तम प्रकारचीं पुस्तकें बक्षीस देत. असें असतांही संभावित लोक आपलीं मुलें या विद्यालयांत पाठवायास कांकू करीत असत. आणि आतां गरीब लोकांचीं देखील मुलें दरमहा पगार देऊन शिकणारीं शेंकडो आहेत. या प्रमाणें या शहराचा सर्व प्रकारें उत्कर्ष होत चालला आहे. सरकारी शाळांतच फीबद्दल दरमहा दोन अडीच हजार रुपये जमतात.

एतद्देशीय लोकांस रसज्ञतेचें ज्ञान होऊन चित्रें, झाडें, वृक्ष, पर्वत, शहरें, गांव, वाडे, बंगले, यांचे इंग्रजी रीतीप्रमाणें नकाशे काढतां यावे व चित्रें काढण्याचें त्यांस पूर्ण ज्ञान व्हावें ह्मणून एल्फिन्स्तन् विद्यालयाच्या खात्यांत सर जमशेटजी जिजीभाई बारोनेट यांनीं एक शाळा स्थापिली आहे. तेथें एक दोन विद्वान् व कुशल इंग्रज ही विद्या शिकवितात. या शाळेंत सकाळचे सात वाजल्यापासून नऊ वरें पर्यंत चित्रें काढायास शिकवितात, एथें जाऊन शिकण्यास सर्वांस मोकळीक आहे. या उदार कृत्यास सर जमशेटजी यांनीं २५,००० रुपये दिले.

मुलींस विद्या शिकण्याची शाळा मुंबईंत पूर्वीं एकही सांपडणें कठीण होतें. मुलांसच धड वाचतां येत नसे, मग मुलींस वाचायास व लिहायास शिकविण्याच्या खटपटींत कोण पडतो. आणि याशिवाय बायकांस वाचायास व लिहावयास शिकवूं नये असा हिंदु लोकांचा समज होता. परंतु सन १८१४ मध्यें अमेरिकेकडून पाद्री ( मिशनारी ) आले त्यांनीं मुलींस शिकविण्याच्या शाळा जागोजागीं घातल्या. व या प्रीत्यर्थ हजारो रुपये खर्च केला. ह्या लोकांस मुलींच्या शाळा स्थापण्यास फारच प्रयास पडले. श्रीमंत लोक तर आपल्या मुलींस बिलकुल शाळेंत पाठवीत नसत. परंतु गरीब लोकांच्या मुलींस घागरे, चोळ्या, साड्या, पैसे असीं इनामें देऊन मुली जमवीत. कित्येक लोक त्यावेळीं दुप्पट भाडें घेऊन देखील शाळा घालायास भाड्यानें जागा देत नसत, परंतु त्यांनीं आपले उद्योग सोडिले नाहींत, तेव्हांपासून मुलींच्या शाळा सुरू झाल्या आणि हल्लीं ह्या शाळा सुमारें २५ आहेत. स्टूडेंटस लिटररी आणि सायंटिफिक् सोसायटीनें काढलेल्याच पांच आहेत. मुंबई इलाख्यांत सरकारी शाळांत ४४,१६६ मुलें विद्याभ्यास करितात. पाद्रीच्या व गांवठी शाळांत ९१,३३० इतकीं मुलें शिकतात.

एल्फिन्स्तन् विद्यालयाची स्थापना होऊन आज सुमारें चाळीस वर्षें झालीं. इतक्या काळांत या शाळेवर पुष्कळ गुरूंची नेमणूक झाली. प्रारंभीं या शाळेवर मिस्तर मर्फी यांची नेमणूक झाली होती, त्यानंतर मि. मेनवारिंग आले. मग कांहीं वर्षांनीं प्रोफेसर वेल आणि हंडरसन आले. तेव्हां पासून ही शाळा थोडी उदयास येत चालली होती. सन १८३३ त मेहेरबान मौंटस्टुअर्ट एल्फिन्स्तन् यांनीं प्रोफेसर आर्लिबार व डाक्तर हार्कनेस यांस या शाळेवर नेमिलें. डाक्तर हार्कनेस यांस मुख्य गुरूंच्या जागीं नेमून शाळेचा सर्व अधिकार यांच्या स्वाधीन केला. यांस दरमहा एक हजार रुपये वेतन मिळत असे. यांनीं शाळेचा बंदोबस्त मोठ्या चातुर्यानें ठेविला. आणि एक सारिखें सत्तावीस वर्षें आपलें आयुष्य ह्या खात्यांत वेंचून विद्या वृक्षापासून शेंकडो फळांचा या देशांत वर्षाव केला. युरोपखंडांतील विद्येच्या खजिन्याची किल्ली बहुधा यांकडूनच आमच्या लोकांस प्राप्त झाली. हे एतद्देशीय लोकांवर किंबहुना विद्यार्थ्यांवर फार ममता ठेवीत; व त्यांस आस्थापूर्वक शिकवीत. यांला गरिबांचा फार कळवळा होता. कित्येक गरीब ब्राह्मणांस व दुसऱ्या अनाथ विद्यार्थ्यांस हे कधींकधीं पोटखर्चास पांच पांच चार चार रुपये दरमहा देत. आणि त्यांजकरवीं विद्याभ्यास करवीत.

हमिल्टन् नामक एक इंग्रज विद्वान् मानसशास्त्र पुस्तकांत असें ह्मणतो,

सृष्टेषु मनुजाछ्रेष्ठं भुवि किंचिन्न विद्यते ॥
पुरुषादपि तस्माच्च बुद्धिरेका विशिष्यते ॥ १ ॥

याचा अर्थ. सृष्टीमध्यें मनुष्य श्रेष्ठ आणि मनुष्यामध्यें बुद्धि श्रेष्ठ. या श्लोकाच्या मतानुरोधानें हे साहेब आपली वर्त्तणूक ठेवीत असत, असें वाटतें. यांनीं शिकवून तयार केलेले विद्यार्थी सर्व पृथ्वीवर पसरले आहेत. आणि त्यांतील कित्येक मोठमोठ्या हुद्यांच्या जागा चालवितात. विद्यार्थ्यांच्या अंगीं या प्रकारचा गुण येण्यास कांहीं अंशीं यांचीच शिक्षा. यांच्या शिष्यांपैकीं कोणी कलेक्टर, कोणी न्यायाधीश, कोणी प्रिन्सिपाल सदर अमीन, कोणी सुप्रीम कोर्टांतील वकील, कोणी त्रान्सलेटर, कोणी डाक्तर, कोणी प्रोफेसर, कोणी व्यापारी, कोणी ग्रंथकार, कोणी वर्त्तमानपत्राचे कर्त्ते, कोणी इंजनेर, कोणी पंडित अशा योग्यतेस चढले आहेत. यांची उदार बुद्धि असल्यामुळें आपल्या शिष्यांस मोठीं हुद्यांचीं कामें मिळावीं व त्यांनीं चांगल्या रीतीनें तो हुद्दा चालवावा ह्मणून ते फार झटत,

या इलाख्यांत युनिव्हर्सिटीची ( पंडित शाळेची ) स्थापना सन १८५७ त झाली. तेव्हां पासून हे परोपकारी प्रोफेसर एतद्देशीय लोकांपैकीं कांहीं विद्यार्थ्यांस इंग्रजी रिवाजाच्या उत्तम पदव्या मिळाव्या ह्मणून त्यांस वारंवार उत्तेजन देत. आणि हा त्यांचा मनोरथ ईश्वरानें पार पाडिला. सन १८६२ मार्च महिन्यांत अशा प्रतीच्या सहा विद्यार्थ्यांची परीक्षा टौनहालामध्यें झाली. त्यांपैकीं हे पुढील चौघे गृहस्थ परीक्षेस उतरले.

रा. महादेव गोविंद. रा. रामकृष्ण गोपाळ.

रा. बाळा मंगेश. रा. वामन आबाजी.

ह्या विद्यार्थ्यांस ता० १ माहे मे सन १८६२ रोजीं टौनहालांत सभा भरून सर हेन्‌री बार्टल्‌ फ्रियर यांच्या हातानें ए. बी. नामक पंडित पदवी मिळाली. ह्या सभेंत इंग्रज व एतद्देशीय श्रीमान् सरकारी हुद्देवाले शेटसावकार असे पुष्कळ गृहस्थ आले होते. आणि मोठ्या समारंभानें यांस ही योग्यता प्राप्त झाली. सर बार्टल् फ्रियर यांणीं या प्रसंगीं फार सुरस भाषण केलें. त्यांत ह्या चौघां गृहस्थांस आपलें सदाचरण, योग्यता व ज्या मोठ्या विद्याखात्यांतून त्यांस हा सत्कार मिळाला आहे, त्याचें महत्व रक्षण करण्यास त्यांणीं किती झटलें पाहिजे त्याची आवश्यकता दाखविली. आणि जी विद्या सद्यः त्यांस प्राप्त झाली आहे ती वाढविण्यास त्यांनीं पुढें किती परिश्रम केले पाहिजेत तेंही दर्शविलें. व इंग्रजी विद्येचें अध्ययन करण्यास एतद्देशीय विद्यार्थ्यांस कोण कोणत्या अडचणी निंवारण केल्या पाहिजेत तेंही संक्षेपानें सुचविलें.

सन १८६२ माहे मे ता० १२ वी रोजीं डाक्तर हार्कनेस एल्फिन्स्तन् पाठशाळेंतील मुख्य गुरूचें काम सोडून स्वदेशीं इंग्लंडास जावयास गेले. हे आपल्या कामाचा राजीनामा देऊन स्वदेशीं जाणार असें समजतांच आजपर्यंत जे त्यांचे हाताखालीं शिकून तयार झालेले व जे अद्यापपर्यंत या शाळेंत अध्ययन करिताहेत यांनीं जमून आपल्या गुरूचें चिरकाल स्मरण राहावें व आजपर्यंत जे कांहीं त्यांनीं आपणांवर उपकार केले आहेत त्यांची उतराई होण्यासाठीं यथानुशक्त्या कांहीं गुरुदक्षिणा द्यावी असा निश्चय करून सुमारें सोळा सत्रा हजार रुपये वर्गणी जमा केली. मग तारीख १० माहे मे रोजीं कांपावरील एल्फिन्स्तन् विद्यालयांत सभा भरून त्यांस इंग्रजी भाषेंत लिहून तयार केलेलें मानपत्र दिलें. तें प्रथम डाक्तर भाऊदाजी यांनीं सर्व मंडळीस वाचून दाखविलें. त्यांत आज-

पर्यंत जीं त्यांनीं परोपकारी कृत्यें केलीं होतीं त्यांचा उल्लेख केला होता व त्यांत दुसरें असें लिहिलें होतें कीं, आपण आह्मावर जे आजपर्यंत उपकार केले आहेत त्यांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण करून आह्मी प्रीतिपुरःसर हें तुलसीपत्र ( ही दहा हजार रुपयांची थैली ) एथें सादर करतों, ती स्वीकारावी. आणि आमचा दुसरा मनोरथ असा आहे कीं आपला पुतळा करवून आपलें नांव चिरकाल या देशांत राहावें ह्मणून फ्रामजी कावसजी यांच्या नांवाचें जें सर्वपदार्थ संग्रहालय तयार होत आहे त्यांत ठेवावा, तर यास आपलें अनुमोदन असावें. अणखी आपलें स्मरण नेहमी विद्यार्थ्यांस राहावें ह्मणून आपल्या तसबिरी काढून त्या प्रत्येकाच्या घरांत असाव्या असी आमची इच्छा आहे हेंही आपण मान्य करावें. हें मानपत्र वाचून डाक्तर भाऊदाजी यांनीं डाक्तर हार्कनेस यांच्या स्वाधीन केलें. ह्या वर सुमारें एक हजार गृहस्थांच्या सह्या होत्या. मग डाक्तर मजकूर यांनीं सुरस भाषण करून आपल्या शिष्य मंडळीची व दुसऱ्या गृहस्थांची स्तुति केल्यावर सभा बरखास्त झाली. या सभेंत श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट, शेट सोराबजी जमशेटजी, शेट बंमनजी हारमसजी, रा० दादोबा पांडुरंग व कित्येक इंग्रज असे पुष्कळ आले होते. यांच्या जाग्यावर सर आलेक्झांडर ग्रांट ह्यांस एल्फिन्स्तन् कालेजाचे प्रिन्सिपाल नेमिले.

मेहेरबान एल्फिन्स्तन् साहेब गव्हर्नर होते त्यावेळीं दक्षिणेंतील कमिशनर चापलेन साहेब यांनीं सन १८२१ अक्टोबर महिन्यांत पुण्यांतील संस्कृत पाठशाळा स्थापिली. स्थापण्यास जीं त्यांनीं प्रयोजनें दाखविलीं आहेत तीं हीं:—

" हिंदुशास्त्राचे उपयोगी भाग शिकविण्याविषयीं व ते सुधारण्याविषयीं या देशच्या लोकांस उमेद यावी या करितां युरोपियन विद्येचे भाग या देशच्या लोकांस शिकण्याची इच्छा व शक्ति आहे त्यांचें ज्ञान त्यांस व्हावया करितां ह्या विद्यालयाची स्थापना केली आहे.

विद्वान् ब्राह्मण जसें सांगतात तसें ते ऐकतात व आचरण करितात. कारण त्यांचें लोकांत वजन फार आहे. हल्लीं त्यांची खराबी ब्राह्मणी राज्य बुडाल्यापासून फार झाली आहे. तीविषयीं त्यांस दुःख न होतां सरकारावर त्यांची प्रीति राहावी, हा हें विद्यालय स्थापण्याचा दुसरा उद्देश आहे.

कमिशनर असें लिहितात कीं, यद्यपि हिंदु शास्त्रांतून पुष्कळ शास्त्रें अगदीं निरुपयोगी आहेत. किंवा त्याहून कदाचित् वाईटही असतील तथापि हिंदूंची

आवड या विद्यालयावर बसावी ह्मणून बहुतेक शास्त्रें शिकविण्याकरितां प्रत्येक शास्त्रांत गुरु ठेवावे असें मी अनुमोदन दिल्हें आहे. पुढें तो साहेब असें लिहितो कीं, युरोपियन विद्येंतील कोणतेही भाग शिकवायास लाविले नाहींत, परंतु जीं हिंदु शास्त्रें अति उपयोगी आहेत व ज्यांच्या अभ्यासानें विद्यार्थी विशेष अगत्याची विद्या ग्रहण करण्यास सिद्ध होतील त्यांचा पाठशाळेंतील विद्यार्थ्यां-करवीं अभ्यास चालविण्याकरितां मी प्रयत्न केला आहे. अज्जम चापलेन साहेब यांणीं सरकारच्या अनुमतानें ज्या नेमणुका केल्या त्यांचा तपसील:– ''

न्यायशास्त्र, वेदांत, धर्मशास्त्र, ऋग्वेद, व्याकरण, यजुर्वेद, अलंकार, वैद्य. इतके विषय शिकविण्याकरितां गुरूंची योजना करून व शंभर विद्यार्थी जमवून शाळा स्थापित केली. आणि नामांकित पंडित राघवाचार्य यांस त्या सर्वांवर मुक्तसर ह्मणजे मुख्य करून न्यायशास्त्रांतील गुरूचेंही काम त्यांनीं चालवावें असें ठरविलें. पाठशाळेची देखरेख प्रथम कमिशनर साहेबांकडे होती. त्यांचा हुद्दा महकूब झाल्यानंतर कलेक्टर साहेबांकडेस तें काम झालें. परंतु या दोन्ही कामदारांस दुसरें काम पुष्कळ ह्मणून पाठशाळेची चौकशी नांवास मात्र त्यांजकडे होती. शाळेची देखरेख मुख्य शास्त्री करीत असत. त्यांत सुस्ती व हयगय फार होऊं लागली सबब मेजर क्यांडी यांस सन १८३७ माहे फेब्रुआरी महिन्यांत सरकारानें चौकसनीस नेमिलें. तेव्हांपासून ही पाठशाळा सुरळीत चालली.

ह्या पुण्यांतील पाठशाळेमुळें मुंबईंतील शाळांस व लोकांस मोठाच लाभ झाला. एथें तयार झालेल्या कित्येक शास्त्र्यांच्या नेमणुका मुंबईंतील पाठशाळेवर होऊं लागल्या. तेथील विद्यार्थी मुंबईंतील पाठशाळेंत येऊन इंग्रजी विद्याभ्यास करूं लागले, व मुंबईंतील कित्येक पुण्यास जाऊन संस्कृत व शुद्ध मराठी भाषा शिकूं लागले. ह्या शाळेच्या संबंधानें मराठी व इंग्रजी क्यांडी साहेबानें केलेला कोश, व मोल्स्वर्थ साहेबानें केलेला मराठी आणि इंग्रजी भाषेचा मोठा अमोलिक कोश, हे उत्पन्न झाले. मोल्स्वर्थ साहेबाचा ह्या पाठशाळेसीं कांहीं संबंध नव्हता, तरी ह्या शाळेच्या योगानें पुण्यास शास्त्र्यांचा समुच्चय असे व तेथें दुसरे अनेक ग्रंथ तयार झाल्यामुळें अनेक शब्दांचा विचार चांगला होत असे. ह्या दोन साहेबांनीं हे दोन कोश केले. ह्यांत त्यांनीं पश्चिम भागांतील भरतखंडस्थ लोकांवर मोठेच उपकार केले. हे मुंबईंतील लोकांनीं तर मोठ्याच कृतज्ञतेनें स्मरले पाहिजेत. मुंबईंत शुद्ध

मराठी भाषा चालू नसल्यामुळें इंग्रजी शिकण्यास व कोणत्याही ग्रंथाचें समर्पक भाषांतर करण्यास फार कठीण पडे. हल्लीं रेलवे झाल्यामुळें व पुण्यास इंग्रजी कालेज स्थापल्यामुळें मुंबई आणि पुण्यांतील पाठशाळा ह्यांचा निकट संबंध जडला आहे.

जे लोक पूर्वीं आबडधोबड काम करीत ते सर्व आतां इंग्रजी शिकूं लागले. कित्येक आपआपला धंदा सोडून इंग्रजी शिकून चाकरी करावयास लागले आहेत. यांस अशा चाकऱ्या मिळूं लागल्यामुळें जो उठला तो इंग्रजी शिकतो, आणि कारकून व्हायास पाहातो दुसरें कांहीं नाहीं. "उत्तम खेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ चाकरी" याकडे कोणी लक्ष देत नाहींत. हल्लीं मुंबईंत कोळी, माळी, घाटी, ह्यार, मांग, चांभार, यांचीं मुलें देखील मराठी, गुजराथी व इंग्रजी शिकत आहेत. हलालखोर लोकांनीं पंचवीस तीस मुलें दरमहा एकएक रुपया देऊन इंग्रजी शिकतात. ही शाळा त्यांनीं आपल्या मोहल्यामध्यें काढिली आहे. आणि त्यांस इंग्रजी शिकविणारा कोणी पोर्टुगीझ् आहे. ह्यार मांगांच्या मुली व मुलगे यांस शिकविण्याकरितां मिशनारी लोकांनीं जागोजागीं पुष्कळ शाळा घातल्या आहेत.

देशोदेशांतून ब्राह्मणांचीं पुष्कळ अनाथ मुलें प्रतिवर्षीं एथें इंग्रजी अभ्यास करायास येतात; व कोणी आचाऱ्याचें, कोणी शागिर्दाचें अशीं कामें पत्करून अवकाश सांपडेल त्यावेळीं शाळेंत जाऊन शिकतात. कित्येक तर सकाळ संध्याकाळ भिक्षा व माधुकरी मागून पोट भरून सवड सांपडेल त्यावेळीं शाळेंत जाऊन इंग्रजीचा अभ्यास करितात. एथें आलें असतां कोठून तरी गरीब गुरिबांची अन्नवस्त्राची सोई होती. कित्येक पारशी व इतर लोक गरीब मुलांस दरमहा रुपया दोन रुपये देऊन त्यांजकरवीं विद्याभ्यास करवितात, हा त्यांचा किती वर्णनीय गुण आहे! आणि अशा अडचणी सोसून अभ्यास केलेलीं कित्येक मुलें उदयास आलेलीं एथें पुष्कळ सांपडतील. कोठेंकोठें दुसऱ्या जातीचीं व कित्येक सधन लोकांचींही मुलें दूर देशाहून येऊन दरमहा पांच पन्नास रुपये खर्च करून एथें इंग्रजी अभ्यास करितात.

# प्रकरण १०.

खत्री व रेशमाचा व्यापार–गिरण्या व कापसाचा व्यापार–कडदोऱ्या–पारशी लोकांचे उद्योग–छापखाने–गणपत कृष्णाजी–वर्त्तमानपत्रें–पारशी लोकांत विद्येची अभिरुचि–सोन्यारुप्याचा मुलामा काढायाचे कारखाने–चित्रें काढण्याचे कारखाने–बर्फाच्या वखारी–लोखंडी सडका–सुताचे व कापड विणण्याचे कारखाने–कारागीर लोक–गाडीचे कारखाने–लोखंडी ओतींव कामाचे कारखाने–रावणाच्या संपत्तीची तुळणा–कसबी काम–कागदाचे व काचीचे कारखाने–तेलाचे घाणे–साबण करायाचे कारखाने–धुराचे दिवे करण्याची मसलत–दारूच्या भट्टया व पिठीं–तंबाखूच्या गाद्या व पानसुपारीचीं दुकानें–अफिणीचा व्यापार व दुकानें–चंडोलखाने–मिठाई–किमयागर–दारू, फुलबाज्या, नळे इत्यादि–लहान सफरी करण्याच्या आगबोटी–दागिने.

खत्री हे लोक चौलचे मूळ स्थायिक. यांची मूलपीठिका कशी काय आहे, हें ग्रंथद्वारें कांहीं बराबर अढळत नाहीं, परंतु हे सहस्रार्जुनाचे वंशज ह्मणतात यावरून हे क्षत्रिय कुळांतील आहेत, असें अनुमान होतें. आणि यांचें वास्तविक नांव क्षत्रिय, परंतु एथें पूर्वीं सर्व कुळंबट वस्ती होती आणि या लोकांत त्यावेळीं कोणी मोठे विद्वान् व पराक्रमी नसल्यामुळें खत्री आणि क्षत्रिय या नांवांत काय भेद आहे याजकडे तादृश लक्ष दिलें नाहीं. खत्री हे क्षत्रिय असें मोल्स्वर्थ साहेबाचें मत आहे. चौलांत यांचीं सुमारें १८०० घरें होतीं. परंतु तेथें गोळीचा रोग उद्भवल्यावरून कितीएक कुटुंबें जीव बचावण्याकरितां देशांतरास गेलीं.

याचा दाखला चौलास गोळिका देवी अद्यापि आहे. पुढें मुंबईची वसाहत होऊं लागली आणि व्यापारी उदमी लोकांची चहा होऊं लागली. तेव्हां पोर्टुगीझ् लोकांच्या कारकिर्दींत सुमारें सन १६००त हे एथें येऊन राहिले.

जे खत्री लोक मुंबईत आले त्यांनीं आपला वडिलोपार्जित जो रेशमाचा व्यापार होता तो चालविला. आणि त्यांचें हें काम इंग्रज सरकाराच्या कारकिर्दींत फार वाढलें. या बेटांत सुमारें चाळीस वर्षांमागें या लोकांच्या घरोघर माग होते. ते लोक उत्तम प्रतीचीं पीतांबरें, पैठणी साड्या, रेशमी पागोट्या, खेस ह्मणजे शेले व अणखी अनेक तऱ्हेचीं रेशमी उंच वस्त्रें काढीत व रेशीम विकीत. आणि त्यावेळीं शहराची वस्ती वाढविण्यास इंग्रज लोक गांवोगांवांतून कारागीर लोकांस मोठ्या आर्जवानें बोलावून आणीत व हरतऱ्हेनें त्यांस उत्तेजन देत. इंग्रजांनीं या लोकांस बरीच मदत केली असावी. कारण यांत कित्येक सधन असून स्थावर जिनगीचे मालक पुष्कळ वर्षांपासून आहेत. इतकेंच कीं, शिल्पविद्येंत हे हुशार असल्यामुळें उद्योग करून द्रव्य कमाविणारे होते. सबब यांजकडून देवालयें इत्यादि बांधणें घडून आलें नाहीं. यांत कित्येक या शहरांत आल्यापासून शिंप्याचेंही काम करूं लागले व सावकारीही करितात. इंग्रज लोकांचे उंच प्रतीचे डगले, मडम लोकांचे गवन वगैरे कपडे शिंवीत. यांतही द्रव्य मिळवून सुखी झालेले या ज्ञातींत पुष्कळ आहेत. ते हल्लीं बहुधा रेशमाचा व शिंवण्याचा हे दोनही धंदे सोडीत चालले आहेत. सांप्रत इंग्रजी शिकून सरकारी व सावकारी हपिसांत चाकरी करितात. रामचंद्र केरोजी हे या जातींत पुष्कळ वर्षांपासून एथें प्रख्यात आहेत. छत्तीस वर्षें पर्यंत ते पोलिस हपिसांत दुभाष्याचें काम करीत होते, व सरकारांत यांची मोठी अब्रू होती. यांस दोनशें रुपये दरमहा वेतन होतें.

ह्या शहरांत चीन देशांतून प्रतिवर्षीं हजारो रुपयांच्या रेशमाच्या पेट्या येतात, आणि रेशमाचे व्यापारी ह्मटले ह्मणजे पारशी, वाणी, मारवाडी, आणि भाटये आहेत. एथून व्यापारी लोक देशोदेशीं पाठवून देतात. देशोदेशांतून पुष्कळ तऱ्हेतऱ्हेचें रेशमी कापड येऊं लागलें व तें स्वस्त दरानें विकूं लागले. सबब अर्थात् खत्री लोकांस आपला मुळचा धंदा सोडणें भाग झालें.

मुंबईत कापसाचा व्यापार पुष्कळ होतो. हा कापूस बाहेर गांवांतून येतो. व एथून तो युरोपखंडांत व चीन देशांत जातो. ह्या बंदरांत कापसाचा व्यापार सुमारें सन १७५० सांपासून चालू झाला, असें अनुमान होतें. त्यापूर्वीं सर्व

व्यापार कल्याणच्या बंदरांत चालत असे. पुष्कळ वर्षांपासून कल्याण ही मोठी पेठ होती. प्रतिवर्षी सुमारें दोन कोटींचा कापूस एथून बाहेर जातो. कापसाचे गठ्ठे बाहेरून येतात तेव्हां सुमारें पांच हात उंच व अडीच हात रुंद इतके मोठे असतात. असे गठ्ठे जहाजांत भरून बाहेर पाठविण्यास जागा पुष्कळ लागते, त्यासाठीं पूर्वी एथें चिंचेच्या लांकडाचें एक साधें यंत्र करून त्यामध्यें ते गठ्ठे घालून थोडेसे लहान करीत. पुढें सन १६८४ मध्यें कंपनी सरकारानें एक लोखंडी गिरणी ( काटनस्क्रु ) एथें पाठवून दिली होती. परंतु पुष्कळ वर्षें पर्यंत तिचा उपयोग बराबर झाला नव्हता. सन १७९२ पासून गिरण्यांचें काम बराबर चालू झालें. आणि त्यांतून प्रतिवर्षी हजारो कापसाचे गठ्ठे दाबून बाहेर निघूं लागले. हें काम प्रथम पारशी लोकांनीं चालू केलें. प्रारंभीं दादाभाई पेस्तन्जी यांनीं कोटांत गिरणीचा कारखाना काढिला होता, त्यांत सहा गिरण्या होत्या. सद्यः अशा या लोकांच्या कोटामध्यें सुमारें ४० गिरण्या आहेत. व कुलाब्यास ५० आहेत. कुलाब्यास एक मोठा वाफेचा गिरणीचा कारखाना आहे तसा कोठें नाहीं असें सांगतात. पूर्वी गिरण्या फिरवायास शेंकडो मनुष्यें खपत असत. तें काम हल्लीं बहुतेक ठिकाणीं वाफेच्या यंत्रावर चालतें. चिंचबंदरावर मोतिशाचा गिरणीचा कारखाना आहे त्यांत सहा गिरण्या आहेत. ह्या कारखान्यांत वाफेचें यंत्र अजून सुरू केलें नाहीं, व अशा साध्या गिरण्या कोटांतही बऱ्याच आहेत.

चवदा मण कापूस ह्या गिरणींत घालून दाबला ह्मणजे तो दगडासारिखा घट्ट होऊन हात दीडहात उंच व अडीच हात लांब असा बेतवार गठ्ठा तयार होऊन सलग बाहेर पडतो. त्यामुळें व्यापारी लोकांस नोराबद्दल हजारो रुपये नफा होतो. ज्या जहाजामध्यें पूर्वी सुमारें तीन हजार गठ्ठे लादले जात होते त्यामध्यें असे दाबलेले गठ्ठे पांचसहा हजार राहूं लागले. यामुळें जहाजांच्या धन्यांचें उत्पन्न वाढलें. गिरणीमध्यें गठ्ठे बांधून तयार करून घेण्यास गिरणीच्या मालकास दर गठ्ठ्यास दीड रुपया द्यावा लागतो. एवढा खर्च होऊनही ह्यापासून व्यापाऱ्यांस प्रतिवर्षी लाखो रुपये नफा होऊं लागला.

सन १८०० मध्यें लवजी फ्यामिली ह्या जहाजाच्या धन्यास असे दाबलेले कापसाचे गठ्ठे भरल्यामुळें एका वर्षांत ३२,००० रुपये नोर जास्ती आला. याच प्रमाणें दुसऱ्या जहाजांसही नफा झाला. तसाच व्यापारी लोकांस कोणास

पंधरा कोणास वीस हजार रुपये नफा होऊं लागला. मुंबईमध्यें सर्व कारखाने मिळून १०० रांवर गिरण्या आहेत. ह्या कारखान्यांत कापसाचे गठ्ठे यंत्रामध्यें कसे दाबले जातात हें पाहावयास पुष्कळ लोक जातात.

कापसाच्या व्यापारांत मुंबईचे व्यापारी न्यहाल होऊन गेले आहेत. सन १८६०-६२ त तर या व्यापारांत कित्येक लक्षाधीश होऊन गेले. या सालीं टैम्स आफ् इंडिया नांवाच्या एका इंग्रजी पत्रांत असें लिहिलें होतें कीं, ह्या वर्षी मुंबईतील व्यापाऱ्यांस जसा कापसांत नफा झाला, तसा कोणत्याच देशीं कोणत्याच व्यापाऱ्यास कोणत्याच काळीं झाला नव्हता. अमेरिकेंतून पुष्कळ कापूस युरोपखंडांत व चीन देशांत जात असे, तो ह्या दोन वर्षांत त्यांत आपसांत द्वंद्व लागल्यामुळें बंद पडला; तेणें करून जो कापूस पूर्वी ऐशीं नव्वद रुपये खंडी होता त्याचा भाव चारशें पांचशें रुपये पर्यंत वाढला. ह्या वर्षांत जसा कापूस महाग जहाला तसा कोणत्याच वेळीं जहाला नव्हता असें सांगतात. कित्येक साधारण प्रतीच्या लोकांनीं आपआपल्या निजायाच्या कापसाच्या गाद्या व टेंकायाचीं लोडें फाडून त्यांतील कापूस आठ दहा रुपये मण या भावानें शेंकडो खंडी विकला. सन १८६२ त फक्त मुंबईत मोठ्या व्यापाऱ्यां पैकीं, कोणाला सत्तर, कोणाला चाळीस, कोणाला तीस, कोणाला दहा, लक्ष रुपये नफा जहाला. सन १८६२ आगष्ट महिन्याच्या गार्डियन नांवाच्या एका इंग्रजी पत्रांत असें लिहिलें होतें. एका लवाण्याचा मुकादम ज्याला दरमहा पंचवीस रुपये मिळतात त्यानें या दोन वर्षांत ह्मणजे १८६०-६२ त कापसाच्या व्यापारांत दोन लक्ष रुपये मिळविले. सन १८६१ सालीं फक्त युरोपखंडांत मुंबईहून ७,१७,८२१ कापसाचे गठ्ठे गेले. सन १८६२ त ह्या शहरांत दहा पंधरा कोटी रुपयांची कापसाप्रकरणीं उलाढाली झाली.

मुंबईत इतक्या गांवांतून कापूस येतो, आणि हा बहुत करून कुलाब्याच्या बंदरांत उतरतो. भडोच, सुरत, जंबुसर, धोलेरा, भावनगर, उमरावती, बारशी, नगर, मंगळोर, कुमटें, धारवाड, खानदेश, वेरावली, महवा ( ह्मो ), पोरगांव, अकोट, आणि नागपुर.

पुष्कळ वर्षांपासून इंग्लंड देशांत लक्षावधि रुपयांचा कापूस अमेरिकेहून जात असे, तेणेंकरून शेंकडो कापड विणणाऱ्यांचे कारखाने चालत. त्यांवर हजारो मजूर व इतर कारभारी लोकांची उपजीविका चाले. परंतु सन १८६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

व्यापार कल्याणच्या बंदरांत चालत असे. पुष्कळ वर्षांपासून कल्याण ही मोठी पेठ होती. प्रतिवर्षीं सुमारें दोन कोटींचा कापूस एथून बाहेर जातो. कापसाचे गठ्ठे बाहेरून येतात तेव्हां सुमारें पांच हात उंच व अडीच हात रुंद इतके मोठे असतात. असे गठ्ठे जहाजांत भरून बाहेर पाठविण्यास जागा पुष्कळ लागते, त्यासाठीं पूर्वीं एथें चिंचेच्या लांकडाचें एक साधें यंत्र करून त्यामध्यें ते गठ्ठे घालून थोडेसे लहान करीत. पुढें सन १६८४ मध्यें कंपनी सरकारानें एक लोखंडी गिरणी ( काटनस्क्रु ) एथें पाठवून दिली होती. परंतु पुष्कळ वर्षें पर्यंत तिचा उपयोग बराबर झाला नव्हता. सन १७९२ पासून गिरण्यांचें काम बराबर चालू झालें. आणि त्यांतून प्रतिवर्षीं हजारो कापसाचे गठ्ठे दाबून बाहेर निघूं लागले. हें काम प्रथम पारशी लोकांनीं चालू केलें. प्रारंभीं दादाभाई पेस्तनजी यांनीं कोटांत गिरणीचा कारखाना काढिला होता, त्यांत सहा गिरण्या होत्या. सद्यः अशा या लोकांच्या कोटामध्यें सुमारें ४० गिरण्या आहेत. व कुलाब्यास ५० आहेत. कुलाब्यास एक मोठा वाफेचा गिरणीचा कारखाना आहे तसा कोठें नाहीं असें सांगतांत. पूर्वीं गिरण्या फिरवायास शेंकडो मनुष्यें खपत असत. तें काम हल्लीं बहुतेक ठिकाणीं वाफेच्या यंत्रावर चालतें. चिंचबंदरावर मोतिसाचा गिरणीचा कारखाना आहे त्यांत सहा गिरण्या आहेत. ह्या कारखान्यांत वाफेचें यंत्र अजून सुरू केलें नाहीं, व अशा साध्या गिरण्या कोटांतही बऱ्याच आहेत.

चवदा मण कापूस ह्या गिरणींत घालून दाबला ह्मणजे तो दगडासारिखा घट्ट होऊन हात दीडहात उंच व अडीच हात लांब असा बेतवार गठ्ठा तयार होऊन सलग बाहेर पडतो. त्यामुळें व्यापारी लोकांस नोराबद्दल हजारो रुपये नफा होतो. ज्या जहाजामध्यें पूर्वीं सुमारें तीन हजार गठ्ठे लादले जात होते त्यामध्यें असे दाबलेले गठ्ठे पांचसहा हजार राहूं लागले. यामुळें जहाजांच्या धन्यांचें उत्पन्न वाढलें. गिरणीमध्यें गठ्ठे बांधून तयार करून घेण्यास गिरणीच्या मालकास दर गठ्ठ्यास दीड रुपया द्यावा लागतो. एवढा खर्च होऊनही ह्यापासून व्यापाऱ्यांस प्रतिवर्षीं लाखो रुपये नफा होऊं लागला.

सन १८०० मध्यें लवजी फ्यामिली ह्या जहाजाच्या धन्यास असे दाबलेले कापसाचे गठ्ठे भरल्यामुळें एका वर्षांत ३२,००० रुपये नोर जास्ती आला. याच प्रमाणें दुसऱ्या जहाजांसही नफा झाला. तसाच व्यापारी लोकांस कोणास

पासून त्या खंडांत आपसांत कलह उत्पन्न झाल्यामुळें लढाई उद्भवली, तेणेंकरून कापसाच्या लागवडीस प्रतिबंध झाला आणि इंग्लंड देशांत कापूस जाणें महकूब झालें. त्यामुळें ल्यांकेशायर प्रांतांतील लोकांस उद्योग नाहींसा होऊन ते उपाशीं मरूं लागले, व त्यांत मोठा दुष्काळ पडला. अशा ह्या लोकांची संख्या सुमारें पंचवीस तीस हजार होती असें सांगतात.

अमेरिकेंत कापसाच्या पिकास प्रतिबंध झाल्यामुळें मुंबईतील व्यापाऱ्यांस अतोनात नफा जहाला. जो कापूस पूर्वी ५०–६० रुपये खंडी विकत होता त्याची धारण ५००–६०० रुपये चढली. त्यामुळें मुंबईतील कापसाच्या व्यापाऱ्यांच्या घरांवर केवळ सुवर्णवर्षाव झाला.

अशा अबादानीच्या हंगामांत मुंबईतील व्यापाऱ्यांनीं व दुसऱ्या धनिक लोकांनीं ल्यांकेशायर प्रांतांतील लोकांचें दुःख दूर करण्यास मदत करावी असी मुंबईतील गव्हर्नराकडून व दुसऱ्या गृहस्थांकडून शरिफद्वारा सूचना जहाली. त्यावरून तारीख १७ सप्टेंबर सन १८६२ रोजीं टौनहालांत सभा भरली होती. त्या समयीं सुमारें मुंबईतील बडे लोकांपैकीं सातसें आठशें गृहस्थ जमले होते. आणि अध्यक्षस्थानीं सर ब्रार्टल् फ्रियर साहेब बसले होते. त्यांनीं, सर आलेक्झांडर ग्रांट, डाक्तर मरे मिचल, डाक्तर भाऊ दाजी यांनीं व दुसऱ्या कित्येकांनीं सुरस भाषण करून जे मानवी प्राणी अन्नवस्त्राची आपदा भोगीत आहेत त्यांचीं दुःखें दूर करण्यास पुढारी होणें हा मुंबईतील गृहस्थांचा धर्म आहे असें दर्शविलें. मग एक याद करून वर्गणी जमविण्यास सुरू केलें. त्या वेळीं शेट रस्तम्जी जमशेटजी जिजीभाई यांनीं व खरशेटजी फर्दुन्जी पारख यांनीं पंचवीस पंचवीस हजार रुपये टिपींत भरले. व बाकीच्यांनीं कोणी सात, कोणी पांच, कोणी दोन, कोणी एक, हजार अशा रकमा भरल्या. असे ह्या एका बैठकीसच १,०९,००० रुपये जमले. आणखी थोडक्या काळांत सुमारें तीन लक्ष रुपये झाले.

कलिकोट, मलबार, गोमांतक, मालवण, इत्यादि ठिकाणांतून काथ्याचे दोर व सुंब एथें येतें. मोठे तारवाचे दोर ज्यांला चऱ्हांट असें ह्मणतात ते बहुधा मलबार, कर्नाटक, वगैरे देशांतून येतात. नारळांच्या चोडांचा काथा हजारो खंडी मुंबईमध्यें येतो. व एथेंही तो तयार होतो. त्याच्या दोऱ्या वळतात तारवाचीं मोठमोठालीं चऱ्हांटें तयार करण्याचे कारखाने एथें जिकडेतिकडे आहेत.

तीनशें चारशें हात लांब हत्तीच्या पाया एवढे जाड चार पांच खंडी वजनाचे मजबूत दोर एथें होतात. या कारखान्यास कडदोरी असें ह्मणतात. पांजरपोळाच्या मागें, डंकन रोड, चौपाटी, चिंचबंदर, कामाठपुर एथें जिकडेतिकडे कडदोऱ्या आहेत. या वखारी एक सारिख्या पंधरा वीस हात लांब असून त्यांत आबडधोबड लांकडी यंत्रें आहेत. एथें काथ्याचे, आंबाडीचे, आणि तागाचे दोर वळतात. मोठमोठाले जाड दोर कसे तयार करितात हें पाहायाचें असलें तर ह्या कारखान्यांत जाऊन पाहावें. हे दोर लोखंडी सांखळां पेक्षांही मजबूत असतात. व ते तिर्कटी व दुसऱ्या तारवांच्या नांगरांस बांधायास खपतात.

कोटाच्या चौकाजवळ तीनचार पारशी लोकांचीं मोठीं दुकानें आहेत, त्यांत व चिंचबंदरावर कित्येक भाट्यांचीं दुकानें आहेत त्यांत तारवांचें अनेक सामान विकतात. तेथें हे दोर शेंकडो मण वजनाचे पडलेले आहेत. मुंबईत अनेक कारखाने आहेत. त्या सर्वांचें वर्णन करणें ह्मटलें ह्मणजे भारता एवढा ग्रंथ लिहिला पाहिजे.

आज पर्यंत व्यापार संबंधीं यंत्रें व दुसरे कारखाने चालू करण्याविषयींचे प्रयत्न बहुधा पारशी लोकांकडूनच झाले. गिरण्यांचे कारखाने प्रथम त्यांनीं घातले. छापखानाही त्यांजकडूनच सुरू झाला. गोदींत तारवें बांधण्याचें काम त्यांनींच पत्करिलें. गोदींतील चीफ इंजनियरांचें काम त्यांसच मिळालें. सूत काढण्याचें व कापड विणण्याचीं यंत्रें त्याजकडूनच उपस्थित झालीं. चीन, इंग्लंड, व अमेरिका इत्यादि देशांत जाऊन तेच व्यापार करूं लागले. सारांश व्यापार संबंधी व दुसऱ्या मोठमोठाल्या कृत्यांत आजपर्यंत हेच पुढारी झाले. ते सर्व खंडांत जातात व ह्मटला तो उद्योग करितात. ह्मणूनच त्यांचे घरीं लक्ष्मी वास करिते. हे त्यांचे गुण ग्राह्य असून स्तुत्यर्ह आहेत. हिंदूलोक ह्या गोष्टींत त्यांचा कित्ता घेतील तेव्हांच वैभवास व योग्यतेस चढतील. नाहीं तर अविंदाचे किंवा यवनाचे घरीं लक्ष्मी गेली, हा कलीयुगाचा महिमा आहे, असें ह्मणून हात पाय गाळून बसणें यांत कांहीं फळ नाहीं. लक्ष्मी सर्व युगांत सारखीच आहे. तिला जाति, वर्ण व मतभेद नाहीं. ती अतिशूद्रापासून ब्राह्मणाचे घरीं देखील एक सारिखीच संतोषानें नांदती. जसी तिची स्थिति सत्ययुगांत चंचल होती तसीच कलियुगांतही आहे. तींत अणुमात्र देखील फेर पडला नाहीं. ती सर्वकाळ उद्योगाची दासी आहे. जेथें उद्योग, सुशीलता, निष्ठा

आणि धर्म आहे तेथें लक्ष्मीचा वास झाला, असें निखालस समजावें. यावर कबीर असें ह्मणतो.

॥ चिंतासे चतुराय घटे दुःखें घटे सरीर ॥
॥ पापसें लछ्मी घटे कहगये दास कबीर ॥

आळस हें पापाचें घर. ह्याची ज्या लोकांत वृद्धि ते लोक दरिद्री होतात. आणि दारिद्य झालें ह्मणजे त्याच्या मागें अनेक दोष लागले ह्मणून समजावें; दुसरें कांहीं नाहीं. इंग्रज, पारशी, वाणी, मुसलमान, यांमध्यें उद्योग वाढला. ह्मणून अर्थातच त्यांच्या घरीं लक्ष्मी पाणी वाहूं लागली. मुंबईत ऐश्वर्य पाहावें तर याच लोकांचें. दक्षिणी लोकांत कांहीं तादृश हशील नाहीं.

॥ उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः ॥
॥ दैवं प्रधानमिति कापुरुषा वदंति ॥

भरतखंडांतील लोकांस शिलाछाप ह्मणजे काय ? व ठसेछाप ह्मणजे काय ? हें पुष्कळ वर्षें पर्यंत स्वप्नींही ठाऊक नव्हतें. छापल्यानें कागदावर अक्षरें निघतात व त्यापासून पुस्तकें तयार होतात ह्मटलें ह्मणजे या लोकांस मोठें अद्भुतच वाटे. एकादा छापलेला कागद पाहिला ह्मणजे स्वर्गाहून विमान आल्यासारिखें लोक पाहायाला जमत. पुढें सन १७७७ त रस्तमूजी केरसासजी या नांवाच्या एका पारशी गृहस्थानें प्रथम मुंबईत छापखाना आणिला. आणि सन १७८० चें इंग्रजी पंचांग छापिलें. नंतर सन १७९० मध्यें ग्याझेट नांवाचा छापखाना व इंग्रजी वर्त्तमानपत्र चालू झालें. त्या मागून एक दोन वर्षांनीं कुरियर नांवाचा छापखाना व इंग्रजी वर्त्तमानपत्र चालू झालें. मग हळूहळू गुजराथी, मराठी, असे छापखाने चालू झाले. मराठी अक्षरांचे ठसे प्रथम अमेरिकन मिशन छापखान्यांतून निघाले. मिशनारी लोकांनीं ह्या शहरांत लोकोपयोगी कृत्यें पुष्कळ केलीं. त्यांचें पुढें कारणपरत्वें वर्णन करण्यांत येईल, मराठी शिलाछापही त्यांकडूनच चालू झाला.

अमेरिकन मिशनारींनीं सन १८१३ त छापखाना घालून ख्रिस्ती धर्म प्रकरणीं मराठी भाषेंत शिला छापावर पुस्तकें छापण्याचा कारखाना सुरू केला. हीं त्यांचीं पुस्तकें छापून बाहेर पडलेलीं पाहून मयत गणपत कृष्णाजी यांच्या मनांत शके १७६२ ह्मणजे सन १८४० मध्यें आलें कीं, आपणही असाच कारखाना उभारून हिंदुधर्म प्रकरणीं व दुसरीं पुस्तकें छापावीं. परंतु छापायाचीं साधनें

यांजपाशीं कांहीं नव्हतीं, व तीं त्यावेळीं मुंबईंत उपलब्धही नसत. मग त्यांनीं अमेरिकन मिशनारींची कृति पाहून स्वतः आपल्या युक्तीनें प्रेस ( छापखाना ) तयार करण्याचे उद्योग मांडिले. हे गृहस्थ भंडारी जातीचे असून कुशळ, बुद्धिमान्, धोरणी, व हिंदुधर्मावर निष्ठा ठेवणारे होते. प्रथम त्यांनीं एक लांकडी यंत्र आपल्या हातानें तयार केलें. आणि लहान शिलांचे तुकडे जिकडून तिकडून जमवून त्यांवर अक्षरें कशीं उठतात ही कृति करून पाहिली. मग शाई वगैरे कशी करितात त्याच्या शोधास लागले. प्रथम त्यांनीं आपल्याच तर्कानें दोन चार प्रकारची शाई करून पाहिली. मग हळूहळू श्रम आणि उद्योग ईंही करून त्यांनीं ही सर्व कृति साध्य करून घेतली. जसजसें हें काम त्यांला साधत गेलें तसतसी उमेद येऊन त्यांनीं सर्व गोष्टी आपणास अनुकूल करून घेतल्या. त्यांचें सगळें धोरण छापखान्याच्या कामांत गम्य करून घेण्याकडे लागलें होतें. आणि तें त्यांनीं साध्य करून घेतलें. मग त्यांनीं एथेंच एक लोखंडी प्रेस करवून मोठ्या शिला विकत घेऊन लहानलहान ग्रंथ छापण्याचें काम सुरू केलें. शके १७५३ त यांनीं आपण स्वतः लिहून त्या वर्षाचें मराठी पंचांग छापिलें. त्यापूर्वीं मराठी छापील पंचांग कोणासच ठाऊक नव्हतें. आणि ह्या पंचांगाची किंमत दर प्रतीस आठ आणे ठेवून विकीत असत. यांचें पंचांग शुद्ध असून नीट छापलेलें पाहून ब्राह्मण लोक जरी छापील पुस्तकास शिवायास कांकू करीत असत तरी ते संतोषानें हीं पंचांगें विकत घेऊन ह्याच पंचांगांवरून संवत्सर प्रतिपदेचे दिवशीं वर्षफळ वाचूं लागले. मग यांनीं छापलेले कांहीं ग्रंथ नेऊन डाक्तर विलसन, पाद्री ग्यारेट व पाद्री आलन् यांस दाखविले. ते पाहून हे साहेब फार खुश झाले. आणि गणपत कृष्णाजीच्या बुद्धीची प्रशंसा केली. आणि यांच्या उद्योगास उत्तेजन द्यावें ह्मणून आपणांकडून कांहीं छापण्याचें काम देऊं लागले. मग जिकडेतिकडे यांच्या छापखान्याची प्रसिद्धि होऊन काम वाढत गेलें.

शके १७६५ मध्यें यांनीं स्वतः टैप करण्याचें कसब साध्य करण्याचा उद्योग मांडिला. आणि मोठ्या प्रयत्नानें अक्षरांचे सांचे तयार करून ते ओतिवण्याचा कारखाना घातला. आणि सर्व प्रकारचीं अक्षरें तयार करून टैपाचा छापखाना चालू केला. ह्याप्रमाणें त्यांनीं ह्या दोनही छापखान्यांवर हजारो गुजराथी आणि मराठी ग्रंथ छापिले. यांचे छापखान्यांत जसें काम तयार होतें तसें बहुधा दुसऱ्या मराठी छापखान्यांत कोठेंच होत नाहीं. हे थोडें थोडें इंग्रजीही काम छापितात.

चित्रें, नकशी, कोरींव, कांतीव व वेलबुटी काढण्याचें काम हे स्वतः करीत. यांच्या छापखान्यांत तयार होतें तसें पंचांग दुसऱ्या कोठेंच होत नाहीं. ह्यांच्या पंचांगाची सर्वत्र आख्या आहे. दुसऱ्या ठिकाणीं छापलेलीं पंचांगें आणा अर्ध आण्यास मिळतात. परंतु ह्यांचीं पंचांगें चार आण्यांखालीं विकीत नाहींत. तथापि तीं लोक संतोषानें घेतात. हल्लीं यांचा कारखाना मोठा वाढला आहे. आणि एथें पुष्कळ सरकारी व सावकारी काम छापितात. शके १७८२ मध्यें ह्या गृहस्थास देवाज्ञा झाली. परंतु हा त्यांचा कारखाना त्यांचे चिरंजीव राजश्री कानोबा गणपत त्यांच प्रमाणें चालवितात. व हेही मोठे गुणवान् व सभ्य पुरुष आहेत. तीर्थरूपांमागें यांनीं बराच लौकिक मिळविला.

आमचे कित्येक भोळे व नैष्ठिक ब्राह्मण छापलेल्या कागदांस स्पर्श करण्यास भीत असत. आणि अद्याप मुंबईंत व बाहेर गांवीं छापील कागदास शिवत नाहींत, व छापलेलें पुस्तक वाचीत नाहींत असे पुष्कळ सांपडतील. परंतु ही एक मोठी आनंदाची गोष्ट आहे कीं, हल्लीं मुंबईंत इंग्रजी, मराठी, हिंदुस्थानी आणि गुजराथी मिळून सुमारें ४० छापखाने आहेत. इंग्रजी वर्त्तमानपत्रें ७ व मासिक पुस्तकें ४ आहेत. गुजराथी वर्त्तमानपत्रें १० व मासिक पुस्तकें ५, मराठी वर्त्तमानपत्रें ५ व मासिक पुस्तकें ६, हिंदुस्थानी वर्त्तमानपत्र १ व पोर्टुगीझ् १ आहे. याशिवाय दरमहा शाळांकरितां मराठी व गुजराथी ग्रंथ हजारो छापून बाहेर पडतात. असेच अनेक तऱ्हेचे दुसरे ग्रंथ धर्मप्रकरणीं व दुसऱ्या विषयांवर छापून प्रगट होतात. पाद्री लोकांचे अनेक भाषांत प्रतिवर्षीं असंख्यात ग्रंथ छापून सर्व शहरभर पसरले जातात. भायखळयास एज्युकेशन सोसायटीझ प्रेस, किल्ल्यांत एक्स्चेंज प्रेस आणि डोंगरीवर गणपत कृष्णाजीझ् प्रेस हे छापखाने मोठे असून पाहण्या जोगते आहेत.

ग्रंथ छापायास प्रारंभ झाल्यापासून पारशी लोकांत विद्येची अभिरुचि उत्पन्न झाली. ह्या लोकांत गरीब गुरीब लोक देखील आपल्या मुलांस शाळेंत पाठवून विद्याप्रीत्यर्थ द्रव्याचा व्यय करूं लागले. पूर्वीं पारशी लोक ह्मटले ह्मणजे ख्यालीखुशाली व मौज तमासे यांमध्यें बहुत आपलें आयुष्य खर्चीत. थोडेसें गुजराथी व सही करण्यापुरतें इंग्रजी आलें ह्मणजे व्यापार धंद्यास लागत. त्यावेळीं हिंदू लोकांस इतका अभिमान होता कीं विद्वान् होणारे काय ते आह्मी. इंग्रजी बोलणारे व लिहिणारे आह्मा मागें. आणि गणितामध्यें आणि ज्योतिःशास्त्रामध्यें आमची टांच

धरणारा कोणी नाहीं. हा अभिमान त्यांचा आतां सोवळ्याचे काठीस बांधून ठेवणें भाग पडलें आहे. त्याचप्रमाणें इतर गुजराथी लोकांतही कमजास्त असा विद्येचा प्रकाश पडूं लागला. पारशी लोकांत वाचण्याची गोडी लागल्यामुळें गुजराथी ग्रंथ पुष्कळ खपून ग्रंथकर्त्यांस उत्तेजन येऊं लागलें, व त्यांमध्यें शाळा पुष्कळ उपस्थित झाल्या ह्मणून सर्व प्रकारें त्यांचा उत्कर्ष होत चालला आहे. दक्षिणी हिंदु लोकांत अजून मराठी ग्रंथ अथवा वर्त्तमानपत्रें वाचण्याची गोडीच लागली नाहीं. आमच्या लोकांस मराठी ग्रंथ वाचण्याचाच आळस इतकेंच केवळ नाहीं, परंतु इंग्रजी ग्रंथ तरी लक्ष लावून वाचायास ते कोठें इच्छितात. सांप्रत काळीं त्यांचीं मनें बहुत करून ख्यालीखुशालीकडे व डामडौलाकडे लागलीं आहेत. ह्या लोकांस इतकें मात्र पक्कें ठाऊक आहे कीं, जें हजार वर्षांमागें वहिवाटींत आलें होतें तेंच अद्याप चालवावें. त्यांत कांहीं फेरफार करूं नये. मग त्यापासून कल्याण होवो किंवा अकल्याण होवो. इंग्रज लोकांमध्यें प्रतिवर्षीं नवे कायदे आणि नव्या रीतिभाती होतांत व जी गोष्ट त्यांच्या कल्याणास अनुकूल होईल तिचें ते अवलंबन करितात. व विचारानें वागतात. ह्मणूनच ते सुखी झाले. तसाच कांहीं प्रकार सद्यः बहुधा पारशी लोकांनीं चालविला आहे. हिंदूलोक जितके शिकतात तितके मागें हटतात. ज्या गोष्टी वडिलोपार्जित चालल्या आहेत त्यां वांचून त्यांस कांहीं सुचत नाहीं. कृतायुगांतील नियम आज कलीयुगांत इंग्रजी राज्यांत जर आमचे लोक चालविण्याची इच्छा धरूं लागले, तर मग त्यांच्या ज्ञानाचा किती प्रकाश पडेल हें सहज एकादा कोळी माळी देखील सांगेल.

मुंबईत दिवसानदिवस नवेनवे कारखाने उपस्थित होतच आहेत. कांहीं वर्षांपासून विद्युत्यंत्राच्या योगानें तांब्याच्या व पितळेच्या भांड्यांस रुपेरी मुलामा देण्याचे कारखाने जिकडेतिकडे चालू झाले होते. आणि जो उठला तो भांड्यांस व गाडीच्या सामानास स्वस्थ मोलानें मुलामा लावून घेत असे. असे कारखाने जिकडेतिकडे पुष्कळ होते. यांस इलेक्ट्रो प्लेटिंग आणि गिल्डिंग असें ह्मणतात. या रीतीनें मुलामा काढलेला चांगला सफाईदार निघून पुष्कळ दिवसपर्यंत टिकतो.

सूर्य किरणाच्या योगानें तसबिरी काढण्याचे कारखाने हल्लीं एथें जिकडे तिकडे झाले आहेत. ह्या काढण्याचें यंत्र असतें, त्यास क्यामिरा असें ह्मणतात. त्याच्या योगानें मनुष्यांचे चेहरे, पशूंचीं चित्रें, घरांचे व देशांचे देखावे वगैरे सर्व काढितां येतात. हें यंत्र उन्हांत ठेवितात व ज्या मनुष्याचा चेहरा काढायाचा

असतो त्याला त्याचे समोर दोन चार पळें उभा करितात; व ज्या काचेवर किंवा कागदावर तसबीर काढायाची असते तो कृतीप्रमाणें तयार करून त्यांत घालितात. मग लागलीच त्यावर हुबेहुब तसबीर निघते. ही कृति सुलभ असून फार चमत्कारिक आहे. हीं चित्रें तयार करितानां पाहिलें ह्मणजे मोठें नवल वाटतें. असे चेहरे काढणारे हल्लीं सुमारें तीस चाळीस असामी सांपडतील. पुष्कळ तरुण गृहस्थांनीं ही विद्या साध्य करून घेतली आहे. कित्येक आपआपल्या घरीं कारखाना घालून आपल्या इष्टमित्रांचे चेहरे काढितात. डाक्तर नारायण दाजी, व हरिश्चंद्र चिंतामण हे हिंदुलोकांत या कामांत हुशार आहेत. रा० हरिश्चंद्र चिंतामण यानें किल्ल्यांत मोठा कारखाना घातला आहे, व या शास्त्रावर एक लहानसा मराठींत ग्रंथ छापविला आहे. इंग्रज लोकांपैकीं मि० जान्सन् हे मोठे प्रख्यात आहेत, यांनीं घारापुरी, कान्हेरी व दुसऱ्या चमत्कारिक स्थलांचीं, इमारतींचीं, देवालयांचीं वगैरे या कृतीनें चित्रें काढिलीं आहेत. अणखी या शहरांतील प्रत्येक जातीच्या स्त्रियांचीं व पुरुषांचीं चित्रें काढून महाराणीस नज़र करण्याकरितां नेलीं आहेत. या कामांत यांची फारच प्रशंसा करितात. यांत दुसरी एक खुबी आहे ती असी कीं, कोणाचीही एक तसबीर काढिली असतां ती वरून दुसऱ्या शेंकडो काढितां येतात.

ह्या शहरांत अमेरिका खंडांतून बर्फ देखील प्रतिवर्षीं मोठमोठालीं तिर्कटी तारवें भरून येतें. हें ऐकून आमच्या कित्येक लोकांस विस्मय होईल. हें थिजलेलें पाणी ज्यास बर्फ असें ह्मणतात तें एथें प्रतिदिवशीं किमानपक्ष हजार दोन हजार रुपयांचें तरी खपत असेल. ह्याच्या मोठमोठाल्या वखारी भरलेल्या आहेत. हें दगडासारिखें घट्ट असून ह्याचीं खंडीखंडी वजनाचीं ढेपें असतात, आणि याचा रंग स्फटिकासारिखा शुभ्र असतो. ह्याचे कुन्हाडींनीं फोडून तुकडे करितात ह्यास किंचित् हवा लागली ह्मणजे तें वितळून त्याचें पाणी होतें. तें मोठ्या जतनेनें ठेवावें पडतें. ज्या वखारींत बर्फ ठेवितात तीस शिशाचे पत्रे मारलेले असतात. व हवा आंत जाऊं नये ह्मणून जिकडे तिकडे फार बंदोबस्त केलेला असतो. हें तोलून रुपयास आठ दहा रत्तल ह्या भावानें विकतात. हें फार थंड आहे. ह्याचा खप इंग्रज, पोर्टुगीझ्, पारशी व मुसलमान लोकांत फार, परंतु हिंदु लोकांत कोठें विरळा, बर्फ घरीं आणिलें तर बुर्णुसांत किंवा ऊर्णावस्त्रांत गुंडाळून ठेविलें पाहिजे, नाहीं तर त्याचें लागलेंच पाणी होतें. पाहा—इंग्रजलोक

परखंडांतील पाणी देखील आणून त्या पासून द्रव्य उत्पन्न करितात. असे त्यांचे उद्योग अनुपमेय आहेत. ह्या बर्फाच्या वखारीहि चमत्कारिक रीतीनें बांधिल्या आहेत. ह्या वखारी किल्ल्यांत आहेत. मुंबईत अनेक चमत्कार आहेत ते पाहाण्याचा आळस करून कित्येक अविचारी लोक शेंकडो कोसांवर साधारण नाच तमाशे व जत्रा पाहायास जातात. जर हे लोक मुंबईतील प्रत्येक कारखाना पाहून त्या पासून ज्ञान ग्रहण करून त्या प्रमाणें वागतील, तर ते सर्व गोष्टींत निपुण होतील.

देहींच देव असतां कांरे भ्रमतोसि व्यर्थ तूं रानीं ॥
नाभींत गंध असतां कस्तुरिमृग जेंवि हिंडतो रानीं ॥

इंग्रज लोकांचे उद्योग आणि शोध अवर्णनीय आहेत. जें जें ते करतात तें अद्‌भुत आहेत असेंच ह्मटलें पाहिजे. आजपर्यंत हजारो खंडी बर्फ अमेरिकेंतून आणीत. परंतु हल्लीं सन १८६२ त कित्येक इंग्रज व्यापाऱ्यांनीं पाहिलें कीं, हें इतक्या दुरून आणण्यास फार प्रयास पडून महाग विकतें तर हें एथेंच तयार करण्याचे प्रयत्न मांडावे. ही किती अलौकिक कल्पना आहे ती पाहा ! जें बर्फ स्वाभाविक ईश्वरी नियमानें तयार होतें तसें कृतीनें तयार करायाचें ! हें तयार करण्यास गिरगांवांत एक मोठें घर बांधिलें आहे आणि त्यांत अनेक तऱ्हेचीं बर्फसाधनीभूत यंत्रें आहेत. ही कृति पाहून मनुष्याची मति कुंठितच होती. एथें विहाडचें पाणी नळांतून आणलें आहे. त्याचें वाफेच्या योगानें बर्फ करितात. ह्या यंत्रांत हें पाणी जातें आणि स्फटिका सारिखें शुभ्र व कठीण होऊन बाहेर निघतें. एथें प्रतिदिवशीं दोनशें तीनशें खंडी बर्फ तयार होतें. हें दररत्तलास पाऊण आणा या दरानें विकतात. ह्या बर्फाची कृति कसी होती हा अभिनव चमत्कार पाहायास पहिल्या दिवशीं पुष्कळ लोक गेले होते, व अद्याप जातात.

सन १८४३ त कित्येक व्यापारी व सरकारी कामदार इंग्रज गृहस्थांनीं पाहिलें कीं, आगीच्या गाडीपासून आपल्या देशांत पुष्कळ लाभ व सुख प्राप्त होतें. तर भरतखंडस्थ लोकासही त्याचे विभागी करावें असें मनांत आणून त्यांनीं ह्या देशांत लोखंडी सडका बांधण्यास सुरू कराव्या असा उपक्रम काढिला व आपला मनोदय लोकांस जाहीरपणें कळवून एक दोन सभा मिळविल्या आणि या कामास लोकांनीं द्रव्याचा सह्यय करून आपलें हित करून घ्यावें असें दर्शविलें. परंतु कित्येक लोकांस तें न आवडून त्यांनीं भलतेच कुतर्क काढिले. ते असे कीं

इंग्रज लोक भरतखंडांतील द्रव्य गोळा करून नेण्यास ही नवी युक्ति काढीत आहेत, व आपलें कार्य साधून घेण्यास निरनिराळे देश करायास पाहातात. अशीं पुष्कळ दूषणें देऊन हें काम चालू होऊं नये म्हणू यत्न केला. कित्येकांस असी भीति प्राप्त झाली कीं, लोखंडी सडका चालू झाल्यानें लोक दरिद्री होऊन त्यांचे व्यापार बुडतील, व गरीब गुरिबांचे हाल होतील. ह्मणून या कामास आश्रय देण्यास फारसे पुढारी झाले नाहींत.

सन १८४४ सालीं या कामावर मिस्तर चापमन् नेमिला, त्यानें याप्रीत्यर्थ हजारो रुपये जाहिरातीबद्दल खर्चिले, व हरयुक्ति करून लोकांचीं मनें वळवून लोखंडी सडका बांधण्याचा ठराव केला. तथापि लोकांकडून हवें तितकें द्रव्य बाहेर पडेना. मग सरकारानें ही गोष्ट मनावर घेऊन मोठ्या उदार बुद्धीनें आपली मोसबेदारी कबूल केली. तेव्हां लोकांस थोडा धीर आला. आणि त्यांकडून पैका बाहेर निघूं लागला. ह्या मंडळीचें भांडवल १,५०,००,००० रुपये जमलें. हल्लीं तिचें भांडवल ८,००,००,००० आहे असें सांगतात.

जेव्हां लोखंडी सडका बांधण्यास प्रारंभ झाला, तेव्हांही कित्येक अज्ञानी लोकांनीं भलत्याच अफवा उठवून लोकांचे मनांत विकल्प आणण्याचे प्रयत्न मांडिले. कोणी असी गप्प उठवावी कीं, रस्ते तयार होण्यास कोठें कोठें दंपत्याची बळी द्यावी पडती. दुसरी असी बातमी सांगत कीं, कोठें कोठें लहान मुलांस सडकांखालीं गाडावीं पडतात. अशा भलत्याच कल्पना काढून ते लोकांचीं मनें विरस करून टाकीत. ज्यावेळीं खोपवलीची सडक तयार होत होती त्यावेळीं कोणी एक असी विलक्षण अफवा उठविली कीं, त्याठिकाणीं कोणी राक्षस आहे त्याला द्वारा दंपत्यांची बळी द्यावी लागते. ती देण्याकरितां शिपाई लोक रस्तोरस्ती बायकांस व मुलांस धरून नेतात. परंतु थोडक्याच काळानें आपला मूर्खपणा त्यांचे ध्यानांत आला. याप्रकारचा आमचे लोकांचा अज्ञानपणा आहे. इंग्रजलोक मनुष्याचा आत्मा व शरीर किती अमोलिक मानितात, आणि त्यांचें रक्षण करायास किती प्रयत्न करितात, व पिशाचांवर त्यांचा कोणत्या प्रकारचा भरंवसा आहे, हें अजून आह्मामधील कित्येकांस ठाऊक नसल्यामुळें ते या प्रकारच्या गप्पा झोंकितात. तारीख १६ माहे एप्रिल सन १८५३ या दिवसीं संध्याकाळींचे पांच वाजतां मुंबई एथें आगीची गाडी प्रथम चालू झाली. त्या दिवशीं सर्व सरकारी व सावकारी कामदारांस सुटी मिळाली होती. आणि हा समारंभ पाहायास गांवो-

गांवांहून हजारो लोक मुंबईस जमले होते. गाडी चालू होण्यापूर्वी दोन तीन तास बोरीबंदरापासून परळ पर्यंत लोकांच समुदाय जमला होता. आणि जेव्हां गाडी चालतानां लोकांच्या दृष्टीस पडली तेव्हां तिचा वेग पाहून ते मोठे चकित झाले आणि घडीघडी टाळया पिटून आपला हर्ष दाखवूं लागले.

या गाडी मध्यें मुंबईचे गव्हर्नर आदिकरून मोठमोठाले हुद्देदार व सरकारी कामदार इंग्रज व दुसरे शेट सावकार मिळोन चारशें गृहस्थ बसले होते. गाडीस तीन वाफेचीं यंत्रें लाविलीं होतीं. व वीस मोठे रथ जुंपिले होते. ही गाडी पांच वाजतां बोरीबंदराहून निघाली ती सुमारें सहा वाजायाचे सुमारास ठाण्यास गेली व तेथून रात्रीस सुमारें आठ वाजतां परत मुंबईस आली हा भरतखंडांत एक नवाच शक सुरू झाला असें कित्येक सुज्ञलोक ह्मणतात.

**कटाव.**

हिंदुस्थानीं, अगीची गाडी,
तिला बांधला, मार्ग लोखंडी,
मनाचाही, वेग मोडी,
मग कैंचीं, हत्ती घोडीं,
पाहुनि झालीं, माणसें वेडीं,
पाउण तासांत, ठाण्यास धाडी,
अधीं निघाली, युरोप खंडीं,
प्रसार मोठा, तिचा इंग्लंडीं,
तेथुनि आली, भरत खंडीं,
ऐशि तिचीही, कथा उदंडी,
अजून पसरेल, पिंडिं ब्रह्मांडीं,
वृद्ध तथापी, ह्मणति लबाडी,
गरीबांचा, व्यापार मोडी,
हिंदुस्थाना, दरिद्र जोडी,
ऐसें ह्मणती, हिंदूखंडीं,
तिचा महिमा, अखंडदंडी,
किती वाणु मी, पामर तोंडीं,
लोखंडी रस्ता झाला, व्यापार वाढवाया ॥ १ ॥ चंद्रिका.

बोरघांटावरून सडक नेण्याचा प्रयत्न चालला आहे, आणि सद्यः तेथें प्रत्यहीं तीस हजार मनुष्य खपतें. असें या खात्याचें काम चाललें आहे. साधारण मानानें ही एवढी सडक तयार करण्यास पांच दहा कोटी रुपये खर्च होईल असें सांगतात. हा डोंगर फोडायास कित्येक मजूर लोक युरोपखंडांतून आणिले आहेत आणि त्यांस एथील मजुरांपेक्षां दसपट मजुरी द्यावी पडती. प्रस्तुत ४३८ मैल सडकेवर आगीच्या गाडीची रहदारी चालू आहे. सन १८६२त मे महिन्यांतील एका आठवड्यांत उतारूंच्या व मालाच्या नोराचा वसूल रु० ७२,७१५१–५–७ झाला.

सूत कांतण्याचे व विलायती कापड विणण्याचे हे दोन्ही कारखाने महालक्ष्मीच्या रस्त्यावर ताडदेवा नजीक आहेत. हे सुरू होऊन चारपांच वर्षें झालीं. प्रथम सुताचा कारखाना एक दोन वर्षें पूर्वीं चालू झाला. नंतर त्याच्या जवळच कापड विणण्याचा बांधून तयार केला. ह्या कारखान्यांतील अनेक तऱ्हेचीं यंत्रें व दुसरा सर्व प्रकार अवर्णनीय आहे. कापड विणण्याचा कारखाना उभारायास सुमारें अकरा लक्ष रुपये लागले. या इमारतीस दोन लक्ष रुपये खपले असतील. परंतु अधिक द्रव्य यंत्रांस व दुसऱ्या सामानास लागलें. सूत कांतण्याच्या कारखान्यास या पेक्षां दोन तीन लक्ष रुपये कमी खर्च बसला.

ज्या वेळीं हीं यंत्रें पाहायास आह्मी प्रथमच गेलों होतो त्या वेळीं जिकडे तिकडे मोठा अद्भुत चमत्कार दृष्टीस पडला. तो असा– कोठें जाड सूत निघे– कोठें बारीक निघे.– कोठें तयार झालेल्या सुताच्या गुंड्या होत. असा चमत्कार दृष्टीस पडला. हें पाहून इंग्रज लोकांच्या उद्योगाची आणि चातुर्याची स्तुति करण्यांतच मन गुंतून गेलें. असे कारखाने हल्लीं पांच सहा नवे उपस्थित करण्याचे प्रयत्न चालले आहेत. विलायती कापड विणतात तो प्रकार प्रत्येक विचारी मनुष्यानें जाऊन एकदां तरी पाहावा. कापडाचे ताणे कसे रचिले आहेत, व प्रत्येक भागांत किती सुताचे तंतु आहेत व त्यांतील एक सुताचा तंतु तुटला असतां लागलेंच सर्व यंत्र कसें बंद होतें व तो जडतांच तें त्वरित कसें चालूं लागतें, हे सर्व अद्भुत चमत्कार आहेत. हीं यंत्रें योजणारांच्या बुद्धि अलौकिक असें ह्मटलें पाहिजे. एका ठिकाणीं ताके विणले जातात. त्याच्या दुसऱ्या बाजूस त्यांजवर खळ चढती. व दुसऱ्या यंत्रावरून गेला ह्मणजे तो वाळून तयार होतो. मग तिसऱ्या यंत्रावर नेऊन ठेविला ह्मणजे त्याच्या आपोआप घड्या होतात.

प्रत्येक कारखान्यांत प्रत्यहीं हजार मनुष्यें खपतात. एथें स्त्रिया आणि मुलें फार असतात. जें काम पूर्वीं मोठ्या कुशळ कारागिराचें होतें तें हल्लीं अज्ञानी बायका व मुलें यांजकडून करून घेतात. कायहो चमत्कार ? ह्या कारखान्यांत जाऊन उभें राहावें ह्मणजे जिकडेतिकडे बायका व सात आठ वर्षांचीं पोरें यंत्रें फिरवितात, व दुसरें काम करितानां दृष्टीस पडतात. हे कारखाने सुरू झाल्यापासून मराठ्यांच्या बायका हुशार व उद्योगी होऊं लागल्या. आणि त्यांचा भित्रेपणा जाऊन त्या धीट होत चालल्या आहेत. ह्या कारखान्यांतील सर्व व्यापार वाफेच्या योगानें होतात. हीं यंत्रें चालतानां त्यांचा वेग पाहून एकादे वेळीं मनांत मोठी भीति उत्पन्न होती.

पुण्यांतील ज्ञानप्रकाश वर्त्तमानपत्रांत सन १८५६ त हें पुढील पत्र छापिलें होतें त्यांत ह्या कारखान्याचें सुंदर वर्णन केलें आहे. तें साद्यंत एथें उतरून घेतलें आहे.

## मुंबईंतील कापसाचें सूत काढण्याचा कारखाना.

कांहीं एक घरगुती कामाकरितां आह्मी मुंबईंस गेलों होतों. त्यावेळेस तेथील कारखाने पाहातां पाहातां ताडदेवाजवळ एक कापसाचें सूत काढण्याचा कारखाना आहे तेथें गेलों. तो ज्यावेळेस पाहावयास गेलों त्यावेळेस जो आह्मास चमत्कार वाटला तो सांगतां देखील येत नाहीं. अहो काय सांगावें ! आधीं तें घर सुमारें ४०० हात लांब, व तेवढेंच रुंद. या सर्व घरभर लहान मोठीं एकसारखीं चक्रें, यंत्रें इत्यादि गरगर फिरत आहेत. त्यांस फिरवायास माणूस नाहीं, आपोआप झपाटा चालला आहे. एका ठिकाणीं कापूस पिंजून त्यांतील मळ बाहेर जाऊन कापूस स्वच्छ होतो. दुसऱ्या ठिकाणीं त्या कापसाच्या शेंकडोशें वाती होत आहेत. तिसऱ्या ठिकाणीं आपोआप लांब व बारीक हजारो सुतें निघत आहेत. याप्रमाणें चमत्कार पाहून चकित झालेले स्तब्ध उभे आहों इतक्यांत, त्या कारखान्याच्या मालकांपैकीं एकानें ही आमची असी अवस्था पाहून आह्माजवळ येऊन आह्मास विचारिलें कीं, गृहस्थहो तुह्मी असे कां स्तब्ध राहिलां आहां ? तुह्मी कोण व कोणत्या ठिकाणचे राहणार ? तुह्मास हा कारखाना पाहण्याची इच्छा आहे असें वाटतें. तर या माझे बराबर. मी तुह्मास सर्व दाखवितों. या प्रमाणें झाल्यावर मग काय विचारता "आंधळा मागे एक डोळा व देव देई दोन डोळे" या प्रमाणें आह्मास झालें. त्या गृहस्थाबरोबर कारखाना फिरत फिरत असतां आह्मी कोण व

कोठील राहणारे हें सर्व त्यास निवेदन केलें. तें त्यानें ऐकून आह्मी परस्थ आहों असें जाणून कारखान्यांतील वेगवेगळया यंत्रांची आह्मास समजूत करून दिली. कायसांगूं या कारखान्यास पांच किंवा दहा लक्ष रुपये खर्च लागला असावा. त्याचा मालक हलका नव्हे आणि तो प्रौढपणानें गर्व न धरितां आह्मा परस्थांचें आगत स्वागत करून आह्मास निर्दोष बुद्धीनें समजावें यासाठीं आपण स्वतः आमचे बरोबर सर्व कारखाना फिरला. हा आधीं केवढा चमत्कार ! योग्य कर्में योग्यासच साधतात.

ह्या गृहस्थानें आह्मास पहिल्यानें एक खोलींत नेलें तेथें पाहतो तंव तीन मोठालीं लोखंडी पात्रें होतीं. त्या एक एकाची लांबी सुमारें १५ हात असेल आणि रुंदी चार हात असेल, असीं आमच्या दृष्टीस पडलीं. यांत अग्नीच्या योगानें पाण्याची वाफ होत होती. ह्या वाफेच्या योगानें एका शेजारच्या खोलींत सुमारें वीस हात रुंदीचें एक मोठें लोखंडाचें चाक फिरत होतें. ह्या गृहस्थांनीं आह्मास असें सांगितलें कीं, वाफेच्या योगानें हें चाक साठ घोड्यांच्या जोरानें फिरत आहे.

पुढें आह्मास त्यानें कारखान्यांतून फिरविलें तेव्हां असें पाहिलें कीं, ह्या मोठया चाकाच्या योगानें दुसरीं चाकें फिरून सर्व यंत्रांची गति व सर्व तऱ्हेचें काम आपोआप होत आहे. केवळ दाखलगिरीला मात्र मध्येंमध्यें माणसें होतीं.

एका खोलींत ( फ्राईमशीन् ) ह्मणून कापूस साफ करण्याची मोठी पेटी होती. तिच्या एके बाजूस गठ्यांतील कापूस घातला ह्मणजे त्यांतील केर कचरा निराळा होऊन बाहेर निघून त्याची गादी होऊन ती एका लोखंडी दांड्यासभोंवतीं गुंडाळली ह्मणजे ती गादी काढून त्या ठिकाणीं दुसरा दांडा घालीत असत. याप्रमाणें एका दिवसांत स्वच्छ कापसाचीं शेंकडो गुंडाळीं तयार होतात.

हीं तयार झालेलीं गुंडाळीं आतां दुसरे एका मोठे खोलींत जिची लांबी सुमारें ६० हात असेल तींत नेऊन तेथें एके बाजूस मोठाले लोखंडाच्या पेट्यांची रांग होती त्यांत दर एका पेटीचे बाजूस एक गुंडाळें अडकविलेलें होतें.

ह्या गुंडाळयांतला कापूस हळूहळू त्या पेटींत जाऊन त्यांत बारीक पिंजून दुसरे बाजूनें बाहेर निघून त्याची एका ठिकाणीं सुमारें आंगठ्या इतकी जाडी वात होऊन एका लोखंडाच्या नळकांड्यांत जाऊन पडत असे. यांत सुमारें ५० किंवा ६० हात लांब वात राहती तेवढी त्यांत आली आणि नळकांडें भरलें ह्मणजे तें काढून त्या ठिकाणीं दुसरें नळकांडें ठेवीत असत. याप्रमाणें आठ नळकांडीं वातीनें

भरलीं ह्मणजे त्यांस दुसरे यंत्राजवळ नेत असत. या पेटीस ते "कार्डिग्मशीन्" ह्मणजे कापूस पिंजण्याचें यंत्र ह्मणत असत. यांस कापसाची वात काढण्याचें यंत्र ह्मटलें तरी चिंता नाहीं.

आतां हीं वातीनें भरलेलीं आठ नळकांडीं दुसऱ्या एका यंत्राचे बाजूस आणून त्या आठांतील आठ वाती ह्या यंत्रांत जाऊन त्याची एक मोठी वात होऊन ती कांहीं चक्रांत सांपडल्यामुळें लांबविली जाऊन तिची फिरून आंगठ्या एवढ्या रुंदीची वात होऊन बाहेर पडत असे, ह्या यंत्राचें नांव "ड्राइंग् मशीन्" ह्मणजे वात लांबवायाचें यंत्र. याचा उपयोग इतकाच कीं, पिंजण्याचे यंत्रांतून निघालेली वात सारखे जाडीची नसती ती ह्या यंत्रांतून सारखी होती. ही वात तयार झाली, आतां सूत काढण्यास आरंभ व्हावयाचा, हिचें एकदम बारीक सूत व्हावयास कठीण ह्मणून हिचें पहिल्यानें जाडें सूत काढावयाचें असतें, हें काम "रोविंग् मशीन्" ह्मणजे पीळ पाडण्याचे यंत्रानें होतें.

ह्या यंत्राच्या योगानें ही वात लांबविली जाऊन तिला पीळ पडून तिची जाडी सुतळी होती. ह्या सुतळीची जाडी सुमारें वाटाण्या इतकी असती. ही सुतळी ह्याच यंत्राच्या योगानें एका वीतभर लांबीच्या चातीवर गुंडाळती. आतां हें गुंडाळें या यंत्रांतून दुसरेकडे बारीक सूत काढण्याचें आहे तिकडे नेतात. ह्या यंत्रांत ती सुतळी एका बाजूनें आंत येऊन लांब होऊन तिचें लांब बारीक सूत होतें, आणि तें एका चाती सभोंवतें गुंडाळतें.

नंतर ह्या चात्या दुसऱ्या एका खोलींत नेऊन तेथें एका हातानें फिरवायाचा राहाट असतो त्या जवळ मांडतात आणि राहाट फिरविला ह्मणजे तें सूत चात्यांवरून उलगडून त्या राहाटा सभोंवतें गुंडाळतें. तें गुंडाळें सुमारें अच्छेर वजनाचें झालें ह्मणजे त्या राहाटांतून काढून घेतात आणि व्यापाऱ्यांस विकितात.

या प्रमाणें चमत्कार तेथील मालकानें आह्मास दाखविला. आह्मां सर्वांस चमत्कारिक यंत्र सूत काढण्याचें वाटलें. पाहा कीं एका वेळीं एका वाफेच्या जोरानें १६०० चात्या फिरत होत्या आणि प्रत्येक चातीपासून दर तासास सुमारें एक हजार ( १००० ) हात सूत निघत असे. ह्मणजे सर्व चात्यांपासून एका तासांस सुमारें ( १६,००,००० ) सोळालक्ष हात सूत निघत होतें. आणि हें यंत्र सुमारें सहातास फिरवितात. तेव्हां रोज सहज या कारखान्यांतून अलबत्ता नाहीं तरी एक कोट हात लांब सूत निघतें.

आतां चांगला सूत काढणारा मनुष्य असला तर दररोज हातानें ५०० हात सूत काढलें जातें. तर हा मनुष्य जेव्हां दोन दिवस बसेल तेव्हां हजार हात सूत काढील, आणि दोनशें दिवस बसेल तेव्हां एक लक्ष हात सूत काढील. २०० दिवस ह्मणजे सुमारें पावणेसात महिने झाले. आपण अशी कल्पना करूं कीं सहा महिन्यांत तो एक लक्ष हात सूत काढितो, तेव्हां त्या मनुष्यास एक कोट हात सूत काढण्यास नाहीं तरी ५० वर्षें पाहिजेत. आतां विचार करून पाहा कीं, जेवढें हें मुंबईचें यंत्र एक दिवसांत सूत काढतें तेवढेंच सूत काढण्यास एक माणूस बसला तर ५० वर्षें लागतील. तेव्हां पन्नास वर्षांचें काम ह्या यंत्रानें एके दिवसांत केलें. तेव्हां या यंत्राची शक्ति किती असेल याचा विचार आमच्या वाचणारांनीं करावा.

ह्या कारखान्यांतील सर्व यंत्रें लावलेलीं नव्हतीं. सुमारें ४ था हिस्सा लावून त्यावर काम चाललें होतें. बाकीच्या यंत्रांची जुळवा जुळवी कारागीर लोक विलायतेहून आणलेले व त्यांचे मदतीस आपले कारागीर मिळून करीत होते. ह्या कारखान्यांत जातांच राहाट फिरवून सुताचें गुंडाळें करण्याचें काम सर्व कामाठिणी बायका करीत होत्या. दरएक राहाटास दोघांची नेमणूक होती. नंतर जेथें मनुष्याची गरज आहे तेथें तेथें मुलें १४ पासून १७ इतक्या वयाचीं कामें करीत होतीं. सूत तयार होते वेळेस मध्यें धागे तुटले तर तीं मुलें फारच चपळाईनें सांधून घेत होती. मुलानीं खेळूं नये काम बरोबर करावें ह्मणून त्यांच्याच यंत्रांस घड्याळाप्रमाणें एक अपूर्व घड्याळ केलेलें आहे. ज्याचें ज्याचें जेवढें जेवढें काम तेवढेंतेवढें तें घड्याळ फिरून त्यावरील आंकडे दिसावे. या वरून ज्याच्या त्याच्या कामाप्रमाणें त्यास रोजमुरा मिळायाचा, सबब तीं मुलें जीव लावून काम करीत होतीं. असो हा कारखाना मुंबईच्या एतद्देशीय हिंदु व पारशी लोकांनीं सर्कतीनें उभारिला आहे. यंत्रें व त्या कामांतील वाकबगार गोरेलोक विलायतेहून आणिले आहेत. ह्या व्यापारी मंडळीनें भांडवल ५,००,००० पांच लक्ष रुपये काढिले आहेत. असें आमच्या मित्रानें आह्मास सांगितलें, ह्या कृत्याची मूळ उभारणी कावसजी नानाभाई पारशी यांनीं केली. आणखी एक असीच मंडळी होऊन तिनें त्याच कारखान्याजवळ ह्या कामाकरितां इमारत बांधण्याचें काम चालविलें आहे, असें कळतें.

ह्या शहरांत हल्लीं कारागीर लोकांचा समुदाय वाढत चालला आहे. एथें सूत व विलायती कापड तयार होतें. तसेंच मुसलमान व साळवी लोक लुगडीं, खण, पागोटया, शेले, व धोतरजोडे एथें तयार करितात. लोहार, कांसार, सोनार, सुतार, कुंभार यांमध्येंही चांगले कारागीर आहेत. सुतार काम तर एथें उत्तम प्रकारचें होतें, तसें युरोपखंडांतही होत नाहीं. ही कदाचित् अतिशयोक्ति असें वाटेल. परंतु ही गोष्ट खरी आहे कीं, १८५१ त ज्यावेळीं लंडन शहरांमध्यें कांचेचें सर्वपदार्थ संग्रहालय बांधून त्यांत पृथ्वीवरील सर्व देशांतील कला कौशल्याचे मासले व अमोलिक पदार्थ जमा करून ठेविले होते, त्यावेळीं राणी महाराजांस बसायास मुंबईहून खुरची नेली होती. आणि तिचें नकशी काम अति उत्कृष्ट होतें. कांहीं वर्षां मागें जनरल बार साहेब इंग्लंडास गेले त्यावेळीं त्यांनीं अबनुसीं लांकडाच्या दोन लहान लहान साध्या खुरच्या करून नेल्या होत्या, त्यांस त्यांनीं दोनशें अडीचशें रुपये खर्च केला होता असें ऐकण्यांत आहे. सुमारें पंधरा वर्षांवर एका राजाच्या जांवयास देण्यास एथें पलंग केला होता, तो लोकांस दाखवायास विठ्ठलवाडींत ठेविला होता. हा पाहायास हजारो लोक जात होते. ह्या पलंगाचें काम मोठें नाजूक केलें होतें. व यास पुष्कळ द्रव्य खर्चिलें होतें. तसाच राजे बहादूर गणपतराव गाईकवाड यांसाठीं थोड्या वर्षांवर एक केला होता. तोही पाहायास कोटांत हजारो लोक जात होते. पांचसहा वर्षांमागें कोटांत एका पारशानें बायजाबाईसाठीं एक उत्कृष्ट मेणा तयार केला होता. त्याची किंमत सुमारें पांच हजार होती. हा पाहायास पुष्कळ लोक जात असत. सन १८५६ त शेतोडीच्या एका ओळींत एके पारशानें दोन लहान खुरच्या तयार केल्या होत्या, त्यांत त्यानें आपली कुशळता फारच दाखविली होती. ह्या खुरच्यांची किंमत तो आठशें रुपये सांगे. सन १८६१ त एका इंग्रजासाठीं एक टेबल् तयार होत होतें. त्यास पांचशें सहाशें रुपये खर्च झाला, असें एका पारशी सुतारानें सांगितलें. लांकूड काम ह्मटलें ह्मणजे बहुतकरून पारशी लोकच करितात. परंतु कांतींव काम गुजराथी लोकांकडून करवून घेतात. एथें चितारी व मातीचीं चित्रें करणारे जिनगर उत्तम प्रकारचे आहेत. रामचंद्र चिंचणकर आणि रामचंद्र झान्या या नांवाचे दोघे गृहस्थ मातीचीं चित्रें करणारे उत्तम प्रतीचे कारागीर होते. त्यांनीं केलेलीं चित्रें इंग्लंडांत देखील पाठविलीं होतीं. वर्षांतून एक दुसरें

चित्र केलें तर ते हजार दोन हजार रुपये कमावीत असत. ह्या प्रख्यात कारागिरास देवाज्ञा होऊन पंधरा सोळा वर्षें झालीं.

घांसारी जे अनेक रंगांचे खडे घांसून तयार करितात ते मुंबादेवीजवळ असतात. हे लोक आंगठीवर बसवायाचे खडे, लोलक, लालडया, पाचा, तपकिरीच्या डब्यांच्या झांकणांवर बसवायाचे खडे व दुसरे अलंकार तयार करितात. सन १८४५ मध्यें अकिक नांवाचा दगड मुंबईतून दुसऱ्या देशांत ८८,८४४ रुपयांचा पाठविला. हा दगड खंबायताहून एथें येतो.

मुलतानी लोक चंदनी, हस्तिदंती, शिसवी, सफाईदार नकशी पेट्या लहान मोठया अशा आकृतीच्या करितात. फार मोठी ह्मटली ह्मणजे हात दीड हात. या पेट्या चमत्कारिक रंगाच्या असतात. व आंतून मखमाल लावितात. कांहीं वर्षांमागें या पेट्या दहा रुपयांपासून दोनशें अडीचशें रुपये पर्यंत किमतीच्या होत असत. परंतु सद्यः पांचांपासून शंभर ऐशीं रुपये किमतीच्या होतात. इंग्रजी लोकांच्या मडमा शिवण काम ठेवायास व अलंकार घालण्यास ह्या फार पसंत करितात. बहुतकरून त्या लोकांतच यांचा फार खप होतो. असें सांगतात कीं युरोपखंडांत देखील अशा पेट्या होत नाहींत. या पेट्या युरोपांत पुष्कळ जातात.

ह्या शहरांत नव्या गाडया करण्याचे कारखाने जागोजागीं आहेत. आणि युरोपखंडांत जशा तऱ्हेदार व उंच-प्रतीच्या गाडया होतात तशा एथें तयार होतात ह्यां शिवाय लंडन शहरांतून पुष्कळ येतात. एक एक गाडी पांच पांच सहा सहा हजार रुपयांच्या किमतीची असते, त्यांस नांवेंही निरनिराळीं आहेत. आणि त्या अनेक रंगाच्या असून रंगविण्यांत इतकी सफाई असत्ये कीं त्यांत आरशासारिखा चेहरा दिसतो. आंत सुंदर, नरम अनेक जातीच्या वस्त्रांच्या गाद्या असून रेशमी व दुसऱ्या उंच प्रतीच्या ऊर्णा वस्त्रांचें अस्तर लाविलेलें असतें. व त्यांस रेशमी गोंडे, झालरी इत्यादि लावून अशा शृंगारलेल्या असतात कीं, त्या पाहून मन दंग होऊन जातें. ह्या गाडयांचे कारखाने इंग्रज, पारशी व हिंदु गृहस्थांचे आहेत. गाडयांचीं नांवें येणेंप्रमाणें असतात. बगी, करेती, डेनेट, फेटन, रेकडा, शिग्राम, चारट, ओपनचारट, करिकल, ब्रूहम, क्याब, सोसिबल, इत्यादि. अशा गाडया सुमारें पन्नास साठ प्रतीच्या मुंबईत सद्यः दृष्टीस

पडतात. पुराणांतरी चौदा विद्या आणि चौसष्ट कला सांगितल्या आहेत, परंत मुंबईत किती विद्या आणि किती कला आहेत यांची संख्याच नाहीं.

अनेक तऱ्हेच्या वस्तु तयार करण्याचे कारखाने ह्या शहरांत जिकडे तिकडे आहेत. त्यांत लोखंडी, तांब्याचे, पितळेचे, शिशाचे, व कथलाचे डागिने तयार होतात. शेतोडींत लोखंडी ओतींव डागिने करायाचा एक मोठा कारखाना आहे. तेथें मोठ मोठाले नळ, कठडे, गरादी, यंत्रें, चाकें व ह्मटलें तें काम तयार होतें. तसाच एक नागपाड्यावर आहे. कांसार, लोहार, सुतार, कांतारी, यांचे कारखाने तर जागोजागीं आहेत. त्यांतून हजारो रुपयांच्या वस्तु तयार होऊन बाहेर पडतात. विलायती कोळसे आल्यामुळें ह्या कारखान्यांच्या मालकांस हें काम सोईवार पडूं लागलें. विलायती कोळसे आगीच्या गाड्यांस, आगबोटींस, टंकसाळींतील, गोदींतील, गनक्यारिएजच्या कारखान्यांतील व सुतारांच्या कारखान्यांतील यंत्रें इत्यादि चालविण्यास मोठेच उपयोगी. ह्या कोळशांवांचून हे कारखाने एक घटकाही चालायाचे नाहींत. विलायती कोळसे प्रतिवर्षीं ह्या शहरांत लाखो खंडी येतात. आणि ह्यांचा हजारो रुपयांचा व्यापार होतो. हे कोळसे लांकडें जाळून करीत नाहींत. परंतु धातूसारिखे खाणींतून काढितात.

भरत खंडस्थ कवींनीं लंकाधीश रावणाच्या संपत्तीचें वर्णन केलें आहे. "रावणा सारिखी संपत्ति कोणाची ॥ तोही एकलाची गेला अंतीं ॥" त्यांत असें वर्णिलें आहे कीं, लंका ही सुवर्णपुरी असून रावणाची चाकरी स्वर्गांतील देव करीत होते. त्याच्या दरबारांत ब्रह्मदेव लेखकाचें, वरुण परिटांचें, वायु केर काढण्याचें, अग्नि आचाऱ्याचें, धन्वंतरी वैद्याचें, गणपति गुराख्याचें, इंद्र माळ्याचें, यम पाणक्याचें, कुबेर भांडाऱ्याचें, काम करी. इत्यादि गोष्टी केवळ पुराणांतरील कविलाधवाच्या आहेत. परंतु हल्लीं मुंबईमध्यें इंग्रज सरकारच्या दरबारांत ह्या गोष्टी प्रत्यक्ष घडून येतात. पाहा ! अग्नि आणि वरुण किती अचाट कामें करितात. टंकसाळींत नाणें पाडितात. समुद्रांत आगबोटी चालवितात. हजारो लोक बसलेले रथ व लाखो खंडी वजनाच्या ओझ्यानें भरलेल्या गाड्या जमिनीवरून वायु वेगानें ओढीत नेतात. अनेक प्रकारचीं वस्त्रें विणतात व यंत्रें घडितात अशीं आश्चर्यकारक कामें करितात. सरस्वती तर हातीं पुस्तक घेऊन अष्टौप्रहर त्यांचे दारीं बसलीच आहे. उद्योग तर कमर बांधून रुपयांच्या थैल्या

त्यांच्या जामदारखान्यामध्यें नेऊन टाकीतच आहे. लक्ष्मी तर खजिना उघडून द्रव्याचा उपभोग घ्या घ्या ह्मणून त्यांचे पाठीस लागलीच आहे. वायुतर हजारो खंडीचीं जहाजें देशोदेशीं फिरवीतच आहे; व यंत्रें चालवितो. आणि धन्वंतरी तर अनेक तऱ्हेच्या औषधि आणि रसायनें घेऊन घरोघर हिंडत आहे. कुबेर तर द्वीपांतरांतलीं सुवर्ण, हिरे, माणकें, रत्नें आणून त्यांच्या घरांत टाकीतच आहे. सूर्य तर युद्ध सामग्री रथावर रचून पृथ्वीच्या प्रत्येक भागावर त्यांस नेऊन आवडेल तो देश हस्तगत करून घ्या ह्मणून त्यांचें आर्जव करीत आहे. विद्यु-ल्लता तर कमर बांधून जासुदाचें काम करायास ह्मटल्या पारीं तयार आहेच. यापुढें रावणाचे संपत्तीची बढाई कोठें राहिली ? त्यांचे दरबारांत अग्नि तर केवळ आचाऱ्याचें व वरुण धोब्याचें काम करीत असे. एथें तर ते कोट्यावधि रुपये उत्पन्न करून देतात. लंका जर सुवर्णाची पुरी होती, तर मुंबई ही परीसपुरी ह्मणा-वयास काय भय आहे ? पाहा ! एकाद्या कवडीच्या औषधापासून ह्या शहरांत शेंकडो रुपये उत्पन्न होतात. कोणी फक्त मातीचा पुतळा करून त्यावर हजार पांचशें रुपये सहज मिळवितो. ह्या पलीकडे सोन्याची ती किंमत कोठें राहिली ?

मुसलमान व दुसरे जरीचें, कलाबतूचें, रेशमाचें, वेलबुट्टी व हरतऱ्हेचें कसबी काम करणारे एथें उत्तम प्रकारचे आहेत. एकाद्या श्रीमंताच्या मुलास झबल्यावर कसब केलें तर त्यावर त्याची मेहेनतच शें दीडशें रुपये होती. पारशी व वाणी गृहस्थ कसबी वस्त्रांचे फार शोकी आहेत. कसबी साड्या, चोळ्या, शाली, घागरे, टोप्या असे पोशाक एथें पुष्कळ तयार होतात. एका वाणी गृहस्थानें कसबी साडी तयार करवून आंत मोत्यें गुंतविलीं होती असें सांगतात.

तसें शिंवण कामही उंच प्रतीचें होतें. एकाद्या इंग्रजाचा डगला शिंवला तर त्याची शिलाईच पंचवीस तीस रुपये होते. कित्येक हौसदार लोकांनीं एकादा बनातीचा डगला शिंवून घेतला तर त्याची शिलाई दहा पंधरा रुपये सहज दर्ज्यास देतात. कशिदा काढण्याचेंही काम एथें उत्तम प्रकारचें होतें.

एथें हस्तिदंताचा व्यापार पुष्कळ होतो. हें युरोप खंडांत जातें व प्रतिवर्षी शेकडो खंडी या देशांतही खपतें. वाणी लोकांच्या पाटल्या, मुलांचीं खेळणीं, पेट्या, डब्या, करंडे, बाहुल्या, फण्या असें उत्तम प्रकारचें कांतींव व कोरींव सामान होतें. हे हत्तीचे दांत पांच पांच सहा सहा हात लांब असतात.

सुमारें चाळीस वर्षांमागें कोटांतील मांडवीवर एक दांत उतरला होता. त्याची लांबी सुमारें १५ हात असून रुंदी सरासरी अडीच विती होती, असें एका वृद्ध गृहस्थानें सांगितलें.

विलायती तऱ्हेचे कागद करण्याचे कारखाने एथें आठदहा वर्षांमागें घालून कागद करण्याचें काम चालविलें होतें. परंतु त्यास खर्च भारी लागून उत्पन्न थोडें होऊं लागलें व उत्तम प्रतीचे कागद निघत नसत. सबब ते कारखाने बंद पडले होते. परंतु तें काम प्रस्तुत चालू केलें आहे. हा कारखाना गिरगांवांत घातला आहे. एथें मोठीं यंत्रें असून चिंध्या कुजविण्याचीं लांकडी भांडीं व दुसरें सामान पाहाण्याजोगें आहे. एथें वाफेचें यंत्र आहे. याचे कारभारी रा. बाबाजी काशिनाथ हे आहेत, व हा कारखाना यांनींच उपस्थित केला आहे. एथें अमदाबादी जाडे कागद तयार होतात. माहिमास एक कागदाचा कारखाना चालू आहे, तेथें साधारण प्रतीचे इंग्रजी कागद तयार होतात.

एथें कांच तयार होते, परंतु एथील लोकांस तो रांधा बराबर करितां येत नाहीं, सबब ती कांच हिरवट असती. व जीं गलासें व दुसरीं भांडीं करितात तीं पातळ असून किंचित् वजन अधिक झालें किंवा दिव्याचा ताप जाजती लागला कीं लागलींच फुटून जातात असीं गलासें आतां एथें बहुतकरून होत नाहींत. कारण चिनाहून व युरोपाहून बिलोरी काम एथें पुष्कळ येतें, व स्वस्थ सांपडतें. परंतु गांवठी बांगडया एथें तयार होतात; त्या बहुधा बाहेर गांवांतून येतात.

भेंडीबाजार व डोंगरी एथें तेलाचे घाणे पुष्कळ आहेत. हें काम बहुतकरून मुसलमान लोक करितात. भेंडीबाजाराच्या लगत्यास तेलाचे पुष्कळ घाणे आहेत. ते लोक खोबऱ्याचें, करडीचें, तिळांचें, भुंयमुगांचें, एरंड्यांचें असें अनेक जातींचें तेल काढितात; परंतु खोबऱ्याचें तेल फार काढीत असतात. तीन मण खोबऱ्यांत १० पक्के शेर पाणी घातलें तर त्यापासून दोन मण तेल निघतें. खोबऱ्याची पेंड निघती, ती गाईंस, म्हशींस व बकऱ्यांस घालायास खपती. याशिवाय मोटीवर एका इंग्रजानें तेलाचा कारखाना घातला आहे. तसा एक माहिमासही आहे. ह्याखेरीज हजारो खंडी अनेक जातींचें तेल गांवोगांवांहून मुंबईस येतें, खोबऱ्याचें पुष्कळ तेल इंग्लंडास जातें. मुंबईंत तेल येतें त्याचा एक तृतीयांश इंग्लंडास जातो, असा आकार केला आहे.

विलायती साबण व मेण करायाचे कारखाने एथें पुष्कळ आहेत. उत्तम तऱ्हेच्या मेणबत्त्या गोंव्याचे किरिस्तांव लोक करीत असतात. व एक दोन इंग्रजांनीं चिंचपोकळी व माहीम एथें मोठे कारखाने घातले आहेत. तेथें विलायती व कपरवंजी साबण तयार होतो. व ह्या कारखान्यांत अनेक जातींच्या मेणबत्त्याही तयार होतात. मेणबत्त्या कोची व गोमांतक एथून पुष्कळ येतात. कांहीं वर्षांमागें कपरवंजी साबणाचे कारखाने एथें पुष्कळ होते. पूर्वी साबणास हिंदुलोक शिवत नसत. परंतु आतां थोडे शिवतात. तथापि बहुतेक ब्राह्मण व दुसऱ्या जातींतील लोक साबणास शिवलें असतां अंघोळ करितात. कित्येक सोवळ्या बायका कोणाच्या हातीं साबणाची वडी पाहिली असतां कुजलेल्या मासळीपेक्षांही अधिक वीट मानितात !

हल्लीं मुंबईत इंग्लंड देशांत आहेत तसे धुराचे दिवे सुरू करण्याची मसलत चालली आहे. हें काम मि० फोर्जेट यांनीं मनावर घेतलें आहे. तर हें ते लवकरच पार पाडतील असें दिसतें. मग काय विचारता ! मुंबईची रचना परिपूर्ण झाली असें समजावें. ह्या शहरांत कोणत्याही कारखान्याचा उपक्रम काढायाची मात्र खोटी. तो उपस्थित केला असतां कोठून तरी सिद्धीस जातोच. एथील लोक धनिक असल्यामुळें त्यांस कोणत्याही कामास हात घालणें भारी पडत नाहीं. हांहां ह्मणतां लाख दोन लाख रुपये जमवून कामाचा उलगडा होऊन जातो. आणि हें काम सिद्धीस जावें असें सरकारच्या मनांतही आहे असें वाटतें, कारण सरकारांतून जस्टिसिस ऑफ् धि पीस, शहराचा बंदोबस्त ठेवणाऱ्या मंडळीस लिहून आलें आहे कीं हें काम चालू करण्यास दीड लक्ष रुपये काढून हें काम प्रथम सुरू करावें.

ह्या शहरांत प्रतिवर्षी लाखो रुपयांची दारू युरोप खंडांतून येती व या देशांतही अनेक प्रकारांची तयार होत असती. माड, शिंदी, ताड, वगैरे यांपासून मुंबईमध्यें दारू करितात. दारवेच्या भट्या कांहीं वर्षांमागें एथें पुष्कळ होत्या, परंतु हल्लीं दारूच्या कांहीं भट्या उरणास व कांहीं माहिमास आहेत. किरकोळ दारू विकणाऱ्या पारशांचीं व भंडारी लोकांचीं दुकानें तर चार चार हातांच्या अंतरावर सर्व शहरभर पसरलीं आहेत. या शिवाय कोटांत पारशी व इंग्रज लोकांच्या वखारी आहेत त्यांत अनेक तऱ्हांचें मद्य एकठोक विकतात. किरकोळ दारू विकण्याचीं जीं पिठीं आहेत त्यांस सरकारांतून

पट्टा घ्यावा लागतो. जसी जसी कमाईची जागा असेल ती ती प्रमाणें सरकारास सालिना शंभरांपासून पांचशें सातशें रुपये पर्यंत द्यावे पडतात. हें दारूचें प्रकरण इंग्रज सरकाराच्या कारकिर्दीपासूनच माजलें आहे असें ह्मणतात. इंग्रज लोकांत मद्याचा खप फार आहे हें खरें आहे. परंतु याचा प्रतिबंध करणें त्यांस योग्य आहे. इतिहासांत एके ठिकाणीं असा लेख सांपडतो. अकबर बादशहानें आपल्या राज्यांत मद्य विकण्याचा फार प्रतिबंध केला होता; परंतु जेव्हां इंग्रज येऊन सुरतेस राहिले तेव्हां त्यानें इंग्रज लोकांस मात्र मद्य विकण्याची व सेवन करण्याची परवानगी दिली. आणि तो असें ह्मणाला. "जसे मासे पाण्यांत उत्पन्न होऊन त्यांत वास करितात, त्याचप्रमाणें इंग्रज हे मद्यावर वाढले आहेत, आणि जर तो पदार्थ त्यांस मिळाला नाहीं तर त्यांची हानि होईल." असे याचे विचार होते.

मुंबईत अफिणीचा व्यापार प्रतिवर्षीं कोट्यावधि रुपयांचा होत असतो, हा व्यापार ह्मटला ह्मणजे एक जुगारच आहे. अफिणीचा सट्टा करणारे मारवाडी, वाणी, पारशी असे पुष्कळ व्यापारी आहेत. व प्रतिदिवशीं यांत ते लाखो रुपये कमावितात व गमावितात. प्रतिवर्षीं हजारो पेट्या चिनास जातात. सन १८६१ सालीं मुंबईत ४५,००० पेट्यांचा व्यापार झाला. ह्या एका पेटीस पंधराशें रुपये पडतात. ह्या दर पेटींत साडेतीनमण अफीण असती. आणि ह्यांपासून जकातीबद्दल लाखो रुपये उत्पन्न होतात. अफिणीच्या दर पेटीवर जकात पूर्वीं ६०० रुपये होती, परंतु १८६१ च्या अक्टोबरापासून ७०० रुपये केली आहे. परचुरण अफीण विकायास सरकारांतून पट्टा घ्यावा पडतो आणि त्या प्रीत्यर्थ सरकारास सालिना ८० रुपये द्यावे पडतात. असीं दुकानें एकेचाळीस आहेत. ह्याशिवाय अफीण ओढण्याचीं दुकानें चिनीलोकांनीं काढलेलीं रस्तोरस्तीं पुष्कळ आहेत. यांपासून लोकांची पुष्कळ नासाडी होत आहे. कित्येक तरुण मुलें बहकून गेलीं व त्यांच्या संसारांची धूळधाणी जहाली. याप्रकारें अफीण ओढतात त्यास चंडोल असें ह्मणतात. हा ओढायाचें एकदां व्यसन लागलें ह्मणजे तें एकाएकीं सुटत नाहीं, आणि तेणेंकरून शरीर, बुद्धि, आणि द्रव्य यांचा समूळ नाश होतो. यास्तव आईबापांनीं मुलांस असीं व्यसनें न लागण्यासाठीं मृत्यूपेक्षांही अधिक जपलें पाहिजे. कित्येक लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, इंग्रज लोक आल्यापासून हिंदु लोकांस मद्य पिण्याचें व्यसन जडत चाललें आहे. ही गोष्ट मोठी दुःखाची आहे

कीं इंग्रज सरकारासारिखें सुधारलेलें सरकार कैफी पदार्थांचा प्रसार करण्यास लोकांस एवढी मोकळीक देतें. हिंदुलोकांमध्यें जरी मद्यसेवन करण्याचा मोठाच प्रतिबंध आहे, तरी मुंबईमध्यें शूद्र व कित्येक दुसऱ्या जातींचे लोक मोकळेपण तिचा उपयोग करितात. गांजा ओढणारे व भांग पिणारेही लोक मुंबईमध्यें बरेच आहेत. तंबाखू, तपकीर, व गांजा विकायासही सरकारांतून पट्टा काढावा लागतो. तंबाखूच्या गाद्या मुंबईमध्यें ३५० आहेत, तशींच पानसुपारीचीं दुकानें सर्व शहरभर सांपडतात. मुंबईत गांवठी तंबाखू भडोच, सुरत, धारवाड, मिरज, सिंध इत्यादि देशांतून येतो. यांत मिरजी तंबाखू उत्कृष्ट मानिला आहे. परंतु उंच प्रतीचा तंबाखू व तपकीर युरोप व अमेरिका खंडांतून येतात. आणि हा तंबाखू तऱ्हेतऱ्हेचा असतो. वेणीदार, दोरीसारखा, भाकरीसारखा, केसरासारिखा असतो. याचा रंग काळा काजळासारखा असून तो नरम असतो. तशीच तपकीर रफी, मेकोबा, पुर्टुकाली, अशा नांवांची असती. मेकोबा तपकीर दहा बारा रुपये रत्तल खपती.

मुंबईत पानसुपारीचीं दुकानें चार चार हातांच्या अंतरानें आहेत. कोणी आपल्या घरीं श्रीमान् व स्नेही आला तर त्याचा सत्कार करणें झाल्यास त्यास प्रथम पान सुपारी देतात. कोणी तंबाखू पिणारा असला तर त्यास गुडगुडीची मेजवानी होत्ये. परस्परांस तपकिरीची चिमूट देणें हें तर स्नेहवृद्धीचें उत्तम लक्षण मानितात! कोणी रस्त्यांत स्नेही भेटला ह्मणजे डबी उघडून त्याजपुढें केली ह्मणजे त्याचा मोठा सत्कार केलासा झाला! मग तो त्याचा उपयोग करो किंवा रस्त्यांत फेकून देवो. स्नेहरक्षण करण्यासाठीं चिमूट घेतलीच पाहिजे!

एथें पानसुपारी खाण्याचाही नाद लोकांस अतिशय आहे. एक एक मनुष्य दिवसास दोन दोन चार चार आण्यांचीं पानें खाणारा सांपडेल. पूर्वीं हीं पानें मांडव्याहून हिरवीं येत, मग तीं पिकवून विकीत. हीं पक्कीं पानें पाव आण्याचें एक या दरानें देखील विकीत. सुपारी एथें देशोदेशांतून येते. चिकणी, बरडी, वेडी, पांढरी, अशा हींत जाति आहेत. श्रीवर्धनी पांढरी सुपारी उत्तम प्रतीची असून ती कापून तयार करण्याची सफाई एथें मोठी. ही तीन चार तऱ्हांनीं कापितात, एक केशरासारिखी बारीक करितात. दुसरी किंचित् जाड असती. तिसरी कांद्याच्या साला इतकी पातळ असती. अलीकडे पक्कीं पानें पुण्याहून येतात आणि बहुतेक हींच खातात. एथेंही माहिमास पानें लावितात. व सुपारी पिकती. तांबडी

फुलवरडी सुपारी वसईहून येती ती फरमाशी असते. एथें प्रतिवर्षीं सुमारें लाख दोनलाख रुपयांचीं पानेंच खपत असतील.

मुंबईंत अनेक प्रकारांचे अमली पदार्थ जागोजागीं विकीत असतात. अफिणीचेच दहा पंधरा तऱ्हांचे कैफ असतात. गोळी, मदत, फरमीशन, चंडोल, कुसुंबा इत्यादि. आतां दुसऱ्या जातींचे कैफ माजूम, बचनाग, लुडगी, भांग, गांजा इत्यादि. कोणी कोणी सोमलाचा देखील अमल खाणारे बैरागी आहेत. ह्या कैफामुळें कित्येकांचीं शरीरें जळून जाऊन बुद्धिभ्रष्ट झाले आहेत.

ह्या बेटांत अनेक चमत्कार आहेत, तसींच अति भयंकर दुर्व्यसनयुक्त स्थळेंही आहेत. एथें चंडोलखाने आहेत ह्मणून सांगितलें आहे, परंतु याचें यथातथ्य वर्णन करावयास कोणीतरी यमपुरी पाहून आलेला असामी असला पाहिजे. या स्थळांतील अधिकारी चिनीलोक, जे अफीण खाण्यांत प्रवीण व मोठे मोठे कैफ करून पचविण्यास समर्थ तेच असतात. चंडोल ह्मणून अफिणीच्या तयार केलेल्या गोळ्या असतात. त्या चिलमींत घालून ओढितात ह्या चिलमी व गुडगुड्या एका तऱ्हेच्या असतात. ह्या चिलमींत विस्तव घालीत नाहींत, परंतु तुपांत भिजिवलेला कांकडा पेटवून डाव्या हातांत घेतात आणि त्या चिलमीवर जी गोळी ठेवलेली असते तीस लावून मोठ्यानें झुरका घेतात. चंडोल पितेवेळीं आडवें पडावें लागतें, ह्मणून ह्या जाग्यांत जिकडे तिकडे आबड धोबड बांक, खाटा व चोपाया घातलेल्या असतात. आणि जाड्या भरड्या हांतऱ्या घालून त्यांवर, मुसलमान, ब्राह्मण, परभू, शेणवी, सोनार, भाटये, असे अठरापगड जातीचे चंडोलउपासक हातपाय ताणून पडलेले असतात. कोणी डोळे वटारिलेले असतात, कोणी ओकतात, कोणाच्या तोंडावर माशा बसलेल्या असतात, कोणी खोकतात, कोणी तोंड वेडें वाकडें करितात, कोणी उसाची गंडेरी चोखितात, कोणी सिताफळाच्या बिया तोंडांत घालितात, कोणी केळीं खातात, कोणी घेरी येऊन पडले आहेत असें दृष्टीस पडतें. या जाग्यांत जिकडे तिकडे केर व कचरा पडलेला असून सर्व गोष्टींनीं हा मळीण असतो. आणि जे लोक या कैफाच्या स्वाधीन झालेले असतात ते निस्तेज व भयंकर दिसतात. पंधरा सोळा वर्षांच्या वयाचा भरज्वानींत आलेला मुलगा वर्ष सहा महिने चंडोल ओढायास लागला ह्मणजे त्याची अवस्था जरत्कारूसारिखी होत्ये. बहुधा यांची मुद्रा मृत्यूच्या चित्रासारिखी असती. ओंठ काळे व करपून गेलेले असतात. यांचें तोंड नेहमी कोरडें पडलेलें असतें. ह्या व्यसनांत

पडून मुंबईतील पुष्कळ मुलें संसारसुखास मुकलीं आहेत. ह्या स्थळांत सहज डोकावून पाहिलें असतां अंगीं कंप सुटतो. एथें अनेक जातींचे लोक जेव्हां चंडोल पिऊन गुंगींत येऊन प्रेतांसारिखे चटाईवर पडलेले असतात तेव्हां त्यांस पाहून यमयातनेविषयींचें जें पुराणांतरीं वर्णन केलें आहे त्याचें स्मरण होतें. यांत इतकाच भेद कीं हे लोक एथें सुखवस्तू जाऊन पडतात. मनुष्य आडमार्गानें जाऊं लागला ह्मणजे त्यांस नरक देखील प्रिय होतो! ही किती आश्चर्याची गोष्ट आहे! इंग्रज सरकार याचा कांहीं बंदोबस्त करील तर बरें.

मुंबईंत पेंढारी, दरोडे यांचें भय हल्लीं नाहीं खरें. परंतु अनेक तऱ्हांच्या धुतारे, तर्कटी व ढोंगी लोकांचें मोठें भय आहे. हे लोक मनुष्यांचा पेंढाऱ्यांपेक्षांही अधिक नाश करितात. पेंढारी एका खेपेस सांपडेल तितकें द्रव्य घेऊन जातात. परंतु हे लोक संपत्ति व बुद्धि यांचा सतत समूळ नाश करितात. हे कोण ह्मणाल तर किमयागर. हे बैरागी, गोसावी, सन्यासी, व फकीर, असतात. हे लोक एथें येऊन मनुष्यास अनेक भुलथापी देऊन किमया करण्याचा नाद लावितात. आणि या छंदांत कोणी एकदां पडला, कीं त्यास तो नाद सुटत नाहीं. हे लोक कोणे समयीं हजार दोन हजार रुपये घेऊन पळून जातात, व अनेक ढोंगें करून एथेंच राहून लोकांच्या द्रव्याचा अपहार करितात. किमयेचें हें केवळ थोतांड आहे. हे लोक लोकांस ठकविण्यासाठीं भट्ट्या पेटवून आंत वनस्पतीचा रस घालून त्यांत नजर चुकवून थोडें सोनें टाकून सोनें केलेंसें करून दाखवितात आणि मग यजमानास भोंदायास लागतात. या शहरांत यांच्या नादास लागून कित्येक सधन लोक फसून भिकेस मिळाले आहेत. तरी लोक सावध होत नाहींत, हेंच नवल वाटतें. याशिवाय हे लोक मोठे दुष्ट असतात. हें किमयेचें वेड पाहून एका सधन पारशी गृहस्थाची सुज्ञ पत्नी असें ह्मणाली "कायहो हे मूर्ख लोक! किमयागरांच्या नादीं लागून तांब्याचें सोनें करायास शोधितात. हे एवढे ठकतात तरी शुद्धीवर कसे येत नाहींत. किमया कोठें आहे? किमया म्हणजे उद्योग. पहा मनुष्य उत्तम प्रकारचा उद्योग करील तर मातीचें सोनें करितो. या पलीकडे किमया ती कोठें राहिली?"

मुंबईंत देशोदेशाहून मेवा मिठाई येते. आणि एथेंही अनेक प्रकारांची मिठाई तयार होती. बर्फी, पेढे, जिलबी, मात्रा, मेसुर, बासुंदी, मलई, साखरफेण्या, बुंदीचे लाडू, पुऱ्या, पापड, भर्जी, अशा अनेक तऱ्हांच्या ह्मटल्या त्या

मिठाई व पक्वान्नें सांपडतात. याशिवाय निरनिराळ्या जातीच्या लोकांच्या मिठाई व पक्वान्नें करून विकणारे निराळे आहेत. इंग्रजलोकांची मिठाई पांव, बिस्कुटें, वगैरे करणाऱ्या पारशी, इंग्रज व किरिस्तांव लोकांचे मोठमोठाले कारखाने किल्ल्यांत व दुसऱ्या ठिकाणीं पुष्कळ आहेत. यांची मिठाई क्रिस्टमसाच्या दिवसांत व नव्या वर्षाच्या दिवशीं शेंकडो रुपयांची खपत असती. शहरांत सर्व पदार्थ पाहिजे तितका सांपडतो. कोणी पांच दहा वर्षांमागें सहस्रभोजन घातलें होतें, त्यास पक्वान्न बर्फी व पुरी केली होती.

फूलबाज्या, अनारें, चंद्रजोती, बाण, चक्रें, नळे, इत्यादि अनेक जातींची दारू बाजारांत सांपडती, व कित्येक लोक दिपवाळीचे दिवसांत घरोघर करितात. दारूकाम मुंबईमध्यें कांहीं वर्षांमागें उत्कृष्ट प्रतीचें होत असे, परंतु हल्लीं वर्णाया-जोगतें होत नाहीं. मेहरबान मौंटस्टुअर्ट एल्फिन्स्तन् ज्या वर्षीं गव्हर्नराचा हुद्दा सोडून इंग्लंड देशास जायास निघाले त्यावर्षीं एथील लोकांनीं त्यांस मेजवानी केली होती. त्या वेळीं चर्चगेटा जवळ कांपाच्या मैदानांत मंडप घालून मोठा समारंभ केला होता. तेव्हां अति उत्कृष्ट दारूकाम केलें होतें. ह्यास लोक लंका केली आहे असें ह्मणत.

प्रतिवर्षीं चीन देशांतून फटाक्या वगैरे दारूकाम हजारो रुपयांचें येत असतें. एथून हजारो रुपयांचा असला माल देशोदेशांत जातो.

एथें लहान सान खुसकी व जलमार्गानें सफरी करण्याचीं साधनें सर्वांस मोकळीं आहेत. आगीच्या गाडींतून काशीपासून रामेश्वरापर्यंत जाण्याची सोई होत चालली आहे. तशाच कराची, सिंध, खंबाईत, सुरत, कर्नाटक, गोवें, वेंगुर्लें रत्नागिरी, वगैरे ठिकाणीं जाण्यास लहान लहान आगबोटी तयार असतात. त्या महिन्यांतून दोन तीन खेपा बंदरो बंदरीं उतारू घेऊन जातात. ह्या आगबोटी एथेंच तयार होत असतात. यांचें खातें चालविणारी ‘ ओरिएंटल् स्टीम् न्याविगेशन् कंपनी ’ ह्मणून एक निराळीच मंडळी आहे. ह्या आगबोटींचे कारखाने बहुतकरून पारशी लोक चालवितात. ह्या शहरांत द्रव्य, शरीर आणि बुद्धि ह्या तीन गोष्टींची मात्र अनुकूलता पाहिजे, ह्मणजे कोणाच्या मनांत पृथ्वीप्रदक्षिणा करून येण्याची इच्छा झाली तर तीही व अल्पकाळांत सुखवस्तू सिद्धीस जाईल.

सोन्यारुप्याचे अलंकार व जडकाम करणारे सोनार या शहरांत उत्तम प्रतीचे आहेत, एथें तयार केलेल्या जडावाच्या अंगठ्या व दुसरे डागिने युरोप लंडा-

पर्यंत जात असतात. इंग्रज लोकांत सोन्याचीं आभरणें अंगावर घालण्याचा शोक नाहीं. ते एकादी हिऱ्याची अंगठी घातली तर घालितात. व स्त्रियांच्या हातांत एकादें जडावाचें कंकण असलें तर तें शोभेसाठीं एकादे दिवशीं घालतील, परंतु तेंही कोठें विरळा. यांचें भूषण सगळें पोशाकांतच असतें.

भाटये, वाणी, कच्छी, मुसलमान, इत्यादिकांच्या स्त्रियांचे डागिने मोठे व आबडधोबड असतात. भाटयांच्या बायकांच्या पायांत वाळे दहा पंधरा शेर चांदीचे असून विलक्षण थबकड्या आकृतीचे असतात. कोपरापर्यंत सोन्याचे पत्रे मारलेलीं व साधीं हस्तिदंती कंकणें असतात. व सोन्याचे डागिनेही आबडधोबड. नाकांतील वाळी दोनचार तोळे सोन्याची असून तिचा मधला आटा साधारण मुलाच्या करंगळी एवढा जाड असतो. आणि ही वाळी नाकांतून तुटून पडूं नये ह्मणून जिकडेतिकडे रेशमाच्या दोऱ्यांनी बांधितात. सर्व त्यांचे पोशाक व अलंकार असेच आबड धोबड असतात. मारवाडी लोकांचींही भूषणें असींच विलक्षण आहेत.

पारशी लोकांच्या स्त्रिया अलंकार घालितात, परंतु त्यांचे अलंकार मकूथा असून त्यांत कांहीं नाजूकपणा असतो. आणि उत्तरोत्तर तेही खटपट कमी करीत चालले आहेत. या लोकांतील नथी साध्या असतात व कित्येक घाली-तही नाहींत. यांमध्यें बायकांच्या पायांत तोडे, अटाशे, तोरड्या व नेपुरें घालण्याचा शिरस्ता नाहीं. पुरुष तर बिलकुल अंगावर अलंकार घालीत नाहींत. कोठें एकादी हिऱ्याची अंगठी घालतील.

परभू, सोनार, शिंपी, सुतार, शेणवी, ब्राह्मण यांच्या स्त्रियांच्या अंगा-वरील डागिने बहुतकरून सारखेच असतात. परंतु त्यांत थोडे थोडे भेद आहेत. ह्या लोकांस मोठे जाड अलंकार घालण्याचा नाद फार असतो. सुरेख व नाजूक अलंकाराकडे लक्ष देणारे कोठें विरळा. हातांत सहा शेरांचे गोट, चार शेरांचे तोडे, दोन शेरांचीं कंकणें, आणि पांच शेरांच्या वांकी असे रांठ डागिने करितात. बहुतेक मुंबईंतील हिंदुलोकांत अलंकाराच्या जाडपणावर दृष्टि असत्ये. शूद्र लोकांच्या स्त्रियांचे बहुतकरून रुप्याचे डागिने, त्यांतही अकटस्य विकटो घांटाचे. कोळी, खारवी, घांटी, कुंभार यांचे अलंकार निरनिराळया घांटांचे व आकृतींचे असतात. परदेशी लोकांचे डागिने तर विलक्षणच. यांच्या बायकांच्या नाकांतील नथीचा आटा एकादे समयीं सुमारें अर्ध वीत रुंद असतो. कोठें

कोठें असें दृष्टीस पडतें कीं, जेवते वेळीं ह्या बाया वाळीच्या आट्यापासून ग्रास तोंडांत घेतात. जर मुंबईंतील सर्व जातींच्या लोकांचे निरनिराळे अलंकार व जवाहीर एकत्र जमविलें तर त्यांत किमानपक्ष पांच दहा हजार जातींचे अलंकार सांपडतील.

मोठमोठाले पुरुष देखील हातांत वाळे, तोडे, गळयांत कंठ्या, गोप, कानांत चौकडे, अशीं भूषणें घालितात. चौकडे गुजर लोकांतच घालण्याचा प्रघात आहे. ते ही चाल थोडी थोडी मोडीत चालले आहेत. परभू , शेणवी, सोनार वगैरे लोकांत पुरुष वाळे, तोडे व दुसरे अलंकार अंगावर घालीत असत. कांहीं वर्षांमागें पाऊणशें ऐंशीं वर्षांचे श्रीमान् पुरुष देखील हातांत चार चार शेरांचे सोन्याचे वाळे व गळयांत शेंपन्नास तोळयांच्या कंठ्या घालून फिरत व यांत मोठी प्रतिष्ठा मानीत. प्रख्यात धाकजी दादाजी यांच्या हातांत पुष्कळ वर्षेंपर्यंत वाळे होते. सुंदरलेहरी ह्मणून एक सधन परभू नेहमी अंगावर अनेक भूषणें घाली. मूल जन्मास आलें ह्मणजे षष्ठीपूजनाच्या दिवशीं त्याच्या हातांत सोन्याचे वाळे, तोडे आणि कमरेंत सांखळ पाठवावी असी कित्येक मातबरलोकांची चाल आहे. मूल पांच वर्षांच्या वयाचें होण्यापूर्वीं त्याच्या अंगावरील अलंकार सात आठ हजारांचे तयार होतात. अशी मुंबईंतील कित्येक श्रीमंत गृहस्थांची वहिवाट आहे इतकेंच नाहीं, परंतु गरीबलोक देखील कर्ज वाम काढून मुलांच्या अंगावर डागिने करण्याचा कुलधर्म सोडीत नसतात. असे अलंकार घालण्याच्या चालीमुळें कित्येक अर्भकांचा नाश झाला. कित्येक स्त्रिया प्राणास मुकल्या, व कित्येक कर्जबाजारी होऊन देशधडी झाले प्रतिवर्षीं अलंकार घातलेल्या मुलांच्या घाताविषयीं पांच चार तरी फौजदारी खटले न्यायाधिशा पुढें तपासायास येत असतात. तरी आमच्या लोकांचें हें खूळ जात नाहीं. ह्या डागिन्यांच्या नादामुळेंच मुलांस विद्वानांच्या पंक्तीस बसविण्याचें कृत्य आह्मां-कडून घडून येत नाहीं.

मुलांच्या अंगावर डागिने घातल्यानें किती हानि होती याविषयीं सरकारी कामगारांनीं, न्यायाधिशांनीं, व विद्वान् लोकांनीं लोकास उपदेश करून ते सोडविण्यास पुष्कळ प्रयत्न केले. परंतु ते कांहीं गोष्टींत निष्फल झाले, मिस्तर फोर्जेट यांनीं दोन चार वर्षांमागें एक सुंदर मराठी भाषेत विनतीपत्र छापून

त्याच्या प्रति सर्व बेटांत वांटिल्या होत्या. त्यांत त्यांनीं मुलांवर व स्त्रियांवर अलंकार घातल्यानें किती अनर्थ होतात, तें सुंदर रीतीनें दर्शविलें होतें.

स्त्रिया, पुरुष व मुलें यांच्या अंगावर सोन्यारुप्याचे डागिने घालण्याचा मुंबईंतील लोकांस इतका नाद आहे कीं, एकाद्या पंधरा वीस रुपयांच्या कारकुनाच्या घरचा देवीचा नवस बाहेर निघाला तर यजमानीन बाईच्या अंगावर मण पाऊण मण सोनें असतें. याखेरीज बाकीचें जवाहीर. हे अलंकार बहुधा दहावीस गृहस्थांच्या घरांतून गोळा केलेले असतात. परंतु परक्यास मात्र त्या बाईच्या श्रीमंती बाण्यावरून हे तिचेच असावे असा भास होतो. कांहीं वर्षांमागें एक नवस काळबादेवीच्या रस्त्यावरून मोठया समारंभानें जात असतां मयत प्रोफेसर हेंडरसन् यांच्या दृष्टीस पडला. त्यावेळीं त्या बायका मस्तकाच्या केंसापासून पायांच्या अंगठ्या पर्यंत शृंगारलेल्या पाहून तो असें ह्मणाला. "मुंबईतील साधारण कारकुनाच्या घरीं जितकें सोनें आहे तितकें महाराणी विक्टोरिया हिच्या जामदारखान्यांत देखील नसेल." हा वृथा श्रीमंतीचा डौलच आह्मां हिंदुलोकांस घातक झाला आहे.

# प्रकरण ११.

टौनहाल्-रायल् एशिआटिक् सोसायटी-जिओग्राफिकल् सोसायटी-आग्रिहार्टिकल्चरल् सोसायटी-बांबे आसोसिएशन्-मेक्यानिक्स इस्टिटय़ूशन्-दक्षिणी भाषेंत पुस्तकें करणारी मंडळी-नेटिव्ह जनरल् लैब्ररी व दुसरीं पुस्तकालयें-सर्वपदार्थसंग्रहालय -विक्टोरिआ आणि आल्बर्ट म्यूझिअम्-विक्टोरिआ गार्डन् .

सरकारास खर्चांत न पाडतां इमारती व वाडे बांधून शहरास शोभा आणण्यास आजपर्यंत इंग्रज लोकांनीं जे जे उद्योग केले ते स्तुत्य आहेत. अशा कारणांस द्रव्य जमविण्याची त्यांची जी युक्ति ती पाहून मन केवळ दंग होऊन जातें. पाहा ! टौनहालासारिखी विशाळ व उपयोगी इमारत बांधायास यांणीं कोणती युक्ति लढविली. इसवी सन १८११ मध्यें सर जेम्स मेकिन्टाश् हे लिटररी आणि सायंटिफिक् नांवाच्या एका विद्यासंपादक मंडळीचे अध्यक्ष होते. आणि ही त्यांणींच उपस्थित केली होती. त्यांणीं एथील कित्येक नामांकित गृहस्थांचे सूचनेवरून असा उपक्रम काढिला कीं, मुंबई शहरासारिख्या चढते कळेस आलेल्या शहरांत विद्वान् व संभावित लोकांस सभा भरविण्यास, पुस्तकालयाची स्थापना करण्यास किंवा प्रसिद्धपणें कोणत्याही नात्यानें सभा भरण्यास एक विस्तीर्ण इमारत असली पाहिजे. परंतु ती उभारायास पुष्कळ द्रव्य पाहिजे. तर यास अशी युक्ति आहे कीं, सरकारी नात्यानें द्रव्यावर सोडती काढाव्या आणि त्या सोडतींच्या चिटया विकून त्यावर जो नफा राहील तें द्रव्य ही इमारत बांधायास खर्चावें. त्यांच्या ह्या भाषणास व लाभदायक युक्तीस सगळयांनीं माना डोलविल्या. मग सरकारांतून रुकार मिळाल्यावर कांहीं दिवसांनीं पहिली सोडत काढिली. त्यावेळीं पुष्कळ टिकिटा खपल्यामुळें द्रव्य पुष्कळ जमा झालें. व कांहीं टिकिटा विकल्यावांचून मालकांपाशीं राहिल्या होत्या, त्यापैकीं एकीच्या नंबरास जो मुख्य पन्नास साठ हजारांचा लाट तोच आला. व दुसरे एक दोन लहान लहान

लाटही घरखात्यांत आल्यामुळें ह्या मंडळीच्या हातीं पहिल्याच खेपेस लक्ष दीडलक्ष रुपये जमले. यावरून मंडळीस इतका भरंवसा आला कीं, अशा दोन तीन खेपा सोडती काढिल्या असतां जें द्रव्य ही इमारत बांधायास पाहिजे तें जमा होऊन कार्य सिद्धीस जाईल. परंतु दुसऱ्या खेपेस जी सोडत काढिली तीविषयीं लोकांत कांहीं वैमनस्य पडल्यामुळें पुष्कळ टिकिटा खपल्या नाहींत. तथापि त्या प्रसंगींही या मंडळीस सुमारें तीस हजार रुपये नफा झाला. पुढें सोडतीचें प्रकरण बंद पडलें.

पूर्वीं एथें सोडती काढण्याचा व्यापार फार असे, व यांत फार तर्कटेंही होत. कोणी सोन्यारुप्याच्या डागिन्यांवर, कोणी जरी साड्या, लुगडीं व पागोटीं यांवर, कोणी घरांवर, वाड्यांवर, घड्याळांवर, पैशावर अशा ह्मटल्या त्या मालावर सोडती काढीत. यांत एकाचे दोन इतका नफा होत असे, ह्मणून लोक या धंद्यावर तुटून पडत. कधीं कधीं सरकारी सोडती निघत. यांत हजारो लोकांच्या द्रव्याचा नाश होऊन एकाद्या कोणास तरी लाभ होई. हा धंदा जुगाराचाच प्रकार आहे, असें लक्षांत आणून हल्लीं सरकारानें बंद केला. यामुळें लोकांचें पुष्कळ कल्याण झालें. कित्येक सोडती भरण्याची चट लागून जमीनदोस्त होत.

सुमारें वीस वर्षांमागें ( सन १८४० च्या सुमारास ) एका गरीब गुजराथी कुंभारानें सोडतींत सवाशें रुपये भरले होते, त्यास पाऊण लक्ष रुपयांचा लाट आला. परंतु तो मनुष्य अविचारी आणि उडाऊ असल्यामुळें तें त्याचें सर्व द्रव्य वर्ष दीड वर्षाच्या आंत जाऊन तो कर्जबाजारी झाला. आणि शेवटीं पंचवीस तीस रुपयांच्या देण्यासाठीं तुरुंगांत जाऊन पडला, आणि हाल अपेष्टा होऊन तो अल्पकाळांतच मरण पावला. अशा प्रकारानें प्राप्त झालेल्या द्रव्याचा परिणाम बहुधा असाच होतो. इंग्रजींत अशी एक ह्मण आहे. " वर्षाच्या आंत श्रीमंत होतो तो सहा महिन्यांपूर्वीं भिकारी होतो. "

अणखी एक गोष्ट या सोडती प्रकरणीं ऐकण्यांत आली. परंतु ती केव्हां घडली हें कांहीं बराबर समजत नाहीं. एका भंग्यास एक लक्ष रुपयांचा सोडतीचा लाट आला. आणि जेव्हां तो तें द्रव्य आपल्या स्वाधीन करून घेण्यास किल्ल्यांत गेला, तेव्हां त्या रुपयांचे तोडे पाहून त्याला हर्षवायु झाला आणि लागलाच मरण पावला. रुपयांचे तोडे व घरदार जिकडच्या तिकडेसच राहिलें. एकादेवेळीं एकदम श्रीमंत होण्याचे प्रयत्न केले असतां त्याचा परिणाम या प्रकारचा होतो.

कंपनी सरकाराकडून टौनहाल् बांधण्यास जागा मिळाल्यावरून हा वाडा कोणत्या प्रकारचा असावा याचा नकाशा काढिला. व इंजनेर वगैरे जमवून सर्व तयारी केली. आणि जरी द्रव्य विपुळ नव्हतें तरी त्या वाड्याचें काम सुरू केलें. कंपनी सरकारानें ह्यास १०,००० रुपये वर्गणी दिली आणि हें काम सन १८२१ माहे सेप्टेंबर या महिन्यांत सुरू केलें. ह्या कामाची चौकशी करण्यासाठीं सरकारानें कपतान हाकिन्स यास नेमिलें होतें.

पुढें सन १८२३ त ह्या मंडळीची खर्ची खुटली आणि जरी ह्या इमारतीस यांणीं सुमारें दोन लक्ष रुपये खर्चिले होते तरी दुसरे अजमासें तीन लक्ष रुपये खर्च होतील तेव्हांच ही पुरी होईल असा निर्णय झाला. त्यावेळीं हें काम कंपनी सरकारानें मनावर घ्यावें असें मंडळीनें बोलणें लावल्यावरून कंपनी सरकारानें लंडन शहरांतील मुख्य कोर्टआफ् डैरेक्टर्स यांस लिहून कळविलें. त्यांस त्यांनीं असें उत्तर दिलें कीं त्यांतील बहुतेक जागा सरकारी हपिसें घालायास देण्याकरितां हे गृहस्थ कबूल असले तर तें काम पत्करून ही इमारत पुरी करावी. असा करार झाल्यानंतर कंपनी सरकारानें ह्या कामाचा पत्कर घेऊन ह्या प्रीत्यर्थ द्रव्य खर्चायाचा निर्धार करून सन १८२६ सांत काम सुरू केलें आणि ही इमारत सरासरी तडीस नेली. परंतु ज्यारीतीनें पूर्वीं बेत केला होता त्यारीतीनें ही इमारत तयार झाली नाहीं. तींत कांहीं व्यंग पडलें. ही इमारत २६० फुटी लांब आणि १०० फुटी रुंद आहे. ही इमारत तयार होण्यास १५ वर्षें लागलीं. हिच्या सदरेच्या दक्षिण भागीं मौंटस्टुअर्ट एल्फिन्स्तन् साहेबाचा पुतळा आहे, व उत्तरेस सर जान् माल्कम् व नामांकित व्यापारी सरचार्लस् फार्बस् या साहेबांचे पुतळे आहेत. व त्यांच्या समोर सर जमशेटजी जिजीभाई ह्या कीर्त्तिमान्, दानशूर, व प्रख्यात व्यापाऱ्याचा पुतळा आहे. व दुसरे दोन नामांकित इंग्रजांचे आहेत. ही इमारत तयार करण्यास सगळे पांच लक्ष रुपये खर्च झाले. त्यांपैकीं कंपनी सरकारास ३,८६,१६५ रुपये खर्चावे पडले. व बाकीचे पहिल्या मंडळीनें खर्चिले होते.

एथें कौन्सल, दरबार व दुसऱ्या सरकारी व सावकारी नात्यानें सभा भरत असतात. यांत जागोजागीं सरकारी हपिसें आहेत. व दुसऱ्या परोपकारी मंडळ्यांचीं स्थानें आहेत. ही इमारत कर्नल कौपर आणि कर्नल वाडिंग्टन् ह्या कुशळ इंजनेरांनीं सिद्धीस नेली.

आग्रिहार्टिकल्चरल् सोसायटी व जिओग्राफिकल् सोसायटी या प्रख्यात दोन मंडळयांचीं हपिसें टौनहालांत आहेत. आग्रिहार्टिकल्चरल् सोसायटीचा उद्देश हा आहे कीं, माळयांस बागेचें काम चांगल्या प्रतीचें शिकवावें; युरोपखंडांत व इतर देशांत अनेक तऱ्हांच्या नवीन वनस्पती आहेत त्यांचें बीं आणून विकावें. या परोपकारी कृत्यावरून युरोपखंडांतील वनस्पति या देशांत पुष्कळ होऊं लागल्या. मोठमोठाले रमणीय बाग तयार होऊं लागले. कोब, सालिट, फ्रेंचबीन्स, सलगम, आलकोल, फूलकोब, पार्स्निप, लूसर्न इत्यादि युरोपखंडांतील भाज्यांचें बीं ही मंडळी युरोपखंडांतून आणून विकते. व कोणी माळी उत्तम प्रकारचीं फळें व नवीन वनस्पति लावून तिची चांगली मरामत केली तर त्यास हरप्रकारें मदत करीत असे. कांहीं वर्षांमागें कोणी माळयास बैलांची जोडी, कोणास विलायती नांगर, कोणास विलायती घोंगडी, कोणास दुसरीं आउतें असें बक्षीस देत असत. परंतु हल्लीं त्यांणीं हें उत्तेजन देणें बंद कां केलें तें समजत नाहीं.

जिओग्राफिकल् सोसायटीचा हा उद्देश आहे कीं, भरतखंडांत ज्याज्या ठिकाणीं नवीन गोष्टी घडून आल्या असतील व जमिनीसंबंधी कांहीं नवा प्रकार घडून आला असेल त्याचें वर्णन करावें व नवीन धातूंच्या खाणी, वनस्पति, जनावरें, वगैरें यांचा शोध करून त्यांचा वृत्तांत लिहून सभेपुढें वाचावा. त्यांचे मासले आणून सभेच्या हपिसांत जमवावे आणि असे तयार झालेले वृत्तांत एकत्र करून त्यांचें पुस्तक प्रतिवर्षीं छापावें. त्या मंडळीच्या खात्यांत अनेक तऱ्हांच्या पदार्थांचें सांठवण करून ठेविलें आहे. ह्या सभेचे सभासद इंग्रज व एतद्देशीय विद्वानांपैकीं पारशी व हिंदु बरेच गृहस्थ आहेत. ह्या सभांकडून शिल्पशास्त्रास व कृषिकर्मास मोठी मदत झाली.

टौनहालाच्या उत्तरेकडील दरवाजानें वर जावें ह्मणजे पुढच्या विस्तीर्ण भागांत प्रख्यात "धि बांबे ब्रांच आफ् धि रायल एशियाटिक् सोसायटी" नांवाचें प्रख्यात पुस्तकालय आहे. मुंबईतील अनेक चमत्कारिक स्थळें व वस्तु पाहून जो आनंद होतो, त्याच्या सहस्रपट हें पुस्तकालय पाहिल्यानें होतो. ह्या पुस्तकालयांत जाऊन मध्यभागीं उभें राहून चहूंकडे दृष्टि फिरवून पाहावें; म्हणजे वरखालीं, आसपास, जिकडे तिकडे अनेक भाषांच्या ग्रंथांच्या रांगा रचलेल्या दृष्टीस पडतात. एके बाजूस संस्कृत पुस्तकांचा ढीग केलेला आहे. दुसऱ्या बाजूस मराठी, गुजराथी, अरबी, हिंदुस्थानी, कानडी, अशा भरत खंडांतील

अनेक भाषांतील हजारो ग्रंथ दृष्टीस पडतात. एके कोठडींत अनेक तऱ्हांच्या पुरातन वस्तु ठेविल्या आहेत. इंग्रजी ग्रंथांची संख्या पाहून तर नवीनच जाणाऱ्याचें मन चकभूल होऊन जातें. या पुस्तकालयांत सुमारें एक लक्ष लहान मोठे असे ग्रंथ आहेत. आणि यांची देखरेख ठेवण्यासाठीं पांच दहा मनुष्यांची नेमणूक केलेली आहे. ह्या पुस्तकालयाच्या वर्गणीदारांस तेथें बसून ग्रंथावलोकन करण्यासाठीं सर्व प्रकारची सोई केली आहे.

आतां पाहा ! हे इतके अनेक विषयांवर ग्रंथ रचण्यास त्याच्या प्रत्येक कर्त्यांस किती श्रम पडले असतील. त्यांला किती रात्री जागरण करावें पडलें असेल ? किती वर्षेंपर्यंत अध्ययन करावें लागलें असेल ? किती काळपर्यंत प्रापंचिक सुखाचा त्याग करावा पडला असेल ? किती द्रव्य खर्चावें लागलें असेल ? व शरीराचे किती हाल करून घ्यावे पडले असतील ? हें कोणाच्यानें सांगवेल. कारण एक विद्वान् असें ह्मणतो.

॥ विद्वानेव विजानाति विद्वज्जनपरिश्रमं ॥
॥ नहि वंध्या विजानाति गुर्वीं प्रसववेदनां ॥

एका प्राकृत कवीचें असें ह्मणणें आहे.

समुद्रांत मासा निद्रा घेतो कैसा ॥
जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे ॥

ज्या ज्या विषयावर आपणास ग्रंथ पाहिजे तो तो ह्या पुस्तकाल्यांत सांपडतो. यास्तव जे विषय निरनिराळ्या स्थानीं आहेत ते ह्या एका ठिकाणीं भरले आहेत, असें ह्मणायास काय चिंता आहे ? ह्या पुस्तकाल्यांत एक लक्ष पुस्तकें आहेत, असें ह्मणतांच आह्मांला एकलक्ष विद्वान् कलाकौशल्यज्ञात्यांचें व परोपकारी गृहस्थांचें स्मरण होतें. आणि ह्या एक लक्ष समुदायामध्यें कोण कसे होते, त्यांचें आचरण कसें होतें, व एवढें ज्ञान संपादन करून घेण्यास त्यांणीं कोणकोणत्या प्रकारचे परिश्रम केले हे विचार सहज उत्पन्न होतात. एथें जातांच आम्हांस व्यास, वाल्मीक, पराशर, गौतम, मनु, पाणिनि, पतंजल, कात्यायन इत्यादि स्वदेशीय महा विद्वान् पुरुष, ज्यांनीं आपल्या ज्ञानरूप सूर्याची प्रभा सर्व पृथ्वीवर पाडिली आहे, व विद्यारूप अमृत पिऊन केवळ अमर होऊन गेले आहेत, त्यांची स्मृति होती. त्याचप्रमाणें होमर् , हिसियड्, हिराडोटस् , प्लेटो, आरिस्टाटल्, पिथागोरस्, व्हर्जिल, सिसिरो, सेनेका, प्लीनी, बेकन्, न्यूटम् , लाक्,

हार्वी, मिल्टन्, शेकस्पियर्, बैरन् इत्यादि परदेशस्थ ग्रंथकारांची व दुसऱ्या नामांकित पंडितांची आठवण पडती, तेणेंकरून विचाररूप तरंगांनीं मन केवळ विस्मित होऊन जातें. जर त्यांच्या ज्ञानाचे ध्वज आमच्या दृष्टीस पडले नसते तर आह्मांस त्यांची आठवण कोठें पडती ? ज्या स्थानापासून एवढे सुखकारक परिणाम घडून येतात त्याची तुलना दुसऱ्या साधारण कोणत्या विषया बरोबर करावी.

ह्या पुस्तकालयाच्या सभासदांचा हेतु केवळ मोठमोठाल्या ग्रंथांचा संग्रह करून पुस्तकालय सुशोभित करून ठेवावें इतकाच नाहीं. परंतु त्यांचा मोठा स्तुत्य उद्योग हाच आहे कीं, एशियाखंडाच्या प्रदेशांत पुरातन शिलालेख, ताम्रपट व जें जें पुरातन काळांतील कलाकौशल्यांसंबंधी सांपडेल, त्याचा संग्रह करणें व त्याजवर विचार करणें ह्या कामाचा विडा ह्या सभेनें उचलला आहे. याचप्रमाणें पुरातन काळीं भरतखंडांत जे जे शककर्ते व दुसरे राजे झाले त्यांचा शोध लावण्याप्रीत्यर्थ शेंकडो वर्षांमागील नाणें, शिक्के, मुद्रा अशा जमा करून ठेविल्या आहेत. व त्यांजवरून कित्येक राजांचे कारकिर्दींचा ठराव केला आहे. शेंकडो रुपये खर्चून पुरातन लिपींचा शोध लावून त्या अर्थासुद्धां सभेच्या वार्षिक इतिहासांत छापून त्यांचा प्रतिवर्षीं एक ग्रंथ तयार करितात. या कामावर ५० रुपये दरमहा देऊन सरकारचे मदतीनें एक शास्त्री ठेवून हें काम प्रख्यात विद्वान् डाक्टर विलसन् यांजकडे सोंपिलें होतें. आणि ह्या प्रीत्यर्थ सरकारानें आजपर्यंत पंचवीस तीस हजार रुपये खर्चिले. विद्वान् इंग्रज लोक ज्या ज्या देशांत आपल्या हुद्यावर जातात तेथें याप्रकरणीं नवीन शोध करून जो कांहीं नूतन विषय सांपडेल त्यावर निबंध रचून तो या सभेकडे पाठवून देतात. तो सभेपुढें वाचल्यानंतर पुस्तकांत छापवितात. अशी त्यांची वहिवाट पुस्तकालय स्थापित झाल्यापासून आजपर्यंत कांहीं विक्षेप आल्यावांचून सुरळीतपणें चालली आहे. एशियाखंडांतील शोध या नांवाचीं या पुस्तकालयांत जीं पुस्तकें आहेत, त्यांत भरतखंडांतील राजे रजवाडे, देवालयें, पुरातनलिपि यांजवर सुरस निबंध सांपडतात. आमच्या कित्येक राजे लोकांविषयीं कांहींच वास्तविक वृत्तांत सांपडत नसे; तो हल्लीं या परोपकारी मंडळीच्या योगानें आह्मांस समजला. हे तिचे आह्मांवर किती उपकार झाले ? असे या पुस्तकालयाच्या संबंधानें उपयुक्त विषयांवर ग्रंथ निघतात. प्रतिवर्षीं इंग्लंड देशांत उत्तम प्रकारचे नवीन ग्रंथ होतात त्यांपैकीं ५,००० रुपयांचे ग्रंथ खरीद करून पाळी पाळी प्रमाणें सभासदांस वाचायास द्यावे, व मासिक, त्रैमासिक

पुस्तकें, व वर्त्तमानपत्रें विकत घेऊन पुस्तकालयांत सभासदांसाठीं संग्रह करावा असा या सभेचा नियम आहे. पाहा ! ह्या त्यांच्या वर्णनीय कृत्यावरून ते स्वतः विद्वान् होऊन दुसऱ्यांसही विद्येची अभिरुचि लागण्याचें साधन करून ठेवितात. ह्या पुस्तकालयांतील पुस्तकांची संख्या उत्तरोत्तर वाढत जाती. हें उपस्थित झाल्यावर कांहीं वर्षांनीं त्यांतील सर्व पुस्तकांचें अनुक्रमानें फेरिस्त (नामावलि) छापून तयार करावें असा ठराव झाला, त्यावेळीं हें काम मयत जनरल् व्हान्स केनडी यांणीं पत्करून मोठया चातुर्यानें सिद्धीस नेलें. ह्या फेरिस्ताचीं दोन मोठीं पुस्तकें छापिलीं आहेत. हें काम करण्यास मोठा विद्वान्, चतुर व किमानपक्ष पांच सहा भाषा पक्क्या जाणणारा पाहिजे. हे सर्व गुण जनरल् केनडी यांमध्यें जागृत होते. हल्लीं पुस्तकांची संख्या वाढल्यामुळें नवीन फेरिस्त तयार करण्यासाठीं एक हजार रुपये खर्चावे असें ठरविलें होतें; परंतु केनडी साहेबासारिखा निपुण हें काम पत्करणारा सांपडणें कठीण. असें सांगतात कीं, ह्या पुस्तकालयांतील बहुतेक ग्रंथांचीं नांवें त्या विद्वान् गृहस्थास मुखोद्गत होतीं.

लंडन शहरामध्यें रायल् एशियाटिक् सोसायटी नांवाचें जें एक मोठें पुस्तकालय आहे त्याची ही एक शाखा आहे. यावरून लंडन शहरामध्यें जो पुस्तकालयरूप वृक्ष आहे त्याचें महत्त्व ध्यानांत आणतां येईल. ह्या पुस्तकालयांत सहस्रावधि अनेक लिपींत छापलेले व लिहिलेले ग्रंथ असून पुरातन काळांतील एशिया अथवा दुसऱ्या खंडांतील वस्तु एकत्र करून ठेविल्या आहेत आणि ह्या वृक्षापासून जीं ज्ञानरूप सुरस फळें निघतात त्यांचा उपभोग सहस्रावधि लोक घेतात.

मुंबईतील ज्या पुस्तकालयाच्या शाखेविषयीं वर्णन करितों त्यास मुंबईत राहणाऱ्या प्रत्येक सभासदास प्रतिवर्षीं शंभर रुपये वर्गणी द्यावी पडती. व जे मुंबई सोडून दुसऱ्या गांवांत जाऊन राहतील त्यांस दरसाल पंधरा रुपये द्यावे पडतात. इची दरमहा सभा भरत असती. विद्वान् व संभावित गृहस्थ असून जे ह्या पुस्तकालयापासून ज्ञान संपादन करायास समर्थ असतील, त्यांसच या सभेचे सभासद करितात. कोणी द्रव्यवान् असून अविद्वान् असला तर उगीच खोगीर भरती करायास त्याला सभासद करीत नाहींत. बहुतकरून जे जे गव्हर्नर मुंबई इलाख्यावर येतात, ते ह्या सभेचे आश्रयदाते असतात, व मुख्य न्यायाधिशासारिखे विद्वज्जन हिचे अध्यक्ष असतात. प्रारंभी जेव्हां या सभेची स्थापना

झाली, तेव्हां सर जेम्स म्याकिंटाश् हे अध्यक्ष होते. हा हुद्दा त्या विद्वान् आणि प्रतापी पुरुषानें पुष्कळ वर्षेंपर्यंत मोठ्या तारतम्यानें व उमेदीनें बजाविला. परोपकारी व विद्वान् डाक्टर विलसन् हे या सभेचे पुष्कळ वर्षेंपर्यंत अध्यक्ष होते आणि सध्या ते तिचे सन्मानित अध्यक्ष आहेत. हे उदार गृहस्थ ह्या सभेच्या कल्याणासाठीं फार झटतात व तीपासून एतद्देशीय लोकांस ज्ञान प्राप्त व्हावें व ते हिचे सभासद असावे ह्मणून त्यांसाठीं ह्यांणीं पुष्कळ मोकळिका केल्या आहेत. त्याचप्रमाणें सर अर्स्किन् पेरी ज्यावेळीं हिचे अध्यक्ष होते त्यावेळीं त्यांणीं एतद्देशीय पुष्कळ लोक ह्या पुस्तकालयाचे सभासद व्हावे ह्मणून त्यांजकडून ५० रुपये वर्गणी घ्यावी असें ठरविलें होतें.

आतां आमच्या देशांत ज्ञानरूप फळांचा वर्षाव करणारा हा वृक्ष कोणत्या परोपकारी आणि उदार गृहस्थानें कोणतेवेळीं आणिला हें जाणणें आवश्यक आहे. ज्या सुज्ञ व विचारी गृहस्थानें आह्मांवर एवढे उपकार केले त्याचें नांव सर्वांस माहीत असलें पाहिजे. कांहीं वर्षांमागें मुंबईतील सुप्रीम कोर्टामध्यें सर जेम्स म्याकिंटाश् नामें मोठे निष्पक्षपाती, सहनशील व चतुर असे न्यायाधीश होते. जे या सभेचे अध्यक्ष होते असें सदरीं सांगितलें आहे त्यांनींच ही सभा सन १८०४ मध्यें लोककल्याणार्थ उपस्थित केली. ही केवळ इंग्रज लोकांसाठींच स्थापिली आहे असें कोणी समजूं नये. तर तिजपासून एतद्देशीय लोकांसही ज्ञान संपादन करून घेण्याचें साधन करून ठेवावें असा त्या परोपकारी गृहस्थाचा अभिप्राय, यांत कांहीं भ्रांति नाहीं.

सन १८६१ त मुंबईत राहणारे ह्या मंडळीचे सभासद पांसष्ट व बाहेरगांवीं राहणारे पंचेचाळीस होते. आणि ह्यांत एतद्देशीय लोकांची संख्या इतकी थोडी आहे कीं तिजविषयीं सांगण्यास लाज वाटती. त्यांत पारशी लोकांतील बरेच गृहस्थ आहेत. परंतु हिंदुलोकांपैकीं फारच थोडे आहेत. किती हो ही दुःखाची गोष्ट ! मुंबई ह्मटली ह्मणजे इंग्रजी विद्येचें व व्यापाराचें व संपत्तीचें स्थान. तेथील लोक सुधारलेले, त्यांसच जर अशा पुस्तकालयांत जाऊन किंवा एथील पुस्तकें घरीं आणून वाचण्याचा कंटाळा, तर मग बिचाऱ्या इतर लोकांची काय कथा ? ज्या शहरांत विद्यालयें व पुस्तकालयें पुष्कळ आणि वाचणारांची संख्या जाजती तेंच शहर लौकिकास येतें. परंतु आमच्या कित्येक श्रीमान् लोकांची असी समजूत आहे कीं, सरस्वती आणि लक्ष्मी यांमध्यें वैर आहे. ज्या

ठिकाणीं एक वसती त्या ठिकाणीं दुसरी नांदत नाहीं. या भीतीनें ते गर्भगलित होऊन विद्येचा नाद सोडून देतात. परंतु ही केवळ मनःकल्पित भीति आहे. जेथें ज्ञान आहे तेथें सुख आहे, यांत कांहीं भ्रांति नाहीं. पाहा ! इंग्रज लोकांमध्यें जे जे विद्वान् तेच बहुतकरून सधन, सुखी व प्रतिष्ठित असतात. आणि यास आमच्या एका ऋषीचेंही मत आहे.

विद्या ददाति विनयं विनयाद्यातिपात्रतां ॥
पात्रत्वाद्धनमाप्नोति धनाद्धर्मं ततःसुखं ॥

कृतीवरून मनुष्याच्या स्वभावाचें अनुमान होतें. जेव्हां विद्येविषयीं आमची अनास्था परकी लोक पाहतात तेव्हां अर्थातच ते आह्मांस अज्ञानी समजतात. ग्रंथांतरीं असी गोष्ट सांपडती कीं, एके दिवशीं रोमशहराचा बादशहा सीझर याची स्वारी रस्त्यांतून जात असतां कोणी परदेशी बगलेंत कुतऱ्यांचीं व माकडांचीं पिलें मारून त्यांस कुरवाळीत जात आहेत असें त्याचे दृष्टीस पडलें. तेव्हां त्याच्या तोंडांतून पुढील शब्द निघाले " कायहो या लोकामध्यें स्त्रियांस मुलें होत नाहींत काय ? " त्याप्रमाणें जेव्हां इंग्रज लोक आह्मांस पोरकट गोष्टींचें अवलंबन करितानां पाहतात, तेव्हां ते असें ह्मणतात " कायहो अज्ञानी हिंदुलोक ? यांमध्यें कोणी विद्वान् व पोक्त पुरुष होत नाहींत ? " थोडक्या दिवसांवर एका सुज्ञ इंग्रज गृहस्थाच्या तोंडांतून असे शब्द निघाले. " अहो हिंदुलोकहो तुह्मांमध्यें मागें मोठमोठे विद्वान् होऊन गेले, ह्मणून तुह्मांवर मी प्रीति करितों, परंतु हल्लींची तुमची विद्येवरील अनास्था पाहून मला तुमचा तिरस्कार येतो. "

ह्या पुस्तकालयाची स्थापना होऊन आज सुमारें छप्पन्न वर्षें झालीं. एवढ्या काळांत शतावधि इंग्रजलोक ह्या सभेचे सभासद होऊन गेले. व भरतखंडासंबंधी जे जे शोध त्यांला करणें आवश्यक होते ते करून ह्या सभेच्या संबंधानें मोठमोठाले ग्रंथ छापिले आणि अद्याप त्यांणीं तोच क्रम चालविला आहे. बरें ह्या इतक्या दीर्घ काळांत आमच्या स्वदेशीय बंधुजनांतील किती गृहस्थांनीं या सभेपासून ज्ञान प्राप्त करून घेऊन लोक कल्याणार्थ किंवा स्वहितार्थ किती ग्रंथ रचिले ? मयत बाळ गंगाधर शास्त्री ह्या सभेचे सभासद होते. आणि त्यांणीं आपल्या अल्पवयांत ह्या सभेकडून जेवढें ज्ञान संपादन करवेल तेवढें केलें. त्यांनीं इंग्रजी भाषेंत लिहिलेले कित्येक विषयांवर सुरस निबंध ह्या व जिओग्राफिकल् सोसायटीच्या वार्षिक इतिहासांत छापलेले अढळतात. असीं हल्लीं एक दोन

विद्वान् गृहस्थांचीं नांवें या सभेच्या पटांत सांपडतील. परंतु या मुंबई टापूची सुमारें आठ लक्ष प्रजा आहे त्यांत हीं नांवें कशांत कांहींच नाहींत. "समुद्रामध्यें जायफळ." परंतु मुंबई टापू कां ह्मणावें, सर्व मुंबई इलाखा ज्यांत लोकांची संख्या दीड कोटीवर आहे, त्यांत हे इतके गृहस्थ ह्मटलें असतां चिंता नाहीं.

आह्मां लोकांमध्यें पूर्वीपासून असीं पुस्तकालयें नसल्यामुळें मध्यम प्रतीच्या लोकांस एकादा ग्रंथ अवलोकन करण्याची इच्छा झाल्यास तो मिळणें कठीण होतें. आणि एकाद्यास ग्रंथ दिला असतां तो परत येण्याची भ्रांति पडे. यामुळें कोणी एक विद्वान् असें ह्मणतो.—

पुस्तकं वनिता वित्तं परहस्तं गतं गतं ॥
कदाचित् पुनरायातं नष्टं भ्रष्टं च खंडितं ॥

एका ग्रंथांत असें वाचण्यांत आलें कीं, फ्रान्स देशामध्यें एका वयातीत झालेल्या पुरुषानें पंचाण्णवाव्या वर्षाच्या वयांत एक मोठा सुरस उद्भिद शास्त्रावर ग्रंथ रचून लोककल्याणार्थ छापविला. या प्रमाणें चांगली सवई लावून घेतल्यानें असे सुखदायक परिणाम घडून येतात. परंतु आमच्या लोकांचा असा समज आहे कीं, पुष्कळ ग्रंथावलोकन केल्यानें वेडा होतो. कित्येक आमचे लोक वृद्धपण प्राप्त झालें असतां उद्योग करवत नसल्यामुळें आपलें आयुष्य निजण्यांत व निरुपयोगी गोष्टी करण्यामध्यें घालवितात. ते जर या प्रतीच्या पुस्तकालयांत जाऊन पुस्तकें वाचण्यांत व त्यांवर आपले विचार लिहिण्यांत खर्चितील तर त्यांकडून आपलें हित व देशाचें मोठेंच कल्याण होईल. एके दिवशीं एका विद्वान् इंग्रजानें असा प्रश्न केला, तो ऐकून मोठें आश्चर्य वाटलें. "ग्रंथावलोकन केल्यावांचून मनुष्याचा निर्वाह होईल काय ?" यास आमचे लोक उत्तर काय देतील ? हें माझ्यानें सांगवत नाहीं.

अजरामरवत्प्राज्ञो विद्यामर्थं च साधयेत् ॥
गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् ॥

या श्लोकाच्या अन्वयाकडे लक्ष लावून जेव्हां आमचे तरुण व वृद्धलोक चालतील तेव्हांच त्यांला विद्येचा सुखानुभव घेतां येईल.

जनरल् व्हान्स केनडी ज्याविषयीं वर सांगितलें आहे, तो नव्वद वर्षांचा वृद्ध होता, तरी शास्त्री ठेवून संस्कृत ग्रंथ पढत असे. आणि मराठी, गुजराथी, व इंग्रजी नवीन पुस्तकें घेऊन सवड सांपडे तेव्हां अवलोकन करीत असे. या

प्रमाणें विद्या संपादन करण्यांत कित्येक इंग्रज विद्वान् लोक आपल्या आयुष्याचा व्यय करितात.

सन १८५२ सालीं या शहरांत एक मोठीच सांगण्याजोगी गोष्ट घडून आली. एतद्देशीय सर्व जातींचे गृहस्थ एकत्र जमून सभा भरली होती. ह्या सभेंत शेट सावकार, सरकारी चाकर व दुसरे प्रतिष्ठित लोक जमले होते. हिचा उद्देश असा होता कीं मुंबई इलाख्यांतील रयतेस कांहीं उपद्रव होत असला तर त्याचा शोध लावून सभेच्या संबंधानें रयतेचीं दुःखें कंपनी सरकारच्या नजरेस आणून देऊन रयतेस हरप्रकारें सुख प्राप्त होई असें करावें. कदाचित् जरूर पडल्यास कंपनी सरकाराचें अनुमत घेऊन मुख्य सरकारास देखील अर्ज करून देशांत स्वस्थपणा राखावा. असे या सभेचे स्तुत्य उद्देश होते. ह्या सभेस "बांबे आसो-सिएशन्" असें नांव ठेविलें होतें. प्रथम ही सभा भरली होती तिची रचना व गृहस्थ लोकांचा थाट व हुशारी पाहून कित्येकांस असें वाटलें कीं, हा समाज आतां एतद्देशीय लोकांचें दारिद्र्य आणि दुःख हीं देशांतरास लावून देईल, आणि वास्त-विक ही सभा इंग्लंड देशांत पार्लमेंट या नांवाची एक सभा रयतेच्या तरफेनें आहे तिचीच एक प्रतिमा असावी असा बहुतेकांस भास झाला. परंतु आज दिवसपर्यंत या सभेकडून सांगाया जोगें कांहीं घडून आलें नाहीं. आणि अजून रयतेस कोणत्या प्रकारचीं दुःखें आहेत याचाही शोध लावला नाहीं, व पुढें लावायाचा हेतुही दिसत नाहीं. या वरून आमचे लोक केवळ आरंभशूर आहेत असें जें कित्येक ह्मणतात तें खोटें नाहीं. "डोंगर व्याला आणि उंदीर निघाला" या प्रमाणें या सभेची अवस्था झाली. जरी मुंबईतील निरनिराळ्या जातींचे गृहस्थ एकादे वेळीं लोक-कल्याणार्थ कृत्यें करण्यासाठीं एकत्र जमतात तरी त्यांमध्यें तादृश एकी नसती. त्यांत एकमेकांसीं मोकळे मनानें वागणारे थोडेच सांपडतात. व ते अशा प्रसंगीं परोपकार बुद्धीचा उपयोग करावा त्या रीतीनें करीत नाहींत. त्यामुळें आमची कोणतीही स्वदेशकल्याणाविषयींची गोष्ट सिद्धीस जात नाहीं. जरी कित्येक बाह्या-त्कारी एकमेकांसीं स्नेह भावानें बोलत असतात, तरी अंतर्यामीं जातिभेदामुळें ह्मणा किंवा दुसऱ्या कारणावरून ह्मणा मनांत कांहीं तरी किसपट असतें. आणि हेंच एक आमचा मोठा शत्रु आहे. जेव्हां मुंबईतील किंबहुना एतद्देशीय लोक एकमेकांशीं मोकळ्या मनानें व उदार दृष्टीनें वागूं लागतील तेव्हांच ते सुखी होतील. त्याशिवाय जरी आह्मीं अशा शेंकडो सभा उपस्थित केल्या आणि

हजारो शाळा घातल्या तरी फलश्रुति कांहीं नाहीं. देशाभिमान सर्वांमध्यें सारखा असला पाहिजे तेव्हांच या गोष्टी सिद्धीस जातात. प्रत्येक मनुष्यानें जातिभेद मनांत न आणितां सर्वांशीं समदृष्टीनें वागलें पाहिजे. ह्या विषयीं ज्ञानोदयांत हा पुढील वृत्तांत छापिला होता.

गेल्या महिन्याच्या ५ वे तारिखेस गुरुवारीं चार वाजतां एतद्देशीय लोकांचीं सभा एल्फिन्स्तन् विद्यालयामध्यें भरली होती. तिचा उद्देश असा कीं, हल्लीं नवीन सनद होणार ह्मणून आपल्या लोकांचें कल्याण कोणत्या योगानें होईल याचा विचार करून विलायत सरकारास कळवावें ह्मणून मंडळी स्थापावी. त्यावेळीं श्रीमंत राजमान्य राजश्री जगन्नाथ शंकर शेटजी हे प्रमुख स्थानीं बसले होते आणि त्यांनीं प्रथम फारच सुंदर रीतीनें भाषण चालविलें, कीं या देशांतील रयतेचें कल्याण करावें अशी इंग्लिश सरकाराची इच्छा आहे ह्मणून आह्मीं सरकारच्या विरुद्ध कोणतें काम चालवावें असें नाहीं. तर कोणत्या योगानें या देशाचें कल्याण होईल या विषयीं चांगला विचार करून सरकारास कळविणें. ही मदत करण्यास आह्मीं अवश्य आवेशी व्हावें. आणि आह्मीं चांगले विचार सरकारास कळविले, तर तें नाकबूल करील असें कोणी समजूं नये. या प्रमाणें चांगलें भाषण झाल्यानंतर असें ठरलें कीं, "मुंबई आसोसिएशन्" या नांवाची मंडळी स्थापून कलकत्ता व मद्रास एथील मंडळयांसीं मिळून विचार करावा आणि नंतर जे बरे विचार ठरतील ते विलायत सरकाराला कळवावे व या कामाला खर्च लागेल सबब पट्टी करावी. नंतर सभेचा उद्देश, कायदे इत्यादि स्थापून शेवटीं कामदार नेमिले. ते येणेंप्रमाणें :—

| | |
|---|---|
| सर जमशेटजी जिजीभाई नैट | सन्मानार्थ मुख्य. |
| श्रीमंत जगन्नाथ शंकरशेटजी | अध्यक्ष. |
| बंमनजी हार्मस्जी | उपाध्यक्ष. |
| खरशेटजी जमशेटजी | उपाध्यक्ष. |
| डाक्तर भाऊदाजी<br>विनायक जगन्नाथजी | चिटणीस. |

यांशिवाय दुसरे १५ संभावित गृहस्थ कमिटींत नेमले आहेत. ज्यांनीं या सभेस मोठी देणगी दिल्ही त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें आहेत.

| | रुपये. |
|---|---|
| सर जमशेटजी जिजीभाई . . . . . . . . . . . . . | ३,००० |
| जगन्नाथ शंकरशेटजी . . . . . . . . . . . . . . | १,००० |
| सखाराम लक्ष्मणजी . . . . . . . . . . . . . . | १,००० |
| धनजीभाई नसरवानजी कामा . . . . . . . . . . . | १,००० |

यां शिवाय दुसऱ्याही गृहस्थांनीं मिळून २०,००० हजारांची बेरीज देऊं केली आहे. २६ वी आगष्ट सन १८५२.

या मंडळीचा रपोट आह्मांस पोहंचला, त्या विषयीं आह्मीं उपकार मानितों. ह्या मंडळीकडून कोणकोणत्या गोष्टी घडल्या त्या सदरहू रपोटावरून ध्यानांत आल्या, आणि त्या सर्व हितावहच आहेत, अशा दिसतात, तरी ह्या गोष्टी क्षुल्लक असा भास होतो. मोठी बाब धरून या देशाचें हित होईल अशा धोरणाचें कांहीं दिसत नाहीं. तशा बाबती पुष्कळ आहेत, जेणेंकरून देशाची सुधारणा व्हावी. दोन उपायांनीं देशाची सुधारणा होती. एक तर कायद्याच्या योगानें आणि दुसरी लोकांच्या प्रयत्नानें. त्यांत पहिल्या प्रकारानें कसकशी सुधारणा होईल हें कायदे करणाऱ्या मंडळीस सदरहू मंडळीनें दाखवावें आणि त्याबरहुकूम कायदे करण्याविषयीं अर्ज करावा. आणि अशा मंडळीनें केलेला अर्ज कायदेकर्त्या-मंडळीला ग्राह्य होईल. कांहीं कायदे अयोग्य असतील तर ते रद्द करतील आणि आतां जे करायाला पाहिजेत ते सुरू करतील. तर या प्रकारें मंडळीनें या कामांत आपली मदत दाखवावी आणि दुसऱ्या प्रकारच्या लोकांमध्यें सुधारलेले आहों ह्मणून सभासदांनीं दाखवावें. आणि त्याबरहुकूम आपल्या देशबंधूंस वर्त्तणुकीचे कित्ते व मदत करणारे असें व्हावें. या कामासाठीं आसोसिएशनाच्या सभासदांस पुरतें धैर्य येवो आणि ते उत्तरोत्तर सफल होवोत. ज्ञानोदय.

४ थीं जुलई १८५६.

मेक्यानिक्स इन्स्टिट्यूशन् नांवाची एक विद्वज्जनमंडळी एथें आहे. इचा उद्देश इंग्रजीभाषेच्या पद्धति, शिल्पशास्त्र, कलाकौशल्य, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, यांमध्यें लोकांस गम्य होऊन देशांत ज्ञानाची व सुखाची वृद्धि व्हावी. ह्या सभेचे सभासद सरकारी कामगार व दुसरे गृहस्थ आहेत. आणि ते पाळीपाळीप्रमाणें लोककल्याणार्थ वर्षांतून आठ दहा वेळीं अनेक विषयांवर व्याख्यानें देतात. ह्या

व्याख्यानांस पाहिजे त्यास जाण्यास मोकळीक आहे. व दर आठवड्यांत जेव्हां ह्या सभासदांच्या सभा भरत असतात तेव्हां ते निबंध वाचीत असतात. त्यावेळीं मकूथा आमंत्रित गृहस्थांस मात्र जाण्याची परवानगी असती. ह्या मंडळीच्या सभा टौनहालांत भरत असतात. इचें पुस्तकालयही त्याच ठिकाणीं स्थापिलें आहे. रेलवे कंपनींतील मुख्य इंजनेर मिस्तर बर्क्ली हे या सभेचे पुष्कळ वर्षेपर्यंत अध्यक्ष होते. व हल्लीं कर्नल् बार हे हिचे अध्यक्ष आहेत. ह्या मंडळीचे सभासद एतद्देशीय विद्वान् लोकांपैकीं बरेच आहेत. ह्या सभेचे सभासद होण्यास दरमहा थोडी वर्गणी द्यावी पडती. ह्या सभेंत जे इंग्रजी भाषेंत उत्तम प्रकारचें व्याख्यान देतील व निबंध लिहितील त्यांस ही सभा शेंदोनशें रुपयेपर्यंत दर खेपेस बक्षीस देते. आणि कोणेसमयीं योग्यतेनुसार सोन्याचीं व रुप्याचीं पदकेंही देते. ह्याहि सभेचा उद्देश मोठा स्तुत्य आहे. आणि आमच्या लोकांतील पुष्कळ विद्यार्थी हिचे सभासद होऊन यांस बराबर निबंध लिहितील व व्याख्यानें देतील तर त्यांस इंग्रजी भाषेचें मर्म समजून ते इंग्रज लोकांच्या बरोबरीस त्या भाषेंत हुशार होतील. अशा सभा असल्यानें मनुष्याच्या अंगीं सभाधीटपणा व वक्तृत्व-शक्ति येती. आणि आपल्या लिहिण्यावर विश्वास बसून आपण लिहितों तें शुद्ध किंवा अशुद्ध आहे हें समजतें आणि भ्रांति उडून जात्ये. एकादेवेळीं नवीनच सभेंत बोलायाचा प्रसंग आला असतां कंप सुटून कांहीं सुचेनासें होतें. अशा प्रकारच्या उपाधि दूर करण्यास ह्या सभांची फारच आवश्यकता आहे.

दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी या नांवाची एक सभा या शहरांत सन १८४९ त स्थापित झाली. ही मोठी उपयोगी सभा उपस्थित करणारे मुख्य गृहस्थ बहुतकरून कर्नल फ्रेंच, जे कांहीं वर्षांमागें जनरल् औटरान् साहेबा-बद्दल बडोद्यास रेसिडेंट होते ते, आणि मयत कप्तान हार्ट, जे पेन्शन् खात्यावर मुक्तसर होते ते, हे दोघेही गृहस्थ एतद्देशीय लोकांवर फार प्रीति करीत. आमचे लोक सर्व गोष्टींत हुशार व्हावे असी त्यांची निष्काम भक्ति होती. एतद्देशीय लोकांस ग्रंथ वाचायाचा जो तिरस्कार पडून गेला आहे, तो दूर करायास त्यांच्या स्वभाषेंत अनेक विषयांवर मनोरंजक व ज्ञानोत्पादक असे ग्रंथ तयार करून द्यावे आणि अशा उपायांनीं त्यांमध्यें विद्येची अभिरुचि उत्पन्न झाली ह्मणजे त्यांस इंग्रजी व दुसऱ्या विद्या संपादन करण्याचा व्यासंग सहज लागेल असें त्यांचें ह्मणणें होतें. हें लक्षांत आणून केवळ आह्मां लोकांचेंच हित व्हावें ह्मणून त्यांनीं

पुष्कळ श्रम घेऊन ह्या कामास हात घातला, आणि संभावित लोकांस पत्रें पाठवून ह्या प्रकरणीं सभा भरली. हिचे सभासद गव्हर्नर देखील होते. तसेंच एतद्देशीय लोकांपैकीं मोठमोठाले गृहस्थ रामलाल, जगन्नाथ शंकरशेट, बमनजी हारमसजी वगैरे पुष्कळ गृहस्थ होते. समशेर बहाद्दर राजे साहेब गणपतराव गायकवाड हे सन १८४९ त एथें आले होते. त्यांणीं ह्या सभेस पांच हजार रुपये दिले. ह्या सभेचे अध्यक्ष नामदार विलबी साहेब कौन्सलर हे होते. या प्रमाणें ह्या सभेचें स्तुत्य काम चालवायास मंडळीनें सुमारें पंचवीस हजार रुपये जमविले. मग त्यांणीं तें द्रव्य व्याजास ठेवून त्या द्रव्याच्या व्याजापैकीं जें उत्पन्न होईल तें खर्चून दोन तीन कारभारी ठेविले आणि काम पडेल त्यावेळीं ऐन रकमेंतून द्रव्य काढून इंग्रजी भाषेंत जे चांगले ग्रंथ असतील त्यांचें सभासदांच्या अनुमतानें मराठी भाषेंत भाषांतर करवून छापून तें ऐन किमतीनें लोकांस विकावें. आणि त्यापासून जें द्रव्य उत्पन्न होईल, तें फिरून मुळच्या रकमेंत भरावें. या प्रमाणें मूळ अनामत ऐवजास धक्का लावूं नये, असे या सभेचे मोठे चांगले नियम होते. आणि याप्रमाणें त्यांणीं आजपर्यंत दहावीस हजार रुपये खर्च करून आठदहा ग्रंथ चांगले तयार करून छापिले. परंतु आमचे लोक काय विचारता? त्यांची स्थिति हल्लीं "आंधळया जवळ नाचणें आणि बहिऱ्याजवळ गाणें" या प्रमाणें झाली आहे. ह्या लोकांकडून आपलें कल्याण करून घेण्याची त्यांस मुळींच आस्था नाहीं. ह्या मंडळीनें हजारो पुस्तकें छापिलीं तरी आमचे लोक कांहीं वळत नाहींत. त्यांणीं आपलें द्रव्य अशा स्तुत्य कृत्याकडे वेचून पुस्तकें छापून ठेविलीं आहेत. परंतु तीं आमचे लोक उत्सुकतेनें विकत घेत नसल्यामुळें ह्या सभेचें द्रव्य सर्व खर्चून तिचें काम हल्लीं थोडें ढिलें पडलें आहे, तथापि त्यांणीं तो क्रम चालविलाच आहे. प्रथम त्या सभेचे चिटणीस कपतान हार्ट साहेब होते. यांणीं तर या सभेचें काम मोठेंच श्रम घेऊन चालविलें. आणि त्यांची अशी इच्छा होती कीं मुंबई इलाख्यांत जे सगळे दक्षिणी सरदारलोक व राजेरजवाडे आहेत, त्या सर्वांकडून या कृत्यास आश्रय मिळवून त्यांस देखील मनोरंजक ग्रंथ पाठवून त्यांमध्यें ग्रंथ वाचण्याची ईर्षा उत्पन्न करावी. आणि हा मुख्य हेतु लक्षांत धरूनच त्यांणीं हें काम हातीं धरिलें होतें. पुढें एक दोन वर्षांनीं हें काम सिद्धीस जाण्याचे पूर्वींच त्यांस देवाज्ञा जाहाली. ही एक आमच्या लोकांची मोठीच हानि झाली. ह्या एका गृहस्थापासून आह्मां लोकांत विद्येचा प्रसार बराच झाला असता, हल्लीं या सभेचे

चिटणीस सुप्रीम कोर्टांतील मुख्य भाषांतर करणारे मिस्तर फिलन् साहेब व त्यांचे मदतनीस नारायण दिनानाथजी हे आहेत.

नेटिव्ह जनरल् लैब्ररी या नांवाचें एक पुस्तकालय एथें सन १८४५ त स्थापित झालें. याला पुष्कळ एतद्देशीय व इंग्रज साह्यकर्त्ते होते. परंतु हें उपस्थित करणारा वास्तविक गृहस्थ ह्मटला तर रावबहादूर राघोबा जनार्दन. हल्लीं हे बेळगांव येथील डेपुटी कलेक्टर आणि माजिस्त्रेट आहेत. हे पूर्वी मुंबई-तील मिलिटरी बोर्ड नांवाच्या सरकारी हपिसांत सरकारकून होते. यांनीं हें श्रम घेऊन एतद्देशीय लोकांसाठीं काढिलें. यांत मयत बाळगंगाधर शास्त्री यांचेंही अंग होतें असें सांगतात. हें सध्या धोबीतळ्यावर आहे. यांत संस्कृत, इंग्रजी, मराठी, गुजराथी मिळून दोनहजार पस्तीस विषयांवर ग्रंथ आहेत. यांत चार आण्यांपासून दोन रुपये पर्यंत दरमहा वर्गणी द्यावी पडते. वर्गणीदारांच्या तीन प्रती आहेत त्या येणेंप्रमाणें २, १, रु० ४ आणे. जसजसी वर्गणी जास्त देतील तसतसीं त्यांस पुस्तकें घरीं नेण्याची मोकळीक मिळते. पुष्कळ सुशिक्षित लोक या पुस्तकालयांत सकाळ संध्याकाळ वर्त्तमानपत्रें वाचायास व ग्रंथावलोकन करायास जातात. एथें मराठी, इंग्रजी, गुजराथी, व दुसरीं वर्त्तमानपत्रें वाचायास सांपडतात, व आपणास लागेल तो ग्रंथ घरीं नेण्याची मोकळीक आहे. तो नेमि-लेल्या दिवसांत परत केला पाहिजे. सन १८६२ त या पुस्तकालयाचे चिटणीस शेट आर्देसर फ्रामजी हे होते. हे एतद्देशीय लोकांच्या कल्याणार्थ फार झटतात. या पुस्तकालयास कोर्ट आफ् डरेक्टर्स यांनीं नवेंच स्थापित झालें होतें तेव्हां हजार रुपये पुस्तकें विकत घेण्यास दिले होते. आमच्या कित्येक मराठी राजे व सरदार लोकांनींही यास बरीच मदत केली होती. व सर अर्स्किन् पेरी यांनीं इंग्लंडास जातेसमयीं ५०० रुपये दिले होते.

ही स्थापण्याचा मुख्य हेतु हा होता कीं, लोक हपिसांत जाऊन धंदा रोज-गार करूं लागले म्हणजे त्यांचें ग्रंथावलोकन करणें बंद पडतें. जो अभ्यास त्यांनीं पूर्ववयांत केलेला तो विसरून जातात. मग सहजच त्यांची विद्येवरील भक्ति उडत्ये. मग ते आपलें आयुष्य गप्पा झोकण्यांत व आळसांत घालवितात. अशा लोकांकडून दिवसांतून तास दोनतास तरी विद्येकडे लागावें ह्मणून ही उभारिली होती. आणि प्रथम दरमहा चार आणे वर्गणी ठेविली होती, परंतु हिंदुलोकांत ग्रंथ वाचून ज्ञान संपादन करण्याची अभिरुचि फारच कमी असल्यामुळें ज्या

लोकांसाठीं ही उभारिली होती त्यांजकडून ह्या संस्थानाची चांगली निगा झाली नाहीं. सबब ती फारशी भरभराटास आली नाहीं. परंतु हीस हल्लीं पारशी, पोर्टुगीझ् व इंग्रज वगैरे वर्गणीदार असल्यामुळें ही नीट चालली आहे. तरी करावा त्या रीतीनें हिचा विनियोग करणारे थोडेच. हिंदुलोकांस अजून विद्येचा व्यासंग व ग्रंथावलोकन करण्याची गोडी लागली नाहीं.

अशा लैब्ऱ्या (पुस्तकालयें) या शहरांत तीस चाळीस आहेत. कांहीं गोष्टींत आमचे लोक आरंभशूर आहेत. परंतु शेवटपर्यंत एकादें कृत्य तडीस नेण्याचें धोरण त्यांजकडे राहत नाहीं. मराठी, इंग्रजी, आणि दुसऱ्या निरनिराळ्या भाषांतील पुस्तकें विकण्याचीं दुकानें सुमारें १५० आहेत.

गव्हर्मेंट डीपो ( सरकारी शालोपयोगी व दुसरीं अनेक भाषांतील पुस्तकें विकण्याचें स्थळ. ) हें हल्लीं काळबादेवीच्या रस्त्यावर आहे. ह्या ठिकाणीं अनेक विषयांवर व अनेक भाषांत सुमारें दोन लक्ष रुपयांचीं पुस्तकें आहेत. इंग्रजी पुस्तकें व नकाशे इंग्लंडाहून आणवितात व एतद्देशीय भाषांत एथें छापवितात. एथून तीं मुंबई इलाख्यांतील गांवोगांवच्या शाळांवर पाठवितात.

ज्ञान आणि सुख प्राप्त करून घेण्याचीं साधनें निरंतर शोधीत असावें, असा इंग्रज लोकांचा स्वभाव आहे. आणि त्यांचे हे प्रयत्न सिद्धीसही जातात. सन १८५६ नांत सरकारानें देशोदेशांतून अपूर्व वस्तु आणून टौनहालामध्यें एक लहानसें सर्वपदार्थप्रदर्शन केलें. त्यावेळीं तें पाहायास या शहरांतील स्त्रिया, पुरुष, मुलें, बाळें असे प्रतिदिवशीं हजारो लोक जात होते. एथें अनेक पदार्थांची रचना मोठ्या तारतम्यानें केली होती. अनेक देशांतील धान्यें, वस्त्रें, जनावरें व पक्षी जमवून ठेविले होते. एथें मोठमोठाले सर्प व अजगर देखील होते. हें पदार्थप्रदर्शन करण्याचा उपक्रम प्रथम मयत डाक्तर ब्युइस्ट यांनीं काढिला. हे लोककल्याणाच्या कामांत फार मन घालीत असत. आणि यांच्या सूचनेवरूनच आह्मांस हा अभिनव चमत्कार दृष्टीस पडला. मग त्यांस एतद्देशीय कित्येक परोपकारी गृहस्थ अनुकूल झाले. कित्येक गैरसमजुतीचे लोक हें पाहून असें ह्मणत. "कायहो हें ! असले पदार्थ या ठिकाणीं जमवून लोकांस दाखविण्याप्रीत्यर्थ शेंकडों रुपये खर्च करणें यांत फलश्रुति काय ! असे पदार्थ आह्मी हजारो वेळां पाहतों, परंतु त्यांपासून आह्मांस कांहीं लभ्यांश झाला नाहीं. इंग्रज लोकांची

ही केवळ वेडी समजूत आहे. उगीच द्रव्य मात्र नासून टाकितात." अशा विलक्षण आमच्या लोकांच्या कल्पना आहेत.

सर्वपदार्थसंग्रहालय हें विद्या संपादन करण्याचें व मनास रमविण्याचें मुख्य स्थान आहे. पृथ्वीवरील लोकांच्या कलाकौशल्याचे मासले व दुसऱ्या चमत्कारिक वस्तु एकत्र गोठिवलेल्या पाहिल्या ह्मणजे लोकांस उद्योग करण्याची ईर्षा उत्पन्न होती. एकादा आळशी असला तरी त्यास उद्योग करण्यास उत्तेजन येतें. कोणती वस्तु पाहून कोणत्या मनुष्यास कोणत्या प्रकारचें ज्ञान होईल, व त्यामध्यें कोणत्या-प्रकारची वीरश्री येईल, हें सांगवत नाहीं. सर्वपदार्थसंग्रहालय हें लोकांस उपयुक्त ज्ञान देणारें विद्यालय आहे. युरोपखंडामध्यें अशीं स्थळें पुष्कळ आहेत. लंडन शहरामध्यें एक नामांकित सर्वपदार्थसंग्रहालय आहे तें तर अति उत्तम आहे असें सांगतात. फक्त ही इमारत बांधायास ८५,००,००० रुपये खर्च झाला. आणि यांत ज्या अमोलिक वस्तु आहेत त्या सर्व पृथ्वीवरील देशांतून जमविल्या आहेत. आणि त्यांत अनेक भाषांतील पुरातन लेख, पुस्तकें, शिक्के व नाणीं आहेत. अशीं शहरांत असलीं ह्मणजे उद्योगी व मेहनत करणाऱ्या लोकांस विश्रांतिस्थान सांपडतें. व तेणेंकरून त्यांस अमोलिक ज्ञान प्राप्त होतें.

सन १८५८ माहे डिसेंबर १५ रोजीं मुंबई शहरांत टौनहालामध्यें इंग्रज व एतद्देशीय लोकांची सभा भरली होती. ह्या सभेचा उद्देश हा होता कीं सन १८५८ त महाराणीनें कंपनी सरकारच्या हातांतून भरतखंडांतील राज्यकारभार आपल्या हातीं घेतला त्या दिवसाची चिरकाळ स्मृति राहवी व या देशाच्या लोकांची राजनिष्ठा प्रदर्शित करावी ह्मणून या शहरांत एक सर्वपदार्थसंग्रहालय व त्याच्या आसमंतात् रमणीय बाग असें एक अपूर्व स्थळ तयार करावें, आणि त्यास इंग्लंड व भरतखंडाचें राज्य चालविणारी महाराणी विक्टोरिया इच्या सन्मानार्थ "विक्टोरिया सर्वपदार्थोपवनालय" असें नांव ठेवावें असें ठरलें होतें. असें स्थळ मुंबई सारिख्या शहरांत असण्याच्या आवश्यकतेच्या विषयांवर पुष्कळ गृहस्थांनीं सुरस भाषण केलें. त्या सभेचे अध्यक्ष नामदार जगन्नाथ शंकरशेट यांस नेमिले. आणि डाक्तर बर्डउड् आणि डाक्तर भाऊदाजी हे ह्या सभेचे चिटणीस नेमिले गेले. जगन्नाथ शंकरशेटजी यांणीं या कृत्यास पांच हजार रुपये वर्गणी दिली. तसेच कित्येक पारशी, वाणी, इत्यादि लोकांनीं आपआपल्या शक्त्यनुसार या कामास द्रव्य दिलें. यास सुमारें एक लक्ष रुपये जमले. हें जें

द्रव्य जमा जहालें तें केवळ एतद्देशीय लोकांचीच वर्गणी. याशिवाय सरकारांतून एक लक्ष रुपये मिळाले व त्यास इमारत बांधावयास भायखळ्याच्या शेवटास चिंचपुगळी नजीक सरकारानें मोठी विस्तीर्ण जागा दिली आहे. याच्या बाजूस शिवरीस सरकारी बाग होता तोही आणिला आहे. ह्या इमारतीचें काम सुरू झालें आहे व ती एक दोन वर्षांनीं तयार होईल. हिची लांबी १८०, व रुंदी ८० फुटी आहे. ह्यांत ठेवण्याचे पदार्थ सद्यः टौनहालांत जमा करीत आहेत. ह्या संग्रहालयास महाराणीच्या भर्त्याचें ही नांव दिलें आहे. ह्मणून यास "विक्टोरिया आणि आलबर्ट म्यूझिअम्" असें नांव ठेविलें आहे.

ह्या विशाळ इमारतीच्या पायाचा दगड बसविण्याचा विधि सन १८६२ माहे नवेंबर तारीख १९ रोजीं झाला. तो स्वतः मुंबईचे गव्हर्नर यांनीं केला. ह्या समारंभ सरकारी गोरगरीब नोकर लोकांस दृष्टीस पडावा ह्मणून गव्हर्नर साहेबांनीं मेहरबान होऊन सर्व सरकारी कारखान्यांस व दरबारास अर्ध्या दिवसाची सुटी दिली होती.

इमारत तयार होत आहे तीसमोर विजयध्वज उभारून अरास केली होती आणि शिंदीच्या ओल्या झावळ्यांचा शुभसूचक असा मोठा सुशोभित दरवाजा केला होता. त्यांतून लोक आंत जात व सुमारें हजार दीड हजार खुर्च्या मांडून ह्या उघड्या स्थळांत जितकी शोभा आणवेल तितकी आणिली होती. पांच वाजल्यानंतर गव्हर्नर व त्यांची पत्नी हीं दोघेंजणें येऊन ह्या स्थळीं दाखल झालीं. त्यांसाठीं निराळींच दोन सुंदर मखमाल बशिवलेलीं आसनें तयार केलीं होतीं. नंतर नामदार जगन्नाथ शंकरशेट, ह्या मंडळीचे अध्यक्ष, यांनीं सुंदर भाषण केलें. तें संपल्यानंतर गव्हर्नर साहेबांनीं त्यांस उत्तर दिलें व एतद्देशीय गृहस्थांच्या ह्या स्तुत्य निष्ठेविषयीं मोठी स्तुति केली. मग सर्व मंडळी जाऊन जो विधि करायाचा तो केला. या प्रसंगीं एथें लोकांचा समाज फारच जमला होता, व स्टुडेंट्स लिटररी आणि सायंटिफिक् सोसायटीच्या शाळेंतील सर्व मुलींस शृंगारून एथें नेल्या होत्या. हा समारंभ पाहायास बडे लोकांपैकीं निमंत्रित शेट सावकार मिळून सुमारें एक हजार गृहस्थ होते. या शिवाय साधारण प्रतीचे अनामंत्रित हजार दोन हजारांवर जमले होते. गाड्या व रथांची तर बेसुमार गर्दी होऊन गेली होती. गृहस्थ मंडळीचीं मनें

रंजविण्याकरितां क्षणोक्षणीं इंग्रजी बाजा सुंदर स्वरावर वाजवीत. ह्याच दिवशीं लेडी फ्रियर, गव्हर्नर साहेबांची पत्नी, इजकडून विक्टोरिया गार्डन् याचा मुहूर्त करविला. जो शिवरीस आग्रिहार्टिकल्चरल् सोसायटीचा सरकारी बाग होता तोही यासच मिळविला आहे.

जो दगड ह्या इमारतीच्या मुख्य दरवाज्यांत गव्हर्नर साहेबांच्या हातानें बसविला आहे, त्याखालीं एक मजबूत तांब्याची पेटी घातली आहे. तींत त्या दिवसाच्या प्रत्येक वर्त्तमानपत्राची प्रत; मुंबईतील चालू नाणें; हें संग्रहालय उपस्थित करण्याचा बेत झाला होता त्यासंबंधीं सर्व कागदपत्रें; व ज्यांनीं यास मदत दिली त्यांचीं नांवें लिहून घातलीं आहेत. अणखी त्या पेटीच्या ढांकणावर असा लेख कोरला आहे.

सन १८६२ नवेंबर १९ बुधवार.

महा प्रतापी राणी विक्टोरिया हिच्या राज्याच्या २५ व्या वर्षी

हिज् एक्सेलन्सी धि रैट आनरबल्

धिअर्ल आव्ह एल्जिन् आणि किंकर्डैन, के. टी. जी. जी. सी. बी. के. एस्. ऐ.

हे भरतखंडाचे व्हैसराय आणि गव्हर्नर जनरल असून हिज्

एक्सेलन्सी सर हेनूरी बार्टल्

एडवर्ड फ्रियर, के. सी. बी.,

मुंबईचे गव्हर्नर,

यांनीं

विक्टोरिया आणि आलबर्ट पदार्थसंग्रहाल-

याच्या पायाचा दगड बसविला.

सन १८५८ नवेंबर १ यादिवशीं महाराणीनें भरतखंडाचें

राज्य आपल्या स्वाधीन करून घेतलें असा जाहीरनामा लावला

होता त्या दिवसाच्या स्मरणार्थ आणि आपल्या राजनिष्ठाप्रदर्शनार्थ

मुंबापुरस्थ लोक हें बांधीत आहेत.

धि आनरबल् जगन्नाथ शंकरशेट,

सर्वपदार्थसंग्रहालय व उपवनालय यांच्या व्यवस्थापक मंडळीचे अध्यक्ष

भाऊदाजी इस्क्वायर, जी. जी. एम्. सी.

आणि जी. सी. एम्. बर्डवुड् इस्कायर, एम्. डी;
हे आनररी जाइंट सेक्रेटरी होते.

विलियम लौडन इस्का-
यर, मुंबईचे शेरिफ.

विलियम ट्रेसी,
शिल्पशास्त्री.

ह्या दगडावर पुढील लेख लिहिला आहे.

हा

विक्टोरिया आणि आलबर्ट संग्रहालयाच्या पायाचा मुख्य दगड
तारीख १९ नवेंबर सन १८६२ रोजीं
मेहेरबान सर एच्. बी. ई. फ्रियर. के. सी. बी.,
मुंबईचे गव्हर्नर, यांनीं घातला आहे.

# प्रकरण १२.

अवर्षण–फ्रामजी कावसूजीचा तलाव–पाण्याचेनळ–नाखुदाचेंतळें–पांजरा-पोळ – बंदीशाळा – उद्योगशाळा – वेड्यालोकांचें घर–मुंबई आणि ठाणें एकत्र करण्याचा बेत–नवीं बंदरें करण्याची योजना–किल्ला मोडून टाकण्याची सूचना–पोसखाने–भटारखाने–खाणावळ–इंग्लंड देशाच्या राजाचा जन्मदिवस–चेंडूफळी–जिम्ने-शिया – जिमूखाना – तालीमखाने – ब्यांड्स्टांड्.

मुंबईत आठ दहा वर्षांनीं साधारण अवर्षण पडत असतें. सन १८२२ त अवर्षण पडलें होतें. त्यावेळीं श्रावण महिन्यापासूनच विहिरींत सुमारें हात दोन हात पाणी होतें. आणि पुढें चैत्र वैशाखांत फारच तंगी होऊन गेली. त्यावेळीं जिकडेतिकडे अनुष्ठानें वगैरे चालविलीं होतीं. परंतु मेघराज कशानेंच संतुष्ट झाला नाहीं. ह्या वर्षीं धोबीतळयाचें पाणी अगदीं आटून खडखडीत झाल्यामुळें त्यांत दोन मोठ्या विहिरी खणल्या होत्या. त्यांस गोडेंपाणी लागलें, ह्यावरून ह्यास साकरतळें असें नांव ठेविलें होतें. पुढें सन १८३१ त हें तळें शेट फ्रामजी कावसूजी ह्यांणीं पांच पंचवीस हजार रुपये खर्च करून बांधिलें. हे पारशी गृहस्थ मोठे परोपकारी असून बोर्ड आफ् एज्युकेशनाचे सभासद होते. एतद्देशीय लोकांत विद्या वाढविण्यास ते फार झटत असत, आणि त्या प्रीत्यर्थ पुष्कळ द्रव्यही खर्चीत. ह्या तळयास सरकारानें ह्या उदार गृहस्थाचें नांव ठेवून फ्रामजी कावस्-जीचें तळें असें जाहीर केलें; परंतु धोबीतळें हें नांव पूर्वीपासून वहिवाटींत असल्यामुळें साकरतळें, आणि फ्रामजी कावसूजीचें तळें हीं दोनही नांवें एकीकडेसच राहून सद्यः वहिवाटीत धोबीतळें हेंच चाललें आहे.

ह्या गृहस्थाचा काळ झाला, तेव्हां कित्येक पारशी व हिंदु विद्यार्थी जमून ह्याचें चिरकाळ स्मरण होण्याजोगें ह्या शहरांत कांहीं तरी असावें ह्मणून वर्गणी करून तीस चाळीस हजार रुपये जमविले आहेत, आणि फ्रामजी कावसूजी इन्स्टिटयूट या नांवाचा कांपावर त्या तळयाच्या शेजारीं एक वाडा बांधून त्यांत

पुस्तकालय स्थापून मनोरंजक, अपूर्व व ज्ञानप्राप्ति होण्याजोगे पदार्थ ठेवावे आणि स्टुडेंट्स् लिटररी आणि सायंटिफिक् सोसायटी या नांवाच्या मंडळीस सभा भरायास व व्याख्यानें देण्यास मोठें रमणीय स्थळ बांधून द्यावें असा ठराव केला आहे. हा वाडा तळयाच्या बाजूस बांधितात. याचा पाया सन १८६२ जानुआरी महिन्यांत घातला. त्याप्रसंगीं हा विधि करण्यास इंग्रज व एतद्देशीय संभावित लोक आले होते. ह्या वाड्याच्या पायाचा दगड श्रीमंत रा. जगन्नाथजी शंकरशेट यांणीं घातला. ह्या ठिकाणीं गृहस्थ जमले होते त्यांस गुलाब अत्तर व तुरे देऊन बोळविलें. हें गृह लवकरच तयार होईल. सर जमशेटजी जिजीभाई ह्यांची कीर्त्ति दिगंतरीं गेली आहे खरी, परंतु पारशी लोकांत सर जमशेटजींच्या तोडीचे धर्म करणारे बरेच आहेत. शेट माणकजी नसरवान्जी पिटी ह्या नांवाचे ह्यांमध्यें एक गृहस्थ होते. त्यांस एक दोन वर्षांमागें देवाज्ञा झाली. हे गृहस्थ फार धार्मिक, दयाळू व परोपकारी होते. ह्यांणीं आपल्या हातानें हजारो रुपये धर्म केला. व शेंकडो लोकांचें कल्याण केलें. ताडदेवावरील सुताचा कारखाना याच उदार गृहस्थानें उपस्थित केला होता.

फ्रामजी कावसूजी हे मोठे उदार व उद्योगी होते. यांणीं मुंबईपासून सुमारें ९ कोसांवर पवई ह्मणून जो साष्टी जिल्ह्यांत गांव आहे तेथें साकर, खडीसाखर, रेशीम, चहा, कापूस, व दुसरे अमोलिक पदार्थ जे चीन देशांत होतात ते उत्पन्न करण्याचा कारखाना घातला होता. त्यांणीं चिनाई लोक चाकरीस ठेविले होते व अनेक तऱ्हांचें कसब एथें करण्याचा कारखाना घातला होता. रेशमाचे किडे आणून त्यांची उत्पत्ति करण्याचा उद्योग चालविला होता. आणि त्यांच्या भक्षासाठीं जागोजागीं तुतीचीं झाडें लावलीं होतीं. ह्या गृहस्थानें हा गांव मोठ्याच ऊर्जित दशेस आणिलेला पाहून सर जान मालकम् यांणीं तो यास सन १८३० मध्यें इनाम दिला. हा कारखाना चालला होता तेव्हां पुष्कळ लोक तो पाहायास जात. चांगले उद्योगी लोक नसल्यामुळें हें काम बराबर चाललें नाहीं, तरी यापासून अजून सालिना वीस पंचवीस हजार रुपये उत्पन्न होतात. हा कारखाना हल्लीं मोडकळीस आला आहे तरी जाऊन पाहाण्याजोगा आहे. एथें मोठमोठालीं यंत्रें व भट्ट्या बांधिलेल्या आहेत. व अनेक जातींचे ऊस व फळें होतात.

फ्रामजी कावसूजी यांणीं सन १८३८ मध्यें मुंबईतील उत्तम प्रकारचे कलमी आंबे इंग्लंड व भरतखंडाची महाराणी विक्टोरिया हीस पाठविले होते

आणि ही त्यांणीं पाठवलेली आम्रफलांची भेट महाराणी विक्टोरिया इणें मोठ्या संतोषानें व आदरपूर्वक स्वीकारिली. जसे मुंबईमध्यें आंबे उत्तम प्रकारचे होतात तसे गोमांतक खेरीजकरून दुसऱ्या कोणत्याच गांवांत होत नाहींत.

पर्जन्य थोडा पडतो त्यावर्षीं मुंबईंतील रयत फार क्लेश पावते. हें गाऱ्हाणें पुष्कळ वर्षांपासून कोर्ट आफ् डैरेक्टर्सपर्यंत गेलें होतें. आणि ही अडचण दूर करायास कंपनी सरकार पुष्कळ वर्षेंपर्यंत अनेक उपाय योजीत होतें. परंतु ह्या गोष्टीचा पक्का निर्णय सन १८४५ त सर जार्ज आर्थर ह्या गव्हर्नराच्या कारकिर्दींत झाला. यांणीं ह्या वर्षीं डाक्टर लीथ व डाक्टर ग्रेहाम या दोन गृहस्थांस मुंबईंत कोठें, किती आणि कोणत्या प्रकारचें पाणी आहे हें सर्व कळवावयास सांगितलें. त्याप्रमाणें त्यांणीं शोध लावून सरकारास कळविलें. पुढें पाण्याची कमताई होते ती पुरी पाडण्यास काय युक्ति योजावी व हें पाणी कोठून आणावें याचा विचार चालला होता. या कामावरही पुष्कळ इंग्रज कामगार व इंजिनेर नेमिले होते. कोणी वाळुकेश्वराच्या डोंगरांत तलाव बांधून त्यांत पावसाचें पाणी सांठवून तें मुंबईस आणावें अशी सूचना केली; कोणी ह्मणत माजगांवच्या डोंगरांत सांठवावें. अशा पुष्कळांनीं अनेक कल्पना काढिल्या. मिस्तर हेन्‌री कानिवेर हे ह्या कामांत कांहीं दिवस पुढारी होते. शेवटीं मेजर क्राफर्ड साहेबांनीं विहाडच्या डोंगरावरून पाणी आणण्याची युक्ति योजिली, आणि ही त्यांची युक्ति सर्वांस मान्य झाली. या गोष्टींत त्यांची स्तुति केली तितकी थोडीच. आजपर्यंत ह्या पाण्याप्रकरणीं जो सरकारांत पत्रव्यवहार चालला होता त्याचे ग्रंथ छापून तयार झाले आहेत. इंग्रज सरकाराचे लोककल्याणार्थ हे प्रयत्न अद्वितीय आहेत.

सन १८५६ नांतही अवर्षण पडलें होतें. त्या समयीं लोकांत मोठाच हाहाकार झाला. पावसाचे ऐन बहराचे महिने सुके गेले, विहिरी व तळीं बहुधा कोरडीं पडलीं; तेव्हां पुढचें वर्ष कसें पार पडेल असें लोकांस संकट येऊन पडलें. मग कोणी हवनें करूं लागले, कोणी भुलेश्वरावर संतत धारा धरिल्या, कोणी तुळशीवर गळत्या बांधिल्या, कोणी सांबाला कोंडून ठेविलें, परंतु कोणताच देव गणमणला नाहीं. मग हिंदुधर्माप्रमाणें पाऊस पडण्याचा शेवटचा उपाय करायाची योजना केली. ती असी. दोन तीन गाडी चिकण माती आणून भुलेश्वराच्या तळयाच्या कांठीं जीनगर लावून एक मोठया पुरुषा एवढा शृंगऋषीचा पुतळा करून त्यास ऋषी बनविला. नंतर त्याची प्राणप्रतिष्ठा करून ब्राह्मण लोक अनुष्ठान

करायास बसले. हें त्यांचें अनुष्ठान सात आठ दिवस पर्यंत चाललें होतें. आणि ह्या शृंगऋषीची प्रतिदिवशीं पूजा, अर्चा व नैवेद्य होत असे. ह्याचे दर्शनास प्रतिदिवशीं हजारो लोक बायका, मुलें, तरणे, ह्मातारे असे जात. ह्या अनुष्ठानाबद्दल ब्राह्मणांस बरेंच द्रव्य मिळालें. ह्या ऋषेश्वराच्या दर्शनास जे जात ते त्या मूर्त्तीपुढें पैसे, तांदूळ, सुपाऱ्या, नारळ, केळीं, व अनेक फळें टाकीत. व ह्या शिवाय जपास जे ब्राह्मण बसले होते त्यांसही दक्षिणा देत. या ऋषीवर प्रतिदिवशीं पांच दहा रुपयांचीं तर फुलेंच पडत. इतकेंही केलें तरी पाऊस ज्यावेळीं पडायाचा त्याचवेळीं, जितका पडायचा तितकाच पडला. पाऊस पाडणें हें ईश्वरावांचून दुसऱ्या कोणाच्या हातांत नाहीं.

शृंगऋषीविषयीं असी कथा आहे कीं, युगांतरीं एका राजाच्या राज्यांत एक सारिखें पांच दहा वर्षेंपर्यंत अवर्षण पडलें. त्यावेळीं त्या राजास नारदमुनींनीं येऊन सांगितलें कीं, अमुक अरण्यांत शृंगऋषी नांवाचा एक महान् पुण्यवान् तपस्वी ब्राह्मण आहे. त्यास बोलावून आणून त्याजकरवीं ईश्वराची प्रार्थना केली असतां पर्जन्य पडेल. मग त्यानें तसें केल्यावर पाऊस पडला.

ह्याचप्रमाणें पारशी लोकांनींही समुद्रतिरीं जाऊन प्रार्थना केली, व खिस्ती, यहुदी, मुसलमान व इतर सर्व जातींच्या लोकांनीं आपआपल्यांत पर्जन्यवृष्टि व्हावी ह्मणून ज्ञागोजागीं प्रार्थना केल्या.

ह्या वर्षीं माघ महिन्यापासून ज्येष्ठ अखेरपर्यंत पाण्याची अतिशय तंगी पडली आणि गरीब गुरीब लोकांत पाण्यासाठीं मोठा हाहाकार पडला. कित्येक लोंक डोईवर हांडे घेऊन रस्तोरस्तीं व गल्लोगल्लीं पाणी पाणी करीत फिरत. मुंबईंतील गांई, ह्मशी व दुसरीं ढोरें माहिमास नेऊन ठेवावीं असा सरकारांतून हुकूम झाला होता. कित्येक गरीब लोकांच्या बायका कांपाच्या मैदानांत मध्यरात्रपर्यंत बसून मोठ्या आयासानें एक दुसरा हंडा पाणी भरून घरीं घेऊन जात. कित्येक बावींत खालीं उतरून वाट्यांनीं पाणी जमवीत. त्यावेळीं कित्येक पारशी व एक दोन वाणी गृहस्थांनीं व सरकारानें लोकांस पाण्याच्या दुष्काळामुळें जें दुःख झालें होतें तें दूर करावें ह्मणून कांपाच्या मैदानांत व दुसऱ्या एक दोन ठिकाणीं विहिरी खणविल्या. ह्या विहिरी खणीत असतांना जें गढूळ पाणी निघे तें देखील नेण्यास शेंकडो लोकांची गर्दी होऊन जाई. ह्या शिवाय सरकारानें बाहेर गांवांतून आगीचे गाडीवरून हजारो पाण्याचीं पिंपें आणवून डोंगरी, चिंचबंदर, बोरीबंदर या

ठिकाणच्या विहिरींत ओतविलीं. असे अनेक प्रयत्न करून इंग्रज सरकारानें रयतेस ह्या अरिष्टांतून मुक्त केलें.

ह्याच वर्षी कांपावर मारुतीच्या देवळा समोर नाखुदा महंमद रोगे यांणीं एक मोठा अष्टकोनी लोककल्याणार्थ तलाव बांधिला. त्यास सुमारें पन्नास हजार रुपये खर्च झाला असें सांगतात. हा तलाव दगडी बांधिला आहे, व लोकांस थंडवेळचें बसून आराम घेण्यास व हवा खाण्यासाठीं त्याच्या आसपास प्रत्येक कोनास एक एक सोपा बांधिला आहे. असे त्याच्या आसपास आठ पाषाणी दगडाचे सोपे बांधिले आहेत. त्यांजवर सकाळ संध्याकाळ वाटसरू वगैरे लोक बसून विश्रांति घेत असतात. जरी या शहरांत बहुतकरून घरोघर विहिरी आहेत, तरी त्यांत पिण्याजोगें पाणी सर्व ठिकाणीं नसतें. गोडेंपाणी ह्मटलें ह्मणजे कांपाच्या मैदानांतच. तेथून बहुतकरून सर्व शहरांत नेतात. गिरगांव, बाबुलनाथ, महालक्ष्मी, वालुकेश्वर ह्याठिकाणीं उत्तम प्रकारचें पाणी आहे, परंतु तें फार दूर असल्यामुळें श्रीमंत लोकांसच सांपडतें.

पाण्यापासून असा त्रास पुनः लोकांस होऊं नये ह्मणून कंपनी सरकारानें शहरांत नळ लावून बाहेरून पाणी आणावें असी योजना केली, आणि लागलेंच सन १८५७ ना पासून काम सुरू केलें. यास त्यांनीं असी युक्ति काढिली. विहाडच्या डोंगरांत एक मोठा सुंदर तलाव बांधून त्यांत पाणी सांठविलें, आणि तेथपासून नळ बांधून तें पाणी मुंबई शहरांत सर्व ठिकाणीं खेळविलें. ह्या पाण्याचे नळ मुंबई शहरांत रस्तोरस्तीं गाडले आहेत. याप्रकारें हें पाणी किल्ल्यांत देखील जागोजागीं नेलें आहे. विहाड हें मुंबईपासून सुमारें सात आठ कोस दूर आहे. फक्त हा तलाव बांधण्यास व जागोजागीं नळ गाडण्यास सरकारानें एका इंग्रजास छप्पन्न लक्ष रुपयांचा मक्ता दिला होता. व लोखंडी नळ व दुसरीं यंत्रें सरकारानें इंग्लंड देशाहून आपल्या खर्चानें आणविलीं. ह्यांतील प्रत्येक मोठ्या नळास २०० रुपये खर्च बसला. कोठेंकोठें असे नळ दर अर्धकोस जमिनींत ४५० गाडले आहेत, असें सांगतात. ह्या तळ्याची रचना व बांधणी मोठी चमत्कारिक आहे. याप्रमाणें रयतेच्या कल्याणाकडे सरकार झटत असतें. इंग्रज सरकार सर्वकाळ प्रजेचें अभीष्ट चिंतून द्रव्याचा व्यय करितें, ह्मणून त्याला क्षणोक्षणीं नाण्याची ओढ येते.

ह्या तळयाची लांबीरुंदी मिळून १,२४२ एकर ह्मणजे सुमारें २,४८४ बिघे आहे.

## विहाडचें पाणी

" मुंबई सारख्या मोठ्या शहरांत पाण्याच्या कमताईमुळें पूर्वी गरीब गुरीब लोकांचे फारच हाल होत होते. परंतु सरकारानें लाखो रुपये खर्च करून मुंबईपासून सुमारें सहा कोसावर एक मोठा तलाव केला. त्याकरितां तेथील कांहीं खेडींही उठवावीं लागलीं. हल्लीं त्या तलावाचा घेर सुमारें दहा बारा कोस झाला आहे. जे लोक तेथें जाऊन पाहातात त्यांस हा समुद्रच आहे कीं काय, असा भास होतो. सरकारास गरिबांचा वगैरे कनवळा येऊन एवढें मोठें कृत्य केलें आहे."

इंदुप्रकाश.

श्रावक, वाणी, भाटये व इतर गुजर लोक " अहिंसा परमो धर्मः " ह्या वाक्याच्या मतानें चालतात. यास्तव ते पशुपक्ष्यांच्या प्राणाचें रक्षण करण्यास फार जपतात. त्यांचें शास्त्र असें आहे कीं, कोणत्याही प्राण्याच्या जिवाचें रक्षण करण्यांत महत्पुण्य आहे. यांत कित्येकांचा असाही समज आहे कीं, मुक्या जनावरांचें रक्षण करणें हें एक मोक्षाचें साधन आहे. असें मानून ते लोक मनुष्यांपेक्षां इतर जनावरांवर फार दया करितात. श्रावक लोकांचे यति ह्या शहरांत पुष्कळ आहेत. ते लोक आपणांकडून किडीमुंगीचा देखील नाश होऊं नये ह्मणून फार जपतात. पायांत जोडा घालीत नाहींत, अनवाणे चालतात, किंवा पादुका घालतात. श्वासोछ्वास घेतेवेळीं तोंडांत एकादा प्राणी जाऊन त्याचा नाश होईल म्हणून तोंडास पडदा बांधितात. पाण्याचा उपयोग करावयाचा असला तर तें चार पांच पदरी घडींत गाळून घेतात. आणि पाणी प्यावयाचें असलें तर तें दुसऱ्याकडून तापवून घेऊन गाळून थंड करून पितात. आणि बाहेर जायाचे वेळीं ह्या पाण्यानें भरलेला कुंभ हातीं घेऊन बाहेर जातात. अशी यांची दीक्षा आहे.

ह्या श्रावक जातीचा मोतीचंद अमीचंद ह्मणून मुंबईशहरांत एक प्रख्यात व्यापारी होता. त्याचा कोट्यावधि रुपयांचा देशोदेशीं व्यापार चालत असे. त्याणें मुंबईत आपल्या लोकांसाठीं कित्येक मंदिरें बांधिलीं. तशींच आपल्या देशांत जागोजागीं बांधून एक मोठें अन्नछत्र घातलें आहे, असें ऐकण्यांत आहे. ह्या उदार आणि दयाळू सौदागरानें आपला काळ होई तोंपर्यंत सुमारें

एक कोट रुपया धर्मास लाविला, असें त्याचे लोक सांगतात. हें कांहीं असो; परंतु हा गृहस्थ आपल्या धर्माचा मोठा अभिमानी होता व गरीबगुरिबांवर दया करीत असे, व उदारपणें त्यांची संभावना करी, आणि कोणी याचक आला असतां त्यास विन्मुख पाठवीत नसे. हें बहुतेकांस ठाऊक आहे.

सन १८३४ सालीं ह्या गृहस्थाच्या मनांत आलें कीं, जसीं रोगी व अशक्त लोकांस व्याधीपासून दूर करण्याचीं स्थानें व औषधालयें आहेत, तसेंच पशुपक्षी इत्यादि मुकीं जनावरें रोगी व अशक्त झालीं असतां त्यांचा प्रतिपाळ करण्यास एक स्थान मुंबईत असावें. असा मनांत विचार आणून त्याणें कावसजी पाटेलाच्या तळयाजवळ एक मोठी जागा विकत घेऊन तींत एक वाडा बांधून त्यास "पांजरापोळ" असें नांव दिलें. यांत रोगी व अशक्त गाई, घोडे, ह्मशी, बकरीं, गाढवें, कुत्रीं, इत्यादि पशु व कावळे, खबुतरें, कोंबडीं, चिडया, व दुसरे अनेक प्रकारचे पक्षी आणून सोडितात. याप्रकारचीं शेंकडो जनावरें एथें आहेत. ह्या निरनिराळया जनावरांच्या जातिजातीप्रमाणें निरनिराळया जागा बांधून तयार केल्या आहेत. अनेक तऱ्हांच्या व्याधींनीं ग्रस्त झालेलीं जनावरें या स्थानांत पाहिल्यानें मनुष्याच्या अंतःकरणांत त्रास होतो. कोठें पंख मोडलेला कावळा, कोठें पाय सुजलेली कोंबडी, कोठें पिसें गळालेलें बदक, कोठें आंधळी घार, कोठें तोंड सुजलेला घोडा, कोठें लंगडा मेंढा, असे अनेक रोगांनीं व्याकुळ होणारे प्राणी दृष्टीस पडतात. एके बाजूस कुत्र्यांस कोंडण्याची कोटडी स्वतंत्र आहे. ज्यावेळीं आह्मी ती पाहिली, त्यावेळीं तींत सुमारें तीनशें चारशें कुत्रीं असून तीं निरंतर कर्कश स्वरानें भोंकत व मनुष्य दृष्टीस पडतांच त्याच्या अंगावर उडी घालण्यास प्रयत्न करीत. हा प्रकार पाहून गरुडपुराणांत यमपुरीचें वर्णन केलें आहे, त्याचें स्मरण पडलें. एथें सुमारें पन्नास साठ मेंढरें पटांगणांत फिरत होतीं. तीं कोणी सावकारानें कसायाकडून विकत घेऊन एथें आणून सोडिलीं असावीं. कित्येक वाणी लोकांस व्यापारांत नफा झाला व दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा हर्ष झाला, ह्मणजे ते गाई व बकरीं कसाई लोकांस दुप्पट तिप्पट पैका देऊन विकत घेतात आणि या ठिकाणीं त्यांचा प्रतिपाळ करितात. एक वाणी द्रोणभर साकर घेऊन ह्या वाडयाच्या आसपास मुंग्यांचीं बिळें शोधून त्यांत चिमूटचिमूट टाकी. तारीख ८ जून १८६१ च्या वर्त्तमानदीपिकेंत हा पुढील मजकूर छापिला होता.

'गंगादास या नांवाचा एक श्रीमंत वाणी जो पांजरापोळाचा म्यानेजर होता, तो गेल्या आठवड्यांत मरण पावला. हा सुमारें बारालक्ष रुपयांचा धनी होता. त्याणें मरूं नये ह्मणून त्याच्या मित्रांनीं शंभर बैल व शंभर मेंढे कसायाच्या हातून विकत घेऊन पांजरापोळांत ठेविले. परंतु त्याच्या दुसऱ्या दिवशीं तो मरण पावला."

महालक्ष्मी ही शक्ति आहे आणि तिला कोंबड्यांचा व बकऱ्यांचा बळी द्यावा लागतो. पूर्वींपासून कोळी, भंडारी, घांटी व दुसरे हिंदु लोक बकरीं व कोंबडीं आणून इच्या समोर मारून हीस संतुष्ट करीत, किंवा तेथें नेऊन सोडीत. मग तेथील भोपी लोक त्यांची खबर घेत. परंतु हल्लीं असें आहे कीं, पांजरापोळाच्या अधिकाऱ्यांनीं तेथें एक शिपाई बसविला आहे, तो कोणी कोंबडें व बकरें देवीस अर्पण करायास आला ह्मणजे तें त्याजकडून घेऊन पांजरापोळांत नेऊन सोडितो. ह्या शिपायाचा हाच उद्योग. परंतु महाजनांचें हें कृत्य देवीस कसें मान्य झालें, तें समजत नाहीं! कारण देवी ह्मटली ह्मणजे तिची तृप्ति ह्या जिवांचे प्राण घेतल्या शिवाय व्हावयाचीच नाहीं. कदाचित् कलियुगांतील देवीनें श्रावक लोकांची दीक्षा घेतली असेल तर कोण जाणें! देवीस पशूचा बळी देणें ही हत्या होत नाहीं. तेणेंकरून त्या प्राण्याचा उद्धार होतो, असा शास्त्रार्थही आहे.

सन १८६२ भाद्रपद महिन्यांत ह्या शहरांत सुरवंट फारच झाले होते. घराच्या भिंतीवर, रस्त्यांत जिकडेतिकडे हे प्राणी लोकांच्या पायांखालीं पडून मरत. ज्यावर्षीं पर्जन्य कमती असतो त्या वर्षीं हे प्राणी सर्वत्र उद्भवतात. मग ते महिना पंधरा दिवसांनीं आपोआप नाहींसे होतात. ह्या वर्षीं पांजरापोळाच्या मालकांनीं ह्या जिवांचें रक्षण करण्यासाठीं मोठी विलक्षण युक्ति काढिली होती. त्यांनीं पांच पंचवीस मजूर ठेविले होते. ते रस्तोरस्तीं फिरून सुरवंट गोळा करून पांजरापोळांत आणून एकाठिकाणीं जमवीत. हे जमविणाऱ्यांकडे एक गाडगें, एक लहान डाळी, आणि एक बारीक काठी दिली होती. काठीनें ते त्या प्राण्यांस डाळींत घालींत आणि मग ते थोडे जमले ह्मणजे गाडग्यांत टाकीत, आणि तें गाडगें भरलें ह्मणजे लागलेच पांजरापोळाच्या मालकाकडे नेऊन हजर करीत. मग त्यांला त्याप्रमाणें चार सहा आणे मजुरी मिळे. ह्या दिवसांत अशक्त व आळशी मजूर लोकांस हा बराच उद्योग सांपडला होता. द्रव्याचा व्यय करण्याचा

व धर्म करण्याचा हा मोठाच विलक्षण मार्ग ! ह्याप्रमाणें जिवांचें रक्षण करण्यास तत्पर असणारे लोक एकादे समयीं एकादा मनुष्य भुकेनें मरूं लागला असतां त्याजकडे डोकावूनही पाहत नसतात. हा यांच्या भूतदयेचा मासला !

या संस्थानाचा खर्च भागविण्याची वहिवाट अशी ठेविली आहे. जो सर्व जातीचा किराणा जिन्नस बंदरांत येतो, त्याजवर " धर्माव " या नांवानें दर-खंडीस एक आणा कर सर्व व्यापाऱ्यांकडून घेऊन, तो पैका धर्मकृत्यास खर्चण्या-करितां एकत्र जमवितात. आणि निरनिराळया धर्मखात्यांत विभागून देतात. यांतील कांहीं द्रव्य पांजरापोळाकडे येतें, आणखी याचा खर्च पुरा पाडण्यास शेट मोतीचंद यांणीं ३०,००० रुपये ठेविले आहेत. व कोणी गुजरलोक धर्मकृत्या-साठीं याच्या खर्चाकडे कांहीं द्रव्य देत असतात. जीं जीं जनावरें एथें असतात, त्यांचा प्रतिपाळ चांगल्या रीतीनें करितात. त्यांला चारा, वैरण, दाणा पाणी वगैरेची सोई वरचेवर असते, व त्यांच्या चाकरीस पंचवीस तीस मनुष्यें ठेविलीं आहेत. असे या निरुपयोगी झालेल्या पशूंच्या रक्षणार्थ दरमहा शेंकडो रुपये खर्च होतात. एथें फक्त खबुतरांसच घालायास दर दिवसास आठचार पायल्या दाणा खपत असतो. पांजरापोळाच्या मध्यभागीं एक लहान बंगला आहे, त्यांत माडीवर या कारखान्याचा हिशेब ठिशेब व व्यवस्था ठेवणारे कारकून व चौकस-नीस बसतात. कोणी चांगल्या गृहस्थास गाई व घोडा पाहिजे असल्यास त्याज-कडून तो विकणार नाहीं व त्याचा चांगला प्रतिपाळ करीन, असें कबूल करून घेऊन त्यास फुकट देतात. यांत कांहीं जनावरें चांगलीं असतात.

नवें पांजरापोळ; वास्तविक ह्मटलें ह्मणजे ही वाडी गुरें चरायासाठीं सोडिली आहे. आणि यांत कांहीं दुसरीं जनावरें नाहींत; परंतु लोक ह्यास नवें पांजरापोळ असें ह्मणतात. हें ठिकाण गिरगांवांत नामदार जगन्नाथ शंकरशेटच्या शाळेच्या लगत असून सर जमशेटजी जिजीभाई यांनीं ही जागा दहा वीस हजार रुपये खर्चून गुरांस चरायासाठीं धर्मार्थ सोडिली आहे, व एथें गुरांस पाणी पिण्याची सोई केली आहे. ह्या धर्मकृत्यास सुमारें आठ दहा वर्षें झालीं. पूर्वीं सुमारें सन १८३८ पर्यंत शहरांतील लोकांच्या गाई, ह्मशी, शेळया, मेंढरें, वगैरे सर्व जनावरें कांपाच्या मैदानांत चरावयास नेत. व एथें जागोजागीं धोबीलोक वस्त्रें धूत. त्यामुळें एथें थोडा चाराही सांपडून समयानुसार पाणीही सांपडे. व एक दोन गृहस्थांनीं कांपाच्या मैदानांत टांकी बांधून नेहमी गुरांस

पाणी पुरवीत. पुढें सरकारानें या ठिकाणीं गुरें चरविण्याबद्दल प्रत्यहीं दर ह्मशीस तीनपै, गाईस दोनपै, व शेळीस एकपै, कर द्यावा असें ठरविलें. हें कांहीं दिवस चाललें. शेवटीं गुरांस कांपाच्या मैदानांत चरायास देण्याची अगदीं बंदी केली. तेणेंकरून गुरांचे फार हाल होऊं लागले. सबब गुराखी लोक त्यांचे पाय मोकळे करावे ह्मणून त्यांस सोनापुराच्या बाजूस समुद्रकिनाऱ्यावर वाळवंटावर नेऊन सोडीत. उष्णकाळांत वाळू तापे व गुरांस पाणी सांपडत नसे व खारी हवा लागून त्यांस फारच त्रास होऊं लागला. असे या जनावरांचे हाल होतात असें पाहून सर जमशेटजी जिजीभाई यांनीं ही जागा घेऊन धर्मार्थ सोडिली आहे.

मुंबईतील गुरांस स्वच्छंदपणें चरण्यास जागा नाहीं; परंतु त्यांच्या खाण्या-पिण्याची सोई चांगली असून वाणी व दुसरे धर्मी लोक गुरांस चारा वैरण घालण्यांत मोठें पुण्य आहे असें मानितात. आणि व्यापारांत नफा झाला, व श्राद्धतिथि झाली, व कोणी देवाज्ञा पावला ह्मणजे त्यांस चारा नेऊन घालितात. भायखळयाच्या बाजूस घासबाजार आहे. तेथें गवत आणि पेंढा विकितात. व त्याच्यापुढें मोठमोठाले गवताचे गंज केलेले दृष्टीस पडतात. मुंबईत फारसें गवत पिकत नाहीं, परंतु प्रत्यहीं शेंकडो गाडया भरून गवत व पेंढा ठाणें, तुर्भें, मरोळ, चेंबूर वगैरे ठिकाणांतून येतात. ह्या गवताच्या व्यापारांतही लोक हजारो रुपये कमावितात. पांच सहा वर्षांमागें एथें गवत इतकें महाग झालें होतें कीं जें गवत पूर्वीं चार रुपये हजार होतें त्याचा भाव सोळा सतरा रुपये झाला होता.

गवळी लोक गुरांस बाजरी उकडून तींत खोबऱ्याची व तीळांची पेंड, गव्हांचें भूस व हरबऱ्यांचीं, मुगांचीं व उडदांचीं सालें मिसळून खायास घालितात. गुरांचें खाणें विकण्याचें ठिकाण वेगळेंच आहे. तेथें सर्व प्रकारचें भूस विकितात. कित्येक जाफ्राबाजी ह्मशी असतात त्या दोंहीसांज मिळून पाऊण मण दूध देतात. व सुरती गाई पंधरा वीस शेर पर्यंत देतात.

एथें दिवाणी आणि फौजदारी अशा दोन बंदीशाळा आहेत. दिवाणीस जुनें आणि फौजदारीस नवें तुरुंग असें ह्मणतात. दिवाणी बंदिशाळेंत कर्जदार लोकांस जसी ज्याला टेप असेल तितके दिवस कैद करून ठेवितात. जे कैद्यास तुरुंगांत घालितात, त्यांस त्याला खाण्याबद्दल दरदिवसास तीन आणे भातें द्यावें पडतें. भातें एक दिवस पोचलें नाहीं, तर लागलाच त्यास सोडून लावितात.

अपराधी लोकांच्या बंदिशाळेंत जे चोरी वगैरे दुराचरण करितात त्यांस ठेवितात. एथें कित्येक कैदी लोकांस सक्त मजुरी करावी पडत्ये. व त्यांजकडून काम करून घेण्यास अनेक साधनें करून ठेविलीं आहेत. याठिकाणीं जाऊन कैदी लोकांस पाहिलें ह्मणजे यमदंडाचें वर्णन केलें आहे, त्याचें स्मरण होतें. ह्या कैद्यांच्या खाण्याचा खर्च सरकारास पुरवावा पडतो. जरी ह्या बंदीशाळा आहेत तरी त्या हवाशीर जाग्यांत बांधिलेल्या असून जिकडेतिकडे स्वच्छ व निर्मळ ठेविल्या आहेत. आणि ज्यावेळीं दरतीन महिन्यांनीं सेशन भरतें, त्यावेळीं जे ग्रांडजुरीचे पंच मुकदमे तपासायास हैकोर्टांत नेमलेले असतात, ते जाऊन ह्या बंदिशाळांची देखरेख करितात. कायद्याप्रमाणें एकाद्या अपराध्यास शासन करणें झालें तरी मनुष्याच्या शरीररक्षणार्थ जीं साधनें आवश्यक आहेत, त्यांजकडे सरकार फार लक्ष देत असतें. अपराध्यास हाणमार करूं नये, व त्याच्या शरीरास उपद्रव करून त्याजकडून आपला अपराध कबूल करून घेऊं नये, ह्मणून फौजदार वगैरे पोलीस अमलदारांस कोर्टांतील न्यायाधिशांकडून ताकीद असत्ये. हा त्यांचा कायदा किती स्तुत्य आहे!

सन १८५९ त डाक्तर ओगिल्वी यास मुंबई इलाख्यांतील सर्व बंदिखान्यांचा चौकसनीस नेमिला होता. त्याणें सर्व बंदीशाळा तपासून त्यांत कैदी किती आहेत व त्यांची स्थिति कशी आहे, ते कोणत्या प्रकारचे उद्योग करितात, व त्यांची संख्या किती आहे, ते काम करितात त्यापासून काय उत्पन्न होतें, आणि त्यांबद्दल सरकारास खर्च काय होतो याचा सर्व आकार काढिला होता. त्यावरून असें समजतें कीं, मुंबई इलाख्यांतील सर्व बंदीशाळा मिळून सरकारास सालिना, २,९३,०७२ रुपये खर्च होतो. त्याच प्रमाणें त्याणें कैदी लोकांची संख्या मोजून पाहिली, तीवरून दर कैद्यास सरकारास सरासरी सात रुपये खर्च बसतो असें आकारिलें आहे. द्वाड लोकांस शासन करायास देखील सरकारास याप्रमाणें द्रव्य खर्च करावें पडतें. उनाड लोक कोठेंही असले तरी त्यांपासून दुसऱ्यास उपद्रव होतोच.

अल्पवयस्क मुलांनीं अपराध केला असतां त्यांस त्यांचे वयाप्रमाणें थोडें शासन होऊन पुढें तीं शहाणीं व उद्योगी व्हावीं म्हणून एक निराळ्याच प्रकारची बंदीशाळा सन १८३५ त स्थापिली आहे. हीस स्कूल आफ् इंडस्ट्री (उद्योगशाळा) असें नांव दिलें आहे. एथें अल्पवयस्क मुलांस एका वर्षा-

पासून पांच वर्षेंपर्यंत जसा ज्याचा अपराध असेल त्याप्रमाणें टेप देऊन त्यास आवडेल तो धंदा शिकवितात. मग पुढें तो मुलगा सुधारला ह्मणजे त्यास घरीं लावून देतात. एथें मुलांस वाचणें, लिहिणें वगैरे शिकविण्याची सोई केली आहे व अन्नवस्त्रही एथेंच मिळतें. ह्या मोठ्या परोपकारी कृत्यास मेहेरबान डेविड सासून यांनीं सरकारांत ३०,००० रुपये ठेविले आहेत. हे दयाळू व उदार गृहस्थ यहुदी जातीचे असून प्रख्यात व्यापारी आहेत. यांणीं आपल्या लोकांसाठीं एक इंग्रजी शाळा घातली आहे. भायखळयावर एक मोठी मशीद बांधिली आहे, व दुसरीं पुष्कळ उदार कृत्यें केलीं आहेत. शेट मंगळदास नथुभाई यांणींही हीस उदारपणें २०,००० रुपये दिले आहेत. उद्योगशाळेविषयीं धूमकेतु नांवाच्या एका मराठी वर्त्तमानपत्रांत हा पुढील वृत्तांत छापिला होता. ही शाळा पूर्वीं शिवरीस होती, परंतु आतां ती ग्रांटरोडाच्या रस्त्यावर आहे.

## शिवरी एथील उद्योगशाळा

"एथें गेल्या महिन्याच्या २६ व्या तारिखेस सायंकाळीं पांच वाजतां सभा भरली होती. त्यावेळेस आमचे गव्हर्नर लार्ड एल्फिन्स्तन् हे प्रमुखस्थानीं बसले होते, आणि एतद्देशीय व युरोपियन इत्यादि गृहस्थांचा बराच समुचय जमला होता. जेव्हां गव्हर्नर साहेबांची स्वारी ५ वाजतां तेथें आली तेव्हां सर्व मुलांकडून तऱ्हतऱ्हेचीं यंत्रें बाहेर आणून काम करविलें. मुलांनीं मातीचीं भांडीं कोणत्या रीतीनें करितात, तीं सर्व लोकांसमोर करून दाखविलीं; व तीं इतक्या जलदीनें होतात, हें पाहून युरोपिअन स्त्रियांस फारच आश्चर्य वाटलें. मग नाना प्रकारचीं कामें मुलांकडून करवून दाखविल्यावर डाक्तर ब्युइस्ट यांनीं भाषण केलें. त्याजवरून समजलें कीं, सदरहू शाळेंत ३९ विद्यार्थी आहेत. यांतून कित्येक जीं उनाड पोरें या शहरांत फिरत असत, व चोऱ्या वगैरे करून निर्वाह करीत, तीं तेथें होतीं. या प्रकारच्या पोरांस ह्याप्रमाणें शाळा असल्याच पाहिजेत. डाक्तर ब्युइस्ट हा अणखी असें बोलिला कीं, जबलपूर एथें अशा प्रकारची शाळा आहे, तींत विशेषें करून जे ठकलोक लोकांस ठकवीत असत व नानातऱ्हांचे उपद्रव करीत असत; असे मनुष्य बहुधा एथें आहेत. नंतर आमचे गव्हर्नर साहेब यांनीं थोडें भाषण केलें. असो अशा प्रकारच्या शाळांपासून आमच्या रिकामटवळया लोकांस उद्योग लागून त्यांच्या उनाडपणापासून जे उपद्रव लोकांस व्हावयाचे ते कमी होतील यांत संशय नाहीं. अशा प्रकारच्या

शाळा जिल्ह्याजिल्ह्यांनीं स्थापून त्यांस सरकारानें मदत द्यावी, आणि भुरट्या चोऱ्या, लहानसहान मारामाऱ्या व शिवीगाळ करणाऱ्या मनुष्यांस शिक्षा देणें ती या शाळेंत पाठविण्याची ठरविली असतां आह्मांस वाटतें कीं, या देशाचें बरेंच कल्याण होईल. याचा विचार मुख्यत्वेंकरून आमच्या लोकांनींच केला पाहिजे, आणि अशा शाळा स्थापून सरकाराजवळ कांहीं मदत मागितली असतां तें देणार नाहीं असें नाहीं. आमच्या ऐकण्यांत पुष्कळ लोक आहेत, ते कोणी भिकारी दारासीं आला असतां त्यास सांगतात कीं, असें उनाडा सारिखें फिरूं नये, कांहीं उद्योग करावा. मग त्या भिकाऱ्यांतून समयानुसार कोणी असें उलट उत्तर दिलें कीं आह्मांस उद्योग लावून द्या, ह्मणजे आह्मीं तो करण्यास सिद्ध आहों, तर अशा प्रकारच्या भिकाऱ्यांस उद्योग लावण्यास ठीक पडेल."

कुलाब्रा एथें वेड लागलेल्या लोकांस घालण्याचें ठिकाण आहे. हें घर मोठ्या कुशळतेनें बांधिलें आहे. कितीही मस्त झालेला वेडा मनुष्य यांतील एके कोठडींत बंद केला म्हणजे त्याचा कांहींच काट चालत नाहीं. ह्या ठिकाणीं शहरांतील वेडेलोकांस नेऊन घालितात. तेथेंच त्यांची सोई होते. ह्याची देखरेख करण्यास एका इंग्रज वैद्याची नेमणूक केली आहे. तो एथें सतत राहत असतो. वेड्या लोकांस मारझोड केल्याशिवाय सामोपचारानें व मोठ्या युक्तीनें त्यांचा संभाळ करितात. आणि एथें जाऊन कित्येक बरे होऊन येतात.

नुकताच तारुण्यावस्थेंत येत आहे, अशा एका सुकुमारराजकुमारास एका कुशळ चिताऱ्याकडे नेऊन उभा केला, आणि सांगितलें कीं, या पुत्राचा हुबेहूब चेहरा काढून द्या, तो बादशहास नजर पाठवायाचा आहे. तें ऐकून चितारी ह्मणाला, महाराज एवढ्या गोष्टीची मला क्षमा असावी, ही गोष्ट मजकडून होणार नाहीं. ह्या राजपुत्रास नुकतीच यौवन दशा लागत आहे; तिचा बहर होऊन गेल्याशिवाय याच्या सौंदर्याचें कांहीं अनुमान करवत नाहीं. मी ह्याचा चेहरा आज काढिला, आणि कांहीं काळानें ह्याच्या सौंदर्यांत पालट झाला ह्मणजे मी बादशहाकडे लटका पडेन.

मुंबई शहराचा प्रकारही तसाच आहे. हा ह्याचा भरज्वानीचा समय, आणि हा कोणतेवेळीं कसा पालटेल ह्याचा भरवसा नाहीं. प्रत्यहीं नवेनवे बेत होतात व शहराची रचना त्यांप्रमाणें फिरत असते. सन १८६२ त नवेंबर महिन्याच्या ग्याझेट वर्त्तमानपत्रांत असें लिहिलें होतें कीं, हल्लीं एथें जाग्याचा सर्व प्रकारें

संकोच होत चालला आहे, व लोकांस दुप्पट तिप्पट भाडें देऊन राहायास जागा सांपडत नाहीं, सबब सरकारचा असा मनसुबा आहे कीं, ठाणें जिल्हा जो मुंबई लगत आहे तो तीस मिळवून ठाणें आणि मुंबई हीं एक शहर करावें. मग सरकारी हपिसांस ठाण्यास, कुरल्यास व साष्टींतील कोणत्याही स्थळीं जागा नेमून द्याव्या, ह्मणजे मुंबईचें स्थळ वाढून लोकांस जाग्याचा संकोच होणार नाहीं. व सरकारास कलेक्टर, न्यायाधीश व खजानची हे निराळे ठेवण्याचा खर्च कमी होईल. परंतु हा मनोरथ केव्हां सिद्धीस जाईल तें सांगवत नाहीं. असें केल्यानें कांहीं अंशीं बरें होईल असें वाटतें.

मुंबईंत हल्लीं वस्ती फार वाढत चालली आहे; व जाग्याचा जिकडेतिकडे संकोच पडल्यामुळें लोकांस फार अडचण होत्ये. आणि व्यापारी लोकांस तारवां-वरून माल उतरावयास व तो वखारींत भरून ठेवण्यास फार खर्च लागून सोईवार जागा सांपडत नाहीं. सबब कांपाच्या मैदानाच्या पश्चिमेस कुलाब्याच्या आणि वालुकेश्वराच्या मध्यें जी सुमारें एक कोस लांब आणि दीड कोस रुंद खाडी आहे, तीस भर घालून तेथें नवें बंदर करून लोकांस राहायासाठीं जागा वाढवावी, असा कित्येकांचा मनसुबा होता. हें मोठें अचाट कृत्य असून यास पुष्कळ द्रव्य खर्च होईल. याविषयीं प्रभोदय नांवाच्या एका मासिक वर्त्तमानपत्रांत असें लिहिलें होतें.

" मुंबईंत दिवसानदिवस जाग्याचा संकोच होत चालल्यामुळें कुलाबा आणि वालुकेश्वर यांच्या मधील समुद्रास दोन कोटी रुपये देऊन त्यापासून जागा विकत घ्यावी, व तेथें शहर वसवावें असा बेत चालला आहे. रत्नाकरपंत एवढ्या ऐव-जानें राजी होतील तर बरें आहे. " ही खाडी मध्यभागीं फार ओंड असल्या-मुळें हें काम तडीस नेण्यास मोठे प्रयास पडतील, असें लक्षांत आणून सद्यः तहकूब ठेविलें आहे. परंतु या खाडीच्या समोर थेट पूर्वेस ह्मणजे *सिनालटेंक-डीस लागून टंकसाळेच्या मागच्या बाजूपर्यंत भर घालून किंवा वरून पूल बांधून एथें नवें बंदर वसवावें, असा बेत चालला आहे. व दुसऱ्यांचें असें ह्मणणें आहे

* आमचे लोक हीस छिनाल टेंकडी म्हणतात. परंतु सिनाल टेंकडी हें नांव हीस पोर्तुगीझ् लोकांनीं ठेविलें होतें. हे प्रथम आले तेव्हां ह्यांनीं या टेंकडीवर आपला बावटा मारला होता. आणि त्यांच्या भाषेंत बावट्यास सिनाल असें म्हणतात. सबब हीस सिनाल टेंकडी नांव पडलें.

कीं, माजगांवचे बंदरापासून कोटांतील मांडवीपर्यंत जी खाडी आहे, तीस भर घालून ती जमीन लोकांसाठीं तयार करावी. ह्या कृत्यास तीन चार कोट रुपये खर्च लागेल. आणि हें सिद्धीस गेलें असतां मालकांस पुष्कळ उत्पन्न होऊन शहरास शोभा व बळकटी येईल. जो क्रम सद्यः चालला आहे, त्यावरून हें काम लवकरच सिद्धीस जाईल असें वाटतें. मग जसें इंग्लंड देशामध्यें लिवरपूल नांवाचें एक व्यापाराचें प्रख्यात बंदर आहे, त्याच मासल्याचें हें एक होईल. माजगांवापासून ह्या खाडींत लोखंडी स्तंभ गाडून त्यांवर बंदर व वखारी तयार कराव्या, असा पक्का सिद्धांत होऊन व्यवस्थापक मंडळीची वगैरे नेमणूक झाली आहे. व ह्या कृत्यास साठ लक्ष रुपये लागतील, असें ठरवून याचे १२,००० भाग करून दर भागीदारानें पांच पांचशें रुपये द्यावे, असें ठरविलें आहे.

सन १८६१ माहे आगष्ट महिन्यांत मुंबईतील बहुतेक व्यापारी व सरकारी हुद्देवाल्या गृहस्थांनीं सरकारास असा अर्ज केला कीं, मुंबईत दिवसेंदिवस जाग्याचा फार संकोच होत चालल्यामुळें किल्ल्यांतील राहणारांस फार अडचण पडत्ये, तर किल्ल्याचे फक्त दक्षिण व पूर्व बाजूकडील तट कायम ठेवून बाकीचे सर्व मोडून त्याच्या भोंवताले पाण्याचे चर आहेत, तें बुजवून टाकून ही जागा कांपाच्या मैदानास मिळवावी, आणि ती लोकांस घरें, हपिसें व बंगले बांधायासाठीं फरोक्त करून टाकावी. येणेंकरून दोन फायदे होतील. एक लोकांस विस्तीर्ण जागा सांपडेल, व दुसरें ही जागा विकली असतां सरकारास पुष्कळ द्रव्य उत्पन्न होईल. ह्या अर्जीवर न्यायाधीश, कौन्सलर्स व दुसऱ्या नामांकित इंग्रज गृहस्थांच्या सह्या आहेत.

## सरकारी ठराव

मुंबईच्या किल्ल्याचा पश्चिमेकडील भाग मोडण्याचा सरकारचा ठराव ता. २२ नवेंबर सन १८६२ रोजीं झाला होता, त्या अन्वयें जस्टिस आफ् धि पीस यांनीं कर्नल बार आणि सर जमशेटजी जिजीभाई बारोनेट ह्या दोघां गृहस्थांस या प्रकरणीं अनुमत देण्यास कमिटी नेमिले आहेत. व सरकारानें मि० आर. शावेल यांस याचे आफिशियेटिंग सेक्रेटरी नेमिले आहेत. आणि लेफ्टनेंट कर्नल ए. डी. लिल् यांस सुपरीन्टेंडिंग इंजिनेर नेमिले आहेत.

हा मजकूर सन १८६२ डिसेंबरच्या १२ व्या तारखेच्या सरकारी ग्याझेटावरून घेतला आहे.

ह्या शहरांत युरोप, अमेरिका व दुसऱ्या देशांतून आगबोटी व जहाजें प्रतिदिवशीं नानाप्रकारचा माल व उतारू घेऊन येत असतात. त्यांवर तांडेल ( कपतान ), खलाशी, सफरी, इत्यादि इंग्रज लोक असतात. हे खलाशी ( सेलर ) लोक बहुधा अनाडी व अशिक्षित असतात. हे जहाजांतून उतरून शहरांत आले म्हणजे, ख्यालीखुशालींत व धिंगामस्ती करण्यांत दिवस घालवितात. कधींकधीं शें पन्नास रुपयांचा एका दिवसांत फडशा उडवून देतात. ते पुष्कळ बायकांवरही धांवतात. असे हे शहरांत आले ह्मणजे लोकांस फार उपद्रव होतो. यांचे उपद्रव बहुतकरून प्रतिआदितवारीं फार असतात. हे सावध असतात, तेव्हां बहुधा कोणाच्या अंगावर जात नाहींत. ते मस्ती करूं लागले ह्मणजे पोलीस अमलदारांसही बधत नाहींत. मागें यांचा प्रत्यहीं फारच त्रास होत असे, परंतु हल्लीं थोडासा बंदोबस्त केल्यामुळें हे फारसे गल्लोगल्लींत दिसत नाहींत. पूर्वीं यांचे खाण्यापिण्याचे पोसखाने धोबीतळें, काळबादेवीचा रस्ता, कोळभाट, भेंडीबाजार, हनुमानशेरी, अशा ठिकाणीं लोकांच्या भरवस्तींत होते, परंतु हल्लीं त्यांस डंकन रोडावर जागा नेमून दिली आहे. त्या रस्त्यावर जाऊन पाहावें, ह्मणजे एकसारिखे हारीनें प्रत्येक घरावर निरनिराळे बावटे उडविले आहेत, आणि दरवाज्यावर पाट्या मारून पोसखान्यांच्या मालकांचीं नांवें लिहिलीं आहेत. तरी त्यांचें सर्व शहरभर फिरणें बंद झालें नाहीं. पोसखानेही थोडे बहुत हिंदुलोकांच्या वस्तींत पसरलेले आहेत. ह्या ठिकाणीं ह्या लोकांस मद्य, मांस, पांव, रोटी, चहा, काफी वगैरे जें जें पाहिजे तें तें देत असतात. ह्यांस प्रत्येक जेवणास रुपयापासून पांच रुपये पर्यंत प्रतिदिवशीं द्यावे लागतात. एवढे त्यांचे दर भारी असतात. असे पोसखाने लहान मोठे मिळून मुंबईत चाळीस पन्नास आहेत. यांचे मालक पारशी, मुसलमान किरिस्तांव, व इंग्रज, असतात. हे सेलर लोक जिकडेतिकडे जाऊन मस्ती करितात, व बेसुमार दारू पिऊन लोकांस त्रास देतात, सबब त्यांचा कांहीं बंदोबस्त करावा ह्मणून ह्या लोकांसाठीं पुष्कळ इंग्रज व्यापारी मिळून सरकाराची मदत घेऊन कांपावर मारुतीच्या देवळाच्या बाजूस सुमारें एक लक्ष रुपये खर्चून एक विशाळ वाडा बांधिला आहे. तेथें त्यांस उतरायास सोईवार जागा केली आहे. ह्यास सेलर्स होम असें नांव ठेविलें आहे. एथें उतरले ह्मणजे त्यांस धिंगामस्ती करायास न देतां बंदोबस्तानें ठेवितात.

हें घर मोठयाच कुशलतेनें बांधिलें आहे. याची इंग्रजी रिवाजाची वास्तू सन १८६२ च्या मार्च महिन्याच्या २९ व्या तारिखेस जहाली. त्याप्रसंगीं तारवावरील बहुतेक सफरी, कपतान, मालीम, खलाशी, यांस जेवणसमारंभ केला होता. संध्याकाळचे पांचवाजल्यापासून संध्याकाळमर्याद इंग्रजी बाजा सुरस वाजत असे. आणि क्षणोक्षणीं सफरी लोक मोठ्यानें आनंदप्रदर्शक गर्जना करीत, त्या सुमारें पावकोसाच्या अंतरावर ऐकायास येत, व मध्यें कित्येक गायन करीत. हा समारंभ पाहाण्यास शेंकडो लोक जमले होते; व जिकडेतिकडे पोलीस अमलदारांचा व स्वारांचा पाहारा होता.

इंग्रज लोकांस गृहप्रवेश करायास महिना, तिथि, वार, चंद्रबल व सुमुहूर्त्त यांची गरज पडत नाहीं, व वास्तू करण्या प्रीत्यर्थ दानधर्म, व होमहवन करणें लागत नाहीं. ते मनास येईल त्यादिवशीं नव्या घरांत जाऊन राहतात. इतकेंच कीं कोणी नवें घर किंवा वाडा बांधिला असतां, हर्ष प्रदर्शित करण्याकरितां चार स्नेही मंडळीस बोलावून एकादे समयीं जेवणसमारंभ करितो, व तसा कोणी भाविक असला तर आपणास नवें घर राहायास मिळालें, ह्मणून निराकार ईश्वराचा स्तव करितो, व नव्या घरांत आपण आलों तेथें आपलें कल्याण व्हावें, व मुलें माणसें दीर्घायु व सुखी व्हावीं ह्मणून त्याची प्रार्थना करितो. एकादा प्रसिद्ध सरकारी वाडा व धर्मार्थ इमारत बांधिली असतां जाहीरपणें चार सभ्य गृहस्थांस बोलावून गृहप्रवेश करितात. ह्या प्रसंगीं नारळ साकर वांटणें व नाच तमासे करणें असें कांहीं त्यामध्यें नाहीं. वैधृति, अमावास्या, ग्रहण, मृत्युयोग, कुयोग, सुयोग, ग्रहबल, चंद्रबल, अमृतसिद्धियोग, संक्रांति, असे त्यांमध्यें शुभ आणि अशुभ दिवस नाहींत. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, ईश्वरानें सर्व दिवस सारिखेच सुदिन केले आहेत, आणि आपलें बरें किंवा वाईट होणें हें त्याच्या इच्छेवर आहे.

प्रतिष्ठित इंग्रज लोकांसाठीं घातलेले पोसखाने वीस पंचवीस आहेत. यांची ठिकाणें किल्ला, भायखळा, महालक्ष्मी, माजगांव, गिरगांव अशा रम्य स्थळीं आहेत. ह्या पोसखान्यांस पांचापासून पंधरापर्यंत दर दिवसाचा जेवणखर्च पडतो. एथें राहायास जागा, निजायास पलंग, बसायास खुरची, पडायास कोच, लिहायास टेबल्, काम करायास चाकर, असा जो जो आपणास सरंजाम पाहिजे तो तो मिळतो. हे पोसखाने हजारो रुपये खर्चून उभारिले आहेत. व त्यांचा दरमहा

शेंकडो रुपये खर्च असतो. यांतील सामान सुमान व रचना पाहिली असतां समाधान होतें. याचें नांव पोसखाना आहे खरें, परंतु याची उपमा नवाबाच्या वाड्यापेक्षांही विशेष आहे.

मुसलमान लोकांचे भटारखाने भेंडीबाजार, मार्कीट, कोट, डोंगरी, व दुसऱ्या ठिकाणीं जिकडेतिकडे पुष्कळ आहेत. एथें सर्व प्रकारचें सिद्धान्न सांपडतें. कंगाल मुसलमान, फकीर, परदेशी, व मुशाफरलोक वर्षांचीं वर्षें अशा जेवणावरच काळ काढितात. अरब, मोंगल व मुशाफरलोक बिऱ्हाड करण्याच्या खटपटींत पडत नाहींत. दरखेपेस चार दोन आण्यांचें जेवण घेऊन खातात, व मशिदींत जाऊन वस्ती करितात. परंतु इंग्रज लोकांसारिखे प्रतिष्ठित पोसखाने कोणांतच नाहींत. कोणी मोठा गृहस्थ आला असतां त्याला निराळें बिऱ्हाडच करावें पडतें.

मुंबईत अन्नच्छत्र व गरीब ब्राह्मण व शूद्र लोकांस धर्मार्थ अन्न घालण्याची सोई नाहीं. पूर्वीं मराठी राज्य होतें तेव्हां धर्मार्थ अन्नच्छत्र घालण्याची चाल फार होती. आणि यासाठीं कोणी गरीब गुरीब तेथें जाऊन जेवीत. आणि इंग्रज लोकांसारखे प्रतिष्ठित पोसखानेही नाहींत, त्यामुळें कोणी अनोळखी प्रतिष्ठित गृहस्थ एथें आला असतां त्यास बिऱ्हाडाची फारच अडचण पडत्ये. अशीं ठिकाणें असलीं ह्मणजे लोकांची मोठी सोई होत्ये, परंतु आम्हां लोकांच्या जातिभेदाच्या अडचणीमुळें आमच्या लोकांकडून असे कारखाने पार पडणें कठीण. दर जातीचा एक एक पोसखाना ह्मटला ह्मणजे शें दोनशें घालावे पडतील.

सावकारी अन्नच्छत्र ह्मणजे ब्राह्मण लोकांनीं घातलेल्या खाणावळी दहावीस आहेत. ह्या खाणावळी इंग्रज लोकांच्या पोसखान्यांसारिख्याच आहेत, परंतु एथें त्या प्रकारची सोई मात्र नसत्ये. आणि यांच्या जेवणाचें दर फार हलके असतात. प्रत्येक जेवणास एक आण्यापासून चार आणे पडतात. एक आणा देणारास नुसता भात, ताकाची कढी, एकादी पालेभाजी आणि अन्नशुद्धीपुरतें तूप; त्यास अंघोळीस पाणी व निजायास जागासुद्धां मिळायाची नाहीं. जे दोन आणे देतात त्यांस अंघोळीस ऊन पाणी, निजायास व बसायास जागा, व जेवायास वरण, भात, एक दोन भाज्या, सार, दहीं, तूप, लोणचें व गव्हांची चपाती मिळत्ये. चार आणे देणारास धोतरें धुवायाची वगैरे सोई असून जेवणाबरोबर पुऱ्या व एकादें साधें पक्वान्न असतें. त्याच्या खाण्यापिण्याची बरदास्त यथास्थित होत्ये.

अशा ह्या कारखान्यास खाणावळ असें ह्मणतात. परंतु कितीही द्रव्य खर्चिलें तरी अशा ठिकाणीं निष्कपटपणें सर्व पदार्थ आपणांस पाहिजेत तसे मिळणें कठीण. कारण आमच्या लोकांचें देणें ह्मटलें ह्मणजे तसेंच असतें. खाणावळींत जेवणारे पांथस्थ, प्रवासी व अनाथ विद्यार्थी लोक पुष्कळ असतात. खाणावळींतील ताक ह्मणजे केवळ चुन्याच्या पाण्यासारिखें पातळ असतें. खाणावळींत जाऊन जेवणें हें आमच्या लोकांत हलकें मानितात, परंतु इंग्रज लोकांस याविषयीं कांहीं हलकेपणा वाटत नाहीं. न्यायाधिशासारिखे मोठमोठे हुद्देदार इंग्रज लोक पोसखान्यांत जाऊन खुशाल वर्ष सहा महिने देखील राहतात.

वाणी, भाटये, लवाणे व दुसऱ्या गुजराथी लोकांत लग्न व दुसरें कांहीं कार्य झालें असतां जेवणावळी घालण्याचा प्रचार एथें फार आहे. तसाच कोणी श्रीमान् असला तर एका लग्नासंबंधीं जेवणासच दहावीस हजार रुपये खर्चून पंधरा वीस जातिभोजनें व ब्राह्मणभोजनें घालितो. अन्नदानाचें महत्पुण्य आहे, असा यांचा समज आहे. हे चौऱ्याशी म्हणून चौऱ्याशी जातीच्या ब्राह्मणांस जेवण घालितात. ह्या प्रसंगीं ते दर दिवसास एक एक जातीच्या ब्राह्मणजातीस समाराधना घालितात. एकाद्या श्रीमंत वाण्यास व्यापारांत नफा झाला, कुटुंबवृद्धि झाली, किंवा आईबापांची क्षयतिथि आली असतां तो ब्राह्मणांस भोजन घालून, पराती, घागरी, टोप, तांब्ये, संध्यापात्रें, अशीं तांब्याचीं व पितळीचीं भांडीं वांटीत असतो. वाणी लोक कवडी कवडी जमवून द्रव्य गोळा करितात, परंतु लग्न, उत्तरकार्य व पुत्रोत्सव ह्या प्रसंगीं जेवण समारंभांत द्रव्य खर्चायास मागें पुढें पाहत नाहींत.

या लोकांत जेवण बहुधा घरोघर घालीत नाहींत. जेवण घालायास त्यांच्या महाजन लोकांनीं जागोजागीं मोठ्या विस्तीर्ण वाड्या घेऊन त्यांत धर्मशाळा बांधिल्या आहेत, आणि लोकांस समाराधना घालण्यासाठीं धर्मार्थ सोडिल्या आहेत. त्यांत एक हजारापासून दहावीस हजार मनुष्यांची जेवणाची सोई असत्ये. मोठमोठालीं रांधायाचीं भांडीं, बसायाचे पाट, वगैरे सरंजाम त्यांच्या पंचाइतीकडून केलेला असतो. या लोकांत दक्षिणी लोकांसारिखा सोवळ्याओवळ्याचा फारसा प्रतिबंध नसतो. यांचीं जेवणें बहुधा संध्याकाळचीं होतात. प्रथम सुमारें दोन घटिका दिवस असतांना बायका व मुलें जेवून जातात. आणि तीं जेवून गेल्यावर त्यांमागून पुरुष जेवितात. ह्यांच्या जेवणांत अनेक प्रकारांचीं पक्वान्नें असतात, आणि यांचीं जेवणें ह्मटलीं ह्मणजे बहुधा मिठाई खाणेंच असतें. या लोकांत

उच्छिष्टाचा फारसा प्रतिबंध नसतो. जेवीत असतां एकादा पदार्थ जेवणारास आवडत नसला तर तो परत त्या भांड्यांत टाकून देतो.

इंग्लंड देशाच्या राजाचा जन्मदिवस पाळणें व त्या दिवशीं उत्साह करणें ही पूर्वीपासून एथें वहिवाट आहे. सन १७२४ ता० २२ मे दिवशीं त्यावेळचा गव्हर्नर यानें असें ठरविलें होतें कीं, २८ व्या तारिखेस इंग्लंड देशाच्या राजाच्या जन्मदिवसाच्या समारंभाच्या दिवशीं सरकारी घोडशाळेंत चार जर्जर झालेले घोडे होते, ते मुंबईतील चौघां प्रतिष्ठित सावकारांस बक्षीस द्यावे. ते घोडे रोड झालेले होते, सबब त्यांजवर तांबडें आच्छादन घालण्याकरितां सहा वार खारवें विकत घ्यावें असें ठरविलें होतें. असें आच्छादन घालून हे घोडे त्या सावकारांस दिले. अर्थातच सरकारांतून घोडे बक्षीस मिळाले ह्मणून त्यास आनंद झाला. आमच्या लोकांत ह्मणच आहे कीं, "दरबारी मान विड्याचें पान."

पूर्वीं इंग्लंड देशांतील राजाच्या जन्मदिवशीं परळास दीपोत्सव व दारूकाम होत असे. ह्या प्रसंगीं शहरांतील बडे लोकांस सरकारांतून आमंत्रणें येत. व हजारो दुसरे लोक हा तमासा पाहयाला जात. हल्लीं विक्टोरिया महाराणीच्या वाढदिवसाचा उत्साह प्रतिवर्षीं मे महिन्याच्या २४ व्या तारिखेस होतो. त्या दिवशीं सर्व सरकारी व सावकारी कामगारांस रजा मिळत असत्ये. संध्याकाळीं पांच वाजतां कांपाच्या मैदानांत गोऱ्या व काळ्या पलटणी उभ्या करून त्यांची तपासणी होत्ये. सरदार लोक उंचा पोशाक करून घोड्यांवरून फिरत असतात. नंतर कांहीं वेळ कवाईत होत्ये. हा तमासा पाहायास श्रीमंत लोक कोणी रथांतून, कोणी घोड्यावर, कोणी पालखींत, बसून येतात. तसेच दुसरे हजारो लोक जमतात. मग थोडावेळ कवाईत झाल्यानंतर तोफांची सरबत्ती व बंदुकांचे बार होऊं लागतात. ह्या सरदारांचे पोशाक, त्यांची शस्त्रें, व त्यांजवर सूर्याचे किरण पडून जी कांति जिकडेतिकडे फांकत्ये, तिची शोभा अवर्णनीय आहे. एथें सुंदर सुरावर इंग्रजी वाद्य वाजत असतें. त्यावेळीं हा सर्व प्रकार मनोरंजक होतो. पूर्वीं ह्या उत्साहाबद्दल दीपोत्सव व दारूकाम होत असे, तेव्हां सरकारास पंचवीस तीस हजार रुपये खर्च होई. परंतु हल्लीं तो बंद केला.

एल्फिन्स्तन् विद्यालयाच्या शेजारीं एक वाडा बांधिला आहे. तसाच एक कोटांतही आहे. या दोनही ठिकाणीं मोठमोठे इंग्रज कामगार व दुसरे प्रतिष्ठित लोक जाऊन चेंडूफळी खेळत असतात. हे चेंडू रबराचे असून दगडासारिखे

कठीण व सुंदर असतात. ह्यांचा रंग पांढरा असून हे इंग्लंडाहून येतात. असे प्रतिष्ठित इंग्रज लोक चेंडूफळी खेळतात, ह्मटलें असतां आमच्या लोकांस नवल वाटेल. आणि कदाचित् असें ह्मणतील. "कायहो हे इंग्रज लोक लहान मुलांसारिखे खेळतात ! यांच्या अंगीं प्रौढपणा कांहीं नाहीं." परंतु ही त्यांची मोठी चूक आहे. हे खेळ निर्दोषी असून शरीरसंपत्ति वाढविण्याचीं व रक्षण करण्याचीं मुख्य साधनें आहेत. विद्वान् आणि उद्योगी लोक हा खेळ कर्मणुकीकरितां खेळतात इतकेंच नाहीं; परंतु त्यांचा मुख्य उद्देश अंगीं शक्ति वाढून हुशारी राहवी हा आहे. ह्याप्रीत्यर्थ त्यांनीं हजारो रुपये खर्चून हीं घरें बांधिलीं आहेत. आणि त्यामुळेंच त्यांची शरीरें बळकट आणि सडसडीत असतात. ह्याचप्रमाणें क्रिकेट ह्मणून त्यांचा एक खेळ आहे. तो ते कांपाच्या मैदानांत खेळत असतात. कर्नल, कपतान व दुसरे पलटणीचे लोक आपलीं शरीरें मजबूत राहण्यासाठीं हा खेळ खेळत असतात. यांच्या सभा भरून याविषयीं नियम करितात. कधींकधीं या मंडळीची वार्षिक सभा भरत्ये, त्यावेळीं मोठा जेवण समारंभ होतो, व त्यांत कौन्सलर्स देखील येत असतात. शरीरसंपत्ति राखायास जीं जीं साधनें आवश्यक आहेत, तीं तीं करायास ते अनेक युक्ति करितात. आह्मां हिंदुलोकांमध्यें असें कांहीं असतें तर बरें होतें. आमचे लोक मुंबईतील हवा वाईट व प्रकृति वारंवार बिघडत्ये, ह्मणून वरचेवर कुरकुरतात. कित्येक तर हात पाय गुंडाळून बसलेले असतात. त्यांस आपली शरीरसंपत्ति रक्षण करण्यास अशीं साधनें असतीं तर बरें होतें. मुंबईंतील बहुतेक हिंदुलोक निस्तेज व बलहीन असतात. याचें कारण त्यांस आपलीं शरीरें रक्षण करायास जितका उद्योग आणि व्यायाम पाहिजे, तितका सांपडत नाहीं. प्रत्येक इंग्रजाच्या घरीं एकदोन मुदगलांच्या जोड्या असतात. व ह्याशिवाय ते असे खेळ खेळून शरीरास जेवढी कसरत पाहिजे तेवढी देतात.

अलीकडे मुलांस कसरत शिकविण्यासाठीं धोबीतळ्यावर पारशी लोकांनीं कसरतीची शाळा घातली आहे. ह्या शाळेंत तालीमखान्यांतील सर्व प्रकारचें सामान ठेविलें आहे. हिंदुलोक मात्र सर्व गोष्टींत लाचार आहेत. तेथें आमचे हिंदुलोक मुलें पाठवितील, तर तीं हुशार होतील.

कांपाच्या मैदानांत एल्फिन्स्तन् विद्यालयासमोर सन १८६२ त जिम्नेशियम् ( कसरत करण्याचें स्थळ ) तयार केलें आहे. या कामासाठीं ही जागा सरकारानें दिली आहे. व यास सरकार आश्रयही देणार, असें ऐकण्यांत आहे. यांत

सर्व जातींच्या मुलांस जाऊन कसरत करण्याची मोकळीक आहे. ह्याप्रमाणें शरीर-संपत्ति साध्य करून घेतल्यानें मनुष्य कोणताही उद्योग करायास व कोणत्याही देशांत जाण्यास समर्थ होतो. आणि शरीर निरोगी असणें हें विद्या आणि संपत्ति साध्य करण्याचें साधन आहे. ह्मणून इंग्रज लोक मुलांस शरीरसंपत्ति मिळविण्याकरितां फार झटतात. "सुदृढ प्रकृति सुखाची आई" अशी एक इंग्रजींत ह्मण आहे.

जिम्खाना या नांवाची एक शरीर सुदृढ करण्याची व अंगांत अनेक प्रकारचें सामर्थ्य आणण्यास प्रयत्न करण्याची मंडळी आहे. तींत घोड्यावरून पैजा मारणें, धांवून नेमलेल्या ठिकाणीं पुढें जाणें, उंच ठिकाणावरून उड्या मारणें, एकादे आडवण उल्लंघून जाणें, असे अनेक प्रकारचे शरीराची हुशारी व चपळता दाखविण्याचे खेळ करितात. मग जो बळांत व चपळतेंत हुशार निघेल, त्यास शेंपन्नास रुपयांचें इनाम देतात. व कोठें रुप्याचे प्याले व दुसरीं भांडीही इनाम देतात. अशीं ह्या शहरांत अनेक साधनें आहेत.

बिलियार्डटेबल् ह्मणून इंग्रज लोकांचा एक खेळ आहे. तो मोठमोठे विद्वान् व न्यायाधिशासारिखे हुद्देवाले देखील खेळत असतात. ह्या खेळाच्या सरंजामास दोनदोन तीनतीन हजार रुपये बसतात.

हिंदु, मुसलमान, बेनी इस्रायल व पारशी लोकांचे तालीमखानें जिकडेतिकडे पूर्वींपासून आहेत. परंतु त्यांत कित्येक दांडगे व अडाणी लोक असल्यामुळें हे तालीमवाले मारामारी व दंगा करितात, ह्मणून अब्रूवाले लोक जात नाहींत. आणि आमच्या लोकांस असें वाटतें कीं, तालीमखान्यांत जाणें ह्मणजे मारामारी व तंटे करायास शिकणें. ह्मणून कोणी आपल्या मुलांस कसरत करूं देत नाहींत. एका वाडींतील तालीमवाले दुसऱ्या वाडींतील तालीमवाल्यांचा द्वेष करितात. त्यामुळें एकमेकांसीं कलह होऊन मारामारी करितात. आणि आपल्या बळाचा याप्रमाणें नाश करितात. पारशी, मुसलमान, घांटी, गवळी, इस्राएल या लोकांत तालमींत कसरत करून तयार झालेले पहिलवान पुष्कळ आहेत. तालीमवाले लोक फार दंगा करूं लागल्यामुळें असे कित्येक तालीमखाने सरकारानें बंद करविले आहेत.

ब्यांडस्टांड् हे मनास उल्हास करणारें ठिकाण कांपाच्या मैदानांत पालो बंदराच्या किंचित् पुढें आहे. हें चारही बाजूंनीं उघडें असून गायक लोकांचा मात्र समावेश होई इतकें मोठें आहे. आणि आंत त्यांचीं वाद्यें ठेवण्यासाठीं बांक

मांडलेले असतात, व लोकांस बसायासाठीं ही सभोंवतीं बांक बसविले आहेत. संध्याकाळच्या पांच घंटा झाल्या ह्मणजे एथेंही वाद्यें वाजविणारी मंडळी जमते. हे गव्हर्नराच्या चाकरींत असणारे, व त्याच्या घरीं इंग्रजी वाद्यें वाजविणारे, ह्मणून ह्यांस गव्हर्नर्स ब्यांड असें ह्मणतात. हे गोऱ्या पलटणींतील लोक असून उत्तम प्रकारच्या नव्या नव्या सुस्वरांनीं हीं वाद्यें आठवड्यांत तीन खेपा या ठिकाणीं लोकांच्या कर्मणुकीकरितां वाजवीत असतात. त्यासमयीं मनोरंजन करून घेण्यास या ठिकाणीं पुष्कळ लोक जात असतात. इंग्रज लोकांचें संध्याकाळचें सहपरिवार हवा खाण्यास जाण्याचें हें आवडतें स्थळ आहे. सबब त्यांच्या शेंकडो गाड्या एथें जमतात. आणि चोंहीं बाजूंनीं मंद वायु सुटत असल्यामुळें हें स्थळ सर्व गोष्टींत मनोहर होऊन जातें. शरीरसंपत्ति आणि अंतःकरणाची शांतवृत्ति प्राप्त होण्यास इंग्रज लोक एक सारिखे उद्युक्त असतात.

इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत ह्मणजे सुमारें १७०० वर्षांमागें ग्रीक ( युनानी ) देशस्थ टालमी नामक एका भूवर्णनवेत्त्यानें त्या काळांतील पृथ्वीच्या भागांचें वर्णन केलें आहे. त्याणें भरतखंडाच्या वर्णनांत मुंबईस हेप्टेजियन् ऐलंड्स ( सप्तद्वीपस्थल ) असें नांव दिलें आहे. त्यावरून त्या वेळीं मुंबईचीं निरनिराळीं सात बेटें होतीं असें स्पष्ट समजतें. पूर्वीच्या मुंबईचा नकाशा या पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणाच्या शेवटीं घातला आहे, तो पाहिल्यानें याविषयीं कांहीं भ्रांति राहणार नाहीं. अणखी हल्लींच्या व पूर्वीच्या मुंबईत जें जमीनअस्मानाचें अंतर झालें आहे, तें ध्यानांत येईल. सांप्रत सात बेटांचें एक बेट झालें आहे, तरी ही आकृति असीच राहील असा भरवसा नाहीं. आसपासच्या खाड्या बुजवून जेव्हां चोंहीकडील जमीन वाढेल, आणि साष्टी वगैरे दुसरे गांव मिळवितील, तेव्हां मुंबई हें बेट होतें, असी कल्पना देखील कोणाच्या मनांत येणार नाहीं.

# प्रकरण १३.

विमान-नाच-तमासे-अनेक जातींचीं जनावरें-नाटकें-घोड्यांच्या पैजा-ओटींच्या पैजा-वेश्यांचे नाच-बाणकोटी-तेलीराजा-गोसावी-तुमडीबावा-हरदासांच्या कथा-बावा-आत्मारामबावा-पाऊड, पांगूळ इत्यादि-जोगी, सन्न्यासी वगैरे भिकारी-आंधळे-जोगिणी-जन्मपत्रिका करणारे जोशी.

प्रत्येक चार सहा महिन्यांनीं कांहींना कांहींतरी पृथ्वीवरील कलाकौशल्याचे मासले व अद्भुत चमत्कार, किंवा नाच तमासे मुंबईंत दृष्टीस पडतात. सन १८५३ नांत युरोपखंडांतून कैट नांवाचा एक पुरुष एथें आला होता; आणि त्याच्या येण्यामुळें मुंबईंतील व आसपासच्या गांवांतील सर्व लोक अगदीं नादित होऊन गेले होते. हा गृहस्थ विमानांत बसून आकाशांत दोन तीन कोस उंच व पन्नास साठ कोस दूर इतक्या अंतरावर जातो, असी आवई उठविली होती. आणि हा अलौकिक चमत्कार व्हावयाच्या पूर्वीं मुंबईंतील आबालवृद्ध आठ पंधरा दिवसपर्यंत ह्याच गोष्टी करीत. वर्त्तमानपत्रांत तर आल्या दिवसास ह्या विमाना-विषयीं नव्या नव्या अफवा उठवीत. ह्या विमानास इंग्रजींत "बलून" असें ह्मणतात. आणि आमच्या लोकांनीं यास विमान, डबा, आकाशरथ, अशीं नांवें दिलीं होतीं. ह्या विमानाचें वर्णन पुष्कळ वर्त्तमानपत्रांत केलें आहे, परंतु ह्याचा साद्यंत वृत्तांत ज्ञानोदयांत लिहिला होता तो येणेंप्रमाणें.

"बलून ह्मणजे विमानयंत्र. हें कसें उडतें हा अभिनव चमत्कार जान्यु-आरीच्या अठराव्या तारिखेस मुंबईच्या लोकांनीं पाहिला. हें विमानयंत्र तयार करून अमुक मनुष्य त्यामध्यें बसून आकाशमार्गें उडवून दाखविणार आहे, असें जाहीर करून सरकारी सर्व कारखान्याला त्या दिवशीं सुटी नेमिली. हा समा-रंभ भायखळ्याच्या पटांगणांत झाला. तेथें पाहणाऱ्या लोकांकरितां मंडप घालून

तीन चार प्रतींच्या जागा दोन, तीन, आणि पांच रुपयांचा दर ठरवून नेमिल्या होत्या. आणि हा चमत्कार पाहाण्यासारिखाच. म्हणून अकरा वाजल्यापासून चार वाजेपर्यंत गाड्या घोड्यांनिशीं माणसांची अशी रहदारी चालली होती कीं, कोटाच्या बाजूनें समुद्रच फुटून वाहत आहे असें वाटलें. दाटींत जायाला नाइलाज, ह्मणून बहुत स्त्रिया व पुरुष गच्च्या व घरांचीं छपरें, यांवर चढून बसले होते. एवढा समुदाय एकत्र कधीं जमला नसेल. हें यंत्र उडविण्याचे अगोदर कासऱ्यांनीं बांधून टाकिलें असतां डोलत होतें, तें पाहून लोकांस नवल वाटे. मग सुमारें पाच वाजतां तें उडविलें. तें प्रथम मोठ्या वेगानें कांहीं दक्षिणेकडे वळून अर्धकोस उंच जाऊन अगदीं ताऱ्याएवढें दिसूं लागलें. मग थोड्या वेळानें पूर्वेकडे वाहून पनवेलीच्या आसपास पडलें.

एवढी गोष्ट कमी झाली कीं, त्याचा कर्त्ता आंत बसून जाणार होता, तो गेला नाहीं. यामुळें पैका भरून सन्निध बसणारे लोक खंती झाले; कां कीं त्यावर बसून जाण्याच्या कसबामुळें लोकांनीं पैसा दिला. परंतु तो न बसण्याचीं कारणें पुष्कळ सांगतात. तीं असीं. त्यामध्यें मनुष्यें बसून जाण्यापुरती वाळू भरली नव्हती. कोणी ह्मणतात बसणारा भ्याला. कोणी ह्मणतात कीं, बसण्याचें कळसूत्र बिघडलें, असें त्याच्या नजरेस आलें. कोणी म्हणतात कीं, तो दारू पिल्यानें बेफाम झाला होता, म्हणून जवळच्यांनीं त्याला आंत बसूं दिलें नाहीं. तयारी झाली तेव्हां त्याणें मी अमक्या ठिकाणीं असा बसेन, म्हणून वर चढून सारा अदा करून दाखविला. पण उडते वेळेस कमरेचे दोर कापून उडी टाकून पळाला, आणि तें सोडतांच उडून गेलें. जर त्या यंत्रांत कांहीं बिघडलें नसून तो दारूमुळें मस्त झाला असेल, तर ती त्याणें मोठी चूक केली, आणि तो ठक, व सरकारच्या कामास एक दिवस अडथळा केला, म्हणून गुन्हेगार असेंही म्हणायाला चिंता नाहीं. ही या गृहस्थानें बेअदबीची गोष्ट केली, असें लोकांच्या ध्यानीं येऊन चुकलें.

असो. तो कोणत्या कारणामुळें बसला नसेल तो नसो. परंतु इतक्यावरूनच बलुनांत बसून जातात, ही गोष्ट खोटी असें कोणी समजूं नये. कारण कीं, शेंकडों वेळा अशा विमानांत बसून लोक गेले आहेत. सन १७८३ त ह्मणजे एकुणऐंशी वर्षांमागें या विमानाची युक्ति निघाली. मंट्गालफियर नामें कागद करणारा एक सधन गृहस्थ फ्रान्स देशांत होता. धूर वगैरे वर चढतात,

या तर्कावरून तसें कांहीं यंत्र करून उडवावें असें त्याला वाटलें. प्रथम त्याणें रेशमाची घट्ट पिशवी करून, तींत पाण्याची वाफ कोंडून ठेवून पाहिली, ती वर चढून लौकर खालीं पडे. मग त्याणें पिशवीचें तोंड पसरट करून तिच्या खालीं कांहीं जिन्नस जाळून या प्रकारची मोट वर उडविली. तरी त्याला तें बराबर साधलें नाहीं. मग त्याला हैड्रोजन ग्यासची युक्ति सुचली. तेव्हां त्याची मोट बांधून वर उडविली. ती त्याच्या मनाप्रमाणें झाली. नंतर त्याणें त्यांत बसून वर चढण्याची व उतरण्याची चांगली परीक्षा करून पारिस शहरांतील लोकांस कळविलें. तेव्हां तो चमत्कार पाहयाला तीन लक्ष लोक मिळाले होते. त्यामध्यें कोणी बसलें नव्हतें. तें विमान फार त्वरेनें वर गेलें. नंतर दोन घटिकांनीं वरती जाऊन फुटलें. कांकीं त्यांत ग्यास फार भरला होता. मग तें आठ कोसां-वर जाऊन पडलें. तेव्हां तेथील रानटी लोकांस मोठें अद्भुत वाटलें. त्यांत कांहीं पिशाच किंवा जनावर आहे, ह्मणून प्रथम त्यांनीं त्यावर गोळया घातल्या. मग एकदम सर्व मिळून कत्तल केली. नंतर तऱ्हतऱ्हांच्या हत्यारांनीं त्याला छिन्नभिन्न करून टाकिलें. तेव्हां त्यांतल्या ग्यास वगैरे पदार्थांची घाण येऊं लागली. हें पाहून त्यांनीं तें घोड्याच्या शेंपटीला बांधून कोसभर ओढून घेतलें. आणि त्याला अगदीं ठार करून टाकावें असा त्यांचा मतलब होता, परंतु हा वृत्तांत सरकाराला कळल्यावर जाहीर केलें कीं, तें यंत्र आहे त्याला असें करूं नये, परंतु उचलून आणावें.

प्रथम त्याची उतरण्याची वगैरे अटकळ समजायाला आंत जनावर बसवून उडविलें. मग मनुष्यें ही बसायास धजूं लागलीं. याप्रमाणें पुष्कळ वेळा करीत आले. तिकडे आतां त्याविषयीं कांहीं नवल वाटत नाहीं. ग्रीन नामक मनुष्य तर पांचशांपेक्षां अधिक वेळा बलुनांत बसून गेला आहे, असें ह्मणतात. अणखी कितीएक वेळां कित्येक चमत्कारासाठीं बलुनाला बैल किंवा घोडे बांधून त्यावर बसून उडाले आहेत. एक मडम बैलावर बलुनांत बसून गेली होती. लंडन व पारिस शहरांमध्यें हैड्रोजन ग्यास उत्पन्न करण्याला चांगलीं साधनें आहेत, ह्मणून हें विमानयंत्र तेथें हमेशा करीत असतात.

ता. १० शनिवार या दिवशीं सुमारें चार वाजतां मिस्तर कैट हा विमा-नांत बसून आकाशमार्गें गेला असतां वाऱ्याच्या योगानें तें विमान फार उंच जाऊन समुद्राकडेस गेलें; तें समुद्रांत पडेपर्यंत लोकांच्या पाहण्यांत आलें, आणि

त्यावरूनच इंडियन् नेव्हीचा सरदार याणें आगबोट वालुकेश्वरापासून सुमारें दीड कोसपर्यंत नेली होती, व दुसरेही पडाव शोधास गेले होते. त्यांणीं सुमारें मध्यरात्रपर्यंत शोध केला, परंतु कांहींच थांग लागला नाहीं. यावरून अनुमान केलें कीं, तो बहुधा पाण्यांत पडून बुडाला असावा.

ताजा कलम. बुधवारीं १४ व्या तारिखेस मिस्तर कैट सुरतेहून आगबोट-द्वारें मुंबईस आला. त्याच्या सांगण्यांत कीं, मी महालक्ष्मीपासून सुमारें पांच कोसांवर समुद्रांत उतरलों, आणि तेथें लाचार होऊन राहिलों होतों, इतक्यांत सुरतेस जाणारी आगबोट आली, तिजवर मला घेतलें. नाहीं तर मृत्यूचें घर मला प्राप्त झालें असतें. ”

मुंबई शहरांत प्रतिदिवशीं अनेक तऱ्हांचे नाच तमासे रस्तोरस्तीं दृष्टीस पडतात. गारुडी, भोरपी, ( बहुरूपी ) माकडांचे व आस्वलांचे नाच करणारे, व दुसरे तमासगीर लोक अनेक सोंगें घेऊन जिकडेतिकडे फिरत असतात, आणि आठ चार आणे दिले ह्मणजे तमासा करून दाखवितात. परंतु युरोप खंडांतून जे प्रतिष्ठित गारुडी व तमासगीर येतात, ते दोन चार महिने एथें राहून दहावीस हजार रुपये गोळा करून जातात. ते कांपाच्या मैदानांत व दुसऱ्या एकाद्या प्रशस्त ठिकाणीं जागा तयार करून तमासे करितात. घोड्यावर नाचणें व त्यावर उभें राहून घिरट्या घालणें, चक्कर मारणें, असे अनेक तऱ्हांचे कसरतीचे खेळ करितात. व दुसरे गारुडी व जादूगिरी ह्मणतात तसे हरतऱ्हांचे खेळ करितात. हे पाहयास जाणाऱ्या प्रत्येक मनुष्याकडून एकापासून पांच रुपयेपर्यंत घेतात. आणि अशाच ठिकाणीं आमचे लोक संतोषानें द्रव्य खर्चितात. असे कोणी तमासगीर लोक आले, ह्मणजे मुंबईतील लोकांस मोठें स्फुरण येतें. युरोपियन लोक सर्व गोष्टींत कुशळ असून धूर्त्त असल्यामुळें जें काम ते हातीं घेतात, त्यांत द्रव्य कमावितात. हे तमासगीर लोक बहुधा फ्रान्स, इटली व इंग्लंड एथून येत असतात.

मुंबई शहरांत आसपास रान नसल्यामुळें अनेक तऱ्हांचीं श्वापदें व पक्षी स्वतंत्रपणें फिरतांना व मंजूळ स्वर काढून गातांना दृष्टीस पडत नाहींत. परंतु एथील इंग्रज व एतद्देशीय श्रीमंत पारशी वगैरे लोक अनेक तऱ्हांचे पक्षी विकत घेऊन बाळगतात. तसेच अनेक तऱ्हांचे पशु देशोदेशांतून एथें आणितात. अनेक जातींचीं कबुतरें बागेंत व घरीं बाळगलेलीं असतात. कांहीं वर्षांमागें एथें

एक सिंहाची जोडी आणिली होती, ती पाहायास हजारो लोक जात असत. तसेच मोठमोठाले वाघ गाड्यांत घालून रस्तोरस्तीं फिरवीत. जिराफ, जीब्रा, गेंडा, शहामृग, सांबर, हरिण, हत्ती, उंट व सांड, असे अनेक वन आणि ग्रामपशु व पक्षी दृष्टीस पडतात. सन १८६२च्या नवेंबर महिन्यांत एक मोठा कुत्रा विकायास आणिला होता, तो ५०० रुपयांस कोणी भाट्यानें घेतला अशी वदंता ऐकिली होती. एथें कुत्रेच सुमारें शें पन्नास जातींचे अढळतात. शिकारी कुत्रे आरबस्थानांतून येतात. त्या दर कुत्र्याची किंमत पांच पांच सहा सहा मोहरा पडल्ये. बसराई मांजर पन्नास साठ रुपयांस खपतें. हीं फार सुंदर असतात. सारांश एथील राहणारास पृथ्वीवरील सर्व जनावरें पाहयास सांपडतात.

सन १८४० त इंग्रज लोकांनीं ग्रॅांटरोड या ठिकाणीं एक नाटकशाळा बांधिली. तिचें नांव थिएटर. एथें पूर्वीं फक्त इंग्रज लोकांचींच नाटकें होत असत. परंतु हल्लीं मुंबईमध्यें लोकांस नाटकाचा नाद फार लागल्यामुळें ह्या ठिकाणीं हिंदु व पारशी लोकांचीं नाटकें होऊं लागलीं. मुंबईमध्यें हल्लीं चार पांच हिंदु नाटककार मंडळ्या असून त्या नेहमी नवींनवीं नाटकें तयार करीत असतात. कित्येकांचा असा समज पडला आहे कीं, नाटकांत सुधारणा होत्ये. अशा विलक्षण समजाखालीं हें खूळ माजविलें आहे. कित्येक असें ह्मणतात कीं, इंग्लंड देशांत शेंकडो नाटकी आहेत व शेक्सपियरासारिख्या विद्वानांनीं नाटकें रचिलीं आहेत, तर आमच्या मुलांनींच नाटकी कां बनूं नये ? परंतु तेथील नाटकी विद्वान् लोक असून ते ज्ञानवृद्धीसाठीं अनेक विषयांवर नाटकें रचितात. आमचे नाटककार ह्मटले ह्मणजे बहुधा अक्षरशत्रु असतात. यांच्या नाटकांत बहुधा सगळ्या कुचेष्टा असतात. आमच्या नाटककारांनीं सुंदर ग्रंथ रचिले असें कोठें अढळत नाहीं. संस्कृतांत पुष्कळ सुरस नाटकें आहेत. परंतु ते विद्वान् नाटककार होते; नट नव्हते. नाटकांत एकदां मूल शिरलें ह्मणजे तें कामांतून गेलें असें समजावें. आणि ह्या प्रकारच्या नाटक्यांस इंग्लंड देशांतही प्रतिष्ठित मानीत नसतात. पूर्वीं कर्नाटक, सांगली, राजापूर, गोमंतक, गुजराथ, पुणें, वगैरे देशांतून तमासगीर लोक येऊन घरोघर दशावतारी, डफवाल्यांचा, सागडबाहुल्यांचा व खांबसूत्राचा नाच करीत; परंतु हल्लीं दशावतारी नाच एथेंच तयार होतात. नटाचें काम करणें हें सर्व लोकांच्या शास्त्रांत फार निंद्य मानिलें आहे. आणि हिंदु शास्त्रांत तर याचा फारच निषेध केला आहे. संभावित व सुशील लोक यांचा तिरस्कार करितात.

असें असतां मुंबईंतील बहुतेक लोक ह्यांस फार लुब्ध आहेत, हें मोठें नवल वाटतें. मुंबईंत नाटकें सुरू जाहल्यापासून पुष्कळ मुलें बिघडलीं, व कित्येक संसार खटलें सोडून भडकून गेलीं. मुलास नाटकाचा छंद लागला, ह्मणजे तो प्रपंच आणि परमार्थ ह्या दोन्ही सुखांस नाडला असें समजावें. मुंबई शहरांत आईबापांनीं फार जपलें पाहिजे, कारण एकदां मुलांस दुष्ट संगति व दुर्व्यसन जडलें, ह्मणजे तीं अनिवार होऊन जातात. ह्या शहरांत विद्येचीं साधनें आहेत, त्यांच्या सहस्रपट दुराचरण प्रवर्त्तक साधनें आहेत. त्यांतून जो मनुष्य पार पडेल तोच शहाणा व सुखी असें समजावें.

घोड्यांच्या पैजा हा एक प्रतिष्ठित श्रीमंती जुगारच आहे. पैजांची जागा महालक्ष्मीच्या रस्त्यावर शेतांत आहे. सुमारें दीड कोस जमिनीचा घेर या प्रीत्यर्थ करून ठेविला आहे. आणि ह्या ठिकाणीं पांच पंचवीस हजार रुपये खर्चून बंगला बांधिला आहे. याचें नांव सरतीचा बंगला.

ह्या ठिकाणीं प्रतिवर्षीं फेब्रुआरी महिन्यांत पैजा होतात. मोठमोठाले प्रतिष्ठित दिवाणी व लष्करी इंग्रज कामगार, सावकार लोक व कित्येक मोंगल लोक वर्गणी देऊन या खात्याचा खर्च चालवितात. पैजांचे घोडे प्रत्यहीं या जाग्यांत फिरवीत असतात. त्यांस प्रतिदिवशीं शिकवून त्या कामासाठीं तयार करितात. ह्या एकेक घोड्यामागें शेंकडो रुपये खर्चितात. मग हे तयार झाले, ह्मणजे त्यांवर स्वार होऊन पैजा मारितात. ह्या पैजांचे छंदांत कित्येक इंग्रज लोक हजारो रुपये उडवून कफल्लक होऊन बसले आहेत. हे घोडे दोन तीन पळांमध्यें दीड कोस जमिनीच्या घेऱ्यांत फेरफटका करून नेमलेल्या जाग्यांत येतात. या पैजांत घोड्यांचे धनी चारपांच हजारांची पैज मारितात. परंतु याशिवाय हजारो लोक जे ह्या पैजा पाहायास जमलेले असतात, त्यांतील कित्येक आपसांतच पैजा मारितात. असा दर पैजेचे दिवशीं या ठिकाणीं पांच पन्नास हजार रुपयांचा उघडपणें जुगार होतो. दरखेपेस एथें पंचवीस तीस हजार लोक जमतात.

कोपेनहेगेन या नांवाच्या एका पैजेच्या घोडयाची फारच स्तुति करितात. असें सांगतात कीं, या घोडयानें धन्यास आपला तूळभार होई इतकें द्रव्य कमावून दिलें. हा घोडा पैजेंत असला ह्मणजे बाकीच्या घोडयांचे धनी भिऊन जात, आणि ह्मणत कीं, ह्या सिंहापुढें आमच्या घोडयांची डाळ कोठें शिजणार आहे ? या घोडयास वृद्धापकाळीं श्रम देऊं नयेत, ह्मणून ह्याच्या धन्यानें त्यास १८६१ च्या

मार्च महिन्यांत इंग्लंड देशांत पाठवून दिलें. याचा वृत्तांत ग्याझेट नांवाच्या वर्त्तमानपत्रांत छापला होता.

मोठमोठाले इंग्रज लोक जमून नौकांच्या पैजा मारितात. ह्या प्रीत्यर्थ यांणीं चांगल्या बोटी तयार करून ह्यांवर हुशार तांडेल नेमलेले असतात. मग नेमलेल्या दिवशीं हे इंग्रज गृहस्थ जमून आपआपल्या बोटी तयार करून अमुक ठिकाणीं ज्याची बोट प्रथम जाऊन येईल, त्याणें अमुक द्रव्य जिंकावें, असें ठरवून एकदम चारपांच बोटी समुद्रांत लोटितात. हा तमासा पहायास शेंकडो लोक समुद्रांत व बंदरांत जमतात.

वेश्यांचे नाच हें तर भरतखंडास एक ग्रहणच लागलें आहे. यांपासून प्रत्येक शहरांत किती नासाडी होत्ये, याचें अनुमान करवत नाहीं. दुराचरणी स्त्रिया सर्व मुंबईभर पसरल्या आहेत. त्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत जात्ये. आनंदाच्या दिवशीं श्रीमंत गृहस्थांस आगतस्वागताविषयीं सन्मान देणें असल्यास ह्या प्रकारच्या एक दोन स्त्रिया आणून सभेंत उभ्या केल्यानें ते संतुष्ट होतात! अशा कर्मणुकीशिवाय दुसरी प्रतिष्ठित कर्मणूक भरत खंडांत सांपडणें दुर्लभ, असा मुंबईंतील बहुतेक लोकांचा समज आहे. ह्यामुळेंच ह्या स्त्रिया सधन होऊन कोणासच मानीत नाहींशा झाल्या आहेत. आठ दहा वर्षांमागें डानबी सीमोर या नांवाचे एक प्रख्यात इंग्रज गृहस्थ लंडन शहरांतील पार्लमेंट सभेचे सभासद, ह्या देशाची स्थिति पाहायास आले होते. त्यावेळीं आमच्या लोकांनीं त्यांच्या सन्मानार्थ असा एक नाच केला होता. तसाच नेपाळाहून जंगबहादूर आला होता; त्यास नाचाची मेजवानी सर अर्स्किन् पेरी यांणीं सुप्रीम कोर्टांत केली होती.

कांहीं दिवसांवर एका नाचणाऱ्या व गाणाऱ्या स्त्रीच्या मुलीचें थोतांड लग्न झालें. त्यांस तिणें सुमारें चार हजार रुपये खर्च केला. ह्या लग्नाची जी वरात निघाली होती, तिच्या बरोबर मोठमोठाले दोन दोन घोड्यांचे रथ व दुसऱ्या उत्तम प्रकारच्या गाड्या सुमारें पंचवीस तीस, व तसेच साजाचे शृंगारलेले घोडे होते. आणि ज्यावेळीं ह्या स्त्रियांचा समुदाय शृंगारून बरोबर चौघडा, इंग्रजी-बाजा, तासे, मरफे व इतर वाद्यें घेऊन मोठ्या कडाक्यानें रस्त्यांतून डुलत डुलत जातांना एकाएकीं दृष्टीस पडला, तेव्हां स्त्रीराज्याविषयीं पुराणांतील गोष्टीचें स्मरण झालें. असें ऐकण्यांत आहे कीं, हिणें याप्रसंगीं आपल्या जातीच्या सर्व स्त्रियांस हळद कुंकू भरून एक एक रुप्याचा द्रोण वांटिला.

ह्या शहरांत हिंदुलोक किंचित् खाऊन पिऊन सुखी असले ह्मणजे एक दोन चाकर बाळगितात. हे चाकर श्रीवर्धन, हरणई, बाणकोट, चिपळून, रत्नागिरी, राजापूर इत्यादि देशांतील शूद्रलोक असतात. हे घरांतील दळण, कांडण, धुणें, झाडणें, सारविणें, मुलांस संभाळणें, वगैरे सगळें काम करितात. हे लोक गरीब असल्यामुळें घरकामास फार उपयोगी पडतात. एक एका श्रीमंताच्या घरीं असे पांच पांच सहा सहा चाकर असतात. ह्यांस खाऊन पिऊन दरमहा एकापासून तीन रुपये द्यावा पडतो. ह्यांची संख्या मुंबईंत सुमारें तीन चार हजार असेल. हे कोणत्याही देशांतून आले, तरी ह्यांस लोक बाणकोटी असें ह्मणतात. ह्यांचीं निरनिराळीं नावें असतात, तरी बाणकोटी ह्मटला ह्मणजे त्यास बाळू असें ह्मणतात. जेवायास घालून पगार देतात, त्यास ओला, आणि जेवण घातल्याशिवाय देतात, त्यास सुका पगार असें ह्मणतात. सुका पगार पांचांपासून सहा रुपयेपर्यंत असतो. परंतु सुक्या पगारावर ह्यांस कोणी घरचाकरीस बहुधा ठेवीत नाहींत. दुसऱ्या अनेक देशांतून शूद्र व दुसऱ्या जातींचे लोक ह्या शहरांत येतात, परंतु ह्यांच्या एवढे ते घरकामास उपयोगी पडत नाहींत. वाणी व दुसऱ्या जातींच्या लोकांतही हे लोक आतां चाकरीस लागले आहेत. हल्लीं ते माळ्याचें, मसालाचें, शिपायाचें, वगैरे सर्व कामें शिकूं लागले आहेत.

हे बाणकोटी लोक भाद्रपद महिन्यांत गणपतीच्या व गौरीच्या दिवसांत दोन चार दिवसपर्यंत अनेक तऱ्हांचीं रानटी गाणीं ह्मणून विलक्षण रीतीनें वेडें-वांकडें तोंड करून व शरीर वळवून नाचत असतात. त्यांच्या बरोबर एक ढोलकें व दोन तीन झांजा असतात; व कित्येक पायांस घागऱ्या बांधितात. ह्यांचें हे नाच केवळ रानटी आहेत. ह्या खेळगड्यांची पांच पन्नास असामींची टोळी असत्ये. ते ह्या दिवसांत आपआपल्या धन्यांच्या व ओळखीच्या गृहस्थांच्या घरीं जाऊन संध्याकाळचे नाचत असतात. त्यांस रुपया आठ आणे बक्षीस द्यावे पडतात. हे यांचे नाच केवळ निर्दोषी आहेत. आषाढ आणि श्रावण ह्या दोन महिन्यांत ते एकाद्या वाडींत बिऱ्हाड घेऊन त्यांत जमून नाच शिकतात. ते एक सारिखे आठ घटिका रात्रीपासून पहाटेपर्यंत ढोलकें वाजवून ओरडत व नाचत असतात.

बाणकोट्यांच्या आवश्यकतेविषयीं हा पुढील मजकूर दीपदर्शक नांवाच्या वर्त्तमानपत्रांत छापिला होता.

ओव्या.

पोलिसांत बाल्ये चाकर ।। दुसऱ्या हपिसांत बाल्ये फार ।।
बाल्याविण नाहीं घर ।। मुंबईंत पाहूं जातां ।। १ ।।
बाल्ये साराया अंगुलीस पाणी ।। बाल्ये बाजार देती आणुनी ।।
बाल्ये जावया वयनी मागुनी ।। बाल्ये मुलें घ्यावया ।। २ ।।
बाल्या पाय दाबावया ।। बाल्या टेबल पुसावया ।।
बाल्या शिग्राम हाकावया ।। धोत्रें धुवावयाला तो ।। ३ ।।

---

जरी सरकारानें व श्रीमंत लोकांनीं गरीब लोकांसाठीं एवढा बंदोबस्त केला आहे, तरी रस्तोरस्तीं शेंकडो भिकारी फिरतात. रस्त्यावर बसून अनेक तऱ्हांचे विलाप करून व वेडीविद्री मुद्रा करून लोकांकडे द्रव्य मागतात. यांत आंधळे, पांगळे, लंगडे, लुले, म्हातारे व निराश्रित असे अनेक जातींचे लोक असतात; व कित्येक ढोंगी ही असतात. पारशी लोकांत भिकाऱ्यांची संख्या फारच थोडी असून त्यांच्या पंचाइतीकडून भिकारी लोकांचा बंदोबस्त होतो. ते परकी लोकांच्या दारीं भिक्षा मागायास कधीं जायाचे नाहींत. तसाच प्रकार बोरी लोकांचा आहे. बोरी कितीही गरीब असला तरी कांहीं आठ चार आण्याचा धंदा करील परंतु परक्याच्या दारांत जाऊन याचना करणार नाहीं. हा या लोकांचा किती स्तुत्य आणि ग्राह्य गुण आहे. किरिस्तांव व इंग्रज लोकांतही सशक्त मनुष्य एकाएकीं भिक्षा मागायाचा नाहीं. जे अनाथ असून जर्जर झालेले असतात व अगदीं कंगाल असतील, तेच एकादे वेळीं भिक्षा मागत फिरतील. अशा स्थितींत जरी त्यांला भिक्षा मागणें प्राप्त झालें, तरी ते मोठाच संकोच पावतात.

सुमारें सन १८३३ सालांत वालुकेश्वरी तुंबडीबावा या नांवाचा बैरागी आला होता, त्याणें मोठी जटा वाढविली होती, व तो कौपीन धारण करी, आणि त्याच्या हातांत एक मोठा तुंबा होता. याजबरोबर पांच दहा शिष्यमंडळी होती. त्याणें मोठ्या सिद्धाचा डौल घालून शास्त्री, पंडित, वैदिक यांस व दुसऱ्या ब्राह्मणांस आणि त्यांच्या स्त्रियांस व कोठ कोठें दुसऱ्या जातींच्या भिकाऱ्यांसही धोतरजोडे, पागोट्या, शेले, लुगडीं असीं उंच उंच किमतीचीं वस्त्रें वांटून दिलीं. कोणास पैठणी पागोट्या, कोणास करवतकांठी मोठाले धोतरजोडे, असें

पहिल्या दिवशीं त्याणें हजार दोन हजार रुपयांचें सनंग वांटलें. ज्या ब्राह्मणाच्या अंगावर धड फाटका पंचा दृष्टीस पडत नव्हता, तो एकदां वालुकेश्वरीं जाऊन आला ह्मणजे नवराच बनून येई. हें पाहून कित्येकांस सुदाम देवाच्या गोष्टीचें स्मरण होऊं लागलें. मग काय विचारता, मुंबईचे लोक ! दुसऱ्या दिवसापासून वालुकेश्वरास यात्राच जमली. जो ब्राह्मण उठला तो वालुकेश्वराचा रस्ता धरी. तैलंगांनीं तर तेथें जाऊन धरणेंच घेतलें. कोणी बावास वारा घालीत; कोणी त्याची लंगोटी धुवीत; कोणी जटा नीट करीत. ज्या मारुतीच्या देवालयांत तो उतरला होता, त्यांत जायास रीग सांपडत नसे. हें ऐकून मुंबईतील कापडबाजार लोटून वालुकेश्वरीं आला. वाणी, भाटये, शिंपी उंच उंच कापडांचें दिंड घेऊन वालुकेश्वरीं जमूं लागले. आणि माल खपविण्याविषयीं तुंबडीबावाच्या शिष्यांचें आर्जव करूं लागले. याप्रमाणें तुंबडीबावानें पांच सहा दिवसपर्यंत दहा पंधरा हजार रुपयांच्या सनंगांचा फडशा उडविला. ज्या व्यापारी लोकांकडून माल घेतला होता, त्यांस प्रथम थोडें थोडें द्रव्य पोंचविलें. तें द्रव्य तो तुंबडी भरून आणून देई. आणि लोकांस असें दाखवी कीं, मी मोठा सिद्ध आहे, आणि हें द्रव्य ह्या तुंबडींतून उत्पन्न करितों. मग काय पुसावयाचें आहे ? मुंबईतील शेट सावकार जो ह्मटला तो तुंबडीबावाच्या दर्शनास जाई. परंतु शेवटीं बावानें आपला कावा साधिला. आठ पंधरा दिवस मुंबईत याप्रमाणें धामधूम करून सावकार लोकांकडून दहा वीस हजार रुपयांचा माल लुटून शिष्यांसहवर्तमान रात्रीचा पळून गेला. सावकारांच्या हातीं तुंबडी देखील लागली नाहीं. या प्रतीचे ढोंगी लोक या शहरांत येऊन भोळया लोकांस धत्तुरा दाखवून चालते होतात, तरी लोकांचें खूळ जाऊन हुशार होत नाहींत. तो गेल्यानंतर हा तुंबडीबावा पुष्कळ ठिकाणीं लोकांस ह्याचप्रमाणें ठकवून गांवोगांवांतून पळून जात असे, असें बोलूं लागले.

भिक्षेचें खूळ हें हिंदु आणि मुसलमान लोकांत फार माजलेलें आहे. या लोकांत बळकट, सदृढ व मल्लां सारिखे जोगावर लोक निर्लज्जपणें अनेक मिषांनीं भिक्षा मागायास दारोदार फिरतात. कोणी बैरागी, कोणी गोसावी, कोणी सन्न्याशी, कोणी शिवहररे, कोणी ढवळेबावा, कोणी कोवळेबावा, कोणी ब्रह्मचारी, कोणी दिगंबर, कोणी परमहंस, कोणी भजनीबावा असे अनेक वेष घेऊन घरोघर हिंडून लोकांस त्रास देतात. हिंदु लोकांत सर्व जातींचे लोक भिक्षा मागणारे अढळतात. हे लोक भिक्षा मागणें हें एक आपलें कर्त्तव्यकर्मच आहे, असें

मानितात. तैलंगी, दक्षिणी व गुजराथी ब्राह्मणां पैकीं शेंकडो भिकारी घरोघर कोरान्न मागत फिरतात, ह्मार, चांभार यांत देखील संतांचा वेष घेऊन दारोदार भिक्षा मागणारे पुष्कळ. म्हार लोक चोखामेळा, व चांभार रोहिदास, यांच्या नांवावर भिक्षा मागतात. वाणी शिंपी, हे नामदेव, तुकाराम यांच्या नांवावर भिक्षा मागतात. हे लोक काखेस झोळी लावून सकाळचे तांदूळ मागत फिरतात, व संध्याकाळ झाला ह्मणजे विणा आणि फाणस घेऊन दोहरे, पवाडे व पदें ह्मणत दारोदार दिडकी दुगाणी मागत फिरतात. या प्रमाणें सकाळपासून मध्यरात्रपर्यंत भिकाऱ्यांचा मुंबईंत लोकांस फार उपद्रव आहे.

कांहीं दिवसांवर एक तेलीराजा आला होता. त्याचा वेष व डौल पाहून तर मोठेंच नवल वाटे. तो हिंग्लाज देवीचा भक्त, आपण हिंग्लाजपुरीहून आलों आहे, असें सांगे. त्याजबरोबर दोघे शिष्य होते, ते त्याचा इतमाम राखीत. त्यानें डोकीस रुमाल बांधला होता, तेलानें चिप्प भिजलेला झगा अंगांत घातला होता, व धोतर नेसला होता, त्यांतून ही थपथपा तेल गळत असे. तो लोकांच्या दारोदार जाऊन उभा राही, ह्मणजे त्याचे शिष्य त्याच्या अंगावर तेल टाका किंवा त्यास तेलाची अंघोळ घाला असें सांगत. कित्येक लोक असें करून त्याची पूजा करून त्याच्या पायां पडत ! व त्यास द्रव्य व शिधा देत. मग तो त्यांला कांहीं भविष्य सांगे. त्याची विलक्षण मूर्त्ति पाहून लोक चकित होत. तो उभा राहिला ह्मणजे त्याच्या अंगांतून तेलाच्या धारा निघत. ह्या प्रकारचीं मुंबईंत नवीं-नवीं ध्यानें येतात. आणि आमचे कित्येक लोक त्यांच्या भुलथापीस भुलून फसून जातात.

पंढरपुराचें माहात्म्य वाढल्यापासून संतांचा वेष धरून भिक्षा मागण्याचें थोतांड हिंदु लोकांत फार माजलें आहे. तशांत मुंबईंत तर सांगायासच नको. जो उठला तो टाळ टिपरी घेऊन धांवतो. याशिवाय देशोदेशचे भिकारी येऊन या शहरांत जमतात. कित्येक बायका संतिणी होऊन कथा व भजन करितात, भिक्षा मागतात, व बरोबर शिष्यांचा मेळा घेऊन समारंभानें फिरत असतात. सन १८३८ मध्यें एक संतीण आली होती. तिच्या एथें पुष्कळ ठिकाणीं कथा झाल्या. ती रामनवमीच्या नवरात्री एकसारिख्या आत्माराम शिंप्याच्या देवळांत कथा करी. ही बाई बालविधवा होती. ज्या लोकांत भिकारी फार ते लोक उत्तरोत्तर गरीब होत जातात. असें एका मुख्य व्यवहारसालच इंग्रज

२०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

विद्वानाचें मत आहे. हें वास्तविक आहे. पाहा! दुसऱ्या लोकांपेक्षां हिंदु लोकांची स्थिति उत्तरोत्तर वाईट होत चालली आहे. याचें कारण ही भिकारसंख्या. जर कोणी खंडी दीड खंडी तांदूळ घेऊन मूठ मूठ घालण्याचा बेत करून दारांत बसला, तर संध्याकाळपर्यंत ते खपून जातील. इतकी निकृष्ट प्रतीच्या भिकाऱ्यांची संख्या मुंबईत जमली आहे. यांत आळशी, लबाड व लुच्चे असतात. यांवर असें कवन आहेः—

दहापांचमिळून एकठायीं करो हरकांहीं ॥
मिळवूं पोटाला बेलाशक, होऊं संत चला मुंबइला ॥
नको विद्याध्यायन सोपें सोंग करावें ॥
धडधाकट गोरापान चेला ज्वान त्याणें पुढें चालावें ॥
बाकीचे अवघे साधक शिष्य बनावे ॥
एक सजवुनी देवतार्चन नित्य भजन पुढें चालावें ॥
तंबोरी चिपळया टाळ माजवुनी गोल पुढें नाचावें ॥
ढोलांचा गलबला कांहीं जणांनीं ऐकावें ॥
कंठीदार आंगीं बंडी मोठी मोठी शेंडी घेर राखावे ॥
मोठ्या प्रातःकाळीं उठून साऱ्यांनीं झटून स्नान करावें ॥
भरवस्ती पाहूनि गल्ली छत्रीखालीं बावानें चालावें ॥
पंखे रुमाल शिष्यानें वागवावे ॥
दिनचर्या झोळीवर पडूनी अपार धान्य मिळवावें ॥
तें विकूनी लाल कपडे झोळीला घ्यावे ॥
धर्मनिष्ठ तेथील लोक संपादावे ॥
आणि ते पैसे भांग तमाखूस जाळावे ॥

हें कवन बरेंच मोठें असून यांत कोवळेबावा, ढवळेबावा इत्यादिकांचें यथार्थ वर्णन केलें आहे, परंतु त्यांत कोठेंकोठें बीभत्स शब्दांचा उपयोग केला आहे, ह्मणून तें सर्व एथें उतरून घेतलें नाहीं. मुंबईत अशा वर्त्तणुकीचे बावा पुष्कळ आहेत. हें कवन गुजाबा नाना ह्मणून एक ब्राह्मण होता, त्याणें केलें होतें. तो असीं कवनें पुष्कळ करी.

मुंबईत स्थायिक असे गोसावी व हरिदास पुष्कळ आहेत, परंतु श्रावण महिन्याच्या अखेरीस व रामनवमीच्या सुमारास या लोकांचा समुदाय एथें देशो-

देशांतून जमतो. याचें कारण कित्येक हिंदु गृहस्थांचे घरीं गणपतीचा उत्साह एथें मोठ्या समारंभानें होतो. ह्या दिवसांत कोणी एक, कोणी दोन, अशा आप-आपल्या सामर्थ्यानुसार कथा करवितात. ह्या कथांप्रीत्यर्थ त्यांस बरेंच द्रव्य मिळतें. कित्येक हरिदास विद्वान् व चांगले वक्ते असतात. त्यांस दर रात्रीस शें दीडशेंपर्यंत रुपये मिळतात. परंतु साधारण असला तर त्याची दहावीस रुपये बिदागी होत्ये. यांतून कित्येक सवड सांपडली असतां समारंभानें चाकरांचे काखेस झोळी लावून आपल्या हातांत विणा, व झांज मृदंगादि वाद्य सरंजाम बरोबर घेऊन दारोदार भिक्षा मागतात. कित्येक एकाद्या देवालयांत संध्याकाळची महिना दोन महिने कथा करितात, व सकाळच्या प्रहरीं धोंडभट्टी करून बरोबर झांज, मृदंग, विणा, टाळ, व एक दुसरा नांवाचा शास्त्री बरोबर घेऊन भिक्षा मागत फिरतात. घरांतून बाहेर निघतेवेळीं थोडासा बुका, एक दोन रुपये, अधेल्या, पावल्या, चवल्या, असें नाणें एका ताटांत घालून मोठ्या समारंभानें शाल अंगावर घेऊन बाहेर निघतात. मग घरोघर जाऊन द्रव्य गोळा करितात. ह्या प्रकारच्या भिक्षेस महाभिक्षा ह्मणतात. व कित्येक महायात्रेस जाण्याचें निमित्त सांगून लोकांकडून द्रव्य हरण करितात.

कांहीं वर्षांमागें ह्या शहरांत आत्माराम बावा या नांवाचे संत होते. यांच्या अंगीं साधूंचीं लक्षणें असून हे फार दयाळू होते. हे परमार्थ बोधक व सुरस असी कथा करीत असत, असें सांगतात. यांच्या अंगीं उदारपणा फार होता. ह्यांणीं आपलें आयुष्य सत्कर्मांत घालविलें. ह्यांस सयाजी महा-राजांनीं बडोदें मुक्कामीं ५०० रुपयांचा गांव इनाम दिला आहे. ह्यांणीं पालवाच्या रस्त्यांवर तीस चाळीस हजार रुपये खर्चून रामाचें देवालय बांधिलें आहे. ह्या साधूस मुंबईंतील व इतर देशांतील लोक फार भजत. ह्यांची नेम-निष्ठा, निर्लोभता आणि उदारबुद्धि पाहूनच लोकांस यांची सेवा करावीसी वाटे. त्यांला लोक हजारो रुपये देत असत. ते सर्व ते गरीब गुरिबांस देण्यांत व दुसरा धर्म करण्यांत घालवीत. सन १८३६च्या सुमारास ह्मणजे शके १७५८ त श्रावण वद्य ७ स हे परोपकारी साधु समाधिस्त झाले. त्या वेळीं त्यांचें वय सुमारें नव्वद वर्षांचें होतें, असें सांगतात, परंतु ते नेमनिष्ठेंत मोठे सावध असत. त्यांची समाधि रामाच्या देवालयाच्या समोर सभामंडपांत आहे. ह्या

देवळास आत्माराम बावाचें ठाकूरद्वार असें ह्मणतात. हें देऊळ बांधावयास मुंबईतील गृहस्थांनीं त्यांस द्रव्याची मदत केली.

गोसावी, बैरागी व सन्न्यासी, यांचा समुदाय प्रतिवर्षीं मुंबईंत येत असतो, व कित्येक वर्षोवर्षीं एथेंच गांजा गोळी पिऊन पडलेले असतात. मुंबादेवी, भुलेश्वर, बाबुलनाथ, गांवदेवी, भवानीशंकर, महालक्ष्मी, वाळुकेश्वर या ठिकाणीं ते राहतात. व सकाळ संध्याकाळ भिक्षा मागायास मात्र गांवांत येतात. कित्येक सर्वकाळ धुमरी पेटवून गांजा व भांग पितात. व अफीण खात बसलेले असतात. देवळांत जाणारे लोक त्यांस जें कांहीं देतात, त्यावरच ते निर्वाह करीत असतात. व त्यांचे शिष्य शहरांत येऊन जें कमावून नेतात, त्यांतूनही त्यांस गुरुदक्षिणा मिळत असत्ये.

पंचाक्षरी, देवऋषी, भगत, सामुद्रिक लक्षणें पाहणारे, कानोबाचा, खंडोबाचा व इतर देवांचा आणि भूतांचा अंगांत अवसर आणणारे धुतारे, सर्व मुंबईभर पसरलेले आहेत. बहुतेक हिंदु लोकांचा यांवर विश्वास असतो. कोणी दोरा बांधितात, कोणी विभूत चोळितात, कोणी अंगारा देतात, कोणी उतारा काढितात, कोणी तांदूळ खायास देतात, कोणी नुसतेंच पाणी मंत्रून प्यावयास देतात, परंतु त्यांच्या थोतांडाविषयीं कित्येकांच्या अजून कांहींच लक्षांत येत नांहीं, हेंच नवल.

दोन तीन घटिका रात्र असतानांच ह्या शहरांत भिकारी फिरायास लागतात. माणसास माणूस दिसायाचे पूर्वीं प्रथम पाऊड येतो. हा लंगोटी नेसतो, आणि डोईवर घोंगडी घालून हातीं काठी घेतो, व काखेस झोळी लावितो. हा रस्त्यावर अर्ध्या हाकेच्या अंतरावरूनच पाऊड आला, पाऊड आला, अशा मोठ्यानें दहावीस हाका मारितो. ह्याच्या ह्या आरोळ्या बिछान्यावर निजलेलें असतानां कानीं पडल्या म्हणजे गलीम आल्यासारिखी एकाएकीं भीति उत्पन्न होऊन छाती धडधडायास लागत्ये. हा लोकांच्या दारोदार उभा राहून अनेक तऱ्हांचे शब्द काढून एकसारखा बडबडत असतो. तो या प्रमाणें लोकांस उपदेश करितो. "अरे कोणी आपल्या वडिलांच्या नांवानें रामपहारामध्यें धर्म करा; कोणी आपल्या देवधर्माच्या नांवानें वस्त्रदान करा; कोणी आपल्या पुण्यासाठीं पैसा धर्म करा; कोणी आपल्या आईबापाच्या नांवावर धर्म करा." इतक्यांत कोणी दुगाणी, पैसा, फाटकी चोळी व कांहीं चिरगूट दिलें असतां चक्रा-

सारिखा फिरून उड्या मारितो, आणि किंचित् मंद स्वरानें असें म्हणतो, "पाऊड पावला जोगाईच्या अंबाबाईला; पाऊड पावला कोल्हापुरच्या महालक्ष्मीला; पाऊड पावला जेजूरीच्या खंडोबाला; पाऊड पावला पंढरीच्या विठोबाला; पाऊड पावला वाडीच्या नरसोबाला; पाऊड पावला इंदुरच्या अहिल्याबाईला; पाऊड पावला देहूच्या तुकोबाला; पाऊड पावला राजापुरच्या ह्मसोबाला; पाऊड पावला चांभारगोंदेच्या सटवाईला; पाऊड पावला इंदापुरच्या धोपेश्वराला." अशीं शें दोनशें तोंडास येतील तीं नांवें घेऊन बडबडत असतो. कुणबी, घांटी, मराठे व वाणी लोक यांस फार भजतात. हा मोठ्यानें आरडायास लागला ह्मणजे कित्येक भोळ्या लोकांस असें वाटतें कीं, हा कोणी सिद्ध आला आहे. मग कोणी पैसे, कोणी तांदूळ, कोणी जुनी चोळी, कोणी लुगडें, कोणी अंगरखा, कोणी बंडी, अशीं चिरगुटें देतात. ह्याप्रमाणें दोन तीन घटिका दिवस येईपर्यंत हा दहावीस चिरगुटें, दोन चार आण्यांचा खुर्दा, व पायली दीड पायली तांदूळ घेऊन जातो.

पाउडाच्या हाकाट्या चाललेल्या असतानांच वासुदेव येतो. ह्याच्या डोकींत मोरांच्या पिसांचा मुगूट, अंगांत एक फाटकासा लांब झगा आणि हातावर धोतराची घडी, व फाटक्या चिरगुटांची गांथण असत्ये. याच्या काखेला झोळी लावलेली असून तो डाव्या हातानें टाळ आणि उजव्या हातानें टिपऱ्या वाजवीत असतो. ह्याच्या पायांमध्यें नेपुरें व चाळ बांधलेली असत्ये. असें सोंग घेऊन तो रस्त्यांतून हाकाट्या मारीत व टिपऱ्या वाजवीत नाचत नाचत येतो. आणि अनेक तऱ्हांचे शब्द करितो. हा पाउडा सारिखाच बडबड करित सुटतो. त्यामध्यें कांहीं अशीं वाक्यें असतात. "धर्म केला कर्ण राजानें; धर्म केला राजा धर्मानें; धर्म केला रामचंद्रानें; धर्म केला अहिल्याबाईनें; धर्म केला गोपिकाबाईनें; धर्म केला चांगदेवानें; धर्म केला दामाजीपंतानें; धर्म केला पुंडलिकानें; धर्म केला जनाबाईनें; इत्यादि."

पाउडाची आणि वासुदेवाची बडबड आटपायाच्या संधींतच नंदीबैल घेऊन पांगूळ येतो. हे तिघेजण एकाच दिवशीं एकाच ठिकाणीं येतात असें नाहीं. परंतु त्यांच्या येण्याचा समय बहुतकरून एकच असतो. एकादे वेळीं वासुदेव आणि पांगूळ एकाच ठिकाणीं गोंधळ घालूं लागतात. परंतु बहुधा एकाची गड-

बड चाललेली असतां दुसरा तेथें जायास धजत नाहीं. याचें कारण उघडच आहे कीं, त्याची तेथें मनाजोगती बिदागी होत नाहीं.

पांगुळाबरोबर ढोलकें वाजवणारा एक पोऱ्या आणि एक नंदीबैल असतो. त्याला कोणी पांगूळ बैल व कोणी घणसा बैल असें ह्मणतात. ह्या बैलाच्या गळ्यांत लहान मोठ्या अशा पन्नास साठ घांटा व पायांत झांजरे असतात. शिंगास अनेक रंगांच्या चिंध्यांचे गोंडे लाविलेले असतात. ह्या शिवाय याच्या पाठीवर दोन अडीच मण वजनाचीं तऱ्हतऱ्हेचीं चिरगुटें टांगलेलीं असतात, व कपाळावर पितळीची महादेवाची किंवा मारुतीची मूर्त्ति बांधलेली असत्ये. हाच याचा शृंगार. मग ढोलकें वाजवून जेव्हां तो नंदीबैलास नाचवितो, आणि तोंडानें मोठी परवड गातो, तेव्हां कानटाळे बसून जातात. आपण जमिनीवर उताणा निजून त्या नंदीला आपल्या छातीवर चौपायांनीं उभा करितो. अशीं अनेक तऱ्हांचीं ढोंगें करितो. पहांटेच्या प्रहरीं ह्या पांगुळाचे कर्कश शब्द, ढोलक्याचा आबड धोबड नाद, व नंदीच्या घंटांचा खणखणाट, असे दोन तीन कलकलाट होऊं लागल्यामुळें विचारी, विद्यार्थी व अशक्त लोकांची मोठी हानि होत्ये.

कांहीं वर्षांमागें पहांटेस एक थंडोजी बावा मोठे सूर काढून रस्तोरस्तीं फिरत असे. तो ओलें धोतर नेसे व पांघरी, आणि डोकीस कण्हेरीच्या पानांचा एकेरी टोप घालून लोकांच्या दारासमोर उभा राहून आपल्या शिष्यांकडून अंगावर थंड पाण्याचे घडे ओतून घेई. ह्याच्या ह्या फेऱ्या बहुतकरून थंडीच्या दिवसांत होत. आणि ज्या दिवशीं मोठीच थंडी व पाऊस पडे, त्या दिवशीं तर हा बावा हटकून फारच लवकर उठून फिरे. आणि पुष्कळ पाणी अंगावर ओतून घेई. लोक त्याची संभावना कशी काय करीत, तें बराबर समजण्यांत आलें नाहीं. हे लोक अलीकडे कोठें अढळत नाहींत.

ही गोष्ट आनंदाची आहे कीं, हे लोक अलीकडे दिवसांनदिवस कमी होत चालले आहेत. ह्या दहा पंधरा वर्षांत तर नंदीबैल व थंडोजीबावा कोठें दृष्टीस पडले नाहींत. अलीकडे लोक सुधारल्यामुळें ह्या लोकांस फार देईनातसे झाले असावे, किंवा ह्या लोकांसच आपल्या धंद्याचा कंटाळा येऊन ते तो सोडूं लागले, हें कांहीं समजत नाहीं.

अनेक तऱ्हांचे अघोरी लोक मुंबईत पुष्कळ येत, तसे आतां येत नाहींत. नानकपंथी ह्मणून कित्येक भिकारी येत. ते हातीं दोन शिसवी लांकडाचे गुळ-

गुळीत सोटे घेऊन वाजवीत, तोंडानें बडबड करीत, आणि जबरीनें दुकानदारां-कडून पैसा पैसा घेत. कोणी न दिला तर त्यास अद्वातद्वा बोलत, व मोठ्यानें बीभत्स शिव्या देत. तसेच दुसरे अघोरी लोक येत. त्यांच्या बरोबर एक काळ्यांची चौकट असे, ती घेऊन दारोदार फिरत, आणि कोणी पैसा न दिला तर बरोबर पोऱ्या असे, त्यास त्या चौकटीवर निजवीत. कोणी छातींत सुरी भोसकून घेत, कोणी गालास टोपण लावीत, व कोणी जिभेस छिद्र पाडून दोरी घालीत. कोठें पांच पंचवीस हिजडे लोकांची टोळी जमून येई, आणि अनेक जातींचे अभद्र शब्द काढून टाळया पिटीत, व मोठे हेळे काढून दुकानदाराकडून जबरीनें पैसा दोन पैसे घेत. ह्यांचा जुलूम लोकांवर इतक होता कीं, त्यांच्या तोंडांतून आलेलें द्रव्य घेतल्याशिवाय दारांतून उठत नसत. कोलवणांतील कित्येक गोसावी अनेक ढोंगें करून येत. कोणी तोंडांतून पोटांतील आंतडीं बाहेर काढून दाखवीत. अशीं अनेक अघोर कर्में करून लोकांस भोंदून द्रव्य घेऊन जात. हीं सर्व अघोर कृत्यें इंग्रज लोकांनीं हळूहळू मोठ्याच चातुर्यानें शहरांतून काढून टाकिलीं.

सुमारें चाळीस वर्षांमागें एथें एक बैरागी आला होता, तो पांच हजार रुपयांची संभावना करून द्या, असें लोकांना सांगे. ते त्यांणीं त्यास दिले नाहींत, ह्मणून तो मुंबादेवीच्या तळयाच्या मध्यभागीं जो खांब रोविलेला आहे, त्यावर जाऊन उपडा पडला, आणि कांहीं केलें तरी उतरेना. कोणी हजार, कोणी दोन हजार रुपये देऊं केले तरी तो ऐकेना. तो तेथें सतत दोन दिवसपर्यंत होता, असें सांगत. मग कोणी भोळया व भिऱ्या सावकार लोकांनीं त्याचें मोठें आर्जव करून व त्यास द्रव्य देऊन खांबावरून उतरून आणिलें. अशीं एथें अनेक थोडांडें येत असत. परंतु हल्लींच्या काळीं जर कोणी तसें केलें असतें, तर फार्जेट साहेब त्यास एका घटिकेंत कुलाब्याच्या दांडीचा रस्ता दाखविते.

बैरागी व बैरागिणी रस्तोरस्तीं फिरून अनेक तऱ्हांचे दोहरे ह्मणत असतात. त्यांतील थोडेसे एथें उतरून घेतले आहेत.

चंदनकी भली चीपडी गाडीभरा न काट ॥
दाताकी भली झोपडी सुमकान भला न गाम ॥
अजगर न करे चाकरी पंची न करे काम ॥
दास मलूका एक हे सबका दाता राम ॥
माया मरे न मन मरे मरमर गये सरीर ॥

आशा तिस्ना ना मरे कह गये दास कबीर ॥
माया मेरे रामकी लूट सकोसो लूट ॥
अंतकाल पछतावगे प्रान जांयगे छूट ॥
शीतापतकी कोठडी चंदन जडे कवाड ॥
ताला कूची प्रेमकी खोलो किस्नमुरार ॥

तसेच मुसलमान लोकांचे फकीरही दिल्ली, मक्का, सिंध, काबुल, कंदहार, हैदराबाद, पंजाब वगैरे शहरांतून शेंकडो येतात. हे भेंडीबाजारांत मशीद आहे तेथें व दुसऱ्या मशिदींत उतरतात. तेथें नाखुदा व दुसऱ्या श्रीमान् मुसलमान लोकांकडून त्यांस खाणें मिळत असतें. व ते सकाळ संध्याकाळ सर्व मुंबईभर कबिराचे व दुसरे हिंदुस्थानी दोहरे व अनेक तऱ्हांचीं गाणीं ह्मणून द्रव्य गोळा करितात. त्यांतही कित्येक दोरे व मंत्रून पाणी देणारे व धंतरमंतर करणारे असतात. कित्येक हिंदु व पारशी फकीर लोकांस जमवून पैसे वांटतात. यांचा असा समज असतो कीं, दुसऱ्या भिकाऱ्यांस देण्यापेक्षां मुसलमानांस धर्म केला असतां विशेष पुण्य आहे ! कित्येक फकीर हिंदु लोकांच्या दारीं भीक मागायास येतात, तेव्हां राम कृष्ण इत्यादि देवांचे दोहरे व पदें ह्मणून द्रव्य मागतात. हें केवळ हिंदु लोकांस फुस लावून द्रव्य काढण्यासाठीं ढोंग असतें. आंतून ते हिंदु धर्माचे मोठे द्वेष्टे व स्वभावाचे क्रूर असतात. जे फकीर मशिदींत राहतात, त्यांशिवाय कित्येक झोंपड्या बांधूनही राहतात. हिंदु लोक मुसलमानांच्या देवास भजतात, परंतु मुसलमान प्राण गेला तरी हिंदूच्या देवास भजणार नाहींत.

दुसऱ्या भिकाऱ्यांचें एक खूळ अलीकडे फार माजलें आहे, आणि ते कोण ह्मणाल तर दक्षिणेंतील ढोंगी वतनदार. हे निजामाच्या व दुसऱ्या मराठी राज्यांतील थोतांडी मराठे, वाणी, किंवा ब्राह्मण लोक असतात. कोणी कुळकरणी बनून गळ्यांत लेखणी बांधितो; कोणी पाटेल बनून कंबरेस हिशेबाची चोपडी बांधितो; कोणी देशमुखाचें सोंग घेऊन हातीं बेडी घालितो; कोणी देशपांड्या होऊन एका पायांत लोखंडाची सांखळ घालितो; कोणी जमीनदार होऊन गळ्यांत नांगर बांधितो. अशीं अनेक सोंगें करून खोटीं कागदपत्रें बनावून बायका मुलांस घेऊन सहपरिवार रस्तोरस्तीं फिरून द्रव्य मागतात. आणि सांगतात कीं, कोणास हजार, कोणास पांचशें, असे रुपये सरकारांत देणें आहे, ह्मणून त्यांस बेडी घातली आहे व त्यांचे

आईबाप, बायका पोरें व भाऊबंद कैदेंत आहेत. यांच्या बायका व हे उच्च स्वरानें मोठे हेळे काढून दु:खनिवेदनार्थ विलक्षण गाणीं ह्मणत असतात.

कावड खांद्यावर घेणारे व पटावरील चित्रें दाखविणारे तेलंगणांतील भिकारी व त्यांच्या बायका रस्तोरस्तीं फिरतानां अढळतात. कोणी पांच दहा गाई बरोबर घेऊन त्यांच्या पोषणार्थ कांहीं द्यावें, ह्मणून लोकांच्या दारोदार फिरून द्रव्य गोळा करितो. असे अनेक ढोंगी लोक ह्या शहरांत पदोपदीं त्रास देत असतात.

पिंगळे, मेढे जोशी, गोंधळी, वाघ्ये आणि कानफाटये प्रतिदिवशीं प्रत्येकाच्या दारापासीं एक दोघे दृष्टीस पडतातच. तशाच खंडोबाच्या मुरळयाच्या टोळया रस्तोरस्तीं फिरतात ह्या दुष्ट स्त्रिया धर्माच्या मिषानें मोठाच अनाचार करितात. असल्या थोतांडाच्या योगानें लोक कुमार्गांत मात्र पडतात. अनाचार प्रवर्त्तक गोष्टी ह्या शहरांत फारच आहेत. आणि लोक अशांत द्रव्य घालून धर्म केला असें मानून संतुष्ट असतात. ह्यास काय ह्मणावें ! बहुतेक भिकारी हालमस्त असतात.

पहाटेस गोंधळी लोकांची गर्दी असत्ये. ह्यांचें माहात्म्य नवरात्रांत फार असतें. हे गळयांत कवडयांच्या माळा घालून अंगांत तेलानें भरलेला लहानसा झगा किंवा अंगरखा घालतात, आणि हातीं मोठा जळता कांकडा घेऊन जिकडे-तिकडे नाचत असतात. यांच्या काखेस तेलाचें बुदलें असतें, व बरोबर तुणतुणें वाजविणारा एक पोऱ्या असतो. हे लोक अनेक तऱ्हांचीं भवानीचीं गाणीं ह्मणतात. " उदोभवानी, अंबाबाईचा जोगवा " हें यांचें ब्रीद असतें.

ह्या शहरांत देशोदेशांतून शेंकडो आंधळे येतात, आणि ते सकाळपासून आठ दहा घटिका रात्रपर्यंत अनेक तऱ्हांचे स्वर काढून भिक्षा मागत फिरतात. कोणी बरोबर एक दोन गाई घेऊन जातात. कित्येक एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून आठ दहा असामींची माळ करितात. कित्येक दोघी दोघी बायका देखील करितात. मागें एथें दोनही पाय लुले पडलेला असा भिकारी रहात असे, तो रस्त्यांतून जनावरासारिखा चालून भिक्षा मागत फिरे. आणि प्रतिदिवशीं रुपया दोन रुपये कमावी. त्याणें तीन बायका केल्या होत्या.

आश्विन महिन्यांत नवरात्राचे नऊ दिवस कित्येक वाडवळ, गुरव, व दुसऱ्या जातींचे शूद्र लोक जोगवा या नांवानें भिक्षा मागत फिरतात. हे प्रतिष्ठित भिकारी ह्या दिवसांत सहकुटुंब सहपरिवार प्रत्येकाच्या दारीं जाऊन मूठ मूठ तांदूळ जमा करितात, ग्रहणाच्या दिवसांत ह्मार, मांग, धेड व हलाल-

खोर " दे दान सुटे गिराण, दे दाता सुटे गिराण " असें ह्मणत ग्रहण लागल्यापासून सुटेपर्यंत सर्व मुंबईभर फिरत असतात.

जन्मपत्रिका, यादवानें, वर्षफळ, व त्रैमासिक फळ करणारे गुजराथी मोत्याळे ब्राह्मण एथें पुष्कळ वर्षांपासून राहत. त्यांची वस्ती बहुत करून अंतोबा गोसाव्याच्या आणि अनंतऋषीच्या वाडींत असे. सांप्रत यांची संख्या खंडत चालली आहे; कारण इंग्रजी विद्येचा नगाऱ्या खाल यांच्या ज्योतिशाच्या टिमटिम्याचा नाद उत्तरोत्तर मंदावत चालला आहे.

कांहीं वर्षांमागें हिंदु, पारशी, व यहुदी लोक जन्मपत्रिकेवर फारच विश्वास ठेवीत, सबब यांचा धंदा चांगला चाले. कोणी कोणी शें दीडशें रुपये खर्चून जन्मपत्रिका करून घेत. आणि ह्या पत्रिका ह्मणजे साक्षात् ब्रह्मदेवाचा लेख आहे असें मानीत. किंचित् आलस्य झाला किंवा कांहीं हानि झाली कीं, जन्मपत्रिकेचा पुडका जोशीबावाचें घर शोधायास जाई. ही एक एक पत्रिका दीड दीड दोन दोनशें हात लांब असून तिच्या प्रारंभीं तुलसीचें झाड किंवा पिंपळाचा वृक्ष काढिलेला असतो. आणि आंत अनेक तऱ्हांचीं राशिचक्रें, ग्रहांचीं स्थानें व कुंडलिका काढून त्या चित्रविचित्र रंगांनीं रंगविलेल्या असतात. कित्येक नव्या केलेल्या जन्मपत्रिका सुमुहूर्तानें घरीं आणवून जोशीबावाकडून वाचवून घेत; आणि तिची पूजा करीत. मग जोशीबावाची चांगल्या रीतीनें संभावना करीत. यांचा मोड होण्यास बहुधा हीं मुख्य कारणें झालीं— इंग्रजी शाळा आणि दवाखाने.

---

# प्रकरण १४.

इंग्रज लोकांचीं देउळें–पोर्टुगीझ् लोकांच्या इगर्जा व खुरुस–हिंदु लोकांचीं देवालयें–श्रावक लोकांचे डेरे व यती–कामाठी लोकांचीं राउळें–मुसलमान लोकांच्या मशिदी व पीर–बेनी इस्राएल व यहुदी लोकांचे सिनेगाग ( मशिदी ) व त्यांचा इतिहास–पारशी लोकांच्या अग्याऱ्या–निरनिराळ्या लोकांचे सण–कपिलाषष्ठी–देवीचीं गाणीं–कानोबाचे मठ–गणेश चतुर्थी–दिपवाळी–मोहरम–यात्रा व जत्रा–उरूस–मिशनारी–परमहंस मंडळी–विष्णु बावा ब्रह्मचारी.

पुष्कळ वर्षांपासून मुंबईखात्यांत इंग्रज लोकांचा उपाध्याय व उपदेशक असा कोणी नव्हता, अथवा एथें त्यांचें देऊळही नव्हतें. सन १७१४ मध्यें कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांनीं रेवरेंड रिचर्ड काब यांस धर्माध्यक्ष पाठविलें. सन १७०० त या बेटावर गव्हर्नर सर निकोलास वेट होते, त्यांनीं इंग्लंड देशांत कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांस असें लिहून पाठविलें होतें. “ मेहेरबानी करून मुंबईस एक बैबल् ( धर्म पुस्तक ) व दोन प्रार्थनेचीं पुस्तकें पाठवावीं. ” कोटांतील मोठें देऊळ बांधण्याचें काम यांच्याच कारकिर्दींत सुरू झालें होतें; परंतु तें मि० चार्लस बून यांच्या कारकिर्दींत मिस्तर काब यांच्या श्रमानें सिद्धीस गेलें. यास कथीड्रल असें ह्मणतात. या देवळाची उस्तवारी करण्याच्या खर्चाची वार्षिक नेमणूक असावी असा विचार करून असें ठरविलें होतें. जो माल मुंबई बंदरांत येईल, त्याजवर शेंकडा आठ आणे जाजती जकात घेऊन जें द्रव्य जमेल तें देवळाच्या वार्षिक खर्चास लावावें. सरकारी दप्तरांत पुढील नोंद सांपडत्ये. “ सन १७३३ च्या जकातीचा वसूल २,६७५, आणि सन १७३४ चा वसूल ८,८९३ रुपये देवळाचे कारभारी यांचे स्वाधीन केला. ”

इंग्रज लोकांचें कथीड्रल हें सर्वांत मोठें. हें तयार करायास तीन वर्षें लागलीं. आणि तें १७१८ मध्यें बांधून तयार केलें. हें बांधायास गव्हर्नर मिस्तर बून यांनीं पुष्कळ द्रव्य देऊन जी मोठी घांट यांत वाजते, ती दिली. तीवर याचें नांव व शक लिहिला आहे. त्यांणीं आपलें वजन खर्चून दुसऱ्या इंग्रज लोकांकडून वर्गणी जमा केली. कंपनी सरकारानें यास १०,००० रुपये दिले. ह्या देवळास सर्व खर्च ५३,९९२ रुपये बसला. यांत एक मोठें तंतुवाद्य आहे, तें प्रत्येक आदित्यवारीं देऊळ भरतें, त्या वेळीं वाजवितात.

सन १८३८ त ह्या देवळाचा जीर्णोद्धार करून तें उंच वाढविलें. त्या वेळींही वर्गणी करून द्रव्य जमविलें होतें. ह्याच्या चहूं बाजूंस घड्याळ आहे. त्यांत तास, अर्धतास, पावतास, अशीं वाजतात. ह्या देवळांत नामांकित इंग्रज लोकांच्या कबरी आहेत. त्यांत एक डंकन साहेब गव्हर्नर यांची आहे. तिजवर त्यांच्या गुणांचें वर्णन केलें आहे. एका ब्राह्मणाचें व मडमीचें संगमरवरी दगडाचें चित्र कोरून ती मडम त्याच्या दयाशीलपणाचें वर्णन लिहिते, व ब्राह्मण हात जोडून त्यांच्या मरणाविषयीं शोक करीतो, असें दाखविलें आहे. हा ब्राह्मण कलकत्त्यांतील एक ज्योतिषी होता. त्यानें डंकन साहेब ज्यावेळीं कलकत्त्यांत कारकुनाचें काम चालवीत होते, त्यावेळीं त्यांस असें भविष्य कथिलें होतें कीं, ते कांहीं दिवसांनीं राज्यपदास चढतील. हें त्याचें भविष्य खरें झालें, ह्मणून ह्या साहेबाचा आणि त्या ब्राह्मणाचा मोठा स्नेह जडला होता, असें सांगतात. दुसरें ह्या परोपकारी साहेबानें रजपूत लोकांत बालहत्या होत, त्या बंद करण्याचा प्रयत्न चालविला होता, ह्मणून त्याच्या मरणाचा दोन बाळकें शोक करीत आहेत, असें दाखविलें आहे. अणखी त्यावर एक सुंदर मोठा वटवृक्ष कोरविला आहे. ह्या थडग्यावरील कोरींव काम फारच उत्कृष्ट आहे. हे साहेब लोककल्याणार्थ फार तत्पर असत, सबब मुंबईंतील लोकांनीं द्रव्य जमवून हें थडगें बांधविलें, आणखी संगमरवरी दगडावरील चित्रें वगैरे विलायतेंत तयार करून सन १८१७ मध्यें आणविलीं. ह्या शहरांत इंग्रज लोकांचीं देउळें सात आहेत.

पोर्टुगीझ् व किरिस्तांव लोकांच्या इगर्जा १३ आहेत. त्यांपैकीं तीन माहिमास आहेत. ह्याशिवाय जागोजागीं खुरुस आहेत. जसे हिंदुलोकांत पिंपळास पार बांधितात, तसे ह्यांस बांधून त्यांवर लांकडाचे खुरुस ठेविले आहेत. ह्यांची संख्या सुमारें साठ सत्तर आहे. ज्यावेळीं ह्या शहरांत पोर्टुगीझ् लोकांचा अमल

होता, त्यावेळीं हे स्थापलेले असावे. कित्येकांचा हल्लीं जीर्णोद्धार केला आहे. जसें प्रत्येक हिंदूच्या दारांत तुलसीचें वृंदावन असतें, आणि ते जसे सकाळ संध्याकाळ तुलसीची प्रार्थना करितात, तसाच कांहींसा प्रकार ह्या खुरुसाचा आहे. ते लोक त्रिकाळ ह्या खुरुससमोर खुरमांड्या घालून हात जोडून सात्विकभावानें प्रार्थना करीत असतात.

कांपाच्या मैदानांत तीन खुरुस आहेत. हीं पोर्टुगीझ् लोकांचीं दैवतें असून त्यांच्या कारकिर्दीच्या खुणा आहेत, ह्मणून इंग्रज लोकांनीं ते जिकडचे तिकडे राहूं दिले आहेत. ह्यांत जो मरीन पलटणी जवळ मोठा आहे, त्यास पुष्कळ किरिस्तांव सकाळ संध्याकाळ भजतात. या समोर खुरमांडया टेंकून प्रार्थना करितात. संध्याकाळचे तर एकसारिखे खुरमांडया घालून एकामागेंएक हारीनें पांच पंचवीस भजन करितानां दृष्टीस पडतात. ह्या खुरुसाची भक्तीण एक ह्यातारी किरिस्तांवीण बाई जवळ असतेच. तिजपाशीं टोपलींत कांहीं पणत्या, तेल व मेणबत्त्या असें सामान असतें. कित्येक या खुरुसास दिवे लावण्याचे व त्या समोर मेणबत्ती जाळण्याचे नवस घेतात. या प्रमाणें याच्या समोर प्रत्यहीं दहा पंधरा दिवे जळत असतात. कित्येक यावर फुलें घालितात, व कोणी यास फळें अर्पण करितात. ही पुजारीण बाई या खुरुसाचें माहात्म्य फार सांगते. कित्येक हिंदु व पारसी देखील यास नवस करितात. हा मुलें देतो; रोजगार लावितो; व्याधि हरण करितो; व जें जें सांगेल तें तें करितो, असें ही बाई सांगत असते! सर्व भूतीं ईश्वर आहे, अशा समजुतीनें हिंदुलोक यास भजतात, कीं आपले तेहत्तीस कोटी देव आहेत, त्यां पेक्षां यांत अधिक दैवत आहे, ह्मणून भजतात, हें कांहीं समजत नाहीं.

पोर्टुगीझ् लोकांच्या देवळांत भुलेश्वराच्या पाठीमागच्या रस्त्यावर जी "नोसामियोरा डी एस्पिरांस" ह्मणून इगर्ज आहे ती सर्वांत श्रेष्ठ. इच्या आसपास विस्तीर्ण जागा आहे. देवळांत पुष्कळ सरंजाम असून साधूंच्या मूर्त्ति आहेत. आमच्या लोकांप्रमाणें ते मूर्त्तीस भजतात. हें देऊळ पूर्वीं कांपाच्या मैदानांत जेथें मोठा खुरुस आहे त्या सुमारास होतें. ह्याचा जीर्णोद्धार सन १८३३ त झाला. माजगांवांतील मोठें देऊळही फार पुरातन आहे. हें पूर्वीं कोळीलोकानीं बांधिलें होतें, असें सांगतात.

ह्या शहरांत हिंदुलोकांचीं मुख्य पुरातन देवालयें ह्मटलीं ह्मणजे मुंबादेवी, काळबादेवी, गांवदेवी, भुलेश्वर, वालुकेश्वर, बाबुलनाथ, महालक्ष्मी, माणकेश्वर, परभादेवी, कोटांतील व्यंकटेश, व रामवाडींतील रामाचें देवालय.

शिवरीस वागेश्वरी आहे. हिची स्थापना पूर्वीं कोणी केली होती, हें समजत नाहीं. परंतु हिची वहिवाट सध्या रा. रा. जनार्दन बाळाजी यांजकडे आहे. हे गृहस्थ श्रीमान् असून ग्रांड जुरीचे सभासद आहेत. यांचे तीर्थरूप बाळाजी शामशेट हे मुंबईत पुष्कळ वर्षांपासून फार प्रख्यात होते. परळास दुसरीं सात आठ लहान देवालयें आहेत. तेथें माणकेश्वराचें देवालय आहे, तें रा. रा. विठोबा माणकोजी यांणीं बांधिलें आहे. माजगांवांस माणकेश्वराचें देवालय आहे. तें कोणी शें दिडशें वर्षांमागें वरळीकर सुतारानें बांधिलें होतें, असें सांगतात. परंतु ह्याची मूळस्थापना कोणी केली होती, तें समजत नाहीं. याचा जीर्णोद्धार पुरुषोत्तम रामचंद्रजी या नांवाच्या गृहस्थानें केला. वरळीच्या खालच्या पाखाडींत शंभुमहादेवाचें व माहिमास परभादेवीचें देवालय हीं फार पुरातन आहेत. माटुंग्यास एक आहे, तें नारायण शेट शिंपी यानें बांधिलें आहे. शिवासही दोन चार देवालयें आहेत, व माहिमास सुमारें २५ आहेत. हींही बहुतकरून जुनींच आहेत.

रामवाडींत रामाचें देवालय आहे. हें बरेंच पुरातन आहे. हें प्रथम काशिनाथ सोकाजी या नांवाच्या परभु गृहस्थानें बांधिलें होतें. नंतर सुमारें साठ सत्तर वर्षांवर मयत विठोबा कानोजी यांणीं याचा जीर्णोद्धार केला. तेव्हांपासून ह्या देवालयाची वहिवाट त्यांच्याच घराण्यांत चालली आहे.

गिरगांवच्या शेवटास महालक्ष्मीच्या रस्त्यावर प्रख्यात श्रीमंत जगन्नाथजी शंकरशेट यांनीं बांधलेलें भवानी शंकराचें देवालय आहे. हें मोठें रम्य स्थळ असून याच्या बाजूस एक धर्मशाळा आहे, ती धर्मार्थ सोडिली आहे. तींत अतिथि अभ्यागत येऊन राहतात. व गरिब गुरिबास हींत वस्ती करायास मोकळीक असत्ये. ह्या देवळाच्या बाजूस यांचा वाडा आहे. यांत अमोलिक सामान भरलें आहे. जिकडेतिकडे कारंजीं उडत आहेत. बागांतून रम्य हवा निघत असत्ये. हेंही स्थळ पाहाण्याजोगें आहे. व इतर लोकांचे ह्या रस्त्यावर पुष्कळ बंगले आहेत.

कांसार लोकांच्या देवीचें देवालय मुंबादेवीच्या देवालया खालीं आहे. हे लोक एथें फार काळापासून वसत आहेत. काहीं वर्षांमागें या लोकांत बापूशेट

नांवाचा एक गृहस्थ मोठा नामांकित असून धर्मी होता. शहरांत कोणत्याही जातीचा गरीब मनुष्य मरण पावला असतां तो त्याच्या प्रेत संस्कारार्थ पांच रुपये देत असे. पूर्वी टंकसाळींतील नाणें पाडण्याचें काम याच्या हातीं होतें. त्यावेळीं एथें त्याचा इतमाम बराच होता. परंतु हल्लीं ह्यांत तादृश कोणी अढळत नाहीं. कांसार आपण चंद्रवंशी क्षत्रिय आहों, असें ह्मणतात.

या बेटांतील देवळांवरील दोनशें वर्षांमागील आणि हल्लींचे लेख वाचून पाहिल्यावरून या शहरांतील लोकांस भाषाप्रौढी, व शब्दचातुर्य हीं भूषणकारक आहेत, असें केव्हांपासून समजूं लागलें हें समजेल. धाकजी दादाजीच्या देवालयावर जो संस्कृत, मराठी आणि इंग्रजी भाषेंत शिलालेख आहे, तो व माहिमास प्रभावतीच्या देवालयावर मुंबईतील अस्सल मराठी भाषेंत लिहिला आहे, तो वाचल्यानें त्या वेळच्या मराठी भाषेंत आणि सांप्रतच्या मराठींत किती अंतर आहे, हें ध्यानांत येईल. पुढें कांहीं देवळांवरील लेख उतरून घेतले आहेत.

एका वृद्ध सुज्ञ सोमवंशी गृहस्थानें गांवदेवीचा हा पुढील वृत्तांत लिहून दिला.

" श्री ग्रामदेवी पुरातन आहे. हिचें नांव लीलावती. दोनशें वर्षांचे पूर्वी ही वालुकेश्वराचे डोंगरांत होती. एके दिवशीं ही देवी बापाजी ह्यात्रे सोमवंशी क्षत्री पाठारे यांच्या स्वप्नांत येऊन सांगितलें कीं, आपणास गांवात न्यावें, तेव्हां बापाजी ह्यात्रे व गिरगांवकर सर्व मंडळी जमून तीस आणून गिरगांवांत उघड्या जागेवर बसवून तेथें वडाचें झाड लाविलें. त्याचा मोठा विस्तार झाला होता, परंतु कांहीं वर्षांमागें तुफान झालें तेणेंकरून तो मोडला. तरी त्याचा कांहीं भाग अद्याप आहे. नंतर शके १७२८ या सालीं राजश्री बाळाजी भिकाजी क्षत्री सोमवंशी पाठारे यांनीं देवीचें देवालय बांधिलें, तें अद्याप आहे. " ह्या देवीस वाडवळ, सुतार, व सोमवंशी क्षत्री पाठारे हे लोक फार भजतात. ह्या देवीची मार्गशीर्ष शुद्ध पूर्णिमेस यात्रा भरत्ये व दुसरे नवरात्राचे व रामनवमीचे उत्साह होतात. याचा सर्व खर्च हेच लोक करितात. ह्या देवीवर एका सुतारानें पूर्वी श्लोक केला होता तो येणेंप्रमाणें."

मुंबादेवि लिलावती वडतळीं गिर्‌गांविं जे बैसली ॥
गांवाची पहिलासि लोक ह्मणती साक्षात जे माउली ॥

येतां विघ्न अरिष्ट तें न कळतां तात्काळ नीवारिती ॥
भक्तां पाहुनि संकटीं झडकरी येऊनियां रक्षिती ॥ १ ॥

---

धाकजी दादाजीच्या देवळावरील लेख.

श्रियो निवासे वसुधा कलापे मुंबापुरे रत्नधिवेष्टितांते ॥
शांडिल्यगोत्रः प्रभुवंश आस्ते दादाजिसूनुः खलु धाकजीति ॥ १ ॥

तेनायं वसुसद्व्यया हितधिया पंचाधिदेवालयः ॥
प्रासादो विहितो हिताय यशसे हर्म्यादिभिर्भूषितः ॥
चित्रग्रावमयस्तिरस्कृतमयो लोकांबकानंदकृत् ॥
चंचच्चारुतरंगनीरधितटालंकारभूतः किल ॥ २ ॥

अत्रत्य देवतानामान्यवगच्छंत्वनुक्रमात् ॥
मयूरेशो गणपतिः शर्वाणी चरमेश्वरी ॥ ३ ॥

शंभुश्च धाकले शाख्यो हरिनारायणो हरिः ॥
सूर्यो विनायकादित्यः सर्वे संतु शिवप्रदाः ॥ ४ ॥

गतेऽब्धिशरपर्वतेंदुमितवत्सरे नंदने ॥
गुरौ घटगते तथा शिवतिथौ सिते माधवे ॥
प्रतिष्ठितमिदं मदीयकुल पालनीयं सदा ॥
समस्तजनभूतये भवतु देवधिष्ण्यं शुभं ॥ ५ ॥

"हें देवालय आणि देवालयाच्या सन्निध धर्मशाळा आहे, ही मुंबईस एथील प्रभु धाकजी दादाजी यांनीं बांधून देवालयांत श्री मयुरेश्वर, श्री रमेश्वरी, श्री धाकलेश्वर, श्री हरि नारायण आणि श्री विनायकादित्य या पांच देवांची स्थापना शके १७५४ नंदन नाम संवत्सरे वैशाख शुद्ध ११ दिवशीं करून देवालय आणि धर्मशाळा यांचा विनियोग हिंदुशास्त्ररीतीच्या धर्मकृत्याकारणें केला असे. याची व्यवस्था आमच्या वंशजांनीं ठेवून याचें संरक्षण करावें."

माणकेश्वराच्या देवळाच्या अलीकडे धर्मशाळेसमोर तीन हात उंच आणि दोन हात रुंद अशी देवळी आहे, तींत शिळेवर कोरलेली नागाची मूर्त्ति आहे. तिच्या बाजूस एक दोन हात उंच व एक हात रुंद असा पाषाण आहे. त्याच्या मस्तकावर सूर्य आणि चंद्र कोरले आहेत. त्याच्या खालीं महादेवाची पिंडी व नंदी काढिला

आहे, आणि ह्या खालीं कानडी आणि बालबोध अक्षरांनीं कांहीं लेख लिहिला आहे. कानडी लेखांतील मजकूर असा आहेः–

"कर्नाटकामध्यें श्रीरंगपट्टण एथीलचा लिहिणारा. न्यांकी नरसप्पय्या याचा मुलगा होन्नारपय्या याचा कुमार लिंगय्या. विजापुराजवळचा वंशज मी. लक्ष्मीवास असो. प्रभव नाम संवत्सरे."

हा दगड कोणी औरंगजेब बादशहाच्या पदरच्या लिंगाईत कानडी अय्यानें मारला होता, असें सांगतात. परंतु या लेखांत याविषयीं कांहीं आधार सांपडत नाहीं. कानडी लोकांत जमिनीची हद्द बांधायाची असल्यास असा दगड मारून त्यावर शेष, नंदी, सूर्य, चंद्र, आणि महादेव यांस साक्षीसाठीं काढण्याचा संप्रदाय आहे, असें सांगतात. हा केवळ लिंगाईत वाण्याच्या सीमेचा दगड आहे. आणि आमचे लोक ह्यास देव असें मानून याची नित्य गंधाक्षता घालून ब्राह्मणद्वारा पूजा करवितात. हा किती अंधार आहे. अशा ह्या आमच्या लोकांच्या देवभोळेपणास काय ह्मणावें !

माजगांवच्या शेवटास मोटेचें माजगांव ह्मणतात. तेथें घोडपदेव आहे. परंतु याचें वास्तविक नांव खडकदेव असावें. कारण हा एक मोठा खडक असून त्याच्या समोरच्या भागास शेंदूर चोपडून ह्यास देव बनविला आहे, दुसरें कांहीं नाहीं. हें देवस्थान कोणी छट शूद्रानें उपस्थित केलें आहे. ह्या देवास हा सुपाऱ्यांचे कौल लावितो, आणि अनेक तऱ्हा करून लोकांस भोंदून द्रव्य हरण करितो. ह्या देवळाच्या छपऱ्यास टांगलेले पन्नास पाउणशें लहान लहान पाळणे व झोळया आहेत. आणि याचे भक्त हें दैवत मोठें प्रखर आहे, असें सांगतात. मुंबईतील देवांचीं नावेंही तऱ्हेवाईक असतात. जबरेश्वर, हट्टेश्वर, ताडदेव, बाबदेव, खोकलादेवी, इत्यादि.

मुंबईत हिंदूंचीं सुमारें तीनशें देवालयें आहेत. माहिमास खोकलादेवी आहे, कोणास खोकला झाला असतां या देवीची उपासना करावी, ह्मणजे तो बरा होतो, असें हिचे उपासक सांगतात ! या शिवाय दर वाडींत एक एक बाबदेव असतोच. ह्या शहरांत मारुतीचीं देउळें फार असून त्यांचें उत्पन्नही पुष्कळ असतें. यांचे मालक बैरागी असतात. व मारुतीच्या भक्तिणी वारांगना व दुष्ट स्त्रिया फार असतात.

कोठें कोठें कथा पुराणें बारमाही चाललेलीं असतात. भुलेश्वर, काशीविश्वेश्वर, रामचंद्र ( रामवाडींत ), विठोबाचें देवालय, आत्माराम बावाचें ठाकूरद्वार, इत्यादि देवळांत नेहमी पुराणें चालत असतात. व कोठें कथाही होतात. श्रावण व भाद्रपद महिन्यांत कित्येक ठिकाणीं सप्ताह होतात. पूर्वीं चतुर्मासांत श्रीमान् परभू, शेणवी, सोनार व इतर लोक घरोघरीं भागवत, भारत, रामायण, व दुसरीं पुराणें वाचवीत, आणि पांच सहा महिन्यांत समाप्ति करून पुराणिकास चारशें पांचशें रुपये दक्षिणा देत. कित्येक पांडवप्रताप, हरिविजय, अश्वमेध, असे प्राकृत ग्रंथ वाचवीत. हल्लीं इंग्रजी विद्येचें माहात्म्य वाढल्यापासून तो प्रकार उत्तरोत्तर कमी होत चालला आहे. जे फार भावीक असतील तेच मात्र वाचवितात. वाणी, भाटये या लोकांत देखील फारशीं पुराणें वाचवीत नाहींत. पांच दहा वर्षामागें एक जन्मांध पुराणीक आला होता. त्यानें विठ्ठलवाडींत विठोबाच्या देवळांत भागवताचें पारायण केलें होतें. सगळें भागवत व रामायण याला तोंडपाठ येत होतें, असें सांगतात. कित्येक गुजराथी पांच पंचवीस हजार रुपये खर्च करून सप्ताह बसवितात.

देवालयें बांधणें हें चांगलें काम. कारण ज्यांला ईश्वराविषयीं कांहीं समजत नाहीं अशा अज्ञान्यांस ईश्वराची ओळख करून भक्तिमार्गास लावणें व त्यांचीं मनें सत्कर्माकडे वळविणें हा मनुष्याचा मुख्य धर्म आहे. परंतु ज्या ठिकाणीं पुष्कळ देउळें आहेत, त्याठिकाणीं उगीच लहान देउळें ज्यांत पुजाऱ्याचा देखील समावेश होत नाहीं, अशीं बांधून टाकण्यांत कांहीं फळ नाहीं. त्यांत कोणी डोकावून देखील पाहत नसतात. आणि ज्या कार्यासाठीं देउळ बांधावें तें कांहीं होत नाहीं, मग त्याचा काय उपयोग ? देऊळ बांधण्याचा मुख्य हेतु हाच आहे कीं, लोकांस ईश्वरप्राप्ति करून देणें व सन्मार्गास लावणें. दुसरें कांहीं नाहीं. तर अशीं देउळें बांधण्यानें लोकांस ईश्वरज्ञान होणें कठीण; द्रव्याची मात्र नासाडी होत्ये. त्यांत पुण्य आणि पुरुषार्थ दोन्ही नाहींत, व ज्या लोकांस देव धर्म कांहींच समजत नाहीं, व ज्या गांवांत देउळें नाहींत, तेथें देउळें बांधून लोकांस ईश्वरी मार्गाकडे वळविणें ह्यांत कांहीं तरी सार्थकाचें कृत्य होईल.

देवालयें ह्मटलीं ह्मणजे रम्य स्थळें असून त्यांत शें दोनशें लोकांचा तरी समावेश होई अशीं असावीं, जीं पाहतांच मनुष्यास भक्ति करण्याची इच्छा व्हावी.

श्रावक लोकांचे डेरे (मंदिरें) सात आहेत. त्यांत मारवाड्यांचे पांच आणि श्रावक वाणी लोकांचे दोन. हे डेरे बांधण्याची तऱ्हा कांहीं निराळीच असत्ये. यांचीं हीं मंदिरें आमच्या देवालयांहून भिन्न असून आंत तक्तपोशीस देखील आवडघोवड आरसे बसविलेले असतात. हे लोक व्यापारी असून देवभोळे असल्यामुळें देवांस पुष्कळ द्रव्य देतात. भेंडीबाजारांत घोरजीनाथाचा डेरा आहे, तो सर्व डेऱ्यांपेक्षां मोठा असून त्याचें भांडार सुमारें पंधरा लक्ष आहे, असें सांगतात. श्रावण महिन्यांत जेव्हां मारवाड्यांच्या सणाचे दिवस येतात, तेव्हां हे प्रत्येक दिवशीं मूर्त्तीवर जवाहिरांचे अलंकार घालून डेऱ्यांमध्यें अरास करितात. ह्या डेऱ्यांत बिलोरी सामानाची गर्दी फारच केलेली असत्ये. यांचें सर्व करणें मारवाडीशाई, त्यामध्यें कांहीं नाजूकपणा नसतो. मूर्त्तीवर अलंकार घालून शृंगारितात, त्यास आंगी चढविणें असें ह्मणतात. एक दिवस हिऱ्यांची, एक दिवस माणकांची, एक दिवस पाचीची, एक दिवस मोत्यांची, अशा दर दिवसास आंग्या चढवितात. आंगी चढविणें ह्मणजे मूर्त्तीच्या पायापासून मस्तकापर्यंत एकसारिखें जवाहीर घालणें किंवा गोंदानें अंगास जवाहीर चिकटविणें. आंगी चढविली ह्मणजे मूर्त्तीचे डोळे मात्र उघडे ठेवितात. घोरजीनाथावर हिऱ्याची आंगी चढवितात, ती सवा लक्षाची आहे असें सांगतात. या लोकांच्या भक्तीचा प्रकार फार विलक्षण असून दुसऱ्या हिंदुलोकांच्या प्रचाराहून केवळ भिन्न आहे. आंगी चढविण्याचा खर्च भागविण्यास अशी युक्ति करितात. पुजारी उभा राहून असें ह्मणतो. अमुक शेट, ही आंगी चढविण्याबद्दल दहा मण तूप देतो. मग जो जास्ती मण तूप देणारा असतो त्याच्या नांवाची ती आंगी असें ठरतें. मग जितके मण तूप देऊं केलें असेल, त्याचे दर मणास १२ रुपये प्रमाणें द्रव्य तेथें पोहोंचतें करावें. यांचें धर्मास देणें तें तुपावर ठरवितात. कोणी दोनशें मण, कोणी शंभर मण, तूप देवास देतो. ह्मणजे तितक्या मण तुपाचें द्रव्य भांडारांत दाखल करितो. जसें एकाद्या मालाचें लिलांव करून तो विकावा, त्याच प्रमाणें हा उत्साह विकीत असतात. सगळे लोक जमले ह्मणजे मूर्त्तीचा पुजारी उभा राहून असें ह्मणतो. “ मोतीशेटनी आंगी दस मण घी ” दुसरा ह्मणतो “ मारा पंदर मण, ” तिसरा ह्मणतो “ मारा तीस मण. ” शेवटीं जो जास्ती मण वाढवितो, त्याचें नांव चोपडीवर लिहितात. श्रावक लोकांचे सण आषाढ महिन्यापासून भाद्रपद शुद्ध पंचमीपर्यंत असतात. या दिवसांत ते उपोषण करितात. कित्येक यती एक, दोन, व तीन महिनेपर्यंत कांहीं खात नसतां उपोषण

करितात असें सांगतात. मग कोणी सधन व्यापारी त्यांचें तें पुण्य पांच पांच सहा सहा हजार रुपये देऊन विकत घेतो, व दुसरेही त्यांस सामर्थ्यानुसार द्रव्य देत असतात. साधारण महिना पंधरा दिवस उपोषण करणारा असतो, त्यास कित्येक मारवाडी लोक आपआपल्या घरीं जेवायास बोलावून आणून शें पन्नास रुपये देऊन त्याचें तें पुण्य विकत घेतात. व भाद्रपद महिन्यांत मोठा समारंभ करून उपोषण केलेल्या यतीची वरात काढितात. यतीलोकांत कित्येक मोठे सधन आहेत, व ते व्यापारही करितात.

श्रावण महिन्यांत सणांच्या दिवसांत मारवाडी लोक आपल्या अंगावरही जवाहीर व सोन्यारुप्याचे अलंकार घालितात. ह्या सणास पजुसण असें ह्मणतात. हा एकसारिखा आठ दिवस चालत असतो.

सन १८६२ त खेमचंद मोतीचंद याच्या डेऱ्यांत एका यतीनें एकसारिखें तीन महिने उपोषण केलें होतें, असें सांगतात. तो संध्याकाळच्या सुमारास एक पंचपात्रभर पाणी तापवून थंड करून पीत असे, व कोणी सांगतात कीं, तो किराइताचें पाणी पीत असे. आणि दुसऱ्या कोणत्याच अन्नास स्पर्श करीत नसे. हें कसें काय होत असे, ते समजत नाहीं. हा केवळ जरत्कारूसारिखा दिसे, आणि शेंकडो लोक त्याच्या दर्शनास जात असत. अन्नावांचून तीन महिनेपर्यंत मनुष्यें वांचतात कीं काय, हें अर्वाचीन वैद्यशास्त्रीय लोकांकडून समजून घेतल्याशिवाय या गोष्टीवर भरवसा ठेवायास संकोच वाटतो.

कामाठी लोकांचीं राउळें कामाठपुरांत ५ आहेत. दोन विठोबाचीं आणि तीन मारुतीचीं. हे लोक हिंदु असून त्यांच्या देवांस भजतात, परंतु त्यांमध्यें जखाई, जोखाय, पुतळाई, येलम्मा अशा विशेष देवी आहेत. हे लोक मद्रास जिल्ह्यांतून आलेले आहेत. हे एथें शें सवाशें वर्षांपासून येऊन राहूं लागले. यांची संख्या सुमारें पांच सहा हजार असून त्यांत आठ दहा निरनिराळया जाति आहेत. हे लोक बहुधा मजूरकाम करितात खरे, परंतु यांत सधनही बरेच असतात. यांच्या बायका फार उद्योगी व बळकट असून कधींकधीं पुरुषांपेक्षां अधिक द्रव्य कमावितात. चुना कुटण्याचें व घरें बांधण्याचें व मजूरकाम यांच्याशिवाय बहुधा होत नाहीं. स्त्रिया आणि पुरुष एकसारिखी मेहनत करून द्रव्य कमावितात.

मुसलमान, बोरी, खोजे, व मेमण यांच्या मशिदी ६९ आहेत. ह्यांखेरीज पिरांच्या कबरी व पंजे पुजण्याचीं ठिकाणें पन्नास पाउणशें आहेत.

मोगल लोकांसाठीं सन १८६२ मध्यें हाजी महंमद हुसेन या नांवाच्या एका श्रीमान् मोगलानें सुमारें एक लक्ष रुपये खर्चून बाबुल्याच्या तळयाजवळ एक मोठी मशीद बांधिली आहे. हिचें काम फार सुंदर आहे. हिच्या बाहेरच्या दरवाजाचें काम तर फारच सुरेख केलें आहे.

माहिमचे मशिदीसमोर मुगदम बावा व त्याची आई ह्या दोघांच्या एक-मेकांच्या शेजारीं कबरी आहेत. या कबरींची नित्य पूजा होते. व या ठिकाणीं फकीर लोक आहेत, त्यांचें हें एक वतनच आहे. या कबरीस कित्येक हिंदु व पारशी लोकहि भजतात. या पिराच्या नांवानें नवस घेतात. ह्याचा उरूस भरतो, तेव्हां दहा पंधरा दिवसपर्यंत याच्या कबरीवरील सबजा खडत नसतो. भोळ्या लोकांची यावर फार भक्ति बसली आहे.

याचा वृत्तांत असा ऐकण्यांत आला. हा भोळे लोक तर धर्मशास्त्राप्रमाणें खरा मानितात. परंतु यांत सत्य मिथ्या किती आहे, हें तपासून यांतील रहस्य ग्रहण करणें हल्लींच्या विद्वान् लोकांकडे आहे. परंपरागत चालत आलेल्या गोष्टीवर भरवसा कितपत ठेविला पाहिजे, हें सांप्रतच्या काळांतील दहा बारा वर्षांच्या विद्यार्थ्यास देखील सांगणें नलगे. पूर्वीच्या काळांतील कित्येक लोकांचा देवभोळेपणा दाखविण्यासाठीं कोठेंकोठें अशा गोष्टी लिहिणें पडतें. परंतु वाच-णारांनीं सारासार विचार करून आपल्या ज्ञानाचा उपयोग यथास्थळीं केला पाहिजे. नाहीं तर सगळे भुस्के लाडूच.

कांहीं वर्षांमागें माहिमास एक मुसलमान राहत होता. त्यास मुगदम हा मुलगा झाला. त्याचा बाप लहानपणींच मरण पावला. तेव्हां मुगदम आणि त्याची आई हीं जिकडून तिकडून आपला निर्वाह करीत. मुलाची आईवर प्रीति असून तिच्या भक्तींत तो तत्पर असे. एके समयीं असें झालें कीं, आई आणि मुलगा जवळच निजलेलीं असतां मध्यरात्रीच्या सुमारास निद्रित असतांना आईनें मुगदमास हाक मारून पाणी पियास दे, असें सांगितलें. तें ऐकतांच हा उठून लोटींत पाणी घेऊन आईच्या बिछान्याजवळ जाऊन उभा राहिला. परंतु आई निजेंत होती, सबब तिला पाणी पिण्याचें भान राहिलें नाहीं. ती सकाळीं जागी झाली आणि पाहते, तों मुगदम पाण्याची लोटी हातीं

घेऊन उभा आहे. अशी त्याची मातृभक्तीवर श्रद्धा पाहून आई गहिं-वरली. आणि त्याच वेळीं ईश्वराचा स्तव करून आपल्या मुलावर तुझा आशीर्वाद असावा, अशी प्रार्थना केली. तेव्हांपासून हीं मायलेंकरें ईश्वर-भक्तींत फारच तत्पर असल्यामुळें त्यांजवर ईश्वरी प्रसाद झाला. पुढें मुगदम-बावाची प्रख्याति होऊं लागली. व तो अनेक चमत्कार करूं लागला ! कोणास मुलें देऊं लागला, कोणास दुखण्यांतून उठवूं लागला ! याविषयीं दुसरें असें सांगतात कीं, हा प्रत्यहीं मक्केस जाऊन येत असे ! याच्या अद्भुत कृत्यांतून एक कृत्य याच्या भक्तानें सांगितलें, तें असें आहे. हा एके वेळीं पहांटेस उठून तळ्यावर गेला, आणि तळ्यांतील पाणी ओंजळी भरून बाहेर टाकीत सुटला. तें पाहून लोकांस आश्चर्य वाटलें. आणि असें काय करितोस, ह्मणून विचारिलें असतां त्यानें त्यांस उत्तर दिलें कीं, मक्केस आग लागली आहे, ती विझवितों. त्यांस हें खोटें वाटलें, आणि ह्मणाले कीं, यास वेड लागलें असेल. परंतु त्याची प्रचीत पहावी, ह्मणून एथील कित्येक सावकारांनीं पत्रें लिहून मक्केस पाठविलीं. मग तेथून उत्तर आलें कीं, त्यादिवशीं त्यावेळीं तेथें आग लागली होती. हें जेव्हां उत्तर आलें, तेव्हां लोकांची खातरी झाली. आणि तेव्हांपासून ते त्यास भजूं लागले. असे त्यानें पुष्कळ चमत्कार केले ! परंतु हा केव्हां जन्मला व ह्यानें हे चमत्कार केव्हां केले, याचा शक व मिती कांहीं सांपडत नाहीं.

हपसाणांतील हपशी यास पूर्वींपासून भजतो. व अद्याप उरुसाच्या दिवशीं कांहीं द्रव्य व कबरेवर घालायास वस्त्रें पाठवितो. असें सांगतात कीं, पूर्वीं तो प्रतिवर्षीं एक किनखापाचा ताका याच्या कबरेवर टाकायास पाठवीत असे, व उरुसाच्या दिवशीं आपण स्वतः येऊन वाद्यगाद्यानिशीं हिजवर सब्ज़ा घाली.

## मुंबईंत व आसपास पीर आहेत त्यांचीं नांवें व ठिकाणें.

| | | | |
|---|---|---|---|
| सय्यद बद्रुद्दीन हुसेनी. | पेण. | सय्यद निजाम उद्दीन. | तुरुंगाजवळ. |
| करमअल्ली शा व हाजी अब्दुल रहमान साहेब. | पनवेल. | सय्यद ब द्दीन रफाई. | भेंडीबाजार. |
| | | मदार छिल्ली. | नळाचा बाजार. |
| शेख इस्माइल गजाअल्ली. गैबी पीर. | मोठा कुलाबा. बाजार. | सय्यद जैनल अबुद्दीन रफाई. | खारें तळें. |
| शेख हसन गजा अल्ली. गैबी पीर. | धाकटा कुलाबा. कांपाचें मैदान. | मस्तानशा और सय्यद अब्दुल्ला साहेब. | खारें तळें. |

| | | | |
|---|---|---|---|
| बिस्मिल्लाशा. | कांपाचें मैदान. | जोमेशा. | डंकनरोड. |
| सय्यद अब्दुल्ला साहेब. | कित्ता. | गुलाबशा. | रुपापाड. |
| सय्यद अल्ली मस्तान. | लैन. | शेख बरी साहेब. | चिंचपोकळी. |
| मुल्ला फक्रुद्दीन. | मरीन पलटण. | शेख तल्याणी साहेब. | कित्ता. |
| सय्यद हुसेन अंद्रुस. | सात ताड. | शेख मिस्री साहेब. | माटुंगें. |
| गैब्री पीर. | आगगाडीचें ठाणें. | पक्त्रा अल्ली मखदूम साहेब. | माहीम. |
| शेख हाजी मोमेन | जुमामशिदीजवळ | | |
| वली युल्ला. | हनुमानगल्ली. | पुपलीर साहेब. | ठाणें. |
| आशोकशा. | डोंगरीवर. | गैब्री पीर. | ठाणें. |
| सरहंग सय्यद हिसा-मुद्दीन-रफाई. | महालक्ष्मी. | दिवाण साहेब. | भिंवडी. |
| | | हाजी अल्ली साहेब. | महालक्ष्मीच्या खालीं. |
| सरहंगमदारछिल्ली. | कित्ता. | मामाहजानी. | वरळीच्या बाजूस. |
| सय्यद मोयदीन घोगारी. | तुरुंगाजवळ. | जंगली पीर. | वरळीच्या डोंगरावर. |
| सय्यद मोयदीन बसरावी. | कित्ता. | | |

मुसलमानांची जुमामशीद मार्किटांत आहे, ती सर्व मशिदींत मोठी. हीं पूर्वीं कांपाच्या मैदानांत होती, ती मोडून एथें बांधिली.

बेनी इस्राएल लोकांचा मुळचा देश अरबस्थान. तेथील राजाच्या जुलुमामुळें इसवी सनाच्या सहाव्या शतकांत ह्मणजे सुमारें बाराशें वर्षांमागें त्यांस अरबस्थान सोडून भरतखंडाकडे येणें भाग पडलें, असें अनुमान होतें. ते दोन जहाजांत बसून निघाले. त्यांपैकीं एक जाऊन कोचीस लागलें. मग त्याजवरील लोक तेथें उतरून वस्ती केली. दुसरें अलिबागेजवळ आलें, तें नवगांव एथें खडकास आपटून फुटलें; तेणेंकरून त्यांतील पुष्कळ लोक जायां झाले. बाकीचे राहिले होते, ते आसपास जाऊन राहिले. जे मुडदे किनाऱ्यास लागले होते, ते जमा करून एक मोठी कबर खणून त्या सर्वांस एकाच कबरींत गाडले. त्यांची कबर अद्याप नवगांव एथें आहे.

बेनी इस्राएल लोकांचे चेहरे, रंग, व पोशाक, अरब लोकांसारिखाच असतो. या देशांत पुष्कळ वर्षें वस्ती झाल्यामुळें ते हिंदुलोकांसारिखा पोशाक करूं लागले, व त्यांच्या कांहीं चाली त्यांणीं ग्रहण केल्या. ह्या लोकांत जातिभेद नाहीं, परंतु ज्यांनीं पूर्वीं अन्य जातींतील स्त्रियांशीं संबंध केला, व जे दुसऱ्या धर्मांतून त्यांच्या धर्मांत आले, त्यांशीं मात्र ते भेद ठेवितात. तो इतकाच कीं, त्यांशीं

घेऊन उभा आहे. अशी त्याची मातृभक्तीवर श्रद्धा पाहून आई गहिंवरली. आणि त्याच वेळीं ईश्वराचा स्तव करून आपल्या मुलावर तुझा आशीर्वाद असावा, अशी प्रार्थना केली. तेव्हांपासून हीं मायलेंकरें ईश्वरभक्तींत फारच तत्पर असल्यामुळें त्यांजवर ईश्वरी प्रसाद झाला. पुढें मुगदमबावाची प्रख्याति होऊं लागली. व तो अनेक चमत्कार करूं लागला ! कोणास मुलें देऊं लागला, कोणास दुखण्यांतून उठवूं लागला ! याविषयीं दुसरें असें सांगतात कीं, हा प्रत्यहीं मक्केस जाऊन येत असे ! याच्या अद्भुत कृत्यांतून एक कृत्य याच्या भक्तानें सांगितलें, तें असें आहे. हा एके वेळीं पहांटेस उठून तळ्यावर गेला, आणि तळ्यांतील पाणी ओंजळी भरून बाहेर टाकीत सुटला. तें पाहून लोकांस आश्चर्य वाटलें. आणि असें काय करितोस, ह्मणून विचारिलें असतां त्यानें त्यांस उत्तर दिलें कीं, मक्केस आग लागली आहे, ती विझवितों. त्यांस हें खोटें वाटलें, आणि ह्मणाले कीं, यास वेड लागलें असेल. परंतु त्याची प्रचीत पहावी, ह्मणून एथील कित्येक सावकारांनीं पत्रें लिहून मक्केस पाठविलीं. मग तेथून उत्तर आलें कीं, त्यादिवशीं त्यावेळीं तेथें आग लागली होती. हें जेव्हां उत्तर आलें, तेव्हां लोकांची खातरी झाली. आणि तेव्हांपासून ते त्यास भजूं लागले. असे त्यानें पुष्कळ चमत्कार केले ! परंतु हा केव्हां जन्मला व ह्यानें हे चमत्कार केव्हां केले, याचा शक व मिती कांहीं सांपडत नाहीं.

हपसाणांतील हपशी यास पूर्वींपासून भजतो. व अद्याप उरुसाच्या दिवशीं कांहीं द्रव्य व कबरेवर घालायास वस्त्रें पाठवितो. असें सांगतात कीं, पूर्वीं तो प्रतिवर्षीं एक किनखापाचा ताका याच्या कबरेवर टाकायास पाठवीत असे, व उरुसाच्या दिवशीं आपण स्वतः येऊन वाद्यगाद्यानिशीं हिजवर सबज़ा घाली.

## मुंबईंत व आसपास पीर आहेत त्यांचीं नांवें व ठिकाणें.

| | | | |
|---|---|---|---|
| सय्यद बद्रुद्दीन हुसेनी. | पेण. | सय्यद निजाम उद्दीन. | तुरुंगाजवळ. |
| करमअल्ली शा व हाजी अब्दुल रहमान साहेब. | पनवेल. | सय्यद ब द्दीन रफाई. | भेंडीबाजार. |
| | | मदार छिल्ली. | नळाचा बाजार. |
| शेख इस्माइल गजाअल्ली. गैबी पीर. | मोठा कुलाबा. बाजार. | सय्यद जैनल अबुद्दीन रफाई. | खारें तळें. |
| शेख हसन गजा अल्ली. गैबी पीर. | धाकटा कुलाबा. कांपाचें मैदान. | मस्तानशा और सय्यद अब्दुल्ला साहेब. | खारें तळें. |

| | | | |
|---|---|---|---|
| बिस्मिल्लाशा. | कांपाचें मैदान. | जोमेशा. | डंकनरोड. |
| सय्यद अब्दुल्ला साहेब. | कित्ता. | गुलाबशा. | रुपापाड. |
| सय्यद अल्ली मस्तान. | लैन. | शेख बरी साहेब. | चिंचपोकळी. |
| मुल्ला फक्रुद्दीन. | मरीन पलटण. | शेख तल्याणी साहेब. | कित्ता. |
| सय्यद हुसेन अंद्रुस. | सात ताड. | शेख मिस्त्री साहेब. | माटुंगें. |
| गैबी पीर. | आगगाडीचें ठाणें. | पकबा अल्ली मखदूम साहेब. | माहीम. |
| शेख हाजी मोमेन | जुमामशिदीजवळ | | |
| वली मुल्ला. | हनुमानगल्ली. | पुपलीर साहेब. | ठाणें. |
| आशोकशा. | डोंगरीवर. | गैबी पीर. | ठाणें. |
| सरहंग सय्यद हिसा-मुद्दीन-रफाई. | महालक्ष्मी. | दिवाण साहेब. | भिंवडी. |
| | | हाजी अल्ली साहेब. | महालक्ष्मीच्या खालीं. |
| सरहंगमदारछिल्ली. | कित्ता. | मामाहजानी. | वरळीच्या बाजूस. |
| सय्यद मोयदीन घोगारी. | तुरुंगाजवळ. | जंगली पीर. | वरळीच्या डोंगरावर. |
| सय्यद मोयदीन बसरावी. | कित्ता. | | |

मुसलमानांची जुमामशीद मार्किटांत आहे, ती सर्व मशिदींत मोठी. हीं पूर्वीं कांपाच्या मैदानांत होती, ती मोडून एथें बांधिली.

बेनी इस्राएल लोकांचा मुळचा देश अरबस्थान. तेथील राजाच्या जुलुमामुळें इसवी सनाच्या सहाव्या शतकांत ह्मणजे सुमारें बाराशें वर्षांमागें त्यांस अरबस्थान सोडून भरतखंडाकडे येणें भाग पडलें, असें अनुमान होतें. ते दोन जहाजांत बसून निघाले. त्यांपैकीं एक जाऊन कोचीस लागलें. मग त्याजवरील लोक तेथें उतरून वस्ती केली. दुसरें अलिबागेजवळ आलें, तें नवगांव एथें खडकास आपटून फुटलें. तेणेंकरून त्यांतील पुष्कळ लोक जायां झाले. बाकीचे राहिले होते, ते आसपास जाऊन राहिले. जे मुडदे किनाऱ्यास लागले होते, ते जमा करून एक मोठी कबर खणून त्या सर्वांस एकाच कबरींत गाडले. त्यांची कबर अद्याप नवगांव एथें आहे.

बेनी इस्राएल लोकांचे चेहरे, रंग, व पोशाक, अरब लोकांसारिखाच असतो. या देशांत पुष्कळ वर्षें वस्ती झाल्यामुळें ते हिंदुलोकांसारिखा पोशाक करूं लागले, व त्यांच्या कांहीं चाली त्यांणीं ग्रहण केल्या. ह्या लोकांत जातिभेद नाहीं, परंतु ज्यांनीं पूर्वीं अन्य जातींतील स्त्रियांशीं संबंध केला, व जे दुसऱ्या धर्मांतून त्यांच्या धर्मांत आले, त्यांशीं मात्र ते भेद ठेवितात. तो इतकाच कीं, त्यांशीं

लग्नव्यवहार करीत नाहींत, व त्यांजबरोबर एका ताटांत बसून जेवीत नाहींत. ह्या लोकांस ते काळे इस्राएल असें ह्मणतात.

यहुदी आणि बेनी इस्राएल हे एकच आहेत. त्यांच्या रीतिभाती, प्रार्थना, ईश्वरभक्ति, आचार विचार, नेमनिष्ठा व धर्मप्रकरणींचे संप्रदाय सर्व एकच आहेत. परंतु हे पुष्कळ वर्षांपासून या देशांत राहिले, सबब ह्यांचा रंग, भाषा व वेष बदलला. त्यांस दोन निराळीं नांवें पडण्याचें कारण असें सांगतात. पूर्वीं जेव्हां त्यांचें राज्य होतें, तेव्हां त्यांमध्यें कोणी दुष्ट राजा झाला; त्याच्या जुलमामुळें त्यांमध्यें दुफळी पडली. त्यावेळीं एक पक्ष आपणास इस्राएल आणि एक पक्ष यहुदी ह्मणूं लागला. इतक्यावरूनच दोन नांवें पडलीं. या पूर्वीं सर्वांस इस्राएल असेंच नांव होतें.

बेनी इस्राएल लोकांची वस्ती कोचींत व कोकणपट्टींत भिंवडीपासून हरणई पर्यंत; ह्या शिवाय दुसऱ्या ठिकाणीं ते लोक सांपडायाचे नाहींत. आतां रोजगाराच्या नात्यानें ते सर्व भरतखंडभर पसरले आहेत.

या लोकांच्या मशिदी दोन आहेत, व यहुदी लोकांची एक आहे. ह्यांच्या सिनेगागांत मूर्त्ति नसतात. मूर्त्तिपूजनाचा यांच्या शास्त्रांत फार निषेध आहे. ह्यांत मुलांची सुंता करितात. मशिदींत पुरातन यहुदी भाषेंत लिहिलेलें धर्मशास्त्र आहे, तें शनिवारीं जमात भरत्ये त्या वेळीं वाचतात, व देवाची प्रार्थना करितात. दर शनिवारीं हे मंडळीगृहांत जमतात. शनिवार हा त्यांचा विश्रामवार आहे ह्या दिवशीं ईश्वरप्रार्थनेशिवाय दुसरें काम करूं नये, असें यांचें शास्त्र आहे. ह्यांच्या मशिदीस सिनेगाग ह्मणतात.

मुंबईंतील इस्राएल लोक मूलस्थायिक अष्टागर, भिंवडी, पेण, हपसाण, रोह्यां अष्टमी, दांडेराजपूर, हरणई इतक्या ठिकाणचे. यांचे कांहीं लोक आंग्र्याच्या दरबारांत लश्करी खात्यांत होते. हे पूर्वीं तेलाचा व्यापार करीत, ह्मणून आमचे लोक यांला शनिवारतेली ह्मणत. ह्या शिवाय ते पिद्रेलाचें, कड्याचें व सुताराचें काम करीत. कोंकणांत ते शेतीभाती करून राहत. तेथें त्यांच्या वतन वाड्या असून ते खाऊन पिऊन सुखी आहेत.

ह्या लोकांचें या बेटांत येणें सुमारें सन १७५०त झालें, असें कांहीं आधारावरून अनुमान होतें. हे एथें येऊन कंपनी सरकारच्या लश्करी खात्यांत शिरले. प्रथम यांचे दोन चार पुरुष आले होते. ह्यांनीं शिपायाच्या कामांत

हुशारी दाखविल्यामुळें एथें त्यांचा बराच लौकिक झाला. मग हळूहळू दुसरी मंडळी कुटुंबासुद्धां येऊन राहूं लागली, व पलटणींतच चाकरी धरूं लागले. ज्यांचे पूर्वज इंग्रजाबरोबर टिपूवर लढाई करायास गेले होते, त्यांचे नातू, पणतू व वंशज एथें बरेच आहेत. ह्यांनीं शिपाई कामांत आपलें शौर्य, हुशारी व प्रामाणिकपणा बराच दाखविला. यांतील कित्येक कम्यांडंट, मेजर सुभेदार, सुभेदार, नाईक, हवालदार, असे झाले. ह्यांनीं पलटणींत आजपर्यंत दंगा फितुरी कांहीं केली नाहीं, सबब इंग्रजांचा त्यांजवर विश्वास बसला. हल्लीं हे व्यापार करितात, इंग्रजी शिकून हपिसांत चाकरी करितात, व पंतोजीचें कामही करितात. ह्यांमध्यें विद्येचा प्रसर होत चालला आहे. ह्यांत कित्येक ड्राफ्ट्स मेन् ( नकाशे काढणारे ) व सर्व्हे-अरचें काम करणारे आहेत. चीफ इंजनेरच्या हपिसांत बनाजी भावजी घोसाळ-कर या नांवाचे इस्राएल आहेत, ते हेड ड्राफ्ट्सन् असून त्यांस १०० रुपये दरमहा मिळतो. हे ह्या कामांत फार हुशार, व मोठे गुणी आहेत. अब्राहाम दाविद्जी हे सद्यः अहंमदनगर एथें पोलीस कोर यावर नेटीव्ह कम्यांडंट आहेत.

हे लोक आल्यापासून मांडवी, चिंचबंदर व डोंगरी इतक्या ठिकाणीं राह-तात. हे राहतात त्या मांडवीच्या भागास इस्राएल मोल्ला ह्मणतात. एथें या लोकां-पैकीं कित्येकांच्या मोठमोठाल्या हवेल्या असून ते सधन आहेत.

ह्या लोकांची पुरातन मशीद मांडवीवर इस्राएल मोल्ल्यांत आहे. ही सन १७९६ त मयत अजम सामाजी हासाजी दिवेकर यांनीं बांधिली होती. ही बांध-ण्यास पुढील कारण झालें, असें ह्मणतात. हे गृहस्थ पूर्वीं टिपूबरोबर इंग्रजांच्या तरफेनें लढत असतां त्यानें त्यांस कैद करून नेलें. तेव्हां त्यांनीं देवास असा नवस केला कीं, त्याच्या हातांतून सुटून मी परत मुंबईस सुखरूपपणें गेलों, तर मशीद बांधीन. त्या प्रमाणें त्यांनीं ही बांधिली. मशिदीवर असा लेख आहेः—

" ही मशीद पहिल्यानें अजम सामाजी हासाजी दिवेकर यांहीं १७१८ या वर्षीं बांधिली. परंतु ती मशीद लहान होती ह्मणून मशिदीचे पैक्यांतून पुनः बांधून तिचा संस्कार चैत्र शुद्ध २ शके १७८२ शनवार रोजीं झाला."

मुंबईत पारशी लोकांच्या अग्यार्‍या १९ आहेत. यांच्या देवालयास अग्यारी ( अग्निस्थान ) असें ह्मणतात. परंतु यांत ही आदर्यान आणि आतस बेहेराम असे दोन प्रकार आहेत. आदर्यान हें साधारण अग्निस्थान असून त्यांत पन्नास साठ जातींच्या संस्कारित अग्नीची स्थापना केलेली असत्ये, आतस बेहेराम यांत

१००१ जातींचा अग्नि सिद्ध करावा पडतो. व तो देशोदेशांतून आणतात. यास पुष्कळ द्रव्याचा खर्च होतो. मुंबईत प्रथम संवत १८३८ ह्मणजे सन १७८१ त दादीशेट नांवाच्या पारशी गृहस्थानें आतस बेहेरामाची स्थापना केली. हा नवेवाडी नजीक आहे. आणि त्या रस्त्यास अग्यारीचा रस्ता असें ह्मणतात. दुसरा हुर्मसजी वाड्या यानें चंदनवाडी नजीक स्थापन केला आहे. हा स्थापून आज ३२ वर्षें झालीं. तिसरा फ्रामजी कावसजी यांनीं गिरगांवच्या रस्त्यावर समुद्रकिनाऱ्यावर स्थापिला आहे. हें मोठें विस्तीर्ण व रम्य स्थळ आहे. हें बांधून सतरा वर्षें झालीं. पारशी लोक स्वजातीशिवाय दुसऱ्या लोकांस अग्यारींत जाऊं देत नाहींत.

ह्या शहरांत कांहींना कांहींतरी आठ पंधरा दिवसांनीं सणवार असतोच. आज कोठें पारशांचे डोसले, आज कोठें पपेटी; आज कोठें परब; आज कोठें गंबार; आज कोठें मुसलमान लोकांची बकरईद; आज कोठें मोगलांचा मोहरम; आज कोठें यहुदीलोकांचा पुरीम; आज कोठें वलांडन; आज कोठें हिंदुलोकांची गोकुलअष्टमी; आज कोठें पिठोरी; आज कोठें मुका पाडवा; आज कोठें आजे पाडवा; आज कोठें गुजराथ्यांचा तेवार; आज कोठें वाणी लोकांची गोवाळी अग्यारस; आज कोठें रांधण सट; आज कोठें शिळी सातम; आज कोठें पोर्टुगीझ् लोकांचा इंत्रूज; आज कोठें मारवाड्यांचा पजुसण; आज कोठें भटांच्या हरितालिका; आज कोठें गणपति; आज कोठें कोळ्यांच्या गौरी; आज कोठें दिपवाळी; आज कोठें दसरा; आज कोठें गाडीवाल्यांचा पोळा; आज कोठें शिंप्यांचा शिराळशेट; आज कोठें दीपोत्सव; आज कोठें कोजागरी; आज कोठें वांद्रेचे भगत; आज कोठें महालक्ष्मीचें हवन; आज कोठें रथसप्तमी; आज कोठें तिलसंक्रांत; आज कोठें इंग्रज लोकांचा क्रिस्टमस. ह्या प्रमाणें ह्मटल्या दिवशीं कांहींना कांहीं तरी आमच्या लोकांस कालक्षेप करावयास व द्रव्य उधळावयास सांपडतें.

सन १८५८ त भाद्रपद वद्य ६ ह्या दिवशीं कपिलाषष्ठीचें महापर्व आलें होतें. ह्या दिवशीं मुंबई शहरांत जसा उत्साह झाला, तसा भरतखंडांत दुसऱ्या ठिकाणीं कोठेंच झाला नसेल. कपिलाषष्ठीचा योग साठ वर्षांनीं येतो असा नियम आहे. परंतु ह्या खेपेस हा अठ्ठावीस वर्षांनीं आला. हा पर्वकाळ सुमारें संध्याकाळच्या तीन तासांवर लागला होता, ह्मणून शहरांतील बहुतेक हिंदु लोक

संध्याकाळपर्यंत उपोषित राहिले होते. ह्या पर्वणीचा उत्साह सर्व जातीच्या हिंदूमध्यें एक सारिखा दिसून आला. सरकारी व सावकारी कारखान्यांतील सर्व हिंदु कामगार लोकांस सुटी मिळाली होती. वाणी, भाटचे, व दुसरे शेट सावकार यांनीं ह्या दिवशीं आपआपलें काम बंद पाडून हा दिवस केवळ दान धर्म, जप तप, संध्या व अनुष्ठान करण्यासाठीं मोकळा ठेविला होता. शेंकडो भिकारी व भिक्षुक ब्राह्मण समुद्रकांठीं व वालुकेश्वरी जाऊन सकाळचे प्रहरीं ठाणें देऊन बसले होते. तीन वाजायाच्या सुमारास लोक स्नानास निघाले. आठ पंधरा दिवसांपासून समुद्रस्नान करण्यासाठीं गांवोगांवाहून कित्येक लोक एथें आले होते. कांपाच्या मैदानापासून चौपाटीपर्यंत सर्व समुद्रकिनारा इतका भरून गेला होता कीं, लोकांच्या गर्दीमुळें कोणास कोण ओळखायास सांपडत नसत. वालुकेश्वरीं लोक जमले होते, त्यांची तर संख्याच नाहीं. ह्या दिवशीं लोकांच्या गर्दींत चेंगरून वालुकेश्वरीं तीन चार मनुष्यें ठार मेलीं, इतकी लोकांची दाटी होऊन गेली. तशीच रस्तोरस्तीं लोकांची बेसुमार गर्दी होऊन गेली होती. कोणी गाई, कोणी फळांच्या टोपल्या, कोणी धान्याच्या मोटी, व रुपयांच्या थैल्या घेऊन समुद्रावर जातानां दृष्टीस पडत. मग स्नान करून समुद्रकांठीं गाई, सोनें, रुपें, धान्य, भूमि वगैरे ब्राह्मणांस देऊन व दक्षिणा वांटून घरीं आले. घरीं आल्यानंतरही त्यांनीं पुष्कळ धर्म केला. कोणास अन्नदान, कोणास सुवर्णदान, कोणास दीपदान, कोणास गोप्रदान, कोणास गृहदान, अशीं दानें दिलीं. असा एक दोन तासांत सुमारें दोन लक्ष रुपयांचा धर्म ह्या मुंबई बेटांत झाला असेल. एका वाण्यानें एक तीन मजली घर त्यांत कुटुंबांतील दहा मनुष्यांचा वर्ष दोन वर्षें निर्वाह होई, इतकी सामग्री भरून ब्राह्मणास दान दिलें. त्यांत भांडीं कुंडीं, दाणा दुणा, भरण्या, पलंग, पासोडा, दुभती गाई, वगैरे सर्व सामान भरलें होतें. ह्या प्रमाणें लोकांनीं धर्म केला. ह्या दिवशीं गरीब निराश्रित ब्राह्मणास देखील दहावीस रुपये मिळाले. श्रीमान् लोकांचे आश्रित होते त्यांस हजार, कोणास चारशें, कोणास पांचशें, असें द्रव्य मिळालें.

मुलांस देवी आल्या असतां त्यां प्रीत्यर्थ एथें काळाचा व द्रव्याचा जो नाश होतो, तो पाहून प्राकृत लोकांस देखील खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं. एकादा नवसासच दोनशें चारशें रुपये खर्चितो. देवी आल्या ह्मणजे त्या मुलास झोंपाळ्यावर निजवून गाणीं ह्मणतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

देवीचीं गाणीं बहुतकरून हिंदुलोकांच्या प्रपंचांतील सर्व व्यवहारासंबंधी व शहरांतील सर्व विषयांवर आहेत. हीं गाणीं मुली व बायका आपल्या मनास येईल त्या प्रमाणें रचीत असतात; यांत कांहीं अर्थ नसतो. परंतु करमणुकीसाठीं एक मासला एथें उतरून घेतला आहे.

## मुंबईचें वर्णन

मुंबईशहराची हवा बाया निघाल्या पाहावया. ।। मुंबई शहराला ग बयानो रसते फार. ।। बाजुला ग दिसती मोठीं मोठीं घरें ।। घराला काम नकशीदार ।। घराला रंग तरेतरेचे ।। रंगांमध्यें रंग ग बयानो निळा जंगाल ।। मुंबई शहर ग आहे फार ।। कोणी एक गाड्यांत बसती ।। कोणी एक घोड्यावर बसती ।। घोड्यांला मखमाली जीन ।। उंच नीच टोप्या ग बायांच्या ।। बायांचे टोपीवाले बसती ।। मुंबई शहराला ग तीन बाजार ।। सकाळचे पारीं ग भायखळयावर विकरा ।। फुलें परोपरी फळें नानापरी ।। फळांमध्यें फळ बायानो मोहाचा नारोळ ।। मार्किट बाजार ग बायानो भरतो भरभरां ।। फळें परोपरी ग बायानो नानापरी ।। फुलांमध्यें फुल विलायती चांफा ।। चिऱ्याचा बाजार भरतो भरभरां ।। बायानो माळी येती न दारा ।। मुंबई शहराला ग बायानो दोन दरबारें ।। टांकसाळ आणि टौनहाल ।। टांकसाळीमध्यें नाणें होतें तयार ।। तेथें नोटीचा व्यापार ।। बाया सांठविता न जवाहीर ।। मुंबई शहराला ग बायानो सात बंदरें ।।

बोरीबंदर, ।। चिंचबंदर, ।। कोळसेबंदर, ।। उरणबंदर, ।। माहीमबंदर, ।। भायखळाबंदर, ।। आणि सातवा भाऊचा धक्का. ।।

कानोबाचे मठ. मुंबईत जागोजागीं हे मठ आहेत. ह्यांची संख्या सर्व शहरांत मिळून पन्नास साठ आहे. ह्या मठांचे धनी सोनार, शिंपी, भंडारी व शूद्र लोक असतात. ब्राह्मण लोकांचे मठ कोठें अढळत नाहींत. मठांचे अधिकारी साधारण लोकांसारिखे काम धंदा करितात, आणि हाही रोजगार चालवीत असतात. कानोबाचे मठ ह्मणजे देवालयांसारिखे बांधलेले नसतात. साधीं घरें, झोंपड्या व चाळींतील एकादी कोठडी ज्या ठिकाणीं कानोबाचा पुजारी राहतो, त्यासच मठ असी संज्ञा आहे. ह्या पुजाऱ्यास भगत ( भक्त ) असें ह्मणतात. ह्या मठांत लहान मोठें जसें ज्याचें उत्पन्न असेल तसें एक मखर असतें. त्यांत कानोबाची मूर्त्ति व फकिराकडून मिळवलेली पिरांच्या मंत्रानें भरलेली मोठी ताईत अथवा पंजा असतो. हिंदूंच्या बालकृष्णाची मूर्त्ति आणि मुसलमानांच्या

पिरांचा पंजा मिळून हिंदूंचा एक विजातीय कानोबा देव झाला आहे. ह्या कानोबाचें मूळस्थान पैठण, व हा धर्मस्थापक सय्यद सादत आहे, असें याचे भक्त सांगतात. कानोबास स्त्रिया फार भजतात. कानोबाच्या भगताचे पुष्कळ शिष्य असतात. यांच्या अंगांत अवसर येतो. ह्यास कानोबाचें वारें ह्मणतात. हीं वारीं येण्यास पुष्कळ खटपट करावी लागते, व पिशवीचें तोंडही सोडावें पडतें. द्रव्य दिल्यावांचून कानोबा एकाएकीं कोणाच्या अंगांत शिरत नसतो.

कानोबा हा कोणी मुसलमान आहे किंवा हिंदु आहे याचा अजून बराबर निर्णय होत नाहीं. हे लोक असें सांगतात कीं, राम आणि रहीम हे दोनही एकच आहेत. हिंदुधर्म आणि मुसलमानी धर्म हे दोघे बंधू आहेत. त्यांत मुसलमानी धर्म हा वडील आणि हिंदुधर्म हा धाकटा भाऊ आहे. असें सांगून ते ह्या मठांत बहुतकरून मुसलमानी रिवाजाची पूजा करितात. देवापुढें ऊद जाळितात, त्यावर सबजा वाहतात, जिकडेतिकडे अबीर फेकितात, मुसलमानी भाषा बोलतात, व कलिमा पढताते. "ए अल्ला बिसमिल्ला" असे अनेक यवनी शब्द बोलतात. कधींकधीं कानोबाची पूजा करायास फकिराची गरज लागत्ये. एखाद्या समयीं हिंदुधर्माची निर्भर्त्सना करितात, व त्यास दूषणें देतात. व फकिरांस धर्म करायास सांगतात.

कानोबाचा उत्साह श्रावणमहिन्यांत जन्माष्टमी आणि गोकुलाष्टमी ह्या दोन दिवसांत होतो. ह्याचे भक्त असें सांगतात कीं, सुमारें अकराशें वर्षांमागें सैयद सादत ह्मणून एक मुसलमान फकीर पैठणामध्यें मोठा विष्णुभक्त होऊन गेला, त्यानें हे दोन धर्म मिश्र केले. ह्यामध्यें मुसलमान धर्माचें माहात्म्य विशेष असतें. ज्यावेळीं मुसलमान हिंदुधर्म मोडायास पाहत होते, त्यावेळीं त्यांच्या भयानें हिंदूंनीं हिंदूमुसलमान मिश्रित हा धर्म तयार केला असावा, असें वाटतें. हिंदू आणि मुसलमान धर्मांत इतका भेद आहे कीं, मुसलमानांचे मशिदींत हिंदूनें उभें देखील राहूं नये, असें असतां जन्माष्टमीच्या दिवशीं उपोषण करून मुसलमानांच्या कुराणांतील प्रार्थना वाचून हे लोक कृतकृत्य मानितात! कानोबाची मूळपीठिका कशी काय आहे, ती पक्की समजत नाहीं. कोणी सांगतात कीं कानोबा हा कृष्णच, कोणी सांगतात कीं, कानोबा हा कृष्णाचा संवगडी होता, व तो त्याचा परमभक्त असे.

गणपतीचा उत्साह ह्या शहरांत दहा दिवसपर्यंत एक सारखा मोठ्या कडाक्यानें चालतो. कित्येक गृहस्थ वर्ष सहा महिने खपून गणपति स्वतः तयार करितात. हा मातीचा असतो खरा, परंतु ह्यांत कुशळतेचें काम असून शें दोनशें रुपये यास खर्च करितात. कोठें कोठें उत्कृष्ट चित्रें होतात. जागोजागीं शेंकडो गणपति तयार होतात. कित्येक सुंदर मखरें करितात. गणपतीचा उत्साह दक्षिणी हिंदुलोकांतच होतो. गुजराथी व घांटी लोकांत गणपतीचें नांव देखील माहीत नाहीं. मुंबईंत गणपतीचें माहात्म्य परभू, सोनार, ब्राह्मण, भंडारी व शेणवी लोकांत फार असतें. ह्या दिवसांत समाराधना, कथा, नाच, बैठका, फुगड्या, जलसे, इत्यादि होत असतात. पैसेवाले लोक याप्रसंगीं हजार पांचशें रुपये खर्च करितात. कोणी कोणी दहा दिवस एक सारखा दारापाशीं चौघडा वाजवीत असतात, व अरास करितात. हांड्या, झुंबर, गलासें, आरसे व चित्रें जिकडून तिकडून जमा करून घरें शृंगारितात, व चुना काढून स्वच्छ करितात. ज्या दिवशीं गणपति शेळवितात, त्यादिवशीं संध्याकाळीं रस्त्यांत जिकडेतिकडे तमासा पहाणाऱ्या लोकांची, गाड्यांची, व गणपतीच्या पालख्यांची गर्दी होऊन जाते. आणि ज्या दिवशीं गौरी जातात, त्या दिवशीं बाणकोटी लोक रस्तोरस्तीं नाचत असतात, व त्यांच्या मेळयांनीं सगळें कांपाचें मैदान भरून जातें. हे हुमऱ्या घालून एक सारिख्या उड्या मारीत असतात.

सुमारें वीस वर्षांमागें गणेश चतुर्थीच्या दिवशीं संध्याकाळीं एथें लोकांस रस्त्यांत फिरण्याची बंदी होती. ह्या दिवशीं दिव्यांत वात पडली कीं, द्वाड लोक घरांवर व रस्त्यांत जाणाऱ्या येणाऱ्यावर दगड मारीत. परंतु हें खूळ हल्लीं सरकारनें अशा लोकांस दंड करून एकसारखी पांच सहा वर्षें थाळी पिटून बंद केलें आहे. हें चतुर्थीच्या चंद्रदर्शनाचा आळ दूर करण्याच्या निमित्तानें होत असे. लुच्चे लबाड लोक मौजेसाठींच लोकांवर दगड मारून नासाडी करीत, ह्मणून या चतुर्थीस एथचे वाणी, पारशी व गुजराथी लोक ढगळा चोथ (दगड मारायाची चतुर्थी) असें ह्मणत. पूर्वीं ह्या दिवशीं लोक संध्याकाळचे पांच वाजले ह्मणजे दरवाजे बंद करून राहत.

दिपवाळी. ह्या सणाचा मुंबईंत उत्साह होतो, तसा पृथ्वीवर कोठेंच होत नसेल. हें मंडण सतत पांच दिवसपर्यंत असतें, आणि हा पाहायास लोक देशोदेशांतून येत असतात. अनेक तऱ्हांचीं चित्रें, आरसे, हांड्या, व झुंबर, लावून

पेढ्या व दिवाणखाने इतके शृंगारितात कीं, त्यापुढें श्रीमंतांचा आरसेमहाल कांहींच नाहीं. किल्ल्यांत, बाजारांत व सर्व मुंबईभर रस्तोरस्तीं व गल्लोगल्लींत हांड्या व गलासें पेटलेलीं असून जिकडेतिकडे गाड्यांची गर्दी असत्ये. प्रत्येक पेढींत अरास होत्ये तिचें वर्णन केलें तितकें थोडेंच. ज्या दिवशीं पेढीपूजन होतें व नव्या चोपड्या होतात, त्यादिवशीं तर कोटांत आणि मार्किटांत गाड्यांची आणि मनुष्यांची इतकी गर्दी होते कीं, नदीच्या लोटासारिखी गाड्यांची हार लागलेली असते.

ह्या दिवसांत गुजराथी घोडेवाले एकत्र जमून एक तऱ्हेवाईक पोशाख करून पायांत चाळ व कमरेंत घागऱ्या बांधून हातांत दोन दोन काठ्या घेऊन गृहस्थांच्या घरीं जाऊन नाचत असतात, व गाणीं ह्मणतात. ह्यांस रुपया आठ आणे पोस्त द्यावें पडतें. कांहीं मोठा सणवार आला ह्मणजे शिपाई चाकर वगैरे लोकांस आठ चार आणे बक्षीस द्यावे पडतात, त्यास पोस्त ह्मणतात. बलिप्रतिपदेचे दिवशीं गवळी लोकांचा मोठा सण. ह्यादिवशीं ह्मशींस व गाईंस शृंगारून पंचवाद्यांनिशीं रस्तोरस्तीं व इष्टमित्रांच्या घरोघर फिरवितात. मग त्यांस पंचारतीची ओंवाळणी होत्ये. कोणी कोणी इंग्रजी बाजा देखील लावितात.

मोहरम— हा मुसलमानांचा सण आहे खरा, परंतु ह्या शहरांतील एक तृतीयांश हिंदु लोक हा पाळीत असतात. ह्या सणास ताबूत ह्मणतात. मोहरम हें ह्या महिन्यांचें नांव आहे. ह्या महिन्यांत मुसलमान ताबूत करून त्यांत पंजा बसवून त्याची सबजा, फुलें व अबीर घालून व धूप दाखवून पूजा करितात. त्यांस ताबूत किंवा डोला असें ह्मणतात. ह्या डोल्यांत प्रतिवर्षीं शेंकडो रुपये खर्च होतो. अनेक तऱ्हांचे कागद लावून व सोनेरी व रुपेरी वर्ख चढवून हे मोठे सुशोभित करितात. लहान मोठे मिळून मुंबईंत सुमारें शें दीडशें ताबूत होतात. कामाठी व कोठें कोठें हिंदुही ताबूत करितात. हा उत्साह सात आठ दिवसपर्यंत एकसारिखा चालतो. ह्या सणास इमामजयंती असें आमच्या लोकांनीं नांव दिलें आहे. मुंबईच्या लोकांस द्रव्य मिळत असतें. सबब हे सण तारतम्यानें होतात.

मुसलमान व कित्येक अडूलोक ह्या आठ दहा दिवसांत अनेक सोंगें घेऊन रस्तोरस्तीं धिंगामस्ती करीत फिरतात. कित्येक वाघ होतात, कित्येक सन्न्याशी व बैरागी बनतात, व कित्येक आस्वलांचीं कातडीं अंगांत घालून आस्वल होतात.

पांच सहा असामी मिळून कापडाचा हत्ती करून रस्तोरस्तीं फिरवितात. ह्या दिवसांत ताबूतभक्त हिरवे, तांबडे, व पिवळे नाडे हातांत बांधितात, व गळ्यांतही घालितात. कित्येक हिंदुलोक आपआपल्या मुलांस फकिरी देऊन व काखेस झोळी लावून लोकांच्या दारोदार "इमामहुसेन" असें ह्मणून फकिरी व चिराखी मागायास पाठवितात. असी जमविलेली भिक्षा संध्याकाळीं नेऊन ताबूतांस अर्पण करितात. ताबुतास खिचडीचा नैवेद्य दाखवावा पडतो, ह्मणून ज्याच्या दारीं हे भिक्षा मागायास जातात, ते तुरीची डाळ व तांदूळ एकत्र करून भिक्षा घालितात, त्या मुलाचे कोणी सोयरे असले तर चिराखीसाठीं ह्मणून दिडकी दुगाणीची भिक्षा घालितात. कोणी तसाच जवळचा नातलग असला, तर त्या मुलाच्या हातीं दोन चार रुपये घालितो. व शेर दोन शेर खिचडी देतो. ताबुतास अबीर, ऊद, या सुगंधि द्रव्यांचा वास आवडतो, व हिरव्या रंगावर त्याची प्रीति असत्ये, ह्मणून ह्या दिवसांत हिंदु व मुसलमान भक्त हिरव्या रंगाचे पोशाख करितात, व अंगास अबीर फांसितात. ज्या दिवशीं ताबूत शेळवितात, त्या दिवशीं मोठ्या समारंभानें समुद्रावर नेऊन समुद्राच्या पाण्याचा स्पर्श करून त्याचा कळस मोडून परत आणितात. कांहीं वर्षांमागें ह्या ताबुतांबरोबर पलटणी व इंग्रज कामगार लोक जात असत.

पूर्व दिवशीं रात्रौ ताबूत रस्तोरस्तीं मिरवितात. ह्या रात्रीस "कतलकी रात" असें ह्मणतात. ह्या रात्रीस दहावीस वर्षांमागें मोगलांचा घोडा निघत असे. त्याची रचना मोठी चमत्कारिक असे, आणि हा पाहयास लोक तुटून पडत. परंतु ह्या दिवशीं मुसलमान व मोगल यांच्या बहुधा मारामाऱ्या होऊन एक दोन तरी मुडदे पडत, सबब सरकारानें हल्लीं तो घोडा बाहेर काढण्याची बंदी केली आहे. ह्या प्रसंगीं हजारो लोक रस्तोरस्तीं जमतात. ज्या दिवशीं ताबूत शेळवितात, त्या दिवशीं कांपाच्या मैदानांत हजारो मनुष्यांचा मेळा जमतो.

एथें काशी, रामेश्वर, द्वारका या महायात्रांस जाण्याच्या हेतूनें वर्ष दोन वर्षांनीं पुष्कळ लोक जमतात. कित्येक श्रीमंत लोक ह्या महायात्रा करायास जात असतात, व यांबरोबर कित्येक गरीब भावीकही जातात. पंढरपुरची यात्रा करणारे वारकरी आषाढी आणि कार्त्तिक एकादशीस शेंकडो जातात. हे जायास निघाले ह्मणजे रस्तोरस्तीं भजनाचा व वाद्यांचा गजर चाललेला

असतो, आणि लहान थोराच्या गळ्यांत पांच पंचवीस माळा घातलेल्या असतात. ह्यांशिवाय आसपासच्या यात्रा. वांई, नासीक, गोकर्ण महाबळेश्वर, अळंदी, निर्मळ ह्या ठिकाणीं जाणारे प्रतिवर्षी हजारो लोक सांपडतील, आणि हल्लीं लोखंडी सडका झाल्यापासून लोक फारच यात्रा तीर्थं करायास लागले. मुसलमान लोक मक्केची यात्रा करितात. तीस " हाज " ह्मणतात.

प्रतिवर्षी मुंबईत कित्येक देवळांच्या जत्रा ( यात्रा ) भरतात, त्या वेळीं अनेक तऱ्हांचा खेळ, मिठाई व दुसऱ्या जिनसा विकायास येतात. देवालयांत व आसपास पुष्कळ अरास केलेली असते. आणि समयविशेषीं दारूकामही सोडितात. मुसलमान लोकांच्या जत्रा होतात, त्यांस उरूस ह्मणतात.

वालुकेश्वरीं श्रावणी अमावास्येस व कार्त्तिक पौर्णिमेस अशा दोन जत्रा भरतात. ह्या हल्लीं एक दोन दिवसपर्यंत असतात. पूर्वी ह्या जत्रांत प्रतिवर्षी दोन तीन लक्ष रुपयांचा फक्त जुगारच होत असे. त्यावेळीं जुगाराच्या छंदामुळें ठाणें, वसई, पनवेल, आलिबाग इत्यादि आसपासच्या शहरांतील कित्येक लोक जीव टाकून येत, व जत्रा एक सारिख्या पांच पांच सहा सहा दिवसपर्यंत चालत. परंतु आठ दहा वर्षांपासून सरकारानें ह्या जुगाराची बंदी केली, त्यामुळें बाहेरगांवांतील लोकांचें येणें बंद झालें, आतां ह्या जत्रा तादृश भरत नाहींत. एक दोन दिवसांत उलगडून जातात. सुमारें वीस पंचवीस वर्षांमागें ह्या जत्रांत पारशी लोक फार जात, व डोंगरावर जागोजागीं तंबू मारून राहत असत. ह्या पारशी गृहस्थांच्या बरोबर नकल्ये, थट्टेबाज, ढोंगी व जुगारी पारशी जाऊन धिंगामस्ती करीत, व जत्रांत स्त्रिया जात, त्यांमध्यें शिरून थट्टामस्करी चालवीत. हें पाहून महाजनांनीं सरकारास ही गोष्ट कळवून वालुकेश्वराच्या संस्थाभोंवतीं भिंत बांधून सरकारच्या हुकुमानें पारशी लोकांस आंत येण्याची मनाई केली. तेव्हांपासून ह्या जत्रांचें मान कमी झालें. महालक्ष्मीस दोन जत्रा होतात. महालक्ष्मीची चैत्र पौर्णिमेस व धाकजीच्या देवळाची वैशाख पौर्णिमेस. नवेवाडीची कार्त्तिक अमावास्येस, व कालिकादेवीची मार्गशीर्ष अमावास्येस. ह्यांशिवाय परभादेवीची, गांवदेवीची, शिंपीओळींतली, जगन्नाथ शंकरशेटच्या देवळाची, माणकेश्वराची, भुलेश्वराची अशा निरनिराळ्या देवालयांच्या जत्रा होत असतात दसऱ्याच्या दिवशीं मुंबादेवीची जत्रा भरते. त्यादिवशीं आपट्याचा पाला (सोन्याच्या नांवानें) सुमारें हजार पांचशें रुपयांचा खपतो. हा घेऊन लोक आपआपल्या मित्रांच्या घरीं जाऊन सोन्याच्या नांवानें

दोन तीन पानें त्यांच्या हातीं देऊन त्यांची भेट घेतात. कोणी कोणी हा श्लोकही ह्मणतात. “ शमी शमयते पापं शमी शत्रुविनाशिनी ॥ अर्जुनस्य धनुर्धारी रामस्य प्रियवादिनी ॥. नारळी पौर्णिमेस कांपाच्या मैदानांत समुद्रकांठीं मोठा मेळा भरत असतो. त्या दिवशीं समुद्रानें शांत व्हावें, ह्मणून त्याची पूजा करून त्यांत लोक नारळ टाकीत असतात. शिवरात्रीस घारापुरीस जत्रा भरते, तेथें पुष्कळ लोक जातात. अशा वर्षापोटीं लहान मोठ्या मिळून तीस चाळीस जत्रा होतात.

नवरात्रांत गुजराथ प्रांतस्थ लोकांत गर्भे कुटण्याचा प्रचार फार आहे. खारवी, कोळी, घोडेवाले यांच्या व इतर कनिष्ठ प्रतींतील लोकांच्या बायका एका टोपलींत मातीचा करा व त्यावर नारळ ठेवून फुलें घालितात. ते घेऊन पांच पंचवीस जसजसा त्यांचा मेळा असेल, त्या प्रमाणें वाणी किंवा पारशी लोकांच्या घरोघर जाऊन सकाळ संध्याकाळ गर्भा कुटतात. तो असा. जमिनीवर ती टोपली ठेवून तींत दिवा पेटवून ठेवितात. मग अनेक तऱ्हांचीं गाणीं गुजराथी भाषेंत ह्मणून टाळया पिटून त्या टोपली सभोंवतालीं तास अर्धतास नाचतात. हा उत्साह एक सारिखा दहा पंधरा दिवस चालतो.

प्रतिष्ठित वाणी लोकांच्या स्त्रिया देखील घरोघर आश्विन महिन्यांत महिना पंधरा दिवसपर्यंत गर्भा कुटीत असतात. यांचा प्रकार असा असतो. एकादा श्रीमान् गृहस्थ आपल्या घरीं गर्भा कुटायाचा बेत करून आपल्या स्नेह्यांच्या घरीं आमंत्रणें पाठवितो. त्या स्त्रिया सुमारें आठ नऊवरें रात्रीस त्याच्या एथें जमतात, व सुमारें अकरा वाजेतोंपर्यंत गर्भा कुटितात. मग त्यांस जसें ज्याचें सामर्थ्य असेल, त्या प्रमाणें कोणी साडले, कोणी पातळें, कोणी तांब्ये, कोणी ताटें, कोणी पराती, असें वांटतात.

कुलाब्यास गजाअली साहेब या पिराचा उरूस भाद्रपद महिन्यांत भरतो. बोरीबंदराच्या शेवटास किल्ल्याच्या तटाच्या बाजूस बिस्मिल्ला साहेब नांवाच्या पिराची कबर आहे, तेथें मार्गशीर्ष महिन्यांत उरूस भरतो. ह्यांशिवाय माटुंग्यांत व दुसऱ्या ठिकाणीं दहा पंधरा उरूस भरत असतात. ह्या उरुसांमध्यें माहीमचा उरूस फार प्रख्यात. यांत दोनचारशें मोठमोठालीं दुकानें पडतात, व तो सुमारें सात आठ दिवसपर्यंत रहात असतो. पूर्वीं ह्या दिवसांत एथें हजारो रुपयांचा व्यापार होत असे, व दूर देशांतून लोक येत असत. हा एकसारखा पंधरा वीस दिवस चाले. ज्यावेळीं उघडपणें जुगार खेळायास मिळत असे, त्यावेळीं अशा

प्रसंगीं मुंबईंत फारच तर्कटें होत. वाळुकेश्वराच्या जत्रांत व माहीमच्या उरुसांत कित्येक जुगारी लोकांच्या घरांतील नग नगोस्यावर व सामान सुमानावर तवाई येई. पूर्वी या उरुसास पारशी फार जात, व चारपांच दिवस तेथें जाऊन पडत. पारशी आणि मुसलमान लोकांचा दंगा झाला, त्या वर्षापासून पारशांनीं ह्या उरुसास जाणें सोडिलें.

कार्तिक वद्य ५ स कोटांतील रथ निघतो. हें संस्थान शेणवी गृहस्थांचें आहे. पूर्वी कित्येक सधन शेणवी गृहस्थांची वस्ती कोटांतच असे. तेथें जत्रा भरत्ये, व ब्राह्मणभोजन होतें. गोवाळी अग्यारस ह्मणून गुजराथी लोकांचा श्रावण वद्य एकादशीस सण येतो. त्या दिवशीं पांच सहा वर्षांच्या मुलांस गोपाळांचे वेश देऊन त्यांच्या अंगांवर सोन्याचे व जवाहिराचे अलंकार घालितात. हे असे बट्ट गोपाळ ह्या दिवशीं कोटांतील ठाकूरद्वारांत शे दोनशें जमतात. ह्यांच्या डोकींत बायकांसारखीं फुलें माळितात. अशा प्रसंगीं एकादा श्रीमंताचा मूल असला, तर त्याच्या अंगावर सुमारे दहा पंधरा हजार रुपयांचें जवाहीर असतें. ह्या पांच सहा वर्षांच्या मुलास किंवा मुलीस शृंगारून देवदर्शन झाल्यानंतर स्नेह्यांचे घरीं दाखवायास फिरवितात. कित्येक दक्षिणी लोकही आपआपल्या मुलांस असे शृंगारितात. ह्या दिवशीं हीं मुलें स्नेह्यांचे घरीं दाखवायास पाठवितात. तेथें त्यांस रुपया दोन रुपये द्यावे पडतात. व कोणी कांहीं खायाचा पदार्थ त्यांच्या हातांत देतो.

इंग्रज जरी पूर्वी सुरतेंत वखारी घालून व्यापार करीत, व त्यावेळीं जे गृहस्थ या देशांत आले होते, त्यांत भात्रीक व खिस्ती धर्मावर श्रद्धा ठेवणारे असे कोठें विरळा होते, तरी तेव्हांपासूनच त्यांस ह्या देशांत आपल्या धर्माचा प्रसार करावा असी इच्छा होई. सन १६१७ त मिस्तर जोझेप सालब्यांक यानें कोर्ट आफ् डैरेक्टर्स यांस पत्र लिहिलें आहे. त्यांत तो मोठ्या उत्कंठतेनें आणि आस्थापूर्वक विनंती करितो कीं, या देशांत कांहीं खिस्ती धर्मोपदेशक पाठविण्यांत यावे. जेणेंकरून ह्या लोकांचें कल्याण होईल. दुसरें तो असें लिहितो कीं, ते असे सात्विक असावे कीं, त्यांचें आचरण पाहून ज्या लोकांत आह्मी राहतों, त्यांची त्यांवर श्रद्धा बसावी. ह्याच वर्षाच्या सुरतेच्या वखारीच्या दप्तरांत एका मोगलास खिस्ती धर्मांत घेतलें, असें लिहिलें आहे.

मिशनरी:- एतद्देशीय लोकांस खिस्ती धर्म शिकवून त्यांस स्वधर्मांत आणावें, हा यांचा मुख्य उद्देश आहे. ह्या स्वधर्माभिमानी लोकांचा मुंबई शहरांत येऊन

ख्रिस्ती धर्माचा उपदेश करावा, असा निश्चय प्रथम सन १८०७ त डाक्टर टेलर नांवाच्या एका मिशनरीनें केला होता, परंतु मुंबई एथें राहायास त्याला सरकारचा हुकूम न मिळाल्यामुळें तो सुरतेस जाऊन राहिला, आणि कांहीं सरकारी काम पत्करिलें. पुढें सन १८११ मध्यें अमेरिकेहून तीन मिशनरी भरतखंडांत आले. त्यांची तर प्रथम "दे माय धरणीठाव" अशी अवस्था झाली. पहिल्यानें ते कलकत्यास गेले. तेथून त्यांस सरकारानें हाकून लाविलें. मग ते कोचीस गेले. तेथेंही त्यांचें कांहीं वळेनासें झालें. नंतर मुंबईस आले. एथें काय विचारता? त्यांस बंदरांत देखील उतरायाची पंचाईत पडली. अशांत मोठ्याच संकटानें तारवांतून धक्क्यावर पाऊल टाकिलें नाहीं, इतक्यांत गव्हर्नर ईव्हान नीपियन यांजकडून हुकूम आला कीं, तुह्मी दोन दिवसांच्या आंत मुंबई बेटांतून निघून जावें. हे लोक आल्यानें एतद्देशीय लोकांच्या धर्माविरुद्ध बोलूं लागतील, ह्या भीतीनें त्यांस एथें राहूं दिलें नाहीं, इतकेंच नाहीं, परंतु कोर्ट आफ् डैरेक्टर्स ह्यांचाही हुकूम होता कीं, कोणी ख्रिस्ती धर्मोपदेशकास एथें राहूं देऊं नये. अशीं ह्या उपदेशकांवर संकटें येऊन पडलीं, तरी ते कोणत्याच गोष्टींत खचले नाहींत. ईश्वरावर भरिभार ठेवून मोठ्या धैर्यानें या प्रसंगीं त्यांनीं आपली वर्त्तणूक ठेविली. त्यांनीं सरकारांत अर्ज केला व इंग्लंड देशांतही आपले उद्योग चालविण्यास परवानगी देण्याविषयीं लिहून पाठविलें. त्यांजकडूनही हुकूम आला कीं कंपनी सरकारच्या राज्यांत त्यांनीं राहूं नये, व लागलेंच स्वदेशास परत जावें. हें ऐकून जरी त्यांची पांचावर धारण बसली, तरी त्यांनीं आपला कृतसंकल्प सोडिला नाहीं. सारांश. अनेक उपाय करून ज्या उद्देशानें ते स्वदेश सोडून आले होते, तो चालू करण्यास त्यांनीं हरयुक्ति करून परवानगी मिळविली. नंतर सन १८१४ पासून त्यांनीं मुंबईत हळूहळू आपला उद्योग चालू केला. प्रथम एतद्देशीय भाषा शिकले. इंग्रजी ग्रंथांचीं निरनिराळ्या भाषांत भाषांतरें करून छापिलीं. आणि लोकांस उपदेश करूं लागले. मग लहान मुलांस व मुलींस शिकवायाच्या शाळा घालून मोठ्या सहनशीलतेनें त्यांनीं आपलें काम चालविलें.

ज्या अडचणी मिशनरी लोकांस भरतखंडांत राहण्यास प्राप्त जाहल्या, त्यांचा शतांश जरी आमच्या एकाद्या धर्माभिमानी पुरुषास प्राप्त जाहला असता, तर त्यानें केव्हांच गाशा गुंडाळून काशीयात्रेची वाट धरिली असती. परंतु मिशनरी लोकांस ज्या अडचणी प्राप्त झाल्या, त्याच त्यांच्या योग्यतेस व भरभराटास

कारणभूत झाल्या. हे अलौकिक धर्माभिमानी गृहस्थ आपलें काम निष्ठेनें करितात; ह्मणूनच त्यांचे सर्व हेतु सिद्धीस जातात. हल्लीं त्यांनीं लाख लाख रुपये खर्चून शाळा बांधिल्या, व त्यांचीं विद्याखातीं सरकारच्या खात्यांबरोबर टक्कर मारितात. फ्रीचर्च विद्यालय, जनरल असेंब्लीचें विद्यालय, आणि मनी विद्यालय, हीं तीन मिशनरी लोकांचीं विद्यालयें आहेत. ह्या शाळांच्या संबंधानें हजारो मुलें मराठी, गुजराथी, आणि इंग्रजी भाषेचा अभ्यास करितात, शिकविण्याप्रीत्यर्थ ते स्वतः श्रम करून हजारो रुपये खर्च ही करितात, व देशोदेशीं शाळा घालून मुलांकरवीं व मुलींकरवीं अभ्यास करवितात. अमेरिकेंतील मिशनरी हे एथें प्रथम आले आणि शाळा घालण्याचे उद्योग पहिल्यानें त्यांनींच चालविले. त्यांनीं ही इंग्लिश शाळा घातली होती, परंतु हल्लीं त्यांच्या शाळा मराठीच आहेत. प्रख्यात मिशन खातीं हीं चारच. ह्या चारहि मिशनांच्या शाळा, पुणें, सुरत, नासीक, बडोदें, कोल्हापूर, सातारा, अशा सर्व मुंबई इलाख्यांत पसरल्या आहेत.

## सरकारी व मिशन शाळांचा तपशील

सरकारी व मिशन शाळांत किती विद्यार्थी शिकतात, हें पुढील तपशिलावरून कळतें. सरकारी शाळांस सरकारचा सालिना २५,००,००० रु० खर्च होतो. आणि मिशन शाळांस सरकारचा केवळ १,६५,००० रु० खर्च होतो. सर्व हिंदुस्थानांत एकंदर ३,००,००,००० मुलें शाळांत जाण्यासारखीं असतील. त्यांपैकीं मिशन शाळांत १,००,००० आणि सरकारी शाळांत १,२७,५१३ शिकतात. मिशन शाळांचा तपशील येणेंप्रमाणें:—— चर्च मिशनरी मंडळीच्या ७८१ शाळा आहेत, व त्यांवर बारा युरोपियन व ८४६ एतद्देशीय शिक्षक आहेत, व त्यांत २७,००० विद्यार्थी आहेत. लंदन मिशनरी मंडळीच्या ३१९ शाळा, ५८९ एतद्देशीय शिक्षक व सुमारें १५,००० विद्यार्थी आहेत. वेसलियन मिशनाच्या ५३ शाळा, १०० शिक्षक, आणि सुमारें ३,००० विद्यार्थी आहेत. फ्रीचर्च मिशनाच्या शाळांत ९,१३२, आणि बापतिस्त मिशनाच्या शाळांत २,५०० विद्यार्थी आहेत. आणि दुसऱ्या मिशनांच्या शाळांतील विद्यार्थी धरिले तर मिशन शाळांतल्या विद्यार्थ्यांची एकंदर संख्या १,००,००० होईल. सरकारी शाळांतील तपशील येणेंप्रमाणें. बंगाल इलाख्यांत सरकारी शाळा व पाठशाळा मिळून २८१ आहेत, आणि त्यांत दररोज सरासरी १४,४९८ विद्यार्थी येतात. मद्रास इलाख्यांत शाळा व पाठशाळा मिळून १४२ आहेत, आणि त्यांत

दररोज सरासरी ८,५९३ विद्यार्थी येतात. मुंबई इलाख्यांत सिंधचा प्रांत धरून शाळा व पाठशाळा ६१० आहेत, व त्यांत रोज येणारे विद्यार्थी सुमारें २५,१८७ आहेत. पंजाब इलाख्यांत दिल्ली धरून १५६ शाळा व पाठशाळा असून विद्यार्थी सरासरी ८,३०१ आहेत. वायव्य प्रांतांत शाळा व पाठशाळा २,९४४ व विद्यार्थी ६८,६८९ आहेत. या सर्वांची बेरीज येणेंप्रमाणें एकंदर विद्यालयें ४,१३१ आणि एकंदर विद्यार्थी सरासरी १,२५,२६८, आणि आग्रा वगैरे ठिकाणच्या शाळा मिळविल्या, तर सर्व मिळून ४,१५८ विद्यालयें आणि १,२७,५१३ विद्यार्थी होतात.

ज्या वेळीं मिशनरी लोकांनीं प्रथम ख्रिस्तीधर्मसंबंधीं मराठी पुस्तकें मुंबई शहरांतील लोकांस फुकट देण्याचा परिपाठ सुरू केला, त्यावेळीं ते आमच्या लोकांचें आर्जव करून त्यांस पुस्तकें देत, परंतु आमचे कित्येक लोक त्यांच्या पुस्तकांस शिवत देखील नसत. कोणी तीं घेतलीं, तरी लागलींच त्यांच्या देखत फाडून टाकीत. मुलींस व मुलांस त्यांच्या शाळेंत ज़ाण्याचा फारच प्रतिबंध करीत. ज़ीं पुस्तकें पूर्वीं त्याच्या घरीं आणून फुकट देत, तींच सद्यः त्राक्ट सोसाइटींत जाऊन आमचे लोक संतोषानें पदरचा दाम खर्चून घेतात. मुलांस व मुलींस बक्षिसें देऊन त्यांच्या आईबापांचें आर्जव करून शाळेंत नेत, तरी बराबर पाठवीत नसत, आणि हल्लीं शेंकडो मुलें दरमहा पैका देऊन आपणांस शाळेंत घ्या, ह्मणून उलटें त्यांचें आर्जव करितात. हें सर्व त्यांच्या निष्ठेचें फळ आहे. पाद्रीलोक आतां बहुधा फुकट पुस्तकें देत नाहींत, व मुलांस फुकट शिकवायास कांकूं करितात. त्राक्ट सोसाइटीचीं पुस्तकें प्रतिवर्षीं शेंकडो रुपयांचीं खपतात.

त्राक्ट आणि बुक सोसाइटी आणि बैबल् सोसाइटी अशा यांच्या दोन पुस्तकें करणाऱ्या मंडळ्या आहेत. त्राक्ट सोसाइटींत ख्रिस्तीधर्मबोधक असीं लहान पुस्तकें तयार करून स्वल्प किमतीनें विकतात, व बैबल् सोसाइटींत ख्रिस्तीधर्मशास्त्र एतद्देशीय अनेक भाषांत छापून विकितात. या शिवाय दुसऱ्या द्वीपांतरांतील सुमारें २०० भाषांत याचे तरजुमे झाले आहेत, असे ह्या लोकांचे उद्योग आहेत. दोनशें भाषांत तरजुमे केले आहेत, ह्मटलें असतां ही अतिशयोक्ति आहे, असे कोणास वाटेल, परंतु इंग्रज लोकांनीं आजपर्यंत शोध करून पृथ्वीवर प्रस्तुत एकंदर ३,०५४ निरनिराळ्या भाषा आहेत, व १,००० वर निरनिराळे धर्म आहेत असें ठरविलें आहे. धर्मप्रसार करण्या प्रीत्यर्थ प्रतिवर्षीं हजारो रुपये

वर्गणी जमल्ये. हे लोक आल्यापासून ह्या बेटांत किंबहुना सर्व भरतखंडांत गरीब गुरीब लोकांमध्यें विद्येचा प्रसार पुष्कळ झाला, व कित्येकांस आपल्या धर्माचा विचार करण्याची ईर्षा उत्पन्न झाली. त्यांनीं आपल्या धर्माचीं पुस्तकें एतद्देशीय निरनिराळया सोळा भाषांत छापून प्रसिद्ध केलीं आहेत, आणि ती स्वस्थ दरानें विकतात. संस्कृतांतही बैबल् तयार केलें आहे. ह्यासच उद्योग आणि निष्ठा ह्मणावें; नाहीं तर चुलीपाशीं धर्माच्या गोष्टी करून फलश्रुति काय ?

पूर्वी फिरंगी लोकांचें एथें प्राबल्य होतें, त्यावेळीं त्यांनीं हजारो लोकांस जबरीनें आपल्या धर्मांत घेऊन त्यास पोर्टुगीझ केलें. असे धर्मांतर केलेले हिंदु किरिस्तांव या नांवानें मुंबईभर किंबहुना सर्व हिंदुस्थानभर पसरले आहेत. त्याच प्रमाणें मुसलमानांची पाळी होती, तेव्हां त्यांनींही हजारो हिंदुलोकांस मुसलमान केलें. हे कोकणी मुसलमान मुंबईंत पुष्कळ आहेत. ते खलाशाचीं व दुसरीं कामें करितात. अशा कृत्यांनीं लोकांची फारच नासाडी झाली.

इंग्रज लोकांच्या मिशनरींचाही हाच मुख्य उद्देश आहे कीं, लोकांस आपला धर्म शिकवून त्यांस खिस्ती धर्माची दीक्षा द्यावी, तरी ते शाळांत मुलांस फक्त खिस्ती धर्मच शिकवितात असें नाहीं. दुसरीं अनेक प्रपंचसंबंधीं शास्त्रें वगैरे सर्व मार्ग शिकवितात. ह्यांचा हा एक गुण बरा आहे कीं, ते कोणास जबरीनें आपल्या धर्मांत घेत नाहींत. ते त्यांस शिकवून त्यांची मनें आपल्या धर्माकडे वळवून त्यांची इच्छा असल्यास मग आपल्या धर्मांत घेतात. असें असतांही ते आल्यापासून आजपर्यंत सुमारें सर्व हिंदुस्थान मिळून १,१२,४२५ एतद्देशीय लोकांस खिस्ती केलें. ही संख्या १८५२ त होती, हल्लीं तर पुष्कळ वाढली असावी.

सन १८६३ पर्यंत मुंबई मुक्कामीं मिशनरी लोकांनीं अनेक जातींतील आपल्या धर्मांत आणलेले खिस्ती सुमारें तीनशें होते. सन १८३९ त प्रख्यात रेवरेंड डाक्तर विल्सन् यांणीं फ्रीचर्च विद्यालयांतील दोघां पारशी विद्यार्थ्यांस खिस्ती धर्माची दीक्षा दिली. पारशी ज्ञातींतील ह्या धर्माचा अनुग्रह घेणारे हे पहिलेच गृहस्थ. सबब ज्या दिवशीं ह्यांस हा संस्कार झाला, त्यादिवशीं फारच गवगवा चालला होता, व यांमध्यें एक सारिखे महिना दोन महिनेपर्यंत त्यांस परत आपल्या धर्मांत नेण्याचे प्रयत्न चालविले होते. पंचायतीचे तरफेनें हा खटला सुप्रीम कोर्टांत देखील नेला होता. परंतु त्यांचें कांहीं वळलें नाहीं,

डाक्तर विल्सन् हे मोठे विद्वान् असून ह्यांस एतद्देशीय पुष्कळ भाषा येतात. यांचें सरकार दरबारांत मोठें वजन असून एतद्देशीय लोकांत यांणीं मोठी कीर्ति मिळविली आहे.

सुमारें सन १८५२ त मुंबईतील कित्येक तरुण इंग्रजी शिकलेल्या व दुसऱ्या गृहस्थास हिंदुलोकांत जातिभेद आहे, त्यामुळें आपल्या लोकांचें पुष्कळ अहित होत आहे, तर तो मोडून हिंदु ह्मणून सर्व एक जात करावी, अशी इच्छा उत्पन्न झाली. त्यावरून त्यांणीं परमहंस नामें एक सभा गुप्तपणें आपसांत स्थापिली. कित्येक तरुण गृहस्थ ह्या सभेचे सभासद होते. ह्यांच्या सभा एकांत ठिकाणीं जमून सर्व जातींचे सभासद तेथें जमले असतील, त्यांनीं कांहीं पदार्थ जातिभेदाची कांक्षा मनांत न आणितां निस्पृहपणें खावा, असा एक नियम होता. ह्या सभेंत निरनिराळया जातींतील तरुण गृहस्थ सुमारें पन्नास पाउणशें होते, आणि गुप्तपणें पत्रें पाठवून त्यांनीं देशोदेशीं आपल्या सभेच्या शाखा स्थापिल्या होत्या. त्या कलकत्ता, मद्रास, व काशीपर्यंत होत्या, असें सांगतात. ह्यांचे प्रयत्न एवढेच होतेकीं, सोवळयाओवळयाचा व खाण्यापिण्याचा जो हिंदुलोकांत मोठा प्रतिबंध आहे, तो मोडून टाकून सर्व एकमय करावें. हे त्यांचे आंतून प्रयत्न होते, परंतु बाहेरून ते आपलें मत दुसऱ्यांस एकाएकीं कळवीत नसत. ह्यांचा बेत असा होता कीं, पुष्कळ समुदाय जमला, ह्मणजे मग प्रगट होऊन आपला कृतसंकल्प सिद्धीस न्यावा. ह्यांच्या ह्या सभा नेमलेल्या दिवशीं भरत, व त्यांनीं आपले नियम वगैरे बरेच चालू केले होते. परंतु पुढें कांहीं मुलांच्या वडिलांस ह्या गोष्टी समजल्यामुळें त्यांनीं कित्येकांस सभेस जाण्याची मनाई केली. कित्येक गृहस्थांच्या घरांत ह्याविषयीं मोठा गवगवा झाला, आणि जिकडेतिकडे लोक आपल्या मुलांस आटपून ठेवूं लागले. कागदोपत्रीं याविषयीं नकवा चालली. ह्या सभेचे सभासद कोण होते व हिचा अध्यक्ष कोण, हें कोणास बराबर माहीत नव्हतें, तरी ज्यांचा ह्या सभेसी संबंध होता, त्यांस दुरुत्तरें करून बोलायास लागले. तेव्हांपासून ही सभा मोडून हिचे सर्व प्रयत्न विलयास गेले. तरी ही सभा निखालस मोडली नाहीं. हिचे कित्येक सभासद अद्याप आहेत, व ह्यांचे उद्योग चालले आहेत.

ह्या सभेचा उद्देश पाहून कित्येक ख्रिस्ती धर्माभिमानि इंग्रज लोकांस आनंद झाला होता कीं, पुढें हिंदु लोकांतील जातिभेदाचें खूळ मोडून ते इंग्रज लोकां-

बरोबर अन्नव्यवहार वगैरे करितील, आणि मग ख्रिस्ती धर्म सहजच वृद्धिंगत होईल. परंतु सगळ्या गोष्टी एकीकडेसच राहून "येरे माझ्या मागल्या" असें झालें. जे या सभेचे सभासद होते, ते पूर्ववत् सोवळेंओवळें पाहूं लागले. खाण्या-जेवण्याचा प्रतिबंध ठेवूं लागले, व कित्येक पहिल्यापेक्षां अधिक देवदेवतार्चन मांडून गोमुखींत हात घालून जप करूं लागले. आमच्या लोकांनीं आजपर्यंत सुधारणुकेविषयीं जेजे प्रयत्न केले, त्यांचे परिणाम बहुधा असेच झाले. आमचे लोक आरंभशूर आहेत, हें मात्र खरें आहे.

सन १८५६ त विष्णू भिकाजी गोखले या नांवाचा एक कोंकणस्थ ब्राह्मण या शहरांत आला होता. हा भगवीं वस्त्रें परिधान करून कौपीन लावी, व हातांत तुंबा घेऊन पादुका घाली. हा आपणास ब्रह्मचारी असें म्हणवीत असे; परंतु वास्तविक ब्रह्मचाऱ्याचे जे धर्म ते पाळीत नसे. प्रथम ह्यास सोवळया-ओवळयाचा कांहीं प्रतिबंध नसे. सर्वकाळ तांबूल भक्षण करी, व मनास येईल तेव्हां शुभ्र वस्त्रेंही नेसून पायांत जोडा घाली. हा स्पष्टवक्ता असून समयसूचक असे. महाराष्ट्र भाषेंत याला वादविवाद चांगले करितां येत. एकाद्या प्रश्नाचें उत्तर समर्पक नसलें, तरी समयास सुचेल तें देऊन आपली बाजू राखी, अडून राहत नसे. यास वेदांतविषयीं व दुसऱ्या गोष्टींत बरीच माहिती होती, परंतु संस्कृतांत गम्य नव्हतें. त्याच्या बोलकेपणावरूनच लोक त्यास लुब्ध होते. हा वेदांतमत्ती होता खरा, परंतु जसा मनुष्याचा कल असेल त्या मताकडे तो फिरे. कधींकधीं मूर्त्तिपूजेचा अव्हेर करी, व कधींकधीं तिची आवश्यकताही प्रतिपादी. ह्याचा सर्व हेतु बहुतकरून ख्रिस्ती मत खंडण करण्याकडे असे. याविषयीं सरा-सरी एक वर्षभर एक सारिखी वर्त्तमानपत्रांत चर्चा चालली होती. एकावेळीं मुंबईंतील शास्त्र्यांची व याची सभा ठाकूरद्वारांत भरली होती, तीमध्यें पुनर्विवाह प्रकरणीं कांहीं वादविवाह होऊन शास्त्र्यांचा आणि याचा तंटा झाला. याचें मत ब्राह्मण इत्यादि जातींतील विधवांचा पुनर्विवाह करावा असें होतें, आणि शास्त्री मजकूर त्याविरुद्ध होते. हा विद्वान् नव्हता, परंतु स्वभावतः बुद्धिमान् असून भित्रा नसे. कोणी देवी प्रसन्न होऊन आपणावर तिणें वरदहस्त ठेवून अनुग्रह केला, तेणेंकरून ज्ञानप्राप्ति झाली, असें तो सांगे!

हा जेव्हां प्रथमच आला, तेव्हां मयत धाकजी दादाजीच्या वाड्यांत दोन चार सभा भरल्या. ह्या सभांत तो हिंदुधर्माचें प्रतिपादन करी. ह्या सभेंत सर्व

डाक्तर विल्सन् हे मोठे विद्वान् असून ह्यांस एतद्देशीय पुष्कळ भाषा येतात. यांचें सरकार दरबारांत मोठें वजन असून एतद्देशीय लोकांत यांणीं मोठी कीर्ति मिळविली आहे.

सुमारें सन १८५२ त मुंबईंतील कित्येक तरुण इंग्रजी शिकलेल्या व दुसऱ्या गृहस्थास हिंदुलोकांत जातिभेद आहे, त्यामुळें आपल्या लोकांचें पुष्कळ अहित होत आहे, तर तो मोडून हिंदु ह्मणून सर्व एक जात करावी, अशी इच्छा उत्पन्न झाली. त्यावरून त्यांणीं परमहंस नामें एक सभा गुप्तपणें आपसांत स्थापिली. कित्येक तरुण गृहस्थ ह्या सभेचे सभासद होते. ह्यांच्या सभा एकांत ठिकाणीं जमून सर्व जातींचे सभासद तेथें जमले असतील, त्यांनीं कांहीं पदार्थ जातिभेदाची कांक्षा मनांत न आणितां निस्पृहपणें खावा, असा एक नियम होता. ह्या सभेंत निरनिराळया जातींतील तरुण गृहस्थ सुमारें पन्नास पाउणशें होते, आणि गुप्तपणें पत्रें पाठवून त्यांनीं देशोदेशीं आपल्या सभेच्या शाखा स्थापिल्या होत्या. त्या कलकत्ता, मद्रास, व काशीपर्यंत होत्या, असें सांगतात. ह्यांचे प्रयत्न एवढेच होतेकीं, सोवळयाओवळयाचा व खाण्यापिण्याचा जो हिंदुलोकांत मोठा प्रतिबंध आहे, तो मोडून टाकून सर्व एकमय करावें. हे त्यांचे आंतून प्रयत्न होते, परंतु बाहेरून ते आपलें मत दुसऱ्यांस एकाएकीं कळवीत नसत. ह्यांचा बेत असा होता कीं, पुष्कळ समुदाय जमला, ह्मणजे मग प्रगट होऊन आपला कृतसंकल्प सिद्धीस न्यावा. ह्यांच्या ह्या सभा नेमलेल्या दिवशीं भरत, व त्यांनीं आपले नियम वगैरे बरेच चालू केले होते. परंतु पुढें कांहीं मुलांच्या वडिलांस ह्या गोष्टी समजल्यामुळें त्यांनीं कित्येकांस सभेस जाण्याची मनाई केली. कित्येक गृहस्थांच्या घरांत ह्याविषयीं मोठा गवगवा झाला, आणि जिकडेतिकडे लोक आपल्या मुलांस आटपून ठेवूं लागले. कागदोपत्रीं याविषयीं बकवा चालली. ह्या सभेचे सभासद कोण होते व हिचा अध्यक्ष कोण, हें कोणास बराबर माहीत नव्हतें, तरी ज्यांचा ह्या सभेसी संबंध होता, त्यांस दुरुत्तरें करून बोलायास लागले. तेव्हांपासून ही सभा मोडून हिचे सर्व प्रयत्न विलयास गेले. तरी ही सभा निखालस मोडली नाहीं. हिचे कित्येक सभासद अद्याप आहेत, व ह्यांचे उद्योग चालले आहेत.

ह्या सभेचा उद्देश पाहून कित्येक ख्रिस्ती धर्माभिमानि इंग्रज लोकांस आनंद झाला होता कीं, पुढें हिंदु लोकांतील जातिभेदाचें खूळ मोडून ते इंग्रज लोकां-

बरोबर अन्नव्यवहार वगैरे करितील, आणि मग ख्रिस्ती धर्म सहजच वृद्धिंगत होईल. परंतु सगळया गोष्टी एकीकडेसच राहून " येरे माझ्या मागल्या " असें झालें. जे या सभेचे सभासद होते, ते पूर्ववत् सोवळेंओवळें पाहूं लागले. खाण्या-जेवण्याचा प्रतिबंध ठेवूं लागले, व कित्येक पहिल्यापेक्षां अधिक देवदेवतार्चन मांडून गोमुखींत हात घालून जप करूं लागले. आमच्या लोकांनीं आजपर्यंत सुधारणुकेविषयीं जेजे प्रयत्न केले, त्यांचे परिणाम बहुधा असेच झाले. आमचे लोक आरंभशूर आहेत, हें मात्र खरें आहे.

सन १८५६ त विष्णू भिकाजी गोखले या नांवाचा एक कोंकणस्थ ब्राह्मण या शहरांत आला होता. हा भगवीं वस्त्रें परिधान करून कौपीन लावी, व हातांत तुंबा घेऊन पादुका घाली. हा आपणास ब्रह्मचारी असें म्हणवीत असे; परंतु वास्तविक ब्रह्मचाऱ्याचे जे धर्म ते पाळीत नसे. प्रथम ह्यास सोवळया-ओवळयाचा कांहीं प्रतिबंध नसे. सर्वकाळ तांबूल भक्षण करी, व मनास येईल तेव्हां शुभ्र वस्त्रेंही नेसून पायांत जोडा घाली. हा स्पष्टवक्ता असून समयसूचक असे. महाराष्ट्र भाषेंत याला वादविवाद चांगले करितां येत. एकाद्या प्रश्नाचें उत्तर समर्पक नसलें, तरी समयास सुचेल तें देऊन आपली बाजू राखी, अडून राहत नसे. यास वेदांतविषयीं व दुसऱ्या गोष्टींत बरीच माहिती होती, परंतु संस्कृतांत गम्य नव्हतें. त्याच्या बोलकेपणावरूनच लोक त्यास लुब्ध होते. हा वेदांतमत्ती होता खरा, परंतु जसा मनुष्याचा कल असेल त्या मताकडे तो फिरे. कधींकधीं मूर्त्तिपूजेचा अव्हेर करी, व कधींकधीं तिची आवश्यकताही प्रतिपादी. ह्याचा सर्व हेतु बहुतकरून ख्रिस्ती मत खंडण करण्याकडे असे. याविषयीं सरासरी एक वर्षभर एक सारिखी वर्त्तमानपत्रांत चर्चा चालली होती. एकावेळीं मुंबईतील शास्त्र्यांची व याची सभा ठाकूरद्वारांत भरली होती, तीमध्यें पुनर्विवाह प्रकरणीं कांहीं वादविवाह होऊन शास्त्र्यांचा आणि याचा तंटा झाला. याचें मत ब्राह्मण इत्यादि जातींतील विधवांचा पुनर्विवाह करावा असें होतें, आणि शास्त्री मजकूर त्याविरुद्ध होते. हा विद्वान् नव्हता, परंतु स्वभावतः बुद्धिमान् असून भित्रा नसे. कोणी देवी प्रसन्न होऊन आपणावर तिणें वरदहस्त ठेवून अनुग्रह केला, तेणेंकरून ज्ञानप्राप्ति झाली, असें तो सांगे !

हा जेव्हां प्रथमच आला, तेव्हां मयत धाकजी दादाजीच्या वाड्यांत दोन चार सभा भरल्या. ह्या सभांत तो हिंदुधर्माचें प्रतिपादन करी. ह्या सभेंत सर्व

जातींच्या लोकांस येण्यास मोकळीक होती. मिशनरी, ख्रिस्ती व सर्व जातींचे लोक येऊन यास प्रश्न करीत, व त्या सर्वांस तो कोणत्या प्रकारचें तरी उत्तर देऊन मोकळा होई. मग हळूहळू पांच सहा ठिकाणीं सभा होऊं लागल्या. ह्या सभांत एकादे समयीं चार पांचशेंपर्यंत लोक जमत. समयविशेषीं हजार बाराशें देखील जमत. ह्या सभा कोठेंकोठें रात्रीच्या अकरा तासपर्यंत चालत. मग त्या कांहीं दिवस ठाकूरद्वारासमोर समुद्रकांठीं होऊं लागल्या. त्यावेळीं तर कधींकधीं दोन हजारपर्यंत लोक जमत. या ठिकाणीं फक्त पाद्री लोकांचे आणि याचे धर्म-प्रकरणीं वादविवाद होत. दर सभेंत एक दोन पाद्री व चार पांच एतद्देशीय ख्रिस्ती जमत. ह्या सभांचें माहात्म्य आठ दहा महिन्यापर्यंत चाललें होतें.

याणें भावार्थसिंधु या नांवाचा एक ओवीबद्ध लहानसा ग्रंथ लिहिला होता. पुढें सन १८५८ च्या अखेरीस यानें वेदोक्तधर्मप्रकाश या नांवाचा एक ग्रंथ छापिला. याचीं अष्टपत्री ७९० पृष्ठें होतीं, व किंमत दोन रुपये होती. या पुस्त-कांत तादृश रहस्य नाहीं, असें समजल्यावरून लोकांस सहजच याचा नाद सोडणें प्राप्त झालें. मग हा कलकत्ता, काशी व मद्रास या ठिकाणीं जाऊन आला. समुद्रकिनाऱ्यावर याचे पाद्री लोकांपाशीं वादविवाद होत, त्यांचें एक इंग्रजी भाषेंत रेवरेंड जार्ज बोएन् यानें पुस्तक छापिलें आहे. हें षोडष-पत्री असून याचीं पृष्ठें २०४ आहेत. यांत उभय पक्षांचे प्रश्न आणि उत्तरें आहेत. दुसरें एक लहान पुस्तक पाद्री लोकांच्या पक्षाकडील लोकांनीं मराठींत छापिलें होतें. त्याचें नांव “ बावाचा कावा ” असें होतें.

---

# प्रकरण १५.

## साधारण विषय

इंग्रज लोकांविषयीं असमंजस विचार—आमच्या राजांची राज्य चालविण्याची रीति, त्यांचा उधळेपणा, व भित्रेपणा—बाहुल्यांचीं लग्नें—लहान मुलांचें लग्न करण्याचा नाद्—माकडांचें लग्न—इंग्रज सरकारचा दक्षपणा— जाति प्रकरणीं खूळ—असंतुष्टपणा—वास्तविक भूतदया.

कित्येक असमंजस लोकांच्या मनांत अशा कल्पना येतात कीं, इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानांतील राज्य अन्यायानें हरण केलें. तर असें विचार करणें न्यायरीतीनें पाहिलें असतां किती अप्रयोजक आहेत तें पाहा. सन १५३० त मोगल बादशहाकडून मुंबई बेट पोर्टुगीझ् लोकांस मिळालें.*

पोर्टुगीझ्, फ्रेंच व वलंदेजीलोक हिंदुस्थानांत येऊन व्यापार करून अपरिमित द्रव्य कमावितात, हें पाहून इंग्रजांसही एथें येण्याची इच्छा झाली. पुढें सन १५९९ मध्यें लंडन शहरांतील कित्येक श्रीमंत व सधन व्यापारी लोकांची मंडळी उपस्थित करून त्यांनीं हिंदुस्थानांत येऊन व्यापार करण्याचा क्रम चालविला. मग एथें आल्यानंतर जसजसी त्यांस संधि सांपडली, तसतसें त्यांणीं द्रव्य संपादन करून व्यापार वाढविला. पुढें मुंबई बेट त्यांस अनायासें प्राप्त झालें, व आमच्या शेखचिल्ली राजांकडून त्यांनीं कांहीं संस्थानेंही विकत घेतलीं.

आमच्या लोकांच्या राज्य चालविण्याच्या विस्कळीत रीति; राजा, प्रधान, व राज्यांतील प्रत्येक कारभारी यांमध्यें परस्परांसीं कपटभावानें चाललेली वर्त्तणूक; व एकमेकांमध्यें फूट व मत्सर निरंतर चाललेली पाहून त्यांस सहज आपलें हित करणें जरूर पडलें. आमच्या दरबारांतील वस्तुतः पाहयास सर्व

---

* कित्येक ग्रंथकर्त्यांनीं असें लिहिलें आहे कीं, मोगल बादशहाचें पोर्टुगीझ् लोकांनीं कांहीं नाजूक काम केल्याबद्दल त्यानें हें बेट त्यांस इनाम दिलें.

एक, परंतु अंतस्थीं ज्याचा तो आपआपला मतलब मनांत आणून वागतो, आणखी डाव साधला असतां दिवाणजी महाराजांचा उपमर्द करायाची मार्गप्रतिक्षा करितो. अशी राज्यामध्यें अंदाधुंदी पाहून इंग्रज लोकांनीं जसजसी सवड सांपडली, तसतसें आपलें महत्व रक्षण करून शहाणपणानें राज्याधिकार प्राप्त करून घेतला. इंग्रज लोक व्यापार करून आपल्या संपत्तीची वृद्धि करावी, या हेतूनेंच स्वदेश सोडून या देशांत आले होते, आणि एथें आल्यावर राज्यप्राप्ति होईल, अशी त्यांस किमपि आस्थाही नव्हती. परंतु पुढें आमच्या लोकांचें अज्ञान व राज्यव्यवहारांत आपसांत अप्रमाणिकपणा यांमुळें जे भयंकर परिणाम घडून येतात, ते आह्मांस देऊन, त्यांजपासून जो शहाण्यास लाभ होतो, तो ग्रहण करून घेणें अर्थातच त्यांस भाग पडलें.

“ अर्थस्य पुरुषो दासः ”

आह्मा सर्वांस माहीतच आहे कीं, इंग्रज लोक भरतखंडांत ब्रह्मचर्य धारण करण्यास, सन्न्यासाची दीक्षा घेण्यास, पंचाग्नि साधन करून धूम्रपान करण्यास, काशीस जाऊन गयावर्जन करून पितरांचा उद्धार करण्यास, किंवा परमार्थ साधण्याच्या हेतूनें आले नाहींत. त्यांचा धर्म, त्यांच्या दीक्षा, त्यांचे नेम व परमार्थ साधण्याचे सर्व मार्ग ते आमच्या पेक्षां सहस्रपट उत्तम आहेत असें मानितात. ज्या कामाचा त्यांणीं पतकर घेतला, तें काम त्यांणीं मोठ्या धैर्यानें व युक्तीनें बजाविलें. यादेशांत येण्याचें त्यांचें मुख्य कारण संपत्ति आणि कीर्त्ति मिळविण्याचें. तें त्यांणीं अज्ञानी लोकांत जे निरंतर तंटे बखेडे चालले होते, त्यांचा निवाडा करून साध्य करून घेतलें. आमच्या राजे लोकांशीं ते प्रथम किती आर्जवानें व सहनशीलतेनें वागत होते, हें आह्मांस हिंदुस्थानाचा इतिहास वाचल्यानें समजतें. पुढें त्यांचें चातुर्य त्यांस फळास आलें; ह्मणून आज त्यांस दोष देणें आह्मांस योग्य नाहीं. जर आमचे लोक चौकस व व्यवहारदक्ष असते, तर आपसांतील तंटे मिटवायास मुळींच परक्याचें आर्जव करावयास गेले नसते, आणि आपल्या देशबांधवांशीं लढण्याकरितां त्यांणीं आपल्या देशाचा भाग परक्या लोकांस फरोक्त करून टाकिला नसता. जें काम नखानें झालें असतें त्यास आमच्या लोकांनीं कुऱ्हाडी लावून नासून टाकिलें, आणि आतां कुऱ्हाडीच्या नांवानें धोंडे फोडून फळ काय ? इंग्रज लोकांस व्यवहारदक्षपणा होता, ह्मणून त्यांस परराज्यांत राज्यप्राप्ति होऊन त्यांचा जयजयकार होत चालला आहे, “ वेडा दळतो आणि शहाणा खातो. ”

" दोघांचें भांडण आणि तिसऱ्याचा लाभ " ह्मणतात तो हाच. यांत दुसऱ्यास दोष लावणें कांहीं उपयोगाचें नाहीं. आमचीं कर्में आह्मांस फळास आलीं. " लाखाचीमत्ता आणि कवडीचीसत्ता " ह्या वाक्याचा अर्थ आमच्या लोकांस मुळींच ठाऊक नव्हता.

मराठी राजे ह्मटले ह्मणजे त्यांचे कारभार बेबंदच, त्यामुळें त्यांची नासाडी झाली. ज्या वेळीं पेशव्यांचा भरभराट चालला होता, त्यावेळीं किती अव्यवस्थितपणा होता ! अमोलिक काळाचा व द्रव्याचा किती नाश होत असे ! असें सांगतात कीं, पुण्यामध्यें सात पेठांत श्रीमंतांनीं सात मोठे सरकारी वाडे बांधिले होते, आणि प्रत्येक वाड्यांत भोजनाचा वगैरे सरंजाम प्रत्यहीं एकसारिखा ठेवीत होते. दर दिवस प्रत्येक वाड्यांत संध्याकाळीं पंचपक्वान्नें करून जेवणाची तयारी करवावी. मग श्रीमंतांचे मर्जीस येईल, त्या वाड्यांत जाऊन भोजन करीत, आणि बाकीच्या वाड्यांत जी तयारी होत असे, तिचा उपभोग चाकर व कारभारी लोक घेत.

एका वृद्ध गृहस्थानें हिंदुलोकांच्या भित्रेपणाविषयीं गोमंतकांत घडून आलेली ही पुढील गोष्ट सांगितली. ज्यावेळीं प्रथमच फिरंगी लोक पोर्टुगालांतून तिर्कटी तारवावर लष्कर घेऊन गोव्याच्या बंदरांत आले. ( ही कदाचित् १५१० मधील गोष्ट असावी. ज्यावेळीं आलबुकर्क याणें गोवें घेतलें होतें. ) तेव्हां ते कांहीं दिवसपर्यंत बंदराच्या बाहेर नांगर टाकून गोमंतकाची स्थिति कसी काय आहे ती पाहत होते. त्यांचें लष्कर जहाजावर होतें; तें गोव्याच्या किल्ल्यावरून सर्व लोकांस दिसे. ते लोक बिस्कुटें खात व दारू पीत. बिस्कुटें कठीण आणि पांढरीं होतीं, तीं ते कडाकड चावीत असत, व जी दारू ते पीत, तिचा रंग तांबडा असे. हा त्यांचा आहार पाहून गोमंतकांतील भोळे लोकांनीं असी अवाई उठविली कीं, हे विलक्षण जहाजांत बसून आलेले लोक चमत्कारिक पोषाक करितात इतकेंच नाहीं, तर ते हाडें खातात, व रक्त पितात. ते कोणी द्वीपांतरांतील राक्षस असावे. असी कल्पना काढून ते अगदीं घाबरून गेले आणि त्यांपुढें आपला कांहीं निभाव होणार नाहीं, असें मनांत आणून गर्भगळित होऊन एक सारिखा रानोमाळ पळ काढीत सुटले. मग काय विचारता ! ही बातमी राजाच्या कानावर जातांच " यः पलायेत जीवति " ह्मणून लश्कर घेऊन तोही शहर सोडून चालता झाला. मग दुसऱ्या दिवशीं जेव्हां फिरंगी लोकांनीं पाहिलें कीं, शहरांत सगळें

सामसूम आहे, तेव्हां ते जहाजावरून तडीस आले, आणि किल्ला सर्ड केला, नंतर राजवाडा व दुसरें लश्करी सामान आपल्या स्वाधीन करून घेतलें, आणि स्वस्थपणें राज्यकारभार चालवूं लागले. असे आमचे लोक मित्रे आहेत.

सन १८६१ च्या कार्त्तिक शुद्ध द्वादशीस एका पळशा जोशी गृहस्थानें तुलसीचें लग्न मोठया सभारंभानें केलें. ह्या गृहस्थास मूलबाळ नव्हतें, कन्यादानाचें श्रेय प्राप्त करून घ्यावें, व लोक मुलांचीं लग्नें करून व्याही विहिणी घरीं आणून केळवितात व अनेक सोहाळे करितात, तो प्रकार आपल्या घरींही व्हावा, अशी त्याला पुष्कळ दिवसांपासून हौस होती. ती पुरविण्यासाठीं त्याणें हा समारंभ केला. ह्या लग्नांत उपाध्ये हे मुलाचे ह्मणजे बाळकृष्णाच्या मूर्तीचे बाप, व यजमान हे कन्येचे ( तुळशीचे ) बाप कल्पून हा समारंभ मोठ्या दब्राजानें केला. वास्तविक लग्नास जसें आमंत्रण फिरतें, तसें फिरवून वराती बरोबर गृहस्थ बोलावून आणिले होते, व वाद्यें गाद्यें लावून रस्त्यांतून मिरवीत वर नेला. इतर लग्नें लावितात, त्यांप्रमाणें हें लग्न लावून ब्राह्मणांस दक्षिणा व गृहस्थांस नारळ, पान सुपारी, तुरे वगैरे दिले. व्याही व विहिणीचें गौरव वगैरे सर्व प्रकारें मोठ्याच तारतम्यानें ठेविलें होतें. वधूप्रवेश सुद्धां शास्त्रोक्त विधीप्रमाणें केला.

कांहीं वर्षांमागें एका गृहस्थानें मांजराची सठी केली होती. ह्या गृहस्थाच्या घरीं मांजर व्याली असतां तिच्या सहाव्या दिवशीं ब्राह्मणाकडून षष्ठीपूजन करवून दक्षिणा वांटली, आणि मिष्टान्नाचा जेवण समारंभ करून कित्येक लोकांस बोलाविलें होतें. तशीच एका शेणवी गृहस्थानें पिंपळाची मुंज बांधिली होती. आमच्या लोकांचें आयुष्य आणि ऐश्वर्य बहुतकरून अशांतच खपतें. मुलें, भाऊबंद, व सुहृत्संबंधी यांचें कल्याण करणें तें एकीकडेसच राहून याच्या जन्माचें आणि संपत्तीचें रूप भलत्याच प्रकारें होऊन शेवटीं कशांतच कांहीं नाहीं असें होतें.

कलकत्त्यानजीक नदिया नामें गांव आहे. तेथें बहुत पंडित होते. त्यांतील ईश्वरचंद राजानें सुमारें ७३ वर्षांमागें ह्मणजे सन १७९० त हिंदु रीतीप्रमाणें मोठा समारंभ करून दोन माकडांचें लग्न केलें, त्यास एक लाख रुपये खर्च लागला. जेव्हां वऱ्हाड निघालें, तेव्हां हत्ती, घोडे, पालख्या, उंट, शृंगारलेल्या घोड्यांची जिलीब, व हजारो मशाली वगैरे शोभा केली होती, आणि त्या नवऱ्यास ( वानरास ) रत्नजडीत पालखींत बसविलें होतें. पुढें लग्नही मोठ्या विद्वान्

ब्राह्मणांनीं सुमुहूर्त्तावर लाविलें. कायहो मूर्खपणा हा! ही किती आश्चर्याची गोष्ट आहे!

कांहीं वर्षामागें गणपतराव गायकवाड महाराज यांणीं बाहुल्यांचा लग्न समारंभ पंचवीस हजार रुपये खर्च करून केला. आणि हा समारंभ खऱ्या लग्नाप्रमाणें पंधरा दिवस चालला होता.

सन १८६० त इंदुरच्या महाराजांस पुत्र जहाल्याचें व तत्प्रीत्यर्थ दरबारांत उत्साह जहाल्याचें वर्त्तमान ऐकिलें होतें. इतक्यांत वर्त्तमानदीपिकेंत असें वाचण्यांत आलें कीं, ह्या राजपुत्राच्या आईस बाळंतविडा आला, त्या प्रीत्यर्थ दरबारांत सुमारें पांच लक्ष रुपये खर्च झाला! तसेंच ह्याच सालीं बडोद्याच्या महाराजांनीं दसऱ्याच्या उत्साहांत अंगावर घालायास हिऱ्याच्या दोन कंठ्या केल्या, त्यांस दहा लक्ष रुपये खर्च झाला, व या सणासंबंधी दुसरे हजारो रुपये खर्च केले. मुसलमानांचे रोजे झाले, तेव्हां साठ सत्तर खंडी साकर फकिरांस वाटली!

मुंबईंतही डामडौलासाठीं द्रव्य खर्चणारे पुष्कळ सांपडतील. कित्येक असे आहेत कीं, आपल्या हातांत दोन चार शेरांचे वाळे व बायकोच्या नाकांत हजार पांचशें रुपयांची नथ घालून दरमहा व्याजाबद्दल पांच पंचवीस रुपये मारवाड्यास भरतील. थोड्या वर्षांमागें एका सधन परभू गृहस्थाच्या मुलीनें बाहुलीचें लग्न केलें, त्यास त्याणें हजार पांचशें रुपये खर्च केला. व कित्येक लोकांस आमंत्रण करून वरघोडा देखील रस्त्यांतून मिरवीत नेला होता. इतके आमचे लोक अविचारानें द्रव्य नासणारे आहेत. वास्तविक सत्कर्माकडेस व देशकल्याणाकडेस द्रव्याचा व्यय करणारे थोडे. मुंबईंत दरमहा दोन हजार रुपये कमाविणाऱ्या सावकारापासून दहा रुपये मिळविणाऱ्या कारकुनापर्यंत सर्वांची धांव सारखी श्रीमंतीकडे असत्ये. आपआपलें स्वरूप ओळखून चालणारे कोठें विरळा सांपडतील.

मुलाचें लग्न केल्यावांचून आईबाप त्याचे ऋणमुक्त होत नाहींत, असा आमच्या लोकांचा समज आहे. आणि ह्या अविचारानें काळोखांत दोरीवर पाय पडला असतां सर्पावर पडला असी भीति होऊन एकादा अपधाकून जातो, त्याप्रमाणें हिंदु लोकांची अवस्था होऊन गेली आहे. मुलगी किंवा मुलगा झाला ह्मणजे प्रथम त्यांच्या लग्नाची काळजी लागते, मग तो मुलगा चंडोलखान्यांत जाऊन पडो, जुगाराच्या अखाड्यांत जाऊन रडो, नाटकांत जाऊन वीरभद्राचें

सोंग घेवो किंवा धोबी तळयावर बसून गप्पा झोंको, परंतु एकदा लग्न करून सोडितात. जसें गाई पाडयाचें लग्न करून त्याच्या कानांत ‘ तृणं भक्ष्वा जलं पिब यथासुखं क्रीडस्व ” असा मंत्र फुकून सोडून देतात, त्या प्रकारचीं आज्ञा लोकांतील बहुतेक लग्नें आहेत. कित्येक धर्मार्थ गरिबांचीं लग्नें करितात इतकेंच नाहीं, परंतु जनावरांचें व झाडांचें देखील लग्न करण्यांत पुण्य आहे, असें समजतात.

कित्येकांचीं इतक्या लहानपणीं लग्नें होतात कीं, आईबाप त्यांस कडेवर घेऊन जो विधि त्याणीं स्वतः करायाचा तो आपण करितात.

लहान मुलांचें लग्न करणें व त्या प्रसंगीं अव्यवस्थित खर्च करणें हा तर मुंबईतील लोकांचा कुलधर्मच आहे. एकाद्या पारशी व्यापाऱ्याच्या ह्मेत्याच्या मुलाचें लग्न झालें, तर तो देखील दहावीस हजार रुपये फक्त मांडवासच खर्चितो. कांहीं वर्षांमागें मुरलीधर शंभु नांवाच्या एका सधन वाणी गृहस्थानें आपल्या मुलाच्या लग्न समयीं मांडव घातला होता, त्यास सुमारें चाळीस हजार रुपये खर्च झाला असें सांगत. हा मांडव घालण्यासाठीं त्याणें एक मोठी तीन चार मजली हवेली विकत घेऊन मोडून टाकिली, आणि त्या जाग्यांत मांडव घातला. असे मंडप प्रतिवर्षीं एक दोन तरी पडलेले असतात.

सन १८६१ त एका मेमणाच्या मुलाचें लग्न झालें, तेव्हां वरघोडा निघाला होता त्याची फारच तारीफ करितात. त्या वरघोडया बरोबर पांचशें मोठमोठाल्या गाडया होत्या व शें दोनशें शृंगारलेले घोडे होते, हिलालांस खोबरेंच सात आठ खंडी लागलें, आणि याप्रसंगीं मेणबत्त्या सुमारें पांचशें रुपयाच्या जाळिल्या. जे श्रीमंत लोक वराती बरोबर चालत होते, त्यांला उजेड होण्यासाठीं फाणसांत मेणबत्ती घालून तीं बरोबर चालविलीं होतीं. या वरघोडयाबरोबर दोन चार हजार लोक होते. हा फक्त एका रात्रीच्या वरघोडयाचा खर्च, यावरून सर्व लग्नास व मंडपास किती खर्च लागला असेल !

मुंबईतील लोकांस द्रव्याची तमा नाहीं इतकेंच नाहीं, परंतु ते कधींकधीं अव्यवस्थित खर्च करितात. एकानें दोन हजार रुपये खर्च करून वर घोडा काढिला, तर दुसरा तीन हजार खर्च करून मामसाळें काढील, आणि तिसरा चार हजार रुपये लावून केळवण ह्मणून करील, व चवथा सीमांतपूजनाची वरात काढून त्या प्रीत्यर्थ पांच हजार रुपये खर्चील. अर्थात् श्रीमंतीचा बाणा कोठें, कसा, कोणी, आणि केव्हां घालावा, याचा विचार करणारे या शहरांत फारच

थोडे सांपडतील. द्रव्य उधळलें ह्मणजे श्रीमंत होतो, असें समजणारे पुष्कळ आहेत.

लहानपण दे गा देवा ॥ मुंगी साखरेचा रवा ॥
ऐरावती रत्न थोर ॥ त्यासी अंकुशाचा मार ॥

तुकाराम

हे विचार किती खोल. ! हें मागणें किती गंभीर ! आणि ह्या अभंगांतील तात्पर्य किती श्रेयस्कर !

कोणी हजारो रुपये खर्च करून श्राद्ध घालतील. कोणी दोन लक्ष रुपये खर्चून लग्न समारंभ करतील, परंतु देशदरिद्री होत चालला आहे व अज्ञान सागरांत बुडत आहे, याजकडे लक्ष देऊन लोकांस सन्मार्गास लावण्याच्या उद्योगांत कोणी पडायाचे नाहींत. हें तर असो, परंतु कित्येक द्रव्य असून त्याचा व्यय आपल्या मुलांच्या विद्येकडे करीत नाहींत. परंतु अशा ठिकाणीं आपला बेहद उदारपणा दाखवितात.

इंग्रज लोकांचा व्यवहारदक्षपणा पाहा ! एकादें देऊळ, रस्ता अथवा शहराच्या शोभेसाठीं किंवा लोककल्याणार्थ कांहीं करणें असल्यास बहुधा वर्गणी करून आपणास व दुसऱ्यास भारी न पडतां ते सिद्धीस नेतात. अशाच युक्तींनीं मुळापासून त्याणीं मुंबईचें वैभव वाढविलें आहे. आमचे राजेलोक असें कांहीं कृत्य करायाचें असलें, तर बढाईसाठीं लाखाच्या ठिकाणीं दोनलाख रुपये स्वतः खर्चितील, किंवा एकाद्या सावकारास एकाएकीं लाख दोनलाख रुपयांचा गंडा घालून जमीनदोस्त करून सोडतील. इंग्रज लोकांचा अशा प्रसंगीं शहाणपणा किती आहे तो पाहा ! ते पन्नास हजारांपासून आणा अर्ध आणापर्यंत वर्गणी कोणी दिली, तर घेण्यास अनमान करायाचे नाहींत. दुसऱ्यास दुखविल्याशिवाय स्वसंतोषानें जें कोणी अशा कृत्यास देईल, तें ते आदरपूर्वक ग्रहण करतात, आणि देणाऱ्याचा व घेणाऱ्यांचाही बोज राखतात. ह्मणूनच त्यांणीं योजिलेलीं कृत्यें सिद्धीस जातात.

मुंबईचा किल्ला, चर, बंदरें, पूल, तळीं, विहिरी, विद्यालयें रस्ते वगैरे लोकोपयोगी कृत्यें यांणीं बहुधा वर्गणी करूनच केलीं.

इंग्रज सरकार जें द्रव्य खर्चितें त्याचा पूर्वीं विचार करितें. जी महाराणी आह्मांवर राज्य करिते, तिच्या कन्येचा विवाह झाला, त्यावेळीं किती बातबेताचा


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
नौपाडा शाखा

खर्च होता. जो त्या प्रसंगीं खर्च करणें तो पार्लमेंट सभेनें एक वर्ष पूर्वींच आकारून दिल्हा होता. आणि त्या शिवाय दुसरा डामडौलाचा कांहीं खर्च केला नाहीं. पाहा ! आजपर्यंत राणीस किती कन्या व पुत्र झाले, परंतु कोठें वावगा खर्च झाला, याविषयीं एक तरी आह्मी गोष्ट ऐकिली आहे काय ? मुंबईचे गव्हर्नर साहेब दरबारी लोकांस कधींकधीं मेजवान्या करीत असतात, परंतु कधीं अन्नाचा नाश झाला व कोठें वेबंद खर्च झाला, असें होत नाहीं.

ह्या शहरांतील बहुतेक हिंदुलोक जात्यभिमाना खालीं चूर असतात. जो तो आपली जात श्रेष्ठ असें मानितो. मी उंच कुळांतला, माझे वडील अमके, तर मी भलत्याशींच संघटण ठेवणार नाहीं. असें खूळ माजविणारे ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत आहेत. परंतु वास्तविक पाहयास गेलें असतां ह्यांत कांहीं नाहीं. मुंबईंत कोणत्याच जातीचा धरबंध नाहीं. हा सर्व वृथाभिमान आहे. ह्या पासून द्वेष, मत्सर, दुराग्रह आणि सतत गृहकलह मात्र उद्भवतात व लोक व्याघ्रांसारिखे एकमेकांवर डोळे वटारीत असतात. हा काय तो ह्या पासून लाभ.

ह्या जातीच्या खुळा मुळेंच हिंदु लोकांत एकी होत नाहीं. जातीच्या तंट्याशिवाय एक दिवसही खालीं जात नाहीं. कोणी ह्मणतो त्याणें अमक्याच्या घरीं भाजलेलें खोबरें खाल्लें, ह्मणून तो वाळींत आहे. कोणी ह्मणतो त्याणें तमक्याच्या घरीं दूध पिलें, म्हणून त्यास बहिष्कृत करावें. कोणी ह्मणतो तो शिंदेशाई पागोटें घालतो, ह्मणून तो जातींत नसावा. अशा पोरकट गोष्टींवरून मोठे बिंदुप्रळय होतात. कित्येक या कामांत शिरण्यांत मोठी प्रतिष्ठा मानितात, आणि भलतींच गृहच्छिद्रें काढून कलह माजवितात. एक पक्ष असला तर त्याचे तीन चार तट करितात. या मुळेंच एथें ह्या क्षुल्लक जाति झाल्या आहेत. माझी जात उंच आणि तुझी जात नीच असें म्हणून भांडण्यांत किती वेडेपणा आहे. ज्या कुळांत मनुष्याला ईश्वरानें उत्पन्न केलें आहे, तें कूळ तर कोणाच्यानें टाकवत नाहीं, किंवा आपले आईबाप बदलवत नाहींत, तर मग माझें उंच रक्त आणि त्याचें हलकें रक्त ह्मणणें हें किती अप्रयोजक आहे. जातिभेद विवेकसार या नांवांचें एक पुस्तक सन १८६१ त एका विचारशील गृहस्थानें रचून लोककल्याणार्थ छापिलें आहे. त्यांत जाति प्रकरणीं बरींच प्रमाणें दाखवून जातीचा अभिमान बाळगून भांडण्यांत किती मूर्खपणा आहे, हें स्पष्ट दाखविलें आहे. एथें इतकेंच सांगणें आहे कीं, मनुष्यानें आपला श्रेष्ठपणा आपल्या उत्तम

आचरणानें दाखवावा. ज्याच्या कुटुंबांत सद्गुणाची वृद्धि, जें कुटुंब ईश्वरसेवा परायण, ज्या कुटुंबांत परोपकारी पुरुष पुष्कळ, तेंच कूळ श्रेष्ठ. कुळाचा वृथा श्रेष्ठपणा बाळगून कांहीं उपयोग नाहीं. मनुष्यानें श्रेष्ठपणा लोकांकडून आपणाकडे येई असें करावें. " सुजनो न याति वैरं "

कुलानामाकरो नास्ति ॥ अकुलानां च भारत ॥
विद्यया तपसा वापि ॥ धनेन धार्यते कुलं ॥

जातिभेद विवेकसार ह्या ग्रंथांतून वरील श्लोक घेतला आहे, अशीं त्यांत वेदांतून व दुसऱ्या ग्रंथांतून पुष्कळ प्रमाणें दाखविलीं आहेत. हा ग्रंथ लोकांनीं अवश्य वाचून पाहवा.

आमचे कित्येक लोक असें रडगाणें सांगतात कीं, इंग्रजी राज्यांत द्रव्य मिळत नाहीं व थोडेंबहुत मिळालें तरी कोठचे कोठेंच जातें. मुंबईंत जें कमवावें तें जिकडचें तिकडे ठेवून जावें, तें संग्रहास किंवा दोन चार पिढ्यांपर्यंत टिकावयाचें नाहीं याचें कारण इंग्रजी द्रव्यास बरखत नाहीं. अशा अनेक वेड्या कल्पना काढितात. कोणी कोणी अकबर बादशहाच्या वेळच्या मोहरा व पैसे देवाऱ्यांत ठेवून कमाईस बरखत व्हावी, ह्मणून नित्य त्यांची पूजा करितात! परंतु असा विचार करीत नाहींत कीं, आपण प्राप्तीपेक्षां अधिक खर्च करितों, व अमोलिक काळ जो द्रव्याचा व सुखाचा किल्लीदार त्याचा अनादर करितों; तेव्हां आह्मांस बरखत कोठून येईल ? " अदा पेक्षां खर्च मोठा त्याचा होई सदा तोटा " मग द्रव्याचा संचय कसा होईल. तर हा इंग्रजी राज्याचा दोष नाहीं, आमच्याच वर्त्तणुकीचीं हीं फळें आहेत. अद्याप आह्मी सावधगिरीनें चाललों, तर आमच्या प्रत्ययास येईल कीं, शहाणपणानें व दक्षतेनें चाललें असतां मागील राज्यापेक्षां प्रस्तुतच्यांत कमाईस अधिक बरखत आहे, व कलियुगाचा हा महिमा आहे कीं, उद्योग करून द्रव्य कमवावें आणि तें विचारानें खर्चावें, ह्मणजे त्यास बरखत येत्ये. मुंबईंत जे लोक दक्षपणानें वागतात व चौकसपणानें व्यवहार ठेवितात, ते सुखी व सधन आहेत.

मुंबईंत दान धर्म पुष्कळ होतो, व अनाथ अभ्यागतास अन्नवस्त्र मिळतें खरें, परंतु लोकांमध्यें जी वास्तविक भूतदया ह्मणतात ती कमीच आहे. परस्पर स्नेह व उदारपणें एकमेकाचें कल्याण करायास झटणारे असे दुसऱ्या लोकांत कोठें कोठें अढळतात, परंतु हिंदु लोकांत फारच कमी, किंबहुना नाहीं-

तत्र. ही मुंबईचीच गोष्ट असें नाहीं, परंतु बहुधा सर्वत्र आमचे लोक असेच आहेत. श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट यांणीं हिंदु लोकांसाठीं इंग्रजी शाळा घातली आहे, व शेट गोकुळदास तेजपाळ यांनीं गुजराथी लोकांसाठीं इंग्रजी व गुजराथी शाळा घातल्या आहेत. सर जमशेटजी जिजीभाई यांणीं पारशी लोकांसाठीं इंग्रजी व गुजराथी शाळा घातल्या आहेत. नाखुदा यांणीं मुसलमान लोकांसाठीं इंग्रजी शाळा घातली आहे. तसीच कासम नाथा यांणीं खोजे लोकांच्या मुलांकरितां व पोर्टुगीझ् लोकांनीं आपल्या मुलांसाठीं शाळा घातली आहे. परभू लोकांनीं परभांसाठीं शाळा घातली आहे. हीं त्यांचीं उदार कृत्यें आहेंत; परंतु शहरांतील सर्व जातींच्या गृहस्थांचा समाज एकत्र जमून मनुष्यमात्राच्या कल्याणार्थ शाळा घातल्या व त्या मुलांचे सद्गुण वाढविण्यासाठीं उपाय योजिले, असें कोठें आजपर्यंत अढळलें नाहीं. जें कांहीं आमच्या लोकांनीं आजपर्यंत केलें, तें बहुतकरून इंग्रज सरकारच्या व दुसऱ्या इंग्रज लोकांच्या आश्रया खालींच केलें, व त्या लोकांत आपणास भूषण मिळावें ह्या हेतूनें केलें. वास्तविक गोरगरिबांचा कळवळा मनांत आणून अशीं कृत्यें करणारे थोडे, इतकाच अर्थ.

सन १८६३ त एका सधन पारशी गृहस्थानें आपल्या ज्ञातींतील गरीब लोकांपैकीं कोणी दुखण्यानें पडलें असतां, त्यास शरीरप्रकृति सुधारायाकरितां हवाशीर ठिकाण व दुसरी सोई असावी, म्हणून तीन लक्ष रुपये ठेविले आहेत. आणि कुलाब्याच्या बाजूस तीन हजार रुपयांस एक जमिनीचा तुकडा घेतला आहे. त्यावर मोठी इमारत बांधून रोगी लोकांस प्रकृति ताळयावर येईपर्यंत राहण्याची सोई करणार.

याचप्रमाणें दुसऱ्या एका पारशी गृहस्थानें चारपांच लक्ष रुपये आपल्या लोकांत धर्मकृत्यास लावण्यासाठीं काढून ठेविले आहेत. आणि या द्रव्याचा व्यय करण्याचा असा संकेत आहे. जे पारशी गृहस्थ विपरीत काळ आल्यामुळें दरिद्रदशेस आले असतील, त्यांस या रकमेच्या व्याजांतून ज्याची जशी योग्यता असेल, त्याप्रमाणें द्रव्य देऊन दारिद्रावस्थेंतून मुक्त करून ऊर्जित दशेस आणावें.

सन १८६२ कार्तिक मासीं शिंदे महाराजांनीं एका दिवसांत एक लक्ष दक्षिणी ब्राह्मणांस भोजन घातलें, आणि दरब्राह्मणास एकएक रुपया दक्षिणा दिली.

ही संख्या पुरी होण्यासाठीं जेथें जेथें दक्षिणी ब्राह्मणांचा समुदाय होता, तेथें तेथें त्याचदिवशीं एकाच प्रकारचा जेवणसमारंभ करण्याचा बेत ठेवण्याची ताकीद फिरविली होती. त्यांपैकीं दहाहजार ब्राह्मणांस पुणें मुकामीं बुंदीच्या लाडवांचें जेवण घातलें. त्यावेळीं कित्येक ब्राह्मण मुंबईहूनही तेथें गेले होते. हे ब्राह्मण कोठेंकोठें किती व कोणत्यावेळीं जेवायास बसले, ह्याची बातमी सरकारास तारा-यंत्रद्वारा पोंचवावी, असी वर्दी केलेली होती. ह्याकृत्यास सुमारें तीन लक्ष रुपये खर्च झाला, असें सांगतात.

परोपकारार्थ द्रव्याचा विनियोग करणें हें स्तुत्य आहे. परंतु सदरील हा केवळ एकदेशीधर्म. ज्याला भूतदया व देशभक्ति ह्मणतात, तो प्रकार याहून निराळाच आहे. त्यांत मनुष्यमात्राच्या कल्याणाकडे दृष्टि दिली पाहिजे. ह्मणजे तो दशग्रंथी ब्राह्मण असो किंवा शतमूर्ख अंत्यज असो. त्या कृत्यापासून सर्वांस सारखा उपभोग झाला पाहिजे.

आतां सर जमशेटजी जिजीभाई यांणीं दवाखाना बांधिला व शेट कावसजी जहांगीरजी रेडीमनी यांणीं एल्फीन्स्तन् पाठशाळा बांधण्यासाठीं एकलक्ष रुपये दिले. हा देशभक्तीचा आणि भूतदयेचा उत्तमप्रकार. आतां जेव्हां आमचे लोक अशा हेतूनें आपल्या सर्व कृत्यांत वागतील, तेव्हांच त्यांमध्यें ऐक्य येऊन ते सुखी व सत्ताधारी होतील.

एक इंग्रजी पत्र इंग्लंडाहून आलेलें वाचण्यांत आलें, त्यांत विद्याखात्यांतील वर्त्तमान असें अढळलें. सन १८६१ सालीं इंग्लंड देशांत देशाभिमानी लोकांनी स्वेच्छेनें निरनिराळया विद्याखात्यांसाठीं देणगी दिली ती नव्वद लक्ष रुपये जमली. त्या शिवाय वार्षिक वर्गणी देणाऱ्यांनीं द्रव्य दिलें तें खेरीज. असे त्या देशांत उदार लोक आहेत. आणि हें द्रव्य देतेवेळीं ते त्यापासून अमुकच लोकांस फल प्राप्त व्हावें, असें मनांत आणीत नाहींत.

समाप्त

## पुढील कोशांत संज्ञार्थ अक्षरें घातलीं आहेत त्यांचा अर्थ

| अक्षरें | अर्थ | अक्षरें | अर्थ |
|---|---|---|---|
| इं० | इंग्रजी. | कों० | कोंकणी. |
| म० | मराठी. | अ० | अरबी. |
| फा० | फारशी. | ला० | लातीन. |
| सं० | संस्कृत. | गु० | गुजराथी. |
| मुं० | मुंबईतील अस्सलभाषा. | हिं० | हिंदुस्थानी. |
| पो० | पोर्टुगीझ्. | ग्री० | ग्रीक. |
| को० | कोळी लोकांची भाषा. | फ्रें० | फ्रेंच. |

# कोश

शब्द — अर्थ

### अ

अक्टिंग. इं. बदली काम चालविणारा.

अटी. म. प्रतिबंध.

अठरापगड जात. हिं. अठराप्रकारच्या पागोट्या घालणारे लोक.

अडमिरल. इं. तारवावरील सेनापति.

अंत्यज. सं. परीट, ह्मार, चांभार आदि-जाति.

अंदाजे. फा. जमाखर्चाचे खर्डे.

अनल. सं. अग्नि.

अनाज. मुं. धान्य.

अनुषंग. सं. संबंध, संगत.

अनुपमेय. सं. अप्रतिम, उत्कृष्ट.

अमेरिकन मिशन. इं. अमेरिका देशांतले प्रेषित, धर्मोपदेशक, पाद्री.

अर्ल. इं. इंग्रज मानकऱ्याची एक पदवी.

अरमार. पो. लढाऊ जहाजें.

अवघंडा. म. मोठें तुफान.

असुर्पी. फा. अर्धरुपया, गोमंतकांतील नाणें, असुर्प्या.

### आ

आक्ट. इं. कायदा, कानु.

आगर. म. मीठ पिकविण्याचें ठिकाण.

आग्रिहार्टिकल्चरल् सोसायटी. इं. बाग करणारी व बीं विकणारी मंडळी.

आचर. पो. लोणचें.

आडिटर जनरल. इं. हिशेब तपासणारां-तील मुख्य, मुजुमदार.

आतस बेहेराम. फा. उत्तमप्रकारचें अग्नि-स्थान, पारशी लोकांचें देवालय.

आदर्यान. फा. साधारण अग्निस्थान, पारशी लोकांचें साधारण प्रतीचें देवालय.

आनराबल. इं. सन्मानित, श्रेष्ठ, अब्रूवान्, नामदार.

| शब्द | अर्थ |
|---|---|

आफिशियेटिंग. इं. बदली काम चालविणारा.
आंब. को. आंबे. आंब्याचा अपभ्रंश.
आलीनवाब. फा. मोठा सुभेदार.

## इ

इगर्जे. पो. देवालय, पोर्टुगीझ् लोकांचें देऊळ.
इंजनेर. इं. इंजिनीर, यंत्रानें काम चालविणारा.
इंडियननेव्ही. इं. भरतखंडांतील नौकासमूह, अरमार.
इंत्रूज. पो. किरिस्तांव लोकांचा शिमगा.
इनकम टाक्स. इं. प्राप्तीवरील कर.
इन्स्टिट्यूशन्. इं. विद्यालय, कारखाना, सभास्थान.
इन्स्टिट्यूट. इं. ज्ञानालय.
इन्स्पेक्टर. इं. शाळांची देखरेख करणारा.
इलेक्ट्रोप्लेटिंग आणि गिल्डिंग. इं. विद्युल्लतेच्या योगानें मुलामा काढणें.
इस्क्वायर. इं. सत्कारार्थ किताब, प्रतिष्ठितगृहस्थ.

## ई

ईस्टइंडिया कंपनी. इं. पूर्वेकडील भरतखंडांत व्यापार करणारी मंडळी.

## उ

उच्छिष्टभोजी. सं. उष्टें खाणारे.
उपमर्द. सं. नाश, मोड.
उमदा. अ. विशाळ, भव्य.
उरूस. अ. मुसलमानलोकांच्या पिरांच्या जत्रा.

| शब्द | अर्थ |
|---|---|

एकर. इं. सुमारें दीड बिघा.
ए. बी. इं. सामान्यपंडिताची पदवी.
एशिआटिक्सोसायटी. इं. एशियाखंडांतील शोध करणारी मंडळी.

## ओ

ओरिएंटल् त्रान्स्लेटर. इं. पूर्वेकडील भाषांचें भाषांतर करणारा.

## क

कडाकेदार. हिं. कठीण.
कत्तलकी रात. अ. हाणामार झालेली रात्र.
कथीड्रल. इं. मोठें देऊळ.
कनिष्टेबल. इं. फौजदारांचा इंग्रज नायक.
कपतान. इं. सरदार, नायक, तारवावरील तांडेल, व लष्करावरील सरदार, मालीम.
कमूस्. इं. येतो.
कमिशनर. इं. न्यायाधीश, चौकसनीस, सत्ताधारी कारभारी.
कम्यांडंट. इं. सरखेल, नायक.
कर्नल. इं. लष्करावरील दुसऱ्या पदवीचा सरदार.
कलेक्टर. इं. तहसीलदार, कमावीसदार.
काटन स्क्रु. इं. गिरणी.
कामन्स. इं. मध्यमप्रतींतील प्रतिनिधि.
कार्डिंगमशीन्. इं. कापूस पिंजण्याचें यंत्र.
कासरा. म. दोर.
कालेज. इं. पाठशाळा.
कुटा. म. मासळी सुकवून व कुटून झाडांस व इतर जित्रबांस खत घालितात तो.
केरे. पो. पाहिजे, केर ह्मणजे पाहिजे.

| शब्द | अर्थ |
|---|---|

केशा. इं. कर्जासाठीं तुरुंगांत घालण्याचा हुकूम.

कोर्ट आफ् डैरेक्टर्स. इं. हिंदुस्थानांतील राज्य चालविणाऱ्या कंपनी सरकारचे मुख्य अधिकारी, राज्यव्यवस्थापक, हे कंपनीकडील इंग्लंडदेशांतील हुद्देदार.

कौन्सल. इं. मंत्रिसमाज, सभा.

कौन्सलर्स (दार) इं. राज्यकारभार चालविणारे व (पहाणारे) पंच, मसलतदार.

क्यामिरा. ला. सूर्यकिरणाच्या योगानें चेहरे काढण्याचें यंत्र.

क्युरेटर. इं. तपासनीस, चौकसनीस.

क्रिकेट. इं. चेंडूफळीचा खेळ.

क्रिस्टमस. इं. खिस्तजयंती.

क्लाक. इं. मोठें घड्याळ.

## ख

खुदरत. अ. सामर्थ्य, शक्ति, ईश्वर.

खेंस. म. रेशमी शेला, हा बहुधा तांबड्या रेशमाचा असतो, ह्यास शेमला व थिम्लाही ह्मणतात.

ख्याल. फा. लीला.

## ग

गनक्यारेज. इं. गन, तोफ, क्यारेज, गाडा. तोफा नेण्याचे गाडे करण्याचा कारखाना.

गर्भा. सं. नवरात्रांतील गुजरांथी लोकांचीं गाणीं.

गवन. इं. इंग्रजस्त्रियांचा घागरा.

गव्हर्नर. इं. सुभेदार, राज्य चालविणारा.

गार्डन्. इं. बाग.

| शब्द | अर्थ |
|---|---|

गुडदाणी. म. भुंयमुगाचे दाणे भाजून सोलतात, आणि ते गुळाच्या पंकांत घालून त्याचीं कापें पाडून विकतात, तीस गुडदाणीं ह्मणतात.

गेट. इं. दरवाजा.

ग्याझेट. इं. वर्त्तमानपत्र.

ग्रांड ज़ुरी. इं. वरिष्ठ पंच.

ग्रेटब्रिटन. इं. इंग्लंड, स्काटलंड, आणि वेल्स.

## च

चखें. हिं. चाखणें.

चर्चगेट. इं. देवळाकडील दरवाजा.

चारिटिस्कूल. इं. धर्माची शाळा.

चिक्की. म. कुरमुऱ्या गुळाच्या पंकांत घालून त्याची मिठाई करितात, तीस चिक्की ह्मणतात. याप्रमाणें हरबऱ्यांची व तिळांची चिक्की करून विकतात.

चिराख (खी). फा. दिवा, वात, दक्षिणा.

चीफ. इं. मुख्य, सरदार.

## ज

जनरल. इं. सेनाधिपति, एका पलटणीवरील सरदार.

जनरल हास्पिटल. इं. मोठा दवाखाना. सर्वलोकांसाठीं केलेलें औषधालय.

जस्टिस आफ् धि पीस. इं. राणीकडून नेमलेले प्रतिनिधि.

जामदारखाना फा. खजिना, तिजोरी.

जिओग्राफिकल् सोसायटी. इं. भूगोलसंबंधी विचार करणारी मंडळी.

| शब्द | अर्थ |
|---|---|

जिमूखाना. हिं. कसरत करण्याचें स्थान.
जिमूनेशियम्. ग्री. कसरतशाळा, तालीमखाना.
जिलीब. अ. स्वारी.
जुमामशीद. अ. जुमा शुक्रवार. शुक्रवारीं निमाज पढायास जाण्याची मशीद.
जुस्तीस् (जस्टिस्). इं. न्यायमनसुबी.
ज्यायनिशीनांशीं. हिं. सुह्रसंबंध्याशीं.

### झ

झुकले. झुकणें. हिं. मनें वळिवलीं, चुकविलें.
झ्या. को. घ्या.

### ट

टेंपरल. इं. प्रपंचसंबंधी, ऐहिक.
टैप. इं. छापायाच्या अक्षरांचा सांचा, ठसा.
टौनबराक. इं. किल्ल्यांतील लश्करी शिपायांस राहण्याची जागा.
टौनमेजर. इं. किल्ल्याचा बंदोबस्त ठेवणारा हुद्देदार.
टौनहाल. इं. सरकारी वाडा, किल्ल्यांतील वाडा.

### ड

डंकन रोड. इं. डंकन साहेबानें बांधविलेला रस्ता.
डाक्तर इं. वैद्य, आचार्य, पंडित, शास्त्री.
डिपुटी. इं. दुयम.
डिस्ट्रिक्ट बेनिवोलेंट सोसायटी. इं. परगण्यांतील गरीब निराश्रित लोकांवर दया करणारी मंडळी.

| शब्द | अर्थ |
|---|---|

डीपो. फ्रें. वखार, कोठार.
डैरेक्टर आफ् पब्लिक् इन्स्ट्रक्षन्. इं. विद्याखात्यावरील प्रमुख.
ड्राइंग्मशीन्. इं. वात लांबविण्याचें यंत्र.
ड्राफ्ट्स्मन्. इं. नकाशे काढणारे.

### ढ

ढगळाचोथ. गु. गणेशचतुर्थी, दगड मारायाची चतुर्थी.

### त

तनाखोरी. फा. लुचेगिरी.
ताबूत. अ. हस्सन हुस्सन यांच्या नांवानें केलेलें मखर, डोला.
तावदान. फा. भिंग, खिडकीचें भिंगें लावलेलें दार.
तृणशय्या. सं. गवताचा बिछाना.
तोहमत. अ. आरोप.
त्राक्ट आणि बुक सोसायटी. इं. धर्मसंबंधी लहान पुस्तकें तयार करणारी मंडळी.

### थ

थिएटर. इं. नाटकशाळा.

### द

दपोटे. मुं. गोण, गोणपाट.
दर्जा. फा. पदवी, सरकारी अधिकार.
दर्यास. फा. न्याय, इनसाफ.
दुणा. म. दुप्पट, दुहेरी.
दुशाला. हिं. दुहेरी शाल, शालजोडी.
देर. इं. तेथें.
दोखमा. फा. पारशी लोकांचीं प्रेतें टाकण्याची विहीर.

| शब्द | अर्थ | शब्द | अर्थ |
|---|---|---|---|

### ध

धि बांबे ब्रांच आफ् धि रायल् एशिआटिक् सोसायटी. इं. मुंबईतील इंग्लंडांत जी एशियाखंडांतील शोध करणारी मोठी मंडळी आहे तिची शाखा.

धृतिनग. सं. धैर्याचा पर्वत.

धोशा. हिं. ख्याति, कीर्त्ति.

### न

नमुना. फा. उत्तम, मासला.

नारोळ. को. नारळ.

निगा. हिं. चौकशी.

निरो. गु. निरा. खजुरीपासून व ताडापासून काढलेला रस.

निःसीम. सं. बेहद.

नृपति. सं. राजा.

नेटिव्ह एज्युकेशन् सोसायटी. इं. एतद्देशीय लोकांस विद्या शिकविणारी मंडळी.

नेटिव्ह जनरल् लैब्ररी. इं. एतद्देशीय सर्व लोकांसाठीं स्थापलेलें पुस्तकालय.

नैट. इं. इंग्रज मानकऱ्याची एक पदवी.

नैष्ठिक. सं. नेमनिष्ठेनें वागणारा.

न्याव्हिगेशन. इं. नौकापर्यटन.

### प

पाखाडी. को. भाग.

पादचारी. सं. पायांनीं चालणारा, पायीं फिरणारा.

पार्लमेंट. इं. राज्यव्यवस्था करणारी इंग्लंड देशांतील मंडळी.

पेटिजुरी. इं. सामान्य पंच.

पेटिसेशन. इं. साधारण फौजदारी कज्जे निवडण्याचें स्थान.

पेनिन्सुलर. इं. द्वीपकल्प.

पोलिस. इं. शहरचा बंदोबस्त ठेवणारे.

पोलिसकोर. इं. शहरचा बंदोबस्त ठेवणाऱ्या शिपायांचें लश्कर.

पोलिस मास्तर. इं. फौजदार, सरकारी कमावीसदार.

पोसखाना. हिं. जेवणावळ.

पोस्ट हपिस. इं. टपाल कारखाना.

पोस्त. सं. सणाच्या दिवशीं चाकर लोकांस बक्षीस देतात तें.

पौंड. इं. ढोरांचें तुरुंग.

प्रेस. इं. छापखाना.

प्रोफेसर. इं. पंडित, शास्त्री, गुरु, अध्यापक.

### फ

फरमान. फा. बादशहानें दिलेली सनद.

फरमीशन. हिं. एका जातीचा अफिणीचा कैफ.

फरोक्त. फा. विकून टाकणें.

फिन्यान्शिअल डिपार्टमेंट. इं. हशील, वसूल प्रकरणीचें खातें.

फी. इं. दस्तुरी, सरकारी देणें.

फ्याक्टरी. इं. अडत्याचा अड्डा, वखार.

फ्यामिली. इं. कुटुंब.

फ्रेंड. इं. मित्र.

फ्राईमशीन्. इं. कापूस साफ करण्याचें यंत्र.

| शब्द | अर्थ |
|---|---|

## ब

बकाली. अ. दुकानदार.

बतावी. इं. ब्याटेव्हिया. ही इंडीयनपासिफिक् महासागरांत जाव्हा म्हणून एक बेट आहे त्याची राजधानी.

बत्तीसेलड्डू. हिं. बत्तीसप्रकारचे पदार्थ व गरम मसाला घालून तयार केलेले लाडू. यांत गुंद वगैरे अनेकपदार्थ घालितात.

बंदरग्यांग. इं. बंदरांतील लोकांची टोळी.

बंदीगान अ. सन्मानित.

बंबेग्रीन. इं. मुंबईतील मैदान, चौक.

बब्बरजी. हिं. आचारी, सैपाकी.

बमुजिबे. फा. प्रमाणें.

बलून. इं. विमान, डबा, आकाशयान.

बाजार. मुं. मासळी.

बांबे आसोसिएशन्. इं. मुंबईची मंडळी, सभा.

बारिस्टर. इं. वरिष्ठ कोडतांतील वकील.

बारोनेट. इं. इंग्रज मानकऱ्याची एक पदवी.

बिल्डिंग. इं. हवेली.

बिशप इं. मुख्य पाद्री, देवळाचा अधिकारी.

बिलियार्ड टेबल्. इं. एका जातीचा इंग्रजी रिवाजाचा खेळ.

बुक. इं. चोपडी, दप्तर, पुस्तक.

बेअदबी. फा. अवमान.

बैबल्. इं. ख्रिस्ती धर्मशास्त्र.

बैबलसोसाइटी. इं. इंग्रजी धर्मपुस्तकें विकणारी मंडळी.

बोर्ड आफ् एज्यूकेशन. इं. सरकारी शिक्षाक्रमाचा बंदोबस्त ठेवणारी मंडळी.

ब्यांक. इं. पेढी.

ब्याकबे. इं. ब्याक (मागें), बे, बंदर शहराच्या पश्चिमेकडील बंदर.

ब्रीद. सं. ब्रिरीद.

## भ

भाट. म. वाडी, वतन.

भूपति. सं. राजा.

## म

मनवार. इं. लढाऊजहाज.

मर्तबा. फा. सत्कार, अधिकार, पदवी.

मलिकामाआझमा. अ. राज्य करणारी राणी.

मस्का. हिं. लोणी.

माजिस्ट्रेट. इं. न्यायाधीश, मनसुबदार.

मांदुस. म. पेटी, द्रव्य ठेवायाचा हडपा.

मामूलचाल. अ. वहिवाट.

मार्किट. इं. बाजार.

मार्किस. इं. इंग्रज मानकऱ्याची पदवी.

माळवें. म. भाजीपाला.

मिंटमास्तर. इं. टांकसाळेचा अधिकारी, नाणें पाडणार.

मिठ्ठो. हिं. मधूर, गोड.

मिशनरी. इं. प्रेषित, ख्रिस्तीधर्म प्रसार करणारा पाद्री.

मिस्तर. इं. साधारणसत्कार, राजश्री,

| शब्द | अर्थ |
|---|---|

मुस्तताब. अ. सन्मान.
मुफासील. फा. बाहेरगांवांतील.
मेक्यानिक्स इन्स्टिट्यूशन्. इं. यंत्रशास्त्राविषयीं विचार करणारी मंडळी.
मेडिकल्कालेज. इं. वैद्यशाळा, वैद्यशास्त्र-शिकण्याची पाठशाळा.
मेयर्सकोर्ट. इं. मुनसफअदालत.
मैल. इं. अर्धकोस, मैल.
मोसबेदारी. फा. जामीनगिरी, बहादारी.
मोहरम. अ. मुसलमानांचा महिना, ताबुताचे दिवस.
म्युनिसिपलकमिशनर. इं. शहराचा बंदोबस्त ठेवणारा.
म्यूझिअम्. ग्री. चमत्कारिक पदार्थ-संग्रहालय.

## य

युनिव्हर्सिटी. इं. पंडित शाळा, महान्-विद्या खातें.

## र

रजिस्टर. इं. नोंद, नोंदून ठेवलेला मजकूर.
रपोट. (रिपोर्ट). इं. हकीकत.
रायल्. इं मोठें, राजमान्य.
रिकार्डर्सकोर्ट. इं. न्यायाधिशाचें खातें.
रेलवे. इं. लोखंडी सडक.
रेवेरंड. इं. मान्य, धर्मोपदेशकाचा किंवा उपाध्यायाचा किताब, पाद्रीलोकांस लिहितेवेळीं रेवरेंड असें लिहिलें पाहिजे.
रेवेन्यु डिपार्टमेंट. इं. जमाबंदी खातें.
रोविंग्मशीन्. इं. पीळ पाडण्याचें यंत्र.

## ल

लार्ड. इं. स्वामी, धनी, मानकरी, प्रभु.
ले. गु. घे.
लेडी. इं. स्वामिणी, पत्नी, कुलीन स्त्री.
लेफ्नेंट. इं. लश्करांतील तिसऱ्या पदवींतील सरदार, कपतानाच्या खालची पदवी.
लैसेन्स. इं. परवानगी.
लोकोत्तर. सं. अद्भुत कृत्य.

## व

वर्ड्यां. (वर्ड्स्) इं. शब्द.
वाच. इं. लहानघड्याळ.
वासवते. को. वेळूचे कोंवळे कोंब, वंश.
व्यारियादोर्स. पो. जहागीरदार.
व्हालंटियरकोर. इं. स्वइच्छेनें पगार घेतल्याशिवाय शहराच्या हितासाठीं काम पडेल तेव्हां लष्करीकाम करण्यास सिद्ध झालेल्या लोकांचें लष्कर.
व्हैकौंट. इं. इंग्रज मानकऱ्याची एक पदवी आहे.
व्हैसराय. इं. राजप्रतिनिधि.

## श

श्यामकर्ण. सं. पुराणांतरीं वर्णिलेला घोडा.
शेखचिल्ली. फा. स्वच्छंदी, दांडगा, मनमौजी.

## स

सक्करमक्करनाकेक. गु. कणीक आणि साकरेची मिठाई करून पारशी लोक विकितात. हा पदार्थ साकरपाऱ्या-

| शब्द | अर्थ |
|---|---|

सारखा असतो व त्यांत अनेक तऱ्हा असतात. ( केक हा शब्द इंग्रजी आहे. त्याचा अर्थ पुरी किंवा पोळी असा होतो. )

संत्री इं. पलटणींतील पहारेकरी शिपाई.

सदरअदालत. अ. कंपनी सरकारचें न्यायखातें, मुख्य दिवाणी व फौजदारी इनसाफ करण्याचें खातें.

सफर. अ. समुद्रांतील प्रवास.

समान. इं. सरकारी सत्तेनें इनसाफ करून घेण्याचें पत्रद्वारा बलावणें.

सर. इं. साहेब, महाराज.

सरखेल. फा. अश्वाधिपति, अश्वसेनापति.

सव्हेंयर. इं. जमिनीची मोजदाद करणारे व जमिनी तपासून चौकशी करणारें.

साकरयावळी. गु. गाईच्या किंवा म्हशीच्या कोंवळ्या दुधाच्या खरवस.

साडला. गु. गुजराथी लोकांच्या रंगविलेल्या दहा हात साड्या.

साम्राज्य. सं. यथान्याय राज्य.

सालिगेट. इं. किल्ल्याचा लहान किंवा मागचा दरवाजा, दिंडी.

सिनियर. इं. मुख्य, श्रेष्ठ, वडील.

सिनोर. [ सियोर ] पो. साहेब. स्वामी.

सिविल. इं. दिवाणी.

सिविलपेमास्तर. इं. दिवाणीखात्यांतील खर्चाची वहिवाट ठेवणारा मुख्य.

सुप्रीमकोर्ट. इं. बादशाही अदालत, मुख्य कोडत.

सेक्रेटारी इं. चिटणीस.

| शब्द | अर्थ |
|---|---|

सेंट्रलबुकडीपो. इं. सरकारी पुस्तकें विकण्याचें मुख्य ठिकाण.

सेलर. इं. खलाशी, गाबती.

सेलर्सहोम. इं. इंग्रजनावाडी लोकांस राहण्याचें स्थान.

सेविंग. इं. संचय करणारी.

सेशन. इं. फौजदारी मोठ्या खटल्याची दर्यास करणारें न्यायखातें, न्यायसभा.

सोडावाटर. इं. थंडहोण्याचें वैद्यलोकांनीं तयार केलेलें पाणी.

सूतिकागृह. सं. बाळंत होण्याचें घर.

स्कूलआफइंडस्ट्री. इं. उद्योगशाळा, उद्योगशिकविण्याची शाळा.

स्क्रू. इं. लोखंडी पिळाचे खिळे, इस्क्रू.

स्टांपआक्ट. इं. छापील कागद घेण्याचा व छापेमारण्याचा कायदा. हा सन १८६० पासून सुरू झाला.

स्टीम. इं. वाफ.

स्टूडंटस् लिटररीएंड सायंटिफिक् सोसायटी. इं. विद्यार्थ्यांची ज्ञान आणि शास्त्रसंपादक मंडळी.

स्पिरिच्युअल. इं. ईश्वरसंबंधी, धर्मसंबंधी, आत्मसंबंधी.

स्पेलिंग. ( वर्ड्स् ). इं. शब्दवटिका.

स्मालकाझकोर्ट. इं. लहान दिवाणी खटल्याबाबत इनसाफ करण्याचें न्यायखातें, मुनसफ कोडत.

## ह

हजरत. अ. स्वामी, महाराज.

हमिन्या. फा. हमिनी. रुपयांची लहान पिशवी, ठेली.

| शब्द अर्थ |
|---|
| हाज. ( हज ) अ. मक्केची यात्रा. |
| हास्पिटल. इं. दवाखाना, औषधोपचार स्थळ. |
| हिज एक्सलेन्सी धि रैट आनराबल्. इं. उत्तम, गुणी व श्रेष्ठ, गव्हर्नराच्या पदवीच्या हुद्याचा माना. |
| हिय्या. हिं. धैर्य, हुशारी, इच्छा, मन, हौस. |
| हु. इं. कोण. |
| हुडे. सं. ढीग. |
| हेप्टेजिअन् एलंडस्. ग्री० ( हेप्टो ) सात ( हेलंडस् ) बेटें. सात बेटें. |
| हैकोर्ट. इं. मोठें न्यायखातें. |
| होरा. सं. शुभचिन्ह. |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
८५११८
८८३
१२११९

# मुंबईचें वर्णन

गोविंद नारायण

ह्यांनीं केलें.

## मुंबईंत

इंदुप्रकाश छापखान्यांत छापिलें.

शके १७८४.

इ० स० १८६३.

---

हें पुस्तक इ० स० १८४७ च्या २० व्या आक्टा प्रमाणें रजिस्टर केलें आहे. यावरून दुसऱ्या भाषेंत भाषांतर करण्याचा हक्क मालकानें आपणाकडे ठेविला आहे.

---

पहिल्या आवृत्तीचें मुखपृष्ठ ( मराठी )

# BOMBAY PAST AND PRESENT

AN

HISTORICAL SKETCH IN MARATHI.

WITH MAPS AND GLOSSARY.

BY GOVIND NĀRĀYAN

## BOMBAY:

PRINTED FOR THE AUTHOR AT THE INDU-PRAKASH PRESS.
1863.

Registered under Act XX. of 1847. The Right
of translation is reserved

पहिल्या आवृत्तीचें मुखपृष्ठ ( इंग्रजी )

परिशिष्ट २ :

To

# EDWARD I. HOWARD, ESQ. M. A.

Director of Public Instruction, Bombay.

Sir,

I most respectfully beg to dedicate this small volume to you as a humble token of gratitude for the boon you have conferred upon the people of Western India, by supplying, what had been long felt to be a desideratum, a series of excellent vernacular class books; for the liberal encouragement you have given to vernacular literature; and for the interest you take in advancing the general studies of my fellow-countrymen.

I remain,

Sir,

Your most obedient Servant,

GOVIND NĀRĀYAN.

---

पहिल्या आवृत्तीची इंग्रजी अर्पणपत्रिका

## गोविंद नारायण यांनीं केलेल्या ग्रंथांचीं नांवें

| | | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|---|
| १. | शुचिर्भूतपणा. तिसरी आवृत्ति. | ० | ३ | ० |
| २. | ऋणनिषेधक बोध. | ० | ३ | ० |
| ३. | सृष्टींतील चमत्कार. | ४ | ० | ० |
| ४. | हिंदू लोकांच्या रीति सुधारण्याविषयीं बोध. | ० | १ | ० |
| ५. | सत्यनिरूपण मराठी. दुसरी आवृत्ति. | ० | ५ | ० |
| ६. | सत्यनिरूपण गुजराथी. दुसरी आवृत्ति. | ० | ५ | ० |
| ७. | दारूपासून अनर्थ. | ० | ० | ३ |
| ८. | वृक्षवर्णन. | ० | ११ | ० |
| ९. | उद्भिदजन्यपदार्थ. | १ | २ | ० |
| १०. | नीतिसंवाद. | ० | १ | ० |
| ११. | व्यवहारोपयोगी नाटक. दुसरी आवृत्ति. | ० | २ | ० |
| १२. | लोखंडी सडकांचे चमत्कार. | ० | २ | ० |
| १३. | उद्भिदपदार्थ. गुजराथी. | १ | २ | ० |
| १४. | भोजनबंधू पानतंबाखू. | ० | ३ | ० |
| १५. | सुलेखन विद्या. | ० | ३ | ० |
| १६. | मुंबईचें वर्णन. | ३ | ८ | ० |
| १७. | रोमशहराचा संक्षिप्त इतिहास. रा. वासुदेव कृष्ण झाले यांनीं केलेला, शुद्ध केला. | ० | १२ | ० |
| १८. | कुटुंब सुधारणा | ० | २ | ० |
| १९. | पत्रावळी व द्रोण | ० | १ | ० |

---

क्रमांक १ ते १७ या ग्रंथांचीं नांवें मूळ पुस्तकावरून घेतलीं असून क्रमांक १८–१९ हीं नांवें श्री. शं. ग. दाते यांच्या मराठी ग्रंथसूचीवरून घेतलीं आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

अ. क्र

क्रमांक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा

अ. क्र ........ विभाग ........

क्रमांक ........ नों. दि. ........